टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,पुणे

तात्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास
विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवीसाठी
सादर केलेला शोधप्रबंध

# "सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या विकासातील योगदान" (१९२४ -२०१०)


संशोधक
श्री.दत्तात्रय निवृत्ती कांबळे

मार्गदर्शक
प्रा.डॉ.त्रिंबक भिमराज राजदेव
सहयोगी प्राध्यापक
इतिहास विभाग
सहकारमहर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालय,
संगमनेर,ता.संगमनेर,जि.अहमदनगर.


सप्टेंबर -२०१७

# प्रतिज्ञा प्रमाणपत्र

मी **श्री दत्तात्रय निवृत्ती कांबळे** असे प्रतिज्ञापुर्वक जाहीर करतो की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, तात्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखातंर्गत इतिहास विषयातील पीएच.डी. पदवी करिता सादर केलेला **"सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या विकासातील योगदान" (१९२४-२०१०)** या विषयावरील शोधप्रबंध मी स्वतः लिहिलेला असून तो पूर्णपणे स्वतंत्र आहे. या प्रबंधात आवश्यक तेथे पूर्वसूरींच्या मताची ऋणनिर्देशपूर्वक नोंद केलेली आहे. हा शोधप्रबंध मी इतर कुठल्याही पदवीसाठी किंवा अन्य परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

**ठिकाण :** साकूर,ता.संगमनेर,
जि.अहमदनगर.

**दिनांक :** / /२०१७

**श्री.दत्तात्रय निवृत्ती कांबळे**
संशोधक

## प्रमाणपत्र

मी असे प्रमाणित करतो की, **श्री दत्तात्रय निवृत्ती कांबळे** हे **"सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या विकासातील योगदान" (१९२४-२०१०)** या विषयावरील शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, इतिहास विषयांतर्गत विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी सादर करीत आहे.

प्रस्तुत प्रबंध हा श्री.दत्तात्रय निवृत्ती कांबळे यांचा स्वतःचा आहे. त्यासाठी त्यांनी अस्सल विश्वासनीय साधनांचा वापर केला असून तो माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्ररित्या लिहिला आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,पुणे इतिहास विषयांतर्गत विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीच्या पूर्ततेसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठिकाण :**संगमनेर,
जि.अहमदनगर.
**दिनांक :** / /२०१७

**मार्गदर्शक**
**प्रा.डॉ.त्रिंबक भिमराज राजदेव**
सहयोगी प्राध्यापक,इतिहास विभाग
सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात
महाविद्यालय, संगमनेर,जि.अहमदनगर.

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या इतिहास विषयातील पीएच.डी. पदवीसाठी **"सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या विकासातील योगदान" (१९२४-२०१०)** या विषयावर शोध प्रबंध सादर करताना मला विशेष आनंद होत आहे. भाऊसाहेबांच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकिय कार्याचा आढावा व त्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाच्या विकासातील त्यांचे योगदान या संदर्भात प्रस्तुत प्रबंधात शोध घेण्याचा मी प्रयत्न केला. प्रस्तुत प्रबंध सादर करण्यासाठी ज्या संस्था व व्यक्तींनी मला मौलिक मार्गदर्शन व साहय केले त्यांचा किमान नामनिर्देश केल्याने व काहीसे वचनपूर्तीचे समाधन मिळते.

माझ्या प्रबंधाचा विषय **"सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या विकासातील योगदान" (१९२४-२०१०)** हा आहे. मी हा विषय निवडण्याचे कारण भाऊसाहेबांनी सहकाराच्या माध्यमातून फक्त जोर्वे गाव व संगमनेर तालुक्याचाच नव्हे तर अहमदनगर जिल्हयाचा सामाजिक, आर्थिक, राजकिय विकास घडवुन आणण्यात योगदान दिले आहे. त्यांचे हे कार्य पाहून त्यांच्या कार्यावर मी पीएच.डी. प्रबंध लिहिण्याचे निश्चित केले. पीएच.डी. प्रबंधाकरीता हा विषय निश्चित करण्यात माझे मार्गदर्शक आदरणीय गुरु डॉ. त्रिंबक भिमराज राजदेव सरांनी मोलाचे सहकार्य केले. माझ्या विषयाच्या अभ्यासाकरिता त्यांचे मला मार्गदर्शन लाभले हे मी माझे भाग्य समजतो. तसेच सौ. संगिता त्रिंबक राजदेव मॅडम यांनी मला संशोधन कार्यासाठी वेळोवेळी प्रोत्साहन दिले. आदरणीय गुरुवर्य डॉ.त्रिंबक राजदेव सर यांच्या मार्गदर्शनामुळेच मी हा प्रबंध लवकर पूर्ण करु शकलो. त्याबद्दल त्यांच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करतो.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिक शास्त्र विभागाचे अधिष्ठाता डॉ.बी.डी. कुलकर्णी, इतिहास विभाग प्रमुख डॉ.नलिनी वाघमारे मॅडम तसेच डॉ.स्वराली कुलकर्णी व विद्यापीठातील पीएच.डी. संशोधन विभाग प्रमुख डॉ.पौर्णिमा वाटे मॅडम यांनी वेळोवेळी मार्गदर्शन करुन माझ्या संशोधन कार्यास बहुमोल सुचना दिल्या. त्याबद्दल मी सर्वांचा फार फार आभारी आहे.

मी भाऊसाहेबांच्या कार्यावर पीएच.डी. करत आहे. हे समजल्यानंतर भाऊसाहेबांचे चिरंजीव आणि महाराष्ट्र राज्याचे माजी महसुलमंत्री व विद्यमान आमदार मा.बाळासाहेब भाऊसाहेब थोरात यांनी सर्वोतोपरी सहकार्य करुन मला भाऊसाहेबांच्या कार्यावर पीएच.डी. करण्यास अनुमती दिली. त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. प्रसंगपरत्वे भाऊसाहेबांच्या घरी जावे लागले. त्यांच्या कुटुंबातील सर्वांनी मला घरातीलच एक मानले. विशेषतः आदणीय पंडीत तात्या थोरात, माननीय आमदार बाळासाहेब थोरात, सौ.कांचनताई थोरात, सहयाद्री बहुजन विद्या प्रसारक समाज संस्थेचे चेअरमन विद्यमान आमदार मा.डॉ.सुधीरजी तांबे, सौ.दुर्गाताई सुधीर तांबे नगराध्यक्षा संगमनेर यांच्या बरोबर झालेल्या चर्चेचा फार उपयोग झाला. त्याबद्दल त्यांचे आभार मानने मी माझे कर्तव्य समजतो.

भाऊसाहेब थोरात यांना संगमनेर आणि अहमदनगर जिल्हयाच्या राजकिय आर्थिक, सामाजिक विकासात खंबीर साथ देणारे अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक व साकूर गावचे भुमिपुत्र मा.श्री.बाजीराव पाटील खेमनर, साकुर गावचे आदर्श सरपंच आणि कृषी उत्पन्न बाजार समिती संगमनेर सभापती मा.श्री.शंकरराव हनुमंता पा.खेमनर यांनी मला वेळोवेळी बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य केले त्याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे.

तसेच संगमनेर भाग सहकारी साखर कारखान्याचे संचालक व सहयाद्री बहुजन विद्या प्रसारक समाज या संस्थेचे संचालक मा.श्री. अशोकराव बाजीराव पाटील खेमनर यांनी मला वेळोवेळी बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य केले त्याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे. तसेच सहयाद्री बहुजन विद्या प्रसारक समाज या संस्थेचे सेक्रेटरी मा. मा.चंद्रकांत पा.कडलग, सह.सेक्रेटरी मा.तुळशीराम भोर, खजीनदार मा.श्री. लक्ष्मणराव कुटे, रजिस्ट्रार मा.श्री.बाबुराव गंवादे, सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.के दातीर, उपप्राचार्य नवले सर,उपप्राचार्य थोरात सर या सर्वांनी मला माझ्या कामात प्रोत्साहन दिले त्याबद्दल मी सर्वांचा अत्यंत ऋणी आहे.

तसेच माझे वडील तिर्थरुप श्री.निवृत्ती कांबळे, आई सौ. इंदूबाई यांचे आशिर्वाद, बंधु संजय, राजेंद्र, विजय, संतोष, संदिप, श्रीराम कल्याणकर, सौ.रुपाली श्रीराम कल्याणकर, राजेंद्र कल्याणकर यांचा सदैव पाठिंबा व साहय तसेच माझा प्रबंध पूर्ण करण्यात मला मोलाचे साहय केले. ती माझी पत्नी सौ. सविता हिने घरची पूर्ण जबाबदारी सांभाळुन मला कामात सहकार्य केले त्याबद्दल सर्वांचे आभार शब्दांतीत आहेत. तसेच श्री.आनंदराव पोटे

साहेब, श्री.विठ्ठलराव थोरात साहेब यांनी मला वेळोवेळी प्रोत्साहन दिले त्याबद्दल त्यांचाही मी फार फार ऋणी आहे.

माझे विभाग प्रमुख गुरुवर्य आदरणीय प्रा.नामदेवराव ढोणे यांनी संशोधन कार्यास सतत मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले. त्याबद्दल मी त्यांचा ही ऋणी आहे. तसेच एस.एम.बी.एस.टी महाविद्यालयातील माझ्यावर मनापासून प्रेम करणारे व सहकार्य करणारे अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.सुहास आव्हाड, वाणिज्य शाखा विभाग प्रमुख प्रा.तुळशीराम जाधव, प्राणीशास्त्र विभागाचे प्रा.लक्ष्मण घायवट तसेच प्रा. संतोष खामकर, श्री.विनायकराव वाकचौरे, सर्व प्राध्यापक व प्राध्यापिकेत्तर सेवकांचे प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष सहकार्य मिळाले त्याबद्दल त्यांचाही मी आभारी आहे.

संगमनेर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.देशमुख के.के.,उपप्राचार्य डॉ.तासिलदार बी.आर.,योग विभाग प्रमुख डॉ.वामन आर.आर. यांचाही मी आभारी आहे. तसेच श्री.वाडेकर जालिंदर जिजाबा- योगशिक्षक, योग व निसर्गउपचार केंद्र, उरुळी कांचन, संगमनेर महाविद्यलयातील योग सेंटरचे श्री.वाडेकर सर, पथवे सर यांचेही मी आभार मानतो. तसेच संशोधन कार्यास सतत प्रोत्साहन देणारे माझे परममित्र प्रा.शिरोळे सर, गणेश पेंडभाजे, गणेश राजदेव, डॉ.निलेश पोटे, हेमंत पोटे, सागर राजदेव यांचाही मी आभारी आहे. तसेच बी.एस.टी. महाविद्यालयाच्या ग्रंथपाल सौ.स्वाती सुर्वे मॅडम, सहाय्यक श्री. बाळासाहेब गोपाळे, श्री.गोरे एम.एच., संगमनेर महाविद्यालयातील ग्रंथपाल श्री.चव्हाण एस.एस. तसेच टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील ग्रंथालय, मुंबई शासकीय अभिलेखागार, अहमदनगर जिल्हा ऐतिहासिक वस्तु संग्राहालयाचे श्री.यादव सर या सर्वांनी संदर्भग्रंथ, जुनी कागदपत्रे, व दैनिके उपलब्ध करुन दिली त्याबद्दल मी या सर्वांचा आभारी आहे. तसेच पीएच.डी. चा हा प्रबंध मला वेळेवर अचुक टाईप करुन देणारे विजय कॉम्प्युटर लोणी,ता.राहाता, जि.अहमदनगर चे संचालक श्री.विजय वामनराव भोसले यांचाही मी आभारी आहे.

**ठिकाण :**संगमनेर,
जि.अहमदनगर.

**दिनांक :** / /२०१७

**श्री.दत्तात्रय निवृत्ती कांबळे**
संशोधक

## अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | पार्श्वभूमी | १ ते २५ |
| २ | अहमदनगर जिल्हयाची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी | २६ ते ५८ |
| ३ | भाऊसाहेबांचे जीवनचरित्र | ५९ ते १०२ |
| ४ | भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या राजकीय विकासातील योगदान | १०३ ते १५२ |
| ५ | भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या सामाजिक विकासातील योगदान | १५३ ते २०३ |
| ६ | भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान | २०४ ते २८३ |
| ७ | सिंहावलोकन | २८४ ते ३०० |
| | संदर्भ ग्रंथसुची | ३०१ ते ३११ |
| | परिशिष्टे | ३१२ ते ३३३ |

# प्रकरण : पहिले
# पार्श्वभूमी

## प्रकरण पहिले

# पार्श्वभुमी

१.१ विषयप्रवेश

१.२ संशोधन विषयाचे महत्व

१.३ संशोधन विषयाची निवड

१.४ संशोधनाची उद्दिष्टे

१.५ संशोधनाची गृहितके

१.६ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

१.७ संशोधनाची सिध्दांतिक संकल्पना

१.८ संशोधन पध्दती

१.९ संशोधनाची संदर्भ साधने

१.१० संशोधन विषयाशी संबधीत संशोधन किंवा पूर्वसुरींनी केलेल्या ऐतिहासिक मांडणीचा आढावा.

१.११ प्रस्तुत प्रबंधाचे प्रकरणानुसार स्वरुप

संदर्भ

# प्रकरण : पहिले

# पार्श्वभुमी

## १.१ विषयप्रवेश :-

इतिहास लेखनाची स्थानिक इतिहास लेखन ही एक महत्वाची शाखा असूनही संशोधक स्थानिक इतिहास लेखनाकडे बऱ्याच वेळा दुर्लक्ष करतात. मी माझ्या पीएच.डी. संशोधनाकरिता स्थानिक इतिहासलेखन शाखेचा एक भाग म्हणून "सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या विकासातील योगदान (१९२४-२०१०)" हा विषय निवडला आहे.

राष्ट्रीय इतिहासात महत्वाच्या असणाऱ्या मुख्य घटनाच इतिहासकार समाजासमोर मांडतो. पण त्या घटनांवर परिणाम करणाऱ्या व प्रभाव टाकणाऱ्या इतर महत्वाच्या पण सामान्य घटना दुर्लक्षित होत असतात. बऱ्याच वेळा आपणास जगाचा, देशाचा, राज्याचा इतिहास माहित असतो. पण स्थानिक इतिहास माहित नसतो. इतिहासकार डॉ. प्रभाकर देव यांनी आपल्या इतिहासशास्त्र लेखन, परंपरा, संशोधन, अध्यापन या ग्रंथात स्थानिक, इतिहास लेखनाचे महत्व स्पष्ट करताना स्थानिक इतिहासाच्या संशोधनाची गरज स्पष्ट केली आहे[१], इतर प्राण्यांपेक्षा समाजप्रिय असणाऱ्या मानवी प्राण्यांचा बौध्दिक विकास मोठया प्रमाणात झाला आहे. यामुळे भूतकाळातील घटना व निसर्गातील घटना जाणून घेण्याचा तो प्रयत्न करतो. निसर्गातील निरंतर माहिती घेत असताना विश्वातील अनेक पैलू उजेडात येत असतात. या पेलूंचा अभ्यास वेगवेगळया सामाजिक शास्त्र विद्याशाखांमधून केला जातो. त्याचप्रमाणे इतिहास या सामाजिक शास्त्रशाखेअंतर्गत इतिहास लेखन शास्त्रातून तिचे प्रस्तुतीकरण होत असते. स्थळ, काळ, आणि व्यक्ती हे इतिहासाचे तीन अनुबंध आहेत. मानवी जीवनाच्या घडामोडींचा अभ्यास इतिहासात केला जातो. फ्रान्सिस बेकन या इतिहासकाराने म्हटल्याप्रमाणे "मानवाला शहाणा बनविणारी विद्याशाखा म्हणजे इतिहास" त्याप्रमाणे इतिहास ही मानवाच्या कल्याणाच्या व विकासाच्या दृष्टीने उपकारक ठरणारी ज्ञानशाखा आहे[२].

इतिहासाचा मानवी जीवनाशी अतिशय निकटचा सबंध आहे. गतकालीन मानवी जीवनाचा तो आरसा आहे. त्यातील महत्वपूर्ण लक्षवेधी घटनांचा इतिहास हा सामाजिक शास्त्राचा आलेख असल्यामुळे वस्तूतः या विषयाचे अध्ययन रोचक व रंजक असते. मानवी

जीवन जसे चित्रचित्त आहे. त्याचप्रमाणे त्याची कथा देखील मनोरंजक आहे. नवे ज्ञान प्राप्त करण्याची तीव्र इच्छा ही मानवाची उपजत प्रवृत्ती असल्यामुळे आपले पूर्वज कसे होते त्यांची जीवनपध्दती कशी होती हे जाणून घेण्याची जिज्ञासा प्रत्येक व्यक्तीला, समाजाला व राष्ट्राला असते. मानवाचा हा परिचय इतिहासाद्वारे होतो. त्यामुळे जिज्ञासा पुर्तीचा आनंद मिळतो. इतिहास गतकालीन संस्कृतीचा वारसा जपतो व त्याद्वारे प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक कालखंडाची जाणीव करुन देतो आणि अशा प्रकारचे आत्मज्ञान इतिहास मानवाला करुन देतो.[३]

इतिहासकार गतकाळाला सजीव करण्याचा प्रयत्न करतात. गतकाळातील घटना या निर्जीव असतात. त्यांना सजीव करुन सुसंगतपणे एकत्र मांडण्याचा प्रयत्न इतिहासकार करत असतो. इतिहास म्हणजे इति + ह + आस= असे घडले म्हणजे भूतकाळात घडलेल्या घटना जशाच्या तशा देणे हाच इतिहासाचा मुख्य उद्देश असतो. सुप्रसिध्द् इंग्रज इतिहासकार कालाईलच्या मते "इतिहास म्हणजे श्रेष्ठ व्यक्तीची चरित्रे व त्यांनी केलेली कामगिरी होय". ही व्याख्या मर्यादित असली तरी पूर्णपणे अर्थहीन अथवा चुकीची आहे असे म्हणता येत नाही. कारण काही व्यक्ती आपल्या विचाराने व कार्याने आपला ठसा उमटून जातात.[४]

इतिहासामध्ये स्थळ, काळ, आणि व्यक्ती यांना अनन्यसाधारण महत्व आहे. जगातील प्रत्येक देशाला भूगोल असतो परंतु भारत मात्र भाग्यवान देश आहे. भारतास भौगोलिक व ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. महाराष्ट्र हे भारतातील एक राज्य असल्याने त्यासही भौगोलिक व ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर जिल्हाही त्यास अपवाद नाही. या जिल्हयाला ही भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे.

आधुनिक भारताच्या इतिहासात भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाला अनन्यसाधारण महत्व आहे. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात पंजाब आणि बंगाल प्रांताप्रमाणे महाराष्ट्र राज्यही आघाडीवर होते. या महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर जिल्हयाने भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात महत्वपूर्ण योगदान दिले आहे. असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ, चलेजाव चळवळीत अहमदनगर जिल्हयातील स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान महत्वपूर्ण राहिले आहे. जंगल सत्याग्रहाने तर अहमदनगर जिल्हयातील संगमनेर व अकोले परिसराने भारताच्या नकाशावर आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. त्याचप्रमाणे इ.स.१९४२ च्या

छोडो भारत चळवळीतही जिल्हयातील स्वातंत्र्य सैनिकांनी महत्वपूर्ण कामगिरी केली. त्यात निसाळ गुरुजी, अच्युतराव पटवर्धन, रावसाहेब पटवर्धन, दादा चौधरी, अण्णासाहेब शिंदे, भास्करराव दूर्वे नाना, कॉ.पी.बी.कडू, भाऊसाहेब थोरात, धर्मा पोखरकर, विनायकराव ताकटे, आण्णासाहेब कदम, बाबुराव दादा तनपुरे, बाबुजी आव्हाड, दादापाटील राजळे, आबासाहेब काकडे, बाबुमियाँ बॅण्डवाले, रावसाहेब शिंदे, रेवजी दिघे, राम नागरे, पांडुरंग गोपाळा भांगरे, भैय्यासाहेब कुलकर्णी आदि स्वातंत्र्य सैनिक भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात सक्रिय होते.

भारत देश ब्रिटिशांच्या पारतंत्र्यातून १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र झाल्यानंतर जमिनदार व सावकारशाहीच्या पाशातून सर्वसामान्य जनतेची मुक्तता करण्यासाठी अण्णासाहेब शिंदे यांच्या नेतृत्वाखाली भाऊसाहेबांनी पुढाकार घेतला. स्वातंत्र्याच्या पूर्व संध्येला विडी मजुर कामगारांची संघटना स्थापन करुन त्यांना न्याय मिळवुन देण्यात महत्वपूर्ण योगदान दिले आहे. त्याचप्रमाणे स्वातंत्र्योत्तर काळातही या स्वातंत्र्य सैनिकांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सहकाराच्या क्षेत्रातील कार्याने एक वेगळीच छाप पाडली होती.

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात आणि त्यानंतर स्वातंत्र्योत्तर काळात झालेली डावी चळवळ, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन, सहकार चळवळ यात अहमदनगर जिल्हयाने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. अहमदनगर जिल्हयाची ओळख निर्माण करण्यात कॉ.चंद्रभान आठरे पाटील, कॉ.एकनाथ भागवत, कॉ.आण्णासाहेब शिंदे, कॉ.पी.बी.कडू, कॉ.दत्ता देशमुख, कॉ.भास्करराव औटी, पद्मश्री विठ्ठलराव विखे, मारुतराव घुले पाटील, कॉ.भाऊसाहेब थोरात, कॉ.शंकरराव काळे, कॉ.शंकरराव कोल्हे, कॉ.कारभारी भिकाजी रोहमारे, कॉ.आप्पासाहेब राजळे, कॉ.गोपाळराव सोले पाटील, कॉ.बाळासाहेब भारदे, जिल्हयातील हे नेते आघाडीवर होते. त्यापैकीच एक स्वातंत्र्यसेनानी म्हणजे सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात होय. जोर्वे गावचे सुपुत्र भाऊसाहेब थोरात हे संगमनेर येथे माध्यमिक शिक्षण घेत असतानाच इ.स.१९४२ च्या छोडो भारत आंदोलनातील सहभागातुन सहकाऱ्यांच्या बरोबरीने संगमनेर, अकोले तालुक्यात सोबोटाज (विध्वंसक) कार्यक्रमांतर्गत टेलिफोनच्या तारा तोडणे, खाब मोडणे, पोस्ट ऑफिस उध्वस्त करणे, रस्त्यात झाडे आडवे पाडणे, खड्डे खोदणे, पुल पाडणे, लोकजागृतीचे काम, पत्रके वाटणे, जनतेस चिथावणी देणे, शासकीय कामात अडथळे निर्माण करणे असा विध्वंसक कार्यक्रम म्हणजे सोबोटाज कार्यक्रम

होय. असे कार्य करु लागले असता शेवटी इ.स.१९४३ च्या जानेवारीमध्ये भाऊसाहेबांना अटक होऊन १५ महिने नाशिक सेंट्रल जेलमध्ये तुरुंगवास भोगणे भाग पडले. दि.०१ एप्रिल १९४४ रोजी नाशिक सेंट्रल जेलमधुन सुटका झाल्यानंतर कम्युनिस्ट विचाराने प्रेरित होऊन सावकारशाही, विडी कामगारांचे प्रश्न, तसेच ब्रिटिश राजवटीविरुध्द कार्य चालु होते.[५]

स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही भाऊसाहेब कम्युनिस्ट विचाराने अहमदनगर जिल्हयाचा सर्वांगीण विकास करु शकत नाही. हे ओळखून त्यांनी इ.स. १९५२ साली आपल्या कम्युनिस्ट विचाराला आळा घालत सहकाराचा वसा घेतला आणि या सहकार चळवळीच्या माध्यमातून जोर्वे गावाच्या आणि संगमनेर तालुक्याच्या विकासाबरोबर अहमदनगर जिल्हयाचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, अहमदनगर जिल्हा सहकारी बॅक या बँकांचे भाऊसाहेब चेअरमन असतांना तसेच सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात सहकारी साखर कारखाना संगमनेर, राजहंस दूध संघ, भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँक, गरुड कुक्कुटपालन संस्था आदी सहकारी संस्थांची भाऊसाहेबांनी स्थापना केली. या संस्थाच्या माध्यामातुन अहमदनगर जिल्हयात सहकाराचा एक नवा आदर्श निर्माण करणारे भाऊसाहेब हे एक वेगळे व्यतीमत्व म्हणुन ओळखले जाते.

त्याचप्रमाणे संगमनेर तालुक्यतील शेतकरी, लघुउदयोजकाप्रमाणेच अहमदनगर जिल्हयातील अल्पभूधारक शेतकरी, लघुउदयोजक यांना महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँक या सहकारी बँकांचे भाऊसाहेब चेअरमन असतांना त्यांनी या पदाचा उपयोग आपण ज्या समाजातुन पुढे आलो आहोत. त्या समाजाच्या विकासासाठी केला. आणि विविध योजनेअंतर्गत अल्प व्याजदराने कर्ज पुरवठा करण्याचे धोरण यशस्वीपणे राबविले. तसेच इ.स.१९७८ साली संगमनेर विधानसभा मतदार संघातुन आमदार झाल्यानंतर उत्तर अहमदनगर जिल्हयाला वरदान ठरणारे निळवंडे धरण मंजुर करुन घेतले. तसेच अनेक छोटे मोठे बंधारे यांना मंजुरी मिळवुन जिल्हयातील शेतीला पाणी पूरवठा करण्याचे धोरण अवलंबिले. याशिवाय जिल्हयातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मिटर ऐवजी अश्वशक्तीनुसार विजबिल आकारले जावे यासाठी काढलेल्या मोर्चात मोठया संख्येने शेतकरी सहभागी झाले. शेवटी सरकारला शेतीपंपावरील विज बील मीटर ऐवजी अश्वशक्तीनुसार आकारण्याचा निर्णय घेणे भाग पडले. तसेच कर्जाचा व्याजदर कमी करावा या मागणीसाठी

मुंबई येथील भारतीय रिझर्व्ह बँकेच्या शाखेवर ५००० शेतकऱ्यांचा टिकुरे मोर्चा त्यांनी नेला असता शेवटी बँकेने व्याजदर कपात करण्याचे धोरण अवलंबिले होते.[६]

भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हा मराठा शिक्षण संस्था, सहयाद्री बहुजन विद्याप्रसारक संस्था, संगमनेर, अमृतवाहिनी शेती आणि शिक्षण विकास संस्था संगमनेर या संस्थाच्या माध्यमातुन जिल्हयातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. तसेच अहमदनगर जिल्हयाच्या विकासात सहकार चळवळीच्या माध्यमातून महत्वाची भूमिका बजावली होती.

**सोबोटाज अर्थ :-** विध्वंसक कृत्य करणे, शासकीय कार्यावर बहिष्कार, आक्रमक धोरणाचा अवलंब करणे म्हणजे सोबोटाज होय.

अशी ही संगमनेर तालुक्यातील जोर्वे या खेडेगावी सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेली एक व्यक्ती स्वातंत्र्यपूर्वकाळात देशाला ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्याच्या ध्येयाने प्रेरीत होऊन जिल्हयात ब्रिटिश सरकारविरोधी कार्य करत होती. तर स्वातंत्र्यप्राप्ती नंतरही आपण ज्या समाजातुन पुढे आले त्या समाजाच्या विकासासाठी आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रात सातत्याने जीवनाच्या अंतापर्यंत कार्य करत होती. अशा या अहमदनगर जिल्हयातील सहकारातील महान व्यक्तीमत्वाचा जीवनपरिचय समाजाला व्हावा तसेच येणा-या भावी तरुण पिढीला दिपस्तंभासारखे असणारे भाऊसाहेब थोरात यांचे कार्य समाजापुढे यावे या हेतुने इतिहासकार स.म.गर्गे यांनी म्हटल्याप्रमाणे "अंधार दिसेल तेथे बॅटरी मारा" या उक्तीप्रमाणे मी माझ्या पीएच.डी. संशोधनाकरीता "सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या विकासातील योगदान (१९२४ ते २०१०)" हा विषय निवडला आहे. हा विषय व्यक्तीचरित्रात्मक असुन सर्वांना प्रेरणा देणारा आहे. एक व्यक्तीचरित्र म्हणून विचार केल्यास भाऊसाहेबांचे कार्य उल्लेखनिय असेच होते.[७]

## १.२ संशोधन विषयाचे महत्व

इतिहास लेखनाच्या प्रक्रियेत व्यक्ती आणि समाज यांना महत्वाचे स्थान असायला हवे असे आग्रहाचे प्रतिपादन इंग्रज इतिहास संशोधक टॉयन्बी यांनी केले आहे. समाज जीवनात एखाद्या ध्येयनिष्ठ व्यक्तीने सेवेच्या भावनेतून सामाजिक कार्य करण्याचे ठरविले तर

कसे परिवर्तन घडू शकते याचा आदर्श भाऊसाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्हयाचा सर्वांगिण विकास साध्य करुन समाजापुढे ठेवला आहे.

अहमदनगर जिल्हयाच्या राजकिय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात काम करत असताना कार्यकर्त्याच्या अंगी कोणते गुण असावेत हे भाऊसाहेब थोरात यांच्या कार्यातून सिध्द होते. जगाच्या इतिहासात भारतीय स्वातंत्र्य चळवळीला अनन्यसाधारण महत्व आहे. या स्वातंत्र्य चळवळीतील इ.स.१९४२ च्या छोडो भारत आंदोलनास भारतीय स्वातंत्र्य चळवळीत अनन्य साधारण महत्व आहे. या स्वातंत्र्य लढयात भाऊसाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्हयातील स्वातंत्र्य सैनिकांचे नेतृत्व केले होते. अहमदनगर जिल्हयात ब्रिटीश सरकार विरोधी सोबोटाज कार्यक्रम अर्थ विध्वसंक कृत्य करणे म्हणजे सोबोटाज कार्यक्रम होय. या अंतर्गत रस्ते अडथळे करणे, शासकीय कार्यालयावर आक्रमण करणे, लुटमार असे आक्रमक धोरण रावबुन अहमदनगर जिल्हयातील शासकिय यंत्रणा कमकुवत केली होती. त्यात भाऊसाहेबांना अटक होऊनही ते आपल्या ध्येयापासून दूर न जाता सुटकेनंतर कम्युनिस्ट विचाराने प्रभावित होऊन अधिक आक्रमकपणे स्वातंत्र्य प्राप्तीसाठी कार्य केले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही कम्युनिस्ट पक्षाच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाचा विकास साध्य करण्याचा प्रयत्न केला. परंतु कम्युनिस्ट मार्गाने जिल्हयाचा सर्वांगिण विकास साध्य होऊ शकत नाही हे लक्षात घेऊन सहकाराच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाचा सर्वांगिण विकास घडवून आणण्यात महत्वपूर्ण योगदान दिले. भाऊसाहेब थोरात यांचे स्वातंत्र्य चळवळीतील कार्य, स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अहमदनगर जिल्हयाच्या राजकिय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रातील कार्याचा सखोल व चिकित्सक अभ्यास प्रस्तुत शोध प्रबंधात करण्यात आला आहे.

## १.३ संशोधन विषयाची निवड

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत भाऊसाहेबांचे योगदान महत्वपुर्ण होते. स्वातंत्र्यपूर्व काळातही स्वातंत्र्यासाठी भाऊसाहेबांनी संघर्ष केला. तर स्वातंत्र्योत्तर काळातही एक सामाजिक बांधीलकी समजून जन्मभूमी असणाऱ्या अहमदनगर जिल्हयात सहकार रुजवून जिल्हयाच्या आर्थिक, सामाजिक, राजकिय, शैक्षणिक क्षेत्रात महत्वपुर्ण भूमिका निभावली. त्यांचे हे कार्य जिल्हयाच्या सर्वांगिण विकासासाठी बहुमोल ठरले आहे. त्यांचे कार्य भावी पिढीला प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरणारे असल्याने ते संशोधक पध्दतीने समाजापुढे मांडणे

आवश्यक आहे. म्हणूनच मी "सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या विकासातील योगदान" (१९२४-२०१०) हा विषय शोध प्रबंधासाठी निवडला आहे.

## १.४ संशोधनाची उद्दिष्टे :-

संशोधन ही दिर्घकालीन प्रक्रिया आहे. ती एक तपश्चर्या आहे. संशोधकाला नवे ज्ञान मिळविण्याची तीव्र इच्छा, जिज्ञासा, नव्या ज्ञानप्राप्तीची लालसा ही संशोधकांची प्रेरणाशक्ती असते. तसेच संशोधन ही एक बौध्दीक प्रक्रिया असून तिच्याद्वारे नवीन ज्ञान प्रकाशात आणले जाते. किंवा जुन्या ज्ञानातील उणिवा दूर करुन त्यात नवीन भर घातली जाते. संशोधनाचे ही उद्दिष्टे भाऊसाहेब थोरात यांच्या कार्यातून साध्य होत असल्याने या संशोधन कार्यास पुर्णत्व प्राप्त होण्यासाठी प्रस्तुत शोध प्रबंधासाठी खालीलप्रमाणे उद्दिष्टे समोर ठेवण्यात आली आहेत.

१) भाऊसाहेब थोरात यांच्यासारख्या प्रगल्भ व्यक्तिमत्वाच्या कार्याचा संशोधनात्मक समग्र अभ्यास होणे आवश्यक आहे.
२) भाऊसाहेब थोरात यांच्या स्वातंत्र्यचळवळीतील योगदानाचा अभ्यास करणे.
३) अहमदनगर जिल्हयात सहकाराचे बिजारोपण करण्यातील भाऊसाहेबांच्या योगदानाचा आढावा घेणे.
४) भाऊसाहेब महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष असतांनाच्या कार्याचा आढावा घेणे.
५) भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून जिल्हयाच्या केलेल्या विकासाचा आढावा घेणे.
६) भाऊसाहेबांचे अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील कार्याचा आढावा घेणे.
७) भाऊसाहेबांनी सहकारी संस्थांच्या माध्यमातून नगर जिल्हयाच्या केलेल्या आर्थिक विकासाचा आढावा घेणे.

## १.५ संशोधनाची गृहितके

"सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या विकासातील योगदान (१९२४-२०१०)" या विषयावर संशोधन करताना खालील गृहितके निश्चित केलेली आहेत.

१) स्वातंत्र्य चळवळीत भाऊसाहेबांचे योगदान महत्वपूर्ण आहे.

२) शेतकरी, विडी कामगाराच्या उन्नतीसाठी भाऊसाहेबांचे योगदान महत्वपूर्ण आहे.

३) अहमदनगर जिल्हयात सहकार रुजविण्यातील भाऊसाहेबांचे योगदान महत्वपूर्ण आहे.

४) भाऊसाहेबांचे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील योगदान जिल्हयाच्या विकासासाठी महत्वपूर्ण ठरले आहे.

५) भाऊसाहेबांचे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेतील योगदान महत्वपूर्ण आहे.

६) भाऊसाहेबांचे राजकीय क्षेत्रातील योगदान अहमदनगर जिल्हयाच्या विकासासाठी महत्वपूर्ण आहे.

## १.६ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांची जन्मभूमी व कर्मभूमी अहमदनगर असल्याने या संशोधन विषयाची व्याप्ती ही अहमदनगर जिल्हयातील त्यांचे स्वातंत्र्यपूर्व काळातील, स्वातंत्र्य चळवळीतील कार्य, तसेच स्वातंत्र्योत्तर काळातील त्यांचे आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक,सहकार क्षेत्रात जिल्हयात महत्वपूर्ण कार्य असल्याने संशोधन विषयाची व्याप्ती ही अहमदनगर जिल्हयापुरती मर्यादीत आहे. या संशोधन विषयाची माहिती मी प्राथमिक व दुय्यम साधनांच्या आधारे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

संशोधन विषयाचा अभ्यास करताना त्यांचा जन्म १२ जानेवारी १९२४ आणि मृत्यु दि.१४ मार्च २०१० आहे. म्हणुनच त्यांच्या जन्मापासून म्हणजेच १९२४ पासूनच्या घटना नमुद करुन २०१० पर्यंतच्या त्यांच्या कार्याचा आढावा या प्रबंधात घेण्याचा मी प्रयत्न करणार आहे. म्हणून संशोधन विषयाचा १९२४ ते २०१० असा कालखंड निश्चित केला आहे.

## १.७ संशोधनाची सिध्दांतिक संकल्पना

सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांनी समाजातील अभिजन वर्ग सर्वसामान्य जनतेचे कशा प्रकारे शोषण करतो हे प्रत्यक्ष अनुभवले असल्याने अहमदनगर जिल्हयातील अशा शेतकरी, कष्टकरी, आदिवासी, शेतमजूर, कूळ या तळागाळातील लोकांच्या उध्दारासाठी भाऊसाहेब थोरात यांनी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. समाजातील वंचित घटकांना त्यांचे हक्क मिळवून देऊन त्यांना मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हयासाठी दिलेले योगदान महत्वपूर्ण आहे.

वास्तविक पाहाता वंचितांच्या इतिहासाची मुळ कल्पना जागतिक स्तरावर २० व्या शतकामध्ये इटालियन मार्क्सवादी इतिहासकार ॲन्तांनियो ग्रामचीने प्रथम मांडली. भारतात सबाल्टर्न इतिहास लेखनाला खरी चालना मिळाली ती डॉ.रणजित गुहा यांच्या इ.स.१९८२ ते १९८९ या काळातील 'सबाल्टर्न स्टडीजच्या' सहा खंडाचे संपादन त्यांनी केले. त्यांच्या कार्यातून वंचिताच्या न्याय्य हक्कासाठी जागृती घडून आली. आधुनिक भारतातील बदलत्या इतिहास लेखन प्रवाहाला अनुसरुन भाऊसाहेबांचे सहकार, सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक या प्रवाहातील कार्य वंचीतांसाठी महत्वपूर्ण ठरले आहे. त्यांचे हे कार्य समाजापासून दुर्लक्षित राहू नये म्हणूनच या संशोधनातून त्यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

## १.८ संशोधन पध्दती

१.९ इतिहास एक सामाजिक शास्त्र असल्याने सामाजिक शास्त्रात प्रचलित असलेल्या सर्वच संशोधन पध्दती इतिहास संशोधनासाठी उपयुक्त ठरतात. त्याचप्रमाणे "सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या विकासातील योगदान (१९२४-२०१०)" हा संशोधन विषय व्यक्तीचरित्रात्मक असुन समाजाशी निगडीत आहे. या संशोधनात सर्वेक्षणात्मक, चर्चा, प्रश्नोत्तर, सर्वेक्षणात्मक, चर्चा, प्रश्नोत्तर, ऐतिहासिक संशोधन पध्दती, मुलाखत पध्दती, आदी संशोधन पध्दतीचा योग्य ठिकाणी समन्वय साधला आहे. अशा विविध संशोधन पध्दतीतून शोध प्रबंधाला पुर्णत्व रुप देण्याचा प्रयत्न करणार आहे.

## १.९ संशोधनाची संदर्भ साधने

"सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या विकासातील योगदान (१९२४-२०१०)" या विषयावर संशोधन कार्य करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केला जाणार आहे. प्राथमिक साधनांत सहकार महर्षी भऊसाहेब संतुजी थोरात यांचे आत्मचरित्र अमृतमंथन, अमृतगाथा, दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को.ऑप. बॅंक लि. अहमदनगर वार्षिक अहवाल, भाऊसाहेब थोरात महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेचे अध्यक्ष असतांनाचे वार्षिक अहवाल, संगमनेर तालुका सुपरवायझिंग युनियन संस्थेचे वार्षिक अहवाल, संगमनेर शेतकी संघाचे वार्षिक अहवाल, जोर्वे विविध कार्यकारी सेवा सोसायटी वार्षिक अहवाल, सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात सहकारी साखर कारखान्याचे वार्षिक अहवाल, अमृतवाहिनी अर्बन को.ऑप. बॅंक लि. घुलेवाडी वार्षिक

अहवाल, अहमदनगर जिल्हा गॅझेटिअर, सहयाद्री शिक्षण संस्थेचे वार्षिक अहवाल, मुलाखती, समकालीन वर्तमान पत्रातील लेख आदी प्राथमिक साधनांचा वापर केला जाणार आहे. तर दुय्यम साधनात गौरवग्रंथ, संदर्भग्रंथ, जिल्हयातील समकालीन व्यक्तीची आत्मचरित्रे, पीएच.डी. चे प्रबंध, स्मरणिका, वेगवेगळी मासिके, पाक्षिके, नियतकालिके, विशेषांक, आदी दुय्यम साधनांचा वापर करुन संशोधन कार्य पूर्णत्वास नेले आहे.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी आपले आत्मचरित्र लिहीले असुन त्यांची दोन ग्रंथाच्या द्वारे प्रकाशन केले आहे.

## १.१० संशोधन विषयाशी संबधीत संशोधन किंवा पुर्वसुरींनी केलेल्या ऐतिहासिक मांडणीचा आढावा.

१) **थोरात भाऊसाहेब "अमृतमंथन"** प्रकाशक,लाटकर उल्हास चितांमणी, प्रकाशन-अमय प्रकाशन,सदाशीवपेठ पुणे, प्रथम आवृत्ती ९ मार्च १९९७.

२) **थोरात भाऊसाहेब "अमृतगाथा"** प्रकाशक,लाटकर उल्हास चितांमणी, प्रकाशन-अमय प्रकाशन,सदाशिवपेठ पुणे, प्रथम आवृत्ती जुलै २००२.

अमृतमंथन या ग्रंथात भाऊसाहेबांचा जन्म १२ जानेवारी १९२४ ते १९५२ पर्यंतच्या कार्याचा आढावा घेतला आहे. तर अमृतगाथा या आत्मचरित्राच्या दुसऱ्या खंडात स्वातंत्र्यपूर्व काळातील स्वातंत्र्य चळवळ, सावकारशाही तसेच स्वातंत्र्योत्तर काळातही सावकारशाही, कामगारावरील अन्याय सहकाराच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाच्या विकासात दिलेले योगदान आदी माहितीचा आढावा घेण्यात आला आहे. याशिवाय भाऊसाहेबांच्या कार्यावर पुढील लेख प्रसिध्द झाले आहेत.

३) **द्विवेदी आर.एस.- 'पंचामृत'** प्रकाशन, जीवन प्रिंटर्स, शिवाजीनगर, संगमनेर, प्रकाशन- १४ नोव्हेंबर २००२.

'पंचामृत' या ग्रंथाच्या माध्यामातुन भाऊसाहेबाच्या कार्यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. यात शुगर मिल, शिक्षणसंस्था, दुग्ध संघ, सहकारी बँक, औद्योगिक संघ या संस्थाच्या माध्यमातुन भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हयाच्या विकासासाठी केलेल्या कार्यावर प्रकाश टाकला आहे.

४) **खेमनर एस.एम.- संपादक, दिपस्तंभ**,प्रकाशक- सर्वांगिण आदिवासी व पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम संगमनेर ग्रुप. प्रकाशन- प्रथम आवृत्ती १२ जानेवारी २००७.

दिपस्तंभ या ग्रंथाच्या माध्यमातुन भाऊसाहेब थोरात यांच्या पुढील कार्यावर प्रकाश टाकला आहे. तसेच बालपण, शिक्षण, स्वातंत्र्य चळवळ, सावकारशाही, शेतकरी चळवळ, कामगार चळवळ, उद्योजकांसाठी कार्य, शैक्षणिक कार्य, सहकार, दंडकारण्य अभियान यावर प्रकाश टाकला आहे.

५) **अंतरकर अरुणा- "कथा आधुनिक दंडकारण्याची"**, प्रकाशक- लाटकर उल्हास चिंतामणी, अमेय प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती ७ जुलै २००८.

एखादया माणूस किती ध्येयवेडा असु शकतो हे दंडकारण्य अभियान या ग्रंथाच्या माध्यमातून दिसुन येते. वयाच्या ८४ व्या वर्षी त्यांनी संगमनेर येथे सुरु केलेले दंडकारण्य अभियान या चळवळीस व्यापक करीत ती अहमदनगर जिल्हयातील लोकचळवळ बनली असून यातुन भाऊसाहेब थोरात यांचे निसर्ग प्रेम दिसुन येते.

६) **खामकर ज.कि. संपादक- "अमृतशक्ती"**, प्रकाशक, बी.के.पंजाबी, प्रकाशन- श्रीराम मुद्राणालय, कुंभारगल्ली, संगमनेर, प्रकाशन १ ऑक्टोबर १९८४.

भाऊसाहेब थोरात "ष्ठयाब्धिपुर्ती" समारंभ प्रसंगी भाऊसाहेबांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय स्वातंत्र्य चळवळ, सहकारातील कार्यावर प्रकाश टाकणारा लेख संग्रह प्रकाशित करण्यात आला. त्यातुन भाऊसाहेबांच्या विविध अंगी कार्यावर प्रकाश टाकला गेला.

याशिवाय भाऊसाहेबांच्या बरोबर स्वातंत्र्य चळवळ, कम्युनिस्ट पक्ष, सहकारात काम करणारे अहमदनगर जिल्हयातील काही तत्वनिष्ठ व्यक्तीच्या आत्मचरित्र व इतर ग्रंथ लेखनातही भाऊसाहेबांच्या कार्यावर प्रकाश टाकलेला दिसुन येतो. त्यात खालील ग्रंथाचा समावेश होतो.

७) **कडू पी.बी.,"क्रांती पंढरीचा वारकरी"** (आत्मचरित्र), प्रकाशक-कडू अरुण पुंजांजी, प्रकाशन-जिनियर्स प्रिंटर्स प्रा.लि.मुंबई, द्वितीय आवृत्ती, १ जुन २००३.

पी.बी.कडू हे भाऊसाहेब थोरात यांचे वर्गमित्र असल्याने विद्यार्थीदशेपासूनच ते भाऊसाहेबांच्या बरोबरीने स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होते. त्यांच्या चरित्रात स्वातंत्र्य चळवळ, कम्युनिस्ट पक्ष, सावकारशाही, तसेच स्वातंत्र्योत्तर काळातील अहमदनगर जिल्हयातील राजकीय, सामाजिक, आर्थिक विकासावर कडू पाटील यांच्या ग्रंथात लेखन झाले असल्याने त्यात बहुतेक ठिकाणी भाऊसाहेबांच्या कार्यावर

प्रकाश टाकला गेला असल्याने हा ग्रंथ भाऊसाहेबांच्या कार्यावर लेखन करण्यासाठी महत्वपुर्ण आहे.

८) **शिंदे रावसाहेब "चरित्र आणि चारित्र्य"** (चरित्रग्रंथ), प्रकाशक- उल्हास चिंतामणी लाटकर,अमेय प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती २५ ऑगस्ट २००१.

रावसाहेब शिंदे हे स्वातंत्र्य चळवळीपासून भाऊसाहेबांच्या बरोबर असल्याने रावसाहेब शिंदे यांच्या चरित्रात भाऊसाहेबांच्या बालपणापासूनच्या अनेक घटनांची नोंद आली असल्याने या ग्रंथातून भाऊसाहेबांचे बालपणीतल्या आठवणी, स्वातंत्र्य चळवळ, कम्युनिष्ठ चळवळ, सावकारशाही, शेतकरी, कामगार चळवळ, सहकार चळवळ अशा विविध घटनांवर या ग्रंथात प्रकाश टाकण्यात आला आहे.

९) **शिंदे रावसाहेब "ध्यासपर्व"**,प्रकाशक-उल्हास चिंतामणी लाटकर,अमेय प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती १३ जानेवारी २०१५.

विद्यार्थीदशेपासूनच रावसाहेब शिंदे भाऊसाहेबांच्या सहवासात असल्याने रावसाहेब शिंदे यांनी आपल्या चरित्रात बालपण, शिक्षण, १९४२ चा लढा, नाशिक जेल, संगमनेर येथे शिक्षण, कम्युनिष्ट चळवळ आदि संदर्भात जे लेखन केले. त्यात भाऊसाहेब थोरात यांच्या आठवणींवर जीवनातील महत्वपूर्ण घटनावर प्रकाश टाकला गेल्याने ध्यासपर्व हा ग्रंथ भाऊसाहेबांच्या कार्यावर लेखन करण्यासाठी महत्वपूर्ण आहे.

१०) **शेवाळे वि.म. "सहयाद्रीच्या कुशीत"** प्रकाशक- वनविहार प्रकाशक संगमने, प्रथम आवृत्ती सप्टेंबर २००६, या ग्रंथात भाऊसाहेब थोरात यांच्यावर लेख देण्यात आला आहे. परंतु त्यातील माहिती संशोधन पध्दतीने मांडल्यास भावी पिढीला प्रेरणादायी ठरणारी असल्याने मी माझ्या संशोधनासाठी या साधनांचा उपयोग केला आहे.

११) **टेमकर राजधर, "पार्थभूमी भूषण"** प्रकाशन- उल्हास चिंतामणी लाटकर,अमेय प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती जुलै १९९९.

पाथर्डी तालुक्यातील पिंपळगांव कासार येथील दादा पाटील राजळे हे स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्य चळवळ, कम्युनिष्ट पक्ष, सावकारशाही विरुध्द लढा यात सहभागी असल्याने भाऊसाहेब थोरात व त्यांचा घनिष्ठ संबध होता. दादा पाटील राजळे यांच्या चरित्र ग्रंथातुन स्वातंत्र्य चळवळ कम्युनिष्ठ पक्ष, सावकार

शाही यावर जे लेखन झाले त्यात भाऊसाहेबांच्या कार्याचा वेळोवेळी उल्लेख आलेला असल्याने हा ग्रंथ भाऊसाहेबांच्या कार्यावर लेखन करतांना महत्वपूर्ण आहे.

१२) **कसबे रावसाहेब, लामखडे मा.रा.-"शेती आणि सहकार"**,थोरात भाऊसाहेब गौरव ग्रंथ, प्रकाशन बाळासाहेब गुंजाळ, संगमनेर, प्रकाशन - विश्वकर्मा मुद्राणालय,पुणे.

भाऊसाहेब थोरात यांच्या ६१ वर्षपूर्तीनिमित्त लिहीलेल्या या गौरव ग्रंथात त्यांच्या स्वातंत्र्यपुर्व स्वातंत्र्य लढा, स्वातंत्र्योत्तर सावकारशाही, कम्युनिष्ठ विचार, काँग्रेस पक्ष व भाऊसाहेबांनी सहकाराच्या माध्यमातुन जिल्हयाचा केलेला विकास यावर प्रकाश टाकला आहे.

१३) **काळे शंकरराव, "समाज अभियंता"**- प्रकाशक - अरुण जाखडे, प्रकाशन- पद्यगंधा प्रकाशन , पांडुरंग कॉलनी, पुणे, प्रथम आवृत्ती ५ ऑक्टोवर २००८.

या ग्रंथात कॉ.शंकरराव काळे यांनी जे लेखन केले त्यात स्वातंत्र्य चळवळ, सावकारशाही, १९४२ चा स्वातंत्र्य लढा याचा संदर्भ आल्याने त्यातुन भाऊसाहेबांच्या कार्यावर प्रकाश टाकला गेला आहे. या लेखनाची संशोधक पध्दतीने मांडणी करुन मी माझ्या संशोधनासाठी त्याचा उपयोग केला आहे.

**प्रबंध :-**

१) एम.फिल,लघुशोध प्रबंध - प्रा.सोनवणे दिंगबर जनार्दन, "अहमदनगर जिल्हयातील थोर स्वातंत्र्य सेनानी, सहकारमहर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांचे स्वातंत्र्य संग्रामातील योगदान, अमरावती विद्यापीठ, अमरावती, इ.स.१९९९ या लघुशोध प्रबंधात भाऊसाहेबांचा जन्म, बालपण, स्वातंत्र्य लढयातील योगदान, स्वातंत्र्योत्तर काळातील कार्य याचा आढावा घेतला आहे. परंतु एम.फिल.चा लघुशोध प्रबंध असल्याने लेखन मर्यादा आल्याने संशोधकास भाऊसाहेबांच्या कार्यावर सविस्तर लेखन करता आले नाही. यात भाऊसाहेबांच्या स्वातंत्र्य चळवळीतील कार्यावरच प्रकाश टाकण्यात आला आहे.

२) प्रबंध - पीएच.डी. (राज्यशास्त्र) प्राध्यापिका राठोड हेमलता अरविंद, "सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात व्यक्ती व कार्य : राजकारणातील व सहकारातील योगदान", पुणे विद्यापीठ,पुणे, वर्ष २००९. या ग्रंथात भाऊसाहेबांचा जन्म, बालपण, त्यांचे सहकार व राजकारणातील योगदान यावर खऱ्या अर्थाने संशोधन केले आहे. परंतु त्यांचे स्वातंत्र्य लढयातील योगदान, कम्युनिस्ट पक्षातंर्गत कार्य, सावकारशाही,

शेतकरी, कामगार, सहकार, उदयोजकांसाठी दिलेले योगदान, या माध्यमातुन भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हयाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात केलेले कार्य संशोधन पध्दतीने मांडल्यास ते भावी पिढीला प्रेरणादायी ठरणारे असल्याने इतिहासकार स.म.गर्गे यांनी म्हटल्याप्रमाणे 'अंधार दिसेल तेथे बॅटरी मारा', या उक्तीप्रमाणे मी माझ्या पीएच.डी.संशोधनाकरीता "सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या विकासातील योगदान" (१९२४ ते २०१०). हा विषय निवडला आहे.

## १.११ प्रस्तुत प्रबंधाचे प्रकरणानुसार स्वरुप

"सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या विकासातील योगदान (१९२४-२०१०)" हया विषयावर संशोधन कार्य सात प्रकरणांमध्ये विभागले गेले आहे ते पुढीलप्रमाणे :-

### १.११.१ प्रकरण पहिले - पार्श्वभूमी :-

प्रस्तुत प्रकरणात विषय प्रवेशामध्ये संशोधनाची विषयाची योग्य निवड ही संशोधनाच्या यशस्वीतेची महत्वाची पायरी असल्याने विषयातील आवड, स्त्रोत साधने, साधनाची उपलब्धता, नव्या दृष्टीकोनातुन संशोधनाची शक्यता हे मुद्ये डोळयासमोर ठेवुन विषयाची निवड करण्यात आली आहे. प्रस्तुत प्रबंधाची मांडणी व्यक्तीचरित्रात्मक असल्याने व्यक्तीचित्रात्मक इतिहास लेखनाचे महत्व स्पष्ट करताना चरित्रात्मक इतिहास लेखन, स्थानिक इतिहास लेखन, सबाल्टर्न हिस्टरी इ. इतिहास लेखन प्रवाहाबाबत माहिती देऊन संशोधनाचे व संशोधन विषयाचे महत्व स्पष्ट केले आहे.

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात महात्मा गांधीजीनी सुरु केलेली असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ, तसेच १९४२ चे छोडो भारत आंदोलन यात अहमदनगर जिल्हयातील स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान, १९४२ च्या चळवळीत अहमदनगर जिल्हयातील भाऊसाहेब थोरात यांचे योगदान, स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भाऊसाहेबांचा कम्युनिष्ट विचारास आवर घालत १९५२ साली सहकाराच्या माध्यमातुन व विविध पदांच्या माध्यमातुन अहमदनगर जिल्हयात सामाजिक, आर्थिक, राजकीय विकासात त्यांचे योगदान यावर प्रकाश टाकला आहे.

संशोधन विषयाचे महत्व स्पष्ट केल्यानंतर पुढील पायरी म्हणजे संशोधन कार्यास पुर्णत्वास नेण्यासाठी निर्धारीत केलेली उद्दीष्टये देण्यात आली आहेत. तसेच संशोधन विषय यशस्वीतेसाठी निश्चित केलेली गृहीतके देण्यात आली आहे. संशोधनातील महत्वाचा टप्पा म्हणजे व्याप्ती व मर्यादा. यात सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांचा जन्म १२ जानेवारी १९२४ ते मृत्यु १४ मार्च २०१० पर्यंतचा कालखंड निश्चित केला आहे.

संशोधनाचे सिध्दांतिक संकल्पना मांडण्यात आली आहे. तसेच संशोधन पध्दतीमध्ये या पायरीमध्ये संशोधनासाठी उपयुक्त असलेल्या सर्वेक्षणात्मक, चर्चा, प्रश्नोत्तरे, ऐतिहासिक संशोधन पध्दती, मुलाखत पध्दती आदी संशोधन पध्दतीचे या संशोधन विषयासंबधी महत्व स्पष्ट केले आहे. तर संशोधनासाठी संदर्भ साधने यामध्ये प्राथमिक व दुय्यम साधनातंर्गत कोणती संदर्भ साधने वापरले जाणार आहे ते नमुद केले आहे. यानंतर संशोधन विषयाशी संबधीत संशोधन किंवा पुर्वसुरींनी केलेल्या ऐतिहासिक मांडणीचा आढावा घेण्यात आला आहे. प्रस्तुत प्रबंधाचे प्रकरणानुसार स्वरुप मांडण्यात आले आहे.

**१.११.२ प्रकरण दुसरे :-**

"अहमदनगर जिल्हयाची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी" या प्रकरणामध्ये सुरुवातीला महाराष्ट्राच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीत महाराष्ट्र या शब्दाची व्युत्पत्ती, काळानुरुप विविध घराण्यातील राजवटी आदी घटकांचा आढावा घेण्यात आला आहे.

यानंतर महाराष्ट्राच्या भौगोलिक पार्श्वभूमीत अक्षांश विस्तार, रेखांश विस्तार, आकार, लांबी, रुंदी, क्षेत्रफळ, समुद्रकिनारा, लोकसंख्या, प्रादेशिक विभाग, कोकण विभाग, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, मराठवाडा, विदर्भ, पश्चिम विदर्भ, पुर्व विदर्भ, खनिजसंपत्ती, हवामान, आदी घटकांचा आढावा घेतला आहे.

यानंतर अहमदनगर जिल्हयाची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी मांडण्यात आली असून अहमदनगर जिल्हयाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीत जिल्हयाचे पौराणिक महात्म्य, प्रागैतिहासिक काळ, इ.स.पूर्व २५०० ते ३०० पर्यंत प्राचीन काळ, मध्ययुगीन काळ, आधुनिक काळ, जिल्हयाची आर्थिक परिस्थिती, जिल्हयाची राजकीय परिस्थिती, टिळकयुग, गांधी युगातील अहमदनगर जिल्हयाचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान आदी घटकांचा आढावा घेण्यात आला आहे. अहमदनगर जिल्हयाच्या भौगोलिक पार्श्वभूमीत जिल्हयाचे अक्षांश, रेखांश, क्षेत्रफळ, विस्तार, हवामान, पर्जन्य, भौगोलिक विभाग, अति पावसाचा

प्रदेश, कमी पावसाचा प्रदेश, माती, वनस्पती, जलसिंचन, पिके, खनिजे, वन्यप्राणी, धरणे, उद्योग, सहकार आदी घटकांचा आढावा घेण्यात आला आहे.

अहमदनगर जिल्हयाच्या ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमीचा आढावा घेतल्यानंतर अहमदनगर जिल्हयातील संगमनेर तालुक्याच्या ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमीचा आढावा घेण्यात आला आहे. संगमनेर तालुक्याच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीत संगमनेरचा प्राचीन इतिहास, मध्ययुगीन इतिहास, मोगलकालीन इतिहास, आधुनिक इतिहास, स्वातंत्र्योत्तर संगमनेर सांस्कृतिक संगनेर इ. घटकांचा आढावा घेतला आहे. शेवटी भाऊसाहेबांची जन्मभूमी असलेल्या जोर्वे गावास लाभलेल्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेतला आहे. तसेच भौगोलिकदृष्टया वैशिष्टयपूर्ण असणाऱ्या संगमनेर तालुक्याच्या भौगोलिक पार्श्वभूमीचा आढावा घेण्यात आला आहे. या भौगोलिक आढाव्यात संगमनेर तालुक्याचे क्षेत्रफळ, विस्तार, अक्षांश - रेखांश, वनस्पती, पर्जन्य व तापमान, पिके, उद्योग, प्राकृतिक विभाग, डोगराळ विभाग, पठारी विभाग, पठार पदीय प्रदेश, अरुंद नदी खोऱ्यांचे विभाग, लोकसंख्या आदी घटकांचा आढावा घेण्यात आला आहे. शेवटी जोर्वेची ऐतिहासिक पार्श्वभुमीत जोर्वे संस्कृतीचा आढावा घेण्यात आला आहे. तर भौगौलिक पार्श्वभुमीत जोर्वे गावाचे भौगोलिक स्थान, क्षेत्रफळ, लोकसंख्या,मृदा, व्यवसाय आदी घटकांचा आढावा घेण्यात आला आहे.

**१.११.३ प्रकरण तिसरे :-**

'भाऊसाहेब संतुजी थोरात यांचे जीवन चरित्र' या प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रास्ताविकानंतर भाऊसाहेब संतुजी थोरात यांच्या घराण्याचा पुर्व इतिहासाचा आढावा घेऊन प्रथम थोरात घराण्याची वंशावळ देण्यात आली आहे. तर संशोधनाच्या पुढील टप्प्यात थोरात घराण्यातील महत्वाच्या व्यक्तीची माहिती देण्यात आली आहे. त्यात भाऊसाहेबांचे पंजोबा सतपाटील थोरात, आजोबा गंगाराम पाटील थोरात, वडील संतुजी पाटील, आई सखुबाई कुटुंबातील या व्यक्तीची माहिती दिली आहे. नंतर प्रबंधाचे प्रबंधक भाऊसाहेब थोरात यांचा जन्म, बालपण यांची सविस्तर माहिती देऊन ते शिक्षण घेत असताना त्यांचा राष्ट्रसेवा दलातील सहभागातुन स्वातंत्र्य चळवळीशी आलेला संबध आणि इ.स.१९४२ च्या चले जाव चळवळीत सहभागी होऊन अहमदनगर जिल्हयातील कार्य, त्यांचे प्राथमिक शिक्षण जोर्वे येथे तसेच माध्यमिक शिक्षण संगमनेर, चांदोरी, वडगांवपान, नाशिक पुन्हा संगमनेर येथे शिक्षण घेत असतांना राष्ट्र सेवादलात सहभागी झाले. आणि त्यातुनच १९४२ च्या स्वातंत्र्य

चळवळीत अहमदनगर जिल्हयातील एक आघाडीचे स्वातंत्र्य सैनिक म्हणुन ते कार्य करु लागले. शिक्षणाबरोबरच त्यांना शेती कामाकडेही लक्ष दयावे लागत होते. वडीलांच्या अनुपस्थित पाटीलकीचे कामही त्यांना पाहावे लागले. संशोधनाच्या पुढील टप्प्यात राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना, राष्ट्रीय काँग्रेसच्या माध्यमातुन महात्मा गांधीचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदानाबद्दल माहिती, तसेच भाऊसाहेबांना पंडीत नेहरु, रावसाहेब पटवर्धन, अच्युतराव पटवर्धन, पा.वा. गाडगीळ यांचे व्याख्याने व वर्तमानपत्रे, मुंकुदरावांचे दिनमित्र, आचार्य अंत्रे नवयुग, ना.सी. फडके यांचे झनकार अशा विविध ग्रंथ वाचानातुन भाऊसाहेब राष्ट्रवादी विचाराकडे ओढले गेले. त्यातुनच १९४२ च्या चळवळीत ते ओढले गेले. ब्रिटीश सरकारविरुध्द संगमनेर, अकोले येथे प्रतीसरकार स्थापनेचा प्रयत्न त्यांनी केला. एवढेच नव्हे तर भुमिगत राहुन ब्रिटीश सरकारविरोधी कार्य करत असताना त्यांना अटक होऊन १५ महिने कारावास भोगावा लागला. सुटकेनंतर मात्र ते कम्युनिष्ट विचार घेऊनच बाहेर पडले. आणि कम्युनिष्ट पक्षांतर्गत कार्य करु लागले. ते १९५२ पर्यंत कम्युनिष्ट पक्षांतर्गत कार्य करत होते. परंतु १९५२ साली कम्युनिष्ट विचाराचा त्याग करुन सहकार मंत्राचा अंगीकार केला. आणि येथुनच भाऊसाहेबांच्या सहकार क्षेत्रातील कार्याला प्रारंभ झाला.

भाऊसाहेबांचे विधानसभेतील कार्य, भाऊसाहेबांचे कौटुबीक जीवनातील त्यांचा विवाह कुंटुब प्रमुख म्हणुन कामगिरी, भाऊसाहेबांना अपत्य प्राप्ती, सर्व मुले वडीलांप्रमाणेच सामाजिक कार्याची आवड असणारी आहेत. डॉ.सुधिर तांबे यांचे भाऊसाहेबांच्या सहकार, राजकीय,सामाजिक कार्यात महत्वपूर्ण योगदान आहे. तसेच माजी महसुलमंत्री बाळासाहेब थोरात यांना शरयु, जयश्री, सविता, राजवर्धन ही चार अपत्य आहेत. त्यांची थोडक्यात माहिती दिली आहे. सर्व मुले वडीलांप्रमाणे समाज कार्याची आवड असणारी आहेत. तसेच भाऊसाहेब थोरात यांच्या सामाजिक कार्यात पत्नी मथुराबाईंचे योगदान आणि प्रकरणाच्या शेवटी वृध्दपकाळ आणि मृत्यु अशी सविस्तर माहिती या प्रकरणात दिली आहे.

**१.११.४ प्रकरण चौथे :-**

"भाऊसाहेब थारोत यांचे अहमदनगर जिल्हयाच्या राजकीय विकासातील योगदान" प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रास्ताविकानंतर भाऊसाहेब संतुजी थोरात यांचे विद्यार्थी दशेतील कार्य आणि संघटन कौशल्य, स्वातंत्र्य चळवळीची प्रेरणा, शिक्षण घेत असताना राष्ट्रसेवा दलातील सहभागातून स्वातंत्र्य चळवळीकडे वाटचाल, महात्मा गांधीजींनी सुरु केलेल्या इ.स.१९४२ च्या छोडो भारत आंदोलनातील अहमदनगर जिल्हयाच्या कार्याची रुपरेषा आखण्यासाठी

राजापूर येथे बैठक. राजापुर बैठकित ठरल्याप्रमाणे भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली अहमदनगर जिल्हयातील स्वातंत्र्यसेनानी सक्रिय झाले होते. सावकारशाही, विडी कामगाराविरुध्द लढा, शेतकरी अन्याया विरुध्द लढा देऊन संपूर्ण जिल्हा क्रांतीमय करुन टाकला होता. संगमनेर येथे प्रती सरकार स्थापनामधील योगदान. भाऊसाहेब थोरात विद्यार्थी दशेपासुन १९५२ पर्यंत त्यांचे कम्युनिष्ट पक्षांतर्गत कार्य, अहमदनगर जिल्हयातील कम्युनिष्ट पक्षाच्या परिषदेतील भाऊसाहेबांचे योगदान. यात जोर्वे परिषद, गुहा परिषद, जोर्वे, वरुडी, शिरसगाव, करंजी येथील स्त्रियांची परिषद, राजापुर, एरंडगाव आदी परिषदांचे आयोजन व त्यातील भाऊसाहेबांची भुमिका, भाऊसाहेबांचे स्थानिक स्वराज्य संस्थेतील योगदान, भाऊसाहेबांचा राजकीय कालखंड १९६२ पासुन सुरु झाला. विधानसभा सदस्य असतांना "मिटर हटाव आंदोलन", विधानसभेतील राजकीय नाटयात भाऊसाहेबांची भुमिका, विडी मजुराच्या प्रश्नासाठी केलेला संघर्ष, निळवंडे धरणास मंजुर त्यांच्या या विधानसभेतील कार्याचा आढावा घेण्यात आला आहे. वरील कार्याच्या माध्यमातुन भाऊसाहेबांच्या अहमदनगर जिल्हयातील राजकीय कार्याचा आढावा घेतला आहे.

**१.११.५ प्रकरण पाचवे :-**

"भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या सामाजिक विकासातील योगदान", स्वातंत्र्यपूर्व काळात भाऊसाहेबांनी सामाजिक कार्य हा ध्येयवाद बनवुन त्या ध्येयाने प्रेरित होऊन शेतकरी, कामगार कष्टकरी, गरीब, वंचित, समाजातील लोकांच्या मुलभूत प्रश्नांसाठी महत्वपूर्ण कार्य केले होते. त्याचप्रमाणे स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही भाऊसाहेबांनी सामाजिक कार्य अविरतपणे चालु ठेवले होते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही भाऊसाहेबांनी जी विविध पदे उपभोगली त्या पदांचा उपयोग अहमदनगर जिल्हयाच्या सामाजिक विकासासाठी केला होता. ज्या अहमदनगर जिल्हयात भाऊसाहेबांनी सामाजिक कार्य केले त्या अहमदनगर जिल्हयाची समाजरचना व सामाजिक परिस्थितीचा प्रथम आढावा घेण्यात आला. नंतर त्यांनी शेतकऱ्यांसाठी केलेले कार्य, सावकारशाही विरुध्द केलेले कार्य, खिरविरे येथील सावकारशाही नष्ट करण्यातील योगदान, खिरविरे येथील सावकारशाही नष्ट केल्याने कर्जमुक्त झालेल्या शेतकऱ्यांची यादी. सोमठाणे, नलावडे येथे सावकारशाही विरोधी लढयातील योगदान व त्यातील कर्जमुक्त झालेले शेतकरी, शेतीकर्जावरील वाढीव व्याजदर कमी करण्यासाठी रिझर्व्ह बँकेवर काढलेला टिकुरे मोर्चा, शेतीपंपावरील मिटर हटाव मोर्चाचे आयोजन, मोर्चाचे यश तसेच राजहंस दूध संघाची स्थापना व दूध संघातंर्गत शेतकऱ्यांसाठी

विविध योजना, सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात सहकारी साखर कारखाना स्थापनेतील योगदान, व कारखान्याच्या माध्यमातुन शेतकऱ्यांसाठी दिलेले योगदान. या संस्थेच्या माध्यमातुन समाजविकास घडुन आणला.

याशिवाय अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे १४ वर्ष अध्यक्ष असतांना शेतकरी, कामगार, उद्योजकांसाठी राबविलेल्या विविध कर्ज योजना, भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी बँकेची स्थापना व शेतकऱ्यांसाठी कर्ज पुरवठा करण्यातील योगदान, सॅम्प्रो संस्थेची स्थापना व जिल्हयातील लाभार्थी शेतकरी, विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातुन तसेच अहमदनगर जिल्हा सहकारी बँक व अमृतवाहिनी सहकारी बँकेच्या माध्यमातुन जिल्हयातील शेतीला पाणी पुरवठा करण्यातील योगदान, भुमिहिनांना वनजमिन मिळवुन देण्यातील योगदान व लाभार्थी, सिलिंग कुळ कायदयासाठी भाऊसाहेबांचे योगदान, कामगार वर्गासाठी दिलेले योगदान यात विडी मजुर कामगारांच्या मागण्यासाठी विडी मजुर राज्य व्यापी परिषदेचे आयोजन, जिल्हयातील विडी कारखान्याची सद्यस्थिती, विडी कामगारांना कारखान मालक व सरकारकडुन मिळणाऱ्या सुविधा, अहमदनगर जिल्हयातील कोंबडा, भिकुसा, हत्ती, लंगर विडी कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांना मिळणाऱ्या सुविधा, विधानसभा सदस्य असतांना विडी कामगारांसाठी दिलेले योगदान, दुष्काळ निवारार्थ कार्य, दंडकारण्य अभियानांच्या माध्यमातुन सामाजिक कार्य, दंडकारण्याची प्रेरणा, संघटन कौशल्य, दंडक आरण्यास लोक चळवळीचे मिळालेले स्वरुप, भाऊसाहेबांचे अहमदनगर जिल्हयातील शैक्षणिक कार्य, सहयाद्री संस्थेच्या माध्यमातुन, अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या माध्यमातुन शैक्षणिक कार्य, अमृतवाहिनी इंजिनिअरींग कॉलेज, अमृतवाहिनी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अमृतवाहिनी कॉलेज ऑफ फार्मसी, अमृतवाहिनी एम.बी.ए. कॉलेज, अमृतवाहिनी रुरल हॉस्पीटल आदि शिक्षणक्रमांचा व हॉस्पीटलच्या माध्यमातुन जिल्हयाच्या कार्यात भाऊसाहेबांनी महत्वपूर्ण योगदान दिले आहे.

**१.११.६ प्रकरण सहावे :-**

"भाऊसाहेब थारोत यांचे अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान", प्रस्तुत प्रकरणात प्रास्ताविकानंतर सहकार चळवळीचा उदय, जिल्हा सहकारी बँकेची उद्दिष्टये, जिल्हा बँकेची स्थापना, शाखा विस्तार, कार्यक्षेत्र आणि अहमदनगर जिल्हयातील सहकार चळवळीत भाऊसाहेब थोरात यांचे योगदान, तसेच भाऊसाहेब थोरात महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष असताना अहमदनगर जिल्हयातील सहकार वाढीसाठी

महत्वपूर्ण योगदान दिले आहे. आपल्या अध्यक्षीय काळात राज्य बँकेत विकास कक्षाची स्थापना करुन बँकेच्या कामात गती प्राप्त करुन दिली. राज्य बँकेच्या अध्यक्ष पदाचा उपयोग नाबार्डच्या दिर्घमुदत कर्ज योजनेचा अहमदनगर जिल्हयाच्या विकासासाठी उपयोग करुन घेतला. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातुन ट्रॅक्टर पुरवठा करण्याचा महत्वपूर्ण कार्य, मच्छिमार व्यवसायकांसाठी महत्वपूर्ण योगदान, भाऊसाहेबांच्या राज्य बँकेतील अध्यक्ष काळात जिल्हयातील शेतकऱ्यांना ट्रॅक्टरसाठी कर्ज दिलेले लाभार्थी शेतकरी, त्याचप्रमाणे भाऊसाहेब अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे १९६५ ते १९६९, १९७३ ते १९७७, १९९५ ते १९९९ असे १४ वर्ष अध्यक्ष असताना अहमदनगर जिल्हयाला वरदान ठरलेल्या जिल्हा बँकेने जे विविध उपक्रम राबविले त्यात भाऊसाहेबांचे योगदान महत्वपूर्ण होते. बँकेची स्थापना, कार्यक्षेत्र, शाखा विस्तार यातील भाऊसाहेबांचे योगदान, भाऊसाहेबांच्या अध्यक्षीय काळातील शाखाविस्ताराची तुलनात्मक आकडेवारी देण्यात आली. जिल्हयातील प्राथमिक शेती संस्था व बिगरशेती सहकारी संस्था यांचे भाऊसाहेबांच्या काळातील वाढती संख्या, एकुण शाखांची आकडेवारी देण्यात आली. अहमदनगर जिल्हयातील सहकारी कारखान्यांना कर्ज पुरवठा करण्यातील अध्यक्षीय काळातील भाऊसाहेबांचे धोरण, बँकेच्या माध्यामातुन पाणीपुरवठा करण्याचे भाऊसाहेबांचे धोरण, तक्त्यानुसार त्याची सविस्तर आकडेवारी देण्यात आली आहे. बँकेचे, शेतीचे आधुनिकीकरणाचे धोरण व त्यातील भाऊसाहेबांचे योगदान, शेतकऱ्यांना बैलगाडी कर्ज व भाऊसाहेबांचे धोरण, मळणी यंत्रासाठी कर्ज व भाऊसाहेबांचे धोरण, ट्रॅक्टरवर चालणारे पाचरटकुटी यंत्र, गोबरगॅस, शेती सपाटीकरण, पोकलॅन,जेसीबी सारखी साधने कर्ज योजनेतील भाऊसाहेबांचे योगदान, द्राक्ष मांडव व द्राक्ष पिकाचे औषधे, कर्ज वितरण व भाऊसाहेबांचे योगदान, शेती व्यवसायाला कर्ज पुरवठा करण्याचे बँकेचे धोरण व त्यातील भाऊसाहेबांचे योगदान, कुक्कुटपालन व्यवसाय व त्यांची आकडेवारी, पशुसंवर्धन व पुशसंवर्धनातील लाभार्थी शेतकरी यादी, गांडुळखत प्रकल्प, शेळी-मेंढी पालन योजना, फळबाग, कांदाचाळ, ग्रामीण गोदाम योजना, विविध अनुदान सुविधा, सभासद अपघात विमा, सैनिकांसाठी आर्थिक साहय्य, बँकेचे ग्रामसभेतुन प्रबोधन, ग्रामीण सोसायटया, नैसर्गिक आपत्ती प्रसंगी धोरण, वैद्यकिय उपचाराविषयी धोरण, बँक सेवकांविषयक धोरण, शैक्षणिक संस्थांना आर्थिक साहय्य, जिल्हा वासियांच्या कलागुणांना वाव देणारे सभागृह व भाऊसाहेब थोरात, विद्यार्थ्यांना आर्थिक साहय्य व त्यातील भाऊसाहेबांचे योगदान.

संगमनेर भाग सहकारी कारखान्याची स्थापना व कारखान्याच्या माध्यमातुन भाऊसाहेबांचे योगदान, विज निर्मिती प्रकल्प, खत निर्मिती प्रकल्प यात भाऊसाहेबांचे योगदान, साखर कारखान्यातील विविध उपक्रमातील लाभार्थी शेतकरी, राजहंस दूध संघाची स्थापना व दुध संघाच्या माध्यमातुन शेतकऱ्यांसाठी दुध व्यवसायासंदर्भात महत्वपूर्ण निर्णय, दुध संघाच्या माध्यमातुन मिनरल वॉटर प्रकल्प, तसेच दुधजन्य उपपदार्थांची निर्मिती, भाऊसाहेबांनी दुध संघातंर्गत राबविलेले विविध उपक्रम तसेच भाऊसाहेबांनी दुध संघाच्या माध्यमातुन शेतकऱ्यांसाठी राबविलेल्या विविध योजनातील लाभार्थी शेतकरी,

भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँकेचे स्थापना व त्यातुन भाऊसाहेबांचे योगदान, उदयोजकांना कर्ज पुरवठा, बँकेच्या कर्ज धोरणातील लाभार्थी शेतकरी, गरुड कुक्कुटपालन संस्थेची स्थापना व जिल्हयातील कुक्कुटपालन व्यवसायिकांना दिलासा देण्याचे धोरण, भाऊसाहेबांचे सहकाराच्या माध्यमातुन जिल्हयातील आर्थिक विकासातील दिलेले योगदान महत्वपूर्ण ठरले आहे.

**१.११.७ प्रकरण सातवे - सिंहावलोकन :-**

प्रस्तुत प्रकरणामध्ये "भाऊसाहेब संतुजी थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या सामाजिक विकासातील योगदान(इ.स.१२४-२०१०)", या कालखंडातील भाऊसाहेबाच्या जीवनातील घटनांचा आढावा पीएच.डी शोधप्रबधांच्या माध्यमातून त्यांच्या जीवन कार्याचे प्रमुख निष्कर्ष नोंदविलेले आहेत. कोणत्याही व्यक्तीवर परिस्थितीचा प्रभाव असतो. परिस्थितीच्या प्रभावातून ती घडत असते. त्यामुळे त्याला परिस्थितीचे अपत्य म्हटले जाते. जोर्वे सारख्या एका खेडेगावात एका शेतकरी कुटुंबात जन्म होऊन प्राथमिक शिक्षणही तेथेच झाले. खेडयातील ग्रामिण जीवनशैलीचा त्यांच्यावर प्रभाव होता. घरातील थोरामोठयांचे सामाजिक कार्य अनुभवत होते.

शिक्षण घेत असतांना महात्मा गांधीजीचे विचार, तसेच पंडीत नेहरु, अच्युतराव पटवर्धन यांच्या प्रखर भाषणातून विद्यार्थी असणारे भाऊसाहेब प्रभावीत झाले होते. त्या प्रभावातून ते स्वातंत्र्य चळवळीकडे आकर्षित झाले होते. इ.स.१९४२ च्या चळवळीत अहमदनगर जिल्हयात स्वातंत्र्य चळवळ प्रखर करण्यात महत्वाची भूमिका पार पाडली. साबोटाज कार्यक्रमातंर्गत ब्रिटिश सरकारला जिल्हयात कारभार पाहणे अशक्य करुन सोडले. अटक होऊन पंधरा महिने शिक्षाही झाली होती. सुटकेनंतरही भाऊसाहेबांमध्ये कोणतेही परिवर्तन झाले नव्हते. उलट कम्युनिस्ट विचारांने ते अधिक प्रखरपणे जिल्हयात

कार्य करत होते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर इ.स.१९५२ पर्यंत कम्युनिस्ट पक्ष्याच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयातील शेतकरी, कामगार, भूमिहीन यांच्यासाठी संघर्ष करत होते. १९५२ नंतर मात्र अहमदनगर जिल्हयाच्या विकासासाठी सहकार तत्वाचा स्विकार करुन सहकाराच्या माध्यमातून जिल्हयाच्या विकासात महत्वपूर्ण योगदान दिले होते. जिल्हयाच्या राजकिय, सामाजिक, आर्थिक विकासासाठी कार्य करत असताना कधीही स्वार्थ पाहिला नव्हता. भाऊसाहेबांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आणि स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अहमदनगर जिल्हयाच्या विकासासाठी दिलेले योगदान महत्वपूर्ण आहे.

**संदर्भ सूची :-**


१) देव प्रभाकर-संशोधन, अध्यापन आणि लेखन परंपरा, प्रकाशक-हर्षल रमेश वरखेडे, प्रकाशन-ब्रेन टॉनिक प्रकाशन, पहिली आवृत्ती, ऑगस्ट २००७,पृष्ठ क्रं.१६

२) कोठेकर शांता-इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान-प्रकाशक-पुराणिक ललिता, प्रकाशन श्री. साईनाथ धरमवळे, नागपूर, तिसरी आवृत्ती, १५ फेब्रु.२०११, पृ.क्रं.२

३) डॉ.सरदेसाई बी.एन. 'इतिहास लेखन शास्त्र' प्रकाशक, भाग्यश्री मोरेश्वर फडके, प्रकाशन नागपूर, पहिली आवृत्ती, एप्रिल २००२, पृ.क्रं.१, २

४) प्रा.राजदेरकर सुहास मधुकर-'इतिहास लेखनशास्त्र'-प्रकाशक श्री.प्रमोद मुंजे, प्रकाशन विद्या प्रकाशन रुईकर रोड, नागपूर, प्रथमावृत्ती, १९९८, पृ.क्रं१४,१५.

५) मुलाखत श्री.कडु पुंजाजी बापूजी, मु.पो.सात्रळ, ता.राहुरी, जि.अहमदनगर, दि.१३/०६/२०१५.

६) थोरात भाऊसाहेब-'अमृतगाथा', प्रकाशक-लाटकर उल्हास चिंतामणी, प्रकाशन - अमेय प्रकाशन पुणे, तृतीयावृत्ती, ११ जाने १९९५, पृ.क्रं.११०,१११,११२.

७) मुलाखत श्री.थोरात पंडित संतुजी, मु.पो.जोर्वे, ता.संगमनेर, जि.अहमदनगर, दि.०२/०७/२०१५.


*****

## प्रकरण : दुसरे

# अहमदनगर जिल्हयाची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभुमी

**प्रकरण दुसरे**

# अहमदनगर जिल्हयाची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी

## प्रास्ताविक :-

२.१ महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी.

२.२ महाराष्ट्राची भौगोलिक पार्श्वभूमी

२.३ अहमदनगर जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

२.३.१ प्राचीन काळ

२.३.२ मध्ययुगीन काळ

२.३.३ आधुनिक काळ

२.३.४ भारतीय स्वातंत्र्य लढा आणि अहमदनगर मधील भुईकोट किल्ला.

२.३.५ भारतीय स्वातंत्र्य लढयातील अहमदनगर जिल्हयाचे योगदान

२.४ अहमदनगर जिल्हयाची भौगोलिक पार्श्वभूमी

२.५ संगमनेर तालुक्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी.

२.६ संगमनेर तालुक्याची भौगोलिक पार्श्वभूमी

२.७ जोर्वे गावाची ऐतिहासिक पार्श्वभूमी.

२.८ जोर्वे गावाची भौगोलिक पार्श्वभूमी

२.९ उपसंहार

संदर्भसूची

**प्रकरण दुसरे**

# अहमदनगर जिल्हयाची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी

## प्रास्ताविक :-

भारतीय संघराज्यातील महाराष्ट्र हे एक घटक राज्य आहे. कोणत्याही देशाला स्वाभाविकपणे भूगोल असतो, परंतू प्रत्येक देशाला ऐतिहासिक वारसा असतोच असे नाही. महाराष्ट्र मात्र भाग्यवान राज्य आहे, कि ज्याला भौगोलिक पार्श्वभूमीप्रमाणेच ऐतिहासिक वारसा देखील लाभलेला आहे. भारतातील अन्य राज्यांपेक्षा महाराष्ट्राला अधिक वैभवशाली परंपरा लाभलेली आहे. सातवाहन, भोज, मौर्य, शिलाहार, चालुक्य, राष्ट्रकुट व यादव यांसारख्या ऐतिहासिक घराण्याची सत्ता येथे प्रस्थापित झाली होती. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील अनेक जिल्हयांनाही ऐतिहासिक पंरपरा लाभलेली आहे. या सर्व ऐतिहासिक परंपरा त्या प्रदेशातील ऐतिहासिक माहितीच्या साक्षीदार आहेत. यापैकी महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्हा हा एक असून प्रस्तुत प्रकरणात सुरुवातीला महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी महाराष्ट्रातील संत परंपरा तसेच सामाजिक व आर्थिक परिस्थितीची माहिती देऊन अहमदनगर जिल्हयाच्या ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमीचा आढावा घेण्यात आला आहे. भाऊसाहेबांची कर्मभूमी असलेल्या संगमनेर तालुक्याच्या ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्र्वभूमीचा आढावा घेण्यात आला आहे. तर संशोधन कार्यास पूर्णत्व येण्यासाठी त्यांची जन्मभूमी जोर्वे गावाची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्र्वभूमीचा आढावा घेण्यात आला आहे.

## २.१ महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

वराहमिहिर यांच्या ग्रंथात आणि सत्याश्रम पुलकेशी यांच्या ६११ सालातील बदामीच्या शिलालेखात 'महाराष्ट्र' नावाचा प्रथम उल्लेख सापडतो.[१], महाराष्ट्र या शब्दाची उत्पत्ती बाबत रा.गो.भंडारकर यांनी 'अर्ली हिस्टरी ऑफ द डेक्कन' या ग्रंथात म्हटले आहे की, अशोकाच्या शिलालेखात दक्षिणेतील 'रठ्ठ' लोकांनाच 'रास्टिक' म्हटले आहे. त्याचे संस्कृत रुप 'राष्ट्रिक' असे झाले आहे. तर रठ्ठाचे 'महारठ्ठ' व राष्ट्रिकचे 'महारिष्ट्रिक' झाले तर सातवाहनकालिन शिलालेखात 'महारिठनी' या शब्दाचा संस्कृत भाषेत 'महाराष्ट्र' असा अर्थ होतो[२].

आर्य भारतात येण्यापूर्वी या देशात अनेक वंशिय मानवी समुह राहात होते. आर्य भारतात आल्यानंतर आर्य व अनार्य यांच्या संस्कृती संगमाच्या परिणामातून भारताचे आर्यावर्त

व दक्षिणापथ असे दोन भाग पडले. आज आपण ज्या प्रदेशाला महाराष्ट्र म्हणतो, तो पूर्वी दक्षिणापथ या नावाने ओळखला जात होता. दक्षिणेत आर्यांच्या वसाहतींना स्थिरता प्राप्त झाल्यानंतर गोदावरी नदीच्या काठावर सातवाहनांचे ऐतिहासिक राजघराणे महाराष्ट्रात ४६० वर्ष राज्य करत होते.[३] सातवाहनानंतर महाराष्ट्रात वाकाटक या घराण्याने राज्य केले. वाकाटकांच्या काळात महाराष्ट्रात राष्ट्रकुटांचा उदय झाला. राष्ट्रकुटांप्रमाणेच सहाव्या शतकात महाराष्ट्रात चालुक्यांची सत्ता स्थापन झाल्याने एकाच वेळी महाराष्ट्रात राष्ट्रकुट व चालुक्य सत्ता काहीकाळ राज्य करत होत्या. चालुक्य घराण्यातील कृष्णदेवराय या कर्तबगार राजाने राष्ट्रकुटांचा पाडाव केल्यानंतर महाराष्ट्रात चालुक्य राज्य करत होते. चालुक्यांनंतर महाराष्ट्रात शिलाहार, शेलार, कदम, शिंदे अशी वेगवेगळी घराणे उदयास आली. याच सुमारास यादव घराण्यातील भिल्लम नावाच्या पराक्रमी राजाने चालुक्यांचा पराभव करुन महाराष्ट्रात यादवांची सत्ता प्रस्थापित केली होती.[४] महाराष्ट्राच्या दृष्टीने यादव हे मराठी राज्य भाषा व वाड्:मय यांचे आधारस्तंभ ठरतात. पराक्रमी मराठा घराणे व यादव घराण्याच्या राज्य स्थापनेने दक्षिण हिंदुस्थानात मुस्लिमांना प्रवेश करणे अशक्य झाल्याने, त्यांनी उत्तर हिंदुस्थानावर लक्ष केंद्रीत करुन उत्तर हिंदुस्थानातील दुर्बल राजसत्तेचा फायदा घेत महमद गझनी आणि महमंद घोरी यांच्या अनेक आक्रमणातून उत्तर हिंदूस्थानात मुस्लीम सत्तेचा पाया घातला गेला.

उत्तर हिंदुस्थानातील विजयाने मुस्लीमांचा आत्मविश्वास वाढल्याने त्यांनी दक्षिण हिंदुस्थानावर लक्ष केंद्रित केले होते. यातुनच अल्लाउद्दीन खिलजीच्या रुपाने १२९४ साली प्रथम यादव राजा रामदेवराय यांच्या काळात देवगिरीवर केलेल्या आक्रमणाने यादव सत्तेच्या विघटनाला सुरुवात झाली. शेवटी अल्लाउद्दीनचा मुलगा मुबारकशहाने रामदेवचा मुलगा शंकरदेव याच्यावर हल्ला करुन संपूर्ण यादव सत्ता संपुष्टात आणली. अल्लाउद्दीन खिलजीच्या स्वारीने दक्षिण भारतात इस्लामी सत्तेचा प्रवेश झाला आणि त्याचबरोबर महाराष्ट्रात इस्लामी राजवट सुरु झाली होती. परंतु महाराष्ट्रातील दुर्गम प्रदेश, उंचच उंच पर्वत रांगा, हिंस्त्र प्राणी, किल्ले या भौगोलिक परिस्थितीत राहणारे काटक लोक, त्यांचे स्वभाव आदि वैशिष्टयामुळे इस्लामी राजवटीची पाळेमुळे येथे खोलवर रुजू शकली नाही.[५] परिणामी १७ व्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रात अनेक पराक्रमी मराठा घराणे राजकारणात पुढे आली. त्यापैकीच भोसले घराणे हे एक होय. या घराण्यातील छत्रपती शिवाजीराजे भोसले यांनी महाराष्ट्रामध्ये स्वतंत्र मराठी राज्य स्थापन केले आणि शेकडो वर्षापासून

मुस्लिमांच्या गुलामगिरीत राहिलेल्या महाराष्ट्रातील रयतेला स्वतंत्र राज्य निर्माण करुन दिले.[६] शिवाजी राजांच्या मृत्युबरोबर मराठयांच्या इतिहासातील एक महान पर्व संपले आणि मोगली आक्रमणापासून स्वराज्याचे रक्षण करण्याची जबाबदारी छत्रपती संभाजी राजांवर येऊन पडली. या मोघल मराठा संर्घषात संभाजी राजांची क्रुरपणे हत्या झाली.[७] त्यानंतर राजाराम महाराजांवर स्वराज्याची जबाबदारी आली, परंतु शारीरिक अस्वास्थामुळे त्यांचा अकाली मृत्यु झाला. महाराणी ताराबाईने पतीच्या निधनाचे दु:ख पचवत पुत्र दुसरा शिवाजी यास गादीवर बसवून स्वत:हा मोगलांबरोबर सात वर्ष संघर्ष करत होत्या. दरम्यानच्या काळात इ.स. १७०७ साली औरंगजेबाचा मृत्यु झाला आणि छत्रपती संभाजी राजाचा पुत्र शाहू यांची मोगलांच्या कैदेतून सुटका झाली आणि शाहु ताराबाई संघर्ष सुरु झाला, या संघर्षामध्ये शाहु महाराजांचा विजय झाला. शाहु महाराजांनी १२ जानेवारी १७०८ रोजी सातारा येथे स्वत:चा राज्याभिषेक करुन अष्टप्रधान मंडळ जाहिर केले. शाहू महाराजांच्या दुर्बलतेचा फायदा घेत पेशव्यांनी मराठा राज्याची सुत्र आपल्या हाती घेतली.[८] सुरुवातीचे पेशवे कर्तबगार होते. परंतु शेवटचे पेशवे कर्तव्य शुन्य होते. त्यातच दुसऱ्या बाजीरावाने सत्ता लालसेतून इंग्रजाबरोबर वसईचा तह केला आणि शेवटी इ.स.१८१८ साली इंग्रज मराठा युध्द झाले.त्यात मराठयांचा पराभव होऊन भारतात इंग्रजांची सत्ता प्रस्थापित झाली.[९]

भारतात ब्रिटिशांची राजवट असतांना इ.स.१९१२ च्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात भाषावार प्रांतरचना असावी असा विचार पुढे आला होता. ब्रिटिश सरकारनेही हे मान्य केले होते. त्यानंतर इ.स.१९२० च्या राष्ट्रीय कॉग्रेसच्या नागपूर अधिवेशनात भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या देशात भाषावार प्रांतरचनेचे तत्व स्विकारुन त्यानुसार भाषानिहाय प्रांताची नव्याने रचना केली जावी हे तत्व मान्य करण्यात आले होते. तर १ मे १९४६ मधील बेळगाव येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात ज्येष्ठ साहित्यीक कै.ग.त्र्यं. माडखोलकर यांनी अध्यक्षीय भाषणात संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचा ठराव मांडला असता त्यास उपस्थितांनी एकमुखाने मान्यता दिली. राष्ट्रीय कॉंग्रेसच्या पूर्वीच्या ठरावाप्रमाणे भारत स्वतंत्र झाला. नंतर भाषावार प्रांतरचना या तत्वानुसार मराठी भाषिक प्रदेश एकत्र आणून मराठी भाषिक लोकांचे 'संयुक्त महाराष्ट्र' हे स्वतंत्र राज्य निर्माण करावे अशी मागणी जोर धरु लागली होती. मात्र नेहरु सरकारने मराठी भाषिक प्रदेशाची मागणी फेटाळली असता आंदोलन अधिक तीव्र झाले. या आंदोलनातील सहभागी आचार्य प्र.के.अंत्रे, एस.एम.जोशी, ना.ग.गोरे,श्रीपाद अमृत डांगे,क्रांतीसिंह नाना पाटील, प्रबोधनकार ठाकरे,उध्दवराव पाटील,

जयवंतराव टिळक, आप्पा पेंडसे, दादासाहेब गायकवाड, कॉ.दत्ता देशमुख, दाजीबा देसाई, आदि नेत्यांच्या नेतृत्वाखाली प्रत्यक्ष सहभागानंतर फेब्रुवारी १९५६ मध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना करण्यात आली. त्यामुळे हे आंदोलन इ.स.१९५६ ते इ.स.१९६० असे पाच वर्ष चालु होते. हरताळ, लाठीमार, हिंसक निदर्शन यामुळे संयुक्त महाराष्ट्र निर्मीतीची ही चळवळ असंख्य मंडळीच्या असिम त्यागाने आणि बलिदानामुळे यशस्वी झाली. आणि १ मे १९६० रोजी भाषावार प्रांतरचनेच्या तत्वावर 'महाराष्ट्र' राज्याची निर्मिती झाली. महाराष्ट्र हे देशातील १५ वे राज्य म्हणून अखेरीस अस्तीत्वात आले. महाराष्ट्राच्या उत्तरेला गुजरात, मध्यप्रदेश, दक्षिणेला आंध्रप्रदेश, म्हैसूर आणि पूर्वेला मध्यप्रदेश व आंध्रप्रदेश ही राज्ये आहेत.[१०] अशा या महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर जिल्हयातील संगमनेर तालुक्याचे भाग्यविधाते भाऊसाहेब थोरात यांनी सहकार चळवळीच्या माध्यमातुन अहमदनगर जिल्हयाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक विकासात महत्वपूर्ण योगदान दिले.

## २.२ महाराष्ट्राची भौगोलिक पार्श्वभूमी :-

भारतातील २९ राज्यांपैकी महाराष्ट्र हे पश्चिम भागातील एक राज्य आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्र हे भारतातील तिसरे तर लोकसंख्येच्या दृष्टीने दुसरे मोठे राज्य आहे. भारतातील सर्वात विकसित राज्य असून भारताच्या मध्यवर्ती भागात असल्याने महाराष्ट्र राज्याच्या सिमा गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा, कर्नाटक, गोवा आणि दादरा नगरहवेली या केंद्रशासित प्रदेशाशी जोडलेले आहे. महाराष्ट्र राज्याच्या पश्चिमेला अरबी समुद्राची किनारपट्टी आहे. लोकसंख्या साधारणपणे १२ कोटी असून राजधानी मुंबई तर उपराजधानी नागपूर आहे.[११] महाराष्ट्राचे क्षेत्रफळ ३,०७,७,७१३ चौ.कि.मी. (१,१८,८०९ चौ.मैल) इतके आहे.[१२] तर अक्षांश विस्तार १५$^{\circ}$.४१ उत्तर अक्षवृत्त ते २२$^{\circ}$.६ उत्तर अक्षवृत्त असून रेखांश विस्तार ७०$^{\circ}$.३६ ते ८०$^{\circ}$.५४ पुर्व रेखावृत्त आहे.[१३]

आज जो महाराष्ट्र म्हणून ओळखला जाणारा भूप्रदेश आहे. त्याचे प्रमुख पाच प्रादेशिक विभाग पडतात. पश्चिम किनारपट्टीला लागून असणारा भाग तो कोकण विभाग, दुसरा पश्चिम महाराष्ट्र, तिसरा मराठवाडा, चौथा भाग विदर्भ आणि पाचवा भाग उत्तर महाराष्ट्र असे पाच विभाग आहेत. सध्या महाराष्ट्रात ३६ जिल्हे ३५७ तालुके आहेत. हे जिल्हे सहा महसुली विभागात प्रशासकिय सोईसाठी सामावण्यात आले आहेत.[१४]

१) **कोकण विभाग :-** कोकण विभागात ठाणे, मुंबई, मुंबई उपनगर, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग हे सात जिल्हे सामावले आहेत.

२) **पश्चिम महाराष्ट्र :-** पश्चिम महाराष्ट्र विभागात पुणे,सातारा, सोलापूर,सांगली, कोल्हापूर या जिल्हयांचा समावेश आहे.

३) **खानदेश :-**खानदेश प्रशासकिय विभागात नाशिक,अहमदनगर,जळगाव,धुळे, नंदूरबार या जिल्हयांचा समावेश आहे.

४) **मराठवाडा :-**मराठवाडा या प्रशासकिय विभागात औरंगाबाद,हिंगोली,परभणी,लातूर, बीड, नांदेड,उस्मानाबाद, जालना या जिल्हयांचा समावेश होतो.

५) **पश्चिम विदर्भ विभाग:-**पश्चिम विदर्भ या प्रशासकीय विभागात अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा, वाशिम या जिल्हयांचा समावेश होतो.

६) **पूर्व विदर्भ विभाग:-** पूर्व विदर्भ प्रशासकिय विभागात नागपूर, वर्धा, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, चंद्रपुर या जिल्हयांचा समावेश होतो.[१५]

महाराष्ट्राची लोकसंख्या देशाच्या लोकसंख्येच्या मानाने एक दशांश आहे. महाराष्ट्रात ५३५ शहरे आणि ४४ हजार खेडी असून महाराष्ट्र राज्यातील दरडोई उत्पन्न हे २४००० हजार रुपये आहे.[१६] अशा प्रकारची आजच्या महाराष्ट्राची रचना असून महाराष्ट्रामध्ये क्षेत्रफळाच्या दृष्टीने अहमदनगर जिल्हा हा सर्वात मोठा आहे.

## २.३ अहमदनगर जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

महाराष्ट्राच्या मध्यभागी वसलेला अहमदनगर जिल्हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा म्हणून ओळखला जातो. संत ऋषीमुनीच्या पावन स्पर्शाने पावन झालेल्या हया जिल्हयाला पाचशे वर्षापेक्षा जास्त ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या जिल्हयाच्या अंगाखांद्यावर इतिहासाच्या असंख्य पाऊलखुणा अद्यापही शाबुत आहे.अगस्ती ऋषीपासून भृंग ऋषीपर्यंतच्या अनेक ऋषीच्या पावन स्पर्शाने पुनीत झालेल्या या जिल्हयाने वारकरी संप्रदायाचा अध्यात्माचा वारसा जपला आहे.जिल्हयातील समाजरचना भारतीय समाजरचनेपेक्षा वेगळी नाही.समाजात हिंदू,ख्रिश्चन, जैन, नवबौध्द, पारशी धर्माचे लोक आपआपल्या धर्माचे सण, उत्सव साजरे करतात. चालिरिती पाळतात.विविधतेचे प्रतिक असलेल्या या जिल्हयातील लोकांमध्ये एकत्व समजुतदारपणा असून एक दुसऱ्यांच्या सुखःदुःखात सामील होण्याची माणुसकीची भावना पुर्णपणे जिवंत आहे. एकतेचे हे एक

प्रतिक आहे. अहमदनगर जिल्हयात अनेक ऐतिहासिक घटना घडल्याचे पुरावे आजही खेडोपाडी पहावयास मिळतात.

**२.३.१ प्राचीन काळ :-**

प्राचीन काळी भारतात सिंधु संस्कृती, हडप्पा संस्कृती आदी संस्कृतींना रानटी मागास संस्कृती समजले जात होते. परंतु उत्खननातून असे दिसून आले की, सिंधु संस्कृती, हडप्पा संस्कृती उत्कृष्ट ग्रामिण व नागरी संस्कृती असल्याचे जगाच्या निदर्शनास आले. अहमदनगर जिल्हयातील नेवासा, संगमनेर, श्रीरामपूर तालुक्यांमध्ये भारत सरकारच्या पुराणवस्तूसंशोधन विभागाकडून आणि डेक्कन कॉलेजच्या पुरातत्व विभागाकडून उत्खनने करण्यात आली. त्यामधून प्राचीन संस्कृतीचे अवशेष मिळाले आहेत.

आद्य संस्कृतीचा काळ इ.स.पूर्व २५०० इतका मागे जातो. अहमदनगर जिल्हयातील उत्खननात सापडलेल्या वस्तूच्या आधारे असे दिसते की, येथील संस्कृती सिंधू संस्कृती, हडप्पा संस्कृतीच्या समकालीन होती.[१७] जिल्हयातील या सर्व उत्खननातुन इतिहासावर नविन प्रकाश पडला आहे. यावरुन प्रवरा नदीच्या खोऱ्यातील या संस्कृतीचे कालमापन हे सामान्यपणे इ.स.पूर्व २५०० ते इ.स. पूर्व १५०० असे असावे. जिल्हयातील जोर्वे, नेवासा, दायमाबाद येथील उत्खननातील वस्तूच्या आधारे या संस्कृतीचा कालखंड हा हडप्पा संस्कृतीशी मिळताजुळता असल्याचे दिसून येते. यावरुन अहमदनगर जिल्हयातील प्राचीन संस्कृतीची ओळख आपणास होते.[१८]

त्याचप्रमाणे प्राचीन काळी अहमदनगरचा भूभाग दंडकारण्यात मोडत होता. सहयाद्री पर्वत रांगेत उगम पावणाऱ्या घनदाट जंगलातून मार्गक्रमण करणाऱ्या प्रवरा नदीच्या तीरावर अकोले परीसरात प्रभू रामचंद्राचे वास्तव्य होते. रामायण, महाभारत काळात अहमदनगर जिल्हा दंडकारण्यात मोडत होता. अगस्ती ऋषी, प्रभू रामचंद्र यांच्या वास्तव्याने पुनीत झालेली अहमदनगरची भूमी संताची भूमी म्हणून ओळखली जाते. जिल्हयातील पाथर्डी तालुक्यात नाथपंथ नवनाथांचे आद्यपीठ आहे. तसेच श्री क्षेत्र वृध्देश्वर, श्री क्षेत्र मढी, आनंद ऋषीचे जन्मस्थान चिंचोडी, संतश्रेष्ठ तनपुरे महाराजांचे जन्मठिकाण 'दगडवाडी' तसेच महाराष्ट्रातील संत परंपरेचे प्रवर्तक निवृत्तीनाथ, सोपान, ज्ञानेश्वर, मुक्ताबाई यांच्या आयुष्याचा बराच काळ या जिल्हयामध्ये गेला आहे. नेवासा येथील वास्तव्य काळात ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लिहिला. तसेच संत मलिक, बाळेश्वर, ताहाराबाद, याशिवाय महानुभाव अवलिये यांचेही कार्य उल्लेखनीय आहे.[१९]

प्राचीन काळीची साक्ष देणाऱ्या इतिहासाच्या असंख्य पाऊलखुणा अद्यापही जिल्हयात अनेक ठिकाणी असल्याचे पहावयास मिळतात. जिल्हयातील विविध उत्खननात सापडलेल्या वस्तू आजही त्याची साक्ष देतात. तसेच पुणतांबे, नेवासे, अकोले, संगमनेर, ताहाराबाद ही ठिकाणे आजही जिल्हयातील प्राचीन संस्कृतीची साक्ष देत आहेत. संत महतांच्या वास्तव्याने व पावन स्पर्शाने पुनीत झालेला जिल्हा म्हणून अहमदनगर जिल्हा ओळखला जातो.[२०]

## २.३.२ मध्ययुगीन काळ :-

हसन गंगू बहामनी याने स्थापन केलेल्या बहामनी राज्याची शकले झाली आणि त्यातून पाच शाहया निर्माण झाल्या. त्यापैकी अहमदनगरची निजामशाही ही एक होय. निजामशाहीला मोगलांबरोबर सातत्याने संघर्ष करावा लागत होता. एकदा अहमदशहा मोगल लष्करांचा पाठलाग करत असतांना अहमदनगर येथील मैदानावर स्वार होऊन जात असतांना त्यास एक आश्चर्यकारक दृश्य दिसले. एक ससा एका कुत्र्याचा पाठलाग करत असतांना पाहून बादशहा थक्क झाला. त्यास ती जागा पसंत पडली. अहमदशाहाला जी जागा आवडली होती तिथेच त्याने किल्ला बांधण्याची आज्ञा दिली. हाच आजचा अहमदनगरचा भुईकोट किल्ला होय. त्याचबरोबर नगर शहराच्या स्थापनेस प्रारंभ झाला. २८ मे १४९० रोजी नगर शहर वसवायला सुरुवात केली.

बादशहाच्या नावावरुन या शहराला अहमदनगर असे नाव पडले. या अहमदशहाच्या काळात नगर शहर व परिसरात अनेक वैशिष्टयपूर्ण वास्तू निर्माण झाल्या. त्या आजही इतिहासाच्या साक्षी आहेत.[२१] इ.स.१४९४ साली या शहराची रचना पूर्ण होऊन अहमदनगर हे निजामशाहीची राजधानी बनले. या शहराची तुलना त्या काळात कैरो, बगदाद या समृध्द शहरांशी केली जात असे. अहमदशहा, बुऱ्हाणशहा, सुलताना, चाँदबिबी यांची कारकिर्द असणारी निजामशाहीने इ.स.१४९० - १६३६ या काळात दख्खनच्या पठारावर आपला ठसा उमटविला होता. या काळात अनेक ऐतिहासिक घटना येथे घडल्या.[२२]

भोसले घराण्यातील अनेकांनी संधी मिळेल तशी निजामशाहीची सेवा केली. शिवाजी महाराजांचे वडील शहाजी राजांनी निजामशाही वाचवण्यासाठी अनेक प्रयत्न केले. शहाजी राजांनी निजामशाहीचा एक वारस मुर्तजा निजामशहा यास संगमनेर जवळील पेमगिरी किल्यावर निजामशाहीचा वारस म्हणून घोषित करुन त्याच्या नावे पुन्हा निजामशाहीचे राज्य सुरु केले होते. परंतु मोगली सामर्थ्यापुढे त्यांचा फार काळ निभाव लागला नाही. त्यातुनच इ.स.१६३६ साली अहमदनगरच्या निजामशाहीचा शेवट झाला.[२३] १५ व्या व १६ व्या

शतकातील एक व्यापारी शहर म्हणून अहमदनगर ओळखले जात होते. अनेक युरोपियन देशांबरोबर या शहराचे व्यापारी संबध होते.

राजकियदृष्टया अहमदनगर शहराचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, या शहराच्या स्थापनेपासून दक्षिणेतील राजकारणाची सुत्रे या शहरातून हालवली जात होती व आहेत. निजामशाहीच्या अस्तानंतर अहमदनगरच्या भुईकोट किल्ल्याचे दुर्देवाचे दशावतार सुरु झाले आणि त्याचे रुपांतर बंदीशाळेत झाले. नाना फडणविस, मोरोबा दादा, संभाजी पत्नी येसूबाई, करवीरचे छत्रपती ४ थे शिवाजी महाराज आदी कर्तबगार मंडळी या बंदी शाळेत होती.[२४]

**२.३.३ आधुनिक काळ :-**

इ.स.१६०० साली इंग्लड येथे काही व्यापाऱ्यांनी ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली. या व्यापाऱ्यांनी इंग्लडच्या एलिझाबेथ राणीकडून पुर्वेकडील देशांशी व्यापार करण्याची सनद मिळविली. आणि व्यापाराच्या रुपाने इंग्रजाचा भारतात प्रवेश झाला. इंग्रजाप्रमाणेच भारतात इतर युरोपीयन व्यापारी आले होते. युरोपियन देशांमधील व्यापारी स्पर्धेत इंग्रज व्यापारी श्रेष्ठ ठरले.

भारतात व्यापारी वर्चस्व सिध्द केल्यानंतर भारतीयांच्या मागसलेपणाचा फायदा घेत राजकिय हस्तक्षेप करत भारतातील छोटी मोठी सत्ताकेंद्रे आपल्या वर्चस्वाखाली आणली. उत्तर भारताप्रमाणे दक्षिण भारतीय राजकारणात ईस्ट इंडिया कंपनीने आपले वर्चस्व सिध्द करतांना इ.स. १७५७ ते इ.स.१८५७ या शंभर वर्षाच्या काळात अनेक संघर्षाना सामोरे जात प्रचंड साम्राज्य विस्तार केला.[२५] इ.स.१८५७ च्या उठावात भारतीयांना जरी अपयश आले तरी भारतीयांच्या ठिकाणी प्रज्वलित झालेली स्वातंत्र्याची ज्योत इंग्रज कदापीही विझवू शकले नाही. इ.स.१८५७ नंतर भारतीय स्वातंत्र्य लढा अधिक प्रखर बनला. या स्वातंत्र्य संघर्षात ब्रिटिश सरकार विरोधी चळवळी, मोर्चे उठाव होत होते. या स्वातंत्र्यलढयात महाराष्ट्र राज्य आघाडीवर होते. तर महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर जिल्हा आघाडीवर होता. अहमदनगर जिल्हा तर स्वातंत्र्यसैनिकांचा जिल्हा म्हणूनच ओळखला जात होता.[२६] या स्वातंत्र्य सेनानीमध्ये अच्युतराव पटवर्धन,पा.वा.गाडगीळ, नाना सय्या, रामकृष्ण महाराज, रावसाहेब पटवर्धन,रावसाहेब शिंदे, दादा चौधरी, काशिनाथ, पंत भालेराव, रामभाऊ निसाळ, केशवराव देशमुख, भैय्यासाहेब कुलकर्णी, बुवासाहेब नवले, लक्ष्मण ठाकर, पारेगावकर, दत्ता देशमुख, भास्करराव औटी, बी.जे.खताळ, बाबुराव तनपुरे, के.बी.

रोहमारे, भास्करराव दूर्वे, अण्णासाहेब शिंदे, पी.बी.कडू, भाऊसाहेब थोरात, रघुजी भांगरे, रामजी भांगरे, चंद्रभान आठरे, मोतीलाल फिरोदिया, विष्णूबुवा हासे, भिमाशंकर कानवडे, महाजन, पी.सी. जोशी, बाळासाहेब भारदे, धर्मा पोखरकर, बाबुजी आव्हाड, बाबुमियाँ बँडवाले इ. स्वातंत्र्य सैनिकांनी ब्रिटिश सरकार विरोधी आक्रमक धोरणांचा अवलंब करत अहमदनगर जिल्हयातील प्रशासकीय कारभारात अडथळे आणण्याचे व सरकारी मालमत्ता नष्ट करण्याचे धोरण अवलंबले होते. या भारतीय स्वातंत्र्य चळवळीत विद्यार्थी दशेपासून भाऊसाहेब थोरात सक्रिय होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत भाऊसाहेबांचे योगदान महत्वपूर्ण राहिले आहे. त्याचप्रमाणे स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही शेतकरी कामगारांच्या प्रश्नासाठी कम्युनिस्ट विचाराच्या प्रभावाने प्रेरीत होऊन भाऊसाहेबांनी कामगार, शेतकरी, यांच्यासाठी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. परंतु कम्युनिस्ट विचाराने जिल्हयाचा विकास होऊ शकत नाही. ही गोष्ट लक्षात आल्याने इ.स.१९५२ साली भाऊसाहेबांनी सहकाराचे व्रत स्विकारले. आणि सहकाराच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाचा राजकिय, सामाजिक, आर्थिक विकास घडवून आणण्यात महत्वपूर्ण योगदान दिले आहे. भाऊसाहेब थोरात यांचे जिल्हयाच्या विकासातील राजकिय योगदान महत्वपूर्ण ठरले आहे.

### २.३.४ भारतीय स्वातंत्र्य लढा आणि अहमदनगरमधील भुईकोट किल्ला :-

अहमदनगर जिल्हयाने भारतीय राजकारणातील सर्व स्थित्यंतरे अनुभवली. इ.स.१९४२ च्या चलेजाव आंदोलनाने म.गांधीजी पाठोपाठ अनेक प्रमुख नेत्यांनाही अटक झाली. त्यातील पंडित जवाहरलाल नेहरु, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद, आचार्य कृपलानी, आचार्य नरेंद्र देव, हरेकृष्ण मेहताब, गोविंद वल्लभपंत, बॅरिस्टर असफ अली, डॉ.सय्यद मेहमुद, डॉ.पी.सी.घोष, शंकरराव देव, पटाभी सितारामय्या आदि राष्ट्रीय नेत्यांना अटक होऊन अहमदनगरच्या भुईकोट किल्ल्यात बंदिवासात ठेवले होते. बंदिवासात असतांना पं.नेहरु यांनी 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' हा प्रसिध्द ग्रंथ याच भूईकोट किल्ल्यामध्ये लिहिला. या ग्रंथाचे काही हस्तलिखित आजही तेथे पहावयास मिळतात. तसेच नेहरुंनी वापरलेल्या वस्तू आजही भुईकोट किल्ल्यात पहावयास मिळतात. याच भुईकोट किल्ल्यामध्ये डॉ.पी.सी.घोष यांनी 'हिस्ट्री ऑफ एन्शंट इंडियन सिव्हिलायझेशन' हा ग्रंथ लिहिला, तर मौलाना आझाद यांनी गुवार- ए खातीर' हा ग्रंथ येथेच लिहिला. अनेक ऐतिहासिक घटनांची साक्षी देत अहमदनगरचा भुईकोट किल्ला आजही उभा आहे.

### २.३.५ भारतीय स्वातंत्र्य लढयातील अहमदनगर जिल्हयाचे योगदान :-

भारतातील राजकारण, समाजकारण, अर्थकारण यातील अनेक घडामोडीच्या केंद्रस्थानी अहमदनगर जिल्हा होता. मध्ययुगीन इतिहासातील अनेक रत्नाचा उदय याच जिल्हयात झाला. हिंदवी स्वराज्य संस्थापक, शिवाजी राजांचे आजोबा मालोजी राजे, वडील शहाजी राजे, पेशवाईतील साडेतीन शहाण्यांपैकी एक विठ्ठल सुंदर, पेशव्यांचा कारभारी त्र्यंबकजी डेंगळे आदी इतिहासातील नवरत्ने याच अहमदनगर जिल्हयात तयार झाली. तसेच चाँदबिबी, वजीर मलिक अंबर, इतिहासकार पेरिस्ता, मुलुख मैदानी तोफेचा जनक रुमीखान, अशा ऐतिहासिक रत्नाची खाण याच जिल्हयात होती.[२७]

निजामशाही ते पेशवाईतील अनेक घटना जिल्हयात घडल्या आणि पेशवाईच्या शेवटाबरोबरच लॉर्ड वेलस्ली या हुशार महत्वाकांक्षी प्रशासकाने इ.स.१८१८ मध्ये अहमदनगरवर कब्जा करुन प्रशासनाच्या सोईसाठी अहमदनगर जिल्हा निर्माण केला.

राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेनंतर राष्ट्रीय कॉंग्रेसचे जसे मवाळ, जहाल, गांधीयुग असे तीन कालखंडात विभाजन झाले होते. तसेच ब्रिटीश सरकारविरुध्द संघर्ष करणारे अहमदनगर जिल्हयात जहाल व मवाळ असे दोन गट होते. देशामध्ये ॲनी बेझेंट यांनी 'होमरुळ चळवळ' सुरु केली असता लोकमान्य टिळकांनी या चळवळीला पाठिंबा दिला. होमरुळच्या जागृतीसाठी लोकमान्य टिळकांनी अहमदनगर येथे इ.स.१८१७ साली सभा घेतली आणि या सभेमध्येच 'स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' ही ऐतिहासिक सिंहगर्जना अहमदनगरच्या मातीत केली. समस्त गट अलिप्त होता.मात्र टिळकांनी पुण्यात होमरुळची शाखा सुरु करते वेळी अहमदनगर जिल्हयातून बाळासाहेब देशपांडे, माधवराव परशरामी, केशवराव परशरामी, वैजनाथ शास्त्री, प्रेमसुख कापरे, भाऊसाहेब फिरोदिया, रा.वा. चितळे, रावसाहेब पटवर्धन असे जहाल, मवाळ दोन्ही गटाचे कार्येकर्ते उपस्थित होते. उभयंतामध्ये तेथेच समेट घडवुन आला.

स्वराज्यासाठी ब्रिटिश सरकारशी संघर्ष करत असतांना आपआपसातील मतभेदाचा फायदा इंग्रजांना मिळु नये म्हणून सर्वांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतला. नगरकर एवढयावरच थांबले नाहीत तर त्यांनी नामदार गोखले आणि लोकमान्य टिळक यांच्यातही समेट घडवून आणला. या दोन राष्ट्रीय नेत्यांमधील हा समेट देशाच्या राजकीय इतिहासात महत्वपूर्ण मानला जातो. या कामी रा.बा.चितळे, बाळासाहेब देशपांडे, चौकार यांनी बजावलेली भूमिका महत्वपूर्ण ठरली.[२८]

लोकमान्य टिळकांचे निधन झाले आणि राष्ट्रीय कॉंग्रेसच्या तिसऱ्या कालखंडाचे नेतृत्व महात्मा गांधीजीकडे आले. गांधीजींनी सुरु केलेल्या असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ या चळवळीच्या माध्यमातुन कॉंग्रेस खेडयापर्यंत जाऊन पोहचली.

अहमदनगरच्या इतिहासात इ.स.१९३० साल अत्यंत महत्वाचे ठरले. महात्मा गांधीजीच्या जंगल सत्याग्रहास अहमदनगर जिल्हयातील लोकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. संगमनेर, अकोले तालुक्यात जो जंगल सत्याग्रह झाला त्यातुन प्रेरणा घेऊन जिल्हयाच्या बाहेरील अनेक गावात जंगल सत्याग्रह झाले.[२९]

इ.स.१९४२ साली महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली सुरु झालेल्या चलेजाव आंदोलनातही अहमदनगर जिल्हयाने महत्वपूर्ण भूमिका निभावली. या चळवळीतील सहभागीपैकी भाऊसाहेब थोरात, अण्णासाहेब शिंदे, भास्करराव दुर्वे नाना, पी.बी.कडू आदिंना अटक झाली. आणि सुटकेनंतर जिल्हयात कम्युनिस्ट पक्षाच्या माध्यमातुन ते कार्य करु लागले. तसेच स्वातंत्र्योत्तर काळात देशात डाव्या चळवळीचा जोर वाढला होता. त्यातही अहमदनगर जिल्हा आघाडीवर होता.[३०]

स्वातंत्र्योत्तर देशातील राजकीय घडामोडीचे बरे वाईट परिणाम अहमदनगर जिल्हयाच्या राजकारणावरही झाले. देशात डाव्या चळवळींचा जोर वाढला होता. त्यात अहमदनगर जिल्हा आग्रभागी होता. अहमदनगर जिल्हयातील भाऊसाहेब थोरात, भास्करराव दूर्वे नाना, पी.बी.कडू पाटील, भैय्यासाहेब कुलकर्णी, बुवासाहेब नवले, धर्मा पोखरकर, वकिलराव लंघे, किसन नेहे आदी कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी शेतकरी, कामगारावरील अन्यायाविरुध्द आक्रमक भूमिका घेतली होती. जिल्हयाच्या राजकारणात कम्युनिस्ट पक्ष एक प्रमुख प्रबळ पक्ष होता. या काळात प्रवरानगर येथे विठ्ठलराव विखे पाटील यांनी सहकारी साखर कारखाना काढला होता. जिल्हयात सहकाराचे वारे वाहू लागले होते. कम्युनिस्ट भाऊसाहेब थोरात यांनी सहकाराचे महत्व ओळखून जिल्हयाच्या सर्वांगिण विकासासाठी सहकार व्रताचा स्विकार केला आणि सहकाराच्या माध्यमातून विविध सहकारी संस्थाची स्थापना केली. भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हा बॅंकेचे अध्यक्ष, राज्य सहकारी बॅंकेचे अध्यक्ष तसेच विधानसभा सदस्य या पदाचा उपयोग जिल्हयाच्या विकासासाठी केला.

इ.स.१९९१ नंतर जिल्हयाच्या राजकारणात परिवर्तन होऊन मी आणि माझा मतदार संघ अशी संकुचित भावना निर्माण झाली होती. या शहकाटशहाच्या राजकारणाने राज्य

पातळीवर जिल्हयाच्या राजकारणाची दखल घेतली गेली होती. त्यातूनच जिल्हयातील काँग्रेस पक्षाचे गोविंदराव आदिक, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बबनराव पाचपुते, भाजपचे सुर्यभान वहाडणे यातील राजकिय पक्षाचे प्रदेश अध्यक्षपद एकाचवेळी अहमदनगर जिल्हयाने भुषविले आहेत. तर बबनराव ढाकणे जनता दलाचे प्रदेश अध्यक्ष होते. तसेच विधानसभा आणि विधानपरिषदेचे सभापतीपद अनुक्रमे भाऊसाहेब फिरोदिया, बबनराव ढाकणे, बाळासाहेब भारदे, ना.स.फरांदे यांनी भुषविली. या जिल्हयाने भारतीय स्वातंत्र्य संग्राम, स्वातंत्र्योतर काळ, औद्योगिक क्रांती, हरितक्रांती, सहकाराचा उदय, आणिबाणी, जनता सरकार, राजीव लाट ते अटल सरकार आणि आत्ताची नमो लाट अशा धुरीकरणामध्ये या जिल्हयाचे सामाजिक, आर्थिक, राजकीय जीवन ढवळुन निघाले. प्रत्येक घडामोडीवर या जिल्हयाची मोहर उमटली. राजकीय बदलाचे बरेवाईट अनुभव घेतले.

### २.३.६ अहमदनगर जिल्हयातील ऐतिहासिक व धार्मिक स्थळे :-

अहमदनगर जिल्हा हा स्वातंत्र्य सैनिकांची जिल्हा म्हणून ओळखला जातो. त्यापैकीच एक स्वातंत्र्य सैनिक भाऊसाहेब थोरात १९४२ च्या चळवळी दरम्यान ब्रिटीश सरकारविरोधी संघर्ष करीत असतांना त्यांना व त्यांच्या सहकार्यांना भुमिगत राहुन संघर्ष करणे भाग पडले होते. अशा भुमिगत चळवळीच्या काळात अहमदनगर जिल्हयातील ऐतिहासिक स्थळे, दुर्गम भागातील धार्मिक स्थळे हिच या स्वातंत्र्य सैनिकांची आश्रयस्थाने होती.

तर स्वातंत्र्योत्तर काळात भाऊसाहेब थोरात अहमदनगर जिल्हयाचा सामाजिक, आर्थिक, राजकिय विकास करु पाहत असताना जिल्हयातील प्रत्येक तालुक्याबरोबर त्यांचा संबध आला होता. स्वातंत्र्योपुर्व काळात स्वातंत्र्यासाठी तर स्वातंत्र्योत्तर काळात सहकाराच्या माध्यमातुन जिल्हयाचा विकास करु पाहणाऱ्या भाऊसाहेबाच्या कार्याचे कार्यक्षेत्र अहमदनगर जिल्हा असल्याने जिल्हयातील ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचे त्यांच्या कार्यात महत्वपूर्ण योगदान आहे. संशोधक पध्दतीने विचार केल्यास भाऊसाहेबांच्या कार्यक्षेत्राची माहिती होण्याच्या दृष्टीने ही ऐतिहासिक व धार्मिक स्थळे महत्वपूर्ण ठरली आहेत. म्हणुनच मी या प्रकरणात काही ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचा थोडक्यात आढावा तसेच काही स्थळांचा नामोल्लेख केला आहे.

**१) अकोले तालुका :-**

**१) कळसुबाई :-**

महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर म्हणुन कळसुबाई प्रसिध्द आहे. ते सहयाद्रीच्या पर्वतरांगामध्ये वसलेले आहे. उंची १६४६ मिटर इतकी आहे. शिखराच्या पायथ्याशी कळसुबाई या देवीचे ठाणे आहे. ते त्या भागातील लोकांचे श्रध्दास्थान आहे.[३१]

**२) भंडारदरा :-**

अकोले तालुक्यातील प्रवरा नदीवर भंडारदरा गावाजवळ जे धरण बांधले आहे ते भंडारदरा म्हणुन परिचित आहे. त्याचे बांधकाम १९१० ते १९२६ या काळात झाले. मुंबई इलाख्याचे गर्वनर यांचे नाव धरणास दिले आहे. धरणाचे बांधकाम ऑर्थर हिल या इंजिनिअरने पुर्ण केले आहे. त्याचे नाव जलाशयाला देण्यात आले. आजही रेकॉर्डला तीच नावे आहेत.[३२]

**३) अगस्ती ऋषीचा आश्रम :**

प्राचीन दंडकारण्याची भूमी प्रभू रामचंद्राच्या पदस्पर्शाने पावन झालेले स्थान म्हणजे अगस्ती ऋशींचा आश्रम होय. श्रीरामाने ज्या बाणाने रावणाचा वध केला तो बाण याच ठिकाणी अगस्ती ऋषीनी श्रीरामाला दिला होता.[३३]

**४) रतनगड :**

अहमदनगर जिल्हयाच्या पश्चिमेकडील सहयाद्रीच्या पर्वत रांगेत रतनगड आहे. या गडाची उंची ४२५३ फुट आहे. याच रतनगडाच्या पायथ्याशी प्रवरा नदीचा उगम होतो.[३४]

**५) भिमगड :-**

सहयाद्री पर्वताची उपरांग बाळेश्वरच्या डोंगररांगेत हा गड आहे. यास प्रेमगड या नावाने ओळखतात. या गडावर शहाजी राजांनी मुर्तजा निजामशहाला गादीवर बसवुन त्याच्या नावे निजामशाहीचा कारभार सुरु केला होता. गडावर २ एकर परिसरात पसरलेला ऐतिहासिक वटवृक्ष आहे.[३५]

६) **हरिश्चंद्रगड :**

मुळा नदीचे उगमस्थान आहे. गडावर हरिश्चंद्राचे हेमाडपंथी मंदिर व लेणी समुह तसेच एक शिलालेख आहे. संत चांगदेव महाराजांनी तत्वसार हा ग्रंथ येथे लिहिला.[३६] याशिवाय अकोले तालुक्यात बिबळयाचे अभयारण्य, भंडारदरा धरण, सिध्देश्वर मंदिर हि जंगलाने व्यापलेली ही ठिकाणी आहेत.

२) **संगमनेर :-**

१) **बाळेश्वर :** संगमनेर तालुक्यातील प्रमुख तिर्थक्षेत्र व प्रेक्षणिय स्थळ आहे. सहयाद्रीच्या उपरांगेपैकी बाळेश्वराच्या डोंगर रांगेत हे ठिकाण आहे. येथे महादेवाचे प्रसिध्द मंदिर आहे.

२) **निझर्णेश्वर :** कोकणगांव जवळील घनदाट जंगलानी व्यापलेल्या परिसरात निझर्णेश्वर महादेवाचे मंदिर आहे.

३) **पेमगिरी :** संगमनेर जवळील पेमगिरी या गावाजवळील डोंगरमाथ्यावर प्रेमगिरी हा गडीवजा किल्ला आहे. १६३३ साली मोगलांनी दौलताबाद किल्ला जिंकून तेथील निजामशाही राजवट संपुष्टात आणल्यानंतर निजामशाहीतील सरदार शहाजीराजे भोसले यांनी निजामशाहीचे शेवटचे अल्पवयीन वंशज मुर्तझा यास या किल्ल्यावर निजामशहा म्हणून घोषित करुन स्वतःहा निजामशाहीचे वजीर बनुन काही काळ निजामाशाहीचा राज्यकारभार पाहिला.[३७] याशिवाय संगमनेर तालुक्यातील सप्तश्रृंगीचे मंदिर, हिवरगाव पावसा येथील खंडोबा मंदिर, समनापूर गणपती मंदिर, नेमबाई देवीचे मंदिर ही धार्मिक स्थळे आहेत.

३) **राहाता :-**

१) **पुणतांबा :** गोदावरी नदीच्या तिरावरील हे प्रसिध्द धार्मिक क्षेत्र आहे. या ठिकाणी चांगदेव महाराजांची समाधी आहे. त्याचप्रमाणे कार्तिक स्वामीच्या मंदिराबरोबरच २१ मंदिरे या गावात आहेत.

२) **संवत्सर :** गोदावरीच्या काठावरील दंडाकरण्यानी व्यापलेला हा प्रदेश असून ऋषीमुनींचे तपश्चर्या स्थान येथे अंग ऋषीचे मंदिर आहे.[३८]

याशिवाय राहाता तालुक्यात सदगुरु उपासनी महाराज आश्रम, एकरुखे येथील वज्रेश्वरी देवीचे मंदिर, शिर्डी आदी धार्मिक ठिकाणे आहेत.

४) **श्रीरामपूर :**

**सरालाबेट -** गोदावरी नदीवर निर्माण झालेले निसर्गरम्य बेट आहे.

गंगाधर महाराजांच्या वास्तव्यामुळे या बेटास धार्मिक महत्व प्राप्त झाले आहे.[३९]

याशिवाय श्रीरामपूर तालुक्यातील कमलापूर येथील महानुभाव पंथाचे मंदिर, बेलापूर येथील श्रीहरिहर केशव गोविंद यांचे प्राचीन मंदिर, ही धार्मिक स्थळे तसेच दायमाबाद हे उत्खणन स्थळ याच तालुक्यात आहे.

५) **राहुरी :**

**ताहाराबाद -** मराठी साहित्यातील पहिले संत चरित्रकार महिपती महाराज यांचे येथे समाधी मंदिर आहे.[४०]

याशिवाय राहुरी तालुक्यातील भगवतीमाता मंदिर, मांजरी येथील चंद्रगिरी महाराजाचा मठ, वांबोरीचा जयरामस्वामी मठ, आदी धार्मिक स्थळे आहेत.

६) **नेवासा :**

संत ज्ञानेश्वर मंदिर, मोहिनीराज मंदिर, देवगडचे दत्त मंदिर, शनि शिंगणापूर, बेलेश्वर वाडीचे रेणूका मंदिर, चांदयाचे जगदंबा मंदिर, नेवासा तालुक्यात आदी धार्मिक स्थळे आहेत.

७) **कोपरगांव :**

राघोबादादांचा वाडा, संत जनार्दन महाराज समाधी, संवत्सर येथील नारदाची समाधी, कचेश्वर, शुक्लेश्वर मंदिर, कोकमठाण मंदिर, साई तपोभूमी.

८) **पारनेर :**

पारनेर तालुक्यातील कोरठण खंडोबा, ढोकेश्वर, मंदिर, निघोज, मळगंगा देवीचे मंदिर पिंपळनेर येथील निळोबाराय समाधी मंदिर, राळेगण सिध्दी, हिवरेबाजार, पळशीकराचा वाडा व विठ्ठल मंदिर आदि धार्मिक ठिकाणे आहेत.

९) **शेवगाव :**

पक्षी अभयारण्य, कांबीची महालक्ष्मी, काशीकेदार, भगवानगड, तळणीची देवी, बोधगावची भानुम्मा, घोटणचे माल्लिकार्जुन मंदिर आदी महतवाच्ी ठिकाणे शेवगाव तालुक्यात आहेत.

१०) **पाथर्डी :-**

तीसगाव ऐतिहासिक वाडा, भगवानगड परमपुज्य भगवान महाराज यांचा आश्रम, मढी- कानिफनाथ महाराजांची समाधी मंदिर, मिरी येथील शंकरमठ, दिनकर स्वामी मठ, पाथर्डी तालुक्यात आदी ऐतिहासिक व धार्मिक स्थळे आहेत.

११) **कर्जत :**

रेहकुरी काळवीट अभयारण्य, गोंदड महाराज मंदिर, सिध्दटेक, राशिनचे जगदंबा मंदिर, काशिविश्वेश्वर मंदिर, कर्जत तालुक्यात आदी महत्वाची ठिकाणे आहे.

१२) **जामखेड :**

खडर्याचा भुईकोट किल्ला, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे जन्मस्थळ चौंडी, अरणेश्वर, अरणगांव आदि महत्वाची ठिकाणे आहेत.

१३) **नगर तालुका :**

गोरक्षनाथ गड, मांजरसुंभा किल्ला, पिंपळगाव तलाव, राजधानीचा खंडोबा, हिवरेबाजार,अरणगांव, मेहेरबाबांची समाधी, डोंगरगण, शरभंग ऋषींचा आश्रम, भातोडी आदी महत्वाची ठिकाणे नगर तालुक्यात आहेत.[४१]

भाऊसाहेब थोरात १९४२ च्या चळवळी दरम्यान भूमिगत असताना अहमदनगर जिल्हयातील डोंगरदऱ्यात असणारी ही ऐतिहासिक व धार्मिक स्थळे भाऊसाहेब व त्यांच्या सहकाऱ्यांची आश्रय स्थाने होती.

तर स्वातंत्र्योत्तर काळात सहकाराच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाचा सर्वांगिण विकासाचा ध्यास घेतलेल्या भाऊसाहेबांचा अहमदनगर जिल्हयातील सर्व तालुके व अनेक गावाबरोबर सातत्याने संबध येत होते. संशोधक पध्दतीने विचार केल्यास भाऊसाहेबांच्या स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कार्यावर प्रकाश टाकण्याच्या दृष्टीने जिल्हयातील या ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचा आढावा घेणे महत्वाचे वाटल्याने एक संशोधक म्हणुन मी येथे काही ऐतिहासिक ठिकाणाची माहिती व नामउल्लेख केला आहे.

## २.४ अहमदनगर जिल्हयाची भौगोलिक पार्श्वभूमी :-

अहमदनगर जिल्हयात अतिप्राचीन काळात सहयाद्री पर्वताच्या उदर गर्भातुन प्रज्वलित झालेल्या ज्वालामुखीतुन उसळणारा तप्त लाव्हारस पसरुन हळूहळू थंड होत असताना उंच सखल भूभाग तयार झालेला आहे. सहयाद्रीच्या उंच सखल रांगामधून भिमा,

मुळा, गोदावरी, प्रवरा या मुख्य तर अनेक लहान उपनद्या उगम पावून अहमदनगर जिल्हयातून वाहतात. या नद्यांच्या परिसरात तयार झालेला सुपीक जमिनीचा भाग म्हणजेच अहमदनगर जिल्हयाचा भूभाग होय. सहयाद्रीच्या कुशीत उगम पावलेल्या नद्या अनादी काळापासून भरण पोषण करीत आल्या आहेत. या भूमीवर अनेक थोरामोठयांच्या पाऊलखुणा उमटलेल्या आहेत.

त्यांच्या पावनस्पर्शाने या भूमीतील मातीचा कणनकण पौराणिक, उपनिषदे, रामायण, महाभारत यांनी पावन झालेल्या इतिहासा इतकाच स्फुर्तिदायक झाला आहे. असा हा अहमदनगर जिल्हा महाराष्ट्राच्या नकाशात ह्दय सिंहासनावर विराजमान झाला आहे.

महाराष्ट्राच्या मध्यावर असणाऱ्या अहमदनगर जिल्हयांची समाज रचना भारतीय समाजरचनेपेक्षा वेगळी नाही. अनेक धर्मिय लोक आपआपल्या धर्माचे आचारविचार पाळत असल्याने त्यांच्यातील एकत्व टिकुन आहे. त्याचप्रमाणे भौगोलिक दृष्टया एकसंघ अशी वेगळी परंपरा अहमदनगर जिल्हयाने जतन केली आहे.जिल्हयाच्या या भौगोलिक वैशिष्टयामुळे, आकारमानामुळे तसेच अहमदनगर नावात काना, मात्रा, वेलांटी, उकार नसल्याने महाराष्ट्रातील वैशिष्टयपूर्ण जिल्हा म्हणून एक वेगळी ओळख आहे. अशा भौगोलिक वैशिष्टयांमुळे व त्याच्या आकारमानामुळे अहमदनगर जिल्हा महाराष्ट्रामध्ये ओळखला जातो.

### २.४.१ अक्षांश रेखांश

अहमदनगर जिल्हा हा उत्तर अक्षांस १८$^{\circ}$.२ अंश ते १९$^{\circ}$.९ अंश आणि पूर्व रेखांश ७३$^{\circ}$.९ ते ७५$^{\circ}$.५ अंश या दरम्यान पसरलेला आहे.[४२]

### २.४.२ क्षेत्रफळ

क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर असलेल्या अहमदनगर जिल्हयाचे क्षेत्रफळ १७४१३ चौ.कि.मी. इतके असून ते महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रफळाच्या ५.५६ टक्के आहे.[४३]

### २.४.३ विस्तार

अहमदनगर जिल्हयाचा विस्तार १४ तालुक्यामध्ये झाला आहे. तर जिल्हयात १५७८ गावे व १३११ ग्रामपंचायती आहेत. जिल्हयाच्या उत्तर सिमेवर नाशिक, उत्तर पुर्वेस औरंगाबाद जिल्हा, पूर्वेस बीड व उस्मानाबाद जिल्हा, दक्षिणेस सोलापूर जिल्हा, पश्चिमेस ठाणे व पुणे जिल्हा आहे. [४४]

### २.४.४ हवामान व पर्जन्य

सहयाद्रीच्या पूर्व उतारावरील महाराष्ट्राचा प्रदेश पर्जन्य छायेचा प्रदेश म्हणुन ओळखला जातो. त्यातील अहमदनगर जिल्हा हा दुष्काळी जिल्हा म्हणुन ओळखला जातो. जिल्हयात साधारणपणे जुन,जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर या कालावधीत पाऊस पडतो. जिल्हयातील पावसाची सरासरी ५५ से.मी.इतकी आहे. हवामान विषम असुन पावसाळा मर्यादीत तर हिवाळा व उन्हाळा कडक असतो. हवामान कमाल ४१° से.तर किमान १२° से.इतके असते.

### २.४.५ भौगोलिक विभाग

भौगोलिक दृष्टया जिल्हयाचे चार भाग पडले आहेत.

१) अती पावसाचा प्रदेश : अकोले तालुक्याचा अंतर्भाव या विभागात होतो.

२) खुप कमी पावसाचा प्रदेश : अहमदनगर, संगमनेर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत या तालुक्यांचा अंतर्भाव होतो.

३) कोपरगाव,श्रीरामपूर व राहुरी या भागात कमी पर्जन्य आहे. परंतु प्रवरा, गोदावरी व मुळा या नद्यांच्या पाटपाण्यामुळे नगदी पिके घेतली जातात. ऊस शेती मोठया प्रमाणात असुन साखर कारखान्यांची संख्या जास्त आहे.

४) नेवासा, शेवगाव तालुक्यात जमीन सुपीक असुन मुळा नदीच्या पाटपाण्यामुळे नगदी पिके घेतली जातात.[४५]

### २.४.६ माती

या भागातील पर्वत रांगामध्ये लाव्हा आणि पॅराव्वाईस यांचा आर्यन ऑक्साइडशी संबध येऊन विशिष्ट प्रकारची लाल माती तयार झालेली आहे. संगमनेर, अकोले तालुक्यात अशी माती आढळते. तर नदी प्रदेशात सुपीक व लागवडीयोग्य माती आढळते.[४६]

### २.४.७ वनस्पती

जिल्हयात राखीव जंगले २००८चौ.कि.मी. संरक्षीत जंगले १८ चौ.कि.मी. एकुण क्षेत्र २०२६ चौ.कि.मी. आहे.जिल्हयात आवळा, खैर, आंबा, बेहडा, सिसम, जांभुळ, साग, पळस, बोर, कडुलिंबु आदि वृक्ष वनामध्ये आढळतात.[४७]

### २.४.८ जलसिंचन

भंडारदरा धरणात पाणी साठवण क्षमता ११२०० द.ल.घन फुट इतकी असुन भंडारदरा धरणामुळे १५७४४८ एकर क्षेत्राला पाणी मिळते. तर मुळा डॅम धरणाची पाणी

साठवण क्षमता २६००० द.ल.घनफुट इतकी आहे. हे धरण मातीचे आहे. या धरणामुळे ८५७१० हेक्टर क्षेत्र ओलीताखाली आले आहे.[४८]

### २.४.९ पिके

येथील बहुतांश शेती पावसावर अवलंबुन आहे. खरीप व रब्बी हंगामात पिके घेतली जातात. खरीप हंगामात बाजरी, ज्वारी, मठ, मुग, मका, हरभरा कापुस पिके घेतली जातात. तर नदी क्षेत्रात ऊस, कापुस, डाळींब, द्राक्षे, संत्री, चिकु हे नगदी पिके घेतली जातात.

### २.४.१० खनिजे

जिल्हयाच्या पश्चिमेकडील संगमनेर तालुक्यातील बाळेश्वर डोंगर राग परिसरात चुनखडी सापडते व इतरत्र बेसाल्ट दगड सापडतो.[४९]

### २.४.११ वन्यप्राणी

जंगलतोड व जंगलाच्या रक्षणाकडे झालेले दुर्लक्ष यातुन जंगलातील वन्य प्राण्याच्या संख्येत घट होत आहे.वन्य प्राण्यामध्ये, ससा, कोल्हे, लांडगे, वाघ, हरणे, रानडुक्कर, उद आदी प्राणी पहावयास मिळतात.[५०]

### २.४.१२ उद्योग

प्राचीन काळापासुन जिल्हा कुटीर उद्योगात अग्रेसर म्हणुन ओळखला जातो. जिल्हयात विडी उद्योग, चांदीकाम, हातमाग, लोहारकाम, सुतारकाम, दोर वळणे, मासेमारी, काचेच्या वस्तु, बांगडया, तांबे पितळांची भांडी, विटा, कुंभारकाम, चामडे कमावणे, साबण उद्योग आदी उद्योग चालतात.[५१]

### २.४.१३ सहकार

सहकार चळवळीच्या क्षेत्रात अहमदनगर जिल्हा महाराष्ट्र राज्यात प्रथमपासुन अग्रेसर आहे. राहाता तालुक्यातील प्रवरानगर येथे पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना हा भारतातील सहकार क्षेत्रातील पहिला सहकारी साखर कारखाना आहे. तर अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही आशिया खंडातील सहकारी क्षेत्रातील सर्वात मोठी बँक आहे. याशिवाय कृषी सहकारी संस्था, बिगरकृषी सहकारी पतसंस्था आदी संस्थाचे जिल्हयाच्या विकासात महत्वपूर्ण योगदान राहिले आहे.[५२]

## २.५ संगमनेर तालुक्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

नगर जिल्हयाच्या ह्दय कमळातुन वाहणाऱ्या पयोधरा नदीचा उगम रतनगडाच्या पायथ्याशी झाला आहे. पयोधरा पुढे सरकत असतांना संगमनेर जवळ म्हाळूंगी आणि म्हांनुटी नद्याच्या संगम होऊन म्हाळुंगी पुढे सरकत पयोधरेला अलिंगन देत तिच्यात सामावून जाते. पयोधरा पुढे सरकत असतांनाच संगमनेर जवळ तिला नाटकी आणि आढळा या छोटया नदयांना आपल्यात सामावून घेत खळखळून वाहते. पयोधरा म्हणजेच आजची प्रवरा नदी होय. या पाच नद्याच्या संगमामुळे गावास 'संगमिका' नाव पडले. तेच आजचे संगमनेर होय. या पाच नद्यांच्या दुआबातील संगमनेर परिसर रमणीय व संस्कृती संवर्धनाला पोषक असाच आहे. या नद्यांनी समृध्द केलेल्या येथील जीवनाइतकेच येथील सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसाही समृध्द आहे. अति प्राचीन काळापासून या तालुक्याच्या परिसरात व शेजारच्या ठिकाणी ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संदर्भ असलेल्या गोष्टी प्रकाशात येत आहेत. प्राचीन काळापासून या शहरास ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभला आहे.

लोकमाता प्रवरा नदी व मुळा नदी यांच्या कुशीत विसावलेला हा परिसर आहे. पावसाने अनेकदा अवकृपा केली तरी या नद्यांनी हा परिसर सावरलेला आहे. या परिसराने अनेक शतकापासून मानवी संस्कृतीला व इतिहासाला मिळालेले हेलकावे पाहिलेले आहे. या नद्यांनी समृध्द केलेल्या येथील जीवनाइतकेच येथील सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा ही समृध्द आहे. अतिप्राचीन काळापासून या तालुक्याच्या परिसरात व शेजारच्या ठिकाणी ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संदर्भ असलेल्या गोष्टी प्रकाशात येत आहेत. अहमदनगर जिल्हयातील पुणे, नाशिक या मार्गावरील संगमनेर शहर प्रवरा नदीच्या तीरावर वसलेले आहे. आढळा, प्रवरा व म्हाळुंगी, नाटकी या नद्यांच्या संगमामुळेच या शहराला संगमनेर नाव पडले आहे.

### २.५.१ संगमनेरचा प्राचीन इतिहास

ऐतिहासिक दृष्टया संगमनेरचा परिसर हा अतिशय प्राचीन आहे. १९५०-५१ मध्ये जगविख्यात मानव वंश, शास्त्रज्ञ डॉ.हसमुख सांकलिया यांच्या मार्गदर्शनाखाली जोर्वे येथील प्रसिध्द पांढरीवर उत्खनन करण्यात आले. तिथे सापडलेल्या वस्तुंच्या आधारे (मडकी, छिडक्याची हत्यारे, सांगाडे) इ.स.पूर्व १५०० ते १००० वर्षापूर्वी प्राचीन संस्कृती प्रवरा

खोऱ्यात विकसित झाली असा निष्कर्ष निघतो. या संस्कृतीला जोर्वे संस्कृती असे नाव दिले गेले.[५३]

अहमदनगर मधील संगमनेर गावाचे प्राचिनत्व इ.स.२०० एवढे असावे. यादवकालीन ताम्रपट व त्यावरील संस्कृतमधील वर्णने आजुबाजुच्या जुन्या परंपरेची साक्ष देतात. पूर्वी संगमनेर हा सुभा होता. संगमनेर हे पुरातन संस्कृतीचे केंद्र होते. प्रभू रामचंद्र वनवासात असतांना त्यांच्या संचाराने पुनित झालेला हा परिसर आहे. त्यावेळी हा भाग दंडकारण्यात मोडत होता. प्रवरेच्या तिरावर अनेक ऋषीमुनी आपले आश्रम थाटुन तपश्चर्या करत असत. प्रवेरला पूर्वी पयोधरा असे नाव होते. इ.स.पूर्व काळापासून संगमनेर भागावर आंध्रभुत्य, चालुक्य, राष्ट्रकुट, यादव या राजवटीचे राज्य होते. इ.स.१००० मधील संगमनेरचा एक ताम्रपट आहे. ऐतिहासिक काळातील यादव राजघराण्याची विश्वासनीय माहिती देणारा हा पहिलाच ताम्रपट होय.[५४]

### २.५.२ मध्ययुगीन इतिहास :-

इ.स.१४९० मध्ये बहामणी राज्याचे पाच तुकडे झाले. त्यातील एक तुकडा म्हणजे अहमदनगरची निजामशाही होय. या निजामशाहीच्या अमंलाखाली अहमदनगर प्रमाणे संगमनेर ही होते. १४ व्या आणि १५ व्या शतकात संगमनेर हे निजामशाहीचे एक खेडे होते. संगमनेरचा परिसर शिवकाळात स्वराज्यासाठी योग्य मानला जात होता. संगमनेरच्या नैऋतेस असलेली पेमगिरी व हरिश्चंद्रगड ही दोन ठिकाणे याची साक्ष देतात. राजे शहाजी व जिजामाता यांचे वास्तव्य काही काळ पेमगिरी किल्ल्यावर होते. शिवाजी राजांनी तोरणा किल्ला घेऊन स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. शत्रुंशी सामना देण्यासाठी संगमनेर व त्याच्या जवळपासचा डोंगराळ भाग छत्रपती शिवाजी महाराजांना फार उपयोगी पडल्याची साक्ष वाडयातील तळघरे, चोरवाटा, अद्यापही देतात. जालन्याहून लुट घेऊन शिवाजी महाराज रायगडाकडे जात असतांना इ.स.१६७७ मध्ये संगमनेर नजिकच्या रायतेवाडी जवळ शिवाजी महाराजांची मोगलाचा सरदार रणमस्तखान यांच्याशी चकमक झाली. या लढाईत संघोजी निबाळकर कामी आले. शेवटी थकलेल्या शिवाजी राजांना बर्हिजी नाईक याने सुरक्षित अशा पट्टा किल्यावर नेले. पेशवाईच्या अखेरच्या काळात निमगावजाळीच्या त्र्यंबकजी डेंगळे या शुर सरदाराने इंग्रजाशी शेवटपर्यंत प्राणपणाने लढा दिला होता.[५५]

### २.५.३ मोगलकालीन संगमनेर परिसर :-

एकेका गावामध्ये अशी एखादी घटना घडलेली असते की, या एका घटनेसाठी संपूर्ण भारतभर त्या गावाचे नाव इतिहासात कायमचे नोंदले जाते. संगमनेर परिसराला अशीच भारतीय ख्याती मिळवून देणाऱ्या ह्दयस्पर्शी प्रसंगाचे चित्र प्रसिध्द इतिहासकार सेतु माधवराव पगडी यांनी आपल्या संगमनेर येथील व्याख्यानात जिवंत केले होते.

जगातले सातवे आश्चर्य म्हणून ओळखणारा जाणारा, 'ताजमहाल' ज्या मुमताज बेगमच्या प्रेमासाठी शहेनशहा शहाजहाँनने बांधला, ती मुमताज संगमनेरला एका गढीत मुक्कामी होती. बादशहा जहागिरची पत्नी नुरजहाँ हिला आपल्या पहिल्या पतीपासून झालेल्या मुलीच्या पतीस (जावई) दिल्लीच्या तख्तावर बसवायचे होते. म्हणून तिने जहांगिरचे कान भरले. हे जेव्हा जहांगिरचा मुलगा शहाजहाँन यास समजले तेव्हा त्याने वडिलाविरुध्द बंड पुकारले. तीन वर्ष संघर्ष चालु होता. परंतु शेवटी शहाजहाँनला आपल्या वडिलांबरोबरील या संर्घषात अपयश आले. या अपयशानंतर त्याने दक्षिण हिंदुस्थानमध्ये पलायन केले. तेव्हा दक्षिणेचा राजा मलिक अंबरने त्यांना आश्रय दिला. शहाजहाँन- मुमताज आणि त्यांची दोन मुले औरंगजेब आणि दाराशूर यांना आश्रय देऊन त्यांची संगमनेरातील गडी वजा किल्ल्यात राहाण्याची व्यवस्था केली. आपला मुलगा शहाजहाँन संगमनेर या ठिकाणी आहे हे जेव्हा जहाँगिर बादशहा व नुरजहाँ यांना समजले तेव्हा नुरजहाँनने दिल्लीचे तख्त शहाजहाँन यास मिळवू नये, तर दिल्लीचे तख्त जहाँगिरच्या पत्नीने आपल्या पहिल्या पतीपासून झालेल्या मुलीच्या पतीस बादशाही मिळवुन देण्यासाठी जहाँगिर बादशहास चिथावणी दिली. आपल्या पत्नीच्या इच्छेदाखल बादशहास आज्ञापत्र करणे भाग पडले. त्यानुसार शहाँजहानने आसीर गड व रोहतास किल्ले सोडून द्यावेत व १४ वर्षाचा दाराशुर आणि आठ वर्षाचा औरंगजेब यांना ओलिस ठेवावे, असे आज्ञापत्र जहाँगिरने काढले होते. तेव्हा कोंडीत सापडलेल्या शहाजहाँनला आपल्या वडिलांपुढे माघार घेणे भाग पडले होते. किल्ले तर सोडावे लागले, परंतु आपल्या दोन छोटयाशा बालकांना बादशहाच्या ताब्यात देणे भाग पडले होते. बादशहाचे शिपाई संगमनेरला दाखल झाले तेव्हा १४ वर्षाचा दाराशूर आणि ८ वर्षाचा औरंगजेब या आपल्या दोन छोटयाशा बालकांना शहाजहाँन व मुमताज महलने २ मार्च १६२६ ला जहाँगिर बादशहाच्या शिपायांकडे मुलांना स्वाधीन केले. प्रेमाचे ह्रदय असणाऱ्या शहाजहाँन व मातृत्वाची आस असणाऱ्या मुमताजने आपली पोटची मुले ओलीस देतांना त्यांच्या ह्दयाची हाक, होणारा आक्रोश आणि डोळयातील आश्रू या

गडी किल्ल्याच्या भक्कम भिंतीनी आणि संथ वाहणाऱ्या प्रवरामाईने ऐकल्या होत्या. आपल्या मुलांना जहाँगिर बादशहाच्या स्वाधीन केल्यानंतर शहाजहाँन व मुमताजनेही संगमनेर सोडले. जहाँगिर बादशहाच्या मृत्युनंतर शहाजहाँनने दिल्लीची गादी मिळविली.

ज्या शहाजहाँन बादशहाने मुमताज बेगमच्या प्रेमासाठी ताजमहाल बांधला ते जगातले सातवे आश्चर्य म्हणून ओळखल जाते. शहाजहाँन व मुमताज बेगम संगमनेरातील ज्या गढीवजा किल्ल्यात राहिले त्या गढीकिल्ल्याचे अवशेष आजही संगमनेरमधील परदेशपुरा भागात भग्न स्थितीत पहावयास मिळतात. किल्ल्याची बांधणी, आतील भुयारी मार्गाचे विट बांधकाम आजही पहावयास मिळते. किल्ल्याचे भग्न अवशेष भूतकाळाची साक्ष देत आजही उभे आहेत. मोगल काळात संगमनेर हा जिल्हा होता. त्यात एकुण ११ महाल होते. मोघल काळाच्या अंतिम टप्प्यात, संगमनेर परिसरात मराठयांचा अंमल होता. हा अंमल संपूष्टात येऊन हळूहळू सर्व प्रदेश इंग्रजांनी ताब्यात घेतला व एक नवा कालखंड सुरु झाला.[५६]

### २.५.४ आधुनिक इतिहास :-

स्वातंत्र्य लढयात ही या तालुक्याचे महत्वाचे योगदान राहिलेले आहे. कै.माधवराव व केशवराव परशरामी, वैजनाथ शास्त्री यांनी स्वदेशी चळवळीत महत्वाचे काम केले. १९ मे १९१७ रोजी संगमनेरला लोकमान्य टिळकांनी भेट देवून स्वराज्य व स्वदेशीचे महत्व सांगितले. ६ एप्रिल १९१९ संगमनेरला (रौलेक्ट ॲक्ट) काळा कायदा विरोधात मोठी मिरवणुक काढून हरताळ पाळला गेला. २१ मे १९२१ रोजी महात्मा गांधी संगमनेरला येऊन गेले. भैय्यासाहेब कुलकर्णी व रामकृष्ण महाराज हे प्रथमपासून गांधीजीच्या स्वातंत्र्य लढयात सहभागी झाले होते. संगमनेरच्या इतिहासात १९३० साल अत्यंत महत्वाचे ठरले. गांधीजीच्या हाकेला जंगल सत्याग्रहाच्या रुपाने जनतेने प्रतिसाद दिला. आणि संगमनेरचे नाव भारताच्या इतिहासात झळकले.

रामकृष्ण महाराजांच्या नेतृत्वाखाली हा सत्याग्रह झाला. भैय्यासाहेब कुलकर्णी हे सत्याग्रहाचे संचालक होते. राजापुर, आश्वी, चंदनापूरी, पेमगिरी, जवळे बाळेश्वर, सारोळे पठार, सावरगाव घुले, वनकुटे, घारगाव, भोजदरी, कुरण या ठिकाणी सत्याग्रहीनी एकच धमाल उडवुन दिली. इ.स.१९३६ मध्ये के.बी. देशमुख व भैय्यासाहेब कुलकर्णी यांनी सारा माफीसाठी मोर्चा काढला. याच वर्षी पंडीत नेहरु संगमनेरला येऊन गेले. इ.स.१९४२ च्या चलेजाव आंदोलनात अनेक तरुण भूमिगत झाले. टेलिफोन तारा तोडणे, कचेरीवर तिरंगा

ध्वज लावणे यामध्ये भास्करराव दूर्वे, अण्णासाहेब शिंदे, भाऊसाहेब थोरात, धर्मा पोखरकर आदी तरुणांनी जिवाची बाजी लावून काम केले. इ.स.१९४२ च्या चलेजाव चळवळीत सहभाग घेतल्याच्या कारणावरुन दत्ता देशमुखांना पुण्यात अटक झाली. तर भाऊसाहेब थोरात यांना संगमनेर येथे अटक झाली होती.[५७]

### २.५.५ स्वातंत्र्योत्तर संगमनेर :-

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काही काळ संगमनेर तालुका साम्यवादी विचाराच्या प्रभावाखाली होता. तरी इ.स.१९४६ मध्ये काँग्रेस तर्फे दत्ता देशमुख विधीमंडळावर निवडून गेले. इ.स.१९४८ मध्ये ते स्थानबध्द झाले.[५८]

इ.स.१९५६ मध्ये झालेल्या संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात दत्ता देशमुख, भाऊसाहेब थोरात, भास्करराव दुर्वे, रामभाऊ नागरे आघाडीवर राहिले. इ.स.१९५७ च्या निवडणुकीत समितीचे उमेदवार म्हणून दत्ता देशमुख विजयी झाले.[५९]

### २.५.६ सांस्कृतिक संगमनेर :-

संगमनेरला समृध्द सांस्कृतिक परंपरा आहे. अनंत फंदीच्या काव्य रचनेचा पेशवाई काळात जनमाणसावर इतका प्रभाव पडला की, होनाजी बाळा सारखा शाहीर सुध्दा म्हणू लागला.

फंदी अनंत कवनांचा सागर अजिंक्य ज्यांच्या हातखंडा ।
चमत्कार चहूकडे चालतो सृष्टीवर ज्याचा झेंडा ।
सरस्वती जिव्हग्री अक्षयी भंग नसे जयचा हडप्पा ।
कवन बहुत उदराध्ये भरले फणस जसा मोठा कापा।

तसेच आद्य स्त्री तमाशा कलाकार पवळा हिवरगावकर ही सुध्दा संगमनेर तालुक्यातील हिवरगाव पावसे या गावाची होती. त्याप्रमाणे संपूर्ण भारतात प्रसिध्द असलेली मोरे सर्कस सुध्दा संगमनेर तालुक्यातील वडगावपान या गावाची होती.[६०]

## २.६ संगमनेर तालुक्याची भौगोलिक पार्श्वभूमी :-

अहमदनगर जिल्हयाच्या अति पश्चिमेकडील पर्वतमय पायथ्याच्या लगत म्हणजे अकोले तालुक्याच्या पूर्वेला संगमनेर तालुका वसलेला आहे. वारंवार पडणाऱ्या दुष्काळाच्या अधिपत्याखाली येथील शेतकऱ्यांनी निसर्गापुढे सतत मान तुकविली आहे. जो काही पाऊस पडेल त्यावर उदर निर्वाही स्वरुपाची पिके घेतली जातात. ज्वारी, बाजरी हि पिके घेतली

जातात. मात्र अलिकडे पाण्याच्या सुविधा उपलब्ध झाल्यामुळे शेतीत नगदी पिकेही घेतली जातात. त्याचप्रमाणे शेतीपूरक उदयोग धंदयात वाढ होत आहे.

अहमदनगर जिल्हयाच्या ठिकाणापासून पश्चिमेस ९० कि.मी. अंतरावर संगमनेर तालुका वसलेला आहे. संगमनेर तालुक्याचे क्षेत्रफळ १,६७,९३४ चौ.कि.मी. इतके आहे. संगमनेर तालुका हा १९.५७° उत्तर अक्षांश व ७४.२२ पूर्व रेखांश विस्तारामध्ये सामावलेला आहे. जिल्हयात सर्वात अधिक लोकसंख्या असलेला तालुका आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार ग्रामीण भागाची लोकसंख्या ३,७९,४८१ व शहरी लोकसंख्या ६१.९५८ इतकी असुन एकुण लोकसंख्या ४,४१,४३९ आहे.तालुक्यात सरासरी पर्जन्यमान ४९६.५ मि.मी. इतके असुन उन्हाळयातील सरासरी तापमान ३७° से. व हिवाळयातील कमीत कमी तापमान १३° से.इतके आहे.दळणवळणाच्या बाबतीत महामार्ग क्रमांक ५० हा संगमनेर शहराजवळुन जातो. त्यामुळे २४ तास सुरक्षित दळणवळणाची संपर्क व्यवस्था संगमनेर तालुक्याला लाभली आहे.[६१]

## २.७ जोर्वे गावाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

संगमनेर तालुक्यातील बऱ्याच गावांना ऐतिहासिक संदर्भ असलेले आढळुन येतात. इतिहासामधील अनेक घटनांची ही गावे साक्षीदार आहेत. काही गावांची नावेही अशा घटनावरुन पडलेली दिसुन येतात. अशाच प्रकारचे संगमनेर तालुक्यातील जोर्वे हे एक गाव आहे. अकराव्या शतकातील काही ताम्रपटात यांचा 'जउर ग्राम' असा उल्लेख आढळतो. स्थानिक परंपरेनुसार 'जरासंध नगरी' म्हणून ते ओळखले जाते. जरासंध नगरी याचेच पुढे जोर्वे असे नामकरण झाले.

जोर्वे गाव संगमनेर शहरापासून ८ कि.मी. अंतरावर प्रवरा नदीच्या काठी ऐतिहासिक वारसा लाभलेले जोर्वे गाव वसलेले आहे. गावापासून पश्चिमेस अर्ध्या कि.मी. अंतरावर 'पांढरी' या ठिकाणी ताम्रपाषाण युगीन अवशेष सापडले आहेत.

इ.स.१९५० मध्ये जागतिक किर्तीचे पुरातत्ववेत्ते पुण्याच्या डेक्कन कॉलेजमधील पुरातत्व विभागप्रमुख डॉ.ह.धो. सांकलिया यांच्या मार्गदर्शनाखाली जोर्वेच्या पांढरीवर उत्खनन करण्यात आले. या उत्खननात ताम्रपाषाण युगीन मातीची भांडी, गारगोटी, छिलक्यांची हत्यारे, प्राचीन अलंकार या वस्तु सापडल्या आहेत. या उत्खननात सापडलेल्या वस्तु डेक्कन कॉलेज पुणे येथील पुरातत्व विभागातील 'जोर्वे दालन' यात संग्रहीत करुन

ठेवल्या आहेत. जोर्वे उत्खनानंतर अहमदनगर जिल्हयातील नेवासा, दायमाबाद, पुणे जिल्हयातील इनामगाव, वाकळी, सोनगांव, चांदोरी, थेऊर, धुळे जिल्हयातील खापरखेडा, जळगाव जिल्हयातील बहाळ, नाशिक या ठिकाणी झालेल्या उत्खननात जोर्वे प्रमाणेच वस्तु, हत्यारे, व भांडी सापडली. या संस्कृतीचे अवशेष प्रथम जोर्वे येथील पांढरीत मिळाल्याने या संस्कृतीला जोर्वे संस्कृती असे नाव देण्यात आले.

जोर्वे संस्कृती ही ताम्रपाषाण युगीन संस्कृती होती. या संस्कृतीचा काळ इ.स.पू.१४०० ते १००० इतका निश्चित करण्यात आला आहे. जोर्वे संस्कृती महाराष्ट्रातील प्रवरा, तापी, गोदावरी, घोड, भिमा, कृष्णा, गिरणा, मुळा या नदयाच्या खोऱ्यात तसेच मध्यप्रदेश, कर्नाटक या राज्यामध्येही पसरलेली होती. या संस्कृतीची जवळपास १०० ठिकाणे सापडली आहे. जोर्वे येथील उत्खननात विविध मातीची भांडी, त्याचप्रमाणे धातूची हत्यारे सापडली. उपजीवीकेसाठी शेतीत विविध पिके घेतली जात, जोर्वे संस्कृतीकालीन मानव भटके जिवन सोडून नदयांकाठी स्थिरावला होता. ताम्रपाषाणयुगीन जोर्वे संस्कृती साधारण १५०० वर्ष टिकली.[६२]

ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचे केंद्र असलेले जोर्वे गावाने कायम आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. भारतीय स्वातंत्र्य संग्रामात संगमनेर तालुक्यातील भाऊसाहेब थोरात, भास्करराव दुर्वे नाना, मुरलीधर नवले, किसनभाऊ हासे, धर्मा पोखरकर, किसन नेहे, भैय्यासाहेब कुलकर्णी, बुवासाहेब नवले, लक्ष्मण ठाकर, दत्ता देशमुख, विष्णूबुवा हासे आदी स्वातंत्र्य सेनानीमध्ये भाऊसाहेब थोरात आघाडीवर होते. अहमदनगर जिल्हयातील स्वातंत्र्य सेनानी मध्ये त्यांनी आपली एक वेगळी ओळख निर्माण केली होती. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही शेतकरी, कामगारांसाठी त्यांनी सहकाराच्या माध्यमातून जिल्हयासाठी दिलेले योगदान महत्वपूर्ण होते. त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्रात जोर्वे गावाने आपली एक वेगळी ओळख निर्माण केली. आजही भाऊसाहेब थोरात यांचे पुत्र माजी महसुलमंत्री व विद्यमान आमदार मा.बाळासाहेब थोरात यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात, समाजकारणात, अर्थकारणात एक आदर्श कर्तव्यदक्ष राजकारणी म्हणुन आपली ओळख निर्माण केल्याने जोर्वे गावाचे नाव आजही सर्वत्र घेतले जाते.

## २.८ जोर्वे गावाची भौगोलिक पार्श्वभूमी :-

जोर्वे हे गाव भौगोलिक दृष्टया प्रवरा खोऱ्यात वसलेले आहे. संगमनेर तालुक्याच्या ठिकाणापासून ८ कि.मी. अंतरावर पूर्वे दिशेस आहे. या गावाच्या चारही बाजुने इतर गावांच्या सिमा लागून आहेत. कणोली, उंबरी, प्रतापपुर, चिंचपूर बु.चिंचपूर खुर्द, ओझर, रहिमपूर, इत्यादी गावांच्या सीमा जोर्वे गावाला लागुन आहेत. जोर्वे गावाचे क्षेत्रफळ १६५२ चौ.कि.मी. इतके आहे. तर गावाची लोकसंख्या स्त्रिया २५१७, पुरुष २७३१ एकुण लोकसंख्या ५२४८ इतकी आहे.

गावाची मृदा ही काळी कसदार असून तिच्यामध्ये एक सलगता असल्याने शेतकरी विविध प्रकारचे नगदी पिके घेतात. प्रवरा नदीचे पाणी, नैसर्गिक वातावरण, व भौगोलिक दृष्टया अनुकुल मृदा लाभल्याने जोर्वे गावाचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे. त्याचप्रमाणे शेती व्यवसायास पूरक व्यवसाय म्हणून दूध व्यवसाय, बंदिस्त शेळी पालन, कुक्कुटपालन या व्यवसायाकडे लोक वळले आहेत. येथील शेतकरी आधुनिक पध्दतीने शेती करण्यावर लक्ष केंद्रीत करत आहे.[६३]

## २.९ उपसंहार :-

भाऊसाहेब थोरात ज्या जोर्वे गावात जन्मले त्या जोर्वे गावाची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी देऊन त्यांनी आपल्या राजकीय व सहकार क्षेत्रातील कार्याचा श्रीगणेशा ज्या संगमनेर तालुक्यातून केला तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातुन राज्यस्तरावर व जिल्हास्तरावर देखील महत्वपूर्ण कार्य केले. म्हणुन महाराष्ट्र राज्याची व अहमदनगर जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी देऊन अहमदनगर जिल्हयातील १३ तालुक्याची थोडक्यात ऐतिहासिक व धार्मिक पार्श्वभूमी या प्रकरणात मांडण्याचा मी प्रयत्न केला आहे.

*****

## संदर्भ ग्रंथ :-


१) http;mr.wikipedia.org/५/१९x

२) प्रा.संवदी ए.बी. 'महाराष्ट्राचा सामान्य भूगोल',प्रकाशन -निराली प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती मे २००२, पृ.क्रं.०१

३) कोलारकर डॉ.शं.गो.मराठयांचा इतिहास,प्रकाशक श्री.प्रसन्न मुजमदार, प्रकाशन, नागपूर,पाचवी आवृत्ती २००३, पृ.क्रं.०३

४) कित्ता, पृ.क्रं.३,४

५) भावे मधुकर, 'यशवतंराव ते विलासराव प्रकाशन- मनोविकास प्रकाशन,पुणे, तृतीय आवृत्ती - २७ जुलै २००८, पृ.क्रं.३१.

६) पवार जयसिंगराव 'जयसिंगराव'-मराठी सत्तेचा उदय,प्रकाशन, पृथ्वी पब्लिकेशन, कोल्हापूर, आवृत्ती-सुधारीत आवृत्ती, मार्च २०१०, पृ.क्रं.३३.

७) कित्ता, पृ.क्रं.२९३, २९४.

८) कोलारकर डॉ.श.गो.मराठयांचा इतिहास पुर्वोक्त क्रं.३, पृ.क्रं.१५५, १५८.

९) कित्ता, पृ.क्रं.४४६, ४८५.

१०) भावे मधुकर 'यशवंतराव ते विलासराव' पुर्वोक्त रु.५, पृ.क्रं.३१,३२.

११) http.mr.wikipedia.org/५/१९x

१२) http.mr.wikipedia.org/५/१९x

१३) www.mpworld.com

१४) मेहेदळे डॉ.विश्वास - यशवंतराव चव्हाण ते पृथ्वीराज चव्हाण, अनुबंध प्रकाशन,पुणे-२०१२, पृ.क्रं.२५.

१५) www.mpword.com

१६) मेहेदळे डॉ.विश्वास यशवंतराव चव्हाण ते पृथ्वीराज चव्हाण,पुर्वोक्त क्रं.१४, पृ.क्रं.२५

१७) पठाण डॉ.के.जी.संदर्भ महाराष्ट्र राज्य व जिल्हे एक दृष्टिकोन,खंड दुसरा,प्रकाशक- इंटेलेक्युअल बुक ब्युरो भोपाल, प्रथम आवृत्ती- २००८, पृ.क्रं.४३९.

१८) गंधे नारायण 'प्रवरा काठची संस्कृती' प्रकाशक चंद्रकुमार गंधे,प्रकाशन- ज्ञानेश प्रिटर्स,संगमनेर-१९८७, पृ.क्रं.१५,१६,१७,१८.

१९) मिरीकर सरदार वैभवशाली अहमदनगर "पैसा" ७० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, अहमदनगर-१९९७, पृ.क्रं.१ ते ४, १०, ११, १३.

२०) www.marathivishwakosh.in

२१) वृत्तपत्र दैनिक सकाळ आवृत्ती पुणे, वर्धापन दिन विशेष अंक, भ्रमंती २ एप्रिल २००८, पृ.क्रं.१३.

२२) www.ashmednagarwikipedia.in

२३) पी.एच.डी.प्रबंध डॉ.राजदेव टी.बी. कॉ.दत्ता देशमुख यांचे महाराष्ट्राच्या जडणघडणीतील योगदान, पृ.क्रं.२०.

२४) जोशी एम.ए. नगरजिल्हा ऐतिहासिक वस्तू संग्रहालयाचे 'त्रैमासिक' नोव्हेंबर १९७७, अंक सहावा पृ.क्रं.१२.

२५) गंधे नारायण पूर्वोक्त क्रं.१८, पृ.क्रं.८५,८७

२६) गंधे नारायण पूर्वोक्त क्रं.१८, पृ.क्रं.८७, ८९

२७) पी.एच.डी.प्रबंध डॉ.राजदेव टि.बी.,पृ.क्रं.२३.

२८) दै.लोकमत द्विदशक पूर्ती, नवीन आशा नवी दिशा, दि.१५ ऑगस्ट २००७, पृ.क्रं.१७.

२९) गंधे नारायण, प्रवरा काठची संस्कृती, पुर्वोक्त क्रं.१८, पृ.क्रं.८८.

३०) शेवाळे वि.म., संघर्ष, सतिश उपाध्याय, गर्जना मुद्रणालय,कोल्हारपुर, पृ.क्रं.२६.

३१) शेवाळे वि.म., 'आपला अकोले तालुका', संपादक- वि.म.शेवाळे, प्रकाशन - आनंद प्रिंटर्स, सावतामाळीनगर, संगमनेर, प्रथम आवृत्ती डिसे.२०१५, पृ.क्रं.८५.

३२) कित्ता - पृष्ठ क्रं.२७.

३३) जोशी सु.ह., 'महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्रे', प्रकाशक -दत्तात्रय ग.पाष्टे, प्रकाशन - डायमंड प्रब्लिकेशन पुणे, प्रथम आवृत्ती, १ जाने.२०१०, पृ.क्रं.५०

३४) देशपांडे द.ग., महाराष्ट्रातील किल्ले, प्रकाशक : डायमंड पब्लिकेशन, प्रकाशन : डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती २९ ऑक्टोंबर २००९, पृ.क्रं.१६६, १६७.

३५) शेवाळे वि.म. सहयाद्रीच्या कुशीत, प्रकाशन : वनविहार प्रकाशन, संगमनेर, प्रथम आवृत्ती सप्टेंबर २००६, पृ.क्रं.८

३६) कित्ता : पृ.क्रं.११३.

३७) अहमदनगर जिल्हा जनरल नॉलेज पुस्तिका, प्रकाशक : समर्थ उद्योग, प्रकाशन : इंदिरा अपार्टमेंट, समर्थनगर, वर्ष २०१७. पृ.क्रं.२३,२६.

३८) कित्ता : पृ.क्रं.२७, ३२.

३९) कित्ता : पृ.क्रं.२७, ३३.

४०) कित्ता : पृ.क्रं.२७,२४

४१) कित्ता : पृ.क्रं.२०,३३.

४२) अहमदनगर जिल्हा गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन मुंबई, पृ.क्रं.१

४३) अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई, २००४-०४, पृ.क्रं.१.

४४) अहमदनगर जिल्हा गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन मुंबई, पृ.क्रं.२

४५) देशपांडे य.धु.,महाराष्ट्राचा भूगोल, पृ.क्रं.२९,३१.

४६) गंधे नारायण, प्रवरा काठची संस्कृती, पुर्वोक्त क्रं.१८,पृ.क्रं.९९.

४७) कित्ता - पृष्ठ क्रं.१००.

४८) कित्ता - पृष्ठ क्रं.१०७,१०८.

४९) कित्ता - पृष्ठ क्रं.१०५.

५०) कित्ता - पृष्ठ क्रं.१००

५१) साळी डॉ.चेतन शंकर, संदर्भ -'महाराष्ट्र राज्ये व जिल्हे एकदृष्टीकोन',प्रकाशक-इंटेलेक्चुअल बुक ब्युरो, प्रकाशन-नारायणनगर, होशंगाबाद रोड, भोपाळ, खंड दुसरा, प्रथम आवृत्ती २००५, पृ.क्रं.४६१.

५२) अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई, २००४-०४, पृ.क्रं.१२.

५३) शेवाळे वि.म.,'सहयाद्रीच्या कुशीत'पुर्वोक्त क्रं.४१,पृ.क्रं.३.

५४) डॉ.काटे बा.ल, प्रकाशन -संगमनेर महाविद्यालयाचा दर्शन अंक, चि.स.अटकुर, कल्पना मुद्रणालय, टिळक रस्ता,पुणे, विचारदर्शन पृष्ठ क्रं.६९.

५५) कित्ता - पृष्ठ क्रं.३६.

५६) दैनिक सार्वमत, ३ मार्च २००७.

५७) कित्ता - पृष्ठ क्रं.३६,३७

५८) शेवाळे वि.म.,'सहयाद्रीच्या कुशीत'पुर्वोक्त क्रं.४१, पृ.क्रं.३८.

५९) कित्ता - पृष्ठ क्रं.५२

६०) पीएच.डी.प्रबंध, कॉ.दत्ता देशमुख यांचे 'महाराष्ट्राच्या जडण घडणीतील योगदान', डॉ.टी.बी. राजदेव, पृ.क्र.५३.

६१) तहसलि रेकॉर्ड संगमनेर.

६२) शेवाळे वि.म.,'सहयाद्रीच्या कुशीत'पुर्वोक्त क्रं.४१, पृ.क्रं.३५,३६.

६३) मुलाखतःजाधव संजय,ग्रामसेवक,जोर्वे,ता.संगमनेर,जि.अहमदनगर,दि.०६/०७/२०१७.

*****

# प्रकरण : तिसरे
# भाऊसाहेबांचे जीवनचरित्र

**प्रकरण तिसरे**

# भाऊसाहेब थोरात यांचे जीवन चरित्र

## प्रास्ताविक

३.१ थोरात घराण्यांचा पूर्वोतिहास

३.२ भाऊसाहेबांचा जन्म व बालपण

३.३ भाऊसाहेबांचे शिक्षण व व्यवसाय

३.४ भाऊसाहेब थोरात यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान

३.५ अहमदनगर जिल्हयातील संगमनेर, अकोले येथे प्रतिसरकार स्थापनेच्या चळवळीतील भाऊसाहेबांचे योगदान.

३.६ भाऊसाहेबांचे भूमिगत चळवळीच्या माध्यमातून सोबोटाज कार्यक्रमातील योगदान.

३.७ भाऊसाहेबांना अटक आणि सुटका

३.८ भाऊसाहेबांचे किसान सभेतील कार्य

३.९ भाऊसाहेबांचे कौटुंबिक जीवन

३.१० उपसंहार

संदर्भ

## प्रकरण तिसरे

# भाऊसाहेब थोरात यांचे जीवन चरित्र

### प्रास्ताविक :-

भारतावर राज्य करणाऱ्या ब्रिटिशांच्या पारतंत्र्यातुन भारतमातेची मुक्तता करण्यासाठी भारतात विविध भागात विविध चळवळी झाल्या. त्यामध्ये महाराष्ट्र राज्य अग्रेसर होते. महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्हयाचे स्वातंत्र्य लढयातील योगदान महत्वपूर्ण आहे. अहमदनगर जिल्हयातील रघुजी भांगरे, रामजी भांगरे, भागुजी नाईक, आदी स्वातंत्र्यसेनानींनी इ.स.१८५७ पूर्वी मोठे बंड केले होते. नंतरच्या काळात भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अहमदनगर जिल्हयामध्ये स्वातंत्र्यसेनानींची मोठी लाट निर्माण झाली होती. भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये स्वातंत्र्य सेनानींनी महत्वपूर्ण योगदान दिले. आशा या अहमदनगर जिल्हयातील स्वातंत्र्य सेनानीमध्ये अच्यूतराव पटवर्धन, रावसाहेब शिंदे, न.न. सथ्था, काशिनाथ पंत भालेराव, रामभाऊ निसाळ, भैय्यासाहेब कुलकर्णी, रामकृष्ण महाराज, दादा चौधरी, केशवराव देशमुख, बुवासाहेब नवले, लक्ष्मण ठाकर, दत्ता देशमुख, भास्करराव दुर्वे नाना, आण्णासाहेब शिंदे, पी.बी.कडू, भाऊसाहेब थोरात, धर्मा पोखरकर, बापुसाहेब भापकर, बाबुमियाँ बॅण्डवाले, चंद्रभान आठरे पाटील, शंकरराव काळे, विष्णूबुवा हासे, भिमाशंकर कानवडे, पी.सी. जोशी, बाळासाहेब भारदे, बाबुजी आव्हाड, दादा पाटील राजळे आदींचा समावेश होता.

अहमदनगर जिल्हयातील स्वातंत्र्य सेनानींची एक तरुण पिढीच निर्माण झाली होती. त्यापैकीच एक म्हणजे भाऊसाहेब संतुजी थोरात होय. इ.स. १९२४ साली जन्मलेल्या भाऊसाहेबांनी विद्यार्थी दशेपासुनच वयाच्या १८ व्या वर्षी भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये सहभागी झाले. इ.स.१९४२ च्या छोडो भारत आंदोलनाच्या सहभागातून भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये त्यांनी आपल्या कर्तुत्वाने एक वेगळा ठसा उमटविला होता. भारतीय स्वातंत्र्य लढयातील अहमदनगर जिल्हयातील एक आघाडीचे स्वातंत्र्य सेनानी म्हणुन ते ओळखले जातात.


देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ही त्यांनी आपले देशसेवेचे व्रत सोडले नाही. तर स्वातंत्र्य प्राप्ती नंतर त्यांनी जिल्हयाच्या राजकिय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सहकार क्षेत्रातील कार्यातून जिल्हयाच्या सर्वांगिण विकासात त्यांनी दिलेले योगदान महत्वपूर्ण

राहिले आहे. त्यांच्या या कार्याचा इतिहास येणाऱ्या भावी पिढीला माहित व्हावा या हेतूने मी "सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या विकासातील योगदान" (१९२४ ते २०१०) या पीएच.डी. लघुशोध प्रबंधाच्या तिसऱ्या प्रकरणात 'भाऊसाहेबांचे जीवन चरित्र' यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

## ३.१ थोरात घराण्याचा पूर्वोतिहास :-

महाराष्ट्राच्या ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक चळवळीत जे अनेक परिवार पिढयांपिढया आपल्या समाजासाठी काम करतात त्यात थोरात पाटील हा एक नावाजलेला परिवार आहे. पिढयांपिढया कष्टाळु वृत्ती, सर्वधर्म समभावाची वागणूक, नेतृत्व गुण, दूरदृष्टी, आध्यात्मिकता असा सर्व गुणसंपन्न हा परिवार आहे. अहमदनगर जिल्हयातील पश्चिमेकडील सहयाद्रीच्या कुशीत उगम पावुन खळखळुन वाहणारी अमृतवाहिनी प्रवरा नदी संगमनेर तालुक्यातुन पुढे जाताना संगमनेरपासून ५ कि.मी. अंतरावर असणाऱ्या जोर्वे गावापासून जाते. जोर्वे गावी झालेल्या उत्खननातुन जे प्राचीन अवशेष सापडले त्यातुन जोर्वे संस्कृती म्हणुनही हे गाव ओळखले जाते. येथील उत्खननात मिळालेल्या वस्तू दिल्लीच्या म्युजिअममध्ये ठेवण्यात आल्या आहेत. या गावातील बहुतांश लोकांचा मुख्य व्यवसाय शेती असून विविध जाती धर्मांचे लोक गुण्यागोविंदाने एकत्र राहातात. या गावांमध्ये थोरात, पानसरे, कुलकर्णी, घुगे, चौगुले, दिघे, गायकवाड, वाघ, शिंदे, कांबळे, इंगळे, वाघचौरे, कदम अशा विविध आडनावाचे विविध जातीधर्मांचे लोक राहातात. यापैकीच थोरात हे एक घराणे होय. थोरात पाटील परिवाराची परंपराच वेगळी आहे. या कुटुंबाला नैतिकतेचा इतिहास आहे. या घराण्याची सतपाटील थोरात यांच्यापासून माहिती मिळते.

### ३.१.१ थोरात घराण्याची वंशवेल :-




भाऊसाहेब थोरात यांच्या घराण्याची वंशावळ, भाऊसाहेबांचे पंजोबा सतपाटील थोरात यांच्यापासून थोरात घराण्याची माहिती उपलब्ध होते.[१]

### ३.१.२ सतपाटील थोरात :-

थोरात घराण्यातील मुळ पुरुष सत पाटील थोरात यांच्यापासून थोरात घराण्याच्या वंशावळी संदर्भात माहिती मिळते. सताउबाईचे नावकरी म्हणून त्यांचे नाव सत ठेवले होते. सत पाटील संतुजी पाटील म्हणुनही ओळखले जात.

ज्याप्रमाणे प्रत्येक घराण्याला इतिहास असतो. काही परंपरा असतात. त्याप्रमाणे सत पाटील थोरात हे जोर्वे गावचे पाटील घराणे होते. त्याकाळी गावातील एक प्रतिष्ठित घराणे म्हणून त्यांच्या घराण्याकडे पाहिले जात असे. गावाच्या मध्यान त्यांचा मोठा वाडा होता.

सत पाटील शरीराने उंच धिप्पाड शरीरयष्टी लाभलेले होते. अंगात तीन बटनांचा शर्ट, धोतर, डोक्यावर मंदील असे रुबाबदार व्यक्तीमत्व होते. शेतीचा पारंपारिक व्यवसाय करुन ते आपली गुजराण करीत. गावात कोणताही वाद झाला की ते पाटील या नात्याने मध्यस्थी करुन तो मिटवत असत. गावात मानाचे स्थान असणाऱ्या सत पाटलांना पान खाण्याची विशेष आवड होती. बरोबर नेहमी पानांची चंची असे. स्वभाव साधा, सरळ, स्वाभिमानी, धार्मिक प्रवृत्तीचा होता. त्यांना गंगाराम व सोरबाजी ही दोन मुले तर येलूबाई, जिजाबाई, सीताबाई या तीन मुली होत्या. त्यातील गंगाराम हे भाऊसाहेबांचे आजोबा होते.[२]

**३.१.३ गंगाराम पाटील :-**

जोर्वे गावाला जसा सांस्कृतिक वारसा आहे तसा या गावातील थोरात घराण्यालाही मोठेपणाचा, कर्तुत्वाचा, सात्विकतेचा आणि जनसंपर्काचा वारसा लाभला आहे. या घराण्यातील गंगाराम पाटील आपला पारंपारिक शेती व्यवसाय करीत असत. रुबाबदार चेहरा, दोन्ही गालांवर गोल मिशांचे झुपके, डोक्यावर तीन बत्ती, अंगात पांढरा शुभ्र बंद गळयाचा कोट, दोन टांगी धोतर, पायात भक्कम जोडा, मजबुत शरीरयष्टी  तसेच घोडी पाळण्याचा त्यांना छंद होता. घोडीवर बसल्यावर ते शिवरायांच्या मावळयाप्रमाणे दिसत. लोक त्यांना घोडीवाले गंगाराम पाटील म्हणून ओळखत, असे रुबाबदार व्यक्तीमत्व होते. गंगाराम पाटील धार्मिक प्रवृत्तीचे होते. दत्ताचे उपासक होते. गावचे पाटील होते. अर्थातच भाऊसाहेबांची आजी मंजुळाबाई गावची पाटलीण होती. तिचा स्वभाव कडक, तापट होता. दोघांचाही गावात दरारा होता. ते गावातील कोणत्या सामाजिक, धार्मिक कार्यात त्यांचा पुढाकार असे. त्यांच्या शब्दालाही तितकाच मान होता. गरजवंताला मदत करणे हा त्यांचा स्वभाव धर्म होता. त्यामुळेच गावाला सांभाळून घेणारे घराणे म्हणुन त्यांचेकडे पाहिले जात होते. त्यांच्या अनेक पैलु असलेल्या वागण्यातूनच थोरात परिवार घडत गेला. अर्थातच भाऊसाहेबांवर आजोबा, आजींच्या स्वभाव वैशिष्टयाचे परिणाम होणे सहाजिकच होते. त्यांच्या सहवासात भाऊसाहेब घडले गेल्यानेच ते देखील पुढे समाजकार्य करु लागले.

**३.१.४ संतुजी पाटील थोरात :-**

गंगाराम पाटलांना संतुजी व दामोदर ही दोन मुले व बाईसाहेब ही एक मुलगी होती.

गंगाराम पाटलांचा मोठा मुलगा संतुजी नावाप्रमाणे संत प्रवृत्तीचे होते. संतपरंपरेचा वारकरी संप्रदायाचा वारसा असणारे सोज्वळ मनाचे व अंत:करणाने सात्विक होते. त्यांचे

शिक्षण मॅट्रीकपर्यंत झाले होते. तरीही नोकरी न करता वडिलोपार्जित शेती व गावची पाटीलकी सांभाळुन स्वतःस समाजकार्यास वाहून घेतले होते. संतुजी पाटलाचा विवाह संगमनेर तालुक्यातील कोल्हेवाडी येथील तात्याबा पाटील दिघे यांची बहिण सखुबाई बरोबर झाला होता. दिघे पाटील घराणे हे नावाजलेले घराणे होते. तात्याबा पाटील दिघे यांनी बहिणीला कन्यादान म्हणून पांढरी शुभ्र घोडी व जोर्वे - कोल्हेवाडीच्या शिवेलगत असणारी जमिनी कन्यादान म्हणुन दिली होती. संतुजी व सखुबाई यांना सहा अपत्य झाली. भाऊसाहेब, मिराबाई, हिराबाई, ताराबाई, पंडीतराव, मधुकर ही सहाही भावंडे अतिशय बुध्दीमान निघाली. संतुजी पाटील शिक्षित असल्याने त्यांना शिक्षणाचे महत्व समजले होते. त्यांनी आपल्या मुलांचे शिक्षण पुर्ण केले. तसेच मुलींचे विवाह सुसंस्कृत घराण्यातील मुलांबरोबर करुन दिले. मुलांचे विवाह सुसंस्कृत घराण्यातील मुलींबरोबर करुन दिले. भाऊसाहेब थोरात यांच्यावर घरातुन जे संस्कार झाले त्यातुनच त्यांना सामाजिक कार्याची आवड निर्माण होऊन त्यांनीही पुढे स्वतः समाजकार्यास वाहुन घेतले.[३]

## ३.२ भाऊसाहेबांचा जन्म व बालपण :-

सहयाद्रींच्या गिरीशिखरातून रतनगडाच्या पायथ्याची प्रवरामाईचा उगम होऊन अल्लड बालिकेप्रमाणे वाकडी तिकडी वळणे घेत खळखळून वाहणाऱ्या प्रवरामाईच्या कुशीत संगमनेरपासून ५ कि.मी. अंतरावर जोर्वे गाव आहे. या गावी संतुजी व सखुबाई या माता-पित्यांच्या पोटी १२ जाने १९२४ रोजी भाऊसाहेबांचा जन्म झाला. घरातील वातावरण वारकरी सांप्रदायिक देशभक्तीचा पगडा असल्याने भाऊसाहेबांचे नाव भागवत ठेवण्यात आले. भाऊसाहेबांचे घराणे गावातील पाटील घराणे असून शेती व्यवसाय करत असत.

घरातील थोरामोठयांच्या संस्कारातून भाऊसाहेब घडले. भाऊसाहेबांचे आजोबा गंगाराम पाटील शेतीचा पारंपारिक व्यवसाय करीत असत. आजोबा मनाने सच्छील वृत्तीचे असून देवभक्त व वारकरी संप्रदायाचा वारसा जपणारे होते. गावातील सामाजिक कार्यात त्यांचा पुढाकार असे. बालपणी आजोबांच्या संस्कारातून भाऊसाहेब घडले असल्यानेच त्यांनाही समाजकार्याची आवड बालपणापासून होती. आजीच्या छायेत भाऊसाहेबांचे बालपण मोठया उत्साही वातावरणात गेले. भाऊसाहेबांची आजी दिसायला सुंदर, शरीराने दणकट, मनाने धीट, आवाजात मोठी जरब दरारा असणारी होती. गावातील सामाजिक कार्यात तिचा पुढाकार असे. त्या देवभक्ती व वारकारी विचारांच्या होत्या. ही सर्व शिकवण

त्यांनी बालपणीच नातवाच्या मनावर बिंबवली असल्यानेच भाऊसाहेब निस्सीम देशभक्त बनू शकले.

भाऊसाहेबांचे वडील संतुजी नावाप्रमाणे संतपुरष असून गावात त्यांना दादा पाटील नावाने ओळखत. मॅट्रिकपर्यंत शिक्षण होऊनही ब्रिटिश सरकारची चाकरी न करता आपला शेतीचा पारंपारिक व्यवसाय करुन पाटलकीच्या माध्यमातून समाज कार्य करत असत. त्यांची वृत्ती नेहमी सहकार्याची होती. गावाच्या विकासासाठी ते नेहमी जागृत असत. भाऊसाहेबांना वडीलांकडून हे बाळकडू बालपणीच मिळाल्याने भाऊसाहेबांचा स्वभाव हा सहकार्य व सामाजिक कार्याची आवड असणारा होता.

भाऊसाहेबांच्या आई सकुबाई यांना दोन थोर घराण्याचा वारसा लाभला होता. माहेर जोर्वे गावची वाडी कोल्हेवाडी येथील तात्याबा पाटील दिघे या पाटील घराण्यातील संस्कार सकुबाईच्या मनावर बालपणीच बिंबले गेले होते. तर लग्नानंतर सासर जोर्वे येथील पाटील घराणे असल्याने सहाजिकच सासु-सासरे, पती यांच्या सामाजिक कार्यातून व संस्कारातून सकुबाई सुसंस्कृत झालेल्या होत्या. या दोन्ही घराण्यातील संस्कार सकुबाईनी बालपणीच भाऊसाहेबांच्या मनावर बिंबले असल्याने ते पुढे एक सामाजिक कार्याच्ी आवड असणारे निस्सीम देशभक्त बनू शकले.

भाऊसाहेबांचे आजोबा आईचे वडील तात्याबा दिघे हे शिक्षित होते. कोल्हेवाडीत मोठा वाडा होता. पारंपारिक शेती व्यवसाया बरोबरच सामाजिक कार्यात त्यांचा पुढाकार असे. भाऊसाहेब आजोबांच्या सहवासात काही काळ राहिल्याने त्यांच्यावर आजोबांचा प्रभाव पडला होता. काम करण्याची जिद्द, चिकाटी, बौध्दिक सामर्थ्य, गावातील सामाजिक कार्यातील सहभाग हे सर्व भाऊसाहेबांनी जवळून पाहिले होते. आजोबांचे हे सर्व गुण पुढे भाऊसाहेबांमध्ये आपोआप रुजले गेल्यानेच ते पुढे अहमदनगर जिल्हयातील एक महान स्वातंत्र्य सेनानी म्हणुन एक वेगळी ओळख निर्माण करु शकले.[४]

बालपणी भाऊसाहेबांना खेळाची विशेष आवड होती. मुलांबरोबर हूतुतु, चिलापाटया, सुरपारंब्या आदि खेळ भाऊसाहेब आपल्या मित्र परिवारांना जमवून खेळत असत. अशा विविध खेळांबरोबरच व्यायाम करण्याचीही त्यांना विशेष आवड होती. प्रवरा नदीत पोहणे, घोडयावर बसणे, जनावरे चारण्यास गेले की मोहोळ काढणे हे त्यांचे बालपणीचे आवडते छंद होते.[४] याशिवाय शिमगा, पंचमी, पाडवा या आखादीच्या महिन्यात गावात सोंगे निघत, तमाशा होत असे. भाऊसाहेबांना तमाशाची विशेष आवड होती. गावातील दत्त मंदिरात चैत्र

शुध्द नवमीला रामजन्माचा सोहळा, हनुमान जयंती आदि सण, उत्सवांमध्ये सहभागी होणे, यात्रामध्ये कुस्त्या पाहाणे, मुलांचे संघटन करणे असे विविध छंद भाऊसाहेबांना होते.[६]

मॅट्रीकचे शिक्षण चालु असताना वयाच्या १८ व्या वर्षी ते भारतीय स्वातंत्र्य लढयात सहभागी झाले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही त्यांनी स्वतः समाजसेवेस वाहुन घेतले होते. वास्तविक पाहता वयाच्या १८ व्या वर्षापासून ते कम्युनिस्ट विचाराने प्रभावित होऊन कार्य करत होते. ते १९५२ पर्यंत कम्युनिस्ट विचाराने अहमदनगर जिल्हयात सामाजिक कार्य करत होते. परंतु चाणाक्ष भाऊसाहेबांच्या लक्षात आले की, कम्युनिस्ट विचाराने आपण जिल्हयाचा विकास करु शकत नाही. हे ओळखुन त्यांनी इ.स.१९५२ साली कम्युनिस्ट विचाराचा त्याग करुन इ.स.१९५२ सालीच सहकार तत्वाचा स्विकार केला. आणि शेवटपर्यंत सहकाराच्या माध्यमातून जिल्हयात कार्य करत राहिले. तसेच इ.स.१९६२ साली राष्ट्रीय काँग्रेस पक्षात प्रवेश केला. येथुनच त्यांच्या राजकीय कारकिर्दीस प्रारंभ झाला. ते शेवटपर्यंत काँग्रेस पक्षाशी एकनिष्ट राहिले. ज्या प्रमाणे राष्ट्रीय काँग्रेसचे तीन कालखंड पडतात. त्याप्रमाणे भाऊसाहेब थोरात यांच्या जिवनाचेही तीन कालखंड पडतात.

१) विद्यार्थीदशेपासून ते १९५२ पर्यंत कम्युनिस्ट
२) इ.स.१९५२ ते २०१० सहकारात काम.
३) इ.स.१९६२ ते २०१० काँग्रेस पक्षात प्रवेश व एकनिष्ठपणे सेवा.

असे भाऊसाहेबांच्या जीवनाचे देखील कम्युनिस्ट, सहकार, काँग्रेस पक्षातंर्गत केलेल्या कार्यावरुन दिसून येते. सामाजिक कार्याबरोबरच त्यांनी आपल्या कुटुंबाकडेही लक्ष दिले. भाऊसाहेबांना बाळासाहेब, मोहिनी, रोहिणी, शोभा, दुर्गा ही पाच मुले आहेत. मुलेही वडीलांप्रमाणेच सामाजिक कार्यात अग्रेसर आहेत. बाळासाहेब संगमनेरचे १९८५ पासून आमदार आहेत. तर दुर्गाताई संगमनेर नगरपालिकेच्या पहिल्या नगराध्यक्षा व विद्यमान नगराध्यक्षा आहेत. तसेच मोहिणी, रोहिणी, शोभा यांनीही समाजकार्यास स्वतःस वाहुन घेतले आहे. हे सर्व भाऊसाहेबांच्या संस्कारामुळे झाले.

### ३.३. भाऊसाहेबांचे शिक्षण व व्यवसाय :-

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये शिक्षणाची अवस्था आजच्या सारखी नव्हती. लोक अज्ञानी, अशिक्षित, अंधश्रध्दाळू होते. त्यामुळे शिक्षणाबाबत अनास्था होती. खेडयामध्ये शिक्षणाबाबत फारशी आवड नव्हती. भारतीयांच्या शिक्षणाबाबत ब्रिटिश सरकारही उदासिन होते. परंतु

लॉर्ड रिपन भारताच्या व्हॉईसरॉय पदी आल्यानंतर त्यांनी इ.स.१८८२ साली जिल्हा लोकल बोर्ड या स्थानिक स्वराज्य संस्थेची स्थापना केली. आणि पुढे जिल्हा लोकल बोर्डाने शिक्षणासाठी शाळा सुरु केल्या. परंतु शाळांना आजच्या सारखे शैक्षणिक साहित्य, इमारत इ. सारख्या कोणत्याही सुविधा नव्हत्या. शाळा गावच्या मंदिरात, खाजगी वाडयात किंवा चावडीमध्ये भरत असे. अशा परिस्थितीमध्ये भाऊसाहेब थोरात यांचे शिक्षण चालू होते.

भौगोलिक, ऐतिहासिक व नैसर्गिक परिस्थितीचा परिणाम त्या काळात विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणे सहाजिकच होते. त्यापेक्षा इथल्या सामाजिक परंपरा, आणि सामाजिक स्थिती यांचा शिक्षणावर एक प्रकारे निर्णायक परिणाम झालेला दिसून येतो. जातीजमातींच्या उतरंडीच्या ओझ्याखाली समाज पुर्णपणे दबला गेला होता. उच्चवर्णियांशिवाय बाकीच्यांना शिक्षण दुरापास्त होते. अनिष्ट रुढींचे परिणाम समाजाला भोगावे लागत होते. भाऊसाहेबांचे शिक्षण सुरु झाले तेव्हा समाजात अशी विचित्र परिस्थिती होती.[७] भाऊसाहेबांच्या सुदैवाने जोर्वे येथे चौथी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण होते.

**३.३.१ प्राथमिक शिक्षण जोर्वे येथे :-**

जोर्वे येथे प्राथमिक शिक्षणाची सुविधा असल्याने भाऊसाहेबांना पहिल्या वर्गात तेथेच घालण्यात आले. शाळा वस्तीपासून एक मैल दूर होती. तरी भाऊसाहेब आपल्या मित्रांबरोबर नित्यनियमाने शाळेत जात असत. शाळा गावच्या मध्यावर असणाऱ्या चावडीत भरत होती. चौथी पर्यंत एकच शिक्षक होते. भाऊसाहेबांचे पहिले शिक्षक मुळे गुरुजी होते. त्यानंतर पहिली ते चौथीपर्यंतचे शिक्षण वारकरी गुरुजीच्या हाताखाली झाले. पहिली ते चौथीपर्यंत एकच शिक्षक असल्याने वारकरी गुरुजीची शिकवतांना मोठी कसरत होत असे. भाऊसाहेब पाटलांचे पोर व त्यांची हुशारी पाहुन शिक्षक त्यांच्याकडे विशेष लक्ष देत असत. तिसरीच्या वर्गात चारच मुले होती. तिसरीच्या परीक्षेत भाऊसाहेब एकटेच पास झाल्याने चौथीच्या वर्गात ते एकटेच होते. एकदा शाळा तपासणीसाठी डेप्युटी साहेब महाराष्ट्रातील एक थोर शिक्षणतज्ञ आणि लेखक वि.द.घाटे आले असता त्यांनी भाऊसाहेबांना काही प्रश्न विचारले असता भाऊसाहेबांनी दिलेल्या समर्पक उत्तराने भाऊसाहेबांना शब्बासकी दिली व उत्तम शेरा दिला. भाऊसाहेब चौथीला उत्तम गुण मिळवुन उत्तीर्ण झाले असता त्यांच्या पुढील शिक्षणाची व्यवस्था श्रीरामपूर तालुक्यातील बेलापूर येथे चुलते दामोदरनानांकडे करण्यात आली.[८]

### ३.३.२ भाऊसाहेब थोरात जोर्वेहून शिक्षणाकरिता बेलापूरला :-

भाऊसाहेबांचे नाना बेलापूरपासून तीन मैल अंतरावर असणाऱ्या डहाणूकरांच्या 'महाराष्ट्र शुगर मिल' या साखर कारखान्यात नोकरीला होते. दामोदर यांनी भाऊसाहेबांना बेलापूरला 'जीवन शिक्षण मंदिर' या शाळेत घातले. शाळा लजपतराय वाडीपासून तीन मैल दूर होती. भाऊसाहेब पाचवीच्या वर्गात तर नानांचा मुलगा रावसाहेब हा दुसरीच्या वर्गात नित्यनियमाने पायी शाळेत जात. भाऊसाहेबांचे नाना भाऊसाहेबांना शाळेतुन घरी येतांना बेलापूरहून काळ, त्रिकाळ, वर्तमानपत्र आणण्यास सांगत. त्यातुन वाचनाची आवड निर्माण होऊन भाऊसाहेबांचे विचार प्रगल्भ होऊ लागले.[९] तसेच 'महाराष्ट्र शुगर मिल' चे मालक डहाणूकर हे राष्ट्रवादी विचारांचे असल्याने ते सर्व कामगार व अधिकारी यांच्यासाठी गणेश उत्सव व इतरही वेळी व्याख्याने आयोजित करीत. एक वर्षी भाऊसाहेबांना अच्युतराव पटवर्धन, पां.वा. गाडगीळ, यांची व्याख्याने ऐकण्याची संधी मिळाली. ही व्याख्याने ऐकुन भाऊसाहेब फार प्रभावित झाले. तसेच इ.स.१९३७ च्या विधीमंडळाच्या निवडणूक प्रचारार्थ पंडीत नेहरु नगर जिल्हयाच्या दौऱ्यावर असतांना बेलापूर स्टेशनला त्यांची सभा होती. ती ऐकण्याची संधी भाऊसाहेबांना मिळाली. पंडीत नेहरुच्या स्वातंत्र्यविषयक विचाराने भाऊसाहेब फार प्रभावित झाले.

भाऊसाहेबांचे पाचवी व सहावीचे शिक्षण पुर्ण झाले होते. त्याच वर्षी भाऊसाहेबांच्या नानांचे 'महाराष्ट्र शगर मिल' च्या व्यवस्थापन मंडळाबरोबर न पटल्याने त्यांनी १९३८ साली नोकरीचा राजीनामा दिल्याने भाऊसाहेबांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला असता गंगाराम बाबांनी नातवाच्या पुढील शिक्षणाची व्यवस्था संगमनेर येथील एक नंबरच्या शाळेत नाव दाखल केले होते.[१०]

### ३.३.३ भाऊसाहेब थोरात बेलापूरहून शिक्षणाकरिता संगमनेरला :-

भाऊसाहेबांचे चुलते दामोदर नांनानी अचानक नोकरीचा राजीनामा दिल्याने गंगाराम बाबांनी आपल्या नातवाचे नाव संगमनेर येथील एक नंबरच्या शाळेत सातवीच्या वर्गात दाखल केले आणि राहण्याची व्यवस्था ओळखीच्या सीताबाई काकड यांच्याकडे केली. संगमनेर मधील जिनसीवाले यांच्या वाडयात सातवीचा वर्ग भरत असे. धर्मा पोखरकरही त्याच वर्गात होते. सीताबाईकडे भाऊसाहेबांना हर प्रकारची कामे करावी लागत असत. त्या शिस्तप्रिय होत्या. अचानक शिक्षणाचे ठिकाण बदलल्याने भाऊसाहेबांचे मन शिक्षणात रमेना. भाऊसाहेबांच्या वारंवार गैरहजेरीमुळे त्यांना परिक्षेस बसता आले नाही.

**३.३.४ भाऊसाहेब थोरात संगमनेरहून शिक्षणाकरिता चांदोरीला :-**

आपल्या नातवाने शिकावे अशी गंगाराम बाबांची व मंजुळा आजीची इच्छा होती. म्हणुन मंजुळा आजींनी निफाड तालुक्यातील चांदोरी गावी आपल्या बहिणीकडे नातवाच्या पुढील शिक्षणाची व्यवस्था केली असता भाऊसाहेब आजीच्या बहिणीचा मुलगा बाबुराव यांना बरोबर घेऊन गावोगाव फिरु लागले. हे जेव्हा वडिलांना समजले तेव्हा भाऊसाहेबांना पुन्हा जोर्व्याला घेऊन आले. भाऊसाहेबांच्या शिक्षणातील या प्रगतीबाबत घरातील सर्वांनी नाराजी व्यक्त केली. आपल्या मुलाने शिकावे असे आईला मनोमन वाटत असल्याने भाऊसाहेबांचे नाव वडगावपान येथे सातवीच्या वर्गात घालण्यात आले.

**३.३.५ भाऊसाहेब थोरात चांदोरीहून शिक्षणाकरिता वडगावपानला :-**

भाऊसाहेबांच्या आईच्या आग्रहामुळे त्यांचे नाव वडगावपान येथील शाळेत सातवीच्या वर्गात घालण्यात आले. आणि राहण्याची व्यवस्था कोल्हेवाडी येथे मामाकडे करण्यात आली. कोल्हेवाडीवरुन ४ कि.मी. भाऊसाहेब नित्यनियमाने शाळेत जाऊ लागले. कांबळे गुरुजींची शिकवण्याची एक वेगळीच पध्दत होती.

त्यामुळे भाऊसाहेबांना शिक्षणाची आवड निर्माण झाली. कांबळे गुरुजीच्या मार्गदर्शनाने चांगल्या गुणांनी सातवी उत्तीर्ण झाले. तेव्हा पुढील शिक्षणाची व्यवस्था नाशिकला करण्यात आली.[११]

**३.३.६ भाऊसाहेब थोरात वडगावपानहून शिक्षणाकरिता नाशिकला :-**

भाऊसाहेब वडगावपानच्या शाळेत सातवी उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांच्या वडिलांनी नाशिक येथील मराठा माध्यमिक विद्यालयात भाऊसाहेबांचे नाव दाखल करुन उदोजी मराठा वसतीगृहात राहण्याची व्यवस्था केली होती. भाऊसाहेबांचे वडील संतुजी हे ही याच शाळेत व वसतीगृहात राहून मॅट्रिक झाले होते.

नाशिक येथील शिक्षणकाळात भाऊसाहेबांच्या विचारात परीवर्तन घडून आले होते. ते हळूहळू देशभक्तीकडे ओढले जाऊ लागले. नाशिक येथे मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. संतुजी पाटलांनी पुन्हा भाऊसाहेबांचे नाव संगमनेर येथे इंग्रजी पाचवीच्या वर्गात दाखल केले.[१२]

**३.३.७ भाऊसाहेब थोरात नाशिकहून शिक्षणाकरिता संगमनेरला :-**

भाऊसाहेब नाशिकला मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर संतुजी पाटलांनी भाऊसाहेबांचे नाव संगमनेर येथील सर डी.एम.पेटीट हायस्कूलमध्ये इंग्रजी पाचवीच्या

वर्गात घातले. हे हायस्कूल एक नावाजलेले हायस्कूल असून शिक्षकवर्ग ख्याती पावलेला होता. भाऊसाहेब शिक्षणासाठी नाशिकहून संगमनेरला येण्यापूर्वीच रावसाहेब शिंदे, धर्मा पोखरकर यांनीही सर.डी.एम.पेटीट हायस्कूलमध्ये इंग्रजी पाचवीच्या वर्गात प्रवेश घेतले होते. तर पी.बी.कडू पाटील ही त्याच वर्गात शिकत होते.[१३] के.बी. देशमुख यांनी आपल्याच वाडयात वसतीगृह सुरु केले होते. पी.बी.कडू हे त्याच वसतीगृहात राहात होते. परंतु वसतीगृह बंद पडल्याने कडू पाटलांच्या राहण्याची समस्या निर्माण झाली असता कडू पाटलांनी पुढाकार घेऊन मुले जमवली व वसतीगृहाची सर्वस्व जबाबदारी स्वत:कडे घेऊन पुन्हा वसतीगृह सुरु केले होते. भाऊसाहेबांनीही त्याच वसतीगृहात प्रवेश घेतला होता.[१४]

त्यावेळी संगमनेर येथे राष्ट्रीय सेवादलाची शाखा होती. आजच्या एस.टी. स्टँडच्या जागेवर शाखा भरत असे. भास्करराव दूर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली ही शाखा भरत होती. तर राष्ट्रीय सेवादलाच्या महिला शाखेचे काम के.बी. देशमुख यांची कन्या प्रभावतीबाई पाहात होत्या. येथुनच भाऊसाहेब व त्यांचे सर्व मित्र स्वातंत्र्य मिळविण्यासाठी अधिकाधिक आक्रमक बनत गेले. शिक्षणाबरोबरच देशसेवेचे कार्यही चालू होते. भाऊसाहेब पाचवीची परिक्षा चांगल्या मार्कांनी पास झाले.[१५]

**३.३.८ व्यवसाय :-**

भाऊसाहेब संगमनेर येथे शिक्षण घेत होते. एके दिवशी भाऊसाहेबांच्या आई अचानकपणे आजारी पडल्या असता त्यांचे चुलत भाऊ रावसाहेब व मुरलीधर पानसरे यांनी रात्रीच संगमनेर येथे जाऊन भाऊसाहेबांना आईच्या आजाराची कल्पना दिली. भाऊसाहेबांनी एवढया रात्री अनेक डॉक्टरांची दारे ठोठावली परंतु कोणी उठले नाही. शेवटी पेठेतील एक डॉक्टर उठले व त्यांनी काही औषधे दिली. ती घेऊन भाऊसाहेब रात्रीच जोर्व्याला गेले. आईला औषध दिले असता ते घश्याखाली जाते न जाते तोच आईने डोळे मिटले. तो दिवस होता २१ जानेवारी १९४५ च्या पहाटे आईचे निधन झाले. भाऊसाहेब मोठे असल्याने भावडांचा सांभाळ करण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. तेव्हा शिक्षणाला पुर्णविराम देऊन भाऊसाहेब गावी आले. आणि आपला पारंपारिक शेती व्यवसाय करु लागले. घरातील संस्कारामुळे लहानपणापासून सामाजिक कार्याची आवड निर्माण झाल्याने ते सामाजिक कार्यातही सहभाग घेत असत.[१६]

### ३.३.९ शेती व्यवसाय :-

आईचे निधनानंतर घर प्रपंचाची जबाबदारी भाऊसाहेब व मथुराबाई यांच्यावर पडली. भाऊसाहेब शेतात नांगर, वखर, रहाळणी, पाभर, केणी तसेच मोटा हाकणे, खळयातील कामे, गुऱ्हाळाची कामे, चाड गाठ देणे, दोर कासऱ्याला चार देणे, आसड गाठ देणे, मोट नाडा करणे, विहीर खोदणे, रहाट चालविणे, औत हाकणे, वेठण बांधणे, बैलांना वेसण, माथवट, मोहोरकी, माथवट घालणे, शिवळजोते घालणे आदि शेतीतील सर्व बारीकसारीक कामे भाऊसाहेब करत असत. गडयांच्या सहाय्याने भाऊसाहेब उत्तम प्रकारे शेती करत होते.[१७]

### ३.३.१० पाटीलकी :-

भाऊसाहेब वडिलांना भाऊ म्हणत. भाऊंकडे जोर्वे गावाची पाटीलकी होती. पाटीलकी गावातील पाच घराण्यांकडे होती. प्रत्येक घराण्याकडे दहा वर्ष पाटीलकीची सुत्रे असत. दहा वर्षानंतर दुसऱ्या घराण्याकडे ही सुत्रे जात. म्हणजेच पुन्हा चाळीस वर्षानंतर पहिल्या घराण्याकडे पाटीलकी येत असे, भाऊंना तिर्थयात्रेला जावयाचे होते. पाटीलकीची सुत्रे भाऊसाहेबांकडे सुपूर्त करण्याचा अर्ज तहसिल कचेरीत भाऊंनी केला. भाऊंचा रजेचा अर्ज मंजूर होऊन भाऊसाहेबांची १५ दिवसांसाठी पाटील या पदावर नेमणूक झाली. योगोयोगाने याच कालावधीत जोर्वे येथे प्रांताधिकारी कर्डिला यांचा दहा दिवसांचा कॅम्प पडला होता. प्रांताधिकारी दहा दिवस जोर्वे येथे राहुन आजुबाजुच्या सर्व गावांची शासकिय तपासणी करणार होते. प्रांतसाहेबांची व त्यांच्या सहकार्याची निवास भोजन व्यवस्था ठेवण्याची जबाबदारी पाटील या नात्याने भाऊसाहेबांकडे होती. प्रत्येक महसुली गावात पाटील, तलाठी, येसकर, जागल्या, प्रत्येकाकडे विशिष्ट कामे सोपविलेली असत. पाटील हा गावचा प्रमुख अधिकारी असुन पाटलास गावातील गुन्हयाची जागल्यांमार्फत पोलीस स्टेशनला माहिती कळविणे, गावातील जन्म मृत्युची नोंद ठेवणे, तलाठयास महसूल वसुल करण्यास मदत करणे, कुलकर्णी हा पाटलाप्रमाणे महत्वाचा घटक असून गावातील शेत जमिनीच्या नोंदी ठेवत असे. कुलकर्णीच्या हाताखाली येसकर व जागल्या हे दोघे असत.

भाऊसाहेबांनी प्रातंधिकारी कर्डिला यांच्या कॅम्पची सर्व तयारी पुर्ण केली होती. ठरल्याप्रमाणे प्रांतधिकारी यांचा कॅम्प गावात आला. दुसऱ्या दिवसापासून जवळपासच्या एक एका गावाची तपासणी सुरु झाली, गावातील महसूल, संरक्षण, अधिकाऱ्यांची कामे, तलाठयाची दप्तर तपासणी, आदी कामांची पाहणी दहा दिवस करण्यात आली.

या दहा दिवसांच्या कॅम्प कालावधीत भाऊसाहेबांनी केलेले नियोजन पाहून प्रांतधिकारी कर्डिला यांनी कौतुक केले. यात्रेवरुन आल्यानंतर प्रांतधिकाऱ्याकडे अर्ज करुन पाटीलकी भाऊंकडे सुपूर्त केली.[१८]

## ३.४ भाऊसाहेब थोरात यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान :-

हिंदुस्थानच्या इतिहासात इ.स.१८५७ च्या उठावा इतकी वादग्रस्त घटना दुसरी कोणतीही नसेल. इ.स.१८५७ पासून आजतागायत या घटनेबद्दल हिंदी इतिहासकार, विचारवंत, नेते, इंग्रज राज्यकर्ते, परकीय इतिहासकार अशा अनेकांनी आपापली मते मांडली आहेत. काहींनी या घटनेस 'शिपायांचे बंड' म्हटले तर काहींनी या घटनेस 'हिंदी लोकांच्या स्वातंत्र्याचे युध्द' म्हणून गौरव केला आहे. या घटनेचे स्वरुप कसे होते. याविषयी असा वाद असला तरी हिंदुस्थानच्या इतिहासातील तिच्या महत्वा विषयी वाद नाही. या उठावानंतर हिंदुस्थानच्या इतिहासात एक नवे पर्व सुरु झाले. याविषयी सर्व इतिहासकारांत एकमत आहे.[१९]

इ.स.१८५७ च्या उठावात भारतीयांना जरी अपयश आले असले तरी भारतीयांच्या हृदयावर कोरलेल्या स्वातंत्र्याच्या लहरी ब्रिटिश कदापिही नष्ट करु शकले नाही. 'ज्याप्रमाणे मेंढराच्या कळपात वाढलेल्या वाघाच्या छाव्याला पाण्यात पडलेले स्वतःचे प्रतिबिंब पाहून स्वतःच्या खऱ्या स्वरुपाची व सामर्थ्याची जशी जाणीव होते. तशीच जाणीव इ.स.१८५७ च्या उठावाने भारतीयांना झाली होती.[२०] म्हणूनच पारतंत्र्यातुन आपल्या मातृभूमीला मुक्त करण्यासाठी भारतातील सुशिक्षित देशप्रेमी लोकांनी प्रांताप्रातात अनेक संघटना स्थापना केल्या होत्या.

तथापि अद्याप सर्व देशांचे प्रतिनिधीत्व करणारी एखादी अखिल भारतीय, राजकिय संघटना स्थापना झालेली नव्हती. ती स्थापन करण्याचे श्रेय सेवानिवृत्त इंग्रज आय.सी.एस. अधिकारी ॲलन ऑक्टोव्हिअन हयूम यांना जाते. हयूम हे भारत सरकारच्या गृहखात्याचे सचिव होते. त्यानी हिंदी लोकांची दुःखे, दारिद्रय, उपासमार व त्यातुन निर्माण झालेला असंतोष, शेतकरी आणि आदिवासींचे उठाव, क्रांतिकारकांचे सशस्त्र उठाव, आदी बाबींची कल्पना हयूम यांना होती. इ.स.१८५७ साली इटवा जिल्हयाचे मॅजिस्ट्रेट असतांना हयुम यांनी असंतुष्ट लोकांनी केलेले बंड जवळून पाहिले होते. भारतीयांच्या मनामध्ये धुमसणारा असंतोष, त्यांच्यातील प्रखर राष्ट्रवादाची भावना यांस जर विधायक वळण दिले नाही तर

इ.स.१८५७ च्या उठावाची पुनारावृत्ती होण्यास वेळ लागणार नाही याची जाणीव ॲलन हयुम यांना होती. त्यामुळेच 'अखिल भारतीय व्यासपीठ स्थापन करण्याची गरज ॲलन हयुम यांना वाटु लागली'. हयुम यांनी तत्कालीन व्हॉईसरॉय लॉर्ड डफरिन व ब्रिटिश सरकार यांची या संघटनेच्या स्थापनेस सहानुभूती मिळवली. यासंदर्भात त्यांनी भारतीय नेत्यांबरोबरही चर्चा केली. सुशिक्षित वर्गानेही त्यांच्या या धोरणास पाठिंबा दर्शविला असता हिंदी लोकांच्या सहकार्यातुन इ.स.१८८४ साली 'इंडियन नॅशनल युनियनची' स्थापना केली. या संस्थेचे पहिले अधिवेशन मुंबई येथील गोकूळदास तेजपाल या संस्कृत कॉलेजमध्ये भरले असता तेथेच या संस्थेचे रुपांतर २८ डिसेंबर १८८५ रोजी अखिल भारतीय राष्ट्रीय काँगेस या संघटेनत करण्यात आले. आणि राष्ट्रीयसभेच्या स्थापनेने हिंदी जनतेला एक व्यासपीठ मिळाले. भारतीय स्वातंत्र्य लढयातील राष्ट्रीय सभेच्या कार्याचे तीन टप्प्यात वर्गीकरण केले जाते.

पहिला टप्पा मवाळ काँग्रेस - इ.स.१८८५ - इ.स.१९०५

दुसरा टप्पा जहाल काँगेस - इ.स.१९०५ - इ.स.१९२०

तिसरा टप्पा गांधीवादी काँगेस - इ.स.१९२० - इ.स.१९४७

राष्ट्रीय सभेच्या कार्याचे तीन कालखंड पडतात.[२१]

इ.स.१९२० साली लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर राष्ट्रीय काँग्रेसच्या तिसऱ्या कालखंडाचे नेतृत्व महामा गांधीजीकडे आले. गांधीजीच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य चळवळीस जनअंदोलनाचे स्वरुप प्राप्त झाले. गांधीजींनी जी विविध आंदोलने केली त्यात अहमदनगर जिल्हा आघाडीवर होता.[२२]

अहमदनगर जिल्हयातील पी.बी.कडू पाटील, रावसाहेब शिंदे, अण्णासाहेब शिंदे, अच्युतराव पटवर्धन, पां.वा.गाडगीळ, ना.ना. सथ्था, रामकृष्ण महाराज, रावसाहेब पटवर्धन, किसन नेहे, दादा चौधरी, काशिनाथ, पंत भालेराव, रामभाऊ निसाळ, केशवराव देशमुख, भैय्यासाहेब कुलकर्णी, बुवासाहेब नवले, लक्ष्मण ठाकर, पारेगावकर, दत्ता देशमुख, भास्करराव दुर्वे, पी.बी.कडू, भाऊसाहेब थोरात,चंद्रभान आठरे पाटील, विष्णूबुवा हासे, भिमाशंकर कानवडे, महाजन, पी.सी. जोशी, बाळासाहेब भारदे, धर्मा पोखरकर, बाबुजी आव्हाड, बाबुमियाँ बँडवाले आदि स्वातंत्र्य सैनिकांमध्ये भाऊसाहेब संतुजी थोरात स्वातंत्र्य चळवळीत अग्रेसर होते. भाऊसाहेबांचे स्वातंत्र्य लढयातील योगदान महत्वपूर्ण आहे.[२३]

### ३.४.१ भाऊसाहेबांना स्वातंत्र्य चळवळीची मिळालेली प्रेरणा :-

भाऊसाहेबांचे घराणे पाटील असल्याने सामाजिक कार्याचे प्राथमिक धडे कुटूंबीयाकडूनच मिळाले होते. जोर्वे येथे चौथीला उत्तीर्ण झाल्यानंतर गंगाराम पाटलांनी नातवाच्या पुढील शिक्षणाची व्यवस्था भाऊसाहेबांचे चुलते दामोदर नाना बेलापूर येथे 'महाराष्ट्र शुगर मिलमध्ये' नोकरीला होते. त्यांच्याकडे करण्यात आली. दामोदर नांनानी भाऊसाहेबांचे नाव बेलापूरच्या 'जीवन शिक्षण मंदिर' या शाळेत घातले. भाऊसाहेबांचे चुलते ज्या 'महाराष्ट्र शुगर मिलमध्ये' नोकरीस होते. त्या मिलचे मालक डहाणूकर हे राष्ट्रवादी विचारांचे व धार्मिक प्रवृत्तीचे होते. त्यांच्यावर लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरु आदि राष्ट्रप्रेमीचा प्रभाव होता. डहाणुकर गणेश उत्सवानिमित्त मिलमधील अधिकारी कामगार यांच्यासाठी खेळाच्या स्पर्धा व व्याख्याने आयोजित करत असत. व्याख्यानाचे विषय राष्ट्रीय चळवळ व भारताचे स्वातंत्र्य हे असत. एक वर्षी भाऊसाहेबांना अच्युतराव पटवर्धन, पां.वा. गाडगीळ, यांची व्याख्याने ऐकण्याची संधी मिळाली. तसेच इ.स.१९३७ साली मुंबई राज्यांच्या विधीमंडळाच्या निवडणूकीच्या प्रचारार्थ पंडीत नेहरुच्या सभेचे आयोजन बेलापुर येथे करण्यात आले होते. या सभेच्या निमित्ताने भाऊसाहेबांना पंडीत नेहरुंना पाहण्याची व त्यांचे भाषण ऐकण्याची संधी मिळाली. पंडीतजींचे सभा स्थानी आगमन होताच घोषणांच्या जल्लोषांनी सारा अस्संमत दुमदुमुन गेला. भारत माता की जय, लेंगें लेंगे, स्वराज्य लेंगे, पंडीत जवारलालजी की जय, महात्मा गांधी की जय इ. घोषणांनी व पंडीत नेहरुंच्या भाषणातील राष्ट्रवादी, विचारांच्या निखाऱ्याने लोक उदगीत झाले. उपस्थितींच्या मनात राष्ट्रवादाच्या भावना उफाळून आल्या.

डहाणूकरांनी आयोजित केलेली राष्ट्रीय चळवळी वरील व्याख्याने आणि पंडीतजीचे प्रभावी व्यक्तिमत्व व राष्ट्रवादी, विचाराने भाऊसाहेबांसारखा तरुण विद्यार्थी राष्ट्रवादाकडे ओढला जाणे यात आश्चर्य ते काय.

येथुनच खऱ्या अर्थाने भाऊसाहेबांना स्वातंत्र्य चळवळीची प्रेरणा मिळाली. भाऊसाहेबांचे चुलते दामोदर नाना भाऊसाहेबांकडे वर्तमानत्रे आणण्यासाठी पैसे देत आणि भाऊसाहेब शाळेतून घरी येतांना बेलापूरहून काळ, त्रिकाळ, केसरी ही वर्तमानपत्र आणत असत. वर्तमानपत्रातील स्वातंत्र्य चळवळीविषयीचे अग्रलेख वाचनातून भाऊसाहेब स्वातंत्र्य चळवळीकडे आकर्षित झाले.[२४] भाऊसाहेबांचे चुलते दामोदर नाना यांनी बेलापूर येथील महाराष्ट्र शुगर मिल मधील नोकरी सोडल्यानंतर भाऊसाहेबांच्या वडिलांनी आपल्या मुलांचे

नाव वडगांवपान येथील जीवन विद्या मंदीर या शाळेत सातवीच्या वर्गात दाखल केले होते. आणि कोल्हेवाडी येथे तात्याबा दिघे यांच्याकडे राहण्याची व्यवस्था केली होती.

भाऊसाहेब शिक्षणाकरीता वडगांवपानला येण्यापूर्वीच अण्णासाहेब शिंदे यांनी संगमनेरच्या सर डी.एम.पेटीट विद्यालयात प्रवेश घेऊन कोल्हेवाडी येथे आत्याकडे राहून शाळेत जात असत. अण्णासाहेबांची आत्या ही भाऊसाहेबांची मामी होती. अण्णासाहेब व भाऊसाहेब एकत्रच अभ्यास, गप्पागोष्टी मारत असत.

अण्णासाहेब हे राष्ट्रवादी विचारांचे होते. स्वातंत्र्याविषयी त्यांना तळमळ असल्याने त्यातुन त्यांनी मित्रांच्या सहकार्याने गणेशोत्सवाच्या निमित्ताने पेटीटी हायस्कूल समोर जिल्हयातील प्रसिध्द पुढारी रावसाहेब पटवर्धन यांचे व्याख्यान ठेवले होते. ते ऐकण्याची संधी भाऊसाहेबांना मिळाली. व्याख्यानातून प्रखर राष्ट्रवाद, ब्रिटिश राजवटीवर टिका, भारतीयांची दयनिय परिस्थिती, यावरील पटवर्धनाच्या भाषणाने व अण्णासाहेबांच्या राष्ट्रवादी विचारांनी भाऊसाहेब प्रभावित झाले.[२५] तसेच अहमदनगर जिल्हयातील सत्यशोधक पुढारी मुंकूंदरावांनी दीन मित्र नावाचे साप्ताहिक सुरु केले होते. दीनमित्राच्या वाचनाने भाऊसाहेब राष्ट्रवादी विचारांकडे ओढले जाऊ लागले.[२६] तर नाशिक येथे शिक्षण घेत असतांना भाऊसाहेब सार्वजनिक वाचनालयाचे सभासद होते. 'आचार्य अत्रे' यांचे 'नवयुग', ना.सी.फडके यांचे 'झन्कार', देवगिरीकरांचे 'चित्रमय जगत' रामभाऊ चिटणिसांचे विविध वृत्त, मामा वरेरकरांचे 'धावता धोटा' ह.ना. आपटे, वि.स. खांडेकर, चि.वि.जोशी, ना.सी.फडके या आवडत्या लेखकांच्या राष्ट्रवादी लेखनशैलीच्या प्रभावाने भाऊसाहेब जहाल विचारणीकडे ओढले जावू लागले. भाऊसाहेबांच्या जीवनात ज्या अनेक घटना आल्या त्यातुनच भाऊसाहेब स्वातंत्र्य चळवळीकडे ओढले गेले.[२७]

**३.४.२ भाऊसाहेब थोरात यांची स्वातंत्र्य चळवळीकडे वाटचाल :-**

बेलापूर येथे दामोधर नानांकडे राहुन शिक्षण घेत असतांना विविध वृत्तपत्रांचे वाचन तसेच अच्युतराव पटवर्धन, पा.वा.गाडगीळ यांची व्याख्याने, पंडीत नेहरुंचे भाषण, यातुन भाऊसाहेबांचे विचार परिवर्तन होऊन ते स्वातंत्र्य चळवळीकडे आकर्षीत झाले. संगमनेर येथे शिक्षण घेत असतांना स्वातंत्र्य चळवळी विषयी काम करत होते. महात्मा गांधीजींनी १९४२ चे चलेजाव चळवळ सुरु केली असता भाऊसाहेबांच्या स्वातंत्र्य लढयातील कार्याला गती आली. त्यांच्या गटाने सर्वस्वीपणे या चळवळीत सक्रीय होत ब्रिटीश सरकार विरोधी

आक्रमक धोरणाचा अवलंब केला. स्वातंत्र्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन स्वातंत्र्य प्राप्तीपर्यंत ते स्वातंत्र्य चळवळीत सक्रीय राहीले.

भाऊसाहेबांनी इ.स.१९४२ साली संगमनेर येथील सर डी.एम. पेटीट विद्यालयात इंग्रजी पाचवीत प्रवेश घेतला होता. तर राहण्याची व्यवस्था पी.बी. कडू पाटील यांनी के.बी. दादा देशमुख यांच्या वाडयात वसतीगृह सुरु केले होते. त्या वसतीगृहाची संपूर्ण जबाबदारी पी.बी.कडू पाटलांकडे होती. या वसतीगृहात भाऊसाहेबांनी प्रवेश घेतला होता. याच वसतीगृहात रेवजी दिघे, गुलजमाल इनामदार, रावसाहेब शिंदे, अण्णासाहेब शिंदे, भिमाशंकर कानवडे, पी.बी. कडू पाटील, धर्मा पोखरकर, इ. चाळीस विद्यार्थी राहत होते. वसतिगृहातील बहुतेक विद्यार्थी राष्ट्र सेवादलाचे सदस्य होते. भाऊसाहेबही राष्ट्र सेवादलाचे सदस्य झाले होते. भास्करराव दुर्वे नानांच्या मार्गदर्शनाखाली ही शाखा भरत असे. भास्करराव दुर्वेनानांच्या मार्गदर्शनाखाली भाऊसाहेबासह सर्व विद्यार्थी अहमदनगर जिल्हयात स्वातंत्र्य चळवळीचा प्रचार आणि प्रसार करत होते. राष्ट्रीय सेवादलाच्या शाखा जिल्हयातील प्रत्येक तालुक्यात स्थापन व्हाव्यात म्हणून गावोगावी जाऊन जागृती करत होते. त्यांच्या कार्याने संपूर्ण जिल्हाच क्रांतिमय झाला होता.[२८] त्यातच गांधीजींनी ८ ऑगस्ट १९४२ रोजी 'चले जाव' चळवळीची घोषणा करताच भाऊसाहेबांसह सर्व विद्यार्थी भारत मातेच्या मुक्ततेसाठी ब्रिटिश सरकारच्या विरोधी 'चले जाव' चळवळीत सहभागी झाले होते.[२९]

### ३.४.३ इ.स.१९४२ चे छोडो भारत आंदोलन आणि भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हयातील योगदान :-

१ सप्टेंबर १९३९ रोजी हिटलरने पोंलडवर आक्रमण करताच इंग्लडने हिटलरला ४८ तासात पोंलड मधील फौजा माघारी घेण्याची सुचना केली. परंतु हिटलरने त्याकडे दुर्लक्ष केल्याने ३ सप्टेंबर १९३९ रोजी इग्लंउ -फ्रान्सने जर्मनी विरोधी युध्द घोषणा केली आणि खऱ्या अर्थाने दुसऱ्या महायुध्दाला सुरुवात झाली. हिंदुस्थानचे व्हॉईसरॉय लॉर्ड लिन लिथगो यांनी भारत ही इंग्लडंच्या बाजुने युध्दात सहभागी असल्याची घोषणा केली. वास्तविक पाहता या संदर्भात भारतीय नेत्यांबरोबर त्यांनी चर्चा करणे आवश्यक होते. परंतु असा कोणताही विचार न करता आपल्या मर्जीनुसार घोषणा केल्याने भारतीय जनतेत असंतोष पसरला. असे असतांनाही राष्ट्रसभेच्या वर्किंग कमिटीने इंग्लंडला सशर्त पाठिंबा देण्याचे ठरविले. परंतु ब्रिटिश सरकार युध्द समाप्तीनंतर हिंदुस्थानला लगेच स्वातंत्र्य

देणार असेल व दरम्यानच्या काळात सर्व पक्षांचे राष्ट्रीय सरकार इंग्रज निर्माण करणार असेल तर राष्ट्रीय काँग्रेस इंग्लंडच्या बाजुने युध्दात सामील होण्यास तयार आहे. परंतु सरकारला हिंदी नेत्यांचे हे धोरण मान्य नव्हते. त्यातूनच भारतात आणखी असंतोष वाढला.[३०] त्यातच जपानी फौजांनी एकामागून एक विजय मिळवत ८ मार्च १९४२ रोजी ब्रम्हदेशाची राजधानी रंगुन ही काबीज केले. आणि जपानी फौज हिंदुस्थानच्या द्वाराजवळ येवुन धडकल्या होत्या.

अशा परिस्थितीत हिंदी लोकांच्या सहानुभूती शिवाय हिंदुस्थानी साम्राज्याचे आपण संरक्षण करु शकणार नाही याची कल्पना आल्याने चर्चिल साहेबांनी ब्रिटिश पार्लमेंटमधील नेता सर स्टॅफर्ड क्रिप्स यांना भारतात शांतता प्रस्थापित करण्यासाठी व युध्दात सहकार्य मिळविण्यासाठी भारतीय नेत्यांबरोबर चर्चा करण्यासाठी पाठविले. परंतु राष्ट्रीय नेत्यांबरोबरील ही चर्चा निष्फळ ठरली. राष्ट्रीय सभेने योजना फेटाळून लावली. कारण वसाहतीच्या दर्जाच्या स्वातंत्र्यात भावी विभाजनाची बिजे पेरली होती. या योजनेला मान्यता म्हणजे विभाजनाला मान्यता देण्यासारखे होते. भारताला पूर्ण स्वातंत्र्या ऐवजी वसाहतीच्या राज्याचा दर्जा मिळणार होता. तसेच सत्ता भारतीयांच्या हाती सुध्दानंतर येणार होती. सर्व काही अनिश्चित होते. या सर्व कारणांमुळे राष्ट्रीय सभेने या योजनेला विरोध केला. महात्मा गांधीजीनी ओळखले की जर जपानने भारतावर आक्रमण केले तर ते इंग्रजामुळेच होणार आहे. म्हणून जपानी आक्रमण भारतावर होण्यापूर्वीच इंग्रजांना हिंदुस्थानातुन घालवुन देण्यासाठी स्वातंत्र्य चळवळ प्रखर करण्याचा निर्धार करुन तसा ठराव १४ जुलै १९४२ रोजी संमत केला.[३१]

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात इ.स.१९४२ हे वर्ष ऐतिहासिक दृष्टीने महत्वाचे गणले जाते. कारण ७ व ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबई येथे गवालिया टँक मैदानावर अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अधिवेशन भरले असता या अधिवेशनासाठी भारतातील सर्व राज्यातुन हजारो कार्यकर्ते उपस्थित होते. गांधीजीनी ब्रिटिश विरोधी छोडो भारताची घोषणा दिली. आणि भारतीय स्वातंत्र्य लढयास प्रारंभ झाला.

**तळ टिप :** छोडो भारत आंदोलन :दुसऱ्या महायुध्दात जपानने इंग्लडचा अनेक आघाडयावर प्राभव केला होता. ब्रिटीशांची भारतावर सत्ता असल्याने भारतावरील जपानी आक्रमणाचा धोका वाढला होता. भारतावर जपानी आक्रमण होण्यापूर्वी ब्रिटीशांनाच भारतातुन घालुन देण्यासाठी महात्मा गांधीजींनी जी देशव्यापी चळवळ सुरु केली होती. तीच १९४२ ची छोडो भारत चळवळ होय.

गांधीजींनी आपल्या भाषणात उपस्थितांना म्हटले की, या क्षणापासून तुमच्यापैकी प्रत्येक स्त्री- पुरुषाने आपण स्वतंत्र झालो आहोत असे समजावे आणि स्वतंत्र भारताचा नागरिक म्हणून वागावे. संपूर्ण स्वातंत्र्याशिवाय अन्य कशानेही माझे समाधान होणार नाही. असे म्हणून गांधीजींनी 'छोडो भारत' ची घोषणा दिली. गांधीजीच्या या घोषणेने हिंदी जनता प्रभावित झाली आणि स्वातंत्र्याकरीता कोणतेही अग्निदिव्य करण्याची मनाची तयार दाखवू लागले. पारतंत्र्याच्या शृंखला तटातट तोडून टाकून मातृभूमीस मुक्त करावयाचे अशा एकाच ध्यासाने लोकांची मने भारली होती. मात्र ब्रिटिश सरकार अधिक आक्रमक बनले होते. ९ ऑगस्ट रोजी गांधीजी नित्याप्रमाणे पहाटे चार वाजता प्रार्थनेला उठले. प्रार्थनेनंतर कामाला लागणार तोच गांधीजींना अटक झाली. त्याच रात्री पंडित नेहरु, सरदार पटेल, मौलाना आझाद, आदि काँग्रेस कमिटीच्या सदस्यांनाही अटक झाली. गांधीजीना पुण्याच्या आगाखान पॅलेसमध्ये स्थानबध्द करण्यात आले. त्याच रात्री पंडित नेहरु, सरदार पटेल, मौलाना आझाद आदी काँग्रेस नेत्यांना अहमदनगर येथील भुईकोट किल्ल्यात स्थानबध्द करण्यात आले. त्याबरोबर देशात सर्वत्र अटक सत्र सुरु झाले. अटक सत्रात हजारो कार्यकर्त्यांना स्थानबध्द करण्यात आले.[३२]

८ ऑगस्ट १९४२ च्या स्वातंत्र्य लढयात महाराष्ट्र राज्य आघाडीवर होते. महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर जिल्हा आघाडीवर होता. अहमदनगर जिल्हयातील स्वातंत्र्य सैनिकांमध्ये भाऊसाहेब थोरात आघाडीवर होते.

अहमदनगर जिल्हयातील स्वातंत्र्य सैनिकांमध्ये भाऊसाहेब थोरात, नाना सय्या, रामकृष्ण महाराज, रावसाहेब पटवर्धन, दादा चौधरी, काशिनाथ, पंत भालेराव, रामभाऊ निसाळ, केशवराव देशमुख, भैय्यासाहेब कुलकर्णी, बुवासाहेब नवले, लक्ष्मण ठाकर, पारेगावकर, दत्ता देशमुख, भास्करराव दुर्वे, अण्णासाहेब शिंदे, पी.बी.कडू, चंद्रभान आठरे पाटील, विष्णु बुवा हासे, किसन नेहे, भिमाशंकर कानवडे, कॉ.तुळपुळे, प्रभाकर बर्डे, महाजन, पी.सी. जोशी, बाळासाहेब भारदे, धर्मा पोखरकर, बाबुजी आव्हाड, बाबुमियाँ बँडवाले आदि स्वातंत्र्य सेनानींनीच्या कार्याने अहमदनगर जिल्हा ब्रिटिश सरकार विरोधी पेटुन उठला.

स्वातंत्र्य सेनानींची गुप्त मिटींग घेऊन सरकार विरोधी आक्रमक कार्यक्रम करण्याचे निश्चित केले. त्यात स्वातंत्र्य चळवळीविषयी जागृती, सातारा जिल्हयातील नाना पाटलाच्या प्रतिसरकारच्या धर्तीवर जिल्हयात गटागटाने प्रति सरकार स्थापन करणे, ब्रिटिश

सरकारच्या प्रशासकीय कारभारावर बहिष्कार टाकुन सरकारला अडचणीत आणण्यासाठी साबोटाज कार्यक्रम यशस्वीपणे राबविणे.[३३]

जिल्हयातील स्वातंत्र्य सैनिकांचे विविध गटात विभाजन करुन त्यांना ठराविक विभागाची जबाबदारी सोपविली होती. त्यात भाऊसाहेबांच्या गटाकडे संगमनेर तालुक्यतील राजापूर, चंदनापुरी, तांभोळ, वीरगाव, सावरगावपाट, समशेरपूर, म्हाळादेवी, मुथाळणे, निळवंडे, मेहेदुरी, उंच खडक, टाकळी ढोकरी, घारगाव, सारोळे, ढोरवाडी, गुंजाळवाडी, जोर्वे, पानोडी आदी गावात जागृती करण्याची जबाबदारी भाऊसाहेबाच्या गटाने यशस्वीपणे पार पाडली होती.

त्यानंतर ठरल्याप्रमाणे एकाच दिवशी जिल्हयात अनेक ठिकाणी प्रतिसरकार स्थापनेचा प्रयत्न केला. भाऊसाहेबांच्या गटानेही संगमनेर कचेरीवर मोर्चा नेऊन प्रतिसरकार स्थापनेचा प्रयत्न केला. परंतू त्यात त्यांना यश आले नाही. अनेक कार्यकर्त्यांना अटक झाली. तर अनेकांना भूमिगत होणे भाग पडले. येथुन पुढे भाऊसाहेब व त्यांचे सहकारी भुमिगत राहून सरकार विरोधी कार्य करत होते.[३४]

प्रतिसरकार स्थापनेत जिल्हयातील स्वातंत्र्य सैनिकांना अपयश आल्यानंतर त्यांनी सोबोटाज कार्यक्रमा अंतर्गत रस्ते अडथळे करणे, प्रशासकीय कार्यालयावर आक्रमण करणे, टेलिफोनच्या तारा तोडणे, इंग्रज अधिकाऱ्यांचे खुन करणे, असे सत्र सुरु होते. भाऊसाहेबाचा गट साबोटाज कार्यक्रमात सर्वांत आघाडीवर होता. या गटाचे अकोले, संगमनेर, राहुरी, कोपरगांव, श्रीरामपूर या तालुक्यात यशस्वी कार्य चालू असतांना एके दिवशी राहूरी तालुक्यातील गुहा, कोल्हार परिसरात तारा तोडणे व खांब मोडण्याचे सत्र सुरु असतांना भाऊसाहेबांच्या पायावर खांब पडला. कसेबसे त्यांच्या सहकार्यानी मामाकडे कोल्हेवाडी येथे पोहोच केले. मात्र पोलिसांना सुगावा लागल्याने इ.स.१९४३ च्या जानेवारीत अटक होऊन त्यांना १५ महिन्यांची शिक्षा होऊन त्यांना नाशिकच्या सेंट्रल जेलमध्ये ठेवण्यात आले.[३५]

**तळ टिप :** सोबोटाज : सोबोटाज म्हणजे विध्वंसक कृत्य करणे, आक्रमक धोरणांचा अवलंब करणे म्हणजे सोबोटाज होय.

## ३.५ अहमदनगर जिल्हयातील संगमनेर, अकोले येथे प्रतिसरकार स्थापनेच्या चळवळीतील भाऊसाहेब थोरात यांचे योगदान :-

ब्रिटिश सरकार विरोधी देशात प्रतिसरकार चळवळ सुरु झाली होती. त्यात मुंबई प्रांताच्या सातारा जिल्हयातील प्रतिसरकार म्हणजे एक नेत्रदीपक प्रकरण ठरले. सातारा येथे प्रस्थापित झालेले हे प्रतिसरकार पत्रीसरकार म्हणुनही ओळखले जात होते.[३६] या प्रतिसरकारच्या कार्यातून प्रेरणा घेऊन अहमदनगर जिल्हयातील स्वातंत्र्य सैनिकांनी ही एकाच दिवशी जिल्हयातील कचेऱ्यांवर आक्रमण करुन कचेऱ्या ताब्यात घेण्याचे निश्चित केले. त्या दृष्टीने तालुकेवार गटाची विभागणी केली. त्यात संगमनेर येथील कचेरी ताब्यात घेण्याची जबाबदारी भाऊसाहेबांच्या गटाकडे होती. या गटात अण्णासाहेब शिंदे, भास्करराव दुर्वे, पी.बी.कडु, पांडुरंग भांगरे, विष्णू बुवा हासे, धर्मा पोखरकर, भैय्यासाहेब कुलकर्णी, बुवासाहेब नवले, लक्ष्मण ठाकर, रावसाहेब शिंदे, महाले, दुर्गुडे, किसन नेहे, आदी स्वातंत्र्य सैनिक होते. भाऊसाहेब, भास्करराव दुर्वे यांनी राजापूर येथे १५ ऑगस्ट १९४२ रोजी प्रमुख कार्यकर्त्यांची मिटींग घेतली. या मिटींगमध्ये प्रतिसरकार स्थापनेचे नियोजन करण्यात आले.

तसेच संगमनेर -अकोले कडे येणाऱ्या सर्व रस्त्यात अडथळे निर्माण केले. भाऊसाहेब व त्यांच्या गटाने दीड महिना जनजागृती करुन अच्युतराव पटवर्धन यांच्या आदेशानुसार २३ ऑक्टोबर १९४२ रोजी संगमनेर कचेरी ताब्यात घेण्याची पूर्वतयारी करण्यात आली.[३७]

त्यासाठी भाऊसाहेबांच्या गटाने भर पावसात, वाऱ्यावादळाची पर्वा न करता तांभोळ, विरगाव,देवठाण,सावरगावपाट,समशेरपूर,मुथाळणे,म्हाळादेवी,निळवंडे,निबंळक,खानापूर, घारगाव,सारोळेपठार,जवळे बाळेश्वर, वरुंडीपठार, आश्वी, पानोडी, शिबलापूर, रणखांब, खंडेरायवाडी, निमगांवजाळी,पोखरी बाळेश्वर, साकुर, पिंपळगाव ढेपा, तळेगांव दिघे,वडगाव पान,मांडवे या संगमनेर व अकोले तालुक्यातील गावांमध्ये प्रचार मोहिम राबविली व नंतर ठरल्याप्रमाणे नाशिक रस्ता घाटाखाली तोडला. नगर-संगमनेर मार्गात झाडे तोडुन रस्त्यात अडथळे करण्यात आले.चंदनापुरी घाटात मोऱ्या तोडुन टाकल्या.

भाऊसाहेबांनी पेमगिरीच्या जंगलात रात्री मोर्चेकऱ्यांचे संघटन केले होते. २३ ऑक्टोंबर १९४२ ला कचेरीच्या पाठीमागे लोक जमा झाले. तेथुन कचेरीवर मोर्चा नेण्याचे नियोजन करण्यात आले होते. भारतमाता की जय, लेंगे लेंगे, स्वराज्य लेंगे, आदि घोषणा देत मोर्चेकरी कचेरीच्या दिशेने चालु लागले. मार्गातच पोलीसांनी धरपकड सुरु केली. यात राम नागरे,शंकरराव गोसावी, विष्णू बुवा हासे, दगडू मनाजी हासे, रामचंद्र खतोडे,

सखाहरी पंढरी खतोडे, आदींना अटक झाली. तर अण्णासाहेब शिंदे,पांडुरंग भांगरे, बुवासाहेब नवले, भाऊसाहेब थोरात यांना पकड वॉरंट निघाले. परंतु भाऊसाहेब व अनेक कार्यकर्ते निसटण्यात यशस्वी होऊन भूमिगत झाले होते. तसेच अहमदनगर जिल्हयातील रावसाहेब शिंदे, अण्णासाहेब शिंदे,महाले,पी.सी.जोशी, बाबुजी आव्हाड, प्रभाकर बर्डे,दत्ता देशमुख आदी कार्यकर्त्यांना प्रतिसरकार स्थापनेच्या प्रयत्नात अटक झाली. तर काहींना अटक वॉरंट निघाले. अनेक कार्यकर्ते भूमिगत होऊन कार्य करु लागले. या भूमिगत कार्यकर्त्यांनी आक्रमक धोरणांचा अवलंब करत साबोटाज कार्यक्रम पुन्हा हाती घेतला.[३८]

## ३.६ भाऊसाहेबांचे भूमिगत चळवळीच्या माध्यमातून सोबोटाज कार्यक्रमातील योगदान :-

जिल्हयातील कार्यकर्त्यांना प्रतिसरकार स्थापन करण्यात अपयश आल्यानंतर अनेक कार्यकर्त्यांना भूमिगत होणे भाग पडले होते. अहमदनगर जिल्हयातील भूमिगत कार्यकर्त्यांनी साबोटाज कार्यक्रमातंर्गत सरकारी मालमत्तेची मोडतोड करणे, नासधूस करणे, तारा तोडणे, दळणवळणाची व्यवस्था मोडणे, खांब मोडणे, सरकारी अधिकाऱ्यांचे खुन करणे असे विध्वंसक कार्य करु लागले.संपूर्ण जिल्हयात सरकार विरोधी कार्यकर्ते आक्रमक झाले होते. त्यात भास्करराव दुर्वे, पी.बी.कडू पाटील, पांडुरंग भांगरे, विष्णू बुवा हासे, धर्मा पोखरकर, भैय्यासाहेब, कुलकर्णी, बुवासाहेब नवले, लक्ष्मण ठाकर, दुर्गुडे, रावसाहेब शिंदे, अण्णासाहेब शिंदे, बाबुजी आव्हाड, दत्ता देशमुख, नाना सय्या, रामकृष्ण महाराज, दादा चौधरी, काशिनाथ, पंत भालेराव, रामभाऊ निसाळ, केशवराव देशमुख, लक्ष्मण ठाकर, पारेगावकर, रामजी भांगरे,चंद्रभान आठरे पाटील, भिमाशंकर कानवडे, महाजन,पी.सी. जोशी,बाळासाहेब भारदे,बाबुमियाँ बँडवाले, गोपाळा भांगरे, प्रभाकर भापकर,बी.सी. कांबळे, बाबुराव तनपुरे,के.बी. देशमुख यातील काहींना साबोटाज कार्यक्रमातील सहभागामुळे अटक झाली होती.तर काही कार्येकर्ते भूमिगत होऊन सरकारविरोधी कार्य करत होते.भूमिगत कार्यकर्त्यांच्या गुप्त बैठका घेऊन कार्यक्रमाची रुपरेषा ठरवित होते.[३९]

**तळ टिप:** प्रति सरकार/ पत्री सरकार:-१९४२ च्या चळवळी दरम्यान क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली सातारा जिल्हयातील भुमिगत कार्यकर्ते एकत्र येऊन कराड तालुक्यातील किवळ व वाळवा तालुक्यातील कामेरी येथे बैठक होऊन त्यात ठरल्याप्रमाणे महात्मा गांधीजीच्या पंचशिल तत्वांना डावालुन स्थानिक पातळीवर स्वत:च्या निर्णयानुसार प्रतिसरकार स्थापन करणे. क्रांतीसिंहाचे हे विचार साकार होऊन १९४३ ते १९४६ पर्यंत त्यांचे सरकार कार्यरत राहिले. या सरकारने प्रथम सावकार, जमिनदारी, गावगुंडाचा

बंदोबस्त करतांना ते पत्री मारण्याची शिक्षा करत असत. म्हणून या सरकारला पत्री सरकार असेही म्हटले जाई.

या भूमिगत कार्यकर्त्यांपैकी भाऊसाहेबांच्या गटात बुवासाहेब नवले, भास्करराव दुर्वे, पी.बी.कडु, पांडुरंग भांगरे, विष्णूबुवा हासे, धर्मा पोखरकर, भैय्यासाहेब कुलकर्णी, रामभाऊ हासे,किसन नेहे आदी कार्यकर्त्यांच्या साहाय्याने भाऊसाहेबांनी संगमनेर-अकोले मार्गावरील सर्व रस्त्यांत अडथळे निर्माण केले. तसेच फोनच्या तारा तोडणे, दोराच्या सहाय्याने पोल पाडण्याचे एक विशिष्ट तंत्र या गटाने आत्मसात केले होते. एका रात्रीत २०-२५ कि.मी अंतरावरील अत्यंत जलद गतीने पोल पाडयाचे काम करत असत. हा कार्यक्रम त्यानी संगमनेर-अकोले, श्रीरामपूर,राहुरी या तालुक्यात राबविला. इ.स.१९४३ चा जानेवारी महिना होता. भाऊसाहेब आपल्या सहकार्यासह संगमनेर, अहमदनगर महामार्गावरील कोल्हार,

गुहा दरम्यान तारा तोडण्याचे व पोल पाडण्याचे काम चालु असतांना एक खांब काही केल्या मोडेना, तेव्हा भाऊसाहेब दोरी सोडून बाजूला झाले असता त्याच वेळी सहकाऱ्यांनी खांबास जोराचा हिसका दिल्याने खांब मोडयाऐवजी तळापासून उपसून आला. भाऊसाहेब ओरडून बाजूला पळाले तरीही खांब भाऊसाहेबांच्या पायावर आदळल्याने भाऊसाहेब खाली पडले. सर्वत्र अंधार असल्याने काय घडले हे क्षणभर कोणालाच समजले नाही. भाऊसाहेबांच्या जिवावर आले ते पायावर निभावले होते. त्यात पोलिस त्यांच्या मागावर होते. एके ठिकाणी फार काळ थांबणे शक्य नव्हते. मित्रांनी भाऊसाहेबांना बाजुच्या ज्वारीच्या शेतात नेऊन ठेवले आणि बैलगाडीने कसेबसे लोणीला आणले. लोणी येथून वडगावपानला आणले. वडगावपान येथुन कशीबशी सायकल मिळवुन धर्मा पोखरकर, पी.बी. कडु, पांडुरंग भांगरे यांनी भाऊसाहेबांना सायकलवरुन कोल्हेवाडी येथे त्यांच्या मामाकडे पोहोच केले.[४०] मामांनी औषध उपचार सुरु केले. पोलिस भाऊसाहेबांच्या मागावर होतेच. त्यातच संगमनेर पोलिसांना गुप्तपणे भाऊसाहेब कोल्हेवाडी येथे असल्याची गुप्त बातमी मिळाली असता चाँदमियाँ फौजदार कोल्हेवाडीला आले. वाडयाची झडती घेतली. त्यांना पाहुन भाऊसाहेब भयभित झाले. चाँदमियाँ फौजदाराने जवळ येताच मोठयाने ओरडुन एक ना अनेक प्रश्न विचारु लागले.

**तळ टिप:** भुमिगत चळवळ : स्वातंत्र्य चळवळी दरम्यान जे स्वातंत्र्य सैनिक लपुन छपुन ब्रिटीश सरकार विरोधी कार्य करत होते. त्यांनी चालविलेली चळवळ म्हणजे भुमिगत चळवळ होय.

भाऊसाहेबांच्या कोणत्याही उत्तराने चाँदमियाचे समाधान झाले नाही. शेवटी तात्याबा मामांनी चाँदमियाँस विनंती केली की, मुलाची तब्येत बरी नाही. मीच उद्या त्यास संगमनेरला घेऊन येतो. असे लेखी दिल्यानंतर चाँदमिया आपला लवाजमा घेऊन माघारी गेले.

तात्याबा दिघे यांनी ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी भाऊसाहेबांना घेवून कचेरीत गेले. रात्री पुन्हा चाँदमियाँने भाऊसाहेबांना अनेक प्रश्न विचारले. भास्करराव दुर्वे, पी.बी.कडु कोठे आहे, धर्मा पोखरकर कोठे आहे. त्यांची माहिती दिल्यास सोडून देण्याचे आश्वासन दिले. परंतु ते मला माहित नाही असे उत्तर दिल्याने भाऊसाहेबांवर खटला भरुन त्यांना नगरच्या सबजेलमध्ये व तेथून नाशिकच्या सेंट्रल जेलमध्ये १५ महिने ठेवण्यात आले. भाऊसाहेबांप्रमाणेच अनेक कार्यकर्त्यांना अटक झाली होती. काहींना नगरमध्ये, काहींना येरवडा तर काहींना कैदी म्हणून नाशिक जेलमध्ये ठेवण्यात आले होते.[४१]

## ३.७ भाऊसाहेबांना अटक आणि सुटका :-

प्रतिसरकार स्थापनेच्या अपयशानंतर भूमिगत कार्यकर्त्यांनी जिल्हयात साबोटाज कार्यक्रम राबविला. भाऊसाहेबांनी सरकारविरोधी आक्रमक धोरणाचा अवलंब करत सरकारी मालमत्ता, साधने यांची नासधुस सत्र सुरु असतांनाच जानेवारी १९४३ मध्ये राहुरी तालुक्यातील कोल्हार गुहा मार्गावर तारा तोडणे, व पोली पाडण्याचे सत्र सुरु असतानाच एके रात्री अचानक त्यांच्या पायावर पोल पडला. जखमी अवस्थेत कोल्हेवाडी येथे मामांकडे असतांना चार पाच दिवसांनी पोलिसांना सुगावा लागताच चाँदमियाँ फौजदार १८-२० पोलिसांच्या ताफ्यासह आले. मामांच्या वाडयाची झडती घेतली आणि भाऊसाहेबांना शोधुन काढले. त्यांना पाहुन भाऊसाहेब भयभित झाले. चाँदमियाँ फौजदाराने येताच मोठयाने ओरडून एक एक प्रश्न विचारु लागले. पायावर काय पडले असे विचारले असता जू पडले अशा भाऊसाहेबांच्या उत्तराने त्यांचे समाधान झाले नाही. शेवटी तात्याबा मामांनी विनंती केली की, मुलाची तब्येत बरी नाही. मीच उद्या त्यास घेऊन येतो. असे लेखी दिल्याने भाऊसाहेब वाचले. तात्याबा दिघे यांनी ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी भाऊसाहेबांना घेऊन कचेरीत गेले असता नगरच्या सबजेलमध्ये ठेवण्यात आले. फेब्रुवारी १९४३ मध्ये नाशिकच्या सेट्रेल जेलमध्ये १५ महिन्यांसाठी स्थानबध्द करण्यात आले. अण्णासाहेब शिंदे यांना आधीच अटक होऊन त्यांना नाशिकच्या सेंट्रल जेलमध्ये ठेवण्यात आले होते. तेथे अण्णासाहेबांच्या

राष्ट्रीय विचारांनी व सततच्या वाचन, मनन, चिंतन यातून वाचनाची आवड निर्माण झाली. भाऊसाहेबांना इंग्रजी ग्रंथ वाचनाचीही आवड निर्माण झाली. त्यात एडगर स्नो चे 'रेड स्टार', ओव्हर चायना ही पुस्तक भाऊसाहेबांनी वाचले. तसेच पंडित नेहरुंचे 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' स्टॅलिनचे तत्वज्ञानावरील ग्रंथ, ग्यानबाचे अर्थशास्त्र तसेच वर्तमानपत्रे, पा.वा.गाडगिळांचे अग्रलेख आदी वाचनातून भाऊसाहेबांची दृष्टी अधिक प्रगल्भ झाली होती. नाशिकचा तुरुंग भाऊसाहेबांच्या दृष्टीने तुरुंग न राहाता तो ज्ञानसंपादनाचे एक अभिनव ठिकाण झाले होते. वाचन, चर्चा, अभ्यास मंडळे, यातुन जगातील सर्व घडामोडीचे ज्ञान मिळत होते. या तुरुंगाच्या रुपाने जणू काही नाशिकच्या सेंट्रेल जेलमध्ये स्वातंत्र्यसैनिकांना ज्ञानाचे अखंड भांडारच सापडले होते. साम्यवाद, मार्क्सवाद, आदी वाचनातून भाऊसाहेब साम्यवादी विचारांकडे ओढले गेले.

एप्रिल १९४४ च्या शेवटच्या आठवडयात भाऊसाहेबांची नाशिकच्या सेंट्रल जेलमधुन सुटका झाली. भाऊसाहेब तुरुंगातून बाहेर आले ते ज्ञानाचा खजिना आणि हातात पेटती मशाल घेऊनच. नाशिकची जेल भाऊसाहेबांच्या आयुष्याला कलाटणी देणारी ठरली. सुटकेनंतरही देशसेवेचे कार्य भाऊसाहेबांनी चालूच ठेवले होते.[४२]

## ३.८ भाऊसाहेबांचे किसान सभेतील कार्य :-

नाशिकच्या सेंट्रल जेलमधून सुटका झाल्यानंतर भाऊसाहेब पुन्हा स्वातंत्र्य चळवळीत कार्यरत झाले. त्यावेळी शामराव व गोदूताई परुळेकर या दांपत्याने किसान सभेच्या वतीने राज्यातील शेतकऱ्यांची परिषद टिटवाळा येथे आयोजित केली असता रावसाहेब शिंदे, धर्माजी पोखरकर, नारायणराव पेठे, भीमाशंकर कानवडे, भाऊसाहेब थोरात, बुवासाहेब नवले, किसन नेहे हे सर्व कार्यकर्ते सायकलवर प्रवास करत टिटवाळा परिषदेस उपस्थित राहिले होते. या परिषदेत सावकारी पाशातुन शेतकऱ्यांची मुक्ता करणे, जमीनदार, व्यापारी यांच्या कचाटयातुन आदिवासींना मुक्त करण्याचा महत्वपूर्ण ठराव परिषदेत मंजुर झाला. टिटवाळा परिषद यशस्वी पार पाडून भाऊसाहेब व त्यांचे सहकारी माघारी आल्यानंतर टिटवाळा परिषदेच्या प्रेरणेतुन अहमदनगर जिल्हयात किसान सभेची स्थापना केली.

किसान सभेअंतर्गत भाऊसाहेब व त्यांच्या सहकार्यांनी जिल्हयात अनेक परिषदांचे आयोजन केले. सर्वसामान्य शेतकऱ्यांवर सावकारशाही, व्यापारी, जमीनदार यांच्याकडून होत असलेल्या अन्याय अत्याचारा विरोधी भाऊसाहेबांनी किसानसभेच्या माध्यमातून जागृती

घडवुन आणली. किसान सभेअंतर्गत वरुंडी परिषद, राजूर परिषद, संगमनेर परिषद, जोर्वे परिषद, करंजी परिषद, गुहा परिषद, आदी परिषदांचे आयोजन करुन जिल्हयातील कार्यकर्त्यांवर विभागवार प्रचार कार्याची जबाबदारी सोपविली होती.

वरुंडी परिषद ही किसान सभेची पहिली व सर्वात मोठी परिषद होती. परिषदेची उद्दिष्टे जिल्हयात सर्व सामान्यापर्यंत कार्यकर्त्यांनी प्रचाराच्या माध्यमातून पोहोचवली होती. परिषदेस अण्णासाहेब शिंदे, आठरे पाटील, आर.जी.कऱ्हाडकर हे प्रमुख मार्गदर्शक होते. सावकारशाही नष्ट करा. कसेल त्याची जमीन, पठार भागात रस्ते हे परिषदेचे उद्देश होते.[४३]

## ३.९ भाऊसाहेब थोरात यांचे कौटुंबीक जीवन :-

मानवी जीवनाला पुर्णत्व प्राप्त होण्यासाठी हिंदू धर्मशास्त्रात सोळा संस्कार सांगितले आहेत. त्यातील विवाह हा एक महत्वाचा संस्कार मानला जातो. भाऊसाहेब जेलमधून सुटल्यानंतर संगमनेर येथे इंग्रजी पाचवीच्या वर्गात शिकत होते. त्याच बरोबर स्वातंत्र्य चळवळीत पहिल्यापेक्षा जोमाने कार्य करत होते. ही सर्व माहिती भाऊसाहेबांच्या घरच्यांना बाहेरुन समजत होती. यावर उपाय म्हणून सकुबाईने भाऊसाहेबांच्या पायात लग्नाची बेडी अडकवण्याचा निश्चय केला. आणि भाऊसाहेबांना घरी बोलावुन सांगितले की, मथुराबाईबरोबर तुझे लग्न जमवले आहे. आईने अचानक घेतलेल्या या निर्णयाने भाऊसाहेबांना धक्काच बसला. भाऊसाहेबांनी आताच लग्न करणार नाही अशी विनवणी केली. परंतु आईने कुणाचेही ऐकले नाही.

### ३.९.१ भाऊसाहेब थोरात यांचा विवाह :-

कोल्हेवाडी येथील तात्याबा दिघे यांची मुलगी मथुराबाई बरोबर भाऊसाहेबांचा विवाह ठरला. तात्याबा दिघे हे भाऊसाहेबांचे मामा असल्याने भाऊसाहेब व मथुराबाई लहानपणी एकत्र अभ्यास करत, खेळत असत. मथुराचा स्वभाव भाऊसाहेब जाणुन होते. मथुरा रंगाने गोरीपान, पातळसडक शरीर, उंच कपाळ, नाक सरळ, आकर्षक चेहरा, हनुवटीवर एक ठिपका गोंदलेला होता. त्याने तिचा देखणेपणा अधिकच खुललेला होता. लग्नाची तारीख ठरविली गेली. रितिरिवाजाप्रमाणे भाऊसाहेब बैलगाडीतून अक्षय तृतीयेच्या दिवशी नवरीच्या घरी गेले आणि दुसऱ्या दिवशी शुभ मुहर्तावर लग्न विधी पार पडला. भाऊसाहेबांना येथून पुढे देशसेवेबरोबरच कौटुंबिक जबाबदारीही पहावी लागत होती.[४४]

### ३.९.२ भाऊसाहेब थोरात यांची कुटुंब प्रमुख म्हणून कामगिरी

विवाहानंतर थोडयाच दिवसांनी भाऊसाहेबांच्या आईचे निधन झाले. आणि संतुजी पाटील थोरात यांनी कुटुंबांची सर्व जबाबदारी भाऊसाहेब व मथुराबाई यांच्यावर टाकली. भांवडे लहान होती. मिराबाईचे लग्न झाले होते. हिराबाई, ताराबाई शाळेत जात. पंडितराव चार वर्षाचा तर मधू आठ-नऊ महिन्याचा होता. या सर्वांचा सांभाळ करण्याची सर्व जबाबदारी भाऊसाहेबांवर होती. पार्वता मामी मधुला कोल्हेवाडीला घेऊन गेल्या. त्यांनीच त्यांचा सांभाळ केला. भाऊसाहेब भांवडाचा सांभाळ व शेतीची सर्व कामे करत असत.

चारही भावंडाचे शिक्षणे पूर्ण केली. पंडितराव व मधू इंजिनिअर झाले. पंडितराव औरंगाबाद येथे मोठे उद्योजक आहेत. मधू नोकरी निमित्ताने मुंबई येथे गेला असता रेल्वे अपघातात मृत्यु पावले. हिराबाई, ताराबाईचेही शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सर्व भांवडांचे विवाह सुशिक्षित सुसंस्कृत घराण्यात करुन दिले. मथुराबाईने मुलांचा आईच्या मायेने सांभाळ केला. मुलांना आईच्या निधनाचे दु:ख कधी जाणवून दिले नाही. कौटुंबिक जबाबदारी बरोबरच भाऊसाहेबांचे देशसेवेचे कार्यही चालूच होते.

### ३.९.३ भाऊसाहेब थोरात यांना अपत्य प्राप्ती :-

भाऊसाहेबांना बाळासाहेब, मोहिनी, रोहिणी, शोभा, दुर्गाताई ही पाच अपत्य आहेत. सामाजिक कार्य करत असतानाही भाऊसाहेबांनी आपल्या कुटूंबाकडे कधी दुर्लक्ष होऊ दिले नाही. मथुराबाई व भाऊसाहेब यांच्या धार्मिक, सामाजिक संस्कारात सर्व मुले घडली. भाऊसाहेबांना शिक्षणाचे महत्व समजले होते. त्यामुळे मुलांचे योग्य प्रकारे शिक्षण पुर्ण केले. मुलगा आमदार बाळासाहेब एल.एल.बी. झाला आहे. मुलींचेही शिक्षण पूर्ण केले. सर्व मुलींचे विवाह सुशिक्षित सुसंस्कृत घराण्यात करुन दिले.[४५]

### ३.९.४ मोहिनी आप्पासाहेब राजळे :-

मोहिनीचा विवाह पाथर्डी तालुक्यातील पिंपळगाव कासार येथील आप्पासाहेब राजळे यांच्याशी करुन दिला. राजळे घराणे धार्मिक, सामाजिक व राजकिय वारसा जपणारे आहे. त्यातच मोहिनीवर आईवडीलांचे सामाजिक कार्याचे संस्कार झाल्याने आपल्या पतीबरोबर त्यांच्या सामाजिक कार्यात सहभाग घेतात. त्याचबरोबर कुटूंबाची जबाबदारी व्यवस्थित पार पाडत आहेत.

### ३.९.५ रोहिणी माधवराव देशमुख :-

रोहिणीचा विवाह कोपरगांव येथील माधवराव देशमुख यांच्याशी करुन दिला. रोहिणीही आपल्या पतीबरोबर त्यांच्या सामाजिक कार्यात सहभाग घेतात. त्याचबरोबर कुटूंबाची जबाबदारी व्यवस्थित पार पाडत आहेत.

### ३.९.६ शोभा अरुण कडु :-

शोभाचा विवाह राहुरी तालुक्यातील अरुण कडू यांच्याशी करुन दिला. अरुण कडू पाटील घराणे मोठे शेतकरी कुटुंब असून कडू घराण्याने धार्मिक, सामाजिक व राजकिय कार्याचा वारसा जोपासला आहे. शोभा आपल्या पतीबरोबर त्यांच्या सामाजिक कार्यात सहभाग घेतात. त्याचबरोबर कुटूंबाची जबाबदारी व्यवस्थित पार पाडत आहेत.

### ३.९.७ दुर्गाताई सुधीर तांबे :-

भाऊसाहेबांनी आपल्या धाकटया मुलीचा दुर्गाताईचा विवाह संगमनेर तालुक्यातील दाढ येथील आमदार डॉ.सुधीर तांबे यांचेबरोबर करुन दिला. दुर्गाताईंना आपल्या वडिलांप्रमाणे सामाजिक कार्याची आवड आहे. त्या संगमनेर नगरपालिकेच्या विद्यमान व पहिल्या महिला अध्यक्षा आहेत. संगमनेर शहरास स्वच्छ, सुंदर शहर म्हणून ओळख निर्माण करुन देण्यात दूर्गाताईंचे योगदान, जिद्द, चिकाटी सर्वांच्या सहभागातून काम करुन घेण्याची पध्दत वाखाण्याजोगी आहे. नगर पालिकेच्या माध्यमातून दुर्गाताईंनी शहरातील प्रत्येक रस्त्याच्या कडेला वृक्षारोपण केले. शहरातील रस्ते सांडपाणी, स्वच्छता, पाणी व्यवस्थापन, धार्मिक स्थळे, ऐतिहासिक स्थळे यांची दुरुस्ती अशी महत्वपूर्ण कामे केली. पुरुषांप्रमाणेच महिलांनीही प्रत्येक क्षेत्रात पुढे यावे. स्वालंबी बनावे या ध्येयाने प्रेरित होऊन २००६ पासून ते २०१७ पर्यंत दुर्गाताईंच्या मार्गदर्शनाखाली २४९० बचतगटांची स्थापना झाली. बचत गटाच्या माध्यमातून महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. बचतगटातील महिलांना पापड, कुरडई, बॅग, ब्युटी पार्लर, मसाला कांडप यंत्र, शेळीपालन, पशुपालन आदी उदयोगासाठी कर्जपुरवठा केला जातो. बचतगटांना मार्गदर्शन करण्यासाठी दुर्गाताई सर्वांच्या पुढे असतात. याशिवाय महिला निवारण कक्ष, महिलांचे संघटन, महिलांसाठी व्याख्याने, विविध सण, उत्सवानिमित्त मेळावे घेऊन महिलांमध्ये संघटन घडवुन आणण्याचे महत्वपूर्ण योगदान

दुर्गाताई देत आहेत. भाऊसाहेबांनी घालुन दिलेल्या सामाजिक कार्याचा वारसा त्या पुढे नेत आहेत.[४६]

### ३.९.८ आमदार डॉ.सुधीर भास्कर तांबे :-

दुर्गाताई तांबे यांचे पती आमदार डॉ.सुधीर तांबे हे संगमनेर तालुक्यातील दाढ येथील आहेत. त्यांचे शिक्षण एम.बी.बी.एस.,व जनरल सर्जरीमध्ये एम.एस. पदवी त्यांनी संपादन केली आहे. अशा हुशार मुलाची निवड भाऊसाहेबांनी दुर्गाताईसाठी करुन त्यांचा विवाह मोठया आनंद उत्साहात साजरा केला. डॉ. सुधीर तांबे यांनी विवाहनंतर संगमनेर येथे वैदयकीय व्यवसाय सुरु केला. आज त्याचे विशाल अशा हॉस्पीटलमध्ये रुपांतर झाले आहे. अकोल रोडलगत त्यांचे सर्व सुविधांनी परिपूर्ण हॉस्पीटल आहे. या हॉस्पीटलचा लाभ अहमदनगर जिल्हयातील रुग्णांबरोबरच जिल्हयाच्या बाहेरील रुग्णही उपचार घेत आहेत.

वैद्यकिय व्यवसायाबरोबरच डॉ.सुधीर तांबे साहेब हे भाऊसाहेबाच्या सामाजिक व सहकारातील कार्यातही सहभाग घेत असत. दादांच्या सहवासात त्यांना सामाजिक कार्य व खरा सहकार काय असतो हे समजले. भाऊसाहेबांच्या निधनानंतर भाऊसाहेबांनी स्थापन केलेल्या सहकारातील संस्थाची जबाबदार ज्याप्रमाणे बाळासाहेब थोरात हे सांभाळतात त्याचप्रमाणे डॉ.सुधीर तांबे हे तितक्याच हिरहिरीने दादांच्या सहकारी संस्था सुव्यवस्थित चालविण्यात व वाढविण्यात महत्वपूर्ण योगदान देत आहेत.

माजी.महसुलमंत्री बाळासाहेब भाऊसाहेब थोरात यांच्या अनुपस्थितीत त्यांच्या संस्थांची जबाबदारी ते व्यवस्थपणे पार पाडत आहेत. डॉ.सुधीर तांबे २००९ पासून पदवीधर मतदार संघ नाशिकमधून बहुमताने विजयी होऊन विधानसभा सदस्य म्हणून कार्यरत आहेत. अहमदनगर जिल्हयाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांचेही योगदान महत्वपूर्ण ठरत आहे. आमदार डॉ.सुधीर तांबे यांचे विविध क्षेत्रातील कार्य

१) शैक्षणिक : मुख्य विश्वस्त, मथुराबाई थोरात सेवाभावी ट्रस्ट संचालित अमृतवाहिनी संगमनेर.
२) चेअरमन : सहयाद्री बहुजन विद्या प्रसारक समाज संगमनेर.
३) संस्थापक : संग्राम करीअर ॲकेडमी
४) संस्थापक : मुकबधीर विद्यालय,वेल्हाळे.

**सामाजिक कार्य :-**

संस्थापक अध्यक्ष : जयहिंद लोकचळवळ, जयहिंद युवामंच, मुख्यप्रवर्तक जयहिंद सामुदायिक विवाहसोहळा,

कार्याध्यक्ष : अखिल भारतीय बाल आनंद महोत्सव अहमदनगर (२००५)

अध्यक्ष : सर्वांगिण आदिवासी व पाणलोट विकासक्षेत्र संस्था

राजकीय : माजी नगराध्यक्ष, संगमनेर नगरपालिका.

उपाध्यक्ष : अहमदनगर जिल्हा काँग्रेस कमिटी २००० ते २००१.

कार्याध्यक्ष : अहमदनगर जिल्हा काँग्रेस कमिटी २००१ ते २००५.

सदस्य : विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य, २००९ पासून

अशा विविध क्षेत्रातील कार्याच्या माध्यमातुन व भाऊसाहेबांच्या तत्वानुसार ते राजकिय, सामाजिक, सहकार, शैक्षणिक कार्याच्या माध्यमातुन अहमदनगर जिल्हयाच्या विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान महत्वपूर्ण ठरत आहे.[४७]

### ३.९.९ माजी महसुलमंत्री बाळासाहेब भाऊसाहेब थोरात :-

भाऊसाहेब थोरात व मथुराबाई या दाम्पत्यांना ७ फेब्रुवारी १९५३ रोजी पुत्र प्राप्ती झाली. मुलाचे नाव विजय ठेवले. घरातील सर्व लाडाने त्याला बाळ म्हणत असत. बाळचे पुढे बाळासाहेब नाव रुढ झाले. भाऊसाहेब शिस्तप्रिय असून शिक्षणाविषयी त्यांना आस्था होती. आपल्या मुलाचे माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन शिक्षण संगमनेर येथे पूर्ण केले. बाळासाहेबांचे बालपण जोर्वे येथे गेल्याने एकत्र कुटुंब असल्याने घराण्याचे संस्कार बालमनावर परिणाम करत होते. त्यांचे घराणे गावचे पाटील घराणे होते. घरातील लहानाथोरांच्या संस्कारातून ते घडले गेले असल्याने त्यांनाही सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील कार्याची आवड निर्माण होणे सहाजीकच आहे. त्यांचे माध्यमिक शिक्षण सर डि.एम.पेटीट हायस्कुल संगमनेर येथे तर महाविद्यालयीन शिक्षण संगमनेर महाविद्यालयात झाले. महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना बाळासाहेब शेतीकडेही लक्ष देत असत. दूध डेअरीमध्ये घालणे, तसेच शेतीची इतर बारीक सारीक कामे त्यांना करावे लागत असत. संगमनेर येथे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी फर्ग्युसन महाविद्यालय पुणे येथे एल.एल.बी.ला प्रवेश घेतला. वकीलीचे शिक्षण घेत असतांनाच पाणी पंचायतद्वारा पाणी प्रश्नावर सभा घेऊन जनजागृती केली.

तसेच विद्यार्थ्यांच्या फी माफीसाठी आंदोलन केले. एवढेच नव्हे तर १९८० साली विडी कामगारांच्या प्रश्नावर केलेल्या चळवळीमुळे त्यांना ९ दिवस विसापूर जेलमध्ये

कारावास भोगावा लागला. तसेच मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीतही ते सक्रीय होते. भाऊसाहेब थोरात सहकाराच्या माध्यमातुन जिल्हयाचा सर्वांगिण विकास साध्य करण्यात व्यस्त होते. भाऊसाहेबांचा सहकारातील पारदर्शी कारभार, शिस्त, गुणवत्ता, यातुन सहकाराचा नवा संगमनेर पॅटर्न उदयास आला. हे सर्व बाळासाहेब प्रत्यक्ष अनुभवत होते. तालुक्यातील सहकाराचे धोरण पुढे अहमदनगर जिल्हयाच्या विकासासाठी महत्वपूर्ण ठरले. बाळासाहेबांना वडीलांकडून सामाजिक, राजकीय, सहकार, अभ्यासूवृत्ती, मनमिळावुपणा, संघटन चातुर्य या गुणांची देणगी मिळाल्यानेच भाऊसाहेबांप्रमाणेच बाळासाहेबांनीही समाजापुढे एक वेगळे आदर्श निर्माण केले.

जोर्वे येथील लोकांच्या आग्रहास्तव १९८३ साली अमृतवाहिनी सहकारी दूध उत्पादक संस्था जोर्वे या संस्थेचे चेअरमन पदी बिनविरोध निवड झाली. आणि खऱ्या अर्थाने येथुनच बाळासाहेबांच्या राजकीय कार्याचा श्रीगणेशा झाला. भाऊसाहेबांच्या प्रत्येक सामाजिक, राजकीय कार्यात ते हिरहिरीने सहभागी होत असत. तालुक्यातील त्यांचा जनसंपर्क मोठया प्रमाणात वाढला होता. त्यात इ.स.१९८५ च्या विधानसभा निवडणूका जाहिर झाल्या असता तालुक्यातील जनतेच्या आग्रहास्तव विधानसभेसाठी अपक्ष म्हणून त्यांनी निवडणुक लढविली आणि जिंकलीही. महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेत सर्वात कमी वयाचा आमदार म्हणून ते ओळखले जात होते. असे असले तरी आपल्या कार्यकुशलतेने आज ते महाराष्ट्राच्या राजकारणातील एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून महाराष्ट्रातील जनता त्यांच्याकडे पाहत आहे. त्यांनी विविध खात्याचे मंत्रीपद भुषवत असताना त्या पदास एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

सन १९९९ पासून महाराष्ट्र राज्याच्या मंत्रीमंडळात विविध खाती सांभाळतांना प्रत्येक खात्याला न्याय देत त्या खात्याला लोकाभिमूख बनविले.

माजी महसुल मंत्री व विद्यमान आमदार बाळासाहेब थोरात यांनी मंत्रीपदी असताना कारभार पाहिलेली खाती.

**तक्ता क्रं.१**

| अ.नं. | वर्ष | पद | खाते |
|---|---|---|---|
| १. | १९८५ | विधानसभा सदस्य | --- |
| २. | १९९० | विधानसभा सदस्य | --- |

| अ. नं. | वर्ष | पद | खाते |
|---|---|---|---|
| ३. | १९९५ | विधानसभा सदस्य | --- |
| ४. | १९९९ | राज्यमंत्री | पाटबंधारे व लाभक्षेत्र विकास |
| ५. | २००३ | राज्यमंत्री फेरनिवड | पाटबंधारे व लाभक्षेत्र विकास |
| ६. | २००४ | कॅबिनेट मंत्री | कृषी, जलसंधारण व खार जमिनमंत्री |
| ७. | २००८ | कॅबिनेट मंत्री फेरनिवड | कृषी, जलसंधारण व, राजशिष्टाचार मंत्री |
| ८. | २००९ | कॅबिनेट मंत्री | कृषी,जलसंधारण,रोजगारहमी, शालेय शिक्षण |
| ९. | २०१० | कॅबिनेट मंत्री | महसुल व खार जमिन मंत्री |
| १०. | २०११ | कॅबिनेट मंत्री | महसूल व खारजमिन |
| ११. | २०१४ | विधानसभा सदस्य | |

विविध खात्याचे मंत्री असतांना ते पुढील जिल्हयाचे पालकमंत्री होते.

**तक्ता क्रं.२**

| अ.नं. | वर्ष | पद | पालकमंत्री व जिल्हा |
|---|---|---|---|
| १. | १९९९ | राज्यमंत्री | उस्मानबाद जिल्हा |
| २. | २००४ | कॅबिनेट मंत्री | लातुर जिल्हा |
| ३. | २००६ | कॅबिनेट मंत्री | लातुर,उस्मानाबाद जिल्हा |
| ४. | २००९ | कॅबिनेट मंत्री | नागपूर जिल्हा |
| ५. | २०११ | कॅबिनेट मंत्री | औरंगाबाद जिल्हा |

या जिल्हयाचे पालकमंत्री असतांना जिल्हयाच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने त्यांनी अनेक महत्वपूर्ण योजना राबविण्यात योगदान दिले. संगमनेर मतदार संघातुन सलग ७ पंचवार्षिक निवडणूकीत त्यांनी विजय मिळविला. १९९९ ते २०१४ पर्यंत महाराष्ट्र राज्याच्या मंत्रीमंडळात विविध खात्याचे मंत्री म्हणून काम पाहतांना त्या पदास एक वेगळे महत्व प्राप्त करुन दिले. महाराष्ट्राच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने आपल्या पदाचा उपयोग करत महत्वपूर्ण निर्णय घेतले.मंत्री पदाशिवाय त्यांनी इतरही पदे भूषविले आहेत.

**तक्ता क्रं.३**

| अ.नं. | वर्ष | पद | संस्था |
|---|---|---|---|
| १. | १९८८ | चेअरमन | राजहंस दूध संघ संगमनेर |
| २. | १९८८ | अध्यक्ष | महाराष्ट्र राज्य विडी कामगार वेतन समितीच्या अध्यक्ष पदावर शासनाकडून नियुक्ती |
| ३. | १९९३ | अध्यक्ष | सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना लि.संगमनेर |
| ४. | १९९४ | अध्यक्ष | सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना लि.संगमनेर |
| ५. | १९९९ | अध्यक्ष | सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना लि.संगमनेर |
| ६. | २००६ | कार्याध्यक्ष | महाराष्ट्र राज्य जलसंधारण सल्लागार परिषदेच्या कार्याध्यक्षपदी निवड |

अशी विविध पदे भूषवित असतांना त्यांनी त्या पदास एक वेगळे महत्व प्राप्त करुन दिले. त्यांच्या सहकारातील व विधनसभेतील कार्याची दखल घेत त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

२०१६ साली "कार्यक्षम आमदार" पुरस्कार नाशिक येथे समारंभपूर्वक प्राप्त. २०१७ सामाजिक व शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल दिला जाणारा"स्व.ॲड.रावसाहेब शिंदे स्मृती पुरस्कार" असे अनेक पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत. तसेच त्यांनी ज्या सहकारात अध्यक्ष म्हणून काम पाहिले त्या सहकारी संस्थांना देखील अनेक पुरस्कार मिळवुन देण्यात त्यांचे महत्वपूर्ण योगदान आहे. भाऊसाहेबांनी ज्या सहकाराचे बिजारोपण केले त्या सहकाराचे विशाल वटवृक्षात रुपांतर करण्याचे कार्य माजी महसुलमंत्री बाळासाहेब थोरात हे करत आहेत. अहमदनगर जिल्हयाच्या सामाजिक, राजकीय क्षेत्रातील त्यांचे योगदान महत्वपूर्ण ठरत आहे. अहमदनगर जिल्हयाच्या राजकारणात माजी महसुलमंत्री बाळासाहेब थोरात आणि माजी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातुन काँग्रेस पक्षाचे वर्चस्व टिकुन ठेवण्यात त्यांचे महत्वपूर्ण योगदान आहे. जिल्हयाचे संपूर्ण राजकारण या दोन माजी मंत्र्याच्या भोवती फिरत आहे.

बाळासाहेबांनी महाराष्ट्र राज्याचा कारभार पाहत असतांना देखील आपल्या कौटुंबिक जबाबदारीकडेही ते दुर्लक्ष करीत नाही. त्यांना शरयू, जयश्री, सविता, राजवर्धन ही ४ मुले असुन बाळासाहेब मुलांचे शिक्षणाकडे लक्ष देत असतात.

शरयू हिचे शिक्षण पूर्ण करुन तिचा विवाह अंभोरे येथील सुसंस्कृत विजयसिहं देशमुख घराण्यातील रणजितसिंह यांच्याबरोबर मोठया थाटामाटात करुन दिला. रणजितसिंह यांचे घराणे संस्कृत पाटील घराणे असल्याने त्यांनाही सामाजिक कार्याची आवड आहे. रणजीतसिंह देशमुख हे राजहंस दुध संघ संगमनेर या संस्थेचे अध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत. तर पत्नी शरयू आपल्या पतीच्या सामाजिक कार्यात त्यांना सहाय करत आहे.

शरयू अमृतवाहिनी शिक्षण संस्थेच्या संचालिक आहेत. याशिवाय त्या अमृतवाहिनी इंटननॅशनल स्कूलचा कारभार सांभाळतात. तसेच महिलांचे संघटन करणे, महिला अत्याचार निवारण करणे, महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणून बचतगट स्थापन करणे, महिलांना मार्गदर्शन करणे, महिलांसाठी व्याख्यानमालेचे आयोजन करणे, महिलांमध्ये बालहत्या बंदी विषयी जागृती करणे आदी सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातुन महिलांना सक्षम करण्यासाठी त्या महत्वपूर्ण योगदान देत आहेत.

सविता आर्कीटेक्ट इंजिनिअर आहे. तिचा विवाह अहमदाबाद येथील उदयोगपती सपनकुमार पारिक या उच्चशिक्षित मुलाबरोबर मोठया थाटामाटात करुन दिला. सपनकुमार हेही आर्किटेक्ट इंजिनिअर आहेत. सविता आपल्या पतीच्या कामात साहय करतात. याशिवाय सामाजिक कामाचीही त्यांना आवड असल्याने महिला सक्षमीकरण करण्यासाठी त्या जनजागृती करणे, महीलांचे संघटन करणे, महिलांना मार्गदर्शन करणे अशी सामाजिक कामे करत असतात.

जयश्री यांचे प्राथमिक शिक्षण संगमनेर येथे झाले. उच्च माध्यमिक शिक्षण पुणे येथे झाले पुढे त्यांनी भारती विद्यापीठात एम.बी.बी.एस. केले. डी.वाय.पाटील कॉलेज नवी मुंबई येथे एम.डी. पदवी प्राप्त केली. त्या सध्या टाटा रिसर्च सेंटर मुंबई येथे अनुभव घेत आहेत. त्या रुग्णसेवेच्या माध्यमातुन समाजाची सेवा करत आहेत.

## ३.१० राजवर्धन :-

राजवर्धन यांचे प्राथमिक शिक्षण, नाशिक, माध्यमिक शिक्षण पुणे, उच्च माध्यमिक शिक्षण मुंबई येथे पूर्ण झाल्यानंतर ते सध्या आर्किटेक्ट इजिनिंअरचे शिक्षण न्युयॉर्क येथे घेत आहे. राजवर्धन याना देखील आजोबा व वडीलाप्रमाणे सामाजिक कार्याची आवड आहे. शिक्षण घेत असतांना देखील ते आपले सामाजिक कार्य विविध माध्यमातून करत आहे. संगमनेर येथे असताना ते सातत्याने समाजाचा सर्वांगिण विकासासाठी देत असतात.त्यांना राजकारणाची विशेष आवड आहे. शिक्षणाबरोबरच ते आंतरराष्ट्रीय राजकारणाचा बारकाईने अभ्यास करत आहेत. वडीलांकडून राजकारण, सामाजिक, सहकाराचे जे शिक्षण मिळत आहे. त्यातुन सामाजिक कार्याकडे ते ओढले जात आहेत. ते संगमनेर येथे असतांना मुलांचे संघटन करुन विविध उपक्रम राबवत असतात.

**त्यांनी स्थापन केलेल्या संस्था :-**

१) राजवर्धन युथ फौंडेशन (२०१३), या माध्यमातून पुढील उपक्रम घेतले जातात.

   १) स्वच्छता अभियान

   २) क्रिकेट स्पर्धा

   ३) वृक्षारोपन

   ४) व्याख्याने.

विद्यार्थ्यांचे संघटन करुन असे विविध उपक्रम राबविले जातात.

२) डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम युवामंच स्थापना २०१६ साली केली. या युवामंचच्या माध्यमातुन पुढील उपक्रम राबविले जातात.

   १) गरीब विद्यार्थ्यांना पुस्तकांचे, वहयांचे वाटप करणे.

   २) विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबविणे.

   ३) विज्ञान प्रदर्शन भरविणे.

   ४) मेडिकल कॅम्पचे आयोजन करणे.

   ५) श्रमदान शिबीर घेणे.

   ६) मोफत स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन करणे.

   ७) आदीवासी मुलांच्या भेटी घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेणे यासाठी संस्थेच्या माध्यमातून साहय करणे.

८)  अपंग मुलांना सहाय्य करणे

असे विविध उपक्रम या मंचाच्या माध्यमातून राबविले जातात. शिक्षणाबरोबरच आपल्या वडिलाप्रमाणेच राजवर्धन सामाजिक कार्यातही सक्रीय असून तालुक्यातील तरुण मुलांना योग्य दिशा देण्याचे कार्य विविध युवा मंचच्या ग्रुपच्या माध्यमातुन ते करत आहे. त्यांचे हे कार्य म्हणजे आजोबा व वडिलांप्रमाणेच कुशल नेतृत्वाकडे वाटचाल करणारे आहे.[४८]

**३.९.११ भाऊसाहेब थोरात यांच्या सामाजिक कार्यात पत्नी मथुराबाईचे योगदान :-**

कोणत्याही यशस्वी पुरुषाच्या पाठीमागे एका स्त्रीचा हात असतो. या उक्तीप्रमाणे भाऊसाहेब थोरात यांच्या जीवनसाथी शोभेल अशाच मथुराबाई सदगुणी सहचारिणी त्यांना मिळाल्या. मथुराबाईच्या भक्कम साथीमुळेच भाऊसाहेब सामाजिक, राजकिय कार्यात आपले योगदान देऊ शकले.

पतीच्या प्रत्येक कार्यात हवे ते सहकार्य मथुराबाई वेळोवेळी देत असत.स्वत:चे वेगळे अस्तीत्व त्या कधी मानतच नव्हत्या. आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण मथुराबाईंनी पतीसाठी, कुटुंबासाठी व समाजासाठी कारणी लावले. स्वतःच्या आवडीनिवडी,सुख स्वास्थ्य याकडे त्यांनी कधी लक्ष दिले नाही. अहोरात्र इतरांसाठी कष्ट करत राहणे, झिजत राहणे हेच त्यांच्या जीवनाचे अविभाज्य अंग बनले. सदैव पडद्यामागे राहून मथुराबाईंनी पतीच्या कार्याला अगदी निरपेक्ष साथ दिली. जीवनात भाऊसाहेबांना अनेक गौरव,पुरस्कार मिळाले, सत्कार झाले. भाऊसाहेबांच्या गौरवाने मथुराबाई सुखावल्या,सत्काराच्या हारतुऱ्यांनी मथुराबाई आनंदी होत होत्या. भाऊसाहेबांच्या प्रत्येक यशाचा मथुराबाईंना अभिमान होता. परंतु त्यांनी त्या अभिमानाचे कधी अहंकारात रुपांतर होऊ दिले नाही. भाऊसाहेबांच्या वाटचालीत मथुराबाईंच्या त्यागमय जीवनाचे मोल खूप मोठे आहे. केवळ पतीसाठीच नव्हे तर पाहुणे, मित्रमंडळी, समाजसेवक, गरीब वर्ग, कष्टकरी, कामकरी, अशा सर्वांना आपुलकीने जवळ केले. कुणाला काय हवे ते देण्याचा प्रयत्न केला. सर्वांसाठी चंदनाप्रमाणे झिजणाऱ्या मथुराबाई खऱ्या अर्थाने भाऊसाहेबांच्या सहचारिणी होत्या. मथुराबाई भाऊसाहेबांची वृध्दपकाळातही अत्यंत काळजी घेत असत. मथुराबाई भाऊसाहेबांच्या सामाजिक, राजकिय, देशसेवेच्या कार्यात प्रत्यक्ष सहभागी नसल्या तरी अप्रत्यक्षपणे त्यांनी पतीला दिलेली साथ हे देशसेवेपेक्षा मोठे अग्नीदिव्य मथुराबाईंनी पेलले. त्यामुळे

भाऊसाहेबांचे जीवन सार्थक झाले. पत्नीच्या साथीचे भाऊसाहेब जीवनाच्या अंतापर्यंत कौतुक करत होते.[४९]

### ३.९.१२ वृध्दापकाळ आणि मृत्यु :-

'हेल्थ इज वेल्थ' या उक्तीप्रमाणे भाऊसाहेबांनी विद्यार्थी दशेपासूनच निर्व्यसनी, नियमित व्यायाम, या तत्वाचा अंगिकार केल्याने त्यांना उत्तम आरोग्य लाभले होते. विद्यार्थी असतांना वयाच्या अठराव्या वर्षी स्वातंत्र्य लढयात सामील झाले. तसेच स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जिल्हयात रुजविलेल्या सहकार रोपटयाची ते शेवटच्या क्षणापर्यंत काळजी घेत होते. प्रत्येक सहकारी संस्थांना वेळोवेळी भेटी देऊन त्याची माहिती घेणे हे भाऊसाहेबाचे नित्याचे कार्य होते.वृध्दापकाळातही सकाळी उठल्यानंतर त्याचे हे कार्य सुरु होत असे. दुपारी जेवण, विश्रांती घेत असत. दुपारनंतर पुन्हा कामानिमित्त, कार्यक्रमानिमित्त त्यांची भ्रंमती सुरु होत असे. वाचनाचा त्यांचा व्यासंग दांडगा होता. कोणाचा विश्वास बसणार नाही इतक्या निरनिराळया तऱ्हेचे वाचन ते करत असत. भीमसेनची डायरी, बखरी, किसिंजरची डायरी, विविध वृत्तपत्रे, अंक, पु.ल. चे समग्र साहित्य, दांडेकरांचे स्मरणगाथा, दलित साहित्य, मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे, एक होता कार्व्हर इ.सर्व प्रकारच्या साहित्याचे वाचन भाऊसाहेब करीत असत. एवढेच नव्हे तर नाटके, कथाकथन, क्रिकेट, जलतरण स्पर्धा आदि कार्यक्रमही ते आवडीने पाहत असत. भाऊसाहेबांचे व्यक्तीमत्व सर्वगुण संपन्न होते.[५०]

जॉ जिओनो या फ्रेंच लेखकाने लिहिलेल्या 'झाडे लावणारा माणूस' हे पुस्तक भाऊसाहेबांनी वाचले. एका मेंढपाळाने आल्प्सच्या वैराण, निर्जन प्रदेशात एकटयाने नंदनवन फुलविले.[५१] हे पुस्तक वाचून वयाच्या ७३ व्या वर्षीही जिद्दी भाऊसाहेबांनी जिल्हयात नंदनवन फलविण्याचे ठरविले. आपल्या कार्याची सुरुवात भाऊसाहेबांनी संगमनेर तालुक्यापासून केली. भाऊसाहेबांचा वृध्दपकाळ आनंदात गेला. देवाने जन्माला घातलेल्या प्रत्येक सजीवाला एक दिवस जगाचा निरोप घ्यावा लागतो. त्यास भाऊसाहेब थोरात कसे अपवाद असणार.सहकारातील या दिपस्तंभाचे वृध्दापकाळाने रविवार दि.१४/०३/२०१० रोजी संगमनेर येथे दुःखद निधन झाले. या घटनेने सारा जिल्हा शोकाकुल झाला. अंत्यविधीस महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील, वनमंत्री पतंगराव कदम, पद्मश्री बाळासाहेब विखे पाटील, ग्रामविकास मंत्री जयंत पाटील, जिल्हयाचे पालकमंत्री व आदिवासी विकास मंत्री बबनराव पाचपुते, खासदार गोविंदराव आदिक, आमदार मधुकरराव पिचड, खासदार दिलीप गांधी, खासदार भाऊसाहेब वाकचौरे,

आमदार दिलीपराव देशमुख, ॲड.रावसाहेब शिंदे, माजी मंत्री बी.जे. खताळ पाटील, आदी राजकिय नेते तसेच महाराष्ट्रातील विविध सहकारी सामाजिक संस्थाचे अधिकारी, भाऊसाहेबांचे चाहते तसेच जिल्हयातील सर्व सहकारी संस्थांचे अधिकारी, सामाजिक, राजकिय क्षेत्रातील मान्यवर तसेच जिल्हयातील लोक मोठया संख्येने सहकरातील दिपस्तंभाचे अंतिम दर्शन घेण्यासाठी उपस्थित होते. मोठया जनसागराच्या उपस्थितीत सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात सहकारी साखर कारखान्याच्या भव्य प्रांगणात या सहकार महर्षीना अश्रुनयनांनी अखेरचा निरोप देतांना सर्वांचे अश्रू अनावर झाले होते.

भाऊसाहेबांचे पंचक्रियाविधी गुरुवार दिनांक १८/०३/२०१० रोजी सकाळी ८.३० वाजता प्रवरातिरी त्यांच्या जन्मगावी दत्त मंदिराच्या प्रांगणात पार पडला. भाऊसाहेबांच्या जाण्याने जिल्हयातील सहकार नेतृत्व हरपल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. भाऊसाहेबांच्या सहकरातील या वटवृक्षाची जोपासना पुत्र आमदार बाळासाहेब थोरात त्यांच्याप्रमाणेच करत आहे. तसेच भाऊसाहेबांच्या मुलींनीही आपल्या वडिलाप्रमाणे सामाजिक कार्याचा वारसा जोपासला आहे.[५२]

## ३.१० उपसंहार :-

प्रस्तुत प्रकरणात भाऊसाहेबांचे जीवन व कार्य मांडत असताना जन्म, बालपण, शिक्षण असे प्रारंभिक जीवनकार्य देऊन स्वातंत्र्य आंदोलनातील भाऊसाहेबांचा सहभाग या विषयी थोडक्यात माहिती देऊन स्वातंत्र्योत्तर काळातील त्यांच्या कार्याचा गोषवारा देतांना सहकाराच्या माध्यमातून संगमनेर तालुका,अहमदनगर जिल्हा आणि महाराष्ट्र राज्यात केलेले राजकारण त्यामाध्यमातून अहमदनगर जिल्हयाच्या विकासात दिलेले योगदान मांडण्याचा प्रयत्न केला आहे.इ.स.१९५२ साली सहकार तत्वाचा स्विकार करुन सहकाराच्या माध्यमातून ते जिल्हयाचा विकास करण्याच्या ध्येयाने शेवटपर्यंत कार्य करत होते. संगमनेर तालुक्यात गाव तेथे सहकारी सोसायटी स्थापन करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. तालुक्याप्रमाणेच अहमदनगर जिल्हयातही सहकार वाढविण्यात त्यांनी बहुमोल योगदान दिले आहे. अहमदनगर जिल्हा बँकेच्या माध्यमातुन व महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयात सहकार वाढविण्यात भाऊसाहेबांनी महत्वपूर्ण योगदान दिले.

असे हे सहकारातील दिपस्तंभ सहकारमहर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांचा वृध्दपकाळ आनंदी गेला आहे. वृध्दपकाळात वयाच्या ८७ व्या वर्षी दिनांक १४/०३/२०१०

रोजी संगमनेर येथे दु:खदनिधन झाले आणि संपूर्ण जिल्हयात शोककळा पसरली. भाऊसाहेबांच्या जाण्याने जिल्हा एका सहकारमहर्षींना मुकला. अशा भावना आजही सर्वत्र व्यक्त होत आहे. या सहकार महर्षीचे कार्य शतकानुशतके सर्वांना प्रेरणा देणारे असल्यानेच मी माझ्या पीएच.डी.संशोधनाकरीता "सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या विकासातील योगदान (१९२४ ते २०१०)" या विषयाची निवड केली आहे.

*****

**संदर्भग्रंथ :-**


१) मुलाखत : आमदार थोरात बाळासाहेब भाऊसाहेब, संगमनेर,दि.१०/०७/२०१५.

२) थोरात भाऊसाहेब 'अमृतमंथन' प्रकाशक - लाटकर उल्हास, चितांमणी प्रकाशन, अमेय प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती ११ जाने.१९९९, पृ.क्रं.७

३) कित्ता - पृ.क्रं.९,१०

४) कित्ता - पृ.क्रं.१०,११

५) कित्ता- पृ.क्रं.२१

६) कित्ता - पृ.क्रं.२४,२५

७) शिंदे ॲड.रावसाहेब- 'शिक्षण आणि समाज' प्रकाशक - लाटकर उलहास चिंतामणी प्रकाशन - अमेय प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, ऑ.२००१, पृ.क्रं.६६

८) थोरात भाऊसाहेब 'अमृतमंथन' पूर्वोक्त क्रं.१, पृ.क्रं.१९,२०,२१.

९) कित्ता - पृ.क्रं.४४,४५.

१०) कित्ता - पृ.क्रं.५२,५३

११) कित्ता - पृ.क्रं.५७,५८

१२) कित्ता - पृ.क्रं.६४,६५.

१३) शिंदे ॲड.रावसाहेब 'शिक्षण आणि समाज' प्रकाशक, लाटकर उल्हास चिंतामणी, प्रकाशन, अमेय प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, १३ जाने. २००५, पृ.क्रं.७८.

१४) कडू पी.बी. - 'क्रांती पंढरीचा वारकरी' - प्रकाशक- कडू अरुण पुंजाजी, प्रकाशन, जिनिअस प्रिंटर्स, प्रा.लि.मुंबई, द्वितीयावृत्ती, सप्टे, २००४, पृ.क्रं.१९

१५) प्रबंध, राठोड हेमलता अरविंद, पीएच.डी. प्रबंध, सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात- व्यक्ती व कार्य, राजकारणातील व सहकारातील योगदान, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, वर्ष २००९, पृ.क्रं.३९.

१६) कित्ता - पृ.क्र.१३७,१३८

१७) शिंदे ॲड.रावसाहेब - 'चरित्र आणि चारित्र्य' प्रकाशक- लाटकर उल्हास चिंतामणी, प्रकाशन -अमेय प्रकाशन पुणे, द्वितीयावृत्ती, ऑ.२००१, पृ.क्रं.१३४,१३५.

१८) थोरात भाऊसाहेब 'अमृतमंथन' लाटकर उल्हास चिंतामणी, प्रकाशन-अमेय प्रकाशन पुणे, द्वितीयावृत्ती, जुलै २००२, पृ.क्रं.१,६

१९) पवार डॉ.जयसिंगराव - 'हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास' प्रकाशक - सौ.भाग्यश्री मोरेश्वर फडके प्रकाशन अथर्व अपार्टमेंट फ्लॅट नंबर १० दुधाळी कोल्हापूर, सातवी आवृत्ती, नोव्हे. २००५, पृ.क्रं.१७.

२०) केतकर कुमार - "कथा स्वातंत्र्याची" प्रकाशक श्री. राठोड एन.के., प्रकाशन महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे प्रथमावृत्ती पृ.क्रं.१५०.

२१) पवार जयसिंगराव - पुर्वोक्त क्रं.१९, पृ.क्रं.५१,५२

२२) कोठेकर डॉ.शांता, वैद्य डॉ.सूमन - 'आधुनिक भारताचा इतिहास' प्रकाशिका ललिता पुराणिक प्रकाशन श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, सहावी आवृत्ती २००९, पृ.क्रं.१,२

२३) शिंदे ॲड. रावसाहेब पूर्वाक्त क्रं.१७, पृ.क्रं.१२८,१२९

२४) थोरात भाऊसाहेब 'अमृतमंथन' पूर्वोक्त क्रं.२ पृ.क्रं.५२,५३

२५) कित्ता - पृ.क्रं.५८,५९

२६) कित्ता - पृ.क्रं.६६

२७) कित्ता - पृ.क्रं.७०

२८) कित्ता - पृ.क्रं.७२

२९) सोनवणे दिंगबर जनार्दन, एम.फिल.प्रबंध, अहमदनगर जिल्हयातील थोर स्वातंत्र्य सेनानी सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांचे स्वातंत्र्य संग्रामातील योगदान.

३०) पवार जयसिंगराव 'हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास', प्रकाशक - सौं.भाग्यश्री मोरेश्वर फडके प्रकाशन अथर्व अपार्टमेंट फ्लॅट नंबर १०, दुधाळी कोल्हापूर, सातवी आवृत्ती नोव्हें.२००५, पृ.क्रं.२४.

३१) कित्ता - पृ.क्रं.२४४

३२) प्रधान ग.प्र. 'स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत' प्रकाशक - साधना प्रकाशन-प्रकाशन - साधना, प्रकाशन, पुणे, चौथी, आवृत्ती ११ जुन २००४, पृ.क्रं.३११, ३१२.

३३) शिंदे ॲड.रावसाहेब 'ध्यासपर्व' प्रकाशक - लाटकर उल्हास चिंतामणी, प्रकाशन - अमेय प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती १३ जाने. २००५, पृ.क्रं.६०

३४) थोरात भाऊसाहेब 'अमृतमंथन' पुर्वोक्त क्रं.२, पृ.क्रं.८१, ८२.

३५) कडू पी.बी. क्रांती पंढरीचा वारकरी, पूर्वोक्त क्रं.१४, पृ.क्रं.४१,४२.

३६) कोठेकर डॉ.शाता वैद्य डॉ.सुमन - आधुनिक भारताचा इतिहास पूर्वोक्त क्रं.२५, पृ.क्रं.१०९, ११०.

३७) थोरात भाऊसाहेब 'अमृतमंथन' पुवोक्त क्रं.२, पृ.क्रं.८२,८३.

३८) कित्ता - पृ.क्रं.८४,८५

३९) कडू पी.बी. - क्रांती पंढरीचा वारकरी, पूर्वोक्त क्रं.१४, पृ.क्रं.३९,४०

४०) थोरात भाऊसाहेब 'अमृतमंथन' पूर्वोक्त क्रं.२, पृ.क्रं.११०,१११,११२

४१) कित्ता - पृ.क्रं.१३, १४, १५

४२) कित्ता - पृ.क्रं.१२५,१२६

४३) थोरात भाऊसाहेब 'अमृतमंथन' प्रकाशक - लाटकर उल्हास चिंतामणी, प्रकाशक, अमेय प्रकाशन पुणे, तृतीयावृत्ती, ११ जाने १९९९, पृ.क्रं.२४०, २४१.

४४) थोरात भाऊसाहेब 'अमृतमंथन' पूर्वोक्त क्रं.२, पृ.क्रं.१२९,१३०,१३१.

४५) मुलाखत - थोरात पंडित संतुजी, मु.पो.जोर्वे,ता.संगमनेर,दि.०७/०८/२०१५.

४६) मुलाखत -तांबे दुर्गाताई सुधीर - संगमनेर, दि.२५/०८/२०१५.

४७) मुलाखत - तांबे सुधिर भास्कर, मु.पो.संगमनेर,ता.संगमनेर,दि.२९/०९/२०१५.

४८) मुलाखत - आमदार थोरात बाळासाहेब भाऊसाहेब, संगमनेर, दि.०३/०९/२०१५.

४९) मुलाखत-थोरात पंडित संतुजी, मु.पो.जोर्वे, ता.संगमनेर, जि.अहमदनगर, दि.१०/०९/२०१५.

५०) शिंदे ॲड.रावसाहेब, 'चरित्र आणि चारित्र्य' पूर्वोक्त क्रं.१७, पृ.क्रं.१३८.

५१) जिओनो जॉ.'झाडे लावणारा माणूस' अनु.माधुरी पुरंदरे, प्रकाशक दिलीप माझगावकर, प्रकाशन, राजहंस प्रकाशन, सदाशिवपेठ, पुणे, तृतीयावृत्ती, ऑक्टो. २००५, पृ.क्रं.६,७

५२) दैनिक सार्वमत, दि.१६ मार्च २०१०, मंगळवार पृ.क्रं.२

*****

# प्रकरण : चौथे

# भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या राजकीय विकासातील योगदान

## प्रकरण चौथे

# भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या राजकीय विकासातील योगदान

**प्रास्ताविक :-**

४.१ भाऊसाहेब थोरात यांचे विद्यार्थी दशेतील कार्य, संघटना व चळवळी

४.२ स्वातंत्र्यपूर्व काळातील राजकिय परिस्थिती आणि भाऊसाहेब थोरात यांचे योगदान

४.३ भाऊसाहेब थोरात यांचे कम्युनिस्ट पक्षांतर्गत कार्य.

४.४ टिटवाळा परिषद आणि भाऊसाहेब थोरात यांचे योगदान

४.५ अहमदनगर जिल्हयातील कम्युनिस्ट पक्षाच्या परिषदांतील भाऊसाहेब थोरात यांची भूमिका

४.६ भाऊसाहेबांचे थोरात यांचे 'स्थानिक स्वराज्य' संस्थेतील राजकिय कार्य.

४.७ भाऊसाहेब थोरात यांचे विधानसभेतील कार्य.

४.८ उपसंहार

संदर्भ

*****

# प्रकरण ४ थे

# भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या राजकीय विकासातील योगदान

## प्रास्ताविक :-

भाऊसाहेबांनी विद्यार्थी दशेत भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग घेऊन ज्या प्रमाणे स्वातंत्र्य पूर्वकाळात राजकीय क्षेत्रात योगदान दिले. त्याचप्रमाणे स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या जन्मभूमी असलेल्या जोर्वे गावांपासुन राजकीय क्षेत्रात प्रारंभ करुन संगमनेर तालुक्याच्या राजकीय क्षेत्रात आपला वेगळा प्रभाव निर्माण करुन अहमदनगर जिल्हयाच्या राजकीय विकासात सहकार चळवळीच्या माध्यमातून योगदान दिले आहे. त्यावर या प्रकरणात मी प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करणार आहे.

## ४.१ भाऊसाहेब थोरात यांचे विद्यार्थी दशेतील कार्य, संघटना व चळवळी :-

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील सहभागी स्वातंत्र्य सैनिकांनी ओळखले की, संघर्षाविना आणि रक्त सांडल्याविना कोणालाही स्वातंत्र्य मिळाले नाही. प्रत्येक गोष्टींचे विशिष्ट मोल असते. तसेच स्वातंत्र्याची किंमत रक्त आहे. त्यासाठी डोक्याला कफन बांधले पाहीजे. अशी आक्रमक भूमिका क्रांतिकारकांनी घेऊन ब्रिटिश सरकारविरोधी संघर्षसत्र सुरु केले. त्यात महाराष्ट्र राज्य आघाडीवर होते. या महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर जिल्हा स्वातंत्र्य आंदोलनात आघाडीवर होता. या जिल्हयातील अनेक तरुण स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी होते. त्यात चंद्रभान आठरे, रावसाहेब पटवर्धन, अच्युतराव पटवर्धन, दादा चौधरी, न.न. सथ्था, काशिनाथ, पंत भालेराव, निसाळ गुरुजी, केशवराव, देशमुख, ंरामकृष्ण महाराज, भैय्यासाहेब कुलकर्णी, बुवासाहेब नवले, दत्ता देशमुख, बाळासाहेब भारदे, बाळासाहेब नागवडे, के.बी.देशमुख, बी.जे.खताळ, बाबुराव तनपुरे, प्रभाकर भापकर, भास्करराव औटी, वकिलराव लंघे, ए.एल. भागवत, दादापाटील राजळे, भास्करराव दूर्वे नाना, धर्मा पोखरकर, अण्णासाहेब शिंदे, बाबासाहेब ठुबे, पी.बी.कडू, भाऊसाहेब थोरात वगैरेचा समावेश होता. या स्वातंत्र्य सेनानीपैकी अनेक विद्यार्थी होते. स्वातंत्र्य आंदोलनातील अनेक घटनातुन प्रेरणा घेऊन त्यांनी विद्यार्थी दशेत स्वातंत्र्य आंदोलनात झोकुन दिले होते. या विद्यार्थ्यांपैकीच एक भाऊसाहेब थोरात होते.

भाऊसाहेबांचे वेगळे वैशिष्टय म्हणजे त्यांच्यामध्ये नेतृत्वगुण होते. त्यांचे घराणे पाटील असल्याने सामाजिक कार्य, संघटन कौशल्य, पुढाकार हे गुणही त्यांना आपल्या घराण्यातून मिळाले. त्यांमुळेच विद्यार्थी असतानाच ते स्वातंत्र्य चळवळीकडे आकर्षित होणे स्वभाविकच होते. संगमनेर येथे शिक्षण घेत असताना १९४२ ची चलेजाव चळवळ सुरु झाली असता येथुनच खऱ्या अर्थाने भाऊसाहेबांच्या स्वातंत्र्य चळवळीतील कार्यास प्रारंभ झाला ते देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत म्हणजे १९४७ पर्यंत हे सक्रिय होते. १९४२ च्या स्वातंत्र्य लढयात त्यांच्या वर्गमित्रांनी व त्यांनी अहमदनगर जिल्हयात या चळवळीस प्रखर स्वरुप प्राप्त करुन दिले. ब्रिटीश सरकार विरोधी आक्रमक धोरणाचा अवलंब केला. एवढेच नव्हे तर भाऊसाहेब हे उत्तम संघटक होते. त्यांनी जिल्हयात गुप्त प्रचार मोहिम राबवून जिल्हयातील स्वातंत्र्य सौनिकांचे संघटन घडवुन आणले. १९४२ च्या चळवळीत त्यांच्यासह जिल्हयातील अनेकांना अटक झाली. सुटकेनंतर भाऊसाहेबांसह अनेक स्वातंत्र्य सैनिक कम्युनिस्ट विचाराने प्रभावीत होऊन कार्य करत होती. भाऊसाहेबही देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत व त्यानंतरही सावकारशाही, कामगार, शेतकरी यांच्यासाठी कम्युनिस्ट विचाराने प्रभावीत होऊन १९५२ पर्यंत कार्य करत होते. १९५२ पर्यंत त्यांचा कम्युनिस्ट काळ होता. तर १९५२ साली त्यांनी सहकार व्रताचा स्विकार करुन सहकाराच्या माध्यमातून जिल्हयाच्या विकासात महत्वपूर्ण योगदान दिले. सहकार हाच ध्येय आणि सहकार हाच श्वास मानून ते २०१० पर्यंत जीवनाच्या शेवटपर्यंत सहकारात सक्रिय होते. तसेच १४ जानेवारी १९६२ रोजी संगमनेर येथे यशवंतराव चव्हाण यांची सभा होती. यशवंतरावाच्या उपस्थितीत भाऊसाहेबांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. आणि येथुनच खऱ्या अर्थाने त्यांच्या राजकिय जीवनाचा प्रारंभ झाला ते शेवटपर्यंत कॉग्रेसपक्षाशी एकनिष्ठ राहिले. त्यांचा काँग्रेस पक्षातील कालखंड हा १९६२ ते २०१० असा आहे.

ज्याप्रमाणे राष्ट्रीय काँग्रेसचे तीन कालखंडात विभाजन झाले आहे त्याच प्रमाणे भाऊसाहेब थोरात यांच्या कार्याचे तीन कालखंडात विभाजन झाले आहे.

१) विद्यार्थी दशेपासून ते १९५२ पर्यंत : कम्युनिस्ट
२) १९५२ ते २०१० : सहकार
३) १९६२ ला काँग्रेस प्रवेश ते २०१० : काँग्रेस अंतर्गत राजकारण

### ४.१.१ भाऊसाहेब थोरात यांना मिळालेली स्वातंत्र्य चळवळीची प्रेरणा :-

इ.स.१९२० साली लोकमान्य टिळकांच्या निधनाने राष्ट्रीय काँग्रेसच्या दुसऱ्या कालखंडाची समाप्ती होऊन राष्ट्रीय काँग्रेसच्या तिसऱ्या कालखंडाचे नेतृत्व म.गांधीजींकडे आले. त्यापूर्वी ब्रिटिश सरकारचे रौलेट ॲक्ट धोरण, जालियनवाला बाग हत्याकांडातील भूमिका या घटनातून म.गांधीजी संतप्त झाले.गांधीजींनी ब्रिटिश सरकार विरोधी १ ऑ.१९२० रोजी अहसकार चळवळीस प्रारंभ केला. अनेक राष्ट्रीय नेत्यांनी पदव्या मान सन्मानांचा त्याग करत आंदोलनात सहभागी झाले. परकिय मालावर बहिष्कार टाकण्यात आला. गांधीजीच्या नेतृत्वाखाली चालणाऱ्या या जनआंदोलनास ५ फेब्रुवारी १९२२ रोजी उत्तर प्रदेशातील चौरीचौरा संघटनेने हिंसक वळण लागल्याने १२ फेब्रुवारी १९२२ रोजी गांधीजींनी असहकार चळवळ स्थगित केली.[१]

असहकार चळवळ स्थगितीनंतर गांधीजींनी सविनय कायदेभंग चळवळीअंतर्गत विविध चळवळी घडवुन आणल्या. त्यात १२ मार्च १९३० च्या मिठाच्या सत्याग्रहाचे नेतृत्व गांधीजींनी केले. दांडी प्रमाणेच देशभर सत्याग्रह झाले. परंतु पावसाळा जवळ आल्याने समुद्रावरील सत्याग्रह बंद होणार असल्याने गांधीजीनी २२ मे १९३० रोजी महाराष्ट्रातील जनतेला सागराकडून जंगलाकडे दृष्टी वळविण्याची विनंती केली.[२]

म.गांधीजींनी या गर्जनेनंतर महाराष्ट्रातील कायदेभंग चळवळीचे कार्यकर्ते त्याचप्रमाणे अहमदनगर जिल्हयातील स्वातंत्र्य संग्रामातील सहभागी गटांनी जंगल सत्याग्रहाचा प्रचार, प्रसार संपूर्ण जिल्हयात खेडोपाडी केला. जंगल सत्याग्रहाने जिल्हा जागृत झाला. १२ जुलै १९३० या दिवशी अहमदनगर जिल्हयातील संगमनेर, अकोले, राजुर, समशेरपूर, चंदनापूरी, शेवगाव, नेवासा, जामखेड, पाथर्डी, कर्जत, पारनेर, श्रीरामपूर आदी ठिकाणी जंगल कायदयाचा भंग करण्यासाठी लोक जंगलात शिरले आणि सत्याग्रहींनी राखीव जंगलातील गवत कापून ते आपल्या जनावराला खाऊ घातले.[३]

**तळ टिप: असहकार :**ब्रिटीश सरकारच्या अन्याय अत्याचारा विरोधी लढा देतांना महात्मा गांधीजींनी कोणतेही शस्त्र हाती न घेता अहिंसक मार्गाने सुरु केलेला लढा म्हणजे असहकार चळवळ होय.

**तळ टिप : सविनय कायदेभंग :** सविनय कायदेभंग म्हणजे घटनात्मकरित्या मंजुर झालेल्या पण नितीशी संबध नसलेल्या कायद्याचा भंग, त्यायोगे प्रतिकार करणाराची शिष्टचार युक्त म्हणजेच अहिंसक बंडखोरी दर्शविली जाते.

अहमदनगर जिल्हयातील जंगल सत्याग्रहाचे लोणनंतर नाशिक, सातारा, ठाणे, पुणे, जिल्हयातही मोठया प्रमाणात प्रसार झाला. जंगल सत्याग्रहाची ही चळवळ पुढे दोन तीन महिने चालू राहिली.[४]

सविनय कायदेभंग चळवळीचा एक भाग म्हणून परदेशी कापडावरील बहिष्कार हा एक भाग होता. मुंबईतील स्वयंसेवकांनी परदेशी कापडाच्या ट्रक्सना दुकानापर्यंत जाऊ दयायचे नाही. असा निर्धार केला असता हुतात्मा बाबु गेनू यांनी १२ डिसेंबर १९३० रोजी मुंबईच्या काळबादेवी रोड या भागातून परदेशी कापडाचा ट्रक जात असतांना बाबु गेनू हा तरुण कामगार ट्रकपुढे जाऊन आडवा पडला आणि ट्रकपुढे जाऊ न देण्याचा निर्धर बोलून दाखविला असता खवळलेल्या पोलिस अधिकाऱ्याच्या हुकूमावरुन ट्रक बाबु गेनूच्या अंगावर घातला. रक्ताच्या चिळकांडया उडाल्या. या घटनेचे लोण संपूर्ण महाराष्ट्रात पसरले.[५]

इ.स.१९३० च्या स्वातंत्र्य आंदोलनात भारतीय महिलांनीही अलौकिक कामगिरी करुन दाखविली. महिलांनी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात महत्वपूर्ण जागृती करुन महिलांचे संघटन घडवुन आणले. सुशिक्षित महिला ब्रिटिशांच्या अन्यायाविरुध्द पेटून उठल्या होत्या. मुंबईतील व्ही.टी.स्टेशन जवळच्या मैदानात महिलांनी मिरवणूक काढुन 'भारत माता की जय' अशा घोषणा देत असतांना पोलिसांनी हाती 'राष्ट्र ध्वज' घेतलेल्या महिलांच्या हातावर दंडूक्याचे तडाखे हाणले. तरीही 'राष्ट्रध्वज' न सोडता रक्तबंबाळ अवस्थेतही महिला 'भारत माता की जय' अशा घोषणा देतच होत्या.[६]

**भाऊसाहेबांना खालील घटनातुन स्वातंत्र्य चळवळीची प्रेरणा मिळाली :-**

१) वर्ग शिक्षकांनी स्वातंत्र्य चळवळी संदर्भात सांगितलेल्या विविध घटना भाऊसाहेब वर्गात ऐकत असत. त्यातुनच त्यांच्या मनावर विलक्षण परिणाम होऊन ते राष्ट्रवादी विचाराकडे आकर्षित होऊ लागले.

२) भाऊसाहेब बेलापूर येथे त्यांचे चुलते दामोदर नानांकडे राहुन शिक्षण घेत असतांना नाना ज्या महाराष्ट्र शुगरमिल मध्ये कामाला होते त्या मिलचे मालक डाहाणूकर राष्ट्रवादी विचाराचे होते. ते कारखान्यातील कामगारांसाठी व्याख्याने आयोजित करत. व्याख्यानाचे विषय राष्ट्रवादी चळवळ आणि भारताचे स्वातंत्र्य हे असत. एक वर्षी अच्युराव पटवर्धन व पा.वा. गाडगीळ यांची व्याख्याने ऐकण्याची संधी त्यांना मिळाली. त्यांच्या राष्ट्रवादी विचारांनी भाऊसाहेबांना प्रेरणा मिळाली.[७]

३) पंडित नेहरुंच्या भाषणाने मिळालेली स्वातंत्र्य चळवळीची प्रेरणा - पंडित नेहरु विधानसभेच्या निवडणूक प्रचारासाठी अहमदनगर जिल्हयाच्या दौऱ्यावर असतांना बेलापूर येथे त्यांची सभा होती. ती ऐकण्यांची संधी भाऊसाहेबांना मिळाली. पंडित नेहरुंच्या राष्ट्रवादी विचारांनी त्यांना प्रेरणा मिळाली.[८]

४) अण्णासाहेब शिंदे यांनी आयोजित केलेल्या व्याख्यानातून भाऊसाहेबांना स्वातंत्र्य चळवळीची प्रेरणा मिळाली. भाऊसाहेब वडगावपान येथे शाळेत असतांना कोल्हेवाडी येथे मामांकडे राहुन वडगावापानला शाळेत जात असत. आण्णसाहेबांची आत्या ही भाऊसाहेबांची मामी होती. तेही आपल्या आत्याकडे राहुन संगमनेर येथील सर डी.एम. पेटीट हायस्कुलमध्ये शिक्षण घेत होते. आण्णासाहेब व त्यांचे मित्र विविध व्याख्यानाचे आयोजन करत असत. एकदा असेच आण्णासाहेबांनी रावसाहेब पटवर्धन यांच्या व्याख्यानास भाऊसाहेबांना नेले.रावसाहेब पटवर्धन यांच्या राष्ट्रवादी विचारांनी भाऊसाहेबांना प्रेरणा मिळाली.[९]

अशा विविध घटना व विचारांचा प्रभाव भाऊसाहेबांवर पडल्याने स्वातंत्र्य चळवळीची प्रेरणा त्यांना त्यातुन मिळाली होती. त्या प्रेरणेतुन संगमनेर येथे शिक्षण घेत असतांना भास्करराव दुर्वे नाना यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या राष्ट्रसेवा दलात ते सहभागी झाले होते.[१०]

**४.१.२ भाऊसाहेबांचा राष्ट्रसेवा दलातील सहभाग :-**

भाऊसाहेबांनी संगमनेर येथील सर डी.एम. पेटीट हायस्कूलमध्ये इंग्रजी पाचवीस प्रवेश घेतला. राहण्याची व्यवस्था के.बी. दादा देशमुख यांनी सुरु केलेल्या वसतीगृहात केली होती. याच वसतीगृहात रामभाऊ कडलग, रावसाहेब शिंदे हे ही राहत होते. वसतिगृहातील बहुतेक विद्यार्थी राष्ट्रसेवा दलाचे सदस्य होते. भास्करराव दूर्वे नाना यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर येथे राष्ट्रसेवा दलाचे सदस्य एकत्र येत असत.

भास्करराव दूर्वे नाना सर्वांना मार्गदर्शन करत असत. दुर्वे नानांनी संगमनेर येथील भंडारी मंगल कार्यालयाच्या ठिकाणी राष्ट्रसेवा दलाचा मेळावा भरविला होता. राष्ट्रसेवा दलात रावसाहेब शिंदे, भाऊसाहेब थोरात, धर्मा पोखरकर, पी.बी.कडू पाटील असे ४० ते ५० स्वयंसेवक सक्रिय सहभागी झाले होते. हे स्वयंसेवक फेऱ्या काढणे, बुलेटिन वाटणे, पोस्ट पेटी पेटवून देणे, फोनच्या तारा तोडणे आदी कामे करत. अहमदनगर येथे निसळ नावाचे कार्यकर्ते होते. भाऊसाहेबांनी त्यांच्याकडून बुलेटिन छपाईचे मशिन, साहित्य आणून

संगमनेर येथे सिताबाई काकड यांच्या शेतात पत्र्याच्या पडवीत बुलेटिन छपाई करत असत. भाऊसाहेब स्टेन्सिल लिहिणे, छपाई, ही कामे करत असत. डॉ.महाले यांची मातोश्री आणि नारायण तेली यांची बहिण गोवऱ्या गोळा करण्याच्या निमित्ताने रोज रानात जात असत. त्या गोवऱ्यांच्या पाटीत खाली बुलेटिन ठेवुन ते डॉ.महालेंच्या घरी आणत असत. नंतर राष्ट्रसेवा दलाचे स्वयंसेवक ते बुलेटिन शहरात वाटण्याचे काम करत असत.

संगमनेर प्रमाणेच अहमदनगर जिल्हयामध्ये राष्ट्रसेवा दलाच्या कार्याचा प्रसार भाऊसाहेब व त्यांचे सहकारी करत असत. जिल्हयात प्रत्येक ठिकाणी राष्ट्रसेवा दलाच्या शाखा स्थापन झाल्या होत्या. या दलाच्या माध्यमातून सरकार विरोधी कार्यास गती आली. होती संगमनेर,अकोले भागातील तारा तोडणे, खांब मोडणे, यांचे नियोजन भाऊसाहेबांकडे होते. भाऊसाहेब दिवसा पाहणी करुन येत नंतर रात्री मुलांचे गट करुन त्यांना विविध भागात पाठविले जात होते. सर्व स्वयंसेवक रात्रीच आपली जबाबदारी पार पाडुन पुन्हा वसतिगृहात येऊन झोपत असत. सकाळी चहा पिण्यासाठी सर्व स्वयंसेवक नेहरु चौकातील हॉटेलमध्ये एकत्र जमत असत. तेथे रात्रीच्या कामगिरीचा आढावा घेऊन पुढील दिशा ठरविली जात असे. त्यात भाऊसाहेब सक्रीय सहभाग घेत असत.[११]

## ४.२ स्वातंत्र्यपूर्व काळातील राजकिय परिस्थिती आणि भाऊसाहेब थोरात यांचे योगदान

राष्ट्रीय कॉंग्रेसच्या तिसऱ्या कालखंडाचे नेतृत्व महात्मा गांधींजीकडे होते. त्यातच ब्रिटीश सरकारने अन्याय, अत्याचाराची परिसिमा गाठली होती. महात्मा गांधी विविध चळवळीच्या माध्यमातून ब्रिटीश सरकारला प्रतिकार करत होते. सरकार विषयी भारतात मोठा असंतोष पसरला होता. त्यातच दुसऱ्या महायुध्दात ब्रिटीशांचा अनेक आघाडयावर पराभव होत होता. जपानी आक्रमणाचा भारतावरील धोका वाढला होता. जपानी आक्रमण भारतावर होण्यापूर्वीच इंग्रजांना भारतातून घालुन देण्यासाठी महात्मा गांधीजींनी १९४२ चे छोडो भारत आंदोलन सुरु केले असता विदयार्थी असणारे भाऊसाहेब त्या आंदोलनात सक्रिय होऊन अहमदनगर जिल्हयात कार्य करु लागले. जनजागृती, आक्रमक धोरण, परिषदातून अहमदनगर जिल्हा ब्रिटीश सरकार विषयी पेटून उठला होता. त्यातच भाऊसाहेबांसह अनेकांना अटक झाली. सुटकेनंतर अनेक स्वातंत्र्य सैनिक कम्युनिस्ट विचाराने प्रेरित होऊन काम करु लागले. त्यात भाऊसाहेब आघाडीवर होते. भाऊसाहेबांनी

ब्रिटीशाचे वरदहस्त असणाऱ्या सावकारशाही विरोधी लढा, विडी कामगारावरील अन्यायाविरोधी लढा, शेतकऱ्यांवरील अन्यायाविरोधी लढा देत संपूर्ण जिल्हाच क्रांतिमय करुन टाकला होता. जिल्हयातील स्वातंत्र्य सैनिकाचे भाऊसाहेबांनी संघटन घडवुन आणले आणि स्वातंत्र्य प्राप्तीपर्यंत संघर्ष करत राहिले.

**४.२.१ राजापूर येथील सभेत भाऊसाहेबांची भुमिका :-**

भाऊसाहेबांनी इ.स. १९४२ च्या स्वातंत्र्य लढयातील कार्यक्रमांची रुपरेषा निश्चित करण्यासाठी जिल्हयातील कार्यकर्त्यांची राजापूर येथे सभा आयोजित केली होती. या सभेस भास्करराव दूर्वे, राम, नागरे, विष्णुबुवा हासे, पांडुरंग भांगरे, पी.बी.कडू, चंद्रभान पाटील आठरे, रावसाहेब शिंदे, बाबुराव तनपुरे, बाबुजी आव्हाड, दादा पाटील राजळे, आदी, कार्यकर्ते उपस्थित होते. इ.स.१९४२ च्या लढयाच्या दुसऱ्या दिवशी गांधीजीसह प्रमुख कार्यकर्त्यांना अटक झाली होती. ब्रिटीश सरकारच्या या कृत्याचा निषेध करण्यात आला होता. ऐवढेच नव्हे तर सरकार विरोधी आक्रमक धोरणाचा अवलंब करण्याची हिच वेळ आहे असे निश्चित करुन जिल्हयातील कचेऱ्या ताब्यात घेऊन प्रतिसरकार स्थापन करण्याच्या कामाचे नियोजन भाऊसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.[१२]

**४.२.२ अहमदनगर जिल्हयातील प्रतिसरकार स्थापनेत भाऊसाहेबांचे योगदान :-**

राजापूर सभेत भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली ठरल्याप्रमाणे जिल्हयातील राष्ट्रसेवादलाचे स्वयंसेवक, कार्यकर्ते ८-१० चे गट करुन जिल्हयात प्रतिसरकार स्थापनेच्या कार्यक्रमासाठी जागृती करण्यात आली. भाऊसाहेब थोरात, भास्करराव दुर्वे, राम नागरे, विष्णूबुवा हासे, पांडुरंग भागरे, पी.बी.कडू, अण्णासाहेब शिंदे, आदी कार्यकर्त्यांनी मिळुन संगमनेर अकोलेचा सर्व भाग पिंजून गावोगावी वाडया वस्त्यांवर फिरुन प्रतिसरकार कार्यक्रमाचे महत्व लोकांना पटवुन देत होते. धर्मा पोखरकर व भाऊसाहेबांचे इतर सहकारी दिवसभर प्रचार करत रात्र झाली की एखाद्या गावातील मंदिरात थाबत असत.

जिल्हयातील प्रतिसरकार स्थापनेच्या प्रयत्नांची सर्व माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलिसही अशा कार्यकर्त्यांच्या मागावरच होते. प्रतिसरकार कार्यक्रम नष्ट करण्याची सरकारनेही जोरदार तयारी केली होती. राजापूर सभेत ठरल्याप्रमाणे जीवाची पर्वा न करता मोठया संख्येने लोक सहभागी होत होते. २३ ऑक्टोंबर १९४२ रोजी जिल्हयातील अनेक तालुक्यातील कचेरीवर मोर्चाने जाऊन कचेरी ताब्यात घेण्याचे निश्चित झाले होते. ठरल्याप्रमाणे सर्व लोक २३ ऑक्टोबरला मोर्चाने कचेरीकडे जाऊ लागले. भाऊसाहेबांच्या

नेतृत्वाखाली संगमनेर कचेरीवर धर्मा पोखरकर, अण्णासाहेब शिंदे, भास्करराव दुर्वे नाना, नारायण अहिरे, पी.बी.कडू, रेवजी दिघे, दगडू मनाजी हासे, आदी कार्यकर्ते लोक ठरल्याप्रमाणे २३ ऑक्टोबरला कचेरीच्या पाठीमागे जमा झाले होते. मोठा जनसागर घोषणा देत कचेरीकडे सरकू लागला. पोलिसांना आधीच मोर्चाची माहिती मिळाली असल्याने पोलिसही तयारीतच होते. मोर्चाने कचेरीकडे कुच करताच पोलिसांनी रायफली रोखल्या. प्रथम हवेत गोळीबार केला आणि माघारी जाण्याची आज्ञा केली. परंतु लोक मागे हटण्यास राजी होत नाहीत हे पाहून पोलिसांनी गोळीबार केला असता अनेक जण मृत्यु पावले. मोर्चेकऱ्यांनी पळापळ सुरु केली. त्यात अनेकांना अटक झाली. विष्णूबुवा हासे. दगडू मनाजी हासे, शंकरगीर गोसावी, पांडुरंग भांगरे, कारभारी खतोडे, सखाहरी पंढरी खतोडे, मुरलीधर नवले, पुंडलिक हासे आदींना अटक झाली. भाऊसाहेबासह अनेक कार्यकर्त्यांवर अटक वॉरंट निघाले. भाऊसाहेब व त्याच्या अनेक कार्यकर्त्यांनी भुमिगत राहुन आपले पुढील कार्य चालु ठेवले होते. पोलिसांच्या सावधानतेमुळे जिल्हयातील प्रतिसरकार स्थापनेचा कार्यक्रम अयशस्वी झाला होता. अनेकांना अटक झाली होती. तरीही सरकार विरोधी कार्य न थांबवता कार्यकर्त्यांनी पुढील कार्यक्रमाची रुपरेषा ठरवितांना अधिक आक्रमक धोरण राबविण्याचे निश्चित केले. त्यात सरकारी मालमत्तेची नासधुस करणे, दळणवळण व्यवस्था मोडणे, तारा तोडणे, खांब मोडणे, असा कार्यक्रम निश्चित केला.[१३] यात भाऊसाहेब थोरात आघाडीवर होते. भाऊसाहेबांना फेब्रुवारी १९४३ साली इंग्रज सरकारने अटक करुन नाशिकच्या सेंट्रल जेलमध्ये १५ महिने त्यांना ठेवण्यात आले होते.[१३]

## ४.३ भाऊसाहेब थोरात यांचे कम्युनिस्ट पक्षांतर्गत कार्य :-

इ.स.१९४२ च्या 'छोडो भारत' आंदोलनातील सहभाग आणि सरकारी मालमत्तेची मोडतोड करत असतांना टेलिफोनचा पोल पायावर पडुन भाऊसाहेब जखमी झाले होते. भाऊसाहेबांना धर्मा पोखरकर, रावसाहेब शिंदे, पी.बी.कडू या सहकाऱ्यांनी कोल्हार येथुन कसेबसे कोल्हेवाडीला तात्याबा दिघे भाऊसाहेबांचे मामा यांच्याकडे पोहोचविले.

**तळटिप:कम्युनिस्ट चळवळ :** प्रत्येक माणसाला सुखाने व स्वाभिमानाने जगता यावे. कुठयाही कारणास्तव व्यक्ती -व्यक्तीत भेदभाव केला जाऊ नये असे वातावरण निर्माण करणे व टिकविणे, श्रमिकांना, दुर्बल घटकांना, शोषितांना त्यांचे रास्त हक्क मिळकतील अशा रितीने सामाजिक, आर्थिक,राजकिय पुरस्कार करणे म्हणजे कम्युनिस्ट चळवळ होय.

मामांकडे असतांना अटक होऊन १५ महिने नाशिक जेलमध्ये शिक्षा भोगणे भाग पडले. या काळात अण्णासाहेबांकडून होणारे प्रबोधन, पंडित नेहरुंचे 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया', स्टॅलिनचे तत्वज्ञानावरील ग्रंथ, एडगर स्नोचे 'रेड स्टार' ओव्हर चायना, न.वि. गाडगिळांचे ग्यानबाचे अर्थशास्त्र तसेच वर्तमानपत्रे, पां.वा.गाडगिळांचे अग्रलेख आदी वाचनातुन भाऊसाहेब मार्क्सवादी विचाराकडे आकर्षित झाले होते. नाशिकचा तुरुंग भाऊसाहेबांच्या व राजकैदयांच्या दृष्टीने तुरुंग न राहाता ते ज्ञानसंपादनाचे केंद्र झाले होते. वाचन, चर्चा, अभ्यासमंडळे, यातून जगातील सर्व घडामोडीचे ज्ञान मिळत होते. या तुरुंगाच्या रुपाने जणुकाही नाशिकच्या सेंट्रल जेलमध्ये स्वातंत्र्यसैनिकांना ज्ञानाचे अखंड भांडारच सापडले होते.[१४]

प्रत्येक राजकीय कैदी तुरुंगातुन बाहेर पडतांना कम्युनिस्ट विचार घेऊनच बाहेर पडत असे. भाऊसाहेबही या गोष्टीला कसे अपवाद असणार. भाऊसाहेब तुरुंगातून बाहेर पडले ते मार्क्सवादी विचारांचा अंगिकार करुनच. ते विचार अहमदनगरच्या भुमित रुजविण्यासाठी जिवाची बाजी लावून आपल्या सहकाऱ्यासमवेत ते कम्युनिस्ट चळवळीतील एक बिनीचा सैनिक म्हणुन उतरले.[१५]

### ४.३.१ भारतात कम्युनिस्ट पक्षाची स्थापना :-

एम.एन. रॉय यांनी जागतिक राजकारणातील कम्युनिस्ट विचार सरणीचे महत्व ओळखुन एस.ए.डांगे, मिरजकर, झेड ए.अहमद, पी.सी. जोशी, आदी कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन दि.२६ डिसेंबर १९२५ रोजी दिल्ली येथे कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली होती. पी.सी. जोशी हे कम्युनिस्ट पक्षाचे सेक्रेटरी होते. हे सर्व कार्यकर्ते परिस्थितीनुसार पक्षाची ध्येयधोरणे ठरवत असत.[१६]

### ४.३.२ कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यास भाऊसाहेब थोरात यांची सुरुवात :-

१ एप्रिल १९४४ साली भाऊसाहेब थोरात यांची नाशिक सेंट्रल जेलमधुन सुटका झाली. अहमदनगर जिल्हयातील त्यांचे बहुतेक मित्र जेलमधुन बाहेर आले होते. जेलमधुन बाहेर आलेल्या सर्वांनी कम्युनिस्ट पक्षातंर्गत काम सुरु केले होते. विडी कामगार, शेतकरी, विद्यार्थी यांच्यामध्ये ही त्यांनी जोरदार प्रचारकार्य सुरु केले. चंद्रभान पाटील आठरे, विनायकराव ताकटे, राम नागरे, प्रभाकर बर्डे, वसंतराव तुळपुळे, भाई सावंत, पोपट धुपटे, म्हाळु पाटील, शामराव कापरे, सातपुते मामा, भानुदास पाटील चौधरी, अच्युतराव पटवर्धन, दादा चौधरी, नाना सय्या, काशिनात, पंत भालेराव, निसळ, केशवराव देशमुख, बुधा ठाकर,

रामकृष्ण महाराज, भैय्यासाहेब, कुलकर्णी, मुरलीधर नवले, बुवासाहेब नवले, पारेगावकर, दत्ता देशमुख, भास्करराव औटी, वकिलराव लंघे, ए.एल. भागवत, धर्मा पोखरकर, अण्णासाहेब शिंदे, प्रभाकर ठुबे, बाबासाहेब ठुबे, पी.बी.कडु पाटील, भाऊसाहेब थोरात, चिमणभाई मेहता, जी.एम. महाजन, बाबुजी आव्हाड, पी.सी.जोशी अशी कितीतरी मंडळी त्यामध्ये सहभागी होती. काँग्रेस अंतर्गत समाजवादी पक्षाशी मतभेद झाल्यामुळे वसंतराव तुळपुळे, बी.डी.कुलकर्णी, यांनी अहमदनगर जिल्हयात डावी चळवळ प्रभावी केली होती. त्यांच्या जोडीला शाहिर अमर शेख, अण्णाभाऊ साठे, शाहीर गव्हाणकर इ. च्या कलापथकांनी संपूर्ण जिल्हा दुमदुमुन सोडला होता. लाल क्रांतीचा उधाणवारा सर्वत्र वाहत होता.[१७]

लालक्रांती यशस्वी करण्यासाठी जागतिक पातळीवर तसेच राज्य पातळीवर परिषदांचे आयोजन होत होते. यात अहमदनगर जिल्हा अग्रेसर होता. भाऊसाहेब थोरात यांनी महाराष्ट्र व्यापी कम्युनिस्ट पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या परीषदेचे आयोजन केले होते.

### ४.३.३ अहमदनगर जिल्हयातील कम्युनिस्ट चळवळ आणि भाऊसाहेब थोरात :-

अहमदनगर जिल्हा हा कम्युनिस्टांचा जिल्हा म्हणून ओळखला जात होता. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातही अहमदनगर जिल्हयात कम्युनिस्ट विचार रुजविण्यात भाऊसाहेब थोरात यांचे महत्वपूर्ण योगदान होते. भाऊसाहेब हे एक उत्तम संघटक होते. त्यांनी जिल्हयातील कम्युनिस्टांचे उत्तम प्रकारे संघटन घडवुन आणले होते. या कम्युनिस्ट स्वातंत्र्य सेनानीमध्ये पाथर्डी तालुक्यातील हंडाळवाडीचे बाबुजी आव्हाड, बाभळगावचे भिवसेन तुपे, पिंपळगाव कासारचे साहेबराव राजळे, दादा पाटील राजळे, राहुरी तालुक्यातील वांबोरीचे बाबा गोसावी, गुहाचे विनायकराव ताकटे,सात्रळचे पी.बी.कडू पाटील,जामखेडचे गं.म. महाजन, गोलीकर, श्रीरामपुरचे रावसाहेब शिंदे, अण्णासाहेब शिंदे, कोपरगांवचे भाई सावंत, यादवराव आढाव, म्हाळू पाटील, बाबुराव जमधाडे, दगडू पाटील कदम, यमाजी कदम, तर अकोले तालुक्यातील कुलकर्णी, मुरलीधर नवले, बुवासाहेब नवले, धर्म कामा भागरे, पांडुरंग भांगरे, गोपाळा भांगरे, बुधा ठाकर, भाऊ पाटील वाकचौरे, विठ्ठल मंडक माळे, सक्रु मेगाळ, पारनेरचे प्रभाकर ठुबे, बुवासाहेब ठुबे, भास्करराव औटी, संगमनेरचे भाऊसाहेब थोरात, केशवराव देशमुख, रामभाऊ नागरे, भैय्यासाहेब, दत्ता देशमुख, के.बी. देशमुख, बाबुराव थोरात, रामभाऊ हासे, भास्करराव दुर्वे नाना, धर्मा

पोखरकर, आदी कम्युनिस्ट विचारांचे स्वातंत्र्यसेनानी भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली अहमदनगर जिल्हयात कम्युनिस्ट पक्षाचा प्रचार, प्रसार करत होते.[१८]

विविध कला गुणांना वाव देत गाणी म्हणत, कथा सांगत, वाद्य वाजवत, नाचत गात, लोकांना प्रथम आकर्षित करत असत. नंतर कम्युनिस्ट पक्षाचे महत्व सांगत असत. भाऊसाहेबांनी जिल्हयातील प्रचारासाठी तालुकावार गट पाडुन प्रत्येक गटाकडे विशेष जबाबदारी सोपवली होती. भाऊसाहेब व त्यांचे सहकारी गाणे म्हणुन नक्कल करुन प्रथम लोकांना आकर्षित करत असत. भाऊसाहेब व धर्मा पोखरकर हे दोघेही प्रथम गाण्यांतून लोकांचे मनोरंजन करत असत. भाऊसाहेब गावा गावात प्रचार करताना गाणी म्हणत. नकला झाल्यानंतर स्वतः उपस्थितांना मार्गदर्शन करत व लाल बावटयाचे महत्व समजुन देत असत. त्यांच्या आकर्षक वक्तृत्व शैलीमुळे लोक आकर्षित होत.[१९]

भाऊसाहेबांनी जिल्हयातील कम्युनिस्टांचे संघटन करुन अहमदनगर जिल्हयात कम्युनिस्ट पक्षाच्या प्रचारासाठी अनेक परिषदा घेतल्या.

## ४.४ टिटवाळा परिषद आणि भाऊसाहेब थोरात यांचे योगदान :-

इ.स.१९४४ साली कम्युनिस्ट पक्षाने किसानसभे अंतर्गत ठाणे जिल्हयातील टिटवाळा येथे महाराष्ट्र राज्यव्यापी किसान परिषद घेण्यात येणार होती. गोदूताईचा शामराव परुळेकरांशी विवाह झाल्यानंतर शामरावांच्या विचाराने प्रभावित होऊन गोदूताईंनी ठाणे जिल्हयातील वारली आदिवासींवर सावकार, जमिनदारांकडून होत असलेल्या अन्यायाची कल्पना आल्याने गोदूताई शामरावांबरोबर आदिवासींवरील अन्याय निवारणार्थ सिध्द झाल्या होत्या. सावकारशाहीविरुध्द वेठबिगारी विरुध्द त्यांनी लढा उभारला होता.

वारली आदिवासींवर सावकार, जमिनदाराचे वर्चस्व होते. वारल्यांना शिक्षा करणे, चाबकाने फटके मारणे, अनेक वारल्यांना पेटत्या भट्टीत ढकलुन दिल्याचे देखील उदाहरणे आहेत. स्त्रींयाना तर गुलामापेक्षा वाईट वागणूक दिली जात होती. ओजाबांनी घेतलेली कर्जे नातवाच्या पिढीपर्यंतही फिटत नसत. त्यामुळे पिढयानपिढया वारली बायका, मुले, पुरुष यांना जनावरांसह सावकार जमिनदारांकडे वेठबिगार म्हणून रहावे लागत होते. हिशोबाचा पत्ताच नसायचा. वारली हे अशिक्षित असल्याने त्यांना कोणत्याही प्रकारचे लिखापडीचे ज्ञान नव्हते. त्यामुळे सावकार जमिनदार ठरवेल तो हिशोब त्यांना मान्य करावा लागत होता. त्यावर वारल्यांचे अंगठे घेतले जात होते.

अवघी पोलिस यंत्रणा तसेच मामलेदार, तलाठी, आदी अधिकारी, सावकार, जमिनदारांच्या बाजुने उभे होते. तर ब्रिटिश सरकार सावकार, जमिनदारांसाठी एक वरदान होते. गोदूताईंनी वाघीणीच्या झेपेने काम हात घेतले होते. अन्याय, जुलुम, पिळवणुक याविरुध्द त्यांनी लढा उभारला होता. वारली जागा झाला होता. गोदुताई वारल्यांच्या गोदाराणी झाल्या होत्या. टिटवाळा परिषद ही वारल्याच्या लढयातला एक टप्पा होता.[२०]

टिटवाळा परिषदेपुर्वी दोन महिने आधी महाराष्ट्रातील कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना परिषदेसंदर्भात प्रचार करण्याचे सांगण्यात आले होते. भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली जिल्हयातील प्रचार कार्यात एक प्रकारे वेगळीच रंगत आली होती. शेतकरी वर्गात उत्साह वाढला होता. आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची त्यांना कल्पना येऊ लागली होती. त्यामुळे जिल्हयातून मोठया संख्येने लोक या परिषदेस जाण्यास निघाले होते.

महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्हा हा कम्युनिस्टांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्हयातील कम्युनिस्ट विचारांचे कार्यकर्ते कोणत्याही कार्यात सहभागी होत असत. टिटवाळा परिषदेस भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली जिल्हयातुन जवळपास ६०० शेतकरी तसेच ५० ते ६० कम्युनिस्ट कार्यकर्ते या परिषदेस जाण्यास निघाले होते. भाऊसाहेब थोरात, भैय्यासाहेब कुलकर्णी, चंद्रभान पाटील आठरे, मुरलीधर नवले, बुवासाहेब नवले, दादा राजळे, भास्करराव दुर्वे नाना, धर्मा पोखरकर, आण्णसाहेब शिंदे, बाबुजी आव्हाड, विनायकराव ताकटे, प्रभाकर खाडे, रावसाहेब शिंदे, आदी कम्युनिस्ट कार्यकर्ते भाऊसाहेबा बरोवर सायकलवर प्रवास करत टिटवाळा परिषदेस निघाले होते. निघतांना प्रत्येकाने दशम्यांचे मोठे गाठोडे बरोबर घेतले होते. प्रत्येकाने सायकलला लाल झेंडा बांधला होता. किसान सभेची, लाल बावटयाची गाणी म्हणत मार्गातील गावांमध्ये परिषदेविषयी गाण्यातून जागृती करत भाऊसाहेब आपल्या सहकाऱ्यांबरोबर प्रवास करत होते. प्रत्येकाने आपल्या बरोबर आवश्यक कपडे, बॅटरी, भाकरी सर्व सामान पिशवीत भरुन घेतले होते. भाऊसाहेबांनी कपडे, बॅटरी, भाकरीचे पेटके घेतले होते.

भाऊसाहेबांनी सर्व पिशवीत भरुन पिशवी सायकलच्या हॅडेलला लटकवली होती. भाऊसाहेब थळ घाटातून जातांना मोठा उतार लागला असता अचानक पिशवीतील टॉर्च सायकलच्या चाकात अडकला, भाऊसाहेब जोराने सायकलवरुन बाजुला फेकले गेले. सायकल अंगावर पडली. बाजुला खोल दरी होती. जीवावर आलेले संकट थोडक्यात टळले होते. भाऊसाहेब ताडकन उठून उभे राहिले. कोठे मार लागला का ते पाहू लागले. पुन्हा

पुढील प्रवासाला लागले. शहापुरपर्यंतचा प्रवास सुखाचा झाला. परंतु तेथुन पुढे साकलवर स्वार होण्यास रोड नव्हता. तेव्हा तेथुन रेल्वेने जाण्याचे नियोजन केले. रात्री स्टेशनवर पोहोचले आणि पहाटे टिटवाळा रेल्वेने सायकलसह प्रवास करत टिटवाळयास पोहोचले.[२१]

भाऊसाहेब व त्यांचे सहकारी या सर्वांना स्टेशन मास्तरने सायकली स्टेशनबाहेर नेण्यास मनाई केली असता प्रती सायकल दोन आणे देऊन कसेबसे स्टेशनवरुन बाहेर पडले. आणि परिषदेच्या ठिकाणी पोहचले. परिषदेचे ठिकाण हे भातसा नदीच्या काठी एका मोठया आंबराईत होते. भाऊसाहेब व त्यांचे सहकारी यांचे स्वागत करण्यात आले. महाराष्ट्रातून मोठया प्रमाणात कम्युनिस्ट कार्यकर्ते, शेतकरी उपस्थित होते. लोक मोठया संख्येने मोर्चाने सभेच्या ठिकाणी येत होते. डहाणू, उंबरगाव तालुक्यातील आदिवासींचा प्रचड मोर्चा आला होता. गोदूताईंनी त्या मोर्चाचे नेतृत्व केले होते. संध्याकाळपर्यंत परिषद चालु होती. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर महाराष्ट्रातून आलेल्या अनेक शेतकरी पुढाऱ्यांनी आपले विचार परिषदेत मांडले होते. भाऊसाहेबांनीही अहमदनगर जिल्हयाच्या वतीने परिषदेपुढे आपले विचार मांडले असता कणखर आवाज व सावकारशाही, जमिनदारविरोधी भाऊसाहेबांच्या भूमिकेने उपस्थितांमध्ये एक प्रकारे नवचैतन्य संचारले होते. उपस्थितांमध्ये सर्वांनी भाऊसाहेबांच्या विचाराचे समर्थन केले. परिषदेत शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने अनेक ठराव मंजुर करण्यात आले होते. 'सावकारी पाशातून शेतकऱ्यांची मुक्ता करणे, कसेल त्याची जमीन, जमीनदार, व्यापारी, सावकारांच्या पाशातून 'वारली' आदिवसींची मुक्तता करणे ही परिषदेची उद्दिष्टये साध्य करण्याचा ठराव पास झाला. शामराव व गोदूताई परुळेकर यांनी परिषदेला मार्गदर्शन करुन किसानसभेची दिशा निश्चित करुन त्यानुसार संपूर्ण राज्यात आंदोलन तीव्र करण्याची अपेक्षा बोलून दाखविली.[२२]

रात्री कला पथकाच्या कार्यक्रमातुन जनजागृती करण्यात आली. शाहिर अमर शेख, शाहिर अण्णाभाऊ साठे, शाहिर गव्हाणकर यांच्या कला पथकाने ही परिषद गाजविली.

'ही आग भुकेची जळते आमुच्या पोटी, मागतो खावया एकच आम्ही रोटी'

शाहिर अमर शेख यांच्या या गाण्याने उपस्थितांच्या अंगावर रोमांच उभे राहिले होते. शाहिर अमर शेख यांच्या व्यक्तिमत्वाची एक वेगळीच छाप सर्वावर पडली होती. कलापथकाचे नाटय, गाणे, वग, पोवाडे हे सर्व प्रबोधनपरच होते. अन्याय आणि पिळवणुक यांच्या विरुध्द पेटून उठण्याची त्यात चेतना होती. वि.स.खांडेकर, प्र.के. अंत्रे, पु.ल. देशपांडे यांनीही या कार्यक्रमाची मनापासून प्रशंसा केली होती. अकलेची गोष्ट हा

अण्णाभाऊ साठे यांनी ुलिहिलेला वग अप्रतिम ठरला होता. या कलापथकांच्या कार्यक्रमातून लोक प्रेरित होऊन कामाला लागत असत. ही या कार्यक्रमाच्या यशाची पावती होती.

'जाती घडी पुन्हा येणार नाय रे

घुसुन चल म्होर जाऊ रे'

या नृत्यावर आधारलेली कोळीगीत लोकप्रियतेचा कळस गाठायचे. शाहिर अमर शेख यांचा गायनाचा आणि अभिनयाचा अविष्कार आकाशाची उंची गाठायचा. शाहिर अमर शेख व शाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या कलापथकाने महाराष्ट्रात लोकजागृतीचे अतिशय क्रांतिकारक कार्य केले होते. ही परिषद यशस्वी झाली. माघारी अहमदनगरला आल्यानंतर सर्व कार्यकर्ते भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली आपआपल्या विभागात जागृती करुन शेतकरी चळवळीसाठी वातावरण निर्मिती करु लागले. भाऊसाहेबांचा उत्साह एवढा वाढला होता की, टिटवाळयाहून आल्यानंतर जिल्हयात कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने शिबीरे परिषदांचे आयोजन केले जात होते. त्यातील महत्वाच्या परिषदा व शिबीरे पुढीलप्रमाणे होती.[२३]

## ४.५ अहमदनगर जिल्हयातील कम्युनिस्ट पक्षांच्या परिषदेतील भाऊसाहेब थोरात यांची भूमिका :-

टिटवाळा परिषदेनंतर कम्युनिस्ट विचारांचा प्रसार अगदी खेडयापाडयापर्यंत जाऊन पोहोचला होता. कम्युनिस्टांच्या विचाराने लोक प्रभावित झाले होते. जिल्हयात भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली गावोगावी सभा, परिषदा, शिबीराचे आयोजन होत होते. लोकांचा उत्साह वाढला होता. लोक कम्युनिस्ट विचारांचे समर्थन करु लागले होते. कम्युनिस्टांच्या जिल्हयात गाजलेल्या परिषदा व शिबीरे पुढीलप्रमाणे होते.[२४]

### ४.५.१ जोर्वे येथील महाराष्ट्रातील कम्युनिस्ट कार्यकर्त्यांच्या शिबिरातील भाऊसाहेबांचे योगदान :-

भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली अहमदनगर जिल्हयातील संगमनेर तालुक्यातील भाऊसाहेबांचे जन्मगाव जोर्वे येथे १९४५ रोजी राज्यव्यापी शिबीराचे आयोजन केले होते. या शिबीरास जिल्हयाच्या बाहेरील कॉ.कऱ्हाडकर, कॉ.डी.बी.कुलकर्णी, कॉ.एम.व्ही.देशपांडे, कॉ.मिरजकर, नांदेडकर, डांगे आदी जवळपास २०० ते २५० पुढारी जिल्हयाच्या बाहेरुन आले होते. तर जिल्हयातील पुढारी व कम्युनिस्ट सदस्य जवळपास १५०० आसपास होते. हे शिबीर जोर्वे येथील दत्तमंदिराच्या प्रांगणात घेण्यात आले. शिबीरापूर्वी जिल्हयातील

कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी जिल्हयात सर्वत्र प्रचार केला होता. भाऊसाहेबांच्या साथीला चंद्रभान आठरे पाटील, रामभाऊ नागरे, बुवासाहेब नवले, दादा राजळे, भास्करराव दुर्वे, अण्णासाहेब शिंदे, पी.बी.कडु पाटील, जिल्हयातील सर्व कम्युनिस्टांनी शिबीर यशस्वी करण्यासाठी फार कष्ट घेतले होते. शिबीरातील मान्यवरांच्या विचाराने उपस्थित लोक इतके प्रभावित झाले होते की त्याच क्षणापासून अनेकांनी अजन्म कम्युनिस्ट पक्षाशी एकनिष्ठ राहण्याची शपथ दत्त महाराजांसमोर घेतली होती. शिबीरातील सहभागींची तीन दिवसांची राहण्याची, चहा, नाष्टा, जेवण अशी सर्व व्यवस्था भाऊसाहेबांनी व्यवस्थित केली होती. शिबीराच्या समाप्तीनंतर जिल्हयातील घराघरांमध्ये कम्युनिस्ट विचारांचे वारे वाहु लागले होते. शिबीरांची माहिती महाराष्ट्रात सर्वत्र प्रसार पावली होती. एवढे मोठे शिबीर घेऊन भाऊसाहेबांनी जणु काय जिल्हाच कम्युनिस्टमय करुन टाकला होता.[२५]

### ४.५.२ गुहा शिबिरातील भाऊसाहेब थोरात यांचे योगदान :-

इ.स. १९४६ साली भाऊसाहेब थोरात, अण्णासाहेब शिंदे, चंद्रभान आठरे पाटील यांच्या प्रयत्नातून कम्युनिस्टाचे दुसरे शिबीर राहुरी तालुक्यातील गुहा या गावी घेण्याचे निश्चित केले होते. गुहा हे कम्युनिस्ट चळवळीचे एक केंद्र होते. विनायकराव ताकटे पाटील, धोंडीभाऊ उऱ्हे, निवृत्ती आंबेकर, विश्वनाथ वाबळे, आदी प्रमुख कार्यकर्ते गुहा येथे होते. गुहा येथे वाबळे पाटलांच्या वस्तीवर शिबीराचे आयोजन केले होते. शिबीराच्या निमित्ताने जिल्हयात प्रचार करण्यात आला. जिल्हयातुन आणि जिल्हयाच्या बाहेरुनही मोठया प्रमाणात कम्युनिस्ट कार्यकर्ते व लोक शिबीराला उपस्थित होते. शिबीरास जवळपास ३०० कम्युनिस्ट कार्यकर्ते उपस्थित होते. शामराव परुळेकर प्रमुख मार्गदर्शक होते.[२६]

शिबीरातील सर्व कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना गनिमी युध्दाच्या तंत्राची माहिती देण्यात आली. रात्री गनिमी काव्याचे प्रात्याक्षिक घेण्यात आले. यासाठी वाबळे पाटलांचा मोसंबीचा बाग आणि शेजारील पाटाचे भराव आणि मधला खोलगट भाग तसेच पाटाच्या कडेची आंब्याची व इतर मोठमोठी झाडे, बागेच्या कडेची झुडपे, वेली या सर्वांचा लपण म्हणून गनिमी काव्याच्या प्रात्याक्षिकांसाठी चांगलाच उपयोग झाला होता. 'पॉवेल' हा गनिमी युध्दातला एक पर्वणीचा गुप्त कोडवर्ड होता. तो शब्द उच्चारला की याचा अर्थ उच्चारणारा आपलाच कॉम्रेड आहे. शत्रू नाही असे समजले जात होते. रात्री सुमारे तीन तास हया गनिमी युध्दाची तालीम मोठी मनोरंजक झाली होती. हे प्रात्याक्षिक मनोरंजन म्हणुन नव्हे तर पुढील युध्दाची तयारी आहे असे सर्वांच्या मनावर बिंबवण्यात आले होते.

शिबीरास मार्गदर्शन करण्यासाठी शामराव परुळेकर, गोदूताई परुळेकर हे ठाण्याहून आले होते. तर भाऊसाहेब थोरात, चंद्रभान पाटील आठरे, भैय्यासाहेब कुलकर्णी, बुवासाहेब नवले, एस.व्ही. देशपांडे आदींनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. जिल्हयातील कम्युनिस्ट मोठया संख्येने शिबीरास उपस्थित होते. शिबीरात दोन दिवस अभ्यासमंडळे घेण्यात आली. शामराव परुळेकर यांनी शिबीराला लढाऊ धोरणाची दिशा दिली होती.[२७]

शिबीरापूर्व जनजागृती मोहिमेअंतर्गत भाऊसाहेबांची जिल्हयात खेडोपाडी अनेक भाषणे झाली होती. जिल्हयातील कार्यकर्त्यांमध्ये तसेच सर्वसामान्य लोकांमध्ये भाऊसाहेबांनी आपल्या व्यक्तीमत्वाची एक वेगळीच छाप पाडली होती. प्रभावी वक्तृत्व शैलीने त्यांनी लोकांची मने जिंकली होती.

या शिबीरातही भाऊसाहेबांनी भाषण केले होते. भाऊसाहेबांचे भाषण म्हणजे एक प्रकारे सावकारशाही, जमिनदार आणि ब्रिटिश सरकार यांचे वर्चस्व संपुष्टात आणुन लोकांना आपले हक्क प्राप्त करुन देणे हे भाऊसाहेबांनी भाषणातून स्पष्ट केले होते. भाऊसाहेबांच्या भाषणाने सर्वांच्या अंगावर रोमांच आले होते. इतके जोशपुर्ण भाषण भाऊसाहेबांनी केले होते. भाऊसाहेबांच्या भाषणाने शामराव व गोदुताई परुळेकर प्रभावित झाले होते. शामराव व गोदूताईनी भाऊसाहेबांना शाब्बासकी दिली होती.

गोदूताईंनी उपस्थित शिबीरार्थींना मार्गदर्शन करतांना सर्वसामान्याची सावकार, जमीनदार कशी फसवणुक करतात. सर्वसामान्याच्या दारिद्रयास सावकारशाहीच जबाबदार आहे. यातुन मार्ग म्हणजे सावकारशाही विरुध्द सर्वांनी बंड करुन उठले पाहिजे. आपल्या हक्काच्या जमिनीवर ताबा मिळविला पाहिजे. असे मार्गदर्शन करुन एक प्रकारे लोकांना सावकारशाही विरोधी लढा पुकारण्याची सुचना केली होती. तर शामराव परुळेकरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात शिबीरार्थींना उद्देशून म्हटले की, सावकारशाही, जमिनदारी ही पिढयानपिढया सामान्य जनतेच्या छाताडावर बसलेली भुते आहेत. या सावकारशाहीचा सर्वनाश केल्याशिवाय सर्वसामान्य लोकांना स्थिरता प्राप्त होणार नाही. महाराष्ट्रातुन सावकारशाही नष्ट करण्यासाठी नियोजनपूर्वक आपआपल्या भागातील सावकार व जमिनदार यांचे वर्चस्व संपुष्टात आणणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने सर्वांनी कामाला लागावे असा संदेश शामरावांनी दिला होता. एवढेच नव्हे तर सौमय्या फार्मकडील लाखो एकर जमीन भूमीहिनांना मिळवुन देण्यासाठी सर्वांनी संघटीतपणे कार्य केले पाहिजे. भूमीहिनांना न्याय मिळवुन देण्यासाठी सौमय्या फार्मविरोधी जिल्हयातील कम्युनिस्टांनी शेतकरी वर्गाने

एकत्रीतपणे लढा दिला पाहिजे. असा संदेश त्यांनी अहमदनगर जिल्हयातील उपस्थित कार्यकर्त्यांना दिला होता. शिबीरास उपस्थित असणारे कॉ.फणसाळकर यांच्या गायनाने लोक मंत्रमुग्ध झाले होते. फणसाळकर 'सारे जहाँसे अच्छा, हिंदुस्ता हमारा' हे गाणे अप्रतिम म्हणत असत, त्याशिवाय

'तांबड फुटलं उठ सजणे गाडी जुंपायची येळ झाली ग' तसेच

'बिगी बिगी चल जाऊ जरा साजणा चतकोर तरी दाव गडया भावना'

अशी गाणी फारच सुरेल आवाजात म्हणत असत. गाण्यातूनही लोकांमध्ये एक प्रकारे जनजागृती होऊन लोकांच्या विचारात परिवर्तन घडून आले होते. अहमदनगर जिल्हयातील जोर्वे शिबीर, गुहा शिबीरापासून शेतकरी वर्ग कम्युनिस्टांना आपला पाठींबा जाहिरपणे देऊ लागले होते. जणू अहमदनगर जिल्हयात एक प्रकारे कम्युनिस्ट विचारांचे वारेच वाहत होते. गुहा शिबीरानंतर जिल्हयात गावोगावी परिषदांचे आयोजन करण्यात आले होते.[२८]

### ४.५.३ वरुडी परिषदेतील भाऊसाहेब थोरात यांचे योगदान :-

टिटवाळा परिषदेनंतर धर्मा पोखरकरांचा उत्साह अधिकच वाढला होता. धर्मा पोखरकर यांच्या आग्रहाखातर भाऊसाहेबांनी संगमनेर तालुक्यातील वरुडी या धर्मा पोखरकरांच्या जन्मगावी परिषदेचे आयोजन केले होते. परिषदेपुर्वी जिल्हयातील कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना प्रचार कार्याची जबाबदारी विभागून दिली होती. वरुडी परिषदेचा संपूर्ण जिल्हयात प्रचार केला गेला.

वरुडी गाव हे बालाघाटाच्या रांगा जेथुन सुरु होतात त्या बाळेश्वर डोंगररागांच्या सभोवतालचा हा भाग तेथील शेती पुर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबुन असे. खरीपाच्या एका पिकावर लोकांना वर्षाची गुजराण करावी लागे. येथील शेतकरी सहा महिने ऊस तोडणी कामगार म्हणून गाव सोडून बाहेर जात असे. पावसाळयाच्या पूर्वी पुन्हा गावावर येऊन शेतीची मशागत करत असत. वरुडी गाव व आसपासच्या पठार भागातील शेतकरी वर्गावर सावकारशाही जमिनदार वर्गाने मोठे वर्चस्व निर्माण केले होते. अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी गहाणखत होत्या. सावकारशाही विरुध्द जागृती करण्यासाठी भाऊसाहेबांनी वरुडी परिषद घेण्याचे निश्चित केले होते. भाऊसाहेबांनी स्वत:ही परिषदेपूर्वी प्रचार कार्यात सहभागी होऊन पिंपळगाव देपा, रणखांब, कुंभारवाडी, वरवंडी, खरशिंदे, वरशिंदे, खांबे, साकूर, घारगाव, बोटा, जवळे बाळेश्वर, पोखरी बाळेश्वर, दरेवाडी, महालवाडी, राजापूर आदी गावांमध्ये भाऊसाहेबांनी प्रचार सभा घेऊन जागृती केली होती. लाल बावटयाचे महत्व

सांगत गावोगावी प्रचार जोरात केला गेला. प्रचार काळात ज्या गावात रात्र होत असे त्याच गावात मुक्काम करावा लागत होता.

भाऊसाहेबांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी संपूर्ण संगमनेर अकोला तालुका पिंजून काढला होता. त्याचप्रमाणे चंद्रभान आठरे पाटील, बाबुजी आव्हाड, रामभाऊ नागरे, बुवासाहेब नवले, दादा राजळे, सदाशिव औताडे, आदींनी नगर जिल्हयाच्या पूर्वेकडील भागात जोरदार प्रचार मोहिम राबविली होती. संपूर्ण जिल्हयात वरुडी परिषदेविषयी आत्मीयता वाटू लागली होती.

वरुडी गाव हे सहयाद्रीच्या पर्वतरागांमध्ये वसलेले एक छोटेसे गाव. गावाकडे जाण्यासाठी निटसे रस्तेही नव्हते. वाहनांची सोय नव्हती. खाजगी वाहनाने जावे लागे. परिषदेसाठी चंद्रभान आठरे पाटील, अण्णासाहेब शिंदे, आर.जी. क-हाडकर, भाऊसाहेब थोरत हे प्रमुख मार्गदर्शक होते. याशिवाय शाहिर अमर शेख, शाहिर अण्णाभाऊ साठे, शाहिर गव्हाणकर यांचे कलापथक बोलाविले होते. परिषदेपूर्वी गावोगावी प्रचार करताना सावकारशाही नष्ट झालीच पाहिजे. 'कसेल त्याची जमिन झालीच पाहिजे' 'पठार भागातील रस्ते झालेच पाहिजे' ही प्रचाराची घोषवाक्य होती. परिषदेस जाण्यासाठी आलेल्या कार्यकर्त्यांची संगमनेरहून तटयाच्या बैलगाडीतून वरुडी येथे जाण्याची व्यवस्था केली होती. परिषदेसाठी भाऊसाहेबांनी मुद्दाम शाहिर अमर शेख यांचे गाजलेले कलापथक परिषदेसाठी बोलावले होते. शाहिर अमर शेख, शाहिर अण्णभाऊ साठे, शाहिर गव्हाणकर यांच्याकला पथकाने धमाल उडवून दिली होती. त्यांची 'अकलेची गोष्ट' लोकांची दाद मिळवुन गेले. परिषदेसाठी जिल्हयातुन मोठया संख्येने शेतकरी वर्ग उपस्थित होता. संगमनेर, अकोले आदिवासी भागातील शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.[२९]

जवळपास ३५०० हजार ते ४००० हजार लोक जिल्हयातून व जिल्हयाच्या बाहेरुन आले होते. एवढया मोठया जनसमुदायाची सर्व व्यवस्था भाऊसाहेबांनी केली होती. भाऊसाहेबांनी परिषदेस मार्गदर्शन करतांना परिषदेचे उद्देश स्पष्ट कले. प्रभावी वक्तृत्व शैलीतून भाऊसाहेबांच्या भाषणाने सर्वांचे डोळे पाणावले गेले. आपण सावकारशाही, जमिनदार यांचा अन्याय कितपत सहन करणार आहात. असा प्रश्न भाऊसाहेबांनी उपस्थितांना केला. आजोबांनी घेतलेले कर्ज नातवाला देखील फेडणे शक्य होत नाही. परिणामी शेतकऱ्यांना भूमीहीन होऊन आपल्याच शेतावर शेतमजुर म्हणून काम करणे भाग पडत आहे. हे वास्तव भाऊसाहेबांनी उपस्थितांमधील अनेकांची उदाहरणे देऊन पटवुन दिले

होते. भाऊसाहेबांच्या भाषणाने उपस्थित जनसमुदाय क्रोधीत होत होता. आपणावर होत असणाऱ्या या अन्यायास सर्वस्वीपणे ब्रिटिश सरकार जबाबदार आहे. ब्रिटिशांना भारतातून घालविल्या शिवाय आपणास सुखाने जगता येणे शक्य नाही. तेव्हा ब्रिटिश सरकारविरोधी सर्वांनी संघटीतपणे संषर्य करुन जिल्हयातून ब्रिटिश सरकारचे वर्चस्व नष्ट करण्यात साहय करावे असे आव्हान भाऊसाहेबांनी उपस्थितांना केले. भाऊसाहेबांच्या भाषणाने संपूर्ण जनसमुदाय प्रभावित झाला होता. अनेकांनी तेथेच क्रांतीकार्यात सहभागी होण्याची आपली इच्छा बोलुन दाखविली. एवढेच नव्हे तर भारत मातेला स्वातंत्र्य मिळुन देण्यात खरोखरच त्यांनी अहमदनगर जिल्हयात भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली कार्य केले. एवढेच नव्हे तर स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही अनेकांनी घेतलेला वसा न सोडता समाजसेवेस स्वतःस वाहुन घेतले. वरुडी परिषद जिल्हयात एक चर्चेचा विषय बनली होती. परिषदेच्या नियोजनाच्या यशस्वीतेबद्दल उपस्थितांनी भाऊसाहेबाचे आभार मानले. कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने घेण्यात आलेली किसानसभेची अहमदनगर जिल्हयातील ही सर्वात मोठी परिषद होती. परिषदेनंतर जिल्हयात गावोगावी सावकारशाही, जमीनदार यांच्या विरोधात लढयाला सुरुवात झाली. अनेकांनी आपल्यावरील सावकार, जमिनदारांचे वर्चस्व झुगारुन देत आपल्या वडीलोपार्जित जमिनी ताब्यात घेऊन कसण्यास सुरुवात केली. ही सर्व भाऊसाहेबांच्या विचारांची कमाल होती.[३०]

### ४.५.४ शिरसगांव परिषदेतील भाऊसाहेब थोरात यांचे योगदान :-

भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली नेवासा तालुक्यातील शिरसगाव येथे कॉ. वकिलराव लंघे यांच्या घरी ही परिषद घेण्यात आली होती. परिषदेपूर्वी भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हयातील कम्युनिस्ट कार्यकर्त्यांच्या सहाय्याने प्रचार कार्य गावोगावी केले होते. प्रचार करत असतांना कार्यकर्त्यांनी गावोगावी आपल्या भाषणातून परिषदेचे उद्देश सांगितले होते.

शिरसगाव परिषदेसाठी अहमदनगर जिल्हयातील चंद्रभान आठरे पाटील, बाबुजी आव्हाड, भाऊसाहेब थोरात, डी.बी. कुलकर्णी, रामभाऊ नागरे, बुवासाहेब नवले, दादा राजळे, सदाशिव औताडे, अण्णासाहेब शिंदे, आर.जी. कऱ्हाडकर, रावसाहेब शिंदे, किसन नेहे, बुधा ठाकर, भास्करराव दुर्वे नाना, भैय्यासाहेब कुलकर्णी, आदी कार्यकर्त्यांसह जिल्हयातील शेतकरी, कामगार वर्ग मोठया संख्येने उपस्थित होता. जवळपास २५०० हजार लोक परिषदेस उपस्थित होते.

परिषदेच्या प्रारंभीच भाऊसाहेबांनी आपल्या प्रभावी वक्तृत्व शैलीने परिषदेचे उद्देश स्पष्ट केले. शेतकरी वर्गावरील सावकार, जमिनदारांकडून होत असलेला अन्याय दूर करणे. त्याचप्रमाणे कामगार वर्गाला त्यांचे हक्क मिळवुन देणे हे परिषदेचे उद्देश भाऊसाहेबांनी परिषदेच्या प्रारंभीच स्पष्ट केले होते. परिषदेचे अध्यक्ष कॉ.डांगे हे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात कम्युनिस्ट चळवळ प्रखर करुन शेतकरी व कामगारांना त्यांचे हक्क मिळवुन देण्यासाठी भाऊसाहेब थोरात, व त्यांचे सहकारी निश्चितच यशस्वी होतील यात शंका नाही. अशी इच्छा व्यक्त केली. त्यांचे हे विचार प्रत्यक्ष साकार करण्याची जबाबदारी भाऊसाहेबांनी स्वीकारली आणि जिल्हयातील शेतकरी व कामगारवर्गाचे संघटन करुन चळवळीस प्रारंभ केला.[३१]

### ४.५.५ करंजी परिषदेतील भाऊसाहेब थोरात यांचे योगदान :-

अहमदनगर जिल्हयातील कम्युनिस्ट चळवळीचा त्या काळातील महत्वाचा 'लँडमार्क' म्हणजे इ.स. १९४६ साली पाथर्डी तालुक्यातील करंजी येथील अखिल भारतीय किसान परिषद होय. बंगालमधील किसानसभेचे नेते कॉम्रेड बंकिमचंद्र मुखर्जी यांच्या अध्यक्षतेखाली या परिषदेचे आयोजन केले होते. प्रचार कार्याचा शुभारंभ करण्यासाठी पाथर्डी तालुक्यातील कोरडगाव हया चंद्रभान आठरे पाटीलांच्या गावी त्यांच्या वाडयासमोर अहमदनगर जिल्हयातील सर्व कार्यकर्ते एकत्र येऊन 'लाल बावटे की जय' अशी उंच आरोळी देऊन प्रचाराचा नारळ फोडला गेला. भाऊसाहेब थोरात, चंद्रभान आठरे पाटील, अण्णासाहेब शिंदे, शाहिर अण्णाभाऊ साठे हे या परिषदेचे नेतृत्व करत हाते. परिषद यशस्वी करण्यासाठी भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली जिल्हयातील सर्वच कार्यकर्ते कामाला लागले होते. महाराष्ट्रात जिथे जिथे कम्युनिस्ट पक्षाचे कार्य होते. ते कार्यकर्ते देखील कामाला लागले होते. महाराष्ट्रातील अनेक जिल्हयातील शेतकरी परिषदेला येण्यासाठी जय्यत तयारी करत होते. जिल्हयातील प्रचार कार्यासाठी भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हयातील कार्यकर्त्याचे विविध गटात विभाजन करुन त्यांच्याकडे ठराविक विभागात प्रचार करण्याची जबाबदारी सोपवली होती. भाऊसाहेबांनी स्वतःकडे नेवासा, पाथर्डी, शेवगाव तालुक्यातील जवळपास शंभर गावात प्रचार करण्याची जबाबदारी घेतली होती. अहमदनगर जिल्हयातील सर्व भागात जोरात प्रचार सुरु झाला होता. भाऊसाहेब थोरात, बुवासाहेब नवले, पी.बी.कडू, पाटील, रावसाहेब शिंदे, धर्मा पोखरकर, भैय्यासाहेब कुलकर्णी, यांच्या गटाने नेवासा, पाथर्डी, शेवगाव तालुक्यातील जवळपासच्या गावांमध्ये सायकलवर प्रचार मोहिम सुरु केली होती.

प्रचार करतांना सकाळी मोठे गाव घेत असत. नंतर दुसरी छोटी छोटी गावे घेतली जात असत प्रचारापूर्वी गावात फेरी मारली जात असे. लोकांना जमा करण्यासाठी धर्मा पोखरकरांचा बहारदार गाण्यांचा कार्यक्रम होत होता. धर्मा नकला करण्यात, गाणी म्हणण्यात पटाईत होता. गाण्यांच्या माध्यमातून धर्मा लोकांना लाल बावटयचे महत्व पटवुन देत असत. करंजी परिषदेच्या प्रचार मोहिमेने संपूर्ण जिल्हयातील वातावरण कम्युनिस्टमय झाले होते. प्रचार मोहिमेत गावोगावच्या कम्युनिस्ट कार्यकर्त्यांच्या भेटी घेऊन त्यांना त्यांच्या भागातील शेतकऱ्यांना परिषदेस घेऊन येण्याची जबाबदारी भाऊसाहेब सोपवत असत. प्रचार मोहिमेस भानुदास चौधरी यांच्यासारखे नवीन निष्टावंत कार्यकर्ते ही भाऊसाहेबांना येऊन सामील झाले होते. भाऊसाहेबांच्या भाषणाने ते प्रभावित झाले होते. जिल्हयातील प्रचार मोहिम यशस्वीपणे पार पडली होती.[३२]

करंजी परिषदेचा दिवस उगवला, चारही दिशांनी शेतकऱ्यांचे जथ्थे पायी चालत सायकलवर परिषदेसाठी येऊ लागले. भाऊसाहेब थोरात, चंद्रभान आठरे पाटील हे परिषदेच्या कामात मग्न होते. परिषदेच्या उद्‌घाटन प्रसंगी महाराष्ट्रातुन मोठया प्रमाणात कम्युनिस्ट, शेतकरी, कामगार वर्ग उपस्थित होता. तसेच अहमदनगर जिल्हयातील सर्व कम्युनिस्ट कार्यकर्ते शेतकरी कामगार मोठया संख्येने उपस्थित होते. परिषदेचे अध्यक्ष पदी बंगालमधील सुप्रसिध्द किसान सभेचे पुढारी कॉ. बंकिमचंद्र मुखर्जी यांच्या अध्यक्षतेखाली कामकाज सुरु होते. परिषदेच्या प्रारंभीच अंमळनेर येथील गिरणी कामगारांच्या संपात हुतात्मा झालेले कॉ.श्रीपत पाटील यांच्या मातोश्री पार्वतीबाई यांच्या हस्ते 'लाल ध्वज' फडकविण्यात आला होता. ठाणे जिल्हयाचे किसान सभेचे प्रमुख नेते शामराव गोदूताई या स्टेजवर विराजमान होत्या. तर समोर २० ते २५ हजार शेतकरी बसले होते. एवढया मोठया संख्येने शेतकऱ्यांनी परिषदेला उपस्थित राहणे हे चळवळीचे मोठे यश होते. प्रारंभी भाऊसाहेब थोरात यांनी प्रास्ताविकपर भाषणात अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचे आभार मानले. तसेच महाराष्ट्रातुन आलेल्या सर्व पाहुण्यांचे आभार मानुन आपल्या प्रास्ताविकपर भाषणात परिषदेची उद्दीष्टये स्पष्ट केली. ही परिषद केवळ जिल्हयातील शेतकऱ्यांसाठी महत्वाची नसून ती महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सावकारशाही जमिनदार वर्गाच्या वर्चस्वातून मुक्त करण्यासाठी आयोजित केली होती. सावकारशाहीला समुळ नष्ट करण्याच्या दृष्टीने भाऊसाहेबांनी आपली योजना परिषदेपुढे विशद केली. भाऊसाहेबांच्या प्रभावी वक्तृत्वशैलीमुळे उपस्थित जनसमुदाय भारावून गेला होता. भाऊसाहेबांनी भारतमातेच्या

मुक्ततेसाठी दिलेल्या हाकेने सर्वांना अश्रू अनावर झाले होते. स्वातंत्र्यप्रेम काय असते ते खऱ्या अर्थाने सर्वसामान्य शेतकऱ्यांना समजले होते. भाऊसाहेबांच्या प्रास्ताविकपर भाषणानंतर ठाणे जिल्हयातील किसान सभेचे प्रमुख शामराव परुळेकर यांनी आपल्या भाषणात ठाणे जिल्हयातील आदिवासी लोकांवर सावकार कशा प्रकारे पिढयानपिढया अन्याय करत आहेत. त्यांच्यावर वर्चस्व प्राप्त केले आहे. ते विशद केले. तसेच महाराष्ट्रातील सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या हालाखीस खऱ्या अर्थाने सावकारच कारणीभूत आहेत या सावकारशाहीच्या पाशातून सर्वसामान्य शेतकऱ्यांची मुक्तता करण्यासाठी शेतकरी वर्गाने संघटीत होण्याची वेळ आली आहे. ठाणे जिल्हयात टिटवाळा परिषद घेऊन गोदुताई व शामराम परुळेकरांनी सावकारशाही विरोधी केलेल्या आंदोलनाची ते उपस्थितांना वेळोवेळी आठवण करुन देत होते.[३३]

शामराव पुरुळेकरांच्या भाषणानंतर काही वक्त्यांची भाषणे झाली. त्यानंतर कॉ.बंकिमचंद्र मुखर्जी यांचे भाषण झाले. उंचीपुरी, भरदार आणि स्थुल शरीरयष्टी, गव्हाळ रंग, भव्य अशी गोल चेहरेपट्टी, टपोरे डोळे, डोक्यावरचा मानेपर्यंत रुळणारा दाट केशसंभार, अंगात खादीचा नेहरु शर्ट आणि एकटांगी धोतर असे त्यांचे प्रभावित करणारे भारदस्त व्यक्तीमत्व, धीरगंभीर आणि जबरदस्त असा वरच्या पट्टीचा आवाज आणि अविर्भावही श्रोत्यावर छात टाकीत होता. बोलण्यात त्यांच्या वैशिष्टयपुर्ण अशी ढंग होती. त्यांचे हिंदी भाषेतील भाषण श्रोते मंत्रमुग्ध होऊन ऐकत होते. कॉ.बंकिमचंद्र मुखर्जी यांचे भाषण म्हणजे वक्तृत्वाचा उत्कृष्ट नमुना होता. सुमारे तास दिड तास त्यांचे भाषण चालले होते. भाषण संपता सुर्य मावळतीला चालला होता. शेवटी आभार प्रदर्शनानंतर परिषदेचे काम संपले.

भाऊसाहेब व त्यांच्या सहकार्यांनी सर्वांची जेवणाची उत्तम व्यवस्था केली होती. रात्रीचे जेवण आटोपल्यानंतर रात्री शाहिर अमर शेख, शाहिर अण्णाभाऊ साठे, यांच्या कलापथकाचा कार्यक्रम होता. रात्री गावालगतच्या शेतातील मोठया पटांगणात कलापथकांचा कार्यक्रम झाला. कलापथकांच्या कार्यक्रमाला मोठी गर्दी झाली होती. गर्दीने कलापथकाचा आनंद द्विगुणीत झाला होता. शाहिर अमर शेख यांच्या अंगात तर वारेच भरले होते. अतिशय कौशल्यपूर्ण हावभाव करुन ते गाणी गात होते. 'अकलेची गोष्ट' हा शाहिर अण्णाभाऊ साठे यांचा वग चांगलाच गाजला. तर शाहिर अमर शेख यांची गाणी लोकांच्या मुखात बसली. तसेच शाहिर गव्हाणकरांच्या पोवाडयानेही श्रोत्यांवर चांगलाच प्रभाव टाकला

होता. श्रोतावर्ग पोट धरुन हसत होता. पोवाडयातुन गाण्यातुन लाल बावटयाची किमया विशद केली जात होती. पोवाडे, गाणी ऐकत रात्र केव्हा संपली हे कुणाच्याही लक्षात आले नाही.[३४]

करंजी परिषदेत शेतकऱ्यांच्या दृष्टीने अनेक महत्वाचे ठराव मंजुर झाले होते. ही आग भुकेची जळते आमच्या पोटी हे अमर शेख यांचे गाणे गुणगुणत हजारो शेतकरी नवी प्रेरणा घेऊन करंजीतुन आपआपल्या गावी परतली. कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढला होता. पुढचे काम आवेशाने करण्याची कार्यकर्त्यांची मनाची चागलीच तयारी झाली होती.[३५]

**४.४.६ करंजी येथील शेतकरी स्त्रियांच्या परिषदेतील भाऊसाहेब थोरात यांचे योगदान :-**

इ.स.१९४६ साली करंजी येथे झालेल्या परिषदेस स्त्रीयांचाही सहभाग होता. करंजी परिषदेने स्त्रीयांही प्रभावित झाल्या होत्या. जिल्हयातील शेतकरी स्त्रींयानी भाऊसाहेबांकडे स्त्रीयांची परिषद घेण्याचा आग्रह धरला असता भाऊसाहेबांनी स्त्रींयाचा उत्साह पाहून त्यांना सर्व प्रकारचे सहकार्य करण्याचे कबूल केले होते. परिषदेचे ठिकाण पाथर्डी तालुक्यातील करंजी येथे होते. या परिषदेचे अध्यक्ष म्हणून गोदूताई परुळेकरांना बोलविण्यात आले होते. स्त्रींयाच्या परिषदेला कम्युनिस्ट कार्यकर्ते चंद्रभान आठरे पाटील, बाबुजी आव्हाड, दादा राजळे, अण्णासाहेब शिंदे, रावसाहेब शिंदे यांनी सर्व प्रकारे सहकार्य केले.

परिषदेस जिल्हयातील शेतकरी स्त्रीया मोठया संख्येने उपस्थित होत्या. दोन दिवशीय या परिषदेतून गोदूताईच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांवर सावकार व जमिनदार वर्गाकडून होत असलेल्या अन्यायाविरोधी स्त्रींयानी देखील सहभागी होणे आवश्यक आहे. गोदूताईंनी आपल्या भाषणात जिजाबाई, लक्ष्मीबाई, ताराबाई शिंदे, अहिल्यादेवी होळकर अशा कर्तबगार स्त्रीयांची उदाहरणे देऊन स्त्रीयांचे आत्मबल वाढविले होते. स्त्रीयांना या परिषदेतुन एक नवी प्रेरणा मिळाली होती. परीषदेहुन माघारी गेल्यानंतर स्त्रीयांनी देखील आपल्या भागातील सावकारशाही विरोधी पुरुषाच्या बरोबरीने संघर्ष करण्याची तयारी दर्शविली होती. या परिषदेतून शेतकरी स्त्रीयांची खऱ्या अर्थाने जागृती घडून आली होती.[३६]

**४.४.७ राजापुर परिषदेतील भाऊसाहेब थोरात यांचे योगदान :-**

अहमदनगर जिल्हयातील संगमनेर तालुक्यातील राजापूर एक छोटेसे गाव प्रथमपासूनच राजकिय चळवळीत अग्रेसर होते. इ.स.१९४२ च्या स्वातंत्र्य लढयात देखील गावातील अनेकांनी भाग घेतला होता. तसेच कम्युनिस्ट पक्षांतर्गत देखील गावातील अनेकांनी महत्वपुर्ण योगदान दिले होते. राजापुरचे भास्करराव दूर्वे नाना यांनी तर संगमनेर

येथे राष्ट्रसेवा दलाची शाखा सुरु करुन तरुणांना स्वातंत्र्य लढयाची एक प्रकारे प्रेरणा दिली होती. राजापूर येथे परिषद घ्यावी असे तेथील कार्यकर्ते, शेतकरी यांना वाटत होते. त्यासंदर्भात त्यांनी भाऊसाहेबांकडे शेतकरी परिषद घेण्याविषयी आग्रह धरला होता. राजापूरमधील शेतकरी वर्गाचा व कार्यकर्त्यांचा उत्साह पाहून भाऊसाहेबांनी ९ मार्च १९५० रोजी परिषद घेण्याचे निश्चित केले होते. परिषदेपूर्वी जिल्हयात सर्वत्र प्रचार करण्यात आला. परिषदेच्या आदल्या दिवसांपासूनच लोक पायी, सायकलवर बैलगाडीतून राजापूरला येऊ लागले होते. परिषदेतील उपस्थितांची सर्व व्यवस्था भाऊसाहेबांनी व्यवस्थित केली होती. अहमदनगर जिल्हयातील कम्युनिस्ट कार्यकर्ते व शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते. पाथर्डी तालुक्यातील चंद्रभान आठरे पाटील, बाबुजी आव्हाड पाटील, राजळे, साहेबराव राजळे, राहुरी तालुक्यातील वांबोरीचे बाबा गोसावी, गुहाचे विनायकराव ताकटे पाटील, सात्रळचे पी.बी.कडू, जामखेडचे डॉ.महाजन, कोपरगावचे भाई रामभाऊ सावंत, यादवराव आढाव, म्हतू पाटील, बाबूराव कडू, विठ्ठलराव जमधाडे, दगडू पाटील कदम, रामजी कदम, श्रीरामपूरचे अण्णासाहेब शिंदे, रावसाहेब शिंदे, कोपरगावचे शंकरराव काळे, राहुरीचे दादासाहेब तनपुरे, शेवगावचे साहेबराव लंघे पाटील आदी कार्यकर्ते उपस्थित होते.[३७]

राजापुरचे विष्णुबुवा हासे, हौसाबाई कोंडाजी हासे, लहानुबाई खंडू हासे, तबा अमृता कानवडे,भाऊ बापु हासे, रखमाबाई हासे, बबूबाई भोकनळ, नबाजी भोकनळ, गंगाराम घोलप, पंढीनाथ सहाणे, गंगूबाई तुकाराम हासे आदींनी भाऊसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली प्रचार मोहिम यशस्वीपणे पार पाडली. ९ मार्च १९५० परिषदेचा दिवस उजाडला. अहमदनगर जिल्हयातील व जिल्हयाबाहेरील असे जवळपास ४०० ते ५०० लोकांचा जमाव जमला होता. परंतु गावातीलच सखाराम बगाजी हासे व गावातील इतरांचे जमत नव्हते. सखाराम हा कम्युनिस्टाच्या विरोधी होता. तो पोलीसांना कम्युनिस्टांच्या बातम्या देत होता. राजापूरच्या सभेची देखील सखारामने पोलिसांना माहिती दिल्याने परिषद चालू होण्यापूर्वीच पोलिसांनी मार्गातच परिषदेच्या ठिकाणी जाणाऱ्या जमावाला रोखण्याचा प्रयत्न केला. जणाव सारखा वाढु लागला. पोलिसांची व कार्यकर्त्यांची झटापट सुरु झाली. पोलिसांनी पुढे येणाऱ्या जमावाला पांगविण्यासाठी लाठीमार करायला सुरुवात केली. तरीही लोक मागे हटेनात. तेवढयात काही तरुण धिटाईने पुढे घुसले आणि त्यांनी पोलिसांच्या बदुकांनाच हात घातला. बंदुका हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला. ही हिसकाहिसकी सुरु

असतांना पोलिस पथकाला गोळीबार करण्याची ऑर्डर मिळाली. आणि पोलिसांनी गोळीबार करण्यास सुरुवात केली असता पोलिस गोळीबारात काशिनाथ कदम, मुरलीधर गोल्हेकर, मारुती गायकवाड, तसेच पोलिसाचा खबऱ्या सखाराम हासे यांना गोळया लागून ते ठार झाले. परिषदेतील लोक दिसेल त्या रस्त्याने पळत होते.

गोळीबारानंतर गावातील १०० ते १५० लोकांना अटक झाली होती. त्यांच्यावर खटले भरले. घरांची झडती घेतली. राजापूर गोळीबार घटनेने संपूर्ण महाराष्ट्रभर खळबळ उडाली. यातून महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ अधिक तीव्र बनली. लोक सरकारबरोबर संघर्ष करण्यास सिध्द झाले.

स्वातंत्र्य मिळवुनही शेतकऱ्यांवरील सावकारशाही जमिनदारांकडून होणारे अन्याय बंद झाले नव्हते. लोकांना आपल्याच शेतावर शेतमजुर म्हणून काम करावे लागे.[३८]

### ४.४.८ एरंडगाव परिषदेतील भाऊसाहेब थोरात यांचे योगदान :-

बाळासाहेब खेर मंत्री मंडळाने दुष्काळाचा सामना करण्यासाठी राज्यात जेथे तेथे ज्वारीचे पिक जास्त आले असेल अशा ठिकाणी सक्तीने लेव्हीच्या स्वरुपात धान्याची वसुली सुरु केली होती. स्वातंत्र्य मिळाले पण शेतकरी, कामगार, शेतमजुर यांच्या बाबतीत मात्र सरकारची धोरणे प्रतिगामी स्वरुपाची राहिली. डाव्या विचारांच्या राजकिय पक्षांनी त्यांना विरोध केला. परिणामी त्यावर सरकारने बंदी घातली. अनेकांना तुरुंगात टाकले. जे बाहेर राहिले ते भूमिगत झाले.

पण त्यांनी कार्य सोडले नाही. या चळवळीचा केंद्रबिंदु होता अहमदनगर जिल्हयात सरकारने सक्तीने धान्याच्या स्वरुपात लेव्ही वसुल करण्याचे धोरण अवलंबिले होते. प्रत्येक शेतकऱ्याने किमान धान्य लेव्ही म्हणून दिलेच पाहिजे असा सरकारी आदेश असल्याने ज्या शेतकऱ्यांच्या शेतात धान्य उत्पादन झाले नाही अशा शेतकऱ्यांना धान्य विकत घेऊन लेव्ही घालावी लागत होती. सरकारच्या या अन्यायी धोरणाविरोधी अहमदनगर जिल्हयात तीव्र आंदोलन उभे करण्याचा निश्चय झाला. भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली जिल्हयातील कॉ.एकनाथराव भागवत, कॉ.पी.बी.कडू पाटील, दादा पाटील राजळे, बाबुजी आव्हाड, शाहूराव कापरे, आबासाहेब काकडे, जनार्दन देवढे, रावसाहेब शिंदे, अण्णासाहेब शिंदे, धर्मा पोखरकर, बुवासाहेब नवले, आदी कम्युनिस्ट कार्यकर्ते शेतकरी आंदोलनात सक्रिय होते. आंदोलनाची सुरुवात शेवगाव तालुक्यातील एरंडगाव येथे परिषदेने झाली.[३९]

अहमदनगर जिल्हयातील शेवगाव तालुक्यातील एरंडगाव हे ज्वारी पिकाचे कोठार म्हणून या गावाची ख्याती होती. बाळासाहेब खेर सरकारच्या धोरणानुसार लेव्ही स्वरुपात ज्वारी येथील शेतकऱ्यांकडून सक्तीने गोळा केली जात होती. जमा झालेली ज्वारी बाहेर पाठविली जात होती. मात्र दुष्काळ आणि टंचाईच्या काळात सरकार शेतकऱ्यांना निळो जातीची ज्वारी खाण्यासाठी देत होते. सरकारच्या या अन्यायी धोरणाविरुध्द भाऊसाहेबांनी जिल्हयात तीव्र आंदोलन करण्याचे धोरण अवलंबिले.

या आंदोलनाचे नेतृत्व कॉ.भाऊसाहेब थोरात करत होते. भाऊसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली कॉ. एकनाथराव भागवत, कॉ.पी.बी.कडू पाटील, अचपळराव लांडे, दादा पाटील राजळे, बाबुजी आव्हाड, शाहुराव कापरे, आबासाहेब काकडे, जनार्दन देवडे, रावसाहेब शिंदे, अण्णासाहेब शिंदे, धर्मा पोखरकर, बुवासाहेब नवले आदी कम्युनिस्ट कार्यकर्ते अहमदनगर जिल्हयात सरकारच्या लेव्ही वसुली विषयी प्रचार करत होते.[४०]

अहमदनगर जिल्हयातील या प्रचार कार्याची खबर पोलिसांना समजताच पोलिसांनी कॉ.पी.बी.कडू पाटील, अचपळराव लांडे, दादा पाटील राजळे, बाबुजी आव्हाड, शाहुराव कापरे, आबासाहेब काकडे, जनार्दन देवढे यांना स्थानबध्द केले. तर इतर कार्यकर्ते भूमीगत होऊन कार्य करत होते. भूमीगत कार्यकर्त्यांनी संपूर्ण जिल्हयात सरकारच्या या धोरणाविषयी जागृती केली होती. सरकारने जिल्हयातील धान्य कोठारांच्या संरक्षणादाखाल पोलिस बंदोबस्तात वाढ केली होती. सरकारने बळाचा वापर सुरु केला होता. कदाचित प्राणहानी होईल अशी शंका येताच आपण हे आंदोलन थांबवावे असे काही कार्यकर्त्यांना वाटत होते.

मात्र सामान्य शेतकऱ्यांच्या भावना तीव्र असल्याने काहीही झाले तरी एरंडगाव येथून आंदोलनाला सुरुवात करायची असा निर्धार भाऊसाहेबांनी केला होता.[४१]

सामान्य शेतकरी वर्ग सरकारच्या या धोरणाने पेटून उठला होता. २४ मार्च १९४९ या दिवशी अहमदनगर जिल्हयातील शेतकरी मोठया संख्येने एरंडगावला जमले होते. सरकारी कर्मचारी गोदामातील धान्य पोती ट्रकमध्ये भरत असतांना आंदोलक शेतकऱ्यांनी त्यांना तीव्र विरोध केला. गोदामातील धान्य आमचे आहे. ते आम्ही बाहेर जाऊ देणार नाही अशी भूमिका आंदोलकांनी घेतली होती. अमेरिकेत जे धान्य डुकरांना घातले जाते ते धान्य निळो ज्वारी रेशनवर सरकार शेतकऱ्यांना देत होते.

रेशनवर दिली जाणारी निळो ज्वारी देणे बंद करा. आम्हाला आमचे धान्य दया अशी खंबीर भूमिका शेतकरी वर्गाने घेतली होती. गोदामा भोवताली मोठा पोलिस बंदोबस्त होता.

सरकारचा आदेश येताच पोलिसांनी निरपराध शेतकऱ्यांवर गोळया झाडण्यास सुरुवात केली होती. या अमानुष गोळीबारात पंढरीनाथ भागवत, आवडाबाई तांबोळी, अक्षाजी कुरुंजकर, मुमुलाबाई, दामोदर कवळे या शेतकऱ्यांना आपल्या प्राणास मुकावे लागले तर अनेक शेतकरी जमखी झाले होते. सरकारच्या या कठोर भूमिकेवर महाराष्ट्रातील सर्व वृत्तपत्रातून टिका, लेख छापले गेले. सरकारच्या या धोरणाची चौकशी व्हावी अशी मागणी सर्वत्र होऊ लागली होती. नगरच्या 'इन्किलाब' या वर्तमानपत्राने आपल्या अग्रलेखाची जागा दोन महिने कोरी ठेवून या आंदोलनावर गोळीबार करणाऱ्या सरकारचा निषेध केला. सरकार फक्त गोळीबार करुन थांबले नाही तर सरकारने अनेकांना अटक करुन तुरुंगात टाकले होते. सरकारविरोधी या आंदोलनात भाऊसाहेबांना शेतकरी वर्गाने साथ दिली होती. भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनाने शेतकरी वर्गास आपल्या हक्काची जाणिव झाली.[४२]

## ४.६ भाऊसाहेब थोरात यांचे स्थानिक स्वराज्य संस्थेतील राजकिय कार्य :-

स्थानिक स्वशासन व्यवस्था जशी लोकशाही प्रक्रियेची कोनशिला आहे. तशीच स्थानिक पातळीवरील दैनंदिन व विकासात्मक गरजा पूर्ण करणारी प्रभावशाली यंत्रणाही आहे. वास्तविक स्थानिक स्वशासन व्यवस्था ही आधुनिक काळाची गरज असली तरी जगातल्या विविध देशांतील ऐतिहासिक संदर्भावरुन असे दिसून येते की, स्थानिक स्वशासन व्यवस्थेच्या निर्मितीला एक गौरवशाली परंपरा लाभलेली आहे. अर्थात स्थानिक स्वशासन विविध देशांच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक, राजकिय व भौगोलिक वारसाचे प्रतिक असून कल्याणकारी राज्य निर्मितीसाठी स्थानिक पातळीवर सत्ता रुजविण्याची व शासनाच्या कार्यात जनसहभाग वाढविण्याची ती एक प्रक्रिया आहे. स्थानिक स्वशासनामुळे राष्ट्रीय कार्यक्रमाची अमंलबजावणी करणारी एक प्रभावी यंत्रणा निर्माण झाली असुन या यंत्रणेने स्थानिक जनतेला लोकशाहीप्रती प्रशिक्षीत व राजकिय प्रक्रियेप्रती जागरुकता निर्माण केली आहे.[४३]

पंचायत राज संस्थांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी केंद्रशासनाने वेळोवेळी कायदे केले आहेत. तसेच संस्था विकासासाठी विविध समित्यांची वेळोवेळी नेमणूक केलेली दिसून येते. त्यातील बलवंतराय मेहता समितीचा अहवाल राष्ट्रीय विकास मंडळाने इ.स.१९५८ मध्ये स्वीकारला.त्यानंतर १ मे १९६० रोजी मुंबईसह सयुक्त महाराष्ट्र अस्तित्वा आला महसूलमंत्री

वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली २७ जून १०६० रोजी एक समिती स्थापन करण्यात आली. या समितीने १५ मार्च १९६१ रोजी आपल्या २२६ शिफारशी सादर केल्या. समितीच्या या शिफारशीनुसार महाराष्ट्रात जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम इ.स.१९६१ मंजूर करण्यात आला. त्यानुसार १ मे १९६२ पासून महाराष्ट्रात त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था अंमलात आली. या समितीच्या शिफारशीनुसार राज्यात गावपातळीवर ग्रामपंचायत, तालुका पातळीवर पंचायत समिती व जिल्हा पातळीवर जिल्हा परिषदेची स्थापना करण्यात आली.[४४]

**४.६.१ ग्रामपंचायत :-**

भारतात प्राचीन काळापासून गाव पातळीवर स्थानिक शासनाचे अस्तित्व होते. गावचा कारभार हा पंचायतीकडून पाहिला जात होता. गावाच्या गरजा गावातच भागविल्या जात होत्या. गाव हे एक स्वयंपूर्ण पंचायत शासनच होते.

वैदिक काळ, रामायण, महाभारत, मनुस्मृती, बौध्दकालीन जातक कथा, नारद स्मृती, दक्षिण भारतातील शिलालेख, कौटिल्याचे अर्थशास्त्र, मौर्य काल, मोगल कालखंड या कालखंडामध्ये ही ग्रामपंचायत या स्थानिक व्यवस्थेचे महत्व विशद केल्याचे दिसून येते. ब्रिटिश कालखंडात ही स्थानिक पातळीवर ग्रामंपचायत ही शासन व्यवस्था अस्तित्वात होती. इ.स.१९३५ च्या कायदयानुसार स्थानिक पातळीवर ग्रामपंचायतीची स्थापना झाली असली तरीही या संस्थेची आर्थिक नाडी ब्रिटिशांनी स्वतःच्या हातात ठेवल्याने ही संस्था फारसे चांगले काम करु शकली नाही. मात्र स्वातंत्र्योत्तर काळात या संस्थेचा विकास झाला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राज्य घटनेच्या ४० व्या कलमात ग्रामपंचायतीची तरतूद करण्यात आली. ग्रामपंचायती कार्यक्षम बनविण्यासाठी केंद्रशासनाने विविध समित्या नेमल्याचे दिसून येते. बलवंतराय मेहता समितीचा अहवाल राष्ट्रीय विकास मंडळाने इ.स.१९५८ साली स्विकारला. त्यानंतर महाराष्ट्रात मुंबई ग्रामंपचायत अधिनियम मंजूर करण्यात आला होता. १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आला. त्यानंतर वसंतराव नाईक समितीच्या शिफारशीनुसार १ मे १९६२ पासून महाराष्ट्रात गावपातळीवर ग्रामपंचायत स्थापन करण्यात आली.[४५]

१४ जानेवारी १९६२ रोजी संगमनेर येथील नेहरु चौकात यशवंतराव चव्हाण यांच्या उपस्थित झालेल्या जाहिर सभेमध्ये काँग्रेस पक्षात भाऊसाहेबांनी प्रवेश केला. आणि खऱ्या अर्थाने भाऊसाहेबांच्या राजकिय कार्याला चालना मिळाली.

भाऊसाहेबांच्या काँग्रेस प्रवेशाने जिल्हयातील अनेक नेत्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. थोडयाच कालावधीत भाऊसाहेब जिल्हा काँग्रेसचे नेतृत्व करु लागले. जिल्हयात राजकिय वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी भाऊसाहेबांनी प्रथम संगमनेर तालुक्यावर आपले वर्चस्व प्राप्त करतांना तालुक्यातील कार्यकर्त्यांचे संघटन घडवुन आणले. भाऊसाहेबांनी तालुक्यातील प्रत्येक गावी दौरे काढले, थोडयाच कालावधीत तालुक्यातील बहुतेक ग्रामपंचायतीवर काँग्रेस पक्षाचे वर्चस्व प्राप्त करण्यात यश मिळविले. तालुक्यातील हा प्रयोग भाऊसाहेबांनी काँग्रेस पक्षांतर्गत जिल्हयातही राबविला. आणि थोडयाच कालावधीत जिल्हयात काँग्रेस पक्षाचे वर्चस्व प्राप्त झाले.[४६]

### ४.६.२ पंचायत समिती :-

जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायत यांच्यातील मध्यस्थ व दूवा म्हणून पंचायत समितीची भूमिका असते. जिल्हा परिषदेच्या कामकाजात मदतनीस म्हणून पंचायत समितीला महत्व आहे.[४७]

महाराष्ट्रात वसंतराव नाईक समितीच्या शिफारशीनुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम इ.स.१९६१ मंजूर करण्यात आला होता. या कायदयानुसार तालुका स्तरावर जी प्रशासकीय संस्था स्थापना करण्यात आली ती संस्था म्हणजेच पंचायत समिती होय. महाराष्ट्रात जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाच्या कलम ५६ मध्ये पंचायत समिती स्थापनेबाबत तरतूद करण्यात आली आहे.[४८]

तर भारतात विकास गटावर कार्य करणाऱ्या ६०९७ पंचायत समित्या अस्तित्वात आहेत. तर महाराष्ट्रात ६५७ तालुके मात्र ३५१ तालुक्यातच पंचायत समित्या सध्या अस्तित्वात आहेत. कारण नागपूर, ठाणे, पूणे, उल्हासनगर हे चार तालुके पुर्णतः शहरी असल्याने तेथे पंचायत समित्या स्थापन केलेल्या नाहीत.[४९]

अहमदनगर जिल्हयात १४ तालुके असून १४ पंचायत समित्या अस्तित्वात आहे. भाऊसाहेब थोरात यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यानंतर सातत्याने जिल्हयात दौरे केले. आणि जिल्हयातील पंचायत समित्यांवर आपल्या पक्षाचे वर्चस्व प्राप्त करण्याच्या दृष्टीने कार्यकर्त्यांमध्ये जागृती घडवून आणली. भाऊसाहेबांनी संगमनेर पंचायत समितीवर काँग्रेस पक्षाचे वर्चस्व प्राप्त केले. आणि पंचायत समितीच्या माध्यमातून गावागावात विविध योजनांच्या माध्यमातून विकास घडवून आणला. हाच आदर्श त्यांनी जिल्हयातील काँग्रेस कार्यकर्त्यांपुढे ठेवल्याने तो जिल्हयातील काँग्रेस कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारा ठरला.

भाऊसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली थोडयात कालावधीत जिल्हयातील बहुतेक पंचायत समितीत्यावर काँग्रेस पक्षाचे वर्चस्व प्राप्त होऊ शकले. अहमदनगर जिल्हयात सातत्याने काँग्रेस पक्षाने आपले राजकीय अस्तीत्व टिकवुन ठेवले आहे. नव्हे काँग्रेस पक्ष जिल्हयातील एक नंबरचा पक्ष म्हणून ओळखला जात आहे.

पंचायत समितीच्या माध्यमातून भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हयात विविध योजनांचा लाभ जनतेला मिळवुन दिला.

म.गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, संपूर्ण स्वच्छता अभियान, निर्मलग्राम योजना, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, पिण्याच्या पाण्याचे व्यवस्थापन, पर्यावरण संतुलित समृध्द गाव योजना, म.गांधी तंटामुक्त योजना, संत तुकाराम वनग्राम योजना, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, इंदिरा आवास योजना, तिर्थक्षेत्र विकास योजना, राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना, वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अनुदान, फळबाग लागवड कार्यक्रम, राजमाता जिजाऊ कुपोषणमुक्त ग्रामअभियान, एकात्मिक उर्जा कार्यक्रम, राष्ट्रीय बायोगॅस विकास योजना, ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रम, मागासक्षेत्र अनुदान निधी, आवर्षण प्रवण क्षेत्रविकास कार्यक्रम, राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना, पंतप्रधान रोजगार योजना, संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना, जीवनदायी आरोग्य योजना, आदिवासी उपयोजना, कार्यक्रम, पर्यावरण संतुलित समृध्द योजना, पवन उर्जा, गोबरगॅस, सौरउर्जा, बसथांबा, पर्यावरण, सांडपाणी, घनकचरा, वृक्षसंवर्धन, रोपवाटीका, उद्याने, रस्त्यासाठी उपक्रम, राजीव गांधी घरकुल योजना अशा विविध योजनांच्या माध्यमातून तालुक्यातील आरोग्य, निवारा, कृषी, रोजगार, पर्यावरण संतुलन, बालकल्याण अशा विविध योजनांचा लाभ मिळवुन दिला. आणि जिल्हयाचा सामाजिक, आर्थिक, राजकिय विकास घडवुन आणण्यात महत्वपूर्ण योगदान दिले. पंचायत समितीच्या माध्यमातून भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हयात आपले राजकिय वर्चस्व वाढविले. पर्यायाने जिल्हयात काँग्रेस पक्ष प्रबळ पक्ष म्हणुन पुढे आला.[५०]

### ४.६.३ जिल्हा परिषद :-

भारतीय विकास योजनांच्या दृष्टीने जिल्हा हा पायाभूत घटक मानला जातो. म्हणूनच जिल्हा विकासाच्या दृष्टीने महाराष्ट्राने इ.स.१९६२ मध्ये स्विकारलेल्या त्रिस्तरीय आकृतीबंधातील जिल्हा परिषद ही सर्वोच्च संस्था आहे. जिल्हा हा विकासाचा केंद्रबिंदु

मानल्यामुळे जिल्हा परिषदांना खूप महत्व आहे. जिल्हा परिषद जर सक्षम असेल तर ग्रामीण भागाचा विकास वेगाने होण्यास मदत होत असते.

महाराष्ट्रात जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम ६ नुसार जिल्हा परिषदांची स्थापना करण्यात आली. वसंतराव नाईक समितीने जिल्हा परिषदेला अधिक अधिकार देण्याची शिफारस केली होती. महाराष्ट्रात इ.स.१९६२ पासून जिल्हा परिषदेची स्थापना करण्यात आली आहे.

भारतात ५३८ तर महाराष्ट्रात ३६ जिल्हे असून मुंबई व मुंबई उपनगर हे दोन्ही नागरी जिल्हे वगळता ३४ जिल्हा परिषदा आहेत. जिल्हा परिषदेसंबधीत जिल्हयातील महापालिका व नगरपालिकांचे क्षेत्र येत नाही.[५१]

### ४.६.४ जिल्हा परिषदेची रचना :-

जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाच्या कलम ९-१ अ नुसार राज्य निवडणुक आयोग जिल्हयाच्या लोकसंख्येनुसार जिल्हा परिषदेची सदस्य संख्या निश्चित करते. साधारण ४० हजार लोकसंख्येमागे एक जिल्हा परिषद सदस्य असतो. जिल्हा परिषदेत कमीत कमी ५० व जास्तीत जास्त ७५ सदस्य असतात. हे सर्व सदस्य प्रौढ गुप्त मतदान पध्दतीने प्रत्यक्ष निवडणुकीतून निवडले जातात. जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा कार्यकाल हा अडीच वर्षाचा आहे. तर पंचायत समिती सभापती, उपसभापती यांचा कालावधी हा पाच वर्षाचा होता. युती शासनाच्या काळात तो एक वर्षाचा करण्यात आला. तर २ मार्च २००० मध्ये करण्यात आलेल्या कलम ४३-१, ६५ व ८३-६ मधील सुधारणांनुसार आता जिल्हा परिषदांचा अध्यक्ष, उपाध्यक्ष, विषय समिती सभापती, पंचायत समिती सभापती, उपसभापती या पदांची मुदत आता अडीच वर्ष करण्यात आली आहे.[५२]

जिल्हा परिषद ही जिल्हयाच्या विकासाचा आत्मा आहे. हे भाऊसाहेबांनी ओळखले होते. म्हणून भाऊसाहेब थोरात यांनी प्रथम जिल्हयातील कार्यकर्त्यांचे संघटन करुन जिल्हयातील ग्रामपंचायत, पंचायत समित्यावर काँग्रेस पक्षाचे वर्चस्व प्राप्त केले. त्यानंतर जिल्हा परिषदेवरही वर्चस्व प्राप्त करुन काँग्रेस पक्षांतर्गत जिल्हयाचा सामाजिक, आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी महत्वपूर्ण कार्यास सुरुवात केली.

भाऊसाहेब थोरात यांनी सातत्याने जिल्हा परिषदेवर कॉग्रेस पक्षाचे वर्चस्व ठेवण्यात यश मिळविले होते. भाऊसाहेबांनी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून जिल्हयातील शेतकऱ्यांचा सर्वांगिण विकास साध्य करण्याच्या दृष्टीने अनेक कृषीसुधार योजनांचा शेतकऱ्यांना लाभ

मिळवुन दिला. तसेच जिल्हयातील पशुसंवर्धन, दुग्धशाळा विकास, वने, समाजकल्याण, शिक्षण, आरोग्य व वैद्यकिय सेवा, इमारत व दळणवळण, जलसिंचन मागासवर्गीय, आर्थिक विकास, अस्पृश्यता निवारण विषयक कार्य, गृहनिर्माण, धर्मशाळा, विश्रांतीगृह गावपातळीवर गावातील दैनंदिन शासकिय सेवा अशा विविध योजनेअंतर्गत जिल्हयातील शेतकरी, कामगार लघुउद्योग करणारे कारागिर, कलाकार अशा सर्वच क्षेत्राचा विकास करत असतांना भाऊसाहेबांनी जिल्हयातील सर्व कॉंग्रेस कार्यकर्त्यांचे संघटन करुन प्रथम त्यांच्यात एकत्व निर्माण केले होते. भाऊसाहेबांच्या या कार्यामुळे अहमदनगर जिल्हयातील कॉंग्रेस पक्ष आजही एक प्रबळ राजकिय पक्ष म्हणूनच ओळखला जातो. जिल्हयातील कॉंग्रेस पक्षाच्या कार्यामुळे साहजिकच राज्य पातळीवरील देश पातळीवर राजकारणात देखील अहमदनगर जिल्हयाचा सहभाग महत्वपूर्ण ठरत आहे. हे सर्व सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी सहकाराच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयात सहकाराचे बिजारोपण करुन सहकाराच्या माध्यमातून जिल्हयात कॉंग्रेस पक्षाची सत्ता प्रबळ बनवली होती. त्यामुळे आजही देशाच्या राजकारणात अहमदनगर जिल्हा हा एक महत्वपूर्ण जिल्हा म्हणून ओळखला जातो.[५३]

**४.६.५ नगरपालिका :-**

मोठया शहरासाठी महानगरपालिका असते. त्याचप्रमाणे छोटया शहरांचा कारभार पाहण्यासाठी नगरपालिका किंवा नगरपरिषदेची स्थापना करण्यात येते. नगरपालिकेचा कारभार हा नागरी अधिनियम १९६५ नुसार चालविला जातो. महाराष्ट्र राज्यात एकूण २२३ नगरपालिका असून त्यांची लोकसंख्येनुसार अ,ब,क असे वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार ४० हजारापेक्षा कमी लोकसंख्या असलेली नगरपालिका 'क' वर्गात असते. ४० ते एक लाख लोकसंख्या असलेल्या शहरास 'ब' वर्ग नगरपालिका तर एक लाखाहून अधिक लोकसंख्या असलेल्या नगर परिषदेस 'अ' वर्गात समावेश केला जातो. लोकसख्येंच्या निकषानुसार नगरपालिकेत कमीत कमी १७ व जास्तीत जास्त ६५ सभासद असतात.

नगरपरिषदेचे सदस्य हे प्रौढ व गुप्त मतदान पध्दतीने निवडले जातात. नगरपरिषदेच्या एकुण सदस्य संख्येच्या ५० टक्के जागा या महिलांसाठी आरक्षित असतात. तर लोकसंख्येनुसार स्विकृत सदस्य ही घेतले जातात. नगरपरिषदेचा कार्यकाल हा पाच वर्षाचा असतो. नगरपरिषदेच्या सदस्याचा कालावधी ही पाच वर्षाचा असतो. नगरपरिषदेच्या निवडून आलेल्या सदस्यांतून अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवड केली जाते.[५४]

भाऊसाहेब थोरात यांनी इ.स.१९६२ साली काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यानंतर सातत्याने संगमनेर नगरपालिकेवर काँग्रेस पक्षाचे वर्चस्व प्राप्त केले होते. भाऊसाहेबांनी नगरपालिकेच्या माध्यमातून संगमनेर शहरातील पाणीपुरवठा, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, आरोग्य सेवा, रुग्णालये, साफसफाई, कचऱ्यांची विल्हेवाट, ड्रेनेजची व्यवस्था, जन्म मृत्युची नोंद, क्रिडांगणे, वाचानालयाची उभारणी, रस्त्यांची व्यवस्था, वृक्षारोपण अशा सर्व बाबींकडे सातत्याने लक्ष देऊन संगमनेर शहराचा चेहरा मोहराच बदलून टाकला आहे.[५५]

सद्यः स्थितीला संगमनेर नगरपालिकेच्या अध्यक्षा म्हणून भाऊसाहेबांच्या कन्या दुर्गाताई सुधीर तांबे या योग्य प्रकारे काम पाहत आहेत. दुर्गाताई वडिलांप्रमाणे दुरदृष्टीच्या असल्याने नगरपालिकेच्या अध्यक्षा म्हणून त्यांनी संगमनेर शहरास एक आदर्श शहर बनविण्याचा जणू चंगच बांधला आहे. शहरातील रस्ते, सांडपाणी, आरोग्य, शिक्षण, बालकल्याण, महिला सबलीकरण, वृक्षारोपण, स्वच्छता अशा विविध कामातून त्यांनी संगमनेर शहराच्या विकासासाठी मोठे योगदान त्या देत आहेत.

भाऊसाहेबांनी प्रथम स्थानिक राजकारणात आपला पाया भक्कम केल्यानंतर जिल्हयातील राजकारणावर लक्ष केंद्रीत करुन काँग्रेस पक्षाअंतर्गत जिल्हयातील बहुतेक नगरपालिकांवर काँग्रेस पक्षाचे वर्चस्व प्राप्त करण्यात महत्वपूर्ण योगदान दिले होते. नगरपालिकेच्या माध्यमातून भाऊसाहेबांनी जिल्हयातील काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या साहयाने जिल्हयाचा सामाजिक आर्थिक, राजकिय विकास घडवून आणण्यात महत्वपूर्ण योगदान दिले आहे.[५६]

## ४.७ भाऊसाहेब थोरात यांचे विधानसभेतील कार्य :-

भाऊसाहेबांचे घराणे पाटील घराणे असल्याने मुळातच भाऊसाहेबांवर सामाजिक कार्याचे संस्कार घरातुनच झाले होते. घरातुन झालेल्या संस्कारातुन भाऊसाहेब सामाजिक कार्याकडे विद्यार्थी दशेपासुनच ओढले गेले होते. स्वातंत्र्य पुर्व स्वातंत्र्य चळवळ, सावकारशाही, जमिनदारी विरोधी तर स्वातंत्र्योत्तर काळात सावकारशाही विरोधी व कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी संघर्ष करत होते. तर शेवटी सहकाराच्या माध्यमातून जिल्हयाचा विकास करत असतानाच भाऊसाहेबांनी राजकिय क्षेत्रातही आपली एक वेगळी ओळख निर्माण केली होती. सुपरवायझिंग युनियनेच अध्यक्ष, जिल्हा लोकल बोर्ड सदस्य, सहकारी साखर कारखाना अध्यक्ष, राजहंस दूध संघ अध्यक्ष असे पदे उपभोगत असतांनाच

भाऊसाहेबांनी आपल्या संघटन कौशल्याद्वारे अहमदनगर जिल्हयातील बहुतेक स्थानिक स्वराज्य संस्थावर काँग्रेस पक्षाचे वर्चस्व प्राप्त करण्यात यश मिळवुन दिले होते. संपूर्ण जिल्हाच काँग्रेसमय झाला होता.[५७]

दुसरीकडे आणिबाणीनंतर झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये केंद्रात जनता पक्षाचे सरकार निवडून आले होते. मात्र महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाची सत्ता होती. असे असले तरी काँग्रेस अंतर्गत मतभेद वाढीस लागले होते. केंद्रातील जनता पक्षाच्या सरकारचा परिणाम काँग्रेस पक्षात फुट पाडण्यात झाला. यातुन यापुढे राज्यात काँग्रेसला चागले दिवस येणे शक्य नाही असे समजुन शंकरराव चव्हाण, बाळासाहेब विखे, अण्णासाहेब म्हस्के, बी.जे.खताळ व त्यांना मानणाऱ्या काँग्रेस कार्यकर्त्यांनी 'महाराष्ट्र समाजवादी काँग्रेस' पक्षाची स्थापना केली. आणि इ.स.१९७८ साली होणाऱ्या विधानसभेसाठी काँग्रेसच्या विरोधात निवडणुक लढविण्यासाठी 'मसका' पक्षाने महाराष्ट्रात जनता पक्षाशी गटबंधन केले होते.

तसेच यशवंतराव चव्हाण, वसंतरावदादा, वसंतराव नाईक, अण्णासाहेब शिंदे व त्यांना मानणाऱ्या काँग्रेस पक्षातील कार्यकर्त्यांनी इ.स.१९७८ साली विधानसभेची निवडणूक स्वतंत्रपणे 'चरखा' या चिन्हावर लढविण्याचा निर्णय घेतला. काँग्रेस पक्षांतर्गत हे नाटय घडत असतांनाच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाच्या संसदीय मंडळाने भाऊसाहेबांना मुंबईला बोलावून घेतले आणि संगमनेर विधानसभा मतदारसंघातुन अधिकृत काँग्रेस पक्षाची उमेदवारी देण्याची तयारी दर्शविली असता भाऊसाहेबांनी निवडणूक लढविण्याची तयारी दर्शविल्याने भाऊसाहेबांची इ.स.१९७८ च्या संगमनेर विधानसभा मतदार संघातील उमेदावारीला हिरवा कंदील मिळाला आणि भाऊसाहेबांनी संगमनेरला आल्यानंतर आपल्या निवडणूक कार्यास प्रारंभ केला. भाऊसाहेबांच्या विरोधात महाराष्ट्र समाजवादी काँग्रेस पक्षाने जनता पक्षाशी आघाडी करुन बी.जे.खताळ यांना भाऊसाहेबांच्या विरोधात उमेदवारी दिली. बी.जे.खताळ यांनी जनता पक्षाची 'नांगरधारी शेतकरी' ही निशाणी घेतली. तसेच काँग्रेस आय पक्षातर्फे गुंजाळदादा व हैदर पटेल या दोन उमेदवारांनी पक्षाच्या उमेदवारीची पत्रे आणली होती. परंतु गुंजाळदादा व हैदर पटेल या दोन उमेदवारांपैकी पक्षाचा अधिकृत उमेदवार निश्चित न झाल्याने दोघांनीही इतर चिन्हावर निवडणूक लढविली.[५८]

भाऊसाहेबांनी सहकाराच्या माध्यमातुन अहमदनगर जिल्हयातील काँग्रेस कार्यकर्त्यांचे संघटन घडवुन आणले होते. तसेच सहकाराच्या माध्यमातून जिल्हयाच्या विकासात महत्वपूर्ण योगदान दिले होते. जिल्हयातील बहुतेक स्थानिक स्वराज्य संस्थांवर

भाऊसाहेबांच्या धोरणातून कॉंग्रेस पक्षाचे वर्चस्व असल्याने जिल्हयात कॉंग्रेस पक्ष हा प्रबळ पक्ष होता. तसेच भाऊसाहेब थोरात ज्या संगमनेर मतदार संघातुन निवडणुकीस उभे होते त्या संगमनेर तालुक्यातील ग्रामपंचायत, पंचायत समिती या स्थानिक स्वराज्य संस्था तसेच संगमनेर नगरपालिका, तालुक्यातील सहकारी विविध कार्यकारी सोसायटया, सुपरवायझिंग युनियन, शेतकी संघ, सहकारी साखर कारखाना, आदी संस्थांच्या माध्यमातून भाऊसाहेबांनी गावपातळीपासून ते तालुका पातळीपर्यंत कॉंग्रेसचा प्रचार करुन आपल्या सभोवती कार्यकत्यांची एक मोठी फळी उभी केली होती. गावागावातील कार्यकर्त्यांच्या संपर्कानुसार भाऊसाहेबांनी निवडणूक दिवसापर्यंतच्या प्रचार कार्यक्रमाची आखणी केली होती.[५९]

प्रत्येक दिवसांचा नियोजनपुर्वक दौरा आखला होता. प्रचारकार्य करतांना कार्यकर्त्यांचे गटवार विभाजन करुन त्यांना ठराविक विभागाची जबाबदारी सोपविली होती. बाहेरगावी असलेल्या मतदारांना आणण्यासाठी देखील विभागवार कार्यकर्ते नेमले होते. भाऊसाहेब आपल्याबरोबर ४० ते ५० कार्यर्त्यांचा समुह घेऊन गावागावात जाऊन भेटीगाठी, सभा घेत होते.

तालुक्यातील प्रत्येक गावात भाऊसाहेबांनी जे निष्ठावंत कार्यकर्ते निर्माण केले होते. ते भाऊसाहेब थोरात गावात येण्यापूर्वीच सभेचे ठिकाण, तेथील नियोजन, सकाळ संध्याकाळच्या जेवणाची व्यवस्था, गावातील लोकांना सभेसाठी बोलावणे अशी सर्व कामे स्थानिक कार्यकर्ते उत्तम प्रकारे पार पाडत होते.

सहकाराच्या माध्यमातून तालुक्याचा नव्हे तर जिल्हयाचा विकास घडवुन आणणाऱ्या भाऊसाहेबांना प्रचार खर्चासाठी प्रत्येक गावातील कार्यकर्त्यांनी निधी जमवून तो गावातील सभेदरम्यान उमेदवार भाऊसाहेब थोरात यांना देत असत. निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांचा उत्साह एवढा वाढला होता की कार्यकर्त्यांनी जमा केलेला निधी हा जादा होऊ लागल्याने भाऊसाहेबांनी शेवटी शेवटी तर जमा केलेला निधी गावात निवडणुकीच्या दिवशी खर्च करण्याची आज्ञा आपल्या कार्यकर्त्यांना दिल्या होत्या. भाऊसाहेब थोरात यांच्या विरोधात उभे राहणारे प्रबळ उमेदवार महाराष्ट्र समाजवादी कॉग्रेस पक्षाचे बी.जे.खताळ पाटील हे इ.स.१९६२ पासून आमदार व बरीच वर्षे मंत्री होते. त्यांना मानणारे कार्यकर्ते देखील गावोगावी असल्याने भाऊसाहेबांनी प्रचार दौऱ्यांचा कार्यक्रम अतिशय नियोजनपूर्वक आखलेला होता. भाऊसाहेबांना देखील मतदार संघात प्रत्येक गावात वाडी वस्तीवर चांगला प्रतिसाद मिळत होता. तर बी.जे.खताळ पाटील इ.स.१९६२ पासून संगमनेर तालुक्याचे

आमदार म्हणुन नेतृत्व करत असल्याने या निवडणुकीत एक वेगळीच रंगत भरली होती. भाऊसाहेबांचे कार्यकर्ते व भाऊसाहेब गावागावातून महाराष्ट्र समाजवादी काँग्रेस पक्षाच्या ध्येयधोरणावर घणाघाती हल्ला चढवत होते.[६०]

निवडणूक प्रचाराने संगमनेर तालुकाच जणू काँग्रेसमय झाल्याचे भासत होते. रात्रंदिवस प्रचार करत एकामागून एक दिवस लोटत होते. निवडणुकीची प्रचार मोहिम अंतिम टप्प्यात आली होती. भाऊसाहेबांचे ग्रामीण भागातील कार्यकर्ते ही जीव ओतून प्रचाराचे काम करत होते. संगमनेर शहरात मुस्लीम समाज मोठया संख्येने असल्याने शहरात मत विभाजन होण्याचा धोका भाऊसाहेब थोरात जाणून होते. परंतु सुरुवातीपासून भाऊसाहेबांना मानणारे एकनिष्ठ मुस्लीम कार्यकर्तेही भाऊसाहेबांनी निर्माण केले असल्याने मुस्लीम समाजाच्या मताची जबाबदारी सय्यद गुलामनबी मकबूल उर्फ छोटू फिटर, रहिमतुल्ला खान, अकबर खान, पिरमहंम्मद सर, आदी मुस्लीम कार्यकर्त्यांनी प्रचार काळात आपली सर्व कामे बंद ठेवत प्रचारात सक्रिय होत संगमनेर शहरातील मुस्लीम मतपरिवर्तन करण्यात यश मिळवुन दिले होते. एवढेच नव्हे तर मुस्लीम मते भाऊसाहेबांना मिळवुन देण्यासाठी मुस्लीम कार्यकर्त्यांनी मुंबईला जाऊन मुस्लीम लिगचे खासदार जी.एस. बनातवाला यांना भाऊसाहेबांच्या प्रचारासाठी संगमनेर शहरात सभा घेण्याची विनंती केली. आणि त्यांच्या होकारानंतर ठरल्याप्रमाणे संगमनेर शहरातील निवडणुक प्रचार संपण्याच्या आदल्या दिवशी सय्यदबाबा चौकात मुस्लीम लिगचे खासदार जी.एस. बनातवाला यांची सभा असल्याने मुस्लीम बांधव मोठया संख्येने सभेस उपस्थित होते. खासदार जी.एस. बनातवाला यांचे भाषण फारच प्रभावी होते. या भाषणाने मुस्लीम मतदार प्रभावीत झाले होते. भाऊसाहेब थोरात यांनाच मते का दयायची याचे खासदार जी.एस.बनावतवाला यांनी केलेले विवेचन अफलातून होते. त्यांच्या एकाच सभेने मुस्लीम मतदारांची नाराजी दूर होऊन त्यांनी भाऊसाहेबांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आश्वासन दिले. आणि येथेच निवडणुकीचे पारडे फिरले गेले. ही सर्व किमया भाऊसाहेबांनी कार्यकर्त्यांमध्ये आपल्या विषयी निर्माण केलेल्या आत्मीयतेमुळे घडली होती. सभा संपताच संगमनेर शहरातून फार मोठी शोभायात्रा काढण्यात आली. भाऊसाहेब खुल्या मोटारीत उभे राहुन हात जोडून शहरातील मतदारांना विनंतीपर संकेत देत होते. तर कार्यकर्ते मोठमोठयाने घोषणा देत होते. शोभायात्रेस हजारो लोक आपण होऊन सहभागी झाले होते. संपूर्ण संगमनेर शहर घोषणांनी जणु काँग्रेसमय झाल्याचा आभास होत होता. शोभायात्रा पाहुनच भाऊसाहेबांचा

विजय निश्चित होणार असे सुर लोकांमधुन ऐकू येऊ लागले होते. सर्वसामान्य जनतेचीही खात्री पटल्याने त्यातुन अनेकांचे मतपरिवर्तन घडून आले.

दूसऱ्या दिवशी मतदान झाले. भाऊसाहेबांना संगमनेर शहरातुनही चांगला प्रतिसाद मिळाला. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील जनतेचाही चांगला प्रतिसाद दिसून येत होता. मतमोजणीच्या दिवशी भाऊसाहेब आपल्या कार्यकर्त्यांसह मतमोजणी केंद्रावर सकाळी आठ वाजता पोहोचले. सर्व कार्यकर्ते आनंदी होते. भाऊसाहेब शांतपणे आत जाऊन प्रांतधिकारी काझी यांच्या जवळील खुर्चीवर बसले. तर काही महत्वाचे कार्यकर्ते मतमोजणी कक्षात दाखल झाले होते. भाऊसाहेब मतमोजणी पूर्ण होईपर्यंत प्रांतधिकारी साहेबांच्या जवळच बसून होते. बाहेर कार्यकर्त्यांचा जल्लोश सुरु होता. जसजशी मतमोजणी होत होती तसतसा घोषणांचा आवाज वाढत होता. मतमोजणीचे आकडे ऐकुन विरोधी उमेदवार बी.जे.खताळ पाटील बेचैन होत होते. शेवटी मतमोजणी निकाल जाहिर झाला. भाऊसाहेब थोरात यांना विरोधी उमेदवार बी.जे.खताळ पाटील यांच्यापेक्षा ११११ मते जास्त मिळून भाऊसाहेब विजयी झाले होते. निकाल जाहिर झाल्यानंतर भाऊसाहेबांनी प्रांतधिकारी काझी तसेच मतमोजणी अधिकारी, तसेच कर्मचाऱ्यांचे आभार मानुन भाऊसाहेब थोरात मतमोजणी कक्षातून बाहेर पडले.

भाऊसाहेब थोरात जरी संगमनेर विधानसभा मतदार संघातुन आमदार म्हणुन निवडुन आले असले तरी भाऊसाहेबांची दृष्टी विशाल होती. ते फक्त तालुक्याचा विचार करणारे कार्यकर्ते नव्हते. अहमदनगर जिल्हयाच्या विकासाच्या दृष्टीने भाऊसाहेबांपुढे अनेक आव्हाने उभी होती. व ती पेलण्यासाठीच भाऊसाहेबांनी आपल्या आमदार पदाचा पुरेपुर उपयोग करुन घेतला. अनेक महत्वपूर्ण प्रश्न मार्गी लावले होते. भाऊसाहेबांनी विधानसभेतील पाच वर्ष काळात अनेक महत्वपुर्ण निर्णय घेण्यास सरकारला भाग पाडले होते.[६१]

### ४.७.१ महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मीटरऐवजी अश्वशक्तीनुसार विजबिल आकारले जावे यासाठी भाऊसाहेबांनी केलेले आंदोलन :-

भाऊसाहेब थोरात यांच्या इ.स.१९७८ च्या विधानसभा निवडणूकीतील विजयाने संगमनेर तालुक्यातीलच नव्हे तर अहमदनगर जिल्हयातील जनतेलाही आनंद झाला होता. त्याचे कारण निवडुन येण्यापूर्वीही भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हयात सहकार रुजविण्यात महत्वपूर्ण योगदान दिले होते. आता तर भाऊसाहेबांकडे आमदार पद आल्याने ते निश्चितच

या पदाला महत्व प्राप्त करुन देतील अशी जिल्हयातील जनतेची अपेक्षा होती. ती भाऊसाहेबांनी सार्थ करुन दाखविली.

अहमदनगर जिल्हा हा निसर्गाच्या लहारीपणावर अवलंबुन असलेला जिल्हा म्हणुन ओळखला जातो. या जिल्हयाला सातत्याने नैसर्गिक संकटांचा सामना करावा लागत होता व आहे. कधी अती वृष्टी तर कधी दुष्काळ, टोळधाड अशा संकटाचा सामना करावा लागतो. शेती उत्पन्नाची निश्चित शाश्वती नाही. अशा परिस्थितीत सरकारने शेतकऱ्यांच्या शेतीपंपावरील विजबिलाची मीटरनुसार आकारणी पध्दत बंद करुन त्याऐवजी अश्वशक्तीनुसार बील आकरण्यात यावे या मागणीसाठी भाऊसाहेब थोरात यांनी जिल्हयातील शेतकऱ्यांची संगमनेर येथे सभा आयोजित केली असता मोठा प्रतिसाद मिळाला होता. या सभेत भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली विजेच्या प्रश्नावर तीव्र आंदोलन करण्याचे निश्चित करुन आंदोलनाची तारीख निश्चित करण्यात आली होती.

मिटरहटाव आंदोलनाचा संदेश जिल्हयातच नव्हे तर महाराष्ट्रात सर्वत्र पोहोचला होता. भाऊसाहेबांनी सुरु केलेले हे आंदोलन फक्त अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांसाठी नव्हते तर या आंदोलनामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर विजबिल आकरणीचा सरकारकडून जो अन्याय होत होता तो दूर होणार होता. भाऊसाहेबांनी आंदोलनाची सर्व तयारी पुर्ण केली होती. भाऊसाहेबांना खंबीर साथ देणारे बाबुजी आव्हाड, दादा पाटील राजळे, शंकरराव काळे, दादासाहेब तनपुरे, रुपवते, बुवासाहेब नवले, कारभारी पाटील चौधरी, आप्पासाहेब सुर्वे, विश्वनाथ नवले, बाळासाहेब विखे, यशवंतराव गडाख्, बी.के. रोहमारे, वकिलराव लंघे, किसन नहे, साहेबराव कानवडे, बाजीराव पाटील खेमनर, माधवराव कानवडे, किसनभाऊ हासे, आदी जिल्हयातील सर्व पक्षाच्या कार्यकर्त्यांनी देखील भाऊसाहेबांच्या या सनदशीर आंदोलनास आपला पाठींबा दिला होता. या आंदोलनापूर्वी दीड दोन वर्षापासून भाऊसाहेबाच्या मनात शेतकऱ्यांवर होत असलेल्या या अन्यायाची खंत होती. त्यासाठी भाऊसाहेबांनी शासनाकडे शेतकऱ्यांच्या विहीरीवरील पंपाच्या वीजबीलांची आकारणी मीटरऐवजी अश्वशक्तीनुसार करावी अशी सातत्याने मागणी केली होती. ही मागणी मान्य करुन घेण्यासाठी भाऊसाहेब आपल्या कार्यकर्त्यांसह मुख्यमंत्री शकरराव चव्हाण साहेबांना दोनदा भेटले देखील होते. परंतु दोन्ही वेळी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण साहेबांनी असे होऊ शकणार नाही या शब्दात भाऊसाहेब थोरात यांची ही मागणी फेटाळुन लावली होती. तर भाऊसाहेबांचा स्वभाव म्हणजे एखादी गोष्ट मनावर घेतली की ती

पूर्णत्वास नेल्याशिवाय भाऊसाहेब शांत बसत नसत. प्रबळ आत्मविश्वास आणि काम करण्याची जिद्द या गोष्टी भाऊसाहेबांच्या रक्तात भिनलेल्या होत्या. त्यामुळे मुख्यमंत्री शंकरराव चव्हाणांच्या नकारार्थी उत्तराने भाऊसाहेब देखील जिद्दीला पेटले होते.

याच काळात दोन महत्वपूर्ण घटना घडल्या. त्या म्हणजे इ.स.१९७८ च्या विधानसभा निवडणुकीत संगमनेर विधानसभेसाठी तिकिट मिळवून भाऊसाहेब थोरात यांचा विधानसभेत सदस्य म्हणुन प्रवेश झाला होता. तर दुसरी गोष्ट त्यानंतर थोडयाच कालावधीत शंकरराव चव्हाण साहेबांना मुख्यमंत्री पद सोडणे भाग पडले होते. शंकरराव चव्हाणानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणुन पद्मभूषण वसंतदादा पाटील यांनी मुख्यमंत्री पदाची सुत्रे आपल्या हाती घेतली होती.

भाऊसाहेब थोरात हे चाणाक्ष व्यक्तीमत्व होते. मुख्यमंत्री बदलाच्या या घटनेचे औचित्य साधुन भाऊसाहेबांनी ठरविले की, आंदोलन करण्यासाठी हीच वेळ योग्य आहे. हे ओळखुन भाऊसाहेबांनी जिल्हयातील कार्यकर्त्यांची संगमनेर येथे सभा घेऊन सभेत ठरल्याप्रमाणे आंदोलन करण्याची तारीख व सर्व नियोजन करण्यात आले होते. ठरल्याप्रमाणे आंदोलनाच्या दिवशी शेतकऱ्यांनी आपल्या विहीरीवरील विजपंपाचे मिटर काढून घेतले. आणि ते मीटर डोक्यावर घेऊन शेतकरी वर्ग भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली मिटर हटाव आंदोलनात सहभागी झाले होते. या आंदालेनास जवळपास पाच हजार शेतकरी डोक्यावर मीटर घेऊन मोर्चात सामील झाले होते. घोषणा देत मिरवणुकीने जाऊन भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली विज महामंडळाच्या कार्यालयात शेतकऱ्यांनी मीटर जमा केले होते.

भाऊसाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या या आंदोलनाचे स्वरुप फक्त जिल्हयापूरते मर्यादीत न राहता महाराष्ट्रात या घटनेचे पडसाद उमटले होते. महाराष्ट्रातील शेतकरी वर्ग संतप्त झाला होता. त्यांनी देखील भाऊसाहेबांच्या या आंदोलनाला पाठींबा दर्शविला. महाराष्ट्रातील अनेक भागातून त्यांसदर्भात पत्रे भाऊसाहेबांनी येऊ लागली. भाऊसाहेब थोरात यांनी सुरु केलेल्या या आंदोलनास जनआंदोलनाचे स्वरुप प्राप्त झाले होते.

भाऊसाहेबांच्या मिटर हटाव आंदोलनानंतर ॲड. भाऊसाहेब धुमाळ यांच्या अध्यक्षतेखाली संघर्ष समितीची स्थापना केली होती. मुख्यमंत्री वसंतराव दादा यांची भेट घेण्यासाठी भाऊसाहेब थोरात यांनी एक शिष्टमंडळ तयार केले होते. अण्णासाहेबांच्या नेतृत्वाखाली भाऊसाहेब थोरात, कारभारी पाटील चौधरी, भाऊसाहेब धुमाळ, अप्पासाहेब

सुर्वे आदी कार्यकर्ते भेटीच्या ठरलेल्या दिवशी वसंतराव दादांना भेटण्यासाठी मुंबईला गेले होते. मुख्यमंत्री वसंतराव दादांच्या भेटीच्या सुरुवातीसच अण्णासाहेब शिंदे यांची मुख्यमंत्री वसंतराव दादा बरोबर थोडी शाब्दिक चकमक झाली. मुख्यमंत्री वसंतराव दादांनी अण्णासाहेब शिंदे यांना म्हटले की, तुम्ही लोकांनी कायदा हातात घेतला हे योग्य केले नाही. अशा शब्दांत नाराजी व्यक्त केली होती. तथापि अण्णासाहेब शिंदे हे देखील चाणाक्ष राजकारणी होते. अण्णासाहेबांनी मीटर हटाव चळवळीच्या समर्थनार्थ अत्यंत संमर्पक स्पष्टीकरण मुख्यमंत्री साहेबांपुढे मांडले. वीजेचा प्रश्न शेतकऱ्यांना अगदी असहय झाला आहे. त्या प्रश्नावर शेतकऱ्यांमध्ये दीर्घकाळापासून प्रचंड असंतोष धुमसत आहे. शेतकऱ्यांची मागणी आम्ही वेळोवेळी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या पुढे मांडली होती. परंतु शंकरराव चव्हाण साहेबांनी दखल न घेतल्याने शेवटी कार्यकर्त्यांनीच ही चळवळ हातात घेऊन मीटर हटविण्याचा निर्णय नाईलाजाने घेतला. अशी परखड भुमिका अण्णासाहेब शिंदे यांनी मुख्यमंत्री वसंतराव दादा यांच्या पुढे मांडली होती. अण्णासाहेबांच्या स्पष्टीकरणांवर थोडे शांतपणे मुख्यमंत्री वसंतराव दादांनी म्हटले कि, आता काय निर्णय घ्यावयाचा. तेव्हा अण्णासाहेब शिंदे यांनी आपली बाजु मांडतांना म्हटले की, मीटरऐवजी अश्वशक्तीनुसार बीजबिलाची आकारणी करावी. त्यावर मुख्यमंत्री साहेबांनी म्हटले की प्रती अश्वशक्ती किती रुपये दर ठेवावा असे मुख्यमंत्री वसंतराव दादांनी म्हटले असता शिष्टमंडळातील सर्वजण शांत बसुन राहिले होते. शेवटी मुख्यमंत्री वंसतराव दादांनीच विचारले " प्रती अश्वशक्ती १७० रुपये एवढा दर चालेल काय" तेव्हा भाऊसाहेबांच्या शिष्टमंडळातील सर्वांनी होकारार्थी मान डोलावली. तर अण्णासाहेबांनी होय म्हटले आणि मुख्यमंत्री वसंतराव दादांनी हाच निर्णय अंतिम केला होता.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने हा निर्णय ऐतिहासिकच मानावा लागेल. भाऊसाहेबांनी सुरु केलेल्या मीटर हटाव चळवळीचा अखेर विजय झाला होता. मुख्यमंत्र्याच्या या निर्णयानंतर अण्णासाहेब शिंदे यांनी सर्व शेतकऱ्यांच्या वतीने मुख्यमंत्री वसंतराव दादांचे हार्दिक आभार मानले.[६२]

हा भाऊसाहेब थोरात यांच्या बौध्दीक कौशल्याचा विजय होता. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी या विजयानंतर फटाके वाजवुन आपला आनंद व्यक्त केला होता. महाराष्ट्रात सर्वत्र भाऊसाहेब थोरात यांच्या विजयाच्या घोषणांनी सारा असंमत दणाणुन सोडला होता. भाऊसाहेब थोरात आपल्या कार्यकर्त्यांसह संगमनेरला माघारी आल्यानंतर संगमेनर शहरात

त्यांची भव्य मिरवणुक काढण्यात आली. एवढेच नव्हे तर जिल्हयातील अनेक ठिकाणी भाऊसाहेबांचा सत्कार करण्यासाठी कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

**४.७.२ विधानसभेतील राजकिय नाटयात भाऊसाहेब थोरात यांची भूमिका :-**

मोरारजी देसाई पंतप्रधान असतांनाच कॉँग्रेसमधील काही दिग्गजांनी विरोधी पक्षाशी गुप्तसंधान बांधले होते. सत्तारुढ पक्षात पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या विरोधात वेगळा गट तयार झाला होता. मोरारजीवर अविश्वास व्यक्त केल्यामुळे त्यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर पतंप्रधान पदासाठी बाबु जगजीवनराम व चौधरी चरणसिंग प्रयत्नशील होते. त्यात चौधरी चरणसिंग यांनी पंतप्रधान पदासाठी दावा केला. परंतु पुरेसे बहुमत नसल्याने त्यांनी कॉँग्रेस पक्षाचा पाठींबा घेण्याचे ठरविले. इंदिरा गांधीनी चरणसिंगांना सरकार बनविण्यासाठी पाठिंबा दिल्याने चरणसिंग पंतप्रधान झाले. चरणसिंगांनी यशवंतराव चव्हाण यांची उपपंतप्रधान पदी निवड केली होती. पाठीशी हमखास बहुमत नसल्याने चरणसिंगांचे सरकार प्रारंभापासूनच अस्थिर होते. इंदिरा गांधीनी पाठींबा काढुन घेतल्यास कोणत्याही क्षणी हे सरकार कोसळणार होते.

तर महाराष्ट्रात शरद पवार, किसन वीर, आबासाहेब कुलकर्णी आदींनी मोरारजी देसाई पंतप्रधान असतांनाच विरोधी पक्षाशी गुप्त संधान बांधले होते. कॉँग्रेसअंतर्गत ३८ आमदारांचा एक मोठा गट तयार झाला होता. हा गट विरोधी पक्षाशी जवळीक ठेवून होता. या ३८ आमदारांमधील शरद पवार यांना मुख्यमंत्री पद मिळवुन देण्यास विरोधी पक्षाने अनुकुलता दर्शविली होती. तेव्हा विधीमंडळाचे अधिवेशन चालु असतांनाच आमदारांमध्ये वसंतराव दादांवर अविश्वास व्यक्त करण्यासंदर्भात उघडपणे चर्चा चालु होती.

या सर्व महानाटयाची कल्पना मुख्यमंत्री वसंतराव दादांना देण्यासाठी भाऊसाहेब थोरात व शिवाजीराव नागवडे गेले आणि त्यांनी दादांना सांगितले की, दादा तुमच्या विरोधी काही घडामोडी घडत आहेत. याची आपणास कल्पना देण्यासाठी आम्ही आलो आहोत. परंतु दादांनी फारसे लक्ष दिले नाही. भाऊसाहेबांचे बोलणे संपते न संपते तोच दरवाजातून शरद पवार व सुंदरराव सोळुंके दादांच्या कार्यालयात आले. या दोघांनी मुख्यमंत्री वसंतराव दादांना शेजारच्या खोलीत घेऊन गेले आणि पाठींबा काढुन घेतल्याचे पत्र त्यांनी दादांच्या हाती सुपूर्द केले. अवघ्या चार पाच मिनिटांतच हा खेळ संपला. शरद पवार आणि सोळुंखे यांनी पत्र दादांकडे दिल्यानंतर तेथुन निघुन गेले. आणि वसंतराव दादा बाहेर येऊन खुर्चीवर बसले असता भाऊसाहेब थोरात यांनी त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिले. चेहऱ्यावरील

नाराजी पाहुन भाऊसाहेब थोरात व शिवाजीराव नागवडे यांनी कार्यालयातुन काढता पाय घेतला.

विधानभवनाच्या आवारात व आमदार निवासामध्ये एकच धांदल उडाली होती. राजकिय हालचाली गतिमान झाल्या होत्या. शरद पवारांनी ३८ आमदारांची सायंकाळी बैठक आयोजित केली होती. या ३८ आमदारांच्या यादीत भाऊसाहेबांचेही नाव त्यांना न विचारात घेण्यात आले होते. तरी देखील भाऊसाहेब थोरात हे या बैठकीला उपस्थित राहिले होते. बैठकीच्या सुरुवातीला किसनवीर यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यावर जोरदार टिका केली. शरद पवारांच्या नेतृत्वाखालील या गटाला जनता पक्षाचे सहकार्य घेऊन नवीन सरकार स्थापन करावयाचे होते. किसनवीर यांच्या भाषणानंतर आबासाहेब खेबुडकर यांनी जोरदार भाषण करत किसनवीर यांच्या विचारांचे समर्थन केले. मुख्यमंत्री वसंतराव दादांच्या विचारांवर आबासाहेबांनी जोरदार हल्ला चढविला. कॉंग्रेसमधुन फुटुन निघण्याच्या निर्णयास जेष्ठ नेते यशवंतराव चव्हाण यांची केवळ अनुकुलताच नव्हे तर अनुमती देखील आहे. असे त्यांनी अगदी बिनदिक्कतपणे सांगितले. आबासाहेबांच्या भाषणानंतर थोडा वेळ सर्वत्र शांतता पसरली होती. आबासाहेबांनी यशवंराव चव्हाणांचे नाव घेऊन कॉंग्रेसमधील फुटीस चव्हाणांना जबाबदार धरले होते. आबासाहेब खेबुडकरांच्या निर्णयाच्या बाजुने किंवा विरोधात बोलण्यास कोणी तयार होईना. परंतु भाऊसाहेब थोरात मात्र तात्काळ उभे राहुन त्यांनी शरद पवारांच्या योजनेस विरोध असल्याचे सांगितले. पुढे भाषणात भाऊसाहेबांनी म्हटले की, कॉंग्रेस पक्षाच्या मंत्रीमंडळाचा कारभार बरोबर नाही म्हणून शरद पवारांच्या नेतृत्वाखाली वेगळा गट निर्माण केला असेल हे एक वेळ योग्य आहे. परंतु या गटाने जनता पक्षाशी हातमिळवणी करुन सरकार स्थापन करण्याचा निर्णय घेणे म्हणजे हा राजकिय धोकेबाजपणा आहे. शरद पवारांच्या या गटाचा हा निर्णय मान्य नसल्याचे भाऊसाहेब थोरात यांनी आपल्या भाषणात स्पष्टपणे सांगितले असता सर्व उपस्थित आमदारांमध्ये शांतता पसरली होती. भाऊसाहेबांनी पुढे म्हटले की, जनता पक्षात पूर्वाश्रमीच्या जनसंघवाद्याचे प्राबल्य आहे. त्यामुळे जनता पक्षाचे धोरण प्रतिगामी व जातीयवादाला प्रोत्साहन देणारे आहे. जनता पक्षाशी युती करणे हा विचार मान्य नसल्याचे भाऊसाहेब थोरात यांनी आपले विचार स्पष्ट केले आणि या युतीला विरोध असल्याचे घोषित केले होते. शेवटी भाऊसाहेबांनी हे ही सांगितले की, ३८ आमदारांच्या यादीमध्ये माझे नाव माझ्या संमतीविना घातलेले आहे. ते काढुन टाकावे. असे बोलुन भाऊसाहेब थोरात बैठकीचे ठिकाण सोडून बाहेर निघुन चालले

असता सभागृहाच्या पायऱ्या उतरत असतांनाच समोरुन रत्नाप्पा कुंभार हे पायऱ्या चढून आत येत म्हणत होते की, काँग्रेस आमदारांच्या यादीत माझे नाव घाला.

भाऊसाहेबांच्या सांगण्यावरुन ३८ आमदारांच्या यादीतून भाऊसोबांचे नाव कमी झाले होते. तर रत्नाप्पा कुंभार अण्णांचे नाव समाविष्ट झाले होते. त्यामुळे शरद पवार यांच्या गटातील आमदारांची ३८ ही संख्या कायम राहिली. तर बी.जे.खताळ पाटील, बाळासाहेब विखे यांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र समाजवादी काँग्रेस पक्षाचे दोनच आमदार होते. त्या दोन आमदारांनीही आपला पाठीबा या फुटीर गटाला जाहिर केला होता. तसेच जनता पक्षानेही शरद पवार यांच्या गटाला पाठींबा दिल्याने शरद पवारांचे मंत्रीमंडळ सत्तारुढ झाले. पूर्वी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद भूषविलेल्या शंकरराव चव्हाणांनी शरद पवारांच्या मंत्रीमंडळात अर्थमंत्री पद स्विकारले होते. तर शरद पवारांचा मुख्यमंत्री म्हणुन शपथविधी पार पडला. त्या प्रसंगी राजभवनावर भाऊसाहेब थोरातही उपस्थित होते. हा शरद पवारांचा विजय नसून विरोधी पक्षाचा विजय होता. विरोधी पक्ष मोठया उत्साहाने वावरत होता. शरद पवारांच्या पत्नी प्रतिभाताई यांना फार आनंद झाला होता.

भाऊसाहेब थोरात यांनी इ.स. १९६२ साली काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यानंतर ते शेवटपर्यंत काँग्रेस पक्षाशी एकनिष्ट राहिले. महाराष्ट्रात शरद पवार यांच्या गटाने घडवुन आणलेल्या या नाटयप्रसंगी शरद पवार यांनी दादासाहेब रुपवते यांचेकडून भाऊसाहेबांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला होता. परंतु भाऊसाहेब कोणत्याही अमिषाला बळी न पडता त्यांनी वसंतराव दादांची साथ सोडली नाही. भाऊसाहेबांनी दादासाहेब रुपवतेना स्पष्टपणे सांगितले की शरद पवारांनी जनता पक्षाबरोबर केलेला समझोता मला आवडला नसल्याने मी शरद पवारांना पाठींबा देऊ शकत नाही. भाऊसाहेब हे स्पष्टवक्ते राजकारणी होते. एखादी गोष्ट न आवडल्यास ते स्पष्टपणे त्यास नकार देत असत. त्यांचा हा स्पष्टपणा त्यांच्या कार्यकर्त्यांनाही चांगलाच माहित झाला होता. कोणत्याही प्रश्नावर सडेतोड उत्तर देत असत.[६३]

### ४.७.३ विधानसभा सदस्य असतांना भाऊसाहेबांनी निळवडे धरणास मंजुरी मिळविली :-

भाऊसाहेब थोरात इ.स.१९७८ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत संगमनेर विधानसभा मतदारसंघातुन काँग्रेस पक्षांतर्गत उमेदवारी मिळवुन बी.जे. खताळ पाटील यांचा १११९ मतांनी पराभव केला. या विजयानंतर भाऊसाहेबांच्या राजकिय कार्यास खऱ्या अर्थाने गति प्राप्त झाली होती. अहमदनगर जिल्हयाला सातत्याने दुष्काळाचा सामना करावा लागत

होता व आहे. या दुष्काळावर मात करुन जिल्हयातील शेती फुलविण्यासाठी भाऊसाहेबांनी विधान सभेच्या सदस्य पदाच्या माध्यमातून प्रयत्न सुरु केले होते. जिल्हयातील राजकिय कार्यकर्त्यांना निळवंडे धरणाचे महत्व सातत्याने पटवुन देत होते. राहुरी तालुक्याचे त्यावेळचे आमदार काशिनाथ पाटील पवार यांची भाऊसाहेबांनी भेट घेऊन त्यांना निळवंडे धरण त्याची पार्श्वभूमी दत्ता देशमुखांच्या नेतृत्वाखाली स्थापन केलेली समिती. त्या समितीने जिल्हयातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी तयार केलेला प्रकल्प आराखडा यांची सविस्तर माहिती आमदार काशिनाथ पाटील यांना दिली. निळवंडे धरणास मागील वसंतराव दादा सरकारने मान्यता दिली आहे. परंतु आता मुख्यमंत्री पदी शरद पवार आले आहेत. तेव्हा शरद पवारांच्या शासनाने निळवंडे धरण प्रकल्पाची कार्यवाही करावी असे मत भाऊसाहेब थोरात यांनी राहुरी तालुक्याचे आमदार काशिनाथ पाटील पवार साहेबांपुढे मांडले.

निळवंडे धरणातुन उजवा कालवा काढुन प्रवरेच्या उजव्या बाजुने अकोले, संगमनेर ते थेट राहुरी, गुहापर्यंत हे पाणी नेता येऊ शकते अशी भाऊसाहेबांनी काशिनाथ पाटील पवार साहेबांना कल्पना दिली. मुख्यमंत्री शरद पवार साहेबांना भाऊसाहेबांचे धोरण योग्य वाटल्याने शरद पवार साहेबांनी पाटबंधारे खात्याला प्रकल्पाचे सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले. या कालव्याचे सर्वेक्षण झाले. थोडयाच दिवसात या प्रकल्पाच्या खोदकामास सुरुवात करण्यात आली. दुष्काळी शेतीला हा प्रकल्प खऱ्या अर्थाने वरदान ठरणार होता. सर्वेक्षणानुसार देवगडच्या मंदिरापासून रोजगार हमीखाली कालव्याच्या खोदाईचे काम सुरु झाले होते. दुष्काळी विभागतील लोकांना काम हवे असल्याने राहुरी कारखान्यापर्यंत हा कालवा खोदण्यात आला. कालव्याच्या भूमीपुजनांचा समारंभ खांडगाव येथे आयोजित केला होता. मोठया संख्येने शेतकरी उपस्थित होते. उदघाटनाचे सर्व नियोजन भाऊसाहेबांनी केले होते. मुख्यमंत्री शरद पवार यांच्या हस्ते उदघाटन झाले.[६४]

त्याचप्रमाणे निळवंडे धरणाच्या डाव्या कालव्याचेही सर्वेक्षण पुर्ण झाले होते. संगमनेर कारखान्याच्या उत्तरेस मालदाडच्या शिवेजवळ पाटबंधारेमंत्री गोविंदराव आदिक यांच्या हस्ते भुमीपुजनाचा भव्य समारंभ भाऊसाहेबांनी घडवून आणला होता. आणि डाव्या कालव्याचेही खोदकाम रोजगार हमी योजनेखाली सुरु झाले होते.[६५]

## ४.८ उपसंहार :-

भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या राजकिय विकासातील योगदान या प्रकरणात मी प्रास्ताविक देऊन भाऊसाहेबांचे विद्यार्थी दशेतील कार्य, त्यांना स्वातंत्र्य चळवळीची मिळालेली प्रेरणा, त्यांचा राष्ट्रसेवा दलातील सहभाग, अहमदनगर जिल्हयातील स्वातंत्र्यपुर्व काळातील राजकिय परिस्थिती आणि भाऊसाहेबांचे योगदान यात कम्युनिस्ट पक्षाच्या माध्यमातुन त्यांनी केलेले राजकीय कार्य आणि स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय कार्यात स्थानिक स्वराज्य संस्था व विधानसभेतील कार्य या प्रकरणात मांडण्याचा मी प्रयत्न केला आहे.

*****

**संदर्भग्रंथ सुची :-**


१) वैद्य डॉ.सुमन,कोठेकर,डॉ.शांता-'आधुनिक भारताचा इतिहास'- प्रकाशिका - ललिता पुराणिक,प्रकाशन-श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, सहावी आवृत्ती २००९, पृ.क्रं.१,९.

२) पाठक नाथ विठ्ठल,-'अहमदनगर जिल्हयातील स्वातंत्र्यसंग्राम' अहमदनगर ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय, अहमदनगर, १९९३ पृ.क्रं.३३.

३) कित्ता पृ.क्रं.३९.

४) कडू पी.बी.- क्रांती पंढरीचा वारकरी, प्रकाशक- अरुण पुंजाजी कडू, मु.पो.सात्रळ,ता.राहुरी,जि.अहमदनगर, द्वितीय आवृत्ती सप्टें.२००४, पृ.क्रं.१०.

५) प्रधान ग.प्र. 'स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत' प्रकाशक - साधना प्रकाशन, ४३, शनिवारपेठ, पुणे, चौथी आवृत्ती, ११ जुन २००४, पृ.क्रं.२५८, २५९.

६) कित्ता पृ.क्रं.२६२, २६३

७) थोरात भाऊसाहेब - 'अमृतमंथन', प्रकाशक - लाटकर उल्हास चिंतामणी, प्रकाशन, अमेय प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती, १२ जाने.१९९९ पृ.क्रं.५२.

८) कित्ता पृ.क्रं.५३

९) कित्ता पृ.क्रं.५९

१०) कित्ता पृ.क्रं.७२

११) कित्ता पृ.क्रं.८२,८३

१२) कित्ता पृ.क्रं.७८, ७९

१३) कित्ता पृ.क्रं.८३, ८४

१४) थोरात भाऊसाहेब, अमृतमंथन, पुर्वोक्त क्रं.७, पृ.क्रं.१२५, १२६.

१५) कसबे रावसाहेब, लामखडे मा.रा.-'शेती आणि सहकार'थोरात भाऊसाहेब गौरवग्रंथ, प्रकाशक-बाळासाहेब गुंजाळ, संगमनेर, प्रकाशन - विश्वकर्मा मुद्रणालय, पृ.क्रं.३०५.

१६) थोरात भाऊसाहेब - 'अमृतमंथन' पुर्वोक्त ७, पृ.क्रं.१५९,१६०

१७) आठरे पाटील आबाजी, 'भरतासारखा भाऊ' चंद्रभान आठरे पाटील - अलांच्छित चंद्रमा, चंद्रभान आठरे पाटील, स्मृतीग्रंथ, अहमदनगर १९९०, पृ.क्रं.१२.

१८) कित्ता पृ.क्रं.१७०,१७१

१९) शिंदे रावसाहेब-'ध्यासपर्व'-प्रकाशक-लाटकर उल्हास चिंतामणी, प्रकाशन - अमेय प्रकाशन पुणे, १३ जाने.२००५, पृ.क्रं.१०६,१०७,१०८.

२०) कित्ता : पृ.क्रं.१११,११२.

२१) कित्ता : पृ.क्रं.११२,११३.

२२) थोरात भाऊसाहेब, अमृतमंथन, पुर्वोक्त क्रं.७, पृ.क्रं.१३६.

२३) शिंदे रावसाहेब - 'ध्यासपर्व' पुर्वोक्त १९, पृ.क्रं.११३,११४.

२४) मुलाखत-कडु पी.बी.,मु.पो.सात्रळ,ता.राहुरी,जि.अहमदनगर, दि.०२/११/२०१५.

२५) शिंदे रावसाहेब - 'ध्यासपर्व' पुर्वोक्त १९, पृ.क्रं.१०९.

२६) थोरात भाऊसाहेब - 'अमृतमंथन' पुर्वोक्त ७, पृ.क्रं.१६१

२७) शिंदे रावसाहेब - 'ध्यासपर्व' पुर्वोक्त १९, पृ.क्रं.१०९,११०.

२८) मुलाखत - कडु पुंजाजी बापुजी, पुर्वोक्त क्रं.२४, दि.१५/११/२०१५

२९) थोरात भाऊसाहेब - 'अमृतमंथन' पुर्वोक्त क्रं. ७, पृ.क्रं.१४०,१४१,१४२

३०) मुलाखत - पुर्वोक्त क्रं.२४, दि.१५/११/२०१५

३१) मुलाखत-गंधाक्ते बबनराव राजधर-वडझिरे,ता.पारनेर,जि.अ.नगर, दि.१८/१२/२०१५.

३२) मुलाखत - पुर्वोक्त क्रं.२४, दि.२७/१२/२०१५

३३) मुलाखत - पुर्वोक्त क्रं.२४, दि.०५/०१/२०१६

३४) शिंदे रावसाहेब - 'ध्यासपर्व' पुर्वोक्त, १९, पृ.क्रं.१२.

३५) भावे सविता- 'कृषीक्रांतीचे सेनानी' अण्णासाहेब शिंदे - प्रकाशक, चि.स.लाटकर, प्रकाशन - कल्पना मुद्रणालय, सदाशिव टिळक रस्ता,पुणे, पृ.क्रं.१८२.

३६) मुलाखत - पुर्वोक्त, क्रं.२४, दि.१७/०१/२०१६

३७) कित्ता दि.२०/०१/२०१६

३८) थोरात भाऊसाहेब - 'अमृतमंथन' पुर्वोक्त ७, पृ.क्रं.१९५,१९६

३९) गवंडी पुंडलिक - 'लाल सुर्य' प्रकाशन- अमोल प्रकाशन पुणे १९९९, पृ.क्रं.४५,४६

४०) आठरे पाटील आबाजी - 'भरतासारखा भाऊ' खा.चंद्रभान आठरे पाटील, अलांच्छित चंद्रमा, चंद्रभान आठरे पाटील, स्मृतीग्रंथ, अहमदनगर १९९०, पृ.क्रं.१२

४१) मुलाखत -पुर्वोक्त क्रं.२४, दि.२६/०१/२०१६

४२) कित्ता - दि.०८/०२/२०१६

४३) शिरसाठ शाम बैनाडे-प्रा.भगवानसिंग, पंचायतीराज आणि नागरी प्रशासन, प्रकाशक-शशिकांत पिंपळापुरे, प्रकाशन विद्या प्रकाशन औ.बाद,ऑगस्ट २०१४, पृ.क्रं.१,

४४) आवाळे मनोज - 'पंचायतराज',प्रकाशक - एस.एम.आवाळे, प्रकाशन- अरिश्रेय प्रकाशन, पुणे, नववी आवृत्ती, मे.२०१५, पृ.क्रं.१२,१३.

४५) कित्ता - पृ.क्रं. ६,७,८

४६) मुलाखत-खेमनर बाजीराव खंडूजी,साकुर,ता.संगमनेर,जि.अ.नगर, दि.२०/०३/२०१६.

४७) शिरसाठ, डॉ.शाम बैनाडे - प्रा.भगवानसिंग - पंचायतीराज आणि नागरी प्रशासन, पूर्वोक्त,क्रं.५९, पृ.क्रं. ७८,९५.

४८) आवाळे मनोज - पंचायतराज पूर्वोक्त क्रं.४४, पृ.क्रं. ७९,५१

४९) शिरसाठ डॉ.शाम बैनाडे - प्रा.भगवानसिंग - 'पचायतीराज आणि नागरी प्रशासन' पूर्वोक्त - क्रं.३९, पृ.क्रं.९६.

५०) मुलाखत - पुर्वोक्त क्रं.४६, दि.२५/०३/२०१६.

५१) आवाळे मनाजे - 'पंचायतराज' पूर्वोक्त क्रं.४४, पृ.क्रं.५९

५२) आवाळे मनाजे - 'पंचायतराज' पूर्वोक्त क्रं.४४, पृ.क्रं.५९,६०,६२.

५३) मुलाखत - खेमनर बाजीराव खंडूजी, पूर्वोक्त क्रं.४६, दि.२७/०३/२०१६.

५४) आवाळे मनाजे - 'पंचायतराज' पूर्वोक्त क्रं.४४, पृ.क्रं.९०,९१

५५) मुलाखत-तांबे दुर्गाताई सुधीर,संगमनेर,ता.संगमनेर,जि.अहमदनगर,दि.३०/०३/२०१६.

५६) कित्ता- दि.०२/०४/२०१६

५७) मुलाखत पूर्वोक्त क्रं.२४, दि.०५/०४/२०१६

५८) थोरात भाऊसाहेब - 'अमृतगाथा' प्रकाशक- उल्हास चितांमणी लाटकर, प्रकाशन - अमेय प्रकाशन,पुणे, पृ.क्रं.२००

५९) मुलाखत पूर्वोक्त क्रं.४६, दि.०४/०४/२०१६

६०) थोरात भाऊसाहेब - 'अमृतगाथा' पुर्वोक्त क्रं.५८, पृ.क्रं.२०१.

६१) कित्ता -क्रं.२०२,२०३

६२) कित्ता - क्रं.२०३,२०४

६३) कित्ता -पृ.क्रं.२०५,२०६,२०७

६४) कित्ता - पृ.क्रं.२०८

६५) कित्ता - पृ.क्रं.२०८

# प्रकरण : पाचवे

# भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या सामाजिक विकासातील योगदान

## प्रकरण पाचवे

# सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या सामाजिक विकासातील योगदान

**प्रास्ताविक**

५.१ अहमदनगर जिल्हयाची समाजरचना व सामाजिक पार्श्वभूमी.

५.२ भाऊसाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांच्या विकासासाठी दिलेले सामाजिक योगदान.

५.३ भाऊसाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्हयातील कामगारांच्या विकासासाठी दिलेले सामाजिक योगदान.

५.४ भाऊसाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्हयातील दुष्काळ निवारणार्थ केलेले सामाजिक कार्य.

५.५ दंडकारण्य अभियानाच्या माध्यमातून भाऊसाहेब थोरात यांचे सामाजिक योगदान.

५.६ स्वातंत्र्योत्तर काळातील अहमदनगर जिल्हयाची शैक्षणिक स्थिती व त्यात अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातुन भाऊसाहेब थोरात यांचे योगदान.

५.७ भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या शैक्षणिक विकासातील योगदान.

५.८ अमृतवाहिनी शेती आणि शिक्षण विकास संस्थेच्या माध्यमातून भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हयातील शैक्षणिक विकासातील योगदान.

५.९ उपसंहार

संदर्भ.

# प्रकरण पाचवे
# भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या सामाजिक विकासातील योगदान

**प्रास्ताविक :-**

समाजात फार थोडी माणसे ध्येय वेडी असतात. त्यापैकी भाऊसाहेब थोरात हे एक होते. भाऊसाहेबांचे कुटूंबच सामाजिक कार्याची आवड असणारे असल्याने सामाजिक कार्याचा वारसा भाऊसाहेबांना आपल्या कूटूंबाकडूनच मिळाला. भाऊसाहेबांच्या सामाजिक कार्यास कूटूंबातील सदस्याकडून फारसा विरोध कधी झाला नाही. त्यामुळेच देश प्रेमाने प्रेरित झालेल्या भाऊसाहेबांनी विद्यार्थी दशेपासून स्वत:हास देश सेवेस वाहून घेतले होते. भाऊसाहेब विद्यार्थी असतांनाच त्यांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी केलेल्या कामामुळे त्यांना पंधरा महिने तुरुंगवासही भोगावा लागला होता.

भाऊसाहेब थोरात कम्युनिस्ट पक्षाच्या माध्यमातून स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अहमदनगर जिल्हयाचा सामाजिक, आर्थिक विकास साध्य करु इच्छित होते. परंतु चाणाक्ष भाऊसाहेब थोरात यांच्या लक्षात आले की, जर आपणास जिल्हयाचा सर्वांगिण विकास साध्य करावयाचा असेल तर सद्यस्थितीला कम्युनिस्ट विचारधारा योग्य नाही. हे ओळखून भाऊसाहेबांनी इ.स.१९५२ साली आपल्या कम्युनिस्ट विचारांना आवर घालत सहकराचे व्रत स्विकारले. आणि येथुन पुढे अहमदनगर जिल्हयाचा सामाजिक विकास साध्य करत असतांना भाऊसाहेबांनी विविध सहकारी संस्थांची स्थापना केली. या विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातुन त्यांनी संगमनेर तालुक्याच्या आणि अहमदनगर जिल्हयाच्या सामाजिक विकासात महत्वपूर्ण योगदान दिले आहे.

याशिवाय जिल्हयाचा सामाजिक विकास साध्य करत असतांना महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, अहमदनगर जिल्हा सहकारी बँक या बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक असतांना जिल्हयातील शेतकरी, व्यापारी, उद्योजक आदिंच्या उत्कर्षासाठी महत्वपूर्ण निर्णय घेतले. तसेच शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवितांना रिझर्व्ह बँकेकडून व्याजदर वाढवीला असता रिझर्व्ह बँकेवरील मोर्चाचे नेतृत्व शेती पंपावरील मीटर हटाव मोहिम, शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी परिषदा, निळवंडे धरण,विस्थापितांचा प्रश्न, सरकारच्या लेव्ही विरोधी शेतकऱ्यांचे आंदोलन असे अनेक प्रश्न सोडविण्यात भाऊसाहेबांनी महत्वपूर्ण योगदान दिले होते.

मी या प्रकरणात भाऊसाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्हयाचा सामाजिक विकास करतांना केलेल्या सामाजिक कार्यावर प्रकाश टाकण्याचा मी प्रयत्न केला आहे.

## ५.१ अहमदनगर जिल्हयाची सामाजिक पार्श्वभूमी :-

### ५.१.१ समाजरचना :-

भाऊसाहेब थोरात यांच्या आरंभिच्या काळात अहमदनगर जिल्हयातील समाजात चातुवर्ण्य व्यवस्था, जातीसंस्था, बलुतेदारी, चालीरिती, परंपरा पाळल्या जात असत. समाज जाती उपजातीमध्ये विभागला होता. व्यवसायानुसार, समाजचे चार गटात विभाजन झाले होते.

१) **ब्राम्हण :-** प्रत्येक गावात ब्राम्हणांची एक वा अनेक घरे असत. त्यांची कामे मंदिरात पुजा अर्चा करणे, कथा, किर्तने सांगणे, पंचाग पहाणे, धार्मिक विधी करणे, ब्राम्हण वर्गास समाजात श्रेष्ठ स्थान होते.

२) **क्षत्रिय :-** ब्राम्हणा नंतरचा दुसरा वर्ग क्षत्रियाचा. त्यांनाच मराठे म्हटले जाई. त्यांच्या ९६ कुळी, कुणबी अशा जाती उपजाती होत्या. शेती करणे, पशुपालन करणे ही त्यांची कामे होती.

३) **वैश्य :-** व्यापार करणाऱ्यांना वैश्य म्हटले जाई. स्वातंत्र्यपूर्व काळात अहमदनगर जिल्हयात व्यापारी वर्ग हा बहुतेक गुजराती, मारवाडी असे कापड व जीवनावश्यक वस्तुची दुकाने त्यांचीच असत.

४) **शुद्र :-** स्वातंत्र्यपूर्व काळात शुद्राची अवस्था वाईट होती. महार, मांग, ढोर, चांभार, यांना शुद्र म्हटले जाई. त्यांना समाजातील हिन कामे करावी लागत असत. परंतु स्वातंत्र्योतर काळात त्यात परिवर्तन घडून आले. लोकशाही राज्यात त्यांनाही समान हक्क देण्यात आले.

स्वातंत्र्योत्तर काळात ही चार्तुवर्ण व्यवस्था नष्ट होऊन समाज आधुनिक विचारसरणीकडे वाटचाल करु लागला.[१]

### ५.१.२ सामाजिक परिस्थिती :-

अहमदनगर जिल्हयातील सामाजिक परिस्थिती पाहाता असे दिसते की, समाजात हिंदू, मुस्लीम, खिश्चन, जैन, नवबौध्द, पारशी धर्माचे लोक आपआपल्या धर्माचे सण, उत्सव साजरे करतात. चालीरिती पाळतात. धर्म वेगळे असले तरी त्यात एकता व समजुदारपणा

असून एक दुसऱ्याच्या सुख-दुखःत सामील होण्याची माणुसकीची भावना पूर्णपणे जिवंत आहे. एकतेचे ते एक प्रतिक आहे. हिंदु धर्मात जशी जाती व्यवस्था आहे तशीच काही प्रमाणात मुसलमानातही आहे. मुसलमानात शिया व सुन्नी हे दोन मुख्य पंथ असून त्यांच्या चालीरितीत थोडा फार फरक आहे. ही जाती व्यवस्था आता मोडीत निघत असून त्याचा क्वचित परिणाम जाणवतो. जातीनुसार व्यवसाय केले जातात. पण त्याची तीव्रता अगदीच कमी आहे. बहुतेक वेळा घरात उपलब्ध आहे म्हणून असे व्यवसाय पुढे चालु ठेवल्याचे दिसून येते. असे असले तरी सध्य परिस्थितीला लोक विविध व्यवसायाकडे वळाले आहेत. जातीबंधने पूर्णपणे नष्ट झाली आहे. असे असले तरी शेती हा जिल्हयातील मुख्य व्यवसाय आहे.

मराठी ही मातृभाषा पण मुसलमान लोक मात्र उर्दु मिश्रीत मराठी बोलतात तर पारशी लोक गुजराथी बोलतात. असे असले तरी मराठी भाषेचा उपयोग सर्वत्र केला जातो. गुजराथी, मारवाडी, सिंधी या व्यापारी जमाती देखील मराठी भाषेचा वापर करतात.

वस्त्रालंकारात इतर भागापेक्षा काही वेगळेपणा नाही. सदरा, धोतर, गांधी टोपी हा पुरुषांचा पारंपारिक वेश तर स्त्रिया नऊवारी साडी व त्यास शोभेसे ब्लाऊज वापरतात. सध्या पुरुष व स्त्रियांच्या वस्त्रप्रावरणात पूर्णपणे बदल झालेला असून शर्ट,पॅन्ट, तर स्त्रिया ५ वारी साठी व ब्लाऊज हे आता सर्वसामान्य वस्त्र प्रकार दिसून येतात. या शिवायही विविध प्रकारचे कपडे परिधान केले जातात. पुरुष अंगठी, चैन, हातात कडे असे अलंकार घालताना दिसतात तर स्त्रिया आधुनिक पध्दतीची विविध दागिने घालतात.धार्मिकतेच्या बाबती विचार केल्यास विठोबा व खंडोबा व देवी ही मुख्य देवते असून आपल्या धर्माप्रमाणे त्यांची पुजा केली जाते. विविध देव देवताचे यात्रा, उत्सव साजरे होतात. सर्व धर्माचे लोक मोठया आनंदाने यात्रा उत्सवात सहभागी होतात.

याशिवाय करमणुकीचा विचार केल्यास तमाशा, किर्तन, याशिवाय सिनेमा, टि.व्ही ही सध्याची करमणुकीची साधने आहेत.[२]

## ५.२ भाऊसाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांच्या विकासासाठी दिलेले सामाजिक योगदान :-

भाऊसाहेबांचा जन्म एका शेतकरी कुटुंबात झालेला असल्याने शेतकरी वर्गाची दयनिय अवस्था भाऊसाहेबांनी पाहिली होती. तसेच प्रत्यक्षात अनुभवली सुध्दा होती.

अहमदनगर जिल्हा कमी पर्जन्य छायेचा प्रदेश असल्याने दुष्काळ हा जिल्हयातील शेतकऱ्यांच्या पाचवीला पुजलेला होता व आहे. अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांना सातत्याने नैसर्गिक संकटाचा सामना करावा लागत असल्याने शेतकरी सावकारी पाश्याच्या चक्रव्युहात सापडला होता. जिल्हयातील शेतकऱ्यांना अशा संकटातून वाचविण्यासाठी भाऊसाहेब थोरात यांनी सातत्याने संघर्ष केला आहे. विविध सभा, मोर्चे, परिषदांच्या माध्यमातून सावकारशाहीच्या व स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश सरकारच्या जाचक करातून मुक्तता करण्यासाठी संघर्ष केला होता.

त्याचप्रमाणे कामगार वर्गाचीही दयनिय अवस्था होती. ब्रिटिश सरकारचे कामगार, नोकर वर्गाविषयी अन्यायी धोरण तसेच भांडवलदार, जमिनदाराचे वर्चस्व यांच्या अन्यायातून कामगार वर्गास हालाखीचे जीवन जगणे भाग पडत होते. जिल्हयातील कामगार वर्गावर होत असलेला अन्याय दूर करण्यासाठी भाऊसाहेबांनी संघर्ष केला होता.

त्याचप्रमाणे स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही शेतकरी व कामगारावरील अन्याय दूर झाले नव्हते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही शेतकरी, कामगार वर्गावर होत असलेल्या अन्यायाविरोधी सभा, मोर्चे, परिषदांच्या माध्यमातून भाऊसाहेब थोरात यांनी दिलेले योगदान महत्वपूर्ण होते.

अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी भाऊसाहेब थोरात यांनी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात दिलेले योगदान पुढील प्रमाणे :-

### ५.२.१ अहमदनगर जिल्हयातील सावकारशाही विरोधी लढयातील भाऊसाहेब थोरात यांचे योगदान :-

भारत हा शेतीप्रधान देश होता व आहे. भारतीय समाजरचना आणि अर्थव्यवस्थेचा गाडा हा शेतकऱ्यांच्या भोवती फिरत असल्यामुळे शेतकरी म्हणजे बळीराजा असे म्हणण्याची प्रथा त्या काळात व आजही रुढ आहे. गावामधील अलुते-बलुतेदारांचा अन्नदाता असणारा शेतकरी महत्वपूर्ण घटक होता व आहे. खेडी स्वंयपूर्ण असल्याने सर्व व्यवहार वस्तुविनिमय पध्दतीने होत असत. पैसा दुर्मिळ असल्याने सर्व व्यवहार धान्यांच्या स्वरुपात होत असत.

पेशवाईच्या अस्तानंतर शिपाईगिरी करणाऱ्या मावळयांना हातात नांगर धरावा लागला होता. उदयोगधंदे आणि इतर कौशल्याचे कामे बदलल्याने देशी अलुते- बलुतेदारांचे गिऱ्हाईक कमी झाले होते. त्यातच ब्रिटिश सरकारच्या यांत्रिकीकरणाच्या धोरणामुळे लघुउद्योग व कुटीरउद्योगातील कलाकार, कामगारांवर बेकारीची वेळ आली होती. तसेच पुर्वीची 'स्वयंपूर्ण खेडी' ही संकल्पना बदलली गेली होती. त्याचा पहिला बळी शेतकरी

ठरला होता. कुणब्याला नवीन परिस्थितीशी जुळवुन घेणे अवघड झाल्यामुळे त्यांना सावकाराच्या दारात जाणे भाग पडू लागले. ब्रिटिश राजवटीतील नियमानुसार अशा कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या जमिनी हडप करण्याची सावकारांना मुभा होती. परिणामी सर्वत्र सावकारांचे वर्चस्व वाढले होते. शेतकऱ्यांच्या घरावर जप्ती येऊ लागली होती. सावकाराच्या जाचास कंटाळुन अनेक शेतकरी आपली जीवन यात्रा संपवू लागले होते. सावकारशाहीच्या या जाचाविरोधी शेतकरी संतप्तपणे विरोध करु लागला होता. महाराष्ट्रात पुणे सातारा,परिसरात कर्जबाजारी शेतकरी सावकारशाही विरोधी उठावास सिध्द झाले होते. त्याची सुरुवात प्रथम पुणे जिल्हयातील शिरुर तालुक्यातील कर्डे गावातून झाली होती. नंतर सुपे, केडगाव या गावातील गावकऱ्यांनी सावकारी विरोधी बंड पुकारले होते.[३]

सावकार कर्जाचा खोटा आकडा देत असल्याने ते कधीही फिटणे शक्य नव्हते. त्यामुळे पिढयानपिढया ही बेठबिगारी चालु होती. या सावकारशाही विरोधी डॅनियल हॅमिल्टन यांनी 'फॅमिन कमिशन' नेमले होते. सावकार अथवा बनिया या शेतकऱ्यांला साहयभूत होण्याऐवजी त्याचा रक्तशोषक बनला होता. कमिशनचा अभिप्राय असा की, शेतकऱ्याला त्याचा उद्योग उभारण्याकरिता कर्ज उपलब्ध होण्यासाठी एखादी चांगली संघटना निर्माण केली पाहिजे.

फॅमिन कमिशनपूर्वीही इ.स.१८८२ च्या सुमारास सर विल्यम वेडरबर्न व महादेव गोविंद रानडे यांनी शेतकरी बँक काढण्यासाठी एक योजना सुचविली होती. परंतु सावकारी व्यवसायाचे हे स्वरुप फॅमिन कमिशनच्या नंतरच्या काळात ही बदलण्याऐवजी ते अधिक भिषण होत गेले. ग्रामीण भागात सर्वसाधारणपणे सर्वत्र सावकारी पाशांनी आपले विळखे टाकले होते. त्यास अहमदनगर जिल्हा कसा अपवाद असणार. अहमदनगर जिल्हयातही सावकारशाही विरोधी उठावास भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली सुरुवात झाली होती.[४]

### ५.२.२ अहमदनगर जिल्हयातील खिरविरे येथील सावकारशाही विरोधी लढयातील भाऊसाहेब थोरात यांचे योगदान :-

टिटवाळा येथे शामराव व गोदूताई परुळेकर यांनी आयोजित केलेल्या शेतकरी परिषदेस अहमदनगर जिल्हयातून भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली कम्युनिस्ट कार्यकर्ते मोठया संख्येने गेले होते. शामराव व गोदूताई यांच्या सावकारशाहीविरोधी विचाराने भाऊसाहेब व लहानु गजाबा कर्पे व त्यांचे सहकारी प्रभावित झाले होते. अहमदनगर जिल्हयातही सावकारांचे वर्चस्व वाढले होते. ते नष्ट करण्याचा जिल्हयातील कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी

टिटवाळा परिषदेहुन माघारी आल्यानंतर निश्चयच केला होता. अहमदनगर जिल्हयाच्या पश्चिमेकडील अकोले व संगमनेर येथे सावकाराचे फार प्रस्थ वाढले होते. अकोले तालुक्यात तर सावकारीने भिषण स्वरुप धारण केले होते. सावकाराने एकदा दिलेले कर्ज पिढयान पिढया फिटत नव्हते. व्याजाचा दरही अधिका होता. महिने मोजतांना शिमगा, फाल्गून, होळी असे महिने मोजले जात होते. शेतकरी निरक्षर होते. सावकाराच्या वहितले टिपण, प्रॉमिसऱ्या व त्यावर आधारित हिशोब हे सारे काही एकतर्फी चालत होते. सावकार शेतकऱ्यांचे धान्य अत्यल्प किंमतीत खरेदी करीत होते. परंतु शेतकऱ्यांना हवे असल्यास तेच धान्य सावकार एकपट धान्यावर दिडपट अधिक धान्य परत करण्याच्या बोलीवर देत होते.

याशिवाय किराणा, कापड ही दुकानेही सावकारांचीच असत, स्वातंत्र्योत्तर काळातही सत्तेवर असणाऱ्या काँग्रेस पक्षाने शेतकऱ्यांवरील या अन्यायास वाचा फोडली नाही. त्याचे कारण बहुतेक सावकार हे काँग्रेसचे पुढीरीच असत.[५]

भाऊसाहेब थोरात यांनी अकोले तालुक्यातील खिरविरे येथील सावकारशाही नष्ट करण्याचा निश्चय केला होता. खिरविरे हे अकोले तालुक्यातील एक गाव असून गावात सावकाराची आठ दहा घरे होती. डांग भाग, इगतपूरी, घोटी, टाकेद आदी आसपासच्या भागात त्यांची सावकारी चालु होती.

अनेक गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी त्यांनी हडप केल्या होत्या. त्यास खिरविरे गाव ही अपवाद नव्हते. या गावातील शेतकऱ्यांमध्ये या सावकारशाही विषयी असंतोष पसरला होता. भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हयातील कम्युनिस्ट कार्यकर्त्यांचे संघटन केले आणि एके दिवशी अचानक खिरविरे सावकारशाहीवर मोर्चा काढला. मोर्चात हजारो लोक सहभागी झाले. अकोले तालुक्यातुनही मोठया प्रमाणात आदिवासी लोक उपस्थित होते. मोर्चापूर्वी सर्व नियोजन भाऊसाहेबांनी केले होते. ठरल्याप्रमाणे मोर्चा खिरविरे गावाकडे सरकु लागला होता. नियोजनाप्रमाणे सावकाराकडील प्रॉमिसरी नोटा गरीब शेतकऱ्यांच्या खरेदी केलेल्या जमिनीची खरेदीखते आदी सावकारी दस्तऐवज जमा करुन गावातील चौकात होळी करावयाची ही होळी पाहण्यासाठी जमणाऱ्या लोकांना या कृतीचा हेतू समजावून सांगावयाचा आणि माघारी जातांना घोषणा देत कुणाला धक्का न लावता शांतपणे मोर्चा करण्याचे ठरले.

मोर्चा सावकाराच्या घरासमोर आला असता गावातील लोकही मोर्चात सामील झाले. मोर्चाच्या पुढे भाऊसाहेब थोरात, मुरलीधर नवले, घोषण देत होते. मुरलीधर नवले यांनी तर

ऐटबाज फेटा बांधुन हातात बंदूक छातीवर काडतुसाचा पटटा लावुन विरासारखे भाऊसाहेबां बरोबर मोर्चाच्या पुढे चालले होते.

मोर्चा सावकाराच्या घरासमोर आल्यानंतर भाऊसाहेबांनी आपल्या भाषणातून मोर्चाचा उद्देश स्पष्ट केला. आणि सावकारांना सर्व प्रकारची गहाणखते, खरेदीखते, प्रॉमिसरी नोटा आपण होऊन ताब्यात देण्याची आज्ञा केली. तेव्हा अनेक सावकारांनी घाबरुन आपल्याकडील दस्तऐवज मोर्चेकऱ्यांच्या स्वाधीन केला. मात्र न्यालाशेठने कागदपत्र, गहाणखते, खरेदीखते देण्यास नकार दिला असता भाऊसाहेबाच्या आज्ञेनुसार मोर्चेकरी घरात घुसले आणि न्यालाशेठ यांचा वाडा खणून खणुन सर्व कागदपत्रे, सर्व संपत्ती बाहेर काढली. सोने तारण असणाऱ्या शेतकऱ्यांना तेथेच त्यांचे सोने परत करण्यात आले तर इतर सर्व दस्तऐवजांची चौकात सर्वांच्या साक्षीने जाहिर होळी करण्यता आली. येथुन पुढे कोणीही सावकारी कर्ज परत करायचे नाही. आपल्या जमीनी पुन्हा ताब्यात घेऊन त्या कसण्यास सुरुवात करा. असा संदेश देऊन भाऊसाहेबांनी मोर्चेकऱ्यांना शांतपणे माघारी फिरण्याची आज्ञा केली. मोर्चेकरी गावाच्या बाहेर गेल्यानंतर सर्वजण आपल्या पध्दतीने मार्गक्रमण करु लागले. भाऊसाहेबांची खिरविरे गावातील सावकारशाही नष्ट करण्याची मोहिम यशस्वी झाल्यानंतर अहमदनगर जिल्हयातील अनेक ठिकाणी याच पध्दतीने मोर्चाने जाऊन लोकांनी सावकारशाही नष्ट केली.[६]

दुसऱ्या दिवशी खिरविरे येथील घटनेच्या बातम्या वर्तमानपत्रात छापुन आल्या. पोलिसांच्या गाडया फिरु लागल्या. पोलिस पकड वॉरंट काढण्याच्या आत सर्व कार्यकर्ते पसार झाले. पोलिस भाऊसाहेबांच्या घरी जोर्वे येथे येऊन भाऊसाहेबांचा तपास करु लागले. खिरविरे घटनेतील सहभागी कम्युनिस्ट अनेक कार्यकर्त्यांना अटक झाली होती. भाऊसाहेबांवर ही खटला भरला होता. अटक वॉरंट जारी केले होते. भाऊसाहेब २ जाने.१९५१ रोजी संगमनेर कोर्टात गेले असता त्यांना के.बी.दादा देशमुख हे कोर्टाच्या आवारातच भेटले असता त्यांच्या आग्रहाखातर भाऊसाहेब त्यांच्या घरी चहा पिण्यासाठी गेले असता पोलिसांना सुगावा लागला. चहा पिणार तोच दोन पोलिस आले आणि भाऊसाहेबांना म्हणाले आम्ही तुम्हाला अटक करण्यासाठी आलो आहोत. त्याच दिवशी भाऊसाहेबांना अटक झाली. आणि भाऊसाहेबांना अकोले पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. कोर्ट निकालानंतर दोन महिने अकोले येथे व नंतर संगमनेर येथील जेलमध्ये ठेवण्यात आले होते.[७]

भाऊसाहेबांनी अकोल तालुक्यातील खिरविरे येथील सावकारांवर काढलेल्या मोर्चामुळे अकोले तालुक्यातील खिरविरे सह अनेक गावांतील कर्जदार शेतकऱ्यांनाही लाभ झाला.

**भाऊसाहेबांचे खिरविरे येथील सावकारशाही लढयानंतर अकोले तालुक्यातील सावकारी कर्जातुन मुक्त झालेले शेतकरी :-**

**तक्ता क्रं.४**

| अ.नं. | शेतकऱ्याचे नाव | गावाचे नाव |
|---|---|---|
| १) | नावाडी मारुती दादा | अकोले |
| २) | सुतार आप्पाजी बबन | अकोले |
| ३) | धुमाळ कारभारी तुळाजी | धुमाळवाडी |
| ४) | नवले रामचंद्र लक्ष्मण | नवलेवाडी |
| ५) | नवले शिवराम राणूजी | नवलेवाडी |
| ६) | धोंड राधाकिसन बापू | कोकमठाण |
| ७) | मानकरी दशरथ यशवंतराव | अकोले |
| ८) | हंबीर किसन गणपतराव | कोतूळ |
| ९) | हरकोर दिनकर द्वारकानाथ | अकोले |
| १०) | पन्हाळे गणपत नारायण | अकोले |

आदी शेतकरी सावकारी कर्जातुन मुक्त झाले होते.[८]

### ५.२.३ अहमदनगर जिल्हयातील सोमठाणे नलावडे येथील सावकारशाही विरोधी लढयातील भाऊसाहेब थोरात यांचे योगदान :-

पाथर्डी तालुक्यातील सोमठाणे नलावडे गावात चार पाच सावकार पिढयानपिढया वास्तव्य करुन होते. सावकार शेतकऱ्यांना संकटप्रसंगी साहय करत असत. परंतु त्यांच्या कितीतरी पट रक्कम पुन्हा वसुल करत असत. त्यांनी अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी हडप केल्या होत्या. शेतकरी निरक्षर असल्याने त्यांना आपल्या हक्कांची जाणीव नव्हती. तसेच हिशोबही त्यांना जमत नसे. अशा परिस्थितीचा फायदा सावकार घेत होते. आजोबाचे कर्ज नातवाकडूनही फिटत नसे. सावकार हिशोबात गोंधळ करत असत. भाऊसाहेबांनी अकोले, संगमनेर येथील सावकाराप्रमाणे सोमठाणे नलावडे येथील सावकारशाही विरोधी लढा उभारला.

भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हयातील कम्युनिस्ट कार्यकर्त्यांची मिटींग घेऊन त्यात सोमठाणे येथील सावकारशाही नष्ट करण्याची योजना आखण्यात आली.

गावातील एकनाथराव काकडे, भानुदास पाटील नलावडे, भिकाजी पाटील नलावडे व सर्व शेतकऱ्यांना एकत्र आणले. भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली गावातील सर्व सावकारांवर बहिष्कार टाकण्यात आला. कोणीही कोणत्याही कामासाठी सावकाराकडे जायचे नाही. यातुन सावकार मंडळी वैतागुन गेली होती. यानंतर भाऊसाहेबांनी शेतकऱ्यांना गहाणखत शेतजमिनीवर आपला ताबा पुन्हा घेण्याच्या आज्ञा केल्या. अशा प्रकारे सोमठाणे नलावडे येथील सावकारशाही विरोधी लढा यशस्वी झाला.[९]

भाऊसाहेबांनी पाथर्डी तालुक्यातील शेतकऱ्यांचे संघटन करुन तालुक्यातील सोमठाणे, नलावडे येथील सावकारावर काढलेल्या मोर्चाने तेथील सावकारशाही नष्ट केल्यामुळे खालील शेतकरी सावकारी कर्जातुन मुक्त झाले.

**तक्ता क्रं.५**

| अ.नं. | शेतकऱ्याचे नाव | गावाचे नाव |
|---|---|---|
| १) | हेडगोत्रे दगडू मनोहर | पाथर्डी |
| २) | हंडाळ किसन त्र्यंबक | पाथर्डी |
| ३) | सदावर्ते किसन शंकर | पाथर्डी |
| ४) | पाटील तुकाराम रामभाऊ | सोमठाणे |
| ५) | लहारे भास्कर नारायण | पाथर्डी |
| ६) | बेलसरे रंगनाथ दत्तात्रय | करंजी |
| ७) | बुधवंत यशवंत काशिनाथ | शिरापूर |

आदी शेतकरी सावकारी कर्जातुन मुक्त झाले होते.[१०]

### ५.२.४ रिझर्व्ह बँकेवर काढलेल्या टिकुरे मोर्चातील भाऊसाहेबांची भूमिका :-

रिझर्व्ह बँकेने शेती कर्जावरील व्याजाचा दर अचानकपणे दोन टक्यांनी वाढविला होता. बँकचे हे धोरण सहकारातील भाऊसाहेब व इतर कार्यकर्त्यांना मान्य नव्हते. तेव्हा भाऊसाहेब थोरात यांनी पुढाकार घेत जिल्हयातील सहकारातील कार्यकर्ते व शेतकऱ्यांचा मेळावा घेतला. मेळाव्यातील ठरावानुसार रिझर्व्ह बँकेने शेती कर्जाच्या व्याज दरात केलेली वाढ अन्यायी व जाचक असल्याने ती वाढ मागे घ्यावी व व्याजदर कमी करावा. या

ठरावानुसार भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांचा टिकुरे मोर्चा रिझर्व्ह बँकेच्या मुंबई येथील कार्यालयावर नेण्याचे निश्चित झाले होते.

मोर्चा पूर्वी जिल्हयात प्रचार मोहिम राबविण्यात आली होती. मोर्चापूर्वी मोर्चाच्या संघर्ष समितीचे अध्यक्ष भाऊसाहेब धुमाळ यांनी रिझर्व्ह बँकेच्या मुंबई येथील मुख्य कार्यालयास कळविले की, शेतकऱ्यांना वाढीव व्याजदर मान्य नाही. व्याज दरवाढ मागे घ्यावी. यासाठी शेतकऱ्यांचा मोर्चा बँकेवर येत आहे. अशी दोन ओळीची तार केली होती. मोर्चा ठरलेल्या तारखेस सकाळी नऊ वाजता मंत्रालयाच्या पाठीमागे आमदार निवासाच्या समोर पाच हजार शेतकरी टिकुऱ्यांसह जमा झाले होते. मुख्यमंत्री वसंतराव दादा यांनी मोर्चातील शेतकऱ्यांचे स्वागत केले व मोर्चाला पाठींबा देऊन मोर्चाला शुभेच्छा दिल्या आणि आमदार निवासापासून मोर्चाला सुरुवात झाली. मोर्चाच्या अग्रभागी असलेल्या जीपवर भाऊसाहेब थोरात उभे राहुन मोठमोठयाने घोषणा देत होते. मोर्चातील सहभागी शेतकऱ्यांनी डोक्याला लाल फेटे बांधलेले होते. खाद्यांवर बरोबर आणलेले टिकुरे घेतले होते. मोर्चा रिझर्व्ह बँकेजवळ आला असता भाऊसाहेब थोरात यांनी भाषण सुरु केले. एवढया प्रचंड संख्येने हातात टिकुरे घेऊन आलेले शेतकरी पाहताच बँकेत धोक्यांची घंटा सुरु झाली आणि बँक कार्यालयाची सर्व दरवाजे, गेट बंद करण्यात आले असता शेतकऱ्यांनी बँकेच्या गेटवर जोर जोराने टिकुरे मारण्यास सुरुवात केली होती.

परंतु शेतकऱ्यांचा संयम सुटण्याच्या आधीच भाऊसाहेबांनी सर्वांना शांतता राखण्याचे अहवान केले होते. मोर्चेकऱ्यांना सामोरे जाण्यास एकही अधिकारी समोर आला नाही. शेतकऱ्यांचा मोर्चा हा रास्त मागण्यासाठी होता. जरी तातडीने मागण्यांची दखल रिझर्व्ह बँकेने घेतली नाही, तरी व्याजदर वाढीबाबत शेतकऱ्यांमधील असंतोष त्यांना प्रत्यक्ष बघायला मिळाला होता. एक महिन्याने रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर आय.जी.पटेल यांनी भाऊसाहेबांना पत्र पाठवुन मुंबईस बोलावले होते. तेव्हा भाऊसाहेब थोरात अहमदनगर जिल्हयातील कार्यकर्त्यांना घेऊन पटेल साहेबांकडे गेले असता, पटेल साहेबांबरोबर झालेल्या चर्चेनुसार पटेल साहेबांनी व्याजदर दोन टक्क्यांनी कमी केला होता.

अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांच्या या अभिनव टिकुरे मोर्चाने संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना शेती कर्जावरील व्याजदर दोन टक्यांनी कमी करुन दिलासा देण्याची अभूतपुर्व कामगिरी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी केली होती.[११]

**५.२.५ शेती पंपावरील मिटर हटाव मोर्चातील भाऊसाहेब थोरात यांची भूमिका :-**

भाऊसाहेब थोरात इ.स.१९७८ साली झालेल्या विधानसभा निवडणूकीत संगमनेर मतदार संघातून विजयी झाले होते. भाऊसाहेब थोरात जरी संगमनेर मतदार संघातुन निवडून आले होते. परंतु ते तालुक्याचे नव्हे तर, अहमदनगर जिल्हयाचे आमदार होते. अहमदनगर जिल्हयाचा सामाजिक विकास करतांना भाऊसाहेबांसमोर अनेक आव्हाने होती. महाराष्ट्राप्रमाणेच अहमदनगर जिल्हयातील लोक विजेच्या प्रश्नांने त्रस्त झालेले होते. विजेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी काहीतरी आक्रमक भूमिका घेणे क्रमप्राप्त होते. दूष्काळाने कृषी अर्थव्यवस्था डबघाईस आली होती. अशा परिस्थितीत विजेचे बिल मिटरनुसार भरावे लागे. विजेचा प्रश्न सोडविण्यासाठी भाऊसाहेबांनी कार्यकर्त्यांची सभा घेतली, आणि लढा देण्याचा निर्णय भाऊसाहेबांनी सर्व कार्यकर्त्यांच्या बैठकीत घेतला. त्या निर्णयानुसार ठरलेल्या तारखेस, मीटर ऐवजी अश्वशक्तीनुसार विजबिल आकरण्यात यावे. या मागणीसाठी विज पंपाचे मिटर काढून विज मंडळाच्या ऑफीसमध्ये जाम करण्याचा निर्णय घेतला. ही मोहीम यशस्वी करण्यात भाऊसाहेब थोरात, कारभारी पा.चौधरी, अप्पासाहेब सुर्वे, विश्वनाथ नवले, चंद्रभान पा.आठरे, पी.बी.कडू पाटील, भास्करराव दूर्वे नाना, रावसाहेब शिंदे आदि कार्यकर्त्यांनी जिल्हयात प्रचार मोहिमे द्वारे शेतकऱ्यांना विज पंपावरील मिटर काढून ठरलेल्या तारखेस संगमनेर विज कार्यालयावर नेण्यात येणाऱ्या मोर्चात सहभागी होण्याचे आव्हान केले होते.

मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्यासमोर तत्पूर्वीच शेती पंपावरील विज बिल प्रस्ताव भाऊसाहेबांनी मांडला होता. परंतु मुख्यमंत्री साहेबांनी म्हटले की, असे होऊच शकरणार नाही. असे म्हणत भाऊसाहेबांची मागणी फेटाळुन लावली होती. मात्र शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री पदावरुन दूर होताच वसंतदादा पाटील मुख्यमंत्रीपदी आले. भाऊसाहेबांनी मीटर हटाव मोर्चा काढण्याचे निश्चित केले. अण्णासाहेब शिंदे मोर्चाच्या शिष्टमंडळाचे प्रमुख होते. प्रत्यक्ष मोर्चाच्या दिवशी पाच हजारांपेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आपआपल्या वीजपंपाचे मीटर्स डोक्यावर घेतले व मिरवणुकीने जाऊन संगमनेर येथे वीज मंडळाच्या कार्यालयात जमा करण्यात आले. विजेचा प्रश्न शेतकऱ्यांना अगदी असाहय झाला होता. भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली संगमनेर विज कार्यालयात पाच हजारापेक्षा अधिक मीटर जमा केल्यानंतर अहमदनगर जिल्हयातील अनेक तालुक्यात संगमनेरच्या घटनेची पुनरावृत्ती झाली होती.

विजेच्या प्रश्नाने शेतकरी त्रस्त झाले होते. भाऊसाहेब थोरात व अण्णासाहेब शिंदे सर्व कार्यकर्त्यांना घेऊन मुख्यमंत्री वसंतदादा पाटलांकडून मीटर हटाव मागणीसाठी गेले असता अण्णासाहेब शिंद यांनी वसंतदादा पाटलांना शेतकऱ्यांची दयनीय अवस्था समजून दिली असता वसंतदादा पाटलांनी मीटर ऐवजी अश्वशक्तीनुसार विजबिल आकारण्याची मागणी मान्य केली आणि प्रती अश्वशक्ती १७० रु. दर निश्चित करण्यात आला.

भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली सुरु केलेल्या मीटर हटाव, चळवळीचा अखेर विजय झाला. अण्णासाहेब शिंदे यांनी सर्व शेतकऱ्यांच्या वतीने मुख्यमंत्री वसंतरावदादांचे आभार मानले. भाऊसाहेबांच्या दुरदुष्टीमुळे काढलेल्या या मोर्चाने फक्त अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांनाच दिलासा मिळाला नाही तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने हा निर्णय महत्वपूर्ण ठरला आहे. भाऊसाहेबांच्या या कार्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये आनंदी आनंद पसरला होता.[१२]

**५.२.६ राजहंस दुध संघाच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी भाऊसाहेबांनी दिलेले योगदान :-**

भाऊसाहेब थोरात यांनी शेतकऱ्यांना शेतीला जोडधंदा भूमिहिन, अल्पभूधारक, मजूर आणि आर्थिक दूर्बल घटक यांचे जीवनमान उंचविण्यासाठी राजहंस सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्यादित, संगमनेर या दूध संघाची सहकारी तत्वावर दिनांक १२/११/१९७७ साली स्थापना केली. दूध संघाचे सुरुवातीचे दैनंदिन संकलन फक्त २००० लिटर होते.

भाऊसाहेबांनी दुध संघाची स्थापना करुन स्थापनेपासून ते आजपर्यंत संघावर काँग्रेस पक्षाचे वर्चस्व ठेवले. त्यांच्यानंतर पुत्र बाळासाहेबांचे दुध संघास खंबीर नेतृत्व लाभले.

भाऊसाहेब थोरात यांनी दुध संघाचे अध्यक्षपद कधीही स्विकारले नाही. परंतु ते राजहंस दुध संघाचे संस्थापक असल्याने त्यांनी प्रयत्नांची शर्त करत शेतकऱ्यांसाठी शिबिरे कार्यशाळा आदींच्या माध्यमातून शेतकऱ्यांमध्ये दुध व्यवसायाच्या संदर्भात जागृती घडून आणली होती. एवढेच नव्हे तर जिल्हा सहकारी बँक, राष्ट्रीयकृत बँक, यांच्या मार्फत संकरित गायी खरेदीसाठी शेतकऱ्यांना अर्थ सहाय्य मिळवुन दिले. भाऊसाहेब थोरात सामाजिक समानता साधण्याच्या दृष्टीने सदैव तत्पर होते. अधिक दूध उत्पादनासाठी दूध संघाच्या माध्यमातून उत्तम जातीच्या गाईंची पैदास सुधारित जातीचे चारा, बियाणे, तसेच अनुदान तत्वावर गव्हाण, कडबा कुटी यंत्र, मिल्किंग मशिन तसेच पशुवैद्यकीय उपचाराची सुविधा आधुनिक तंत्रज्ञान, दुध उत्पादकांच्या दारापर्यंत पोहोचण्याच्या योजना राबविल्या जात होत्या व आहेत. दुध उत्पादक शेतकऱ्यांना विविध पध्दतीने सहाय्य करुन दूध उत्पादन

वाढविण्यासाठी प्रयत्न केले जात होते व आहेत. संघाच्या माध्यमातून विविध दुधजन्य पदार्थाची निर्मिती केली जाते. राजहंस दूध संघाच्या माध्यमातून जिल्हयातील आदिवासी भागातील शेतकऱ्यांना शेतीस जोडधंदा मिळाला असून, भाऊसाहेबांनी सुरु केलेल्या दुध संघाचा जिल्हयातील अनेक शेतकऱ्यांना लाभ होत आहे.

मा.महसुलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी वडीलांप्रमाणे राजहंस दुध संघावर काँग्रेस पक्षाचे वर्चस्व ठेवण्यात यश मिळविले आहे. ते इ.स.१९८८ ते १९९३ दुध संघाचे अध्यक्ष होते. दुध संघाचे अध्यक्ष असतांना दुध संघाच्या माध्यमातुन शेतकऱ्यांना दुध व्यवसाय करण्यासाठी अनेक योजना राबविल्या. आजही त्यांच्या मार्गदर्शनाखाली दुध संघाची वाटचाल यशस्वीपणे चालु आहे. हा दुध संघ महाराष्ट्रातील आदर्श दुध संघ म्हणून ओळखला जातो. सद्य स्थितीला दुध संघाचे संकलन तीन लाख एकावन्न हजार लिटर प्रति दिन होत आहे. संकलन केलेले दुध महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक राज्यात दुध व दुग्धजन्य पदार्थाची विक्री केली जाते.[१३]

### ५.२.७ सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून भाऊसाहेबांनी शेतकऱ्यांसाठी दिलेले योगदान :-

पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी धनंजयराव गाडगीळ यांच्यासारख्या अर्थतज्ञाच्या मार्गदर्शनाखाली अहमदनगर जिल्हयातील लोणी येथे आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना काढला आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक परिवर्तनाच्या दृष्टीने सहकारी चळवळीने नवे खंबीर पाऊल उचलले. जिल्हयात इतरही खाजगी कारखाने होते, परंतु सहकारी तत्वावर चालविला जाणारा, प्रवरा कारखान्यास मोठया प्रमाणात ऊस येऊ लागल्याने, संगमनेर,अकोले सारख्या दुर्गम भागातील शेतकऱ्यांचा ऊस शिल्लक राहु लागला होता. त्यावेळी बी.जे.खताळ महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात पाटबंधारे मंत्री होते. भाऊसाहेब थोरात यांनी बी.जे.खताळ आणि आण्णासाहेब शिंदे यांच्यापुढे पठार भागातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊस गळतीविषयी चिंता व्यक्त केली. बी.जे. खताळ संगमनेर मतदार संघातील आमदार म्हणुन तर कित्येक वर्ष मंत्रीपदी होते. त्यांनी संगमनेर येथे साखर कारखाना काढण्याच्या भाऊसाहेबांच्या धोरणाला पाठींबा दिला. आणि याकामी मंत्री आण्णासाहेब शिंदे यांच्या साहयाने संगमनेर भाग सहकारी साखर कारखान्यास कारखान्यासाठी परवाना मिळविला. शेतकऱ्यांनी भाऊसाहेब थोरात, बी.जे. खताळ पाटील, आण्णासाहेब शिंदे यांच्यावर विश्वास ठेवुन मोठया प्रमाणात साखर कारखान्याचे शेअर्स

घेतले.भाऊसाहेब थोरात यांच्या प्रयत्नातुन कारखान्याच्या जागेचाही प्रश्न सुटला होता. बी.जे. खताळ आणि आण्णासाहेब शिंदे या दोन मंत्र्यांच्या साहयाने भाऊसाहेबांचे संगमनेर भाग सहकारी कारखान्याचे उभारणीचे स्वप्न साकार झाले. आणि प्रत्यक्षात १९६८ ला संगमनेर भाग सहकारी साखर कारखाना सुरु झाला.

कारखान्याचे पहिले अध्यक्ष विठ्ठलराव विखे पाटील, उपाध्यक्ष भाऊसाहेब धुमाळ तर खजिनदार भाऊसाहेब थोरात तर दत्ताजीराव मोरे, कारभारी पाटील चौधरी, विश्वनाथ नवले, हरिभाऊ वर्पे, भाऊसाहेब दिघे, बाबुराव तनपुरे, बाबुराव ढोले, नारायणराव उंबरकर, तुकाराम पावसे, हरिभाऊ सांगळे यांची संचालक पदी निवड झाली. प्रारंभी ८५० मेट्रीक टन क्षमता होती. भाऊसाहेब १९६८ साली संचालक होते. तर पुढे इ.स.१९७७ ते १९७८, १९९७ ते १९९२, २००३ ते २००६ या वर्षी भाऊसाहेब साखर कारखान्याचे अध्यक्ष होते. अध्यक्ष पदास त्यांनी विषेष महत्व प्राप्त करुन दिले. अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने विविध योजना राबविल्या. त्यातुन ऊस क्षेत्रात मोठया प्रमाणात वाढ झाली. तर मा.महसुलमंत्री बाळासाहेब थोरात हे १९९२ ते १९९४ आणि १९९९ साली अध्यक्ष होते. त्यांनीही आपल्या वडीलांचे ध्येय धोरण राबवत ऊस क्षेत्रात मोठया प्रमाणात वाढ करण्यास शेतकऱ्यांना विविध योजनाचा लाभ दिला. त्यांच्या या धोरणातून जिल्हयात मोठया प्रमाणात ऊस क्षेत्रात वाढ झाल्याने सध्या ५००० मे.टन क्षमतेची मशनरी बसविली आहे.

भाऊसाहेब थोरात यांच्या कल्पनेतुन उभारलेल्या सहकारी साखर कारखान्यामुळे अहमदनगर जिल्हयातील ऊस क्षेत्रात वाढ होऊन जिल्हयातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. भाऊसाहेब थोरात यांनी कारखान्याच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाच्या सामाजिक विकासात दिलेले योगदान महत्वपूर्ण राहिले आहे.[१४]

### ५.२.८ अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष असतांना भाऊसाहेबांनी शेतकऱ्यांसाठी दिलेले योगदान :-

भाऊसाहेब थोरात अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेत १९६५-६८, १९७३-७७, १९९५-९९ अशी १४ वर्षे अध्यक्ष असतांना आपल्या अध्यक्षपदाचा उपयोग अहमदनगर जिल्हयाच्या सर्वांगिण विकासासाठी करणोर ते एक आदर्श अध्यक्ष होते. सहकाराची जाण असणाऱ्या भाऊसाहेबांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून पिक विमा, दुध व्यवसाय कर्ज, ऑईल इंजिन, वीज पंप, ट्रॅक्टर, पुरवठा मळणी यंत्र, विहीर, पाईपलाईन,आधुनिक शेती अवजारे, शेतीपूरक उद्योग, अशा विविध योजनांच्या माध्यमातून

जिल्हातील शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात कर्ज पुरवठा करुन अहमदनगर जिल्हयाच्या सामाजिक विकासात महत्वपूर्ण योगदान दिले होते.[१५]

### ५.२.९ भाऊसाहेब थोरात, अमृतवाहिनी सहकारी बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी भाऊसाहेब थोरात यांचे योगदान :-

अहमदनगर जिल्हयाचा पूर्वेकडील भाग आदिवासी लोकवस्तीचा असून अशा आदिवासी अल्पभूधारक शेतकऱ्यांना इतर बँका कर्ज देण्यास टाळाटाळ करत असत. हे पाहून भाऊसाहेब व्यथित होत होते. त्या दृष्टीने सर्वसामान्य जनतेची बँक असावी असे भाऊसाहेबांना वाटत होते. भाऊसाहेबांनी रिझर्व्ह बँकेकडून "भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँक, घुलेवाडी" या बँकेस इ.स. १९८३ साली परवाना मिळविला, प्रत्यक्षात ०१/१०/१९८३ रोजी बँकेच्या कामकाजास सुरुवात झाली. भाऊसाहेबांनी ज्या सहकारी संस्था स्थापन केल्या त्या पदासाठी नाही तर समाज विकासासाठी स्थापन केल्या. सहकारात काम करणाऱ्यांनाही त्यांनी महत्वाच्या पदावर नेमण्याचे धोरण अवलंबुन एक नवा आदर्श घालुन दिला. भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी बँकेचे संस्थापक असल्याने ते बँकेच्या विकासाकडे सातत्याने लक्ष देत असत. त्यांनी बँकेचा शाखा विस्तार करत संगमनेर मार्केटयार्ड, नेहरु चौक संगमनेर, इंजिनिअरींग कॉलेज संगमनेर अशा चार शाखात विस्तार केला. बँकेच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांना पाईपलाईन, विहीर, दुध व्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन, शेतीपूरक उद्योगांसाठी कर्ज पुरवठा केला जाऊ लागला. सर्वसामान्य शेतकऱ्यांनाही गहाणखत करुन कर्ज दिले जाते. भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँक ही अहमदनगर जिल्हयातील सर्वसामान्यांची बँक म्हणुन ओळखली जाते. अमृतवाहिनी बँकेच्या माध्यमातून भाऊसाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्हयाच्या सामाजिक विकासात दिलेले योगदान महत्वपूर्ण म्हणुन ओळखले जाते.[१६]. तर पुत्र बाळासाहेब थोरात यांनीही बँकेचा शाखा विस्तार करत घारगांव, साकूर, तळेगांव दिघे येथे नवीन शाखा सुरु केल्याने सद्या बँकेच्या सात शाखा सुरु आहेत.

### ५.२.१० सॅम्प्रो संस्थेच्यामाध्यमातून शेतकऱ्यांसाठी भाऊसाहेबांनी दिलेले योगदान :-

शाळीग्राम होडगर यांच्या कल्पनेतुन भाऊसाहेब थोरात यांनी ॲग्रीकल्चरल प्रोडयुस ॲण्ड ट्रान्सपोर्ट कंपनी संगमनेर या संस्थेची स्थापना १०/०४/१९८१ साली केली. ती सॅम्प्रो या संक्षिप्त नावाने ओळखली जाते. अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांची खाजगी व्यापाऱ्यांकडुन लुटमार होत होती. यातुन शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी शाळीग्राम होडगर

यांच्या कल्नेतून भाऊसाहेब थोरात यांनी संगमनेर येथे सॅम्प्रो संस्था सुरु केली. अहमदनगर जिल्हयाच्या बाहेरील शेतकऱ्यांनाही विविध साहित्याचा पुरवठा करण्याचे महत्वपुर्ण धोरण राबविले होते. त्यांच्या या महत्वपूर्ण निर्णयाने जिल्हयाच्या बाहेरील शेतकरीही सॅम्प्रो संस्थेतील विविध वस्तुंचे स्वस्त दाराने खरेदी करण्याचा लाभ घेऊ लागले. त्यातुन जिल्हयातील बाजारपेठेवर नियंत्रण मिळविण्यात सॅम्प्रो संस्था महत्वपूर्ण योगदान देत आहे. सॅम्प्रो संस्थेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना खाजगी व्यापाऱ्यांच्या तुलनेत कमी दराने साहित्य पूरवठा केला जातो. सॅम्प्रो संस्थेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पी.व्ही.सी. पाईप, टायर, सिमेंट, स्टिल, खते, बियाणे, पत्रे, लोखंड, टोमॅटो तार, बांधकाम साहित्य उपलब्ध करुन दिले जाते. भाऊसाहेब थोरात यांनी सॅम्प्रो संस्थेच्या माध्यमातून नफ्यापेक्षा सेवेला अधिक प्राधान्य दिले असल्याने अहमदनगर जिल्हयाच्या बाजारपेठेवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने सॅम्प्रो संस्थेचे योगदान महत्वपूर्ण ठरत आहे. पुत्र बाळासाहेब थोरात यांनी आपल्या वडिलांची ही परंपरा कायम ठेवत संस्थेला सर्वोच्च स्थानी नेऊन ठेवले आहे.

सॅम्प्रो संस्थेच्या माध्यमातून भाऊसाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्हयाच्या सामाजिक विकासासाठी दिलेले योगदान आजही महत्वपूर्ण ठरत आहे.[१७]

### ५.२.११ शेतकऱ्यांना पाणीपुरवठा करणाऱ्या सहकारी संस्थेतील भाऊसाहेब थोरात यांचे योगदान :-

अहमदनगर जिल्हयातील शेती सजुलाम-सुफलाम करण्यासाठी शेतीला बारमाही पाणीपुरवठा होणे आवश्यक आहे. हे ओळखून भाऊसाहेब थोरात यांनी शेतीस पाणीपूरवठा करण्याच्या योजनेस लोकचळवळीचे स्वरुप प्राप्त करुन दिले होते. एवढेच नव्हे तर, राज्य सहकारी बँकेतील अध्यक्ष पदाचा त्याचप्रमाणे जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष असतांना अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांना अनेक सामुहिक पाणीपुरवठा योजनांना कर्जपुरवठा उपलब्ध करुन दिला होता. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना स्वतंत्र पाईपलाईनसाठी देखील कर्ज बँकेच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिले होते. एवढेच नव्हे तर, बँकांच्या माध्यमातून जिल्हयातील पाझर तलाव, साठवण बंधारे, टि.टि.वेअर, छोटे बंधारे यासाठी देखील मोठया प्रमाणात बँकांकडून कर्ज पुरवठा उपलब्ध करुन दिला होता. त्याचप्रमाणे सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून पाणीपुरवठा संस्थेची स्थापना करुन शेतकऱ्यांना वैयक्तिक पाईपलाईनसाठी तसेच सामुहिक पाईपलाईनसाठी देखील मोठया प्रमाणात कर्जपुरवठा करण्याचे धोरण अवलंबिले होते. भाऊसाहेब थोरात

यांनी अहमदनगर जिल्हयात विविध पाणीपुरवठा करणाऱ्या सहकारी संस्थांची स्थापना करुन जिल्हयातील शेतीस बारमाही पाणीपुरवठा कसा होऊ शकेल याकडे लक्ष दिले होते. भाऊसाहेबांच्या प्रयत्नातून जिल्हयात अनेक मोठया पाईपलाईन सुरु झाल्या. त्यातील भाऊसाहेबांनी स्वतः लक्ष घालुन अहमदनगर जिल्हयातील नांदूर खंदरमाळ या डोंगर माध्यावर असणाऱ्या गावात मुळा नदीवरुन ५५० फुट उंचावर सामुहिक पाईपर्लाइन करुन पठार भागाचे नंदनवन केले आहे. भाऊसाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली सुरु झालेल्या पाणीपुरवठा चळवळीमुळे जिल्हयातील पाझर तलाव, साठवण बंधारे, गाव तलाव, टि.टि. वेअर, छोटे बंधारे आदि पाणी अडविण्याच्या योजना तयार होऊन अहमदनगर जिल्हयातील शेती सुजलाम -सुफलाम होण्यात भाऊसाहेब थोरात यांचे योगदान महत्वपूर्ण राहिले आहे.[१८]

**५.२.१२ भाऊसाहेब थोरात यांची भूमिहिनांना वनजमिन मिळवून देण्यातील भूमिका :-**

महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्हा दुष्काळी जिल्हा म्हणुन ओळखला जातो. त्यातच महाराष्ट्रात अनेक वेळा पडलेल्या दुष्काळाची झळ सर्वात जास्त प्रमाणात अहमदनगर जिल्हयाला सोसणे भाग पडत होते व आहे. महाराष्ट्रात इ.स.१९५२ साली मोठा दुष्काळ पडला होता. या दुष्काळाची झळ अहमदनगर जिल्हयाला सर्वाधिक बसली होती. या दुष्काळामध्ये अहमदनगर जिल्हयातील वन जमिनीवरील झाडे नष्ट झाली होती. जंगलहिन झालेल्या जमिनीवर मालकी हक्क मात्र वन खात्याचा होता. या वन जमिनी जिल्हयातील आदिवासी, मागासवर्गीय, आदि भूमिहिंनाना मिळाव्यात म्हणून भाऊसाहेब थोरात यांनी चळवळ सुरु केली. त्यामध्ये अनेक ठिकाणी त्यांनी मोर्चे काढले. काही ठिकाणी सभा घेतल्या. भाऊसाहेबांच्या या संघर्षामुळे सरकारला वनविभागाच्या तात्याबील अनेक जमिनी भूमिहीन आदिवासी मागासवर्गीयाना देणे भाग पडले होते. या मोहिमेद्वारे अकोले, संगमनेर, राहुरी, पारनेर या आदिवसाी व पठार भागातील फार मोठया जमिनी भूमिहींनाना मिळाल्या होत्या. त्यामुळे रोजदारीसाठी भटकंती करणाऱ्या फार मोठा समुदायास स्थिरता प्राप्त झाली होती. हे भाऊसाहेब थोरात यांच्या कार्यातून घडून आले होते.[१९]

**वनजमिनी मिळालेले लाभार्थी भूमिहीन**

**तक्ता क्रं.६**

| अ.नं. | लाभार्थी शेतकऱ्याचे नाव | गावाचे नाव |
|---|---|---|
| १) | धोंडीराम महादू वाकचौरे | राहाता |
| २) | गंगाराम जानकु केदार | देसवडे, पारनेर |
| ३) | तुकाराम गोपीनाथ कदम | साकुर |
| ४) | तुकाराम भवानी थोरात | राहाता |
| ५) | विजय बाबुराव ससाणे | साकुर |
| ६) | भिकाजी भवानी थोरात | राहाता |
| ७) | ज्ञानदेव बाबुराव केदार | साकुर |

आदी भूमिहीनांना वनजमिनी मिळाल्या आहे.[२०]

**५.२.१३ भाऊसाहेब थोरात यांनी सिलिंग व कुळकायदयासाठी दिलेले योगदान :-**

देशातील कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी सिलिंगचा कायदा झाला पाहिजे. अशा प्रकारचा मोठा कार्यक्रम हाती घेतला होता. या कायदयानुसार जमिनदारांजवळील अतिरिक्त जमिनी काढून घेऊन त्या जमिनी भूमिहीन शेतमजुरांना वाटण्यात याव्यात अशी ती मागणी होती. देशामध्ये मोठया जमिनदारांकडे हजारो एकर जमिनी स्वत:च्या मालकीच्या होत्या. त्या जमिनीच्या बळावर अनेक जमिनदार शेतमजूंराची पिळवणुक करत असत. महाराष्ट्रातील कम्युनिस्टाच्या चळवळीपूर्वी ही एक सिलिंगचा कायदा अस्तित्वात होता. पण तो पुरेसा नव्हता. म्हणूनच महाराष्ट्रातील कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी सत्याग्रह सुरु केला. त्याचप्रमाणे अहमदनगर जिल्हयात भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली कम्युनिस्ट पक्षांच्या वतीने सिलिंगचा कायदा झाला पाहिजे म्हणून सत्याग्रह सुरु केला. अहमदनगर जिल्हयात तेव्हा सोमय्या फार्म, खटोड फार्म, चंद्रकांत रुपचंद डाकले फार्म, काशिनाथ बाल मुकुंद फार्म अशा मोठमोठया जमिनदारांचे शेतकी फार्म होते. जिल्हयातील या सर्व जमिनदारांविरुध्द भाऊसाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली एकाच दिवशी वेगवेगळया फार्मवर तीन ते चार हजार शेतकऱ्यांनी सत्याग्रह केला होता. सरकारने सिलिंग व कुळकायदा चळवळ दडपण्यात यश मिळविले असले तरी ही या चळवळीची दखल घेणे शेवटी सरकारला भाग पडले होते.

जेव्हा सरकारने सिलिंग व कुळ कायद्यात बदल करतांना वीस कलमी कार्यक्रम जाहीर केला होता, त्यात कम्युनिस्टाच्या धोरणाचा विचार करण्यात आला होता.

कम्युनिस्टाच्या धोरणानुसार सिलिंग कायदा करुन मोठया जमिनदारांकडील अतिरिक्त जमिनी भूमिहिन शेतमजुरांना देण्याचा कायदा करण्यात आला.

सिलिंग कुळ कायदयासाठी भाऊसाहेबांनी दिलेले योगदान महत्वपूर्ण राहिले आहे.[२१]

## ५.३ भाऊसाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्हयातील कामगारांच्या विकासासाठी दिलेले सामाजिक योगदान :-

भाऊसाहेबांची वृत्तीच मुळात अन्याया विरुध्द लढण्याची होती. स्वातंत्र्यपूर्व काळातही भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हयातील शेतमजुर, आदिवासी कामगार, भूमिहिन, विडी कामगारांचे भांडवलशाही कडून होत असलेले शोषण थांबविण्यासाठी संघर्ष केला. त्याचप्रमाणे स्वातंत्र्योत्तर काळातही भाऊसाहेबांनी कम्युनिस्ट संघटनेच्या माध्यमातून आपले हे कार्य चालुच ठेवले होते. मात्र इ.स.१९५२ साली सहकाराचे व्रत स्विकारल्यानंतर भाऊसाहेबांनी सहकारातील कामगार, स्थानिक स्वराज्य संस्थातील कामगार, उद्योगातील कामगार, कारखान्यातील कामगारांचे मालकाकडून होणारे शोषण अशा विविध कामगारासाठी भाऊसाहेबांनी अखेरपर्यंत आपला लढा चालू ठेवला होता. भाऊसाहेब थोरात यांचे कामगार विषयक कार्य पुढीलप्रमाणे होते.[२२]

### ५.३.१ अहमदनगर जिल्हयातील विडी मजूर संघटनेतील भाऊसाहेब थोरात यांचे योगदान :-

महाराष्ट्रातील एकुण विडी कारखान्यांपैकी सर्वात जास्त कारखाने अहमदनगर जिल्हयात होते. विडी कारखानदारांकडून विडी मजुरांचे होत असलेले शोषण थांबविण्यासाठी भाऊसाहेबांनी पुढाकार घेतला. आणि त्यांच्या पुढाकाराने अहमदनगर जिल्हयातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील विडी मजुरांना न्याय मिळुन दिला. भाऊसाहेबांचे विडी मजूर चळवळीतील कार्य पुढीलप्रमाणे :-

### ५.३.२ भाऊसाहेब थोरात यांनी सुरु केलेल्या विडीमजुर चळवळीपूर्वीच्या विडीमजूर चळवळी :-

अहमदनगर जिल्हा हा दुष्काळी जिल्हा म्हणून ओळखला जातो. सतत दुष्काळाच्या छायेत असणाऱ्या अहमदनगर जिल्हयात सर्वात जास्त विडी कारखाने आहेत. अहमदनगर

जिल्हयातील पश्चिमेकडील अकोले, संगमनेर या आदीवासी भागाचे महत्व भिकुसा, चांडक, सारडा, सावदेकर या विडी कारखानदारांनी ओळखले होते. या कारखानदारांनी संगमनेर व अकोले तालुक्यात अनेक विडी कारखाने सुरु केले. कामगार वर्गाच्या असंघटीतपणाचा फायदा कारखानदार घेत होते.[२३]

विडी कारखानदारांकडून जिल्हयातील विडी मजूरांवर होत असलेल्या अन्यायाविरुध्द अहमदनगर जिल्हयातील संगमनेर येथे इ.स.१९४० साली विडी मजूर चळवळीचा पाया घातला गेला होता. विडी कामगारांची पहिली युनियन नानासाहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली होती. या युनियनचे सेक्रेटरी विडी कामगार रामभाऊ नागरे होते. इ.स. १९४५ साली झालेल्या विडी कामगाराच्या संपात मोठया संख्येने विडी कामगार सामील झाले होते. परंतु या चळवळीस विघातक स्वरुप प्राप्त झाले होते. विडयाची पाने जाळणे, तंबाखूची पोती फेकून देणे, आदी घातपाती कृत्ये सुरु झाल्याने दहशतवाद मान्य नसणाऱ्यांनी नवी विडी कामगार संघटना सुरु केली होती.[२४]

### ५.३.३ अहमदनगर जिल्हयातील विडी मजूर चळवळीतील भाऊसाहेब थोरात यांचे योगदान :-

अहमदनगर जिल्हा हा कमी पर्जन्य छायेचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. असे असले तरी जिल्हयातील लोकांचा शेती हा मुख्य व्यवसाय होता व आहे. दुष्काळी भाग असल्याने शेतीवर उपजिवीका भागणे अशक्य होत होते. जिल्हयातील या दुष्काळी परिस्थितीचे महत्व विडी कारखानदारांनी ओळखले होते. कारखानदारांना विडी कारखान्यासाठी अहमदनगर जिल्हा महत्वाचा वाटल्याने जिल्हयात गावोगावी विडी कारखाने सुरु केले. जिल्हयातील लोकांना शेती व्यतिरिक्त आर्थिक साहय मिळविण्याचे हे कारखाने साधन वाटू लागले. जिल्हयातील अनेक तालुक्यात विडी उद्योग भरभराटीस आला होता. आर्थिक मिळकतीच्या हेतूने भूमिहीन स्त्रिया, शेतकरी मुले हे सर्व जण आपणास वेळ मिळेल त्यापध्दतीने विडया वळण्याचे काम करत असत. यातून त्यांच्या रोजंदारीचा प्रश्न सुटत असे. त्याचबरोबर पैसाही मिळत होता. आदिवासींप्रमाणेच इतरही लोक विडया वळण्याचे काम करीत असत. परंतु या विडी कामगारांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण नव्हते. त्यांच्या भविष्यासाठी कोणताही कायदा नव्हता. विडया वळण्याचा त्यांना अत्यंत कमी मोबदला दिला जात होता. कोणत्याही प्रकारे निवास व्यवस्था, आरोग्य सुविधा, पेन्शन सुविधा, दिली जात

नव्हती. असे असुनही विडी कामगारांना कारखान्याच्या मालकाची मर्जी सांभाळणे भाग पडत होते.कारखानदारांना कोणी विरोध केल्यास मालक त्यांना कामावरुन काढून टाकत असत.[२५]

वेळप्रसंगी कामगारांना पुरेशी पाने व तंबाखु दिली जात नव्हती. या दिन दुबळया कामगारांच्या दुःखाला वाचा फोडण्यासाठी भाऊसाहेबांनी एक विशेष आघाडी सांभाळली होती. ती म्हणजे विडी कामगारांच्या संघटनेची होय. विडी कामगारांचे संघटन करण्यासाठी भाऊसाहेब विडी कारखान्याच्या गावी जावुन प्रचार करीत असत. विडी कामगारांमध्ये जागृती करण्यासाठी भाऊसाहेबांनी कम्युनिस्ट कार्यकर्त्यांच्या सहाय्याने अहमदनगर जिल्हयात जागृती घडवुन आणली होती. विडी कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी एखादी संघटना असावी असे महत्व भाऊसाहेब लोकांना पटवुन देत होते. जिल्हयातल्या प्रचार मोहिमेनंतर भाऊसाहेबांनी विडी कामगारांचे संघटन करुन युनियन संस्थापनेचा निर्णय घेतला होता.

विडी कामगारांसाठी काम करणारे रामभाऊ नागरे, कॉ.पी.बी.कडू पाटील, पी.जी. भांगरे, डी.बी. कुलकर्णी, अण्णासाहेब शिंदे, धर्मा पोखरकर आदी कम्युनिस्ट कार्यकर्ते भाऊसाहेबांच्या गटात सामील झाले होते. सर्वांनी संघटीत होऊन विडी कामगारांच्या युनियनची स्थापना केली होती. या युनियनचे अध्यक्ष रामभाऊ नागरे तर सेक्रेटरी भाऊसाहेब थोरात आणि किसानसभेचे संघटक चंद्रभान आठरे पाटील होते.[२६]

भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली कम्युनिस्ट कार्यकर्ते गावोगावी जावून विडी कारखान्यांना भेटी देत असत. कामगार युनियनचे महत्व पटवुन देत असत. भाऊसाहेब व त्यांचे सहकारी गावोगावी फिरुन युनियनची सभासद नोंदणी करत. युनियनसाठी वर्गणी गोळा करणे, भाऊसाहेब स्वतः मासिक वर्गणी जमा करत असत. मासिक सभा घेणे कामगारांच्या मागण्या कारखान्याच्या मालकापूढे मांडणे, ही कामे भाऊसाहेब करत होते. काही जुजबी मागण्या कारखान्याचे मालक मान्य करीत असत. परंतु मजुरी वाढवुन देण्याचीमागणी मान्य करण्यास तयार नसत.कामगारांच्या वेतन वाढीचा प्रश्न सोडविण्यासाठी भाऊसाहेबांनी विडी कामगारांचा संप घडवुन आणला होता. भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली संप महिनाभर चालु होता. मात्र कारखान्याच्या मालकावर संपाचा काहीही परिणाम झाला नाही. भाऊसाहेबांनी बेकार झालेल्या विडी कामगारांसाठी चंदनापुरीला सहकारी विडी कारखाना काढण्याचा प्रयोग केला. परंतु विडया खपविण्यास अडचणी येऊ लागल्याने अखेर कारखाना बंद करावा लागला. त्यातच विडी कारखानदारांनी ताठर भूमिका घेतली होती. संपात काही

कामगारांना अटक झाली होती. अनेक कामगार बेरोजगार झाले होते. तेव्हा कामगारांच्या उपजिविकेचा प्रश्न सोडविण्यासाठी भाऊसाहेबांनी संप मागे घेतला.[२७]

भाऊसाहेब थोरात यांनी स्थापन केलेल्या विडी कामगार संघटनेने संप, मोर्चे निदर्शेने करुन कारखानदारांपुढे प्रश्न निर्माण केला होता. कामगारांच्या प्रश्नांची जाणीव कारखानदारांना झाली होती. शेवटी शासनाला विडी कामगारांच्या प्रश्नाची दखल घेणे भाग पडले होते. महाराष्ट्र शासनाने विडी कामगारांच्या प्रश्नासाठी एक समिती स्थापन केली होती. त्यावेळी गुलझारी लाल नंदा मंजुर मंत्री होते. बाळासाहेब खेर यांच्या शासन काळात सरकारने कामगारांच्या प्रश्नांची दखल घेतली होती. भाऊसाहेबांनी विडी कामगारांसाठी उभारलेल्या लढयामुळे शासनाने विडी कामगारांना किमान वेतन निश्चित करुन कायदयाचे संरक्षण दिले. भाऊसाहेबांनी विडी कामगारांसाठी दिलेले योगदान भावी काळातील विडी कामगारासाठी महत्वपूर्ण ठरले आहे.[२८]

### ५.३.४ महाराष्ट्र व्यापी विडी मजुर परिषद आयोजनातील भाऊसाहेब थोरात यांचे योगदान :-

विडी मजुरांचे प्रश्न सोडविण्यासाठी भाऊसाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्हयातील संगमनेर येथे महाराष्ट्र व्यापी विडी मजुर परिषदेचे आयोजन केले. इ.स.१९४४ साली नाशिक जेलमधुन सुटका झाल्यानंतर भाऊसाहेबांनी विडीमजुरांचे प्रश्न सोडविण्यासाठी विडीमजूर कामगार युनियनची स्थापना केली होती. अहमदनगर जिल्हयात भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली इ.स.१९४४ पासुन विडी मजूरांचे संप, मोर्चे निदर्शने घडवुन आणले. तसेच अहमदनगर जिल्हा हा दुष्काळी जिल्हा असल्याने जिल्हयात विडी कारखान्याची व विडी मजुरांची संख्या जास्त होती जिल्हयातील विडी मजूरांचे प्रश्न सोडविण्यासाठी इ.स.१९५२ साली भाऊसाहेब थोरात, भास्करराव दुर्वे, रामभाऊ नागरे, कॉ.पी.बी.कडू पाटील, रावसाहेब शिंदे धर्मा पोखरकर यांनी पहिली महाराष्ट्रव्यापी विडी मजूर परिषद संगमनेर येथे भरविली होती. या परिषंदेमध्ये विडी मजूर कामगारांच्या अनेक मागण्या, प्रश्न मांडले गेले होते. विडी कामगारांवरील अन्याय दूर करण्यासाठी महाराष्ट्रातील विडी कामगारांचे संघटन घडवून आणण्याच्या धोरणावर परिषदेत एकमत झाले. भाऊसाहेबांच्या या महाराष्ट्र व्यापी परिषदेची दखल महाराष्ट्र शासनास घेणे भाग पडले होते. शासनाने विडी मजूरांसाठी स्वतंत्र विडी कामगार कायदा लागू केला. विडी कामगारांना किमान वेतन, प्रॉव्हिडंड फंड, मॅटर्निटी बेनिफीट, ग्रॅच्युइटीचा कायदा व इतर

कायदयाच्या सर्व सवलती विडी कामगारांना लागू आहेत. भाऊसाहेबांनी विडी कामगारांसाठी दिलेले योगदान अहमदनगर जिल्हयातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील विडी कामगारांच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरले आहे.[२९]

### ५.३.५ अहमदनगर जिल्हयातील विडी कारखान्याची सद्यस्थिती

अहमदनगर जिल्हा हा कमी प्रर्जन्यमान असणारा जिल्हा म्हणून ओळखला जातो. अहमदनगर जिल्हयाचा पश्चिमेकडील भाग सहयाद्रीच्या पर्वतरांगांनी व्यापलेला आहे. या आदीवासी पट्टयात कामगार मोठया प्रमाणात मिळत असल्याने जिल्हयाच्या पश्चिमेकडील भागात विडी कारखाने अधिक आहेत. विडी कारखान्याची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी मी चार विडी कारखान्याला भेटी दिल्या.

**तक्ता क्रं.७**

| अ.नं. | कारखाना मालक | कारखाना स्थापना वर्ष | विडी प्रकार | कारखाना शाखा विस्तार |
|---|---|---|---|---|
| १) | क्षत्रिय प्रकाश प्रल्हाद,संगमनेर | (१९५६) | भिकुसा विडी | १ |
| २) | वैद्य विश्वनाथ बळवंत, बाजारपेठ, संगमनेर | (१९५०) | हाती विडी | १५ |
| ३) | सावदेकर ठाकुर, नेहरु चौक, संगमनेर | (१९४५) | लंगर विडी | ३ |
| ४) | चांडक राधाकिसन, मोतीनगर | (१९६८) | कोंबडा विडी | १५ |

वरील कारखान्यांना भेटी दिल्या असता कारखाना मालकाच्या म्हणण्यानुसार सरकारने विडी कारखान्यासाठी जे कायदे केले त्यात कामगाराच्या दृष्टीने अनेक सुधारणा करण्यात आल्या. परंतु कारखान्यासाठी पाहीजे त्या प्रमाणात कायदयात दुरुस्ती न केल्याने विडी कारखाना उद्योग चालविणे अशक्य होत आहे.

अहमदनगर जिल्हयातील भाऊसाहेब थोरात यांनी विडी कामगारासाठी जो संघर्ष केला त्याची सरकारला दखल घेणे भाग पडले आणि नविन कायदयानुसार कामगाराच्या आरोग्य व आर्थिक दृष्टीने अनेक सुविधा देण्याचे धोरण अवलंबिले आहे.

सध्या विडी कामगारांना पुढील सुविधा मिळतात.

**५.३.६ विडी कारखानदार मालकांकडून विडी कामगारांना मिळणाऱ्या सुविधा :-**

विडी कामगारांना १००० विडीमागे १५६ रु.८० पैसे मिळतात. त्यातील १३% बोनस म्हणून कपात केली जातात. नियमित वेतन, बाथरुम सुविधा, पाणी सुविधा, विश्रांती कक्ष, स्त्रियांसाठी स्वतंत्र विश्रांती कक्ष, पेन्शन सुविधा, बोनस सुविधा, पगारी रजा, स्त्रियांना बाळंतपणा ४५ दिवसांची रजा, नियमित काम, जेवणाची सुट्टी, परंमनन्ट सुविधा, मास्क सुविधा. विडी कारखानदारांकडून कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांना वरील सुविधा मिळत आहेत.

**५.३.७ सरकारकडुन विडी कामगारांना मिळणाऱ्या सुविधा :-**

मोफत वैद्यकिय सुविधा, विडी कामगारांच्या मुलांना शिष्यवृत्ती, परमानंन्ट विडी कामगारांना घर बांधण्यासाठी २,५०,०००/-लाखापर्यंत सरकारी कर्ज या सुविधा सरकारकडून विडी कामगारांना दिल्या जातात.[३०]

**५.३.८ अहमदनगर जिल्हयातील विडी कारखाने मुख्य व उपशाखा :-**

**५.३.८.१ कोंबडा विडी,**

**कारखाना मालक :** चांडक राधाकिसन

**मुख्यशाखा :** मोतीनगर, संगमनेर,

**उपशाखा :** राजापुर, मालदाड, सायखिंडी, निमगांव, कुरण, निमगाव भोजापूर, गणोरे, कोल्हेवाडी, डोगरगाव, सुकेवाडी, झोळे, गुंजाळवाडी, कळस, इंदोरी.

कोंबडा विडी, उपशाखा कारखाने अहमदनगर जिल्हयात १५ ठिकाणी आहेत. या कारखान्याच्या माध्यमातून विडी कामगारांना विडयाची पाने व तंबाखू व इतर साहित्य उपलब्ध करुन दिले जाते. व तयार झालेला माल पुन्हा जमा करुन घेतला जातो. त्याचप्रमाणे कारखाना मालकांकडून सर्व सुविधा त्यांना वेळेवर पुरविल्या जातात.[३१]

कोंबडा विडी कामगारांच्या मुलाखती घेतल्या. त्यांना मिळणाऱ्या सुविधांची शहानिशा केली.

१) गवांदे किसन आप्पाजी, मॅनेजर

२) जोंधळे आशा रंगनाथ

३) चन्ना राणी संजय

४) अंभग संगिता सुदाम

५) चांगटे अनिता कैलास

६) डोईफोडे वैशाली गणेश

७) पठारे मिना संजय

८) कळसकर वर्षा दत्तात्रय

९) घुले रंजना सुदाम

१०) शिंदे माया राजेंद्र

११) नाईकवाडे संजना सिताराम

१२) काळे लता अशोक

१३) उणवणे पद्मा जयसिंग

१४) खांबेकर चंद्रकला राधाकिसन

१५) उबाळे मिरा बाळु

१६) निराळे आशा शंकर

१७) माळवळकर साधना राजेंद्र

१८) गाडेकर आशा अशोक

१९) गोसावी रंजना प्रभाकर

२०) गोसावी रतनबाई प्रभाकर

२१) कापरे शोभा राजेद्र

२२) शिंदे शोभा रमेश

२३) घोडेकर कल्पना गोरख

२४) बगाड हिराबाई बन्सी

२५) कटयारे रविंद्र लक्ष्मण

२६) नागरे सोपान गजानन

२७) सदाफुले दशरथ गोपीनाथ

२८) पाबळे अर्जुन मोतीलाल

२९) पठाण नसीर महमंद

३०) कळसकर सचिन विश्वनाथ

३१) खुळे भाऊराव रघुनाथ

३२) शेख इम्राम गरिब

३३) देखमुख विश्वनाथ दामोधर

३४) कानवडे अशोक माधव

आदी विडी कामगारांना भेटी दिल्या असता भाऊसाहेब थोरात यांनी विडी कामगारांसाठी संगमनेर येथे राज्यव्यापी परिषद भरविली होती. त्या परिषदेत विडी कामगारांच्या हिताच्या दृष्टीने सरकारकडे व विडी कारखानदारांकडे काही मागण्याचा मसुदा तयार करुन तो त्यांना सादर करण्यात आला. विडी कामगारांच्या हिताच्या दृष्टीने भाऊसाहेबांनी केलेल्या या आंदोलनाची दखल सरकारला घेणे भाग पडले. त्यातुन विडी कामगारांसाठी कायदा करुन कायदयानुसार त्यांना वरील सुविधा आजही उपलब्ध होत आहेत असे कोंबडा विडी कामगारांकडून प्रत्यक्ष मुलाखंतीअंती समजले.[३२]

**५.३.८.२ हत्ती विडी :-**

**कारखाना मालक :** वैद्य विश्वनाथ बळवंत

**मुख्य शाखा :** बाजारपेठ,संगमने

**उपशाखा :** अमृतनगर, संगमनेर साखर कारखाना, सुकेवाडी, खांडगाव, झोळे, कुरण, राजापूर, सायखिंडी, धुमाळवाडी, गणोरे, हिवरगावं, राहुरी, निमोण, पारेगांव, हत्तिविडी उपशाखा कारखाने अहमदनगर जिल्हयात १५ ठिकाणी आहेत.[३३]

हत्तिविडी कामगारांना प्रत्यक्ष भेटी दिल्या व मुलाखती घेऊन त्यांना मिळणाऱ्या सुविधांची शहानिशा केली.

१) श्री.सातपुते रामनाथ भाऊराव,मॅनेजर

२) गिरी संगिता कैलास

३) गुळवे कल्पना माधव

४) कांगुणे कांताबाई बाबाजी

५) सोनवणे परिगा भाऊसाहेब

६) एखंडे रंजना भास्कर

७) श्रीपाद दत्तात्रय अंबादास

८) सातपुते सोमनाथ विष्णू

९) सातपुते मच्छिंद्र दत्तु

१०) शेटे रोहिदास विष्णू

११) गिरी कैलास सखाराम

१२) श्रीपाद संगिता दत्तात्रय

आदी विडी कामगारांना भेटी दिल्या असता समजले की, भाऊसाहेब थोरात यांनी विडी कामगारांसाठी जे आंदोलन केले त्यामुळे कारखानदारांकडून तसेच सरकारकडून विडी कामगाराच्या हिताच्या दृष्टीने कायदयानुसार सुविधा मिळण्यास पारंभ झाला.[३४]

**५.३.९ विधानसभा सदस्य असतांना विडी कामगार चळवळीतील भाऊसाहेब थोरात यांचे योगदान :-**

अहमदनगर जिल्हयातील संगमनेर,अकोले हा भाग कायम दुष्काळी सावटामध्ये सापडलेला होता व आहे. त्यामुळे येथील लोकांचे उदरनिर्वाहाचे साधन असलेला शेती व्यवसाय नेहमी संकटात सापडलेला असल्याने संगमनेर,अकोले भागात विडी वळण्याचा व्यवसाय खूप जोरात वाढला होता. संगमनेर, अकोले भागात भिकुसा, सारडा, चांडक, सावदेकर यांनी या भागात अनेक विडी कारखाने स्थापन केले होते.

येथील लोक विडी बांधण्याचे काम करत होते. या लोकांत भूमिहीन, स्त्रिया, शेतकरी, मुले, विडी कामगार म्हणून काम करत होते. या विडी मजुरांना कोणत्याही प्रकारचे कायदेशीर संरक्षण नव्हते. त्यांच्यासाठी कोणताही कायदा नव्हता. त्यामुळे या लोकांचे कारखानदार अतोनात शोषण करत असत. विडी कामगारांकडून जास्तीत जास्त वेळ काम करुन घेतले जात होते. त्यांच्या पगारामध्ये वाढ केली जात नसे. त्यांच्या जिविताची कोणतीही हमी घेतली जात नव्हती. त्यांना केव्हाही कारखानदार कामावरुन काढत असत. कामगारांना बोनस, पेन्शन मिळत नव्हती. त्याशिवाय विडया बांधण्यासाठी पुरेसे पानपुडे दिले जात नव्हते. अशा एक ना अनेक अडचणी विडी कामगारांच्या होत्या. त्यांच्या दु:ख व शोषणास पारावार नव्हता. विडी कामगारांची ही दु:खे भाऊसाहेब थोरात जवळून पाहत होते.

विडी कामगारांवरील हा अन्याय दूर करण्यासाठी तसेच त्यांच्या वेतनात वाढ होण्याच्या मागणीसाठी भाऊसाहेब थोरात विधानसभेचे सदस्य असतांना संगमनेर येथे विडी कामगारांची चळवळ घडवून आणली. परंतु या संघर्षात सरकारकडून दोनशेपेक्षा अधि स्त्री पुरुष कामगारांना अटक झाली होती. अटक केलेल्या कामगारांना विसापूर जेलमध्ये ठेवण्यात आले होते. या विडी कामगारांवर झालेला हा अन्याय दूर करण्यासाठी व त्यांची तुरुंगातून सुटका करण्यासाठी भाऊसाहेबांनी आपल्या विधानसभा सदस्य पदाचा उपयोग करुन घेतला. विडी कामगारांवर झालेल्या अन्यायाची कल्पना भाऊसाहेब थोरात यांनी

गोविंदराव आदिकांना दिली. गोविंदराव आदिकांच्या मध्यस्थीने विडी कामगारांवर झालेल्या अन्यायाची ही घटना मुख्यमंत्री शरद पवार यांच्या कानावर गेली असता या घटनेची दखल घेत पवार साहेबांनी या विडी कामगारांच्या सुटकेचे आदेश काढले असता अटक केलेल्या व विसापूर जेलमध्ये असलेल्या सर्व विडी कामगारांना स्पेशल एस.टी. बसेसमधुन संगमनेर येथे त्यांच्या घरी पोहचविण्यात आले होते.

भाऊसाहेबांनी आपल्या विधानसभेतील पदाचा उपयोग केवळ संगमनेर, अकोले तालुक्यातील विडी कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठीच नव्हे तर महाराष्ट्रातील विडी कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी महत्वपूर्ण योगदान दिले होते.[३५]

## ५.४ भाऊसाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्हयातील दुष्काळ निवारणार्थ केलेले सामाजिक कार्य :-

महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्हा हा दुष्काळी जिल्हा म्हणुन ओळखला जातो. वर्षानुवर्ष पडणाऱ्या या दुष्काळाचा जिल्हयातील लोकांना सातत्याने सामना करावा लागतो आहे. सातत्याने पडणाऱ्या अशा दुष्काळ प्रसंगी भाऊसाहेब थोरात यांनी सातत्याने दुष्काळग्रस्तांना मदतीचा हात दिला आहे. भाऊसाहेब थोरात हे १९९५ ते १९६८, १९७३ ते १९७७, १९९५ ते १९९९ या काळात १४ वर्षे अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष होते. या अध्यक्षीय काळात जिल्हयात पडलेल्या दुष्काळ प्रसंगी भाऊसाहेबांनी जिल्हा बँकेच्या माध्यमातुन पाण्याच्या टाक्यांचे वाटप केले. याशिवाय अनेक गावांना टँकरने पाणी पुरवठा केला. तसेच अशा दुष्काळ प्रसंगी जिल्हयातील जनावरांच्या छावण्यांना देखील जिल्हा बँकेच्या माध्यमातुन चाऱ्यासाठी अर्थसाहय केले. तसेच अशा दुष्काळ प्रसंगी जिल्हयातील शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना शिक्षण अर्धवट सोडणे भाग पडत असे. सन १९७२-७३ या वर्षी पडलेल्या दुष्काळप्रसंगी शिक्षण घेऊ विद्यार्थ्यांना गरीब विद्यार्थ्यांना भाऊसाहेबांनी जिल्हा बँकेच्या माध्यमातुन २५,०००/- रुपयांचे अर्थसाहय केले. तसेच महाराष्ट्रातील आणि महाराष्ट्राच्या बाहेरील लोकांना देखील नैसर्गिक आपत्ती प्रसंगी ५०.८४ लाखापर्यंतचे अर्थसाहय अहमदनगर जिल्हा बँकेने केले आहे.[३६]

भाऊसाहेब थोरात इ.स. १९७८ साली झालेल्या विधानसभेच्या निवडणूकीत संगमनेर मतदार संघातुन निवडुन आले होते. इ.स.१९७८ हे वर्ष अहमदनगर जिल्हयाच्या दृष्टीने अतिदुष्काळी वर्ष होते. भाऊसाहेब थोरात हे अहमदनगर जिल्हयाचे नेतृत्व असल्याने या

नैसर्गिक संकटातुन जिल्हयाला वाचविणे ही भाऊसाहेब आपली जबाबदारी समजत होते. इ.स.१९७२ साली पडलेल्या दुष्काळात अहमदनगर जिल्हयात विविध रस्ते, नालाबंडिग व पाझर तलावाची कामे झालेली होती. सध्य:स्थितीला समोर असलेल्या संकटाचा सामना करणे आवश्यक होते. लोकांना उपजिविकेचे साधन नव्हते. उपासमारी होऊ नये म्हणून भाऊसाहेबांनी लोकांना काम देण्यासाठी पूर्वीच्या दुष्काळात जी रोडची कामे पुर्ण झाली होती. त्या मुख्य रस्त्यांपासून आत असणाऱ्या गावांसाठी वाडयांसाठी रस्त्यांची कामे काढून ती पूर्ण करुन घेण्याचे धोरण भाऊसाहेब थोरात यांनी समोर ठेवले होते. जिल्हयातील लोकांच्या भाऊसाहेबांकडून ज्या अपेक्षा होत्या. त्या भाऊसाहेबांनी रोजगार हमीची कामे जिल्यात सुरु करुन पुर्ण केल्या होत्या. यावर्षी जिल्हयातील छोटया वाडया, वस्त्या, छोटी गावे याला मुख्य रस्त्यास जोडण्यात आले होते. त्याचप्रमाणे जेथे नाला बडिंग, पाझर तलावाची कामे सुरु करणे शक्य आहे. तेथे ती सुरु केली. तसेच जनावरांसाठी देखील विविध संस्थांच्या माध्यमातून चारा पुरवठा केला. भाऊसाहेब थोरात यांच्या दुरदृष्टीमुळे १९७८ साली दुष्काळ असून ही लोकांना त्या दुष्काळाचे फारसे काही वाटले नाही. भाऊसाहेब थोरात यांनी जिल्हयातील समाजासाठी केलेले हे कार्य बहुमोल असेच होते.[३७]

## ५.५ दंडकारण्य अभियानाच्या माध्यमातून भाऊसाहेब थोरात यांचे सामाजिक योगदान :-

जगात ध्येयवेडी माणसे फार थोडी असतात. त्यातील भाऊसाहेब थोरात हे एक होते. केवळ ध्येय बाळगुण उपयोग नाही, तर ते ध्येय साध्य करण्यासाठी आपली सद्सदविवेक बुध्दी सतत जागृत असली पहिजे. आपण कोठेही असू, काहीही करत असू परंतु आपले इच्छित ध्येय साध्य करण्यासाठी आपण सतत जागृत असले पाहिजे याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे भाऊसाहेब थोरात होते. ज्या प्रमाणे मानव दगडात देव शोधत असतो, त्याप्रमाणे भाऊसाहेब थोरातांनी समाजसेवेचे व्रत स्विकारुन ते समाजात देव शोधत होते. ज्याप्रमाणे राजहंस दुधातून पाणी वेगळे करतो, त्याचप्रमाणे भाऊसाहेब समाजात वावरत असतांना केवळ आपला मार्ग साध्य करण्यासाठी प्रेरित झालेले होते.

भाऊसाहेब थोरातांना बालपणापासून असणारी वाचनाची आवड वयाच्या ८४ व्या वर्षी देखील थोडीही कमी झालेली नव्हती. आराम करणे हा त्यांचा स्वभाव नव्हता. भाऊसाहेबांच्या टेबलावर सर्व प्रकारची २०-२५ पुस्तके नेहमी असत.

जगातील अशाच ध्येयवेडया माणसांपैकी एलाझिअर्ड बुफिए हा एक होता. आल्प्स पर्वतांच्या प्रदेशात राहणारा हा माणूस अल्प्सच्या ओसाड व निर्जन प्रदेशात राहात होता. त्या प्रदेशात रानटी लेव्हेंडर या वनस्पती खेरीज काही उगवत नव्हते. अशा या मेंढपाळ माणसाला कौटुंबिक जीवनात अपयश आले होते. मुलाचा मृत्यु, पत्नीच्या मृत्युने त्याच्या कुटुंबात तो एकटाच राहिला होता. तेव्हा पासून त्याने आपल्या जीवनाचे एकच ध्येय ठेवले होते. कौटुंबिक दु:ख बाजूला सारत मात्र या ध्येयवेडया माणसाने व्हेरॅग नावाच्या ओसाड मृतप्राय आडगावात ११ कि.मी. लांबीचा झाडाझुडपांनी बहरलेला हिरवा गर्द पट्टा निर्माण केला होता. या आनंदाने तो आपल्या कौटुंबिक औदासिन्यातून बाहेर पडला होता. त्याने लावलेल्या एक लाख बिजापैकी १० हजार झाडे डौलाने नैसर्गिक सौंदर्यात भर टाकत होते. वयाच्या ८४ व्या वर्षी देखील आपले हे कार्य त्याने अविरतपणे चालु ठेवले होते. त्याच्या प्रयत्नातून उजाड माळरानावर नंदनवन फुलविले होते.[३८]

**५.५.१ भाऊसाहेब थोरात यांना दंडकारण्य अभियान सुरु करण्यासाठी मिळालेली प्रेरणा :-**

भाऊसाहेब थोरात यांना लहानपणापासूनच पुस्तके वाचण्याचा छंद होता. अण्णासाहेब शिंदे यांच्या सहवासाने त्यात आणखी भर पडली. भाऊसाहेबांची कन्या दुर्गाताई तांबे यांच्या अंगीही हा गुण उरतला आहे. दुर्गाताईंना आपला भाचा राजीव राजळे यांच्या टेबलावर 'झाडे लावणारा माणूस' हे पुस्तक दिसले व ते त्यांनी वाचून काढले. पुस्तक खाली ठेवणे त्यांना अशक्य झाले कारण असे जगावेगळे पुस्तक आपल्या वडिलांनीही वाचावे अशी प्रबळ इच्छा त्यांना झाली होती.

मुळातच वाचनाची आवड असणाऱ्या भाऊसाहेबांच्या टेबलावर डझनभर पुस्तके पडलेली होती. दुर्गाताईनीं 'झाडे लावणारा माणूस' हे पुस्तक सर्वात वर ठेवले. परत ते पुस्तक दुसऱ्या दिवशी सर्व पुस्तकाच्या खाली गेले. दुर्गाताईंनी पुन्हा ते पुस्तक सर्व पुस्तकांच्या वर ठेवले असे सातत्याने सहा दिवस गेल्यानंतर सातव्या दिवशी हा लपनडाव संपून भाऊसाहेबांचे हात या पुस्तकाला लागले होते. अर्ध्या तासात 'झाडे लावणारा माणूस' हे पुस्तक भाऊसाहेब थोरात यांनी वाचून हातावेगळे केले. पण त्यातला विचार ते मनावेगळा करु शकले नाहीत. भुताखेतांची बाधा झालेल्या माणसाला झाडानं धरलं, असं ग्रामीण भागात म्हणतात. तसं या पुस्तकाने भाऊसाहेबांना धरले होते. बुफिएचे पुस्तक वाचण्यापूर्वी ही त्यांना अहमदनगर जिल्हयाच्या सौंदर्याची खंत वाटत होतीच पुस्तक वाचल्याने ही खंत द्विगुणीत होऊन आपले इच्छित ध्येय साध्य करण्याचा निर्णय भाऊसाहेब थोरात यांनी घेतला

होता. या कार्यक्रमाची सुरुवात अहमदनगर जिल्हयाच्या पूर्वेकडील संगमनेर तालुक्यातील उजाड माळरानावर एक कोटी बिजारोपणाचे ध्येय निश्चित करुन भाऊसाहेब थोरात आपल्या पुढील कार्यास लागले होते.[३९]

### ५.५.२ भाऊसाहेब थोरात यांचे दंडकारण्य अभियानातील संघटन कौशल्य :-

स्वातंत्र्य चळवळीतील सहभागापासूनच भाऊसाहेब थोरात यांच्या अंगी संघटन कौशल्य हा गुण विकसीत झाला होता. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ही त्यांनी सहकाराच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाचा विकास साध्य करतांना संघटन कौशल्य चातुर्यामुळे ते सहकाराचा प्रचार आणि प्रसार करु शकले होते. भाऊसाहेब थोरात यांची दुरदृष्टी प्रगल्भ होण्याचे महत्वाचे कारण म्हणजे त्यांना असणारी वाचनाची आवड, त्यांच्या हाती एखादे पुस्तक पडले की ते वाचून झाल्याशिवाय सोडत नसत. असेच एक दिवस रात्री झोपतांना 'झाडे लावणारा माणूस' हे पुस्तक त्यांच्या वाचनात आले असता पुस्तकातील विचार ते मनावेगळा करु शकले नाहीत. तासभर त्यावर विचार करत राहिले. आणि आपणही अहमदनगर जिल्हयात याच स्वरुपाची चळवळ सुरु करावी. या चवळवळीला नाव काय द्यावे याचा विचार ते करत असतांना त्यांना एकदम नाव सुचले 'दंडकारण्य अभियान' हेच नाव भाऊसाहेबांनी आपल्या चळवळीला दिले होते. भाऊसाहेबांचा स्वभावच मुळात जिद्दी होता. हाती घेतलेले कार्य तडीस नेल्याशिवाय त्यांना बरे वाटत नव्हते. वयाच्या ८४ व्या वर्षीही त्यांचा जिद्दी स्वभाव तसाच होता. या वयातही भाऊसाहेबांनी 'दंडकारण्य अभियान' चळवळ हाती घेतली होती.

बालपणापासूनच संघटन कौशल्याची आवड असल्याने तसेच सहकाराच्या माध्यमातून हे संघटन कौशल्य द्विगुणित झाले असल्याने याही वयात त्यांच्यातील संघटन कौशल्य हा गुण तसाच होता. या कौशल्यामुळेच भाऊसाहेब तालुक्याप्रमाणे अहमदनगर जिल्हयातील कार्यकर्त्यांचे ही संघटन करु शकले आणि या चळवळीस जन चळवळीचे स्वरुप प्राप्त करुन देऊ शकले. ही चळवळ फक्त तालुक्यापुरती मर्यादीत न राहाता ती संपुर्ण जिल्हयात प्रसार पावली होती व आहे.[४०]

### ५.५.३ भाऊसाहेब थोरात यांनी दंडकारण्य अभियानास लोक चळवळीचे दिलेले स्वरुप :-

भाऊसाहेब थोरात यांनी सुरु केलेली 'दंडकारण्य अभियान' चळवळ कोणत्याही राष्ट्रीय, राज्य व स्थानिक पातळीवरील राजकीय संघटनेशी जोडलेली नव्हती. चळवळ पुढे नेणारी नेतृत्व करणारी माणसं असतील पण तिथे कोणतेही पद नसेल. पदांमधुन निर्माण

होणारी मक्तेदारी आणि बांधिलकी भाऊसाहेबांना या चळवळीत येऊ द्यायची नव्हती, असे असले तरी भाऊसाहेब थोरात यांनी सुरु केलेल्या दंडकारण्य अभियान चळवळीचे क्षेत्र तालुक्यापुरते मर्यादीत न राहाता भाऊसाहेबांच्या संघटन कौशल्य गुणामुळे संपूर्ण अहमदनगर जिल्हयात या चळवळीचा प्रसार होऊन 'दंडकारण्य अभियानास' लोक चळवळीचे स्वरुप प्राप्त झाले. अहमदनगर जिल्हयातील विविध संघटना, सहकारी संस्था, शाळा, महाविद्यालय, गणेश मंडळे, समाज सुधारक, निसर्ग प्रेमी, वनविभाग अधिकारी यांच्या सहभागामुळे अहमदनगर जिल्हयातील प्रत्येक गावात, वाडया वस्त्यावर जेथे वनविभागाची पडिक जमीन असेल अशा सर्वच ठिकाणी भाऊसाहेबांच्या प्रेरणेतुन बीजारोपण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बिज संकलन करण्यात आले. सर्व संस्था, शाळा, महाविद्यालयातून मोठया प्रमाणात बीज संकलन करण्यात आले होते.[४१]

### ५.५.४ सायखिंडी येथील बीजारोपन कार्यक्रमांची अहमदनगर जिल्हयात पुनरावृत्ती :-

बीज जमा करणे व जनजागृती करणे या पहिल्या टप्प्यातील काम संपले होते. दुसऱ्या टप्प्यातील काम २३ जून ते २ जुलै २००६ या कालावधीत बीजारोपण कार्यक्रम घेण्याचे निश्चित झाले होते. बीजारोपन करण्यासाठी पिवळया रंगाचा टी शर्ट, शेवाळी पँट, गळयात पिवळ उपरणे, बिया ठेवण्यासाठी कमरेला पिवळी पिशवी, स्त्रियांना पिवळी साडी असा पोशाख निश्चित केला होता.

संगमनेर तालुक्यातील सायखिंडी येथे कार्यक्रमाची पुर्वतयारी म्हणून भाऊसाहेब थोरात यांच्या सह सर्व संघटना , गावातील विद्यार्थी, सहकारी संस्थेचे अधिकारी, वनविभाग अधिकारी, गावातील लोक या सर्वांच्या सहाय्याने सायखिंडी येथील डोंगरावर नियोजित कार्यक्रम १९ जून २००६ रोजी बीजारोपण कार्यक्रम घेण्यात आला होता. भाऊसाहेबांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम यशस्वी झाला, नंतर या कार्यक्रमाची पुनरावृत्ती २३ जुन ते २ जुलै २००६ रोजी संपूर्ण अहमदनगर जिल्हयात होणार होती. प्रत्येक गावातील नागरिक, शालेय विद्यार्थी, कार्यकर्ते अशा सर्वाच्या सहकार्याने गावालगतच्या डोंगरावर पडीक जागेत मोठया उत्साही वातावरणात बिजारोपणाचा कार्यक्रम पार पडला, लोकांमध्ये एवढा उत्साह होता, की चिरकाल विश्रांतीच्या ठिकाणीही लोकांनी बिजारोपनाचा कार्यक्रम केला होता. भाऊसाहेब थोरात यांच्या प्रेरणेतुन अहमदनगर जिल्हयातील हा उपक्रम पाहण्यासाठी जिल्हयाच्या बाहेरील पत्रकार, शासकीय अधिकारी आवर्जुन उपस्थित होते. भाऊसाहेबांना ही संकल्पना सुचली आणि ३० दिवसात कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भाऊसोबांनी दिलेला शब्द

तालुक्यातीलच नव्हे तर अहमदनगर जिल्हयातील कार्यकर्त्यांनीही पाळला आणि कार्यक्रम यशस्वी केला होता. हजारो एकर मोकळया जागेवर बीजारोपणाचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला होता. याच कार्यक्रमाची पुनरावृत्ती पुढील वर्षीही होणार होती. पुढील वर्षी २३ जून ते ३० जून २००७ रोजी मागील कार्यक्रमाची पुनरावृत्ती घडवुन आणण्यात आली. भाऊसाहेब थोरात यांच्या प्रेरणेतून सुरु झालेला हा सामाजिक उपक्रम भाऊसाहेबांचे पुत्र मा.बाळासाहेब थोरात यांनी अविरतपणे पुढे चालु ठेवला आहे.[४२]

## ५.६ स्वातंत्र्योत्तर काळातील अहमदनगर जिल्हयाची शैक्षणिक स्थिती व त्या अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातुन भाऊसाहेब थोरात यांचे योगदान

भारतात व्यापाऱ्याच्या माध्यामातुन आलेल्या पोर्तुगीज, फ्रेंच, डंच, इंग्रज यांनी आपल्या वसाहती स्थापन केल्या. त्याच्या या व्यापारी स्पर्धेत इंग्रजानी आपले वर्चस्व निर्माण केले. आणि नंतर भारतीयांच्या मागासलेपणाचा फायदा घेत राजकीय हस्तक्षेप करण्यास प्रारंभ केला. त्यातुनच त्यांना १७५७ च्या प्लासीच्या युध्दास सामोरे जावे लागले. या युध्दातील विजयाने बंगालवर वर्चस्व प्राप्त केले. आणि येथुनच त्यांच्या साम्राज्य विस्तारास खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला. साम्राज्य विस्तार करताना त्यांना नोकर वर्गाची आवश्यकता भासु लागल्याने त्यांनी इंग्रजी शाळा सुरु केल्या. त्यास अहमदनगर जिल्हा कसा अपवाद असणार. अहमदनगर जिल्हयात १८३१ साली आलेल्या ख्रिश्चन मिशनऱ्यांनी इ.स.१८३८ साली फराहबाग येथे पहिली मुलींची शाळा सुरु केली, तर १९१७ साली वैद्य गंगाधर शास्त्री गुणे यांनी आयुर्वेदीक कॉलेज सुरु केले. १९४७ साली रेव्हरंड डॉ.भा.पा.हिवाळे यांनी अहमदनगर कॉलेज सुरु केले. तसेच नगर शहर आणि आजुबाजुच्या खेडयात व्हॉलेंटरी शाळा सुरु केल्या. यातुन प्रेरणा घेऊन स्थानिक लोकांनीही व्हॉलेंटरी शाळा सुरु केल्या. या सर्व शाळातुन कमी कमी १० हजार विद्यार्थी लिहिण्या वाचण्यास शिकले.

स्वातंत्र्योत्तर काळात शैक्षणिक प्रगतीला खऱ्या अर्थाने चालना मिळुन अहमदनगर जिल्हयाच्या शैक्षणिक विकासास गती देण्यासाठी अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेने सातत्याने आर्थिक साहय करण्याचे धोरण राबविले. भाऊसाहेब थोरात १९६० पासून जिल्हा बँकेत अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक अशा पदावर असताना जिल्हयाच्या शैक्षणिक विकासात त्यांनी दिलेले योगदान महत्वपूर्ण ठरले आहे.भाऊसाहेबांच्या या योगदानामुळे जिल्हयातील

शिक्षण संस्थाच्या संख्येत व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळेच्या संख्येत सातत्याने वाढ होत असल्याचे दिसून येते ते पूढील तक्त्यावर स्पष्ट होते.

भारतीय स्वातंत्र्य वर्ष १९४७ ते १९५९ पर्यंतची अहमदनगर जिल्हयातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची स्थिती दर्शविणारा तक्ता.

**तक्ता क्रं.८**

| अ.क्रं. | वर्ष | प्राथमिक शाळा संख्या | विद्यार्थी संख्या | माध्यमिक शाळा संख्या | विद्यार्थ्याची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १) | १९४७-४८ | ७५९ | ४१,१६१ | २६ | ६,९३५ |
| २) | १९५७-५८ | १६२३ | १,७७,४६६ | ४९ | १२,२९१ |
| ३) | १९५८-५९ | १६३३ | १,९४,८७९ | ५४ | १४,२७६ |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, १९४७-४८ प्राथमिक शाळाची संख्या ७५९ होती त्यात सातत्याने वाढ होतांना दिसुन येते. सन १९५८-५९ या वर्षापर्यंत प्राथमिक शाळांची संख्या १६३३ साली तर विद्यार्थी १,५४,८७९ वर माध्यमिक शाळाचा विचार केल्यास असे दिसुन येते की, सन १९४७-४८ मध्ये माध्यमिक शाळाची संख्या २६ तर विद्यार्थी संख्या ६,९३५ होती. तर १९५८-५९ मध्ये शाळा ५४ तर विद्यार्थी संख्या १४,२७६ होती.

यावरुन असे दिसून येते की, सन १९४७ ते ५९ या तेरा वर्षात प्राथमिक शाळाची संख्या ८८७४ एवढी झाली. तसेच विद्यार्थी संख्या ही १५३७१८ एवढी वाढली होती. परंतु माध्यमिक शाळाचा विचार केल्यास शाळाची संख्या १९४७ ते १९५९ या १३ वर्षात २८ नवीन शाळा सुरु झाल्या होत्या. तर विद्यार्थी संख्या फक्त ७३४१ एवढी वाढली होती.

वरील आकडेवारीवरुन असे दिसून येते की, प्राथमिक शाळाची संख्या ज्या प्रमाणात वाढत होती त्या प्रमाणात माध्यमिक शाळांची संख्या व विद्यार्थी संख्या वाढत नसल्याचे दिसून येते. याचे कारण सुविधांचा अभावामुळे प्राथमिक शिक्षण पूर्ण करणाऱ्या मुलांपैकी फार थोडया मुलांना माध्यमिक शिक्षण घेणे शक्य होत होते.

प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयांची सन १९५८-१९५९ मधील संख्या व विद्यार्थी संख्या.

**तक्ता क्रं.९**

| अ.नं. | वर्ष | शाळा/ महाविद्यालयाची संख्या | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १) | प्राथमिक | १६३३ | १९४८७९ |
| २) | माध्यमिक | ५४ | १४२७६ |
| ३) | महाविद्यालय | २ | १२४३ |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या तुलनेत महाविद्यालयाची संख्या १९५९ पर्यंत फक्त २ होती. तर विद्यार्थी संख्येचा विचार केल्यास प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या १९४८७९ पैकी फक्त १२४३ मुलेच महाविद्यालयीन शिक्षण घेऊ शकत होते. तुलनात्मकदृष्टया विचार केल्यास हे प्रमाण प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या मुलांच्या एक टक्का देखील नव्हते. यावरुन असे दिसून येते की, आर्थिक परिस्थितीमुळे मुलांना महाविद्यालयीन शिक्षणापासून वंचित राहावे लागे.

१९५९ ते १९८१ या २२ वर्षातील अहमदनगर जिल्हयातील शैक्षणिक परिवर्तन पाहण्यासाठी पुढील तक्त्यांच्या माध्यमातून दिलेल्या आकडेवारीवरुन जिल्हयातील शैक्षणिक परिस्थिती लक्षात येते.

**१९८१-१९८२ मधील शिक्षणाची स्थिती दर्शविणारा तक्ता :-**

**तक्ता क्रं.१०**

| अ.क्रं. | शिक्षणक्रम | शाळा संख्या | विद्यार्थी संख्या | | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | |
| १) | प्राथमिक | २४५० | २८१२१९ | १९११५० | ४७२३६९ |
| २) | माध्यमिक | २३० | ४८०८५ | १६३२७ | ६४४१२ |
| ३) | उच्च माध्यमिक शिक्षण | ४० | १२७३४ | २९९६ | १५७३० |
| ४) | महाविद्यालयीन शिक्षण | १६ | ८५३२ | २२७८ | १०८१० |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयाच्या संख्येत सातत्याने वाढ होत असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे विद्यार्थी संख्येतही १९५९ पासून सातत्याने वाढ होत असल्याचे दिसुन येते. अहमदनगर जिल्हयातील प्राथमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन संख्येत मोठया प्रमाणात वाढ होण्यात अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे योगदान महत्वपूर्ण आहे. भाऊसाहेब थोरात १९६५ ते

१९६८, १९७३ ते १९७७ या काळात अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष असतांना त्यांनी ओळखले की, शिक्षणाशिवाय जिल्हयाचा सर्वांगिण विकास होऊच शकत नाही. हे ओळखुन जिल्हा बँकेतील आपल्या अध्यक्षीय पदाचा उपयोग करत अहमदनगर जिल्हयातील माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयांना मोठया प्रमाणात आर्थिक साहय केले. त्यांच्या या योगदानामुळे अहमदनगर जिल्हयातील माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ घडुन आली. अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेने १०१ माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यालयांच्या उभारणीकरिता ११,६०,००० चे अर्थसाहय केले.

एवढेच नव्हे तर अहमदनगर जिल्हयातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षणाच्या सुविधाही उपलब्ध असाव्यात यासाठी अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेने अहमदनगर, अकोले, पारनेर, शेवगांव, पाथर्डी, राहुरी, श्रीगोंदा, जामखेड महिला महाविद्यालय नगर, न्यु लॉ कॉलेज नगर, सहकार प्रशिक्षण केंद्र अहमदनगर इत्यादी १७ संस्थांना नवीन महाविद्यालये सुरु करणेकरीता १३,२०,०००/- रुपयांचे अर्थसाहय केले. त्यामुळेच जिल्हयात १७ नवीन महाविद्यालये सुरु झाली. आणि जिल्हयातील ग्रामीण भागातील मुलांप्रमाणेच मुलींनाही शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध झाल्या.

भाऊसाहेब थोरात अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे १४ वर्ष अध्यक्ष होते. आपल्या अध्यक्षीय काळात त्यांनी सातत्याने अहमदनगर जिल्हयातील जिल्हा बँकेच्या माध्यमातून माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयांना जे अर्थ साहय केले त्यात भाऊसाहेब थोरात यांचे योगदान महत्वपूर्ण ठरले आहे. शिक्षणाशिवाय जिल्हयाचा सर्वांगीण विकास होणार नाही हे जाणणाऱ्या भाऊसाहेबांनी बँकेतील आपल्या अध्यक्षीय काळात सातत्याने माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयांना मोठया प्रमाणात आर्थिक साहय करण्याचे निर्णय घेतले. त्यामुळेच जिल्हयातील शिक्षण संस्थांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झाली आणि अगदी ग्रामीण भागातील मुला-मुलींना देखील शिक्षणाच्या सुविधा मोठया प्रमाणात उपलब्ध होण्यात भाऊसाहेब थोरात यांचे योगदान आजही महत्वपूर्ण ठरत आहे.

भाऊसाहेब थोरात यांनी केवळ जिल्हा बँकेच्या माध्यमातून जिल्हयातील शैक्षणिक संस्थांना साहय केले. एवढेच नाही तर त्यांनी स्वतःही सहयाद्री शिक्षण संस्था व अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेची स्थापन करुन या संस्थेच्या माध्यमातुन जिल्हयाच्या शैक्षणिक विकासात महत्वपूर्ण योगदान दिले आहे.

### ५.६.१ व्यवसाय शिक्षणास अर्थ साहय :-

वसंत दादा पाटील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी विना अनुदान तत्वावर तांत्रिक शिक्षणक्रम सुरु करण्यास मान्यता दिली असता अहमदनगर जिल्हा बँकेने अहमदनगर जिल्हयाच्या ग्रामीण भागात अभियांत्रिकी, वैद्यकिय महाविद्यालये, तंत्रनिकेतन, माध्यमिक विद्यालये, प्राथमिक विद्यालये, आयुर्वेद आणि होमिओपॅथी महाविद्यालये, आय.टी.आय. सुरु करण्याकरिता नऊ संस्थांना रुपये ५२,५०,०००/- रुपयांचे अर्थ साहय केले. त्यातुनच अहमदनगर, संगमनेर, राहुरी, नेवासा, पाथर्डी, राहाता या तालुक्यात विविध व्यावसायिक महाविद्यालये सुरु झाली.

जिल्हा बँकेने केवळ शिक्षण संस्थांनाच अर्थसाहय केले नाही तर विद्यालयांना देखील अर्थ साहय केले आहे.

### ५.६.२ अहमदनगर जिल्हा बँकेची विद्यार्थी साहय योजना :-

जिल्हा सहकारी बँकेने सन १९७२, १९७३ च्या दुष्काळची तीव्र झळ बसलेल्या विद्यार्थ्यांना २५०००/- हजार रुपयांचे अर्थसाहय केले. तर १९८३ साली दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना १९,०००/- रुपयांचे अर्थसाहय केले. परिसंवादासाठी विद्यार्थी परदेशी जाऊन शिक्षण घेण्यासाठी तसेच क्रिडा क्षेत्रातील विशेष प्राविण्याबद्दल विद्यार्थ्यांना बँकेने रु.१,५३,०००/- हजाराचे अर्थसाहय केले.

जिल्हा बँकेने विद्यार्थ्यांना जे अर्थसाहय केले त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षण पुर्ण करुन जिवनात स्वतःच्या पायावर उभे राहाता आले.[४३]

## ५.७ भाऊसाहेब थोरात यांचे शिक्षण संस्था स्थापनेच्या माध्यमातुन अहमदनगर जिल्हयाच्या शैक्षणिक विकासातील योगदान

अहमदनगर जिल्हा हा दुष्काळी जिल्हा म्हणून ओळखला जातो. अहमदनगर जिल्हयातील मुलांना शिक्षण मिळणे दुराप्रास्त होते. भाऊसाहेबांनी ज्या हालाखीच्या परिस्थितीत शिक्षण पूर्ण केले होते त्या परिस्थितीची जाण भाऊसाहेबांना होती. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सहकाराच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाचा विकास साध्य करु पाहात असतांना एक सामाजिक बांधीलकी समजून जिल्हयातील मुला-मुलींना शिक्षण मिळावे यासाठी भाऊसाहेबांनी आपल्या सहकाऱ्याच्या साहयाने सहयाद्री बहुजन विद्या प्रसारक समाज या शिक्षण संस्थेची सन १९६५ ला स्थापना केली.

### ५.७.१ सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज शिक्षण संस्था स्थापनेतील भाऊसाहेब थोरात यांचे योगदान :-

भाऊसाहेब थोरात यांच्या अध्यक्षतेखाली अंभोरकरांच्या वाडयात घेण्यात आलेल्या सभेत सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज शिक्षण संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेऊन बहुजन हिताय, बहुजन सुखाय हे संस्थेचे ब्रीदवाक्य ठरले. सह्याद्रीच्या कुशीत वास्तव्य करुन आपला चरितार्थ चालविणारा छोटा शेतकरी दलित मागासवर्गीय यांच्या मुला-मुलींना शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देणे हे उद्दिष्ट डोळयासमोर ठेवुन भाऊसाहेबांसह सर्व कार्यकर्त्यांच्या प्रयत्नातून २८ सप्टेंबर १९६५ रोजी संस्थेची घटना तयार करुन संस्थेचे रजिस्ट्रेशन झाले. आणि सर्वांच्या विचारातून शिक्षण संस्थेचे कार्य सुरु झाले होते. संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या प्रयत्नातून संस्थेचे पहिले विद्यालय दि.०६/०६/१९६६ रोजी मा.अण्णासाहेब शिंदे यांच्या हस्ते आणि पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मा.बी.जे. खताळ पाटील यांच्या उपस्थितीत सह्याद्री माध्यमिक विद्यालयाची संगमनेर येथे सुरुवात झाली.

विद्यालयाच्या प्राचार्य पदाची जबाबदारी के.बी. देशमुख यांची कन्या शंकुतला देशमुख यांनी स्विकारली होती. येथुनच खऱ्या अर्थाने भाऊसाहेब थोरात यांच्या शैक्षणिक कार्यास प्रारंभ झाला होता.[४४]

### ५.७.२ भाऊसाहेब थोरात यांचे सह्याद्री संस्थेच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाच्या शैक्षणिक विकासातील योगदान :-

भाऊसाहेब थोरात हे अहमदनगर जिल्हयाचे नेतृत्व करणारे सहकारातील श्रेष्ठ कार्यकर्ते होते. अहमदनगर जिल्हयातील मुला-मुलींना शिक्षण मिळावे म्हणून भाऊसाहेबांनी प्रयत्नपूर्वक सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज या शिक्षण संस्थेची स्थापना केली. भाऊसाहेब थोरात सहयाद्री संस्थेचे १९६६ ते १९९४ असे २९ वर्ष खजिनदार या पदावर होते. १९९४ ते १९९७, अशी चार वर्षे संस्थेचे अध्यक्ष होते. अध्यक्ष असतांना त्यांनी संस्थेचा शाखा विस्तार केला. संस्थेसाठी त्यांनी दिलेल्या योगदानामुळे आज अहमदनगर जिल्हयातील एक नामवंत शिक्षण संस्था म्हणून तिच्याकडे पाहिले जाते. भाऊसाहेबांनी या संस्थेच्या माध्यमातुन या संस्थेच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयातील सह्याद्रीच्या पर्वत रांगानी व्यापलेल्या दुर्गम अशा भागात वास्तव्य करणाऱ्या आदिवासी, मागासवर्गीय, दलित, शोषित, अगदी सामान्यातला सामान्य विद्यार्थी शिक्षण घेऊ शकणार होता. हा उद्देश साध्य

करण्यासाठी भाऊसाहेब थोरात यांनी सह्याद्री संस्थेच्या माध्यमातून २१ माध्यमिक विद्यालये अहमदनगर जिल्हयातील दुर्गम अशा आदिवासी भागात सुरु केली. आजही सर्व विद्यालये आमदार बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीपणे वाटचाल करत आहे. भाऊसाहेब थोरात यांच्या प्रमाणेच आ.बाळासाहेब थोरात यांनी आपल्या वडिलांच्या शैक्षणिक कार्याचा वारसा जोपासला आहे. भाऊसाहेबांनी सुरु केलेल्या या शिक्षण संस्थेत शिक्षण घेतलेले विद्यार्थी विविध पदावर कार्यरत आहेत.

भाऊसाहेब थोरात यांच्या प्रयत्नातुन सुरु झालेल्या सह्याद्री संस्थेच्या झालेल्या शाखा विस्तारामुळे अहमदनगर जिल्हयात आदिवासी दुर्गम अशा प्रदेशातील तसेच अहमदनगर जिल्हयातील गरीब विद्यार्थ्यांच्या दृष्टीने भाऊसाहेबांनी दिलेले योगदान महत्वपूर्ण ठरले आहे. सह्याद्री संस्थेच्या विद्यालयाने आजही गुणवत्तेची आपली परंपरा कायम टिकवुन ठेवली आहे. सह्याद्री संस्थेच्या माध्यमातून भाऊसाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्हयाच्या शैक्षणिक विकासासाठी दिलेले योगदान महत्वपूर्ण ठरले आहे.

### ५.७.३ सह्याद्री शिक्षण संस्थेची उच्च माध्यमिक विद्यालये स्थापनेतील भाऊसाहेब थोरात यांचे योगदान :-

भाऊसाहेबांनी सह्याद्रीच्या डोंगरालगत वास्तव्य करणाऱ्या आदिवासी, मागासवर्गीय तसेच सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी माध्यमिक विद्यालये सुरु केली होती. परंतु या मुलांना पुढील उच्च माध्यमिक शिक्षणही मिळावे म्हणून भाऊसाहेब थोरात यांच्या प्रयत्नातून आठ उच्च माध्यमिक विद्यालय देखील सुरु करण्यात आली आहेत.[४५]

भाऊसाहेब थोरात यांच्या प्रयत्नातुन सुरु झालेल्या आठ उच्च माध्यमिक विद्यालयाच्या माध्यमातून आदिवासी, मागासवर्गीय, गरीब मुलांप्रमाणेच मुली देखील उच्च माध्यमिक शिक्षण घेऊ शकतात. अहमदनगर जिल्हयाच्या शैक्षणिक विकासात भाऊसाहेबांनी जे योगदान दिले आहे त्यामुळेच संस्थेचे अनेक विद्यार्थी विविध पदावर कार्यरत आहेत.[४६]

### ५.७.४ सहयाद्री शिक्षण संस्थेची वरिष्ठ महाविद्यालय :-

अहमदनगर जिल्हयातील ग्रामिण भागातील आदिवासी मागासवर्गीय मुलांमुलींना महाविद्यालयीन शिक्षण मिळावे या उद्देश पुर्तीसाठी भाऊसाहेब थोरात यांनी महाविद्यालयीन शिक्षणाचे महत्व ओळखुन प्रयत्नपूर्वक अहमदनगर जिल्हयातील पुर्वेकडील आदिवासी भागात दोन महाविद्यालयाची स्थापना केली. या महाविद्यालयाच्या माध्यमातून समाजातील सर्व सामान्य विद्यार्थी महाविद्यालयीन शिक्षण घेऊन कुटुंबाचा, समाजाचा, राष्ट्राचा विकास घडवु

शकेल या उद्देशपूर्तीसाठी सर्वसामान्य विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षण सुविधा उपलब्ध करुन दिल्या. भाऊसाहेब थोरात यांच्या धोरणातून अहमदनगर जिल्हयाच्या शैक्षणिक विकासाला गती मिळाली आहे.

## ५.८ अमृतवाहिनी शेती आणि शिक्षण विकास संस्थेच्या माध्यमातुन भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या शैक्षणिक विकासातील योगदान :-

अहमदनगर जिल्हयातील पूर्वेकडील संगमनेर, अकोले, तालुक्यातील आदिवासी, मागासवर्गीय विद्यार्थ्यांप्रमणाचे जिल्हयातील गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे म्हणून भाऊसाहेब थोरात यांनी प्रयत्नपूर्वक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालये स्थापन करुन अहमदनगर जिल्हयातील पठार भागातील आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या होत्या. माध्यमिक उच्च माध्यिमक शिक्षणाप्रमाणेच अहमदनगर जिल्हयातील विद्यार्थ्यांना, तांत्रिक शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात असे भाऊसाहेब थोरात यांना मनोमन वाटत होते. परंतु तांत्रिक शिक्षण केवळ शासनातर्फे दिले जात होते. त्यामुळे मोठया शहराच्या ठिकाणीच तांत्रिक शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध होत्या. बदलत्या काळानुसार मोठया प्रमाणात औद्योगिकीकरणाची वाढ होत होती. वेगवेगळया उद्योग व्यवसायामध्ये मेकॅनिकल, इंजिनिअर्स, प्रॉडक्शन इंजिनिअर्स यांची मोठया प्रमाणावर मागणी होती. तसेच शासकीय स्तरावर सिव्हील इंजिनिअर्सची मागणी होती. वस्त्रोद्योगामध्ये तांत्रिक अभियंत्याची तर देशामध्ये पेट्रोल व तेल शुध्दीकरण उद्योगात केमिकल इंजिनिअर्सची मागणी होती. वैज्ञानिक क्षेत्रातील प्रगतीने समाज जीवनातील सर्व क्षेत्रात वर्चस्व प्रस्थापित केले होते. कॉम्प्युटरायझेशन इलेक्ट्रॉनिक इन्स्ट्रमेंटेशन इत्यादि विषयांनी उद्योगधंदयाची सर्व क्षेत्रे काबीज केली होती. त्यासाठी तंत्रज्ञानाची मोठी उणीव भासत होती. हे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी ओळखले होते. सद्यःस्थितीला शासनास नवीन अभियांत्रिकी महाविद्यालये काढणे शक्य नव्हते. त्यातच औद्योगिकीरण झपाटयाने वाढत होते. तांत्रिक शिक्षणाचे महत्व लक्षात घेऊन मुख्यमंत्री वसंतदादा पाटलांनी खाजगी संस्थांना अभियांत्रिकी महाविद्यालये काढण्यास परवानगी देण्याचे धोरण अवंलबले आणि अशा संस्थांना विना अनुदान तत्वावर अभियांत्रिक महाविद्यालय काढण्यास मान्यता देण्याचा अत्यंत महत्वपुर्ण निर्णय इ.स.१९८३ साली घेतला.

स्पर्धेच्या युगात तांत्रिक शिक्षणाचे महत्व वसंतराव दादांनी जाणले होते. त्यांच्या प्रेरणेने महाराष्ट्रात अनेक तांत्रिक महाविद्यालये स्थापन झाली. या संधीची वाट भाऊसाहेब थोरात अनेक वर्ष पाहात होते. भाऊसाहेब थोरात यांनी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखानाच्या माध्यमातून इ.स.१९७२ साली अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेची स्थापना केली होती. भाऊसाहेब या संस्थेचे संस्थापक असुन ते १९९४ ते १९९७ संस्थेचे अध्यक्ष होते. त्यांनी या संस्थेच्या माध्यमातून ऊस क्षेत्र वाढविण्यावर संस्थेने भर दिला होता. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना शेतीपूरक साहित्य व इतर वस्तुंचा पुरवठा योग्य किंमतीत करण्यासाठी सॅम्प्रो या संस्थेची स्थापना केली होती. मात्र मुख्यमंत्री वसंतदादा यांच्या तांत्रिक शिक्षणाच्या घोषणेनंतर भाऊसाहेब थोरात यांनी तात्काळ अमृतवाहिनी शेती आणि शिक्षण विकास संस्थेची सभा बोलावून सभेत अभियांत्रिकी महाविद्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेतला एवढेच नव्हे तर प्रयत्नपुर्वक विना अनुदानित तत्वावर अभियांत्रिकी महाविद्यालय स्थापण्याची परवानगी मिळविली. अभियांत्रिकी महाविद्यालयास परवानगी मिळताच भाऊसाहेब थोरात यांनी साध्या पत्र्याच्या खोल्या तयार करुन इ.स.१९८३ साली अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु केले होते. भाऊसाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्हयातील विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात हे मनाशी बाळगलेले स्वप्न प्रत्यक्षात साकार झाले होते. भाऊसाहेब थोरात यांनी सुरु केलेल्या या अभियांत्रिकी महाविद्यालयात महाराष्ट्रातील विविध जिल्हयातील त्याचप्रमाणे परदेशी विद्यार्थीही मोठया प्रमाणात लाभ घेत आहे.

आज या अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विशाल अशा वटवृक्षात रुपांतर झाले आहे. भाऊसाहेब थोरात यांनी अमृतवाहिनी शेती आणि शिक्षण विकास संस्थेच्या माध्यमातून केवळ अभियांत्रिकी महाविद्यालयच नव्हे तर अनेक शैक्षणिक उपक्रम देखील सुरु केले आहेत.

### ५.८.१ भाऊसाहेब थोरात यांचे अमृतवाहिनी इंजिनिअरींग कॉलेजच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाच्या सामाजिक विकासातील योगदान :-

तांत्रिक शिक्षणाचे महत्व ओळखुन मुख्यमंत्री वसंतदादा पाटलांनी खाजगी संस्थांना अभियांत्रिकी महाविद्यालय काढण्याची मान्यता इ.स.१९८३ साली देताच भाऊसाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्हयातील विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण मिळावे, यासाठी इ.स.१९८३ साली अमृतवाहिनी इंजिनिअरींग कॉलेजची स्थापना केली. साध्या पत्र्याच्या खोल्यांमध्ये सुरु

केलेले इंजिनिअरींग महाविद्यालय आज सर्व सुविधांनी परिपूर्ण असे आहे. त्याचे विशाल वटवृक्षात रुपांतर झाले आहे.

भाऊसाहेब थोरात यांनी सुरु केलेल्या इंजिनिअरींग कॉलेजचा लाभ अहमदनगर जिल्हयातील आदिवासी, मागासवर्गीय गरीब विद्यार्थ्यांना मोफत सुविधा, वसतीगृह सुविधा दिल्या जातात. जेणेकरुन अहमदनगर जिल्हयातील जास्तीत जास्त विद्यार्थी इंजिनिअरींग महाविद्यालयाच्या माध्यमातून इंजिनिअर होऊन अहमदनगर जिल्हयाच्या सामाजिक विकासात आपले योगदान देऊ शकतील आणि जिल्हयांचा सर्वांगीण विकास होऊ शकेल. या उद्दीष्टपूर्तीसाठी भाऊसाहेब थोरात सतत प्रयत्नशिल होते. भाऊसाहेब थोरात यांच्यानंतर अमृतवाहिनी शेती आणि शिक्षण विकास संस्थेच्या माध्यमातून इंजिनिअरींग कॉलेजची जबाबदारी मा.आमदार बाळासाहेब थोरात सांभाळत आहेत. भाऊसाहेब थोरात यांच्या शैक्षणिक कार्याची जबाबदारी मा.आमदार बाळासाहेब थोरात यशस्वीपणे पुढे चालवत आहेत. संस्था चालकाच्या मार्गदर्शनानुसार सर्व स्टाफ संस्थेच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशिल आहे. भाऊसाहेब थोरात यांच्या प्रयत्नातून सुरु झालेल्या इंजिनिअरींग कॉलेजमध्ये पुढील विषय शिकविले जातात. सिव्हील इंजिनिअरींग, प्रॉडक्शन इंजिनिअरींग, कॉम्प्युटर इंजिनिअरींग, इलेक्ट्रॉनिक इंजिनिअरींग याशिवाय महाविद्यालयात लांबच्या विद्यार्थ्यांना अद्यायावत वसतीगृहाची सुविधा, वैद्यकिय सुविधा, जिमखाना, भव्य ग्रंथालय, गरीब विद्यार्थ्यांसाठी कमवा व शिका योजना, सुसज्ज निसर्गरम्य परिसर, उत्कृष्ठ निकालाची परंपरा, कॅम्पस इंटरव्हुय, सर्व दृष्टीने सुसज्ज इंजिनिअरींग कॉलेजने आज अहमदनगर जिल्हयाच्या शैक्षणिक विकासात महत्वपूर्ण भर टाकली आहे. जिल्हयातीलच नव्हे तर महाराष्ट्र व महाराष्ट्र राज्याच्या बाहेरील विद्यार्थीही या इंजिनिअरींग कॉलेजमधुन डिग्री घेऊन देशात, परदेशात यशस्वीपणे काम करत असुन यात अहमदनगर जिल्हयातील विद्यार्थी मोठया प्रमाणात असून त्यांनी देशात परदेशात या महाविद्यालयाच्या माध्यमातुन अहमदनगर जिल्हयाची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. भाऊसाहेब थोरात यांनी केलेले हे सामाजिक कार्य अहमदनगर जिल्हयाच्या विकासात बहुमोल ठरत आहे.[४७]

### ५.८.२ भाऊसाहेब थोरात यांचे अमृतवाहिनी पॉलिटेक्निक कॉलेजच्या माध्यमातुन अहमदनगर जिल्हयाच्या सामाजिक विकासातील योगदान :-

अहमदनगर जिल्हयातील मुलांनाही तांत्रिक शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात ही भाऊसाहेबांची प्रबळ इच्छा होती. अहमदनगर जिल्हयातील मुलांनी तांत्रिक शिक्षण घेऊन

आपल्या जिल्हयाचे नाव देशात परदेशात एक वेगळी ओळख निर्माण करावी, असे भाऊसाहेबांना वाटत होते.आपला हा हेतू साध्य करण्यासाठी इ.स.१९८३ साली अमृतवाहिनी पॉलिटेक्निक कॉलेजची स्थापना केली. या कॉलेजमध्ये सिव्हील इंजिनिअरींग, मॅकेनिकल इंजिनिअरींग, इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरींग, ऑटोमोबाईल इंजिनिअरींग, कॉम्प्युटर इंजिनिअरींग, इन्फरमेशन टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग हे अभ्यासक्रम शिकविले जातात. मागासवर्गीय, आदिवासी विद्यार्थ्यांना मोफत वसतीगृहाची सुविधा उपलब्ध झाल्याने अहमदनगर जिल्हयातील पठार भागातील विद्यार्थीही शिक्षण घेऊ लागले आहेत. महाराष्ट्रातील विविध जिल्हयातून आलेल्या विद्यार्थ्यांनाही वसतीगृहाची सुविधा उपलब्ध करुन दिली जाते. तसेच सुसज्ज जिमखाना, ग्रंथालय सुविधा, सुसज्ज प्रयोगशाळा, कॅम्पस इंटरव्हयु, सुविधा, कमवा व शिका योजना सर्व सुविधांनी पूर्ण कॉलेज भाऊसाहेब थोरात यांच्या दुरदृष्टीमुळे सुरु होऊन आज जिल्हयाच्या शैक्षणिक विकासात या पॉलिटेक्निक कॉलेजचे महत्वपूर्ण योगदान आहे.[४८]

**५.८.३ अमृतवाहिनी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र स्थापनेतील भाऊसाहेब थोरात यांचे योगदान :-**

अहमदनगर जिल्हयात रोजगारांच्या संधी फार कमी उपलब्ध असल्याने जिल्हयातील मुलांना रोजगारांसाठी बाहेरील जिल्हयात जावे लागे. भाऊसाहेब थोरात यांना असे वाटत होते की, जिल्हयातील मुलांना औद्योगिक प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करुन दिली तर जिल्हयातील बेकारी दूर होऊ शकेल. या उद्देशाने भाऊसाहेब थोरात यांनी जागतिकीकरणातील इंडस्ट्रियल क्षेत्राचे महत्व ओळखुन औद्योगिक प्रशिक्षण केंद्राची स्थापना इ.स.१९८४ साली केली. अहमदनगर जिल्हयाच्या ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थी या औद्योगिक प्रशिक्षण केंद्रातुन शिक्षण घेऊन शासकिय किंवा स्वत:हाचे उद्योग सुरु करुन अहमदनगर जिल्हयाच्या सामाजिक विकासात महत्वपूर्ण योगदान देत आहेत.

अमृतवाहिनी औद्योगिक प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून कॉम्प्युटर ऑपरेटर,व प्रोग्रामिंग असिस्टंट, फिटर, मॅकेनिकल मोटार व्हेईकल, वायरमन, डिझेल मॅकेनिक हे अभ्यासक्रम शिकविले जातात. वरील अभ्यासक्रम या संस्थेद्वारे यशस्वीपणे शिकविले जात आहेत. या क्षेत्राकडे विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी नोकरी व स्वयंरोजगारासाठी ट्रेनिंग दिले जाते. आंतरराष्ट्रीय कोर्सेसची सुविधा उपलब्ध करुन दिली जाते. विद्यार्थ्यांना विविध व्यवसायातील तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन केले जाते. भाऊसाहेब थोरात यांनी सुरु केलेल्या या शिक्षण

उपक्रमाद्वारे अहमदनगर जिल्हयातील अनेक विद्यार्थी औद्योगिक शिक्षण घेऊन विविध पदावर काम पाहात आहेत.[४९]

### ५.८.४ अमृतवाहिनी मॉडेल स्कूल स्थापनेच्या माध्यमातून भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या सामाजिक विकासातील योगदान :-

भारत हा कृषीप्रधान देश आहे. अहमदनगर जिल्हयातील आदिवासी, शेतकऱ्यांच्या मुलांनाही इंग्रजी शिक्षण मिळावे, आणि राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धेत ग्रामीण भागातील विद्यार्थी टिकुन रहावा या उद्देशाने भाऊसाहेब थोरात यांनी इ.स.१९८६ साली संगमनेर येथे अमृतवाहिनी मॉडेल स्कूलची स्थापना केली . इ.स.१९८६ साली ज्यु.के.जी. च्या वर्गापासून सुरु झालेली मॉडेल स्कूल आज खऱ्या अर्थाने नावारुपाला आली आहे.

अहमदनगर जिल्हयातील आदिवासी, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अनेक सवलती दिल्या जातात. जिल्हयातील सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या मुलांनाही शिक्षण मिळावे व त्याने अहमदनगर जिल्हयाचे नाव देशात व देशाबाहेर उंच करावे. तसेच अहमदनगर जिल्हयाच्या सामाजिक विकासात महत्वपूर्ण योगदान द्यावे, या उद्देशाने भाऊसाहेब थोरात यांनी इ.स.१९८३ साली सुरु केलेल्या अमृतवाहिनी मॉडेल स्कूलची प्रगती जलद गतीने होत आहे. इ.स.२०११-१२ मध्ये मॉडेल स्कूलने ज्युनिअर कॉलेज सुरु केले असून या अंतर्गत विज्ञान शाखा सुरु करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना वसतिगृह सुविधा, भोजन सुविधा, ग्रंथालय सुविधा, सुसज्ज जिमखाना, विविध व्याख्यानांचे आयोजन, विविध स्थळांना भेटी, तज्ञ शिक्षकवर्ग अशा विविध सुविधा पुर्ण अमृतवाहिनी मॉडेल्स स्कूल सुरु असून अहमदनगर जिल्हयातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना भाऊसाहेब थोरात यांच्या दुरदृष्टीमुळे इंग्रजी शिक्षणाची सुविधा उपलब्ध झाली आहे.

अमृतवाहिनी मॉडेल स्कूलने राज्य पातळीवरच नव्हे तर देश पातळीवरही आपली गुणवत्ता सिध्द करुन या शाळेतील विद्यार्थ्यांनी लौकिक मिळविला आहे. नॅशनल सायन्स ऑलंपियाड ऑल इंडिया जनरल नॉलेज टेस्ट, राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा, गणित प्रज्ञाशोध परीक्षा यासारख्या स्पर्धा परीक्षांमध्ये या शाळेतील विद्यार्थ्यांनी सदैव यश मिळविले आहे. अभिजित पिल्ले व करण राजपाल या विद्यार्थ्यांनी अखिल भारतीय सामान्य ज्ञान परीक्षांमध्ये प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. तर आशिष बोरा या विद्यार्थ्याने नॅशनल सायन्स ऑलिंपियाड मध्ये भारतात सर्व प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणांना चालना देण्यासाठी दरवर्षी विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. विशेषतः

राष्ट्रभाषा हिंदी परीक्षा आदि परिक्षा घेतल्या जातात. शाळेची निकालाची परंपरा कायम ९०-१००% या दरम्यान टिकुन आहे. अभ्यासाबरोबरच क्रिडा क्षेत्रातही शाळेने भरघोस यश मिळविले आहे. दरवर्षी या शाळेतील खेळाडू जिल्हा, राज्य व देशपातळीवर चमकत असतात. देशपातळीवर खेळणारे हरगोविंद राज व स्वागतचंदा या सारखे खेळाडू याच शाळेने तयार केले आहेत.

ॲथलेटिक्स बरोबरच स्केटिंग, बॅटमिंटन, बुध्दीबळ, मल्लखांब, दोरीवरील मल्लखांब, हॉकी, योगासने, तायक्वांदो यासारख्या खेळातही शाळेने उज्वल यश मिळविले आहे. क्रिकेट, बास्केट बॉल, टेबल टेनिस यासारख्या खेळाचे नियमित प्रशिक्षण येथे दिले जाते. दरवर्षी स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिनी विविध क्रिडा प्रात्यक्षिके सादर केली जातात. अभ्यासक्रम व खेळ याबरोबरच संगिताचे उत्कृष्ट ज्ञान दिले जाते. संगित शाळेत विविध प्रकारची वाद्य उपलब्ध असून विद्यार्थ्यांना गायन वादनाचा सराव दिला जातो. सुमारे ४००-५०० विद्यार्थ्यांचे समूहगान बसवून दरवर्षी राज्य पातळीवरील समूहगान स्पर्धेत भाग घेऊन पारितोषिके मिळविली आहेत. बारावी विज्ञान शाखा शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून सुरु झाली आहे. या शाखेने आपली उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. भाऊसाहेब थोरात यांच्या दुरदृष्टीमुळे अहमदनगर जिल्हयातील अनेक विद्यार्थ्यांनी या मॉडेल स्कूलमध्ये शिक्षण घेऊन अहमदनगर जिल्हयाचे नाव देशात व परदेशातही उज्ज्वल केले आहे. शाळेचे माजी काही विद्यार्थी इंग्लंड, अमेरिका, रशिया आदि देशांमध्ये विविध पदावर सेवेत कार्यरत आहेत. भाऊसाहेब थोरात यांची प्रेरणा नामदार बाळासाहेब थोरात आणि डॉ.सुधीर तांबे यांचे मार्गदर्शन सर्व शिक्षकांचे परिश्रम यातून मॉडेल स्कूलचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे. भाऊसाहेब थोरात यांनी सुरु केलेले मॉडेल स्कूल अहमदनगर जिल्हयातील विद्यार्थ्यांना महत्वपूर्ण शैक्षणिक सुविधा देत आहे.[५०]

**५.८.५ अमृतवाहिनी रुरल हॉस्पिटल स्थापनेच्या माध्यमातून भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या सामाजिक विकासातील योगदान :-**

भाऊसाहेब थोरात यांच्या एकसष्टी सोहळयाच्या निमित्ताने भाऊसाहेबांवर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी स्वखुशीने जमा केलेले ७ लाख ५० हजार रुपये एकसष्टी सोहळयात भाऊसाहेबांना देण्यात आले. कार्यकर्त्यांच्या अतुट प्रेमापोटी मिळालेल्या ७ लाख ५० हजार रुपयांचा विनियोग भाऊसाहेब थोरात यांनी योग्य प्रकारे केला होता. भेट म्हणुन मिळालेल्या ७ लाख ५० हजारा रुपयात स्वत:कडील ५१ हजार रुपयांची भर टाकून मथुराबाई

भाऊसाहेब थोरात सेवाभावी ट्रस्ट नावे विश्वस्त संस्था स्थापन केली. या संस्थेद्वारे अमृतवाहिनी रुरल हॉस्पिटल या शंभर खाटांची सुविधा असणाऱ्या हॉस्पिटलची स्थापना केली.[५१] या हॉस्पिटल अंतर्गत सौ.मथुराबाई दंत महाविद्यालयाची स्थापना केली. या दंत हॉस्पिटलद्वारे अहमदनगर जिल्हयातीलच नव्हे तर जिल्हयाच्य बाहेरील रुग्णांना अल्प फि मध्ये उपचार केले जातात. तसेच ६० वर्षावरील रुग्णांना मोफत सुविधा दिल्या जातातत. तसेच १२ वर्षाखालील रुग्णांना मोफत सुविधा दिल्या जातात. या हॉस्पिटलमध्ये दात साफ करणे, शस्त्रक्रिया करणे, एक्स-रे काढणे असे उपचार केले जातात. तसेच दंतमहाविद्यालयात ५५० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. दंतमहाविद्यालयात विद्यार्थ्यांना विविध सुविधा पुरविल्या जातात. वसतिगृह, भोजन व्यवस्था, तसेच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध उपक्रमही राबविले जातात. भाऊसाहेब थोरात यांच्या प्रयत्नातून साकार झालेल्या सेवाभावी ट्रस्टने घोटी येथेही दंतमहाविद्यालयाचे हॉस्पिटल सुरु केले आहे. भाऊसाहेब थोरात यांच्या प्रयत्नातून साकार झालेल्या मथुराबाई दंतमहाविद्यालय व रुरल हॉस्पिटलचा लाभ अहमदनगर जिल्हयातील रुग्णांप्रमाणेच जिल्हयाच्या बाहेरील रुग्णांना देखील होत आहे.[५२]

## ५.९ उपसंहार :-

भाऊसाहेब थोरात यांना सामाजिक कार्याचा वारसा आपल्या कुटुंबाकडुनच मिळाला. वास्तविक पाहता त्यांच्या बालपणी समाज रुढीप्रिय होता. समाजात जातीभेद दृढ होता. समाजातील शुद्र म्हणुन ओळखल्या जाणाऱ्या वर्गास अनेक बंधने पाळणे भाग पडत होते. परंतु भाऊसाहेबांच्या घराण्याने कधीही भेदभाव न करता सर्व जातीधर्माच्या लोकांना आपलेसे केले. हेच संस्कार भाऊसाहेबांवर घरातुन झाल्याने ते पुढे उत्कृष्ट समाज संघटक म्हणुन ओळखले जाऊ लागले. प्रस्तुत प्रकरणात भाऊसाहेबांचे सावकारशाही विरोधी धोरण रिझर्व्ह बँकेच्या वाढीव शेती कर्जाविषयक धोरण,मिटर हटाव आंदोलन, राजहंस दुध संघ, संगमनेर साखर कारखाना,अहमदनगर जिल्हा सहकारी बँक,अमृतवाहिनी बँक, सॅम्प्रो संस्था,पाणीपुरवठा संस्था,वन जमिन हक्क,सिलिंग कायदयासाठी संघर्ष,विडी कामगारांसाठी योगदान, दुष्काळ निवारणार्थ कार्य, दंडकारण्य अभियान, शैक्षणिक योगदान, या माध्यमातुन भाऊसाहेबांनी स्वातंत्र्योत्तर काळात समाज विकासासाठी महत्वपूर्ण योगदान दिले.त्यांचे हे योगदान अहमदनगर जिल्हयाच्या विकासासाठी आजही महत्वपूर्ण ठरत आहे.

## संदर्भ ग्रंथ सुची :-


१) गाठाळ एस.एस.,मराठयांचा इतिहास व संस्कृती, प्रकाशक- अतकरे के.एस., प्रकाशन - कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, जुलै २००८, पृ.क्रं.३७०,३७१.

२) पठाण के.जी.- मगनाळे व्ही.एस.- महाराष्ट्र राज्य व जिल्हे- एक दृष्टिकोन, प्रकाशक- शर्मा संजय, प्रकाशन- इंटेलेक्च्युअल बुक ब्युरो, नारायणनगर, हौशंगाबाद रोड, भोपाळ, प्रथम आवृत्ती, २००५, पृ.क्रं.४२२, ४२३.

३) टेमकर प्रा.राजधर - 'पार्थभूमी भूषण' दादा पाटील राजळे चरित्र ग्रंथ - प्रकाशक- लाटकर उल्हास चिंतामणी, प्रकाशन- अमेय प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, जुलै १९९९, पृ.क्रं.२७.

४) कसबे रावसाहेब लामखडे मा.रा.- "शेती आणि सहकार" थोरात भाऊसाहेब गौरव ग्रंथ, प्रकाशक- गुंजाळ बाळासाहेब प्रकाशन, विश्वकर्मा मुद्रणालय, पृ.क्रं.२१,२८८.

५) कित्ता - पृ.क्रं.२८८,२८९.

६) मुलाखत : लहानु गजाबा कर्पे, पिंपळगाव कोंझिरा,ता.संगमनेर,जि.अहमदनगर- दि.२०/०६/२०१६.

७) मुलाखत -पुर्वोक्त ६, दि.२०/०६/२०१६.

८) पन्हाळे गणपत नारायण,अकोले,ता.अकोले, दि.०२/०५/२०१६

९) टेमकर प्रा.राजधर - 'पार्श्वभूमी भूषण' पुर्वोक्त क्रं.३, पृ.क्रं.२८.

१०) मुलाखत - हंडाळ किसन त्रिंबक, पाथर्डी,ता.पाथर्डी, दि.२०/०५/२०१६.

११) थोरात भाऊसाहेब 'अमृतगाथा' प्रकाशक -लाटकर उल्हास चितांमणी, प्रकाशन- अमेय प्रकाशन,पुणे, द्वितीयावृत्ती, जुलै २००२, पृ.क्रं.१९८,१९९,२००

१२) कित्ता - पृ.क्रं.२०३,२०४

१३) मुलाखत - मा.देशमुख रणजितसिंह विजयसिंह, मु.पो.अंभोरे, ता.संगमनेर, जि.अहमदनगर, दि.०४/०५/२००१६.

१४) खताळ बी.जे.माजी पाटबंधारे मंत्री, मु.पो.संगमनेर, जि.अ.नगर, दि.१०/०५/२०१६.

१५) मुलाखःकडू पुंजाजी बापुजी, मु.पो.सात्रळ, ता.राहुरी,जि.अ.नगर, दि.१७/०५/२०१६

१६) मुलाखतः पंडीत अमित वल्लभराय, चेअरमन- श्री.भाऊसाहेब संतुजी थोरात अमृतवाहिनी सहकारी बँक लि.घुलेवाडी,मु.पो.संगमनेर,ता.संगमनेर,जि.अहमदनगर, दि.२१/०५/२०१६.

१७) मुलाखत : दातीर बाळकृष्ण भिकाजी- मु.पो.खांबा, ता.संगमनेर,जि.अहमदनगर, चेअरमन सॅम्प्रो संस्था संगमनेर,दि.२६/०५/२०१६.

१८) मुलाखतः खेमनर बाजीराव खंडूजी, मु.पो.साकूर, ता.संगमनेर, जि.अहमदनगर, दि.२८/०५/२०१६.

१९) मुलाखतः कडू पुंजाजी बापुजी पूर्वोक्त क्रं.१५, दि.०६/०६/२०१६.

२०) मुलाखत : केदार गंगाराम जानकु, देसवडे,ता.पारनेर,दि.१५/०५/२०१६.

२१) कित्ता - दि.१८/०६/२०१६

२२) कित्ता - दि.२२/०६/२०१६

२३) शेवाळे वि.म. 'सहयाद्रीच्या कुशित', वनविहार प्रकाशन संगमनेर, प्रथमावृत्ती, सप्टेंबर २००६, पृ.क्रं.२८.

२४) मुलाखतः कडू पुंजाजी बापुजी, पुर्वोक्त क्रं.१५, दि.०८/०२/२०१६.

२५) थोरात भाऊसाहेब, 'अमृतमंथन', प्रकाशन - लाटकर उल्हास चिंतामणी , प्रकाशन - अमेय प्रकाशन पुणे, तृतीयावृत्ती, १२ जाने.१९९९, पृ.क्रं.१३३.

२६) शेवाळे वि.म.- 'सहयाद्रीच्या कुशीत' पुर्वोक्त क्रं.२३, पृ.क्रं.३३

२७) थोरात भाऊसाहेब 'अमृतमंथन' पुर्वोक्त क्रं.२५, पृष्ठ क्रं.१३४

२८) मुलाखत : पुर्वोक्त क्रं.१५, दि.२५/०२/२०१६.

२९) दर्शनअंक विचारदर्शन, पृ.क्रं.३४

३०) मुलाखतः क्षत्रिय प्रकाश प्रल्हाद, भिकुसा विडी कारखाना मालक, संगमनेर, दि.२०/०७/२०१६.

३१) मुलाखत- गंवादे किसन आप्पाजी, मॅनेजर, कोंबडा विडी कारखाना, मोतीनगर, संगमनेर, दि.०५/०८/२०१६.

३२) मुलाखतः डोईफोडे वैशाली गणेश, कोंबडा विडी कामगार,मुख्य शाखा, मोतीनगर, संगमनेर, दि.२५/०८/२०१६.

३३) मुलाखत : सातपुते रामनाथ भाऊराव, मॅनेजर,हत्ति विडी कारखाना, बाजारपेठ, संगमनेर, दि.१२/०८/२०१६.

३४) मुलाखत - कांगुणे कांताबाई बाबाजी, हत्ति विडी कारखाना, बाजारपेठ, संगमनेर, दि.१७/०८/२०१६.

३५) मुलाखत पूर्वोक्त क्रं.१५, दि.२८/०६/२००६.

३६)	खेमनर बाजीराव खंडुजी, माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक, अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, दि.२०/०५/२०१६.

३७)	कित्ता - दि.०४/०७/२०१६.

३८)	अंतरकर अरुणा 'कथा आधुनिक दंडाकरण्याची', प्रकाशक - लाटकर उल्हास चिंतामणी, प्रकाशन, अमेय प्रकाशन पुणे,प्रथमावृत्ती ७ जुलै २००८,पृष्ठ क्रं.९,१०,११.

३९)	कित्ता - पृष्ठ क्रं.१३,१४,१५

४०)	कित्ता - दि.१७,१८.

४१)	मुलाखत : पूर्वोक्त क्रं.१४, दि.१७/०७/२००६.

४२)	मुलाखत - पुर्वोक्त, क्रं.१८, दि.२५/०७/२००६.

४३)	परिवर्तन : प्रकाशक- गडाख शंकरराव यशवंतराव, सुवर्ण महोत्सवी वर्ष, अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, अहमदनगर वर्ष १९५८ ते २००८.पृ.क्रं.१०२ ते १०६.

४४)	थोरात भाऊसाहेब 'अमृतगाथा' पूर्वोक्त क्रं. ११, पृष्ठ क्रं.९८.

४५)	सहयाद्री संस्था रजिस्टर क्रं.५०, नोंदीनुसार

४६)	वार्षिक अहवाल - 'सहयाद्री बहुजन विद्याप्रसारक समाज' संगमनेर सन २०१३-२०१४, पृ.क्रं.२१.

४७)	प्राचार्य विखे एस.पी.- संगमनेर,ता.संगमनेर,जि.अहमदनगर, प्राचार्य इंजिनिअरींग कॉलेज, संगमनेर,दि.०३/०८/२०१६.

४८)	मुलाखतः- प्राचार्य देशमुख एस.टी. अमृतवाहिनी इंडस्ट्रियल ट्रेनिंग कॉलेज संगमनेर, ता.संगमनेर,जि.अहमदनगर, दि.०६/०८/२०१६.

४९)	मुलाखतः- प्रा. कडलग एस.पी. अमृतवाहिनी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, संगमनेर,दि.१२/०८/२०१६.

५०)	सौ.हजारे एस.डी.प्राचार्या- 'अमृतवाहिनी मॉडेल स्कूल', संगमनेर,ता.संगमनेर, जि.अहमदनगर, दि.२०/०८/२०१६.

५१)	मुलाखत पूर्वोक्त क्रं.१८, दि.०२/०८/२०१६.

५२)	मुलाखतः- प्राचार्य पाटील, डॉ.अशोक, मथुराबाई दंत महाविद्यालय, संगमनेर, ता.संगमनेर,जि.अहमदनगर,दि.२६/०८/२०१६.

******

# प्रकरण : सहावे

# भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान

## प्रकरण सहावे

# भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान

**प्रास्ताविक :-**


६.१ सहकार चळवळीचा उदय आणि अहमदनगर जिल्हयातील सहकार चळवळीतील भाऊसाहेब थोरात यांचे योगदान

६.२ भाऊसाहेब थोरात यांचे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान

६.३ भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान

६.४ भाऊसाहेब थोरात यांचे सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान.

६.५ भाऊसाहेब थोरात यांचे राजहंस सहकारी दूध संघाच्या माध्यामातुन अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान.

६.६. भाऊसाहेबांनी राजहंस दुध संघातील विविध योजनांच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाचा केलेला आर्थिक विकास.

६.७ भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी नागरी सहकारी बँकेच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान.

६.८ भाऊसाहेब थोरात यांचे गरुड कुक्कुटपालन संस्थेच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान.

६.९ उपसंहार

संदर्भग्रंथ

## प्रकरण सहावे

# भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान

**प्रास्ताविक :-**

अहमदनगर जिल्हयातील प्रवरानगर येथे धंनजयराव गाडगीळ, पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांच्या प्रयत्नाने इ.स.१९५० साली पहिला सहकारी साखर कारखाना सुरु झाला.त्याचबरोबर अहमदनगर जिल्हयातील सहकार चळवळीस चालना मिळाली. त्याचवेळी अहमदनगर जिल्हयात कम्युनिस्ट चळवळ प्रखर बनली होती. कम्युनिस्टांचे प्रणेते भाऊसाहेब थोरात जिल्हयातील शेतकरी, कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रभावी कार्य करत होते. परंतु भाऊसाहेबांच्या लक्षात आले की, कम्युनिस्ट विचाराने जिल्हयाचा आर्थिक विकास होऊ शकत नाही. तेव्हा इ.स.१९५२ साली सहकार तत्वप्रणालीचा स्विकार केला. भाऊसाहेब थोरात यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष असतांना अहमदनगर जिल्हयाचा आर्थिक विकास होण्याच्या दृष्टीने ज्या विविध योजना राबविल्या त्या योजनांच्या माध्यमातुन जिल्हयांच्या झालेल्या आर्थिक विकासावर या प्रकरणात प्रकाश टाकणार आहे. तसेच संगमनेर भाग सहकारी साखर कारखाना,राजहंस दुध संघ, गरुड कुक्कुटपालन संस्था, भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी बँक, सॅम्प्रो संस्था, अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्था या सहकारी संस्थांची स्थापना करुन या सहकारी संस्थाच्या माध्यमातुन अहमदनगर जिल्हयांच्या आर्थिक विकासासाठी दिलेल्या योगदानाचा आढावा प्रस्तुत प्रकारणात घेण्यात आला आहे.

## ६.१ सहकार चळवळीचा उदय आणि अहमदनगर जिल्हयातील सहकार चळवळीतील भाऊसाहेब थोरात यांचे योगदान

सहकाराचा उगम प्रथम इंग्लडमध्ये झाला. इंग्लड येथे रॉबर्ट ओवेन यांनी इ.स.१८५० साली सर्वसामान्य कामगारावर होत असलेला अन्याय दुर करण्यासाठी सहकार तत्वाचा प्रयोग यशस्वी केला. रॉबर्ट ओवेन यांना सहकार चळवळीचे जनक म्हटले जाते.[१] भारत सातत्याने दुष्काळाचा सामना करत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीश सरकारने भारतातील दुष्काळावर मात करण्यासाठी डेक्कन ॲग्रीकल्चरल रिलिफ ॲक्ट नावाचा कायदा संमत केला होता. परंतु भारतीय शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास हा

कायदा उपयोगी पडला नाही. त्यानंतरही भारतीय शेतकऱ्यांना योग्य दराने कर्ज पुरवठा करण्यासाठी सहकारी संस्था स्थापना केल्या जाव्यात अशी शिफारस सर फेंड्रीक निकोलस यांनी केली होती. तसेय एडवर्ड लॉ यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने सहकारी संस्था स्थापन करण्याची शिफारस केली होती. वरील शिफारशींची दखल घेत ब्रिटीशी सरकारने भारतीय चळवळीस मुर्त स्वरुप देणारा पहिला सहकारी कायदा इ.स.१९०४ साली पास केला. परंतु शेतकऱ्यांना फक्त कर्ज पुरवठा करणाऱ्या सहकारी सोसायटया काढुन भागणार नव्हते. शेतकऱ्यांना अन्य प्रकारच्या सेवा देणाऱ्या सोसायटया काढण्याची गरज होती. पण त्यासाठी १९०४ चा कायदा अपुरा होता. त्यात बदल करत इ.स.१९१२ चा सहकारी सोसायटयांचा कायदा पास करण्यात आला. इ.स.१९१९ साली सहकार खाते प्रांतिक सरकारकडे सोपविण्यात आले. त्यानुसार प्रांताना सहकार कायदे करण्याचा अधिकार देण्यात आल्याने त्यातुनच मुंबई राज्याने इ.स.१९२५ साली, मद्रास राज्याने इ.स.१९३२ साली व बिहार प्रातांने इ.स.१९४० साली स्वत:चे सहकार कायदे पास केले.[२]

भारतात सहकार चळवळीचा प्रसार होऊ लागला होता. त्यातच १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर मराठा भाषिकांनी स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या मागणीसाठी संघर्ष सुरु केला. शेवटी मराठा भाषिकांच्या स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची मागणी मान्य होऊन त्यानुसार १ मे १९६० रोजी महाराष्ट्र हे मराठी भाषिकांसाठीचे स्वतंत्र राज्य अस्तित्वात आले. त्याच बरोबर इ.स.१९२५ च्या मुंबई सहकारी संस्थाच्या कायदयाची जागा घेणारा इ.स.१९६० चा कायदा पास झाला. तो महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा या नावाने त्याची अंमलबजावणी २६ जानेवारी १९६२ पासुन सुरु झाली. इ.स.१९६२ पासुन महाराष्ट्रातील सहकारी सोसायटयांना लागु असणारा इ.स.१९६० चा सहकारी कायदा अदयापही लागु आहे. मात्र त्यात वेळोवेळी दुरुस्त्या केल्या जातात. कायदयात सर्व सहकारी संस्थांसाठी वेगवेगळया तरतुदी करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्रात सहकारी चळवळीचा प्रसार होत होता. महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्हा त्यात आघाडीवर होता.[३] आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना प्रवरानगर येथे सुरु होऊन अहमदनगर जिल्हयात सहकाराची मुहर्तमेढ रोवली गेली. जिल्हयाच्या विकासात सहकाराचे महत्व लक्षात घेत कम्युनिस्ट भाऊसाहेबांनी इ.स.१९५२ साली सहकार तत्वाचा स्विकार केला. आणि इ.स.१९५३ साली जोर्वे सोसायटीचे अध्यक्षपद स्विकारुन सहकाराचा श्रीगणेशा केला. भाऊसाहेब इ.स.१९५६ साली संगमनेर तालुका सुपरवायझिंग युनियनचे अध्यक्ष, जिल्हा

लोकल बोर्डाचे सदस्य इ.स.१९५७, संगमनेर शेतकी संघाचे चेअरमन इ.स.१९५६, अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष इ.स.१९६५, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष इ.स.१९८१, संगमनेर सहकारी साखर कारखान्याची स्थापना इ.स.१९६८, संगमनेर विधानसभा मतदार संघातुन निवड इ.स.१९७८, अमृतवाहिनी सहकारी बँकेची स्थापना इ.स.१९८३, अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेची स्थापना इ.स. १९८३, अमृतवाहिनी रुरल हॉस्पिटलची स्थापना इ.स. १९८३, भारतीय औद्योगिक वित्तीय महामंडळ नवी दिल्ली या संस्थेचे संचालक इ.स. १९८४. अशा विविध सहकारी संस्थांची स्थापना करुन व सहकारी संस्थांतील पदाच्या माध्यमातुन अहमदनगर जिल्हयाचा सर्वांगिण आर्थिक विकास करण्यासाठी महत्वपूर्ण योगदान दिले.[४]

## ६.२ भाऊसाहेब थोरात यांचे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान

इ.स.१९६५ पासुन महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेत भाऊसाहेब अध्यक्ष,उपाध्यक्ष, संचालक अशा विविध पदावर होते. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेत भाऊसाहेब अध्यक्ष या पदावर १९८०, १९८१, १९८२, १९८३, १९८४ या वर्षी होते. आपल्या अध्यक्ष पदाचा उपयोग महाराष्ट्रातील सहकार वाढविण्यासाठी त्यांनी केला. महाराष्ट्रातील सहकार वाढवत असतांना त्यात अहमदनगर जिल्हयातील जी प्रकरणे बँकेकडे येत ती मंजुर करुन अहमदनगर जिल्हयातील सहकारी संस्थांना लाभ मिळवुन दिला. त्याचप्रमाणे जिल्हयातील उद्योजक, व्यापारी, कामगार, शेतकरी यांच्या हिताच्या दृष्टीने देखील महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातून विविध कर्ज योजना सुरु करुन त्या योजनांचा लाभ जिल्हयातील सर्वांना घेता यावा यासाठी आपल्या कार्यकर्त्यांच्या सहाय्याने योजना सर्व सामान्यपर्यंत पोहचविण्यात महत्वपूर्ण योगदान दिल्यानेच जिल्हयाचा सर्वांगिण विकास साध्य होऊ शकला.[५]

### ६.२.१ महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेची सहकार चळवळ आणि अहमदनगर जिल्हयातील सहकार चळवळीच्या माध्यमातुन जिल्हयाच्या आर्थिक विकासातील भाऊसाहेब थोरात यांचे योगदान

महाराष्ट्रात सहकाराचा प्रचार, प्रसार करण्यासाठी बँकेच्या माध्यमातून सहकार उद्योग मंडळाची स्थापना करण्यात आली होती. सहकार उद्योग मंडळाच्या संचालक

मंडळात महाराष्ट्र राज्य बॅकेचे संचालक व विविध विषयामधील तत्वज्ञ, तंत्रज्ञ यांचा देखील समावेश करण्यात आला होता. भाऊसाहेब इ.स. १९६५ पासून सातत्याने ३३ वर्ष बॅंकेत अध्यक्ष उपाध्य, संचालक या पदावर असल्याने सहकार उद्योग मंडळात भाऊसाहेबांची भूमिकाही महत्वपूर्ण होती.

राज्यातील शेती उत्पादनावर आधारीत कोणकोणते उद्योग सहकाराच्या माध्यमातून उभे करता येतील याचे सर्वेक्षण करण्याचे अत्यंत महत्वाचे काम "सहकार उद्योग मंडळामार्फत हाती घेण्यात आले होते. त्यानुसार भुईमुगावर आधारित तेलगिरण्या, पेडीवर आधारित पशुखाद्य प्रकल्प, सहकारी भात गिरण्यांवर आधारित रिफांईड तेल व वनस्पती तुप उत्पादन प्रकल्प, त्याचपासुन साबण, रंग, वॉर्निश निर्मिती प्रकल्प, केळयांवर आधारीत केळी पावडर प्रकल्प, आंब्यावर आधारित रस प्रकल्प, विविध पदार्थ उत्पादन प्रकल्प, द्राक्षरस व बेदाणा प्रकल्प, ऊसावर आधारित साखर निर्मिती प्रकल्प, ऊसाच्या चोथ्यापासून कागद प्रकल्प, मळीपासून औद्योगिक मद्यार्क प्रकल्प कापसावर आधारीत सूतगिरण्या व वस्त्रोद्योग प्रकल्प आदी उद्योग उभारणीस अहमदनगर जिल्हयात गती आली होती. उद्योग उभारणीस महाराष्ट्राच्या सहकारी बॅंकेमार्फत मोठया प्रमाणात व जलद कर्जपुरवठा केला जात होता.[६]

याच संधीचा फायदा घेत अहमदनगर जिल्हयात विविध उद्योग उभारण्यासाठी जिल्हयातील कार्यकर्त्याची अहमदनगर येथे सभा घेऊन महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेच्या आधिकाऱ्यांना सहकारी चळवळी विषयीचे ध्येय धोरण समजावून दिले. भाऊसहेबांच्या या जनजागृतीमुळे जिल्हयातील कार्यकर्ते कामाला लागले. एखादया भागात जे पिक मोठया प्रमाणात घेतले जाते त्या पिकावर प्रक्रिया करणारे उद्योग उभारण्यासाठी योजना आखण्यात येऊ लागल्या.

त्यांचा अहवाल महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेला सादर केला जाऊ लागला. महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेत भाऊसाहेब सातत्याने विविध पदावर असल्याने जिल्हयातील उद्योगांना ते तत्काळ मान्यता मिळवुन देत असत. भाऊसाहेबांनी संगमनेर येथे सहकारी साखर कारखाना सुरु केला. त्याचप्रमाणे सहकारी राजहंस दूध संघ ही सुरु केला. तेल ऑईल मिल, असे उद्योग स्वतः भाऊसाहेबांनी लक्ष घालुन उभे केले. याशिवाय जिल्यातील प्रत्येक तालुक्यात फिरुन कार्यकर्त्यांना या संधीचा फायदा घेण्याचे आव्हान केले. राज्य सहकारी बॅंकेकडून शेतकऱ्यांना शेअर्स खरेदीसाठी ही आर्थिक साहय केले जात होते. तसेच संस्थांना भांडवल गुंतवणुकीसाठी कर्जपुरवठा व चालू व्यवहारासाठी कॅश क्रेडीट पुरवठा

करण्याचा महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेचा निर्णय अहमदनगर जिल्हयातील सहकार चळवळ वाढवण्यास भाऊसाहेबांच्या पथ्यावर पडला होता. महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेच्या या धोरणातून राज्यात जलद गतीने सहकार चळवळीची वाटचाल सुरु झाली. त्यास अहमदनगर जिल्हा कसा अपवाद असणार. अहमदनगर जिल्हयातील सहकाराचे दिपस्तंभ भाऊसाहेब थोरात यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेतील अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक या पदाचा उपयोग राज्यातील सहकार चळवळ वाढविण्यासाठी त्याचप्रमाणे अहमदनगर जिल्हयातील सहकार चळवळ विकसीत करण्यासाठी महत्वपूर्ण योगदान दिले होते. त्यामुळे संपूर्ण जिल्हाच सहकारमय झाला होता. सहकाराच्या माध्यमातून जिल्हयाच्या आर्थिक विकासासाठी भाऊसाहेब थोरात यांचे योगदान महत्वपूर्ण राहिले आहे.[७]

**६.२.२ भाऊसाहेब थोरात महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेचे अध्यक्ष असतांना बॅंकेत विकास कक्ष स्थापन करण्यातील योगदान :-**

भाऊसाहेब थोरात सहकाराच्या माध्यमातून जिल्हयाचा आर्थिक विकास करत असतांना ते इ.स. १९६० पासून जिल्हा बॅंकेत संचालक, अध्यक्ष, उपाध्यक्ष या पदावर ३३ वर्ष काम पाहत होते तेव्हापासूनच भाऊसाहेबांच्या मनात देशात शेती व ग्रामीण विकासाच्या दृष्टीने एक स्वतंत्र बॅंकिंग व्यवस्था असावी असे विचार येत होते. त्याचप्रमाणे राजकिय वर्तुळातही हा विषय अनेक वर्षापासून चर्चेत होता. भाऊसाहेबांच्या विचारातील या कल्पनेस मुर्त स्वरुप प्राप्त झाले होते. ते इंदिरा गांधी पंतप्रधान असतांना लोकसभेत एक कायदा मंजुर होऊन " राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बॅंक "नाबार्ड" ची निर्मिती झाली आणि नाबार्ड बॅंकेचे पहिले अध्यक्ष होण्याचा मान रामकृष्णय्या यांना मिळाला. तेव्हा भाऊसाहेब थोरात महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेचे अध्यक्ष होते. "नाबार्ड" बॅंकेच्या निर्मितीमुळे भाऊसाहेबांना आनंद झाला होता. कारण महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंक, अहमदनगर जिल्हा सहकारी बॅंक, ग्रामपातळीवर सहकारी सेवा संस्था यांच्या मध्यस्थीने शेती व्यवसायाच्या उन्नतीसाठी दीर्घमुदतीच्या कर्जाचे वितरण करता येणे शक्य होणार होते.

परंतु ही संकल्पना साकार होत असतांना राज्यातील शेती व्यवसायाशी संबधीत कामांना अधिक गतिमान करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेत व प्रत्येक जिल्हा सहकारी बॅंकेत एक स्वतंत्र विकास कक्ष स्थापनण्याची आणि त्यासाठी स्वतंत्र कर्मचारी वर्ग नेमण्याची कल्पना भाऊसाहेबांनी महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेस मूर्त स्वरुप देणारे डॉ.धनंजयराव गाडगीळ व डॉ. श्री. श्रीमाळ यांच्या पुढे मांडली. भाऊसाहेबांनी मांडलेल्या या

कल्पनेचा हेतू लक्षात घेऊन त्यांनी भाऊसाहेबांच्या बँकेत 'विकास कक्ष' स्थापनेच्या धोरणास होकार दिला आणि त्या चर्चेत ठरल्याप्रमाणे विकास कक्षातील तांत्रिक कामासाठी सिव्हिल इंजिनिअर्सची व स्वतंत्र जनरल मॅनेजरची नेमणूक करण्यात आली. त्यामुळे राज्य सहकारी बँक, जिल्हा सहकारी बँक, ग्रामीण पातळीवरील सहकारी सेवा संस्था यांच्या शेतीत सिंचनक्षेत्राची वाढ करणे, खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे ही कामे विकास कक्षांच्या माध्यमातून अत्यंत जलद गतीने होणे शक्य झाले होते. भाऊसाहेब थोरात महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे १९८० ते १९८४ या वर्षी अध्यक्ष असतांना महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेत विकास कक्ष स्थापन करुन विकास कक्षाच्या माध्यमातुन बँकेच्या कामाला गती दिली. याकामी भाऊसाहेबांनी सर्व जिल्हा सहकारी बँका ग्रामपातळीवरील सहकारी सेवा संस्थांकडून यासंदर्भात सुचना मागविल्या होत्या. जेणेकरुन राज्य सहकारी बँकेतील विकास कक्षाच्या माध्यमातून जलद गतीने काम करता येणे भाऊसाहेबांना शक्य होणार होते.

भाऊसाहेबांनी बँकेतील विकास कक्षाच्या माध्यमातून राज्यातील शेती व्यवसायाशी संबधीत अल्प मुदतीच्या व दिर्घ मुदतीच्या कर्ज योजनाद्वारे शेतकऱ्यांना आधुनिक पध्दतीने शेती करण्यासाठी साहय केले होते. भाऊसाहेब थोरात यांच्या या अभिनव उपक्रमामुळे महाराष्ट्रात कृषीक्रांती घडुन आली होती.[८]

यास अहमदनगर जिल्हा कसा अपवाद असणार होता. भाऊसाहेब ज्या जिल्हयाचे नेतृत्व करत होते. त्या अहमदनगर जिल्हयासाठी भाऊसाहेबांनी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेतील आपल्या अध्यक्ष पदाचा पुरेपूर उपयोग करुन घेत जिल्हयातील कार्यकर्त्यांमध्ये प्रथम जागृती करुन त्याच्याद्वारे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या विविध योजना अगदी खेडोपाडी नेऊन पोहोचविल्या होत्या. यातुन जिल्हयातील सिंचन सुविधा, जमीन सपाटीकरण, विविध शेती उपयोगी, यंत्रसामुग्री, शेतीपूरक धंदयासाठी आर्थिक साहय अशा विविध योजनामुळे जिल्हयातील शेतकऱ्यांच्या हाती बऱ्यापैकी पैसा खेळू लागला होता. भाऊसाहेबांनी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेतील अध्यक्ष पदाचा पुरेपुर उपयोग करुन घेत राज्यात कृषींक्रांती घडुन आणण्यासाठी केला. त्याचप्रमाणे अहमदनगर जिल्हयात कृषीक्रांती बरोबर आर्थिक क्रांती घडवुन आणण्यातील भाऊसाहेबांचे योगदान महत्वपूर्ण राहिले आहे.[९]

### ६.२.३ भाऊसाहेब थोरात महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष असतांना नाबार्डच्या दीर्घ मुदत कर्ज योजनेचा जिल्हयाच्या आर्थिक विकासासाठी केलेला उपयोग :-

इंदिरा गांधी पतंप्रधान असतांना "राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक" म्हणून "नाबार्ड" ची निर्मिती झाली. त्यावेळी भाऊसाहेब थोरात महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष होते. नाबार्ड बँकेकडून दीर्घ मुदत कर्ज योजना सुरु झाल्याने नव्याने सहकारी साखर कारखाने, सुतगिरण्या, ग्राहक भांडारे, ऑईलमिल सुरु होत होत्या. या उद्योगांना वेळेवर कर्जपुरवठा व कच्च्या मालाचा पुरवठा वेळेवर करण्यासाठी शेती विकासास गती देणे आवश्यक असल्याने भाऊसाहेबांनी राज्यातील जिल्हा सहकारी बँकांना भेटी देऊन शेतकऱ्यांना जलद गतीने कर्जपुरवठा करण्याविषयी मार्गदर्शन केले होते. भाऊसाहेबांनी शेती विकासासाठी सहकारी पाणीपुरवठा संस्थाकडून सिंचन क्षेत्राच्या वाढीसाठी छोटे मोठे प्रकल्प अन्य योजना भाऊसाहेब थोरात महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून नाबार्डकडे मंजुरीसाठी पाठवत असत. नाबार्ड बॅकेच्या मंजुरीनंतर एक महिन्यातच जिल्हा सहकारी बँक, ग्रामपातळीवरील सेवा सहकारी संस्थेमार्फत शेतकऱ्यांना कर्जपुरवठा होत असे. शेतकऱ्यांना शेतीचे यांत्रिकीकरण, फळबागा योजना व दुधविकासाच्या योजनांना जलद गतीने कर्ज पुरवठा होण्यास बँकेतील विकास कक्षाची भूमिका महत्वपूर्ण ठरत होती.

राज्यातील बहुतेक जिल्हयामधुन शेती यांत्रिकीकरण साधने, फळबागा, शेतीपूरक उद्योगाची जी प्रकरणे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे येत होती त्यात अहमदनगर जिल्हयाची प्रकरणे अधिक असत. भाऊसाहेब थोरात महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष असल्याने जिल्हयातील प्रकरणे जलद गतीने मंजूर करुन देत असत. नाबार्डच्या दीर्घ मुदत कर्ज योजनेतून भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हयातील साखर कारखाने, दुध उद्योग, सुतगिरण्या, ग्राहकभंडार, ऑईलमिल आदी उद्योगांना मोठया प्रमाणात दीर्घ मुदत कर्ज उपलब्ध करुन देण्यात भाऊसाहेबांनी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष पदाचा उपयोग केल्याने जिल्हयातील औद्योगिक विकासाबरोबरच कृषी विकासही घडवुन आणण्यात जे योगदान दिले त्यातुन अहमदनगर जिल्हयाचा आर्थिक विकास घडुन आला.[१०]

### ६.२.४ महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना ट्रॅक्टर पुरवठा करण्याच्या योजनेतील भाऊसाहेब थोरात यांचे योगदान :-

भाऊसाहेब थोरात महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे इ.स.१९८२ साली अध्यक्ष असतांना राज्यातील शेतकऱ्यांना ट्रॅक्टर पुरवठा करण्याची योजना मंजुर केली होती. भाऊसाहेबांच्या या योजनेनुसार राज्यातील मागेल त्या शेतकऱ्याला ट्रॅक्टरसाठी दिर्घ मुदत कर्ज योजनेअंतर्गत कर्जपुरवठा केला जाणार होता. या संधीचा फायदा घेत राज्यातील सर्व

जिल्हयातुन अनेक प्रकरणे महाराष्ट्र राज्य बॅकेकडे मंजूरीसाठी येऊ लागली. अहमदनगर जिल्हयातील प्रकरणे अधिक संख्येने होते. भाऊसाहेबांनी या योजनेची जिल्हयातील खेडोपाडी प्रचार मोहिम राबवुन जागृती केल्यामुळे जिल्हयातून मोठया संख्येने प्रकरणे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे येऊ लागली होती. भाऊसाहेब थोरात महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष असल्याने प्रकरणे जलद मंजुर करत. भाऊसाहेब थोरात यांनी जिल्हयातील शेतकऱ्यांना राज्य सहकारी बँकेमार्फत ट्रॅक्टर उपलब्ध करुन दिल्याने शेतकऱ्यांना वेळेवर शेतीची मशागत करणे शक्य होऊ लागले. शेती सपाटीकरण होऊ लागल्याने शेतीक्षेत्रात वाढ घडुन आली. शेतकरी रोख पैसा मिळवुन देणाऱ्या पिकाकडे वळू लागला. ऊस क्षेत्रात लक्षणीय वाढ घडुन आली. जिल्हयातील कारखान्यात मुबलक ऊस उपलब्ध होऊ लागला. भाऊसाहेबांनी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या अध्यक्ष पदाचा उपयोग जिल्हयातील शेतकऱ्यांना जास्तीत जास्त साहाय करण्यासाठी केल्याने जिल्हयात आर्थिक संपन्नता आली.[११]

### ६.२.५ नाबार्ड बँक आयोजित दिल्ली परिषदेतील भाऊसाहेब थोरात यांची भूमिका :-

नाबार्ड बँकेने दिल्ली येथे सर्व राज्य सहकारी बँकाच्या प्रतिनिधीची परिषद रामकृष्णय्या यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली होती. परिषदेत सर्व राज्यातील प्रतिनिधींनी चर्चेत सहभागी होऊन बँकेच्या ध्येयेधोरणावर आपआपले विचार मांडले. चर्चेत सहकारी संस्थाकडील थकबाकीचा मुद्दा उपस्थित झाला असता. अनेक प्रतिनिधींनी आपले विचार मांडले, अनेक प्रतिनिधींचे विचार ऐकल्यानंतर भाऊसाहेब थोरात यांनी आपली भूमिका परखडपणे मांडतांना म्हटले "थकबाकीवाढ व अनिष्ट तफावतीस सहकारी सेवा संस्था जबाबदार नसुन राज्य सहकारी बँका व जिल्हा सहकारी बँका यांची व्याज आकारणीची व वसुलीची पध्दत जबाबदार असल्याचे म्हटले. व्याजावर व्याज आकारणी तसेच मुद्दलापेक्षा जास्त व्याज घेऊ नये असा कायदा असूनही प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नसल्यानेच थकबाकी वाढत असून परिषदेत देण्यात आलेली आकडेवारी पूर्णतया खोटी असल्याचे म्हटले होते. भाऊसाहेबांचे हे विचार महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या विरोधी आहे. असे सर्वांना वाटु लागले. शेवटी सर्व राज्य सहकारी बँकेच्या प्रतिनिंधींना भाऊसाहेबांच्या या मुद्दयावर विचार करणे भाग पडले होते. भाऊसाहेबांच्या या विचारातुनच सर्व राज्यातील थकबाकीदार सहकारी सेवा संस्थापमाणेच महाराष्ट्र राज्यातील

त्याचप्रमाणे अहमदनगर जिल्हयातील थकबाकीदार सहकारी सेवा संस्थांना दिलासा मिळाल्याने जिल्हयाचा आर्थिक विकास घडून येण्यास साहय्य झाले होते.[१२]

**६.२.६ भाऊसाहेब थोरात महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष असतांना बँकेच्या माध्यमातून मच्छिमार परिषद आयोजनातील योगदान :-**

भाऊसाहेब थोरात महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे इ.स. १९८२ साली अध्यक्ष असतांना महाराष्ट्रातील मच्छिमार सहकारी संस्था मोडकळीस आल्या होत्या. त्या संस्थांना उर्जीत अवस्थेत आणण्यासाठी व मच्छिमार लोकांच्या रोजीरोटीचा प्रश्न सोडविण्यासाठी भाऊसाहेबांनी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातून मच्छिमारांची राज्यव्यापी परिषद घेण्याचे निश्चित केले होते. महाराष्ट्रातील सर्व जिल्हयातील मच्छिमार सहकारी संस्था, व्यावसायिक अशा सर्वांना परिषदेची कल्पना दिल्याने मुंबई येथे आयोजित या परिषदेस मोठया प्रमाणात मच्छिमार सहकारी संस्थांचे प्रतिनिधी त्याचप्रमाणे मच्छिमार व्यावसायिक व स्त्रिया देखील मोठया संख्येने उपस्थित होत्या.

भाऊसाहेबांनी मच्छिमार व्यावसाया संदर्भात बँकेचा दृष्टीकोन स्पष्ट करत बँकेकडे मोठया प्रमाणात जमा असलेल्या फिशरी फंडाची माहिती दिली. बँकेची मच्छिमार व्यावसायिकांसाठी मोठी आर्थिक तरतूद असून त्या निधीचा जास्तीत जास्त व्यावसायिकांनी फायदा घ्यावा असे आवाहन केले. या परिषदेनंतर राज्य सहकारी बॅकेकडे राज्यातील विविध जिल्हयातून मोठया प्रमाणात प्रकरणे येऊ लागली. त्यात अहमदनगर जिल्हयातील प्रकरणे मोठया संख्येने होती. अहमदनगर जिल्हयातील मुळा धरण, भंडारदरा धरण, प्रवरा नदी, मुळा नदी तसेच अनेक छोटे मोठे तलाब,बंधारे अशा ठिकाणी मच्छिमारी करणारे अनेक व्यावसायिक होते. परंतु त्यांना योग्य प्रकारे बोटी तसेच इतर साहित्य उपलब्ध नसल्याने ते हालाखीचे जीवन जगत होते. भाऊसाहेबांनी आयोजित केलेल्या मच्छिमार परिषदेनंतर जिल्हयातील मच्छिमारी करणारा व्यावसायिक वर्ग जागा झाला. आणि मोठया संख्येने महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे प्रकरणे पाठवू लागले. भाऊसाहेब थोरात महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष असल्याने जिल्यातील मच्छिमार व्यावसायिकांची प्रकरणे जलद मंजूर होत होती. थोडयाच कालावधीत मच्छिमार व्यावसायातून जिल्हयाचा आर्थिक विकास होण्यास साहय झाले.[१३]

**६.२.७ महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष असतांना बँकेच्या माध्यमातून शेती विकासासाठी आयोजित राज्यव्यापी परिषदेतीतील भाऊसाहेबांची भूमिका :-**

भाऊसाहेब थोरात महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष असतांना राज्यातील कृषी विकासावर आधारीत राज्य व्यापी परिषदेचे आयोजन केले होत. परिषदेचे अध्यक्ष मुख्यमंत्री वसंतराव दादा पाटील होते. भाऊसाहेबांनी प्रास्ताविकपर भाषणात महाराष्ट्र राज्य सहकारी बॅकेची ध्येयधोरणे, शेती व्यवसायासंबधी धोरण, विविध योजनांतून दिला जाणारा निधी यांची सविस्तर माहिती दिली. दिर्घ मुदत, अल्प मुदत कर्ज योजनांची माहिती देऊन अधिकाधिक शेतकऱ्यांनी बँकेतील योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर अनेक तज्ञांची भाषणे झाली. शेवटी मुख्यमंत्र्यांनी देखील बँकेतील योजनांचा लाभ घेण्याचे शेतकऱ्यांना आवाहन केले होते.[१४] भाऊसाहेबांनी आयोजित केलेल्या या राज्यव्यापी परिषदेनंतर राज्यातील शेतकऱ्यांमध्ये मोठया प्रमाणात जागृती होऊन बँकेकडे मोठया प्रमाणात प्रकरणे येऊ लागली. भाऊसाहेबांनी जिल्हयातील शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात कर्जपुरवठा करण्यासाठी आपल्या पदाचा उपयोग केल्याने जिल्हयाच्या दरडोई उत्पन्नात मोठया प्रमाणात वाढ घडून आली. दुष्काळी जिल्हा म्हणून ओळख असतांनाही जिल्हयात मोठया प्रमाणात शेती क्षेत्राचा विकास घडून येण्यास भाऊसाहेब थोरात यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेतील अध्यक्ष पदाचा उपयोग जिल्हयातील शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी केल्याने अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासास चालना मिळाली.

### ६.२.८ भाऊसाहेब थोरात महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे १९८२ साली अध्यक्ष असतांना अहमदनगर जिल्हयातील कर्जदार शेतकरी

१) करंजकर मोहनराव चंद्रभान,सायखिंडी

२) चकोर पाराजी धोंडीबा, खळी

३) कुटे लक्ष्मण बाबाजी, संगमनेर

४) ढोले विष्णू नारायण, पळसखेडे

५) रुपवते गंगाधर वामनराव, घुलेवाडी

६) गोपाळे प्रकाश रामकृष्ण, निमगांव खुर्द

७) आहेर सुभाष मल्हारी, घारगांव

८) जोंधळे साहेबराव रावजी, कोकणगांव

९) सिनारे सुर्यभान नामदेव, चिखली

१०) डोंगरे संपतराव विष्णू, निमज

अहमदनगर जिल्हयातील आदी शेतकऱ्यांना भाऊसाहेबांनी दिर्घ मुदतीचे कर्जे उपलब्ध करुन दिली होती.[१५]

## ६.३ भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातुन अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान :-

भारत हा खेडयांचा देश आहे. कृषी व्यवस्था हा अर्थव्यवस्थेचा कणा आहे. परंतु सातत्याने वाढणाऱ्या लोकसंख्येच्या प्रमाणात औद्योगिक विकास घडुन आला नाही. त्यात लोकसंख्या वाढीमुळे शेतीचे विभाजन होऊ लागले. तसेच सातत्याने पडणारे दुष्काळ या परिस्थितीतीचा फायदा काही खाजगी सावकार घेत असत. शेतकरी व सर्वसामान्यांना कर्ज पुरवठा करत असत. त्या बदल्यात आपणास हवा त्या प्रमाणात व्याजाचा दर आकारत असत. यावर मात करण्यासाठी स्वतंत्र्यपुर्व काळात ब्रिटिश सरकारने ही प्रयत्न केले. प्रारंभी केलेले कायदे निरुपयोगी ठरले असता सहकारच भारतीय शेती व उद्योग विकासासाठी महत्वपूर्ण ठरु शकते हे लक्षात घेऊन ब्रिटीश सरकारने १९०४ साली पहिला सहकारी कायदा पास केला. या कायदयामुळे भारतात सहकारी चळवळीस प्रारंभ झाला.

सहकार म्हणजे ज्या प्रकारच्या उद्योग व्यवस्थापनात सर्वांचा सहभाग असतो व सामुदायिक जबाबदारीच्या तत्वावर व्यवहार केला जातो त्या संस्थेला सहकारी संस्था म्हणतात. तर सहकाराच्या तत्वावर चालविल्या जाणाऱ्या बँकांना सहकारी बँक म्हणतात. वैकुंठभाई मेहता यांचे मते "सहकार ही एक अशी व्यापक चळवळ असुन जिच्यात समान आर्थिक उद्दिष्टाच्या पुर्ततेसाठी व्यक्ती स्वइच्छेने संघटीत झालेले असतात", तर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म्हणजे "एका विशिष्ट भौगोलिक क्षेत्रातील सर्वसाधारणपणे एका जिल्हयातील प्राथमिक सहकारी संस्था एका मध्यवर्ती संस्थेत संयुक्तपणे संघटीत झालेल्या असतात अशा मध्यवर्ती संस्थेला सहकारी बँक किंवा व्यवसाय संघ म्हणून संबोधले जाते. जेव्हा या संयुक्त संघटनेचे सदस्यत्व केवळ प्राथमिक सहकारी संस्थापुरते मर्यादीत असते तेव्हा त्यांना बँक व्यवसाय संघ म्हणतात. आणि या संस्थाबरोबरच इतर व्यक्तींनाही सदस्यत्व दिले जाते तेव्हा अशा संघटीत संस्थेला मध्यवर्ती सहकारी बँक असे म्हणतात. थोडक्यात जी बँक जिल्हयातील सर्व सहकारी संस्थांना कर्जपुरवठा करते आणि प्राथमिक सहकारी संस्था आणि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक यांच्यात समन्वय साधण्याचे कार्य करते अशा बँकेला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक असे म्हणतात. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे

कार्यक्षेत्र जिल्हयापुरते मर्यादीत असुन बँकांच्या उपशाखांची संख्या २०० च्या वर असावी अशी अपेक्षा असते.

सन १९०४ च्या सहकार कायद्यानुसार सहकारी संस्थांच्या माध्यमातून भारताचा आर्थिक विकास साध्य करण्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची भुमिका महत्वपूर्ण ठरली आहे. या सहकार कायद्यानुसार सन १९०६ साली भारतात प्राथमिक स्वरुपाची पहिली सहकारी बँक झाली, तर इ.स.१९१० साली पहिली मध्यवर्ती सहकारी बँक अजमेर येथे सुरु झाली. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे भारताच्या आर्थिक विकासातील महत्व लक्षात घेता थोडयाच काळात भारतात सहकार चळवळ विकसित पावली. त्यास अहमदनगर जिल्हा कसा अपवाद असणार अहमदनगर जिल्हा महाराष्ट्रातील विस्ताराने सर्वांत मोठा जिल्हा आहे. हा जिल्हा दुष्काळी जिल्हा म्हणून ओळखला जातो. सातत्याने पडणारे दुष्काळ आणि त्यातुन सावकारशाहीचे वाढते वर्चस्व रोखुन जिल्हयाचा आर्थिक विकास साध्य करण्यासाठी जिल्हयातील मोतीलाल फिरोदिया, डॉ.श्री.वि.निसाळ, ल.ब.पाटील, वि.दा.मुसमाडे, ज.वा. बनकर, म.ग.शेळके, ह.क.काळे, पी.जे.आंबरे, मारुतराव घुले, भाऊसाहेब थोरात यांच्या एकत्रीत धोरणातुन अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को.ऑप.बॅके लि. अहमदनगर या नावाने नोंदणी २२१९१० या क्रमांकाने ३ ऑक्टोबर १९५७ ला बँकेचे रजिस्ट्रेशन झाले. आणि प्रत्यक्ष कामकाज २१ मार्च १९५८ रोजी सुरु झाले. बँकेच्या शासन नियुक्त मंडळाच्या नेमणूकीत मोतीलाल फिरोदिया अध्यक्ष तर का.भि.रोहमारे यांची उपाध्यक्ष पदी नेमणूक झाली. ते २१ मार्च १९५८ पासुन १९६३ पर्यंत त्यांनी बँकेचे काम पाहिले, बँकेच्या माध्यमातुन जिल्हयाचा आर्थिक विकास साध्य करण्यात त्यांनी महत्वपूर्ण योगदान दिले. त्याचप्रमाणे पुढे १९६५ साली भाऊसाहेब थोरात यांची बँकेच्या अध्यक्षपदी निवड झाली. तेव्हापासुन ते बँकेत अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक अशा विविध पदांवर १९९९ पर्यंत होते. त्यात ते १९६५, १९६६, १९६७, १९६८, १९७३, १९७४, १९७५, १९७६, १९७७, १९९५, १९९६, १९९७, १९९८, १९९९ अशी १४ वर्षे ते बँकेचे अध्यक्ष होते. या शिवाय उपाध्यक्ष, संचालक असे जवळपास ३८ वर्षाच्या बँकेतील आपल्या पदाचा उपयोग भाऊसाहेब थोरात यांनी जिल्हयातील कृषी क्रांती, औद्योगिक क्रांती, कामगार वर्गावरील अन्याय, यासाठी पुरेपुर उपयोग केल्यानेच जिल्हयाचा आर्थिक विकास होऊ शकला. भाऊसाहेबांच्या या दुरदृष्टी धोरणातुन जिल्हयातील प्राथमिक सहकारी संस्था बरोबर योग्य प्रकारे सांगड घातली होती. त्यामुळे खऱ्या अर्थाने कृषीक्रांती ही घडून आली.

भाऊसाहेब थोरात यांनी जिल्हयाचा आर्थिक विकास साध्य करत असतांना बँकेत राबविलेले विविध उपक्रम पुढीलप्रमाण होते.

### ६.३.१ अहमदनगर जिल्हा सहकरी बँकेची स्थापना, कार्यक्षेत्र व भाऊसाहेब थोरात यांच्या अध्यक्षीय काळातील शाखा विस्तार :-

स्थापना : मुंबई राज्य हे विशाल द्विभाषिक राज्य झाल्यावर सर्व अपेक्स बँकांची मुंबई राज्यांचे त्यावेळचे अर्थमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. त्या सभेत मुंबई राज्याला एकच राज्य सहकारी बँक असावी व प्रत्येक जिल्हयाकरीता एक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक असावी असा निर्णय झाला. या निर्णयानुसार मुंबई राज्य सहकारी बँकेच्या शाखांमार्फत सहकारी संस्थांना कर्ज पुरवठा करण्याचे काम केले जाते तेथे त्या जिल्हयाकरीता स्वतंत्र जिल्हा सहकारी बँक स्थापन करण्याचे धोरण राज्य सहकारी बँकेच्या संचालक मंडळाने घेतले.

राज्य सहकारी बँकेच्या संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयाचे अहमदनगर जिल्हयातील जाणकार नेत्यांनी स्वागत केले. अहमदनगर जिल्हा महाराष्ट्रात विस्ताराने मोठा असुन सातत्याने पडणाऱ्या दुष्काळामुळे जिल्हयात सावकारशाही प्रबळ झाली आहे. या दुहेरी संकटातून जिल्हयातील जनतेला वाचविण्यासाठी विठ्ठलराव विखे पाटील, मोतीलाल कुंदनमल फिरोदिया, कारभारी भिकाजी रोहमारे, राम नारायण, जगन्नाथराव वामनराव पाटील, रामघन खटोड, सखाराम श्रीपतराव पाटील, डॉ.श्रीकृष्ण विश्वनाथ निसळ, भाऊसाहेब नारायण देशमुख, भाऊसाहेब संतुजी थोरात, काशिनाथ नारायण पाटील, साहेबराव यादवराव पाटील, मारुतीराव शंकरराव पाटील, पंढरीनाथ जिजाबा अंबरे, बाजीराव गंगाराम पाटील, वाय.बी. गायतोंडे, म.ग. शेळके, ह.क. काळे, मारुतराव घुले यांच्या प्रयत्नाने तसेच मुंबई राज्य सरकारने व महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने घेतलेल्या निर्णयाचे मुर्त स्वरुप म्हणजे दि.०३/१०/१९५७ रोजी विजयादशमीचे शुभ मुहूर्तावर २२१९१० या नोंदणी क्रमांकाने रजिस्टर झालेली अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑप.बँक लि. अहमदनगर ही होय.

**बँकेचे उद्दिष्टये :-**

१) स्थानिक भांडवल व ठेवी उभारुन बँकेचा आर्थिक पाया मजबुत करणे.

२) सहकारी संस्थाची वाढ करुन त्यांच्या व्यवहारास बळकटी आणणे.

३) सहकारी संस्थांची व कार्यकर्त्यांची संघटना घडवुन आणणे.

४) स्थानिक कार्यकर्त्यांना मोठमोठया जबाबदार संस्था चालविण्याचे शिक्षण देणे.

५) जिल्हयाच्या स्थानिक अडचणी समजावुन घेऊन त्या दुर करण्याच्या दृष्टीने आर्थिक प्रश्न सोडविण्यास सहाय्य करणे.

६) जिल्हयातील सहकारी चळवळ स्वावलंबी व मजबुत करण्यास मदत करणे.

७) सरकारने आखलेल्या पंचवार्षिक योजना यशस्वी करण्यास मदत करणे.

जिल्हा बँकेचे हे उद्दिष्ट निर्धारीत करण्यात आले होते. वरिल सर्व उद्देश पुर्तीस अधिन राहुन अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या संचालक मंडळाची निवड मुंबई राज्य सरकारच्या ठरलेल्या धोरणानुसार मे.रजिस्ट्रार साहेब को-ऑप.सोसायटीज मुंबई राज्य, पुणे यांनी मुंबई राज्य सहकारी बँकेच्या सल्ल्याने दि.०४/०२/१९५८ रोजी बँकेच्या संचालक मंडळाची नेमणूक पहिल्या तीन वर्षाकरीता करण्यात आली. अहमदनगर जिल्हयाचे असिस्टंट रजिस्ट्रार व मुंबई राज्य सहकारी बँकेचे मॅनेजर हे ही संचालक मंडळावर पदसिध्द सभासद होते. संचालक मंडळाने पोटनियमानुसार नेमणूका झालेल्या सभासदांपैकी ७ सभासदांची एक एक्झिक्युटिव्ह कमिटी नेमली. आणि या कमिटीने बँकेच्या कामकाजास २१ मार्च १९५८ रोजी सुरुवात केली. बँकेचे पहिले शासन नियुक्त अध्यक्ष होण्याचा पहिला मान मोतिलाल कुंदनमल फिरोदिया तर उपाध्यक्ष होण्याचा मान कारभारी भिकाजी रोहमारे यांची नेमणुक झाली. नेमणूक झालेल्या अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक मंडळाने पोटनियमानुसार यातील ७ सभासदांची एक एक्झिक्युटिव्ह कमिटी नेमली. आणि या कमिटीने बँकेच्या कामकाजास सुरुवात केली. अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे कार्यक्षेत्र अहमदनगर जिल्हयापुरते मर्यादीत असुन भाऊसाहेब थोरात सन १९६५ ते १९६९, १९७३ ते १९७७, १९९५ ते १९९९ या वर्षी जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष असताना बँकेच्या कार्यक्षेत्रात अहमदनगर, कोपरगांव, श्रीरामपूर,नेवासा,पाथर्डी, पारनेर, श्रीगोंदा, संगमनेर, अकोले, राहुरी, कर्जत, जामखेड, शेवगांव या १३ तालुक्यांचा समावेश होता. या १३ तालुक्यातील सहकारी संस्थापैकी १९६५, १९६६ या वर्षी जिल्हयातील ११२६ शेतकी सहकारी सोसायटया, ३ खरेदी - विक्री संघ, २ सहकारी साखर कारखाने याशिवाय जिनिंग प्रेसिंग सोसायटया, पगारदार नोकरांच्या सोसायटया, दूध सोसायटया, विणकर सोसायटया, औद्योगिक सोसायटया या सहकारी संस्थांना बँकेच्या माध्यमातून कर्ज पुरवठा केला जात होता. भाऊसाहेबांच्या दुरदृष्टीमुळे प्राथमिक व बिगरशेती सहकारी संस्थांची संख्या वाढण्यास चालना मिळाली. जिल्हा बँकेची सभासद संख्या वाढविण्यास भाऊसाहेब थोरात

यांचे योगदान महत्वपूर्ण ठरले. भाऊसाहेब थोरात यांच्या इ.स.१९९९ या अध्यक्षीय वर्षी जिल्हयात सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांची संख्या ७८४३ होती. या पैकी अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या ४७७९ संस्था सभासद होत्या. त्यात १२२१ प्राथमिक शेती सहकारी संस्था, तर ४१९ बिगर सहकारी संस्था अशा एकुण १६४० सहकारी संस्थांना बँक १९९९ साली कर्ज पुरवठा करत होती. भाऊसाहेब थोरात यांच्या सहकारातील चाणाक्ष धोरणामुळे जिल्हा बँकेच्या सहकारी संस्थांची सभासद संख्या मोठया प्रमाणात वाढली होती.[१६]

बँकेच्या शाखा विस्ताराचा तुलनात्मक अभ्यास करता असे दिसुन येते की, बँकेच्या स्थापनेवेळी इ.स.१९५८ साली बँकेचा शाखा विस्तार, अहमदनगर, कोपरगांव, नेवासा, शेवगांव, पाथर्डी, कोळपेवाडी, या ६ शाखांमध्ये झाला होती. तर भाऊसाहेब थोरात यांची अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी १९६५ ते १९६९, १९७३ ते १९७७, १९९५ ते १९९९ यावर्षी अध्यक्ष असताना त्यांच्या कार्यकाळात झालेला शाखा विस्तार पुढील प्रमाणे होता. सन १९६५ ते १९९९ या काळात भाऊसाहेब अध्यक्ष असताना जिल्हा बँकेचा केलेला शाखाविस्तार.

**तक्ता क्रं.११**

| अ.नं. | अध्यक्षीय वर्ष | शाखा संख्या | नवीन शाखा |
|---|---|---|---|
| १) | १९६५-१९६६ | ३७ - ४१ | ४ |
| २) | १९६६ - १९६७ | ४१ - ४५ | ४ |
| ३) | १९६७-१९६८ | ४५ - ५० | ५ |
| ४) | १९६८-१९६९ | ५० - ५५ | ५ |
| ५) | १९७३-१९७४ | ७३ - ७६ | ३ |
| ६) | १९७४-१९७५ | ७६ - ८२ | ६ |
| ७) | १९७५-१९७६ | ८२ - ९३ | ११ |
| ८) | १९७६-१९७७ | ९३ - १०१ | ०८ |
| ९) | १९९५-१९९६ | २८१ - २८९ | ०८ |
| १०) | १९९६-१९९७ | २८९ - २८९ | -- |
| ११) | १९९७-१९९८ | २८९ - २८९ | -- |
| १२) | १९९८-१९९९ | २८९ - २८९ | -- |
| | | **एकुण शाखा** | **५४** |

वरील तक्त्यांचा तुलनात्मक अभ्यास केल्यास असे दिसुन येते की, भाऊसाहेब थोरात यांनी आपल्या १४ वर्षाच्या अध्यक्षीय काळात ५४ नव्या शाखा सुरु केल्या. या नवीन शाखा सुरु करुन जिल्हयातील सर्व सामान्य जनतेला बँकेच्या सुविधांचा उपभोग घेण्यास सहाय्य केले.[१७]

बँकेची शाखा विस्ताराची सद्य स्थिती पाहिल्यास सन २०१६-१७ या वर्षी बँकेचा शाखा विस्तार २८६ शाखा व १० विस्तार कक्ष अशी २९६ शाखा सध्या जिल्हा वासियांच्या सेवेस तत्पर आहे.

**भाऊसाहेब थोरात यांच्या अध्यक्ष पदाच्या सन १९९८-९९ या शेवटच्या वर्षाचा जिल्हा बँकेचा शाखा विस्तार :-**

**तक्ता क्रं.१२**

| **अ.नं.** | **तालुका** | **शाखा संख्या सन १९९८-९९** | **अ.नं.** | **तालुका** | **शाखा संख्या सन २०१६-१७** |
|---|---|---|---|---|---|
| १) | अहमदनगर | ३२ | १) | अहमदनगर | ३२ |
| २) | कोपरगांव | ३० | २) | कोपरगांव | २० |
| ३) | श्रीरामपूर | २३ | ३) | श्रीरामपूर | १५ |
| ४) | संगमनेर | ३८ | ४) | संगमनेर | ३९ |
| ५) | नेवासा | २४ | ५) | नेवासा | २५ |
| ६) | अकोला | २० | ६) | अकोला | १९ |
| ७) | राहुरी | २६ | ७) | राहुरी | २६ |
| ८) | पारनेर | २५ | ८) | पारनेर | २४ |
| ९) | श्रीगोंदा | १८ | ९) | श्रीगोंदा | १९ |
| १०) | शेवगांव | १७ | १०) | शेवगांव | १७ |
| ११) | जामखेड | ७ | ११) | जामखेड | ८ |
| १२) | पाथर्डी | १५ | १२) | पाथर्डी | १४ |
| १३) | कर्जत | १४ | १३) | कर्जत | १३ |
| | | | १४) | राहाता | १७ |
| | **एकुण शाखा** | **२८९** | | **एकुण शाखा** | **२८६** |
| | **विस्तार कक्ष** | **०६** | | **विस्तार कक्ष** | **१०** |
| | **एकुण शाखा** | **२९५** | | **एकुण खाखा** | **२९६** |

भाऊसाहेब थोरात यांच्या १९९८-१९९९ या अध्यक्षीय वर्षी बँकेचा शाखा विस्तार २८९ अधिक ६ विस्तार कक्ष अशी २९५ होती.[१८] तर सध्या २०१६-१७ या वर्षी बँकांचा शाखा विस्तार २९६ अधिक १० विस्तार कक्ष अशी २९६ आहे.

वरील आकडेवारीचा विचार केल्यास भाऊसाहेब थोरात यांच्या अध्यक्षीय काळात १९९८-१९९९ ची असणारी शाखांची संख्या २९८ होती. तर २०१६-१७ ची शाखांची संख्या २९६ व १० विस्तार कक्ष अशी २९६ आहे. वरील आकडेवारीचा विचार केल्यास असे दिसुन येते की, सन २०१६-१७ साली बँकेच्या उपशाखांची संख्या कमी झाल्याचे दिसुन येते.[१९]

### ६.३.२ अहमदनगर जिल्हयातील प्राथमिक शेती सहकारी संस्था व बिगरशेती सहकारी संस्थांना कर्ज पुरवठा व त्यात भाऊसाहेबांचे योगदान :-

भाऊसाहेब थोरात यांना सहकारातील राजहंस असे म्हटले जाते. कारण १९५२ साली सहकाराचे व्रत स्विकारल्यानंतर अहमदनगर जिल्हयातील सहकार वाढविण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यातच ते १९६५ ते १९६९, १९७३ ते १९७७, १९९५ ते १९९९ अशी १४ वर्षे अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष होते. भाऊसाहेबांनी जिल्हयातील दुष्काळी परिस्थिती व सावकारशाहीच्या पाशातून शेतकरी व सर्वसामान्य जनतेला वाचविण्यासाठी सहकाराचे महत्व जाणणाऱ्या भाऊसाहेबांनी बँकेतील आपल्या अध्यक्षपदाचा उपयोग करत जिल्हयातील प्राथमिक शेती सहकारी संस्था व बिगरशेती सहकारी संस्थांना कर्ज पुरवठा करण्याच्या दृष्टीने अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतल्यानेच जिल्हयातील सहकारी संस्थांचा विकास झाला व जनतेलाही या संस्थांच्या माध्यमातून कर्ज उपलब्ध झाल्याने ते शेतीव इतर उद्योग यशस्वी करु शकले.

प्राथमिक शेती सहकारी संस्था म्हणजेच जिल्हयातील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटया तर बिगरशेती सहकारी संस्थे अंतर्गत जिल्हयातील खरेदी विक्री संघ, सहकारी साखर कारखाने, प्रक्रिया व उत्पादन करणाऱ्या सोसायटया, कारागीरी सोसायटया, दूध संघ, जिनिंग, प्रेसिंग सोसायटया, पगारदार नोकरांच्या सोसायटया, औद्योगिक सोसायटया, नागरी सोसायटया आदिंचा बिगरशेती सहकारी संस्थेत समावेश होतो.

भाऊसाहेब थोरात यांच्या अध्यक्षीय काळात प्राथमिक शेती सहकारी संस्था व बिगरशेती सहकारी संस्थांना भाऊसाहेबांच्या अध्यक्षीय काळात कर्ज पुरवठा केलेल्या संस्थांची संख्या पुढील प्रमाणे होती.

**भाऊसाहेबांच्या थोरात यांच्या अध्यक्षीय काळात जिल्हा बँकेच्या प्राथमिक सहकारी संस्था व बिगरशेती सहकारी संस्थांची संख्या**

**तक्ता कं.१३**

| अ.नं. | अध्यक्षीय वर्ष | बँकेच्या कर्जदार प्राथमिक शेती सहकारी संस्था | बँकेच्या कर्जदार बिगरशेती सहकारी संस्था | बँकेच्या कर्जदार एकुण सहकारी संस्थांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १) | १९६५-६६ | ११२६ | ५० | ११७६ |
| २) | १९६६-६७ | १०६४ | १२३ | ११८७ |
| ३) | १९६७-६८ | १०७१ | १२६ | ११९७ |
| ४) | १९६८-६९ | १०७३ | १२६ | ११९९ |
| ५) | १९७३-७४ | १०९० | १२१ | १२११ |
| ६) | १९७४-७५ | १०८६ | ९० | ११७६ |
| ७) | १९७५-७६ | १०८९ | ७९ | ११६८ |
| ८) | १९७६-७७ | १०८९ | ८२ | ११७१ |
| ९) | १९९५-९६ | १२०० | ४६० | १६६० |
| १०) | १९९६-९७ | १२१३ | ४६० | १६७३ |
| ११) | १९९७-९८ | १२१५ | ४२९ | १६४४ |
| १२) | १९९८-९९ | १२२१ | ४१९ | १६४० |

**२०१६-१७ या वर्षी जिल्हा बँकेचे कर्जदार, जिल्हयातील प्राथमिक सहकारी व बिगरशेती सहकारी संस्थांची संख्या**

**तक्ता क्रं.१४**

| अ.नं. | सन | प्राथमिक संस्था | बिगरशेती | एकुण सहकारी संस्था |
|---|---|---|---|---|
| १) | २०१६-१७ | १३९४ | १२२ | १५१६ |

वरील तक्त्यावरुन असे दिसुन येते की, भाऊसाहेब थोरात बँकेचे अध्यक्ष असताना प्राथमिक शेती सहकारी संस्थांची संख्या सातत्याने वाढत गेली आहे. ती सन १९९८-९९ पर्यंत १२२१ अशी होती. त्यात बिगरशेती संस्थांची संख्या १९७५, १९७६, १९७७ हे तीन वर्ष वगळता सातत्याने वाढत गेल्याचे दिसुन येते.[२०]

तक्ता क्रं.२ चा विचार केल्यास प्राथमिक शेती सहकारी संस्थांची संख्या वाढल्याचे दिसुन येते. तर बिगरशेती सहकारी संस्थांची संख्या कमी झाल्याचे दिसुन येते. तसेच काळपरत्वे सहकारी संस्थांची संख्या वाढणे अपेक्षित होते. परंतु जिल्हा बँकेच्या एकुण सहकारी सभासद संस्थांची संख्या कमी झाल्याचे दिसुन येते. भाऊसाहेब थोरात बँकेचे अध्यक्ष असताना त्यांनी प्राथमिक सहकारी संस्थांना कर्ज पुरवठा करण्याचे जे धोरण अवलंबवले होते त्याच प्रमाणे बिगरशेती सहकारी संस्थांनाही कर्ज पुरवठा करण्याचे धोरण राबविले. बिगरशेती सहकारी संस्था ही प्राथमिक सहकारी संस्था इतक्याच महत्वाच्या आहेत हे भाऊसाहेब जाणुन होते. इ.स.१९६५ साली ते बँकेचे अध्यक्ष झाले असता बिगर शेती सहकारी संस्थांची सख्या ५० होती. ती सन १९९९ या त्यांच्या अध्यक्षीय १४ व्या वर्षी ४६० पर्यंत गेल्याचे दिसुन येते. तर तक्ता क्रं. २ चा विचार केल्यास बिगरशेती व इतर संस्थांची संख्या कमी झाल्याचे दिसुन येते. तसेच प्राथमिक सहकारी संस्थांची संख्या भाऊसाहेबांच्या अध्यक्षीय काळात १६४० पर्यंत गेलेली होती. ही १९९९ ची आकडेवारी असुन सद्यस्थितीला १९१६-१७ या वर्षीची प्राथमिक शेती सहकारी संस्थेची एकुण आकडेवारी १५१६ आहे.  म्हणजेच प्राथमिक व बिगरशेती सहकारी संस्थेच्या एकुण आकडेवारीचा विचार केल्यास वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, भाऊसाहेबांच्या काळात असणारी संख्या काळपरत्वे वाढणे आवश्यक असतांना ती उलट कमी झाल्याचे दिसून येते.[२१]

**६.३.३ भाऊसाहेब थोरात अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष असताना बँकेच्या माध्यमातुन जिल्हयातील सहकारी साखर कारखान्यांना कर्ज पुरवठा करण्यातील योगदान :-**

डॉ.धनंजयराव गाडगीळ यांनी अहमदनगर जिल्हयाचा दौरा केल्यानंतर त्यांना दिसुन आले की, अहमदनगर जिल्हयात सहकार फुलविल्यास जिल्हयाची आर्थिक परिस्थिती बदलु शकते. त्या दृष्टीने सन १९४५ साली गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली बेलापूर येथे दि.डेक्कन कॅनॉल बागाईतदार परिषद झाली. त्यांच्या भाषणाने प्रेरीत होऊन विठ्ठलराव विखे पाटलांनी साखर कारखाना काढण्याचा चंगच बांधला आणि कामाला लागले. त्यांनी डॉ.धनंजयराव गाडगीळांकडे यासाठी पाठपुरावा केला. गाडगीळांनीही मुंबई राज्याचे सहकार मंत्री वैकुंठभाई मेहता यांच्या सहकार्याने केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला. आणि शेवटी केंद्र सरकारने १४ डिसेंबर १९४८ रोजी आशिया खंडातील पहिल्या प्रवरा सहकारी साखर कारखान्यास परवानगी दिली आणि सन १९५० साली आशिया खंडातील पहिला सहकारी

साखर कारखाना सुरु झाला. विठ्ठलराव विखे पाटील यांचे परिश्रम सार्थकी लागले. आणि याचबरोबर अहमदनगर जिल्हयात सहकारी साखर कारखाना उभारणीस चालना मिळुन पुढील काही वर्षात १८ कारखाने सुरु झाले. परंतु अनेक कारखाने आर्थिक अडचणीमुळे डबघाईस येऊ लागले. जिल्हा बँकेने सहकारी साखर कारखान्या विषयी सहकार्याची भुमिका निभावत मोठया प्रमाणात कर्ज पुरवठा केला.

भाऊसाहेबांनी आपल्या अध्यक्षीय काळात जिल्हयातील कारखानदारी वाढीसाठी कारखान्यांना २% व्याजात सवलत देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला होता. एवढेच नव्हे तर नगर व कुकडी या साखर कारखान्याने बँकेने दत्तक घेऊन साखर कारखान्याचे शेअर्स घेण्यासाठी शेतकऱ्यांना पाच कोटी पन्नास लाख रुपयांचे कर्ज दिले. मोठया प्रमाणात कर्ज पुरवठा करुन या दोन्ही कारखान्यांची उभारणी भाऊसाहेबांच्या दुरदृष्टी धोरणामुळे झाली.[२२]

रिझर्व बँकेच्या माध्यमातुन आडसाली ऊस लागवडीस कर्ज दिले जाई, त्या पिक कर्जाची परतफेड कालावधी बँकेच्या नियमाप्रमाणे ११ महिने पेक्षा जास्त देता येत नसला तर अडसाली ऊस लागवडीनंतर १८ ते २० महिन्यांनी गळीतास तयार होतो. ऊसाचे येणारे उत्पादन व कर्ज फेडीचा हा तफावतीचा प्रश्न शेतकऱ्यांच्या दृष्टीने अडचणीचा होता. हे भाऊसाहेब थोरात जाणून होते. ते सन १९६६ साली जिल्हा बँकेचे अध्यक्ष असताना त्यांनी व पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी आडसाली ऊस कर्ज फेडीचा प्रश्न डॉ.धनंजयराव गाडगीळ व मा.वसंतदादा पाटील यांना भेटून पटवून दिला. एवढेच नव्हे तर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे ॲग्रिकल्चरल क्रेडिट डिपार्टमेंटमध्ये प्रमुख अधिकारी डॉ.सी.डी.दाते यांना या प्रश्नांचे गांभिर्य समजावून दिले. भाऊसाहेबांच्या या धोरणाची दखल बँकेने घेतली आणि संपूर्ण देशातील शेतकऱ्यांसाठी बँकेत सन १९७२, १९७३ पासुन कॅश क्रेडिट कर्ज पध्दती सुरु केली. ही योजना सुरु करण्यास बँकेस विचार करण्यास लावण्यास भाऊसाहेबांचे धोरण महत्वपूर्ण ठरले. त्यांच्या या प्रयत्नाचा केवळ जिल्हयातच नव्हे तर देशातील शेतकऱ्यांना लाभ झाला आहे.[२३]

श्रीगोंदा सहकारी साखर कारखाना उभारणी वेळी दुष्काळी परिस्थितीमुळे (सन १९७२-७३) शेतकऱ्यांकडुन भांडवल उभे करणे अशक्य होते. पैशा अभावी श्रीगोंदा कारखाना उभा करणे अशक्य झाले होते. त्याचवेळी सन १९७३ साली सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांची जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदी नेमूणक झाली. श्रीगोंदा सहकारी साखर कारखाना व्यवस्थापक मंडळाने भाऊसाहेबांकडे साखर कारखाना उभारणी विषयी अडचण

बोलुन दाखविली व बँकेच्या माध्यमातुन एवढी मोठी रक्कम देणे शक्य आहे काय अशी विचारणा केली. भाऊसाहेबांनी जाणले की, दुष्काळी परिस्थिती असल्याने जर बँकेने श्रीगोंदा करखाना उभारणीस कर्ज दिले नाही तर कारखाना निघुच शकत नाही. पर्यायाने श्रीगोंदा तालुका विकासापासुन वंचीत राहिल हे जाणकार भाऊसाहेबांनी ओळखले आणि श्रीगोंदा साखर कारखान्याचा कर्ज प्रश्न संचालक मंडळापुढे मांडुन तो मजुरही करुन घेतला. जिल्हा बँकेने श्रीगोंदा कारखाना उभारणीसाठी सन १९७३ ते १९७४ साली ६० लाखाचे कर्ज दिले. त्यामुळे कारखाना उभा राहून श्रीगोंदा तालुक्याच्या विकासास चालना मिळाली. हे सर्व भाऊसाहेबा थोरात यांच्या जिल्हा बँकेतील अध्यक्षीय काळातील घेतलेल्या निर्णयामुळे झाले.[२४]

याशिवाय भाऊसाहेबांनी जिल्हा बँकेतील आपल्या अध्यक्षीय काळात शेवगांव तालुक्यातील केदारेश्वर कारखाना, पारनेर तालुक्यातील साखर कारखाना, अकोले तालुक्यातील अगस्ती सहकारी साखर कारखाना आदि साखर कारखान्यांना प्रारंभी उभारणीसाठी शेअर्ससाठी कर्ज व नंतर खेळते भांडवलासाठी कर्ज पुरवठा करण्याचे धोरण भाऊसाहेबांनी आपल्या अध्यक्षीय काळात अवलंबविल्यानेच अहमदनगर जिल्हयात सहकार वाढीस खऱ्या अर्थाने चालना मिळाली.[२५]

अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेने आजपर्यंत सन २०१६-२०१७ अखेर पर्यंत अहमदनगर जिल्हयातील सहकारी साखर कारखान्यांना केलेल्या कर्ज पुरवठयाचा आढावा घेतल्यास असे दिसुन येते की, आजपर्यंत बँकेने जिल्हयातील साखर कारखान्यांना खेळते भांडवलापोटी ७००८ कोटी रुपये दिलेले आहेत. तसेच सहवीज निर्मिती व साखर कारखान्यांना मध्यम मुदत कर्जे योजनेतंर्गत ७१ कोटी रुपये कर्ज मार्च २०१७ अखेर पर्यंत बँकेने सहकारी साखर कारखान्यांना दिलेले आहे.

वरील कर्जपुरवठयापैकी भाऊसाहेब थोरात बँकेचे अध्यक्ष असताना मोठया प्रमाणात साखर कारखान्यांना कर्ज पुरवठा केल्याचे दिसुन येते.

### ३.३.४ अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष असताना पाणी पुरवठा योजनांना कर्ज पुरवठा करण्याच्या माध्यमातून भाऊसाहेब थोरात यांचे योगदान :-

भारतीय अर्थव्यवस्था कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणुन ओळखली जाते. सहकारातील तज्ञ भाऊसाहेबांनी ओळखले की सातत्याने दुष्काळाचा सामना करणारा जिल्हा असल्याने जिल्हयात सहकारी पाणी पुरवठा योजना तसेच धरणे, तलाव, बंधारे, पाट, टि.टी.वेअर, शेततळे, जाळी बंधारे, सिमेंट बंधारे, विहीर, ठिबकसिंचन, तुषार सिंचन असे पाण्याचे स्त्रोत

उपलब्ध केले तरच जिल्हयातील शेतकरी व सर्वसामान्य जनता वाचु शकते. हे जाणणाऱ्या भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हा बँकेतील अध्यक्षीय पदाचा उपयोग करत जिल्हयात पाणी पुरवठा सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने अनेक महत्वपूर्ण योजनांना मंजुरी मिळवुन कर्ज पुरवठा करण्याचा योग्य निर्णय घेतला.

भाऊसाहेबांनी जिल्हा बँकेतील १४ वर्षाच्या अध्यक्षीय काळात जवळपास पंपसेटसाठी ३० कोटीचे कर्ज वितरण केले, तर पाईपलाईनसाठी व विहिर खोदाईसाठी जवळपास १०० कोटी कर्ज वितरण केले. जिल्हयातील पाणी योजनांसाठी सन २०१६-१७ पर्यंत पंपसेटसाठी ८० कोटी पाईपलाईनसाठी २५० कोटीचे कर्ज बँकेने दिले आहे. त्यात भाऊसाहेबांच्या १४ वर्षाच्या काळात सर्वाधिक कर्ज वितरण झाल्याचे दिसुन येते. भाऊसाहेबांनी पाणी पुरवठा योजनांना मोठया प्रमाणात कर्ज पुरवठा केल्यामुळेच जिल्हयात कृषीक्रांती बरोकर सहकार क्रांतीही विकास पावली आहे.[२६]

भाऊसाहेब थोरात यांनी जिल्हा बँकेतील आपल्या अध्यक्षीय काळात पाणी पुरवठा योजनेसाठी पुढील प्रमाणे कर्ज वितरण करण्याचे धोरण अवलंबविले होते. त्याचे स्वरुप पुढील प्रमाणे होते.

**जिल्हा बँकेचे शेतीस पाणी पुरवठा योजनेसाठी मध्यम मुदत व दिर्घ मुदत कर्ज वितरण धोरण :-**

**तक्ता क्रं.१५**

| अ.नं. | तपशिल | कर्जाची कमाल मर्यादा रुपये व कर्ज दर | कर्ज वितरणाचे हप्ते | सभासदाची स्व गुंतवणुक रक्कम रु. | कर्जाचा परत फेड करावयाचे वर्ष | कर्ज परतफेड हप्ते संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | **नवीन विहिर :-** ५ मि.व्यास, १२ मि.खोली व ४ मि.उंचीच्या बांधकामासाठी | ८८,७०० | २ | २०% | ५ | ५ |
|  | **विहीर दुरुस्ती** ३ मिटर खोदाई साठी | ३०,००० | २ | २०% | ५ | ५ |

| अ.नं. | तपशिल | कर्जाची कमाल मर्यादा रुपये व कर्ज दर | कर्ज वितरणाचे हप्ते | सभासदाची स्व गुंतवणुक रक्कम रु. | कर्जाचा परत फेड करावयाचे वर्ष | कर्ज परतफेड हप्ते संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| २) | **इले.मोटार पंपसेट** | | | | | |
| | १) ३ एच.पी. | १३,९०० | १ | | ५ | ५ |
| | २) ५ एच.पी. | १६,००० | १ | | ५ | ५ |
| | ३) ७.५एच.पी. | २०,००० | १ | एमएसईबी | ५ | ५ |
| | ४) १० एच.पी. | २५,००० | १ | नियमानुसार | ५ | ५ |
| | ५) १२.५ एच.पी. | २८,००० | १ | | ५ | ५ |
| | ६) १५ एच.पी. | ३१,४०० | १ | | ५ | ५ |
| | ७) २० एच.पी. | ३४,००० | १ | | ५ | ५ |
| | ८) २५ एच.पी. | ४३,००० | १ | | ५ | ५ |
| | ९) ३० एच.पी. | ५३,५०० | १ | | ५ | ५ |
| ३) | **निव्वळ इले.मोटार साठी :-** | | | | | |
| | १) ३ एच.पी. | ६,५०० | १ | ---- | ५ | ५ |
| | २) ५ एच.पी. | ७,५०० | १ | | ५ | ५ |
| | ३) ७.५ एच.पी. | १०,००० | १ | | ५ | ५ |
| | ४) १० एच.पी. | ११,००० | १ | | ५ | ५ |
| ४) | **सबमर्सिबल पंप** (बोअरवेलसाठी) | | | | | |
| | १) ३ एच.पी. | २०,७०० | १ | २०% | ५ | ५ |
| | २) ५ एच.पी. | २४,६०० | १ | २०% | ५ | ५ |
| | ३) ६ एच.पी. | २५,६०० | १ | २०% | ५ | ५ |
| | ४) ७.५एच.पी. | २९,२०० | १ | २०% | ५ | ५ |
| | ५) १० एच.पी. | ३७,९०० | १ | २०% | ५ | ५ |
| | ६) १५ एच.पी. | ४२,१०० | १ | २०% | ५ | ५ |
| | ७) १७.५ एच.पी. | ४८,९०० | १ | २०% | ५ | ५ |
| | ८) २० एच.पी. | ५४,८०० | १ | २०% | ५ | ५ |
| ५) | **ऑईल इंजिन :-** | | | | | |
| | १) १.५ एच.पी. | | | | | |
| | २) ७.५ एच.पी. | | | | | |
| ६) | **पानबुडी मोटर** | | | | | |
| | १) ३ एच.पी. | १२,१०० | १ | २०% | ५ | ५ |
| | २) ५ एच.पी. | १४,००० | १ | २०% | ५ | ५ |
| | ३) ६.५ एच.पी. | १४,००० | १ | २०% | ५ | ५ |
| | ४) ७.५एच.पी. | १५,५०० | १ | २०% | ५ | ५ |
| | ५) १० एच.पी. | १७,५०० | १ | २०% | ५ | ५ |

याशिवाय ठिंबक जलसिंचन व मिनी व मायक्रो स्प्रिंक्लर सिंचनासाठी क्षेत्रानुसार एक हप्त्यात रक्कम दिली जाते. सभासदास स्वगुंतवणुक करावी लागत नाही. कर्ज परतफेड ५ वर्षांची असुन ती ५ हप्त्यात फेडण्याची सुविधा बँकेने केली आहे. क्षेत्रानुसार कर्ज वितरण पुढील प्रमाणे :-

**ठिंबक जलसिंचन संच उभारणी कर्ज :-**

**तक्ता क्रं.१६**

| अ.नं. | लॅटरल गट अंतर | ०.५ एकर | १ एकर | २.२० एकर | ५ एकर | ७.५ एकर | १० एकर | १२.५० एकर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | ८.०१ मी व त्यापेक्षा जास्त | ४७०० | ९४०० | २३९०० | ३८१०० | ५९००० | ७४१०० | ९४२०० |
| २) | ४.०१ मी ते ८ मी | ६७८० | १३५६० | ३३९०० | ५८१०० | ८९३०० | ११३२०० | १४२४०० |
| ३) | २.०१ मी ते ४ मी. | ११६८० | २३३६० | ५८४०० | १०८००० | १६१८०० | २२०६०० | २७१५०० |
| ४) | १.२१ मी ते २ मी. | १७०८० | ३४१६० | ८५४०० | १६१३०० | २४३४०० | ३३२८०० | ४१२८०० |
| ५) | १.२० मी | २०००० | ४०००० | १००००० | १९३५०० | २९२१०० | ३९९४०० | ४९५४०० |

**मिनी स्प्रिंक्लर व मायक्रो स्प्रिंक्लर संच उभारणी खर्च :-**

**तक्ता क्रं.१७**

| अ.नं. | क्षेत्र हेक्टर | मायक्रो स्प्रिंक्लर अंतर ५ x ५ मी. | मिनी स्प्रिंक्लर अंतर १० x १० मी. |
|---|---|---|---|
| १) | ०.४० | २९५९७ | ४१३५८ |
| २) | १.० | ५८९०० | ८५२०० |
| ३) | २.०० | १०३३२५ | १५९९९२ |
| ४) | ३.०० | १४९२२४ | २४२९४९ |
| ५) | ४.०० | २०१५०४ | ३१२७०९ |
| ६) | ५.०० | २५४७३५ | ३८३०७१ |

तसेच पाईपलाईनसाठी शेतकऱ्यांना एकरी ४०००० हजार पर्यंत कर्ज दिले आहे. हे कर्ज एका हप्त्यात दिले जाते. त्यात सभासदास स्वगुंतवणुक १०% करणे अपेक्षीत आहे. कर्ज परतफेड ५ ते ९ वर्षापर्यंत असून पहिला हप्ता दोन वर्षानंतर भरणे भाग पडते.

अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेने शेतीस पाणी पुरवठा करण्यासाठी राबविलेल्या योजनेअंतर्गत भाऊसाहेब थोरात यांनी आपल्या १४ वर्षाच्या अध्यक्षीय काळात शेतीस पाणी पुरवठा करण्याची जी प्रकरणे जिल्हा बँकेकडे आली. ती भाऊसाहेबांनी वेळेवर मंजुर केली. भाऊसाहेबांच्या अध्यक्षीय काळात सर्वाधिक प्रकरणे मंजुर झाली. त्यामुळे जिल्हयातील शेतीस मोठया प्रमाणात पाणी उपलब्ध झाले. पर्यायाने अहमदनगर जिल्हयात भाऊसाहेब थोरात यांच्या धोरणातुन कृषी क्रांती घडुन आली.[२७]

### ६.३.५ शेतीच्या आधुनिकीकरणासाठी जिल्हयातील शेतकऱ्यांना विविध शेती साधनासाठी अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे कर्ज विषयक धोरण व त्यात भाऊसाहेबांचे योगदान :-

भाऊसाहेब थोरात अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे सन १९६५ ते १९६९, १९७३ ते १९७७, १९९५ - ते १९९९ असे १४ वर्ष अध्यक्ष होते. अध्यक्षीय काळात त्यांनी अहमदनगर जिल्हयातील शेती यांत्रिकीकरणासाठी बँकेच्या माध्यमातुन अनेक उपक्रम राबविले. त्यांच्या या धोरणामुळे जिल्हयात कृषीक्रांती बरोबरच सहकार क्रांती घडुन येण्यास साहय झाले आहे. भाऊसाहेबांनी विविध शेती साधनासाठी केलेला कर्ज पुरवठा पुढील प्रमाणे होता.

#### ६.३.५.१ ट्रॅक्टर, ट्रेलर, ट्रॉली औजारासाठी कर्ज पुरवठा करण्यातील भाऊसाहेबांचे योगदान :-

भाऊसाहेबांनी जिल्हा बँकेतील अध्यक्षीय पदाचा उपयोग अहमदनगर जिल्हयातील कृषी व्यवस्थेत परिवर्तन करणारे ठरले. जिल्हयातील शेती क्षेत्रात वाढ होण्यासाठी व आधुनिक पध्दतीने व जलदगतीने शेती मशागत व्हावी यासाठी बँकेच्या माध्यमातुन ट्रॅक्टर, ट्रेलर, ट्रॉली औजारे पुरवठा करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला. कोटेशनच्या ८५% कर्ज बँकेच्या माध्यमातुन देण्याचे धोरण भाऊसाहेबांनी राबविल्याने या संधीचा फायदा घेत जिल्हयातील अनेक शेतकऱ्यांनी बँकेकडे पूर्तता अहवाल पाठवुन ट्रॅक्टर व औजारासाठी प्रकरणे पाठविले. भाऊसाहेबांनी ही सर्व प्रकरणे मंजूर करुन शेतकऱ्यांना ट्रॅक्टर व साधने

यासाठी ८५% कर्ज बँकेने शेतकऱ्यांना दिले. शेतकऱ्यांना १५% रक्कम भरणे भाग पडत असे.

भाऊसाहेबांनी अध्यक्षीय १४ वर्षाच्या काळात ३००० ट्रॅक्टरसाठी कर्ज पुरवठा केला. तर बँकेचे सुवर्ण महोत्सवी वर्षी २००८ सालापर्यंत ६ हजार ३०० ट्रॅक्टरसाठी २४५ कोटी रुपयांचा कर्ज पुरवठा शेतकऱ्यांना केला. बँकेच्या माध्यमातुन ट्रॅक्टर योजना राबविण्यात भाऊसाहेबांच्या योगदानामुळे जिल्हयात कृषी क्रांती घडुन आली.[२८]

**६.३.५.२ बैलगाडी व बैलजोडीसाठी कर्ज पुरवठा धोरण :-**

शेतकऱ्यांना शेतीतील उत्पादीत माल शेतातुन वाहून नेण्यासाठी वाहतुक साधने उपलब्ध व्हावीत या हेतूने भाऊसाहेब थोरात यांनी जिल्हा सहकारी बँकेतील आपल्या अध्यक्षीय काळात शेतकऱ्यांना बैलजोडी व बैलगाडीसाठी कर्ज पुरवठा करण्याचा निर्णय घेतला. कर्ज पुरवठा स्वरुप पुढील प्रमाणे होते.

गावठी बैलजोडीसाठी १०००० हजाराचे कर्ज तर सुधारीत बैलजोडीसाठी १२००० रुपयांचे कर्ज दिले जाई. तर

१) बैलगाडी पारंपारिक - ५ टनी रु.६०००/- रुपये
२) बैलगाडी पांरपारिक - ८ टनी ६४००/- रुपये
३) टायर बैलगाडी - २ टनी, रु.८८००/- रुपये
४) टायर बैलगाडी - ३ टनी रु.११,०००/- रुपये
५) स्थानिक बैलगाडी - रु.५६००/- रुपये
६) लोखंडी बैलगाडी - १ टनी रु.६१००/-

या स्वरुपात जिल्हा बँकेच्या माध्यमातुन शेतकऱ्यांना शेतातील उत्पादित माल वाहतुक करण्यासाठी कर्ज पुरवठा केला जाऊ लागल्याने शेतातील उत्पादित माल शेतकऱ्यांना सुरक्षित ठिकाणी किंवा बाजारपेठे पर्यंत वाहुन नेणे शक्य होऊ लागले. भाऊसाहेब थोरात जिल्हा बँकेचे अध्यक्ष असतांना शेतकऱ्यांची बैलगाडी व बैलजोडीसाठी आलेले प्रकरणे जलदगतीने मंजुर करत. भाऊसाहेबांच्या या धोरणामुळे त्यांच्या अध्यक्षीय काळात सर्वाधिक प्रकरणे मंजुर झाली.यात भाऊसाहेब थोरात यांचे योगदान महत्वाचे होते.[२९]

### ६.३.५.३ मळणी यंत्रासाठी कर्ज पुरवठा :-

शेतकऱ्यांसाठी उत्पादित केलेल्या अन्नधान्याची मळणी शेतकरी पारंपारिक पध्दतीने करत असत. त्यात वेळ व श्रम अधिक होते. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाची मळणी करणे सुलभ व्हावे म्हणून भाऊसाहेबांनी जिल्हा बँकेच्या माध्यमातुन शेतकऱ्यांना मळणी यंत्रासाठी कर्ज पुरवठा केला. त्या कर्ज पुरवठयाचे स्वरुप पुढील प्रमाणे होते.

**तक्ता क्रं.१८**

| अ.क्रं. | तपशिल | कर्जाची कमाल मर्यादा रुपये | कर्जाचे वितरणाचे हप्ते | सभासदांची स्वगुंतवणुक रक्कम | कर्ज परतफेड कलावधी | हप्ते संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | मळणीयंत्र, ५ एच.पी. इले. मोटारसह | २३००० | १ | २५% | ५ | ५ |
| २) | मळणीयंत्र, ७.५ एच.पी. इले.मोटारसह | २५००० | १ | २५% | ५ | ५ |
| ३) | मळणीयंत्र, ५ एच.पी. इंजिनसह | २२००० | १ | २५% | ५ | ५ |

वरील प्रमाणे मळणी यंत्रासाठी कर्ज पुरवठा करुन भाऊसाहेबांनी जिल्हयातील शेतकऱ्यांना दिलास दिला.

### ६.३.५.४ ट्रॅक्टरवर चालणारे पाचटकुटी यंत्रासाठी कर्ज पुरवठा :-

भाऊसाहेबांनी शेतीला पाणी पुरवठा योजनाना बँकेच्या माध्यमातुन कर्ज पुरवठा करण्याच्या धोरणामुळे जिल्हयात मोठया प्रमाणात ऊस क्षेत्रात वाढ घडुन आली होती. शेतकरी ऊस तोडणीनंतर राहिलेले पाचरट पेटवत असत. परंतु भाऊसाहेबांना सातत्याने वाटत होते की, जर ऊसाच्या पाचराटाची कुटी केल्यास चांगल्या प्रकारचे कंम्पोस्ट खत तयार होऊन ते ऊसाच्या खोडवा पिकासाठी खत म्हणून त्याचा चांगल्या प्रकारे उपयोग होऊ शकतो. हे ओळखुन भाऊसाहेबांनी शेतकऱ्यांना ट्रॅक्टरवर चालणारे पाचटकुटी यंत्रासाठी बँकेच्या माध्यमातुन कर्ज पुरवठा केला. त्यासाठी शेतकऱ्यांना एक हप्त्यात रु.१,१६,०००/- रुपयांचे कर्ज उपलब्ध करुन दिले जाते. शेतकऱ्यांना फक्त २५% रक्कम गुंतवणे भाग पडे. कर्जाची परतफेड ५ वर्षासाठी असुन ती ५ हप्त्यात फेडण्याची सवलत होती.[३०]

**६.३.५.४ गोबरगॅस संयत्रासाठी कर्ज पुरवठा :-**

भाऊसाहेब थोरात अहमदनगर जिल्हा बँकेचे अध्यक्ष असताना त्यांनी बँकेच्या माध्यमातून "गोठा तेथे गोबर गॅस आपल्या दारी" ही योजना राबवुन शेतकऱ्यांना गोबरगॅससाठी प्रोत्साहन दिले. एवढेच नव्हे तर बॅकेच्या माध्यमातुन जे कर्ज दिले जाई या व्यतिरिक्त शेतकऱ्यांना स्वतः रक्कम गुंतवावी लागत नव्हती. फेड पाच वर्ष ५ हप्त्यात फेडण्याची सुविधाही होती. त्यामुळे या योजनेस जिल्हयात लोक चळवळीचे स्वरुप प्राप्त होऊन गोठा तेथे गोबरगॅस होऊ लागले होते. अनेक शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतल्याने महिला भगिनीची पारंपारिक पध्दतीने चुलीवर स्वंयपाक करण्यातून सुटका झाली. धुरापासुन महिलांना होणारा त्रास व विविध आजार यातुनही महिलांची सुटका झाली. ज्या शेतकऱ्यांच्या घरी गोबरगॅस आहे त्या घरातील महिला गोबरगॅसवर चालणाऱ्या गॅसवर आपला स्वयंपाक करु लागल्या. गोबर गँससाठी बँकेच्या माध्यमातुन पुढीलप्रमाणे कर्ज पुरवठा केला जात होतो.

**तक्ता क्रं.१९**

| अ.नं. | क्षमता / घनमिटर | क्षमता / घनफुट | आवश्यक जनावरे | कर्जाची कमाल मर्यादा रुपये |
|---|---|---|---|---|
| १) | २ | ७० | ३ ते ५ | २७,७०० |
| २) | ३ | १०० ते १०५ | ६ ते ७ | ३२,८७५ |
| ३) | ४ | १४० | ८ ते ९ | २६,६५० |

गोबरगॅससाठी कर्ज देतांना जर संडाससह बांधकाम असेल तर, २३००/- रुपये अधिक कर्ज दिले जात होते. तसेच गोबर गॅसचे ठिकाण हे डोंगराळ भागात असेल तर त्यासाठी ७०० रु अधिक कर्ज दिले जात असे.

गोबरगॅससाठी जिल्हा बॅकेकडे जे प्रकरणे येऊ लागली. ती भाऊसाहेब थोरात यांनी जलद गतीने मंजुर केली. त्यामुळे भाऊसाहेबांच्या अध्यक्षीय काळात गोबरगॅसची सर्वाधिक प्रकरणे मंजुर झाल्याचे दिसुन येते. बँकेच्या माध्यमातुन गोबर गॅसची योजना राबविल्याने जिल्हयातील शेतीलाही चांगल्या प्रकारच्या शेणखताचा पुरवठा होऊ लागला. पर्यायाने शेती उत्पादनात वाढ घडुन आली.[३१]

**६.३.५.५ लोडर, फंटएंड, डोझर, हायड्रोलिक एरॅकव्हेल्ट, पोकलॅन इ. अर्थ मुव्हींग मशिनरी (जे.सी.बी.) खरेदी करिता दिर्घ मुदत कर्ज धोरण :-**

अहमदनगर जिल्हा सहकारी बॅंकेच्या संचालक मंडळाने सातत्याने शेतकऱ्यांना शेती व्यवसाय करणे सुलभ व्हावे यासाठी विविध शेती साधनासाठी कर्ज पुरवठा करण्याचे धोरण अवलंबिले आहे. भाऊसाहेब थोरात जिल्हा बॅंकेचे अध्यक्ष असताना त्यांनी जिल्हयात कृषी क्रांती घडवुन आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. जिल्हयातील शेतीचे सपाटीकरण होऊन बागायत क्षेत्रात वाढ होण्याच्या दृष्टीने त्यांनी बॅंकेच्या माध्यमातुन शेतकऱ्यांना लोडर, फंटएंड, डोझर, हायड्रोलिक, एरैकव्हेटर, पोकलॅन इत्यादी अर्थमुव्हिंग मशिनरी (जे.सी.बी.) खरेदीसाठी दिर्घ मुदत कर्ज योजनेतंर्गत शेतकऱ्यांना कोटेशनाच्या ७५% कर्ज बॅंकेकडुन दिले जाई शेतकऱ्यांना स्वगुंतवणुक २५% करणे भाग पडे. या कर्जाची परतफेड १ वर्षासाठी असुन ती १८ समान हप्ते स्वरुपात भरण्याची सवलत बॅंकेने दिली आहे.

भाऊसाहेबांच्या या कर्ज धोरणामुळे शेतकऱ्यांना शेती सपाटीकरण, पाईपलाईन चर, शेतीकडे जाणारे रस्ते, छोटे छोटे पाणी साठवण बंधारे, बांधबंदीस्त डोंगराळ भागात माती टाकुन नवीन शेती तयार करणे आदि कामासाठी या साधनाचा उपयोग होऊ लागल्याने जिल्हयातील शेती क्षेत्रात वाढ घडुन आली. एवढेच नव्हे तर बागायत क्षेत्रही वाढले. पर्यायाने जिल्हयातील सहकार फुलला आहे हे सर्व भाऊसाहेबांच्या बॅंकेतील धोरणामुळे घडुन आले.[३२]

**६.३.५.६ द्राक्ष मांडव व द्राक्ष पिकास औषध फवारणी पंप :-**

भाऊसाहेबांनी बॅंकेतील आपल्या अध्यक्षीय काळात शेतकऱ्यांनी रोख पैसा मिळुन देणाऱ्या द्राक्ष पिकाकडे वळविण्यासाठी बॅंकेच्या माध्यमातून द्राक्ष मांडवासाठी व द्राक्ष पिकास औषध फवारणी पंपासाठी कर्ज पुरवठा केला :-

द्राक्ष पिकास कर्ज पुरवठा दर्शविणारा तक्ता पुढीलप्रमाणे :-

**तक्ता क्रं.२०**

| अ.नं. | तपशिल | कर्जाची कमाल मर्यादा रु. | कर्ज वितरणाचे हप्ते | सभासदाची स्वगुंतवणुक रक्कम रु. | कर्जाचा परत फेड कालावधी | कर्ज परत फेड हप्ते संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | द्राक्ष मांडवाकरीता एकरी ४३५ ते १००० वेलीसाठी | १ ला : १,०००<br>२ रा: २५,०००<br>३ रा :१०,०००<br>४ था: १०,५,०००<br>**एकुण: १,५०,०००** | ४ | -- | ५ | ४, २४ महिन्याने पहिला हप्ता. |
| २) | इले.मोटारवर चालिवण्यात येणारे द्राक्षे विकले औषध फवारणी पंप | १०,०००/- | १ | २०% | ५ | ५ |

जिल्हयातील शेतकरी नगदी पिकाकडे वळावा. यासाठी भाऊसाहेबांनी जिल्हा बँकेतील आपल्या अध्यक्षीय काळात जिल्हयातील जे शेतकरी द्राक्ष पिक घेऊ इच्छितात अशा शेतकऱ्यांना बँकेच्या माध्यमातून वेळेवर कर्ज पुरवठा करण्याचे धोरण अवलंबले. शेतकऱ्यांना द्राक्ष मांडव व औषध फवारणी पंपसाठीची प्रकरणे बॅकेकडे आली असता ती भाऊसाहेब जलदगतीने मंजुर करत असत. भाऊसाहेबांच्या या धोरणातुन जिल्हयातील द्राक्ष पिकाच्या उत्पन्नात मोठया प्रमाणात वाढ झाली. शेतकऱ्यांच्या हाती रोख पैसा खेळु लागला.

वरीलप्रमाणे द्राक्ष पिकासाठी भाऊसाहेबांच्या अध्यक्षीय काळात बँकेच्या माध्यमातून कर्ज पुरवठा केला गेला.[३३]

### ६.३.६ शेतीपुरक व्यवसायाला कर्जपुरवठा करण्याच्या माध्यमातुन भाऊसाहेबांचे अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान :-

शेतकऱ्यांना शेतीला जोडधंदा मिळवण्याच्या उद्देशाने भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेतील आपल्या १४ वर्षाच्या अध्यक्षीय काळात शेतीपूरक व्यवसायास चालना देण्यासाठी कुक्कुटपालन, शेळीपालन, मेंढयापालन, मधमाशा पालन, सुतकताई, महिला बचत गट, ऊस क्षेत्र वाढ, शेतमाल प्रक्रिया उदयोग, गोपालन, दूध व्यवसाय, चाराकुटी यंत्र, रेशिम उद्योग, पॅक हाऊस, गांडुळखत प्रकल्प, हरितगृह, शेडनेट, टयुबलाईट स्ट्रक्चर, डेअरी उद्योगजकता विकास योजना आदी शेतीपुरक व्यवसायांना जिल्हा बँकेच्या माध्यमातुन कर्ज पुरवठा करण्याच्या भाऊसाहेबांच्या महत्वपूर्ण धोरणामुळे

शेतकऱ्यांना शेतीस जोडधदयांची साथ मिळाली. पर्यायाने शेतकऱ्यांच्या हाती पैसा खेळू लागला. आर्थिक उलाढाल वाढली. तसेच काही प्रमाणात जिल्हयातील रोजगाराचा प्रश्न सुटण्यासही साहय झाले. जिल्हा बँकेचे हे धोरण जिल्हयाच्या आर्थिक विकासास चालना देण्यासाठी महत्वपूर्ण ठरले आहे.

**६.३.६.१कुक्कुटपालन व्यवसायास बॅकेने केलेला कर्ज पुरवठा व भाऊसाहेबांचे योगदान :-**

जिल्हयातील शेतकरी वाचला तरच जिल्हयात कृषी क्रांती, सहकारक्रांती पर्यायाने आर्थिक क्रांती होऊ शकते हे जिल्हा बॅकेचे अध्यक्ष भाऊसाहेब थोरात जाणून होते. म्हणून त्यांनी शेतकऱ्यांना शेतीस जोड धंदा मिळावा या उद्देशाने बँकेच्या माध्यमातुन कुक्कुटपालन विकास कार्यक्रम अंतर्गत शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करण्याचे धोरण अवलंबिले.

त्यासाठी शेड बांधकाम, डिपलिटर पध्दती, पिंजरा पध्दती, खादयपुरवठा यासाठी बँकेच्या माध्यमातुन कर्ज पुरवठा केला. भाऊसाहेबांनी राबविलेल्या या योजनेचा जिल्हयातील अनेक शेतकऱ्यांनी शेतीस जोडधंदा म्हणून उपयोग करुन घेतला.

**कुक्कुट पालन व्यवसायास बँकेचे कर्ज विषयक धोरण :-**

**तक्ता क्रं.२१**

| अ. नं. | तपशिल | कर्जाची कमाल मर्यादा रु. |
|---|---|---|
| १) | कुक्कुटपालन | |
| | शेडबांधकाम<br>१)डिपलिटर पध्दती | १०रु.प्रति चौ.फुट |
| | २) पिंजरा पध्दती | १५रु.प्रति चौ.फुट |
| २) | साहित्य | |
| | १) डिपलिटर पध्दती | १२ प्रति पक्षी |
| | २) बॉयलर | १० रु. प्रति पक्षी |
| ३) | पिंजरा पध्दती<br>१) ब्रुडर केज | २२ रु. प्रति पक्षी |
| | २)ग्रोअर केज | १८० रु.प्रति प्रक्षी |
| | ३) लेअरकेज | २५ रु.प्रति पक्षी |
| ४) | आवर्ती खर्च | |
| | पिलांची किंमत<br>(एक दिवसाचे पक्षी) | |
| | १) लेअर | ०८ |
| | २) ब्रॉयलर | ०९ |

जिल्हयातील शेतकऱ्यांना शेतीस जोडधंदा मिळावा यासाठी बॅकेने राबविलेल्या कुक्कुटपालन योजनेची सर्वात जास्त प्रकरणे भाऊसाहेब थोरात यांनी आपल्या अध्यक्षीय काळात मंजुर केल्याने शेतकऱ्यांना शेतीस जोडधंदा मिळाला.

शेतकऱ्यांच्या हाती रोख पैसा येऊ लागल्याने ते शेती व्यवसायात नवीन नवीन प्रयोग करुन पिके घेण्याचा प्रयत्न करु लागले. भाऊसाहेबांनी आपल्या अध्यक्षीय काळात राबविलेल्या योजनेमुळे झाले.[३४]

**६.३.६.२ पशुसंवर्धनासाठी बँकेच्या माध्यमातुन केला गेलेला कर्जपुरवठा :-**

अहमदनगर जिल्हा हा दुष्काळी जिल्हा आहे. त्यात शेतकऱ्यांना सातत्याने पडणाऱ्या दुष्काळाचा सामना करावा लागतो. या दुष्काळी परिस्थितीतुन शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी शेतीस जोडधंदा म्हणून गौपालन व्यवसाय सर्व उत्तम आहे हे ओळखून भाऊसाहेबांनी जिल्हा बँकेतील १९९५ ते १९९९ या पाच वर्षात बँकेच्या माध्यमातुन "दुध व्यवसाय विकास कार्यक्रम" राबविला.

या योजनेच्या माध्यमातून जिल्हयातील शेतकऱ्यांना जर्सी, होस्टन, फ्रिजन गाई, गीर, हरियाना, धारणकर गाई, तसेच म्हैसीमध्ये सुरती, जाफराबाद, नागपूरी, धारवाडी, पंढरपुरी, या गौपालनासाठी भाऊसाहेबांनी शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले. बँकेच्या माध्यमातून १० गाई किंवा १० म्हशीचे युनिट ते २ गाईचे युनिट असा १० गाईसाठी १,००,०००/- लाख तर २ गाईसाठी २६ हजार रुपये दिले जात असत. हा दुध व्यवसाय विकास कार्यक्रम भाऊसाहेबांनी १९९५ ते १९९९ या पाच वर्षाच्या बँकेतील अध्यक्ष काळात जोमाने राबविला. परतफेड ५ वर्षे ५ हप्ते या स्वरुपात होती. १० गायी किंवा म्हशींच्या युनिटसाठी गोठा, गोदाम, पाण्याची टाकी, चाफकटर, चार उत्पादन खर्च यासह खर्च दिला जाई. सन १९९८ या एका वर्षाचा विचार केल्यास असे दिसून येते की, या एकाच वर्षी १६६ युनिटसाठी २.३४ कोटी रुपयांची तर २ गाईच्या युनिटसाठी १४६७८ गाईसाठी १७.८० कोटी रुपयांची जुन अखेर मुदती कर्जाची मंजुरी भाऊसाहेबांनी दिली होती. त्यामुळे सन १९९५ साली असणारे ६.५० लाख लिटर दुध संकलन १९९६ साली ते ७ लाख लिटर पर्यंत गेले. तर १९९७ पर्यंत ते ८ लाख लिटर तर १९९८ साली दुध संकलन १०.४० लिटर पर्यंत तसेच १९९९ पर्यंत ११.३० लाख लिटर पर्यंत वाढले. भाऊसाहेबांनी बँकेच्या माध्यमातुन राबविलेल्या दुध व्यवसाय विकास कार्यक्रमामुळे जिल्हयातील शेतकऱ्यांना शेतीसाठी जोडधंदा मिळाला. पर्यायाने शेतकऱ्यांच्या हातात रोख पैसा खेळु लागला.[३५]

भाऊसाहेबांच्या बँकेतील दुध व्यवसाय विकास कार्यकमाचा जिल्हयातील प्रत्येक तालुक्यातील शेतकऱ्यांनी लाभ घेतला. त्यातील संगमनेर तालुक्यातील काही लाभार्थी शेतकरी. जिल्हा बॅकेने १९९७-९८ साली पशुसंवर्धनासाठी केलेल्या कर्ज पुरवठा योजनेतील संगमनेर तालुक्यातील लाभार्थी शेतकरी.

**तक्ता क्रं.२२**

| अ. नं. | शेतकऱ्याचे नाव | गाव | गाई संख्या | मंजुर रक्कम | परतफेड वर्ष | हप्ते |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | भुजबळ बाळासाहेब रखमाजी | निंबाळे | २ | ३०००० | | |
| २. | शेख दगडू हसन | निंबाळे | २ | ३२००० | | |
| ३. | घोलप ताराबाई कांतीलाल | निंबाळे | ५ | ८०००० | | |
| ४. | मेहेत्रे मच्छिंद्र भिका | निंबाळे | ५ | ८०००० | | |
| ५. | नेहे पोपट गुलाब | समनापूर | ३ | ४२०० | | |
| ६. | हासे नामदेव विठ्ठल | समनापूर | ३ | ५०००० | | |
| ७. | चांडे केशव भागवत | समनापूर | ३ | ५०००० | | |
| ८. | चांडे सुशिलाबाई दामु | समनापूर | ४ | ६०००० | | |
| ९. | शेरमाळे पांडुरंग मुरलीधर | समनापूर | ४ | ६०००० | | |
| १०. | शेरमाळे पांडुरंग मुरलीधर | समनापूर | ४ | ६०००० | | |
| ११. | गुंजाळ सखाराम रामभाऊ | समनापूर | ३ | ५०००० | | |
| १२. | गुंजाळ संतोष संपतराव | समनापूर | ३ | ८०००० | | |
| १३. | रुपवते छबुबाई प्रकाश | समनापूर | १ | १६००० | | |
| १४. | वाबळे सुदाम गोंविद | कासारा दुमाला | ३ | ४२००० | | |
| १५. | वाबळे निवृत्ती गोविंद | कासारा दुमाला | ३ | ४२००० | | |
| १६. | वाबळे रंगनाथ मारुती | कासारा दुमाला | ४ | ६०००० | | |
| १७. | म्हस्के लक्ष्मण रामभाऊ | कासारा दुमाला | ४ | ६०००० | | |
| १८. | पोखरकर शिवाजी रामकृष्ण | कासारा दुमाला | ४ | ६०००० | | |

जिल्हयातील आदी शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा केल्याने शेतकऱ्यांना शेतीस जोड धंदा मिळाला.[३६]

**६.३.६.३ शेळी, मेंढी पालनासाठी कर्ज पुरवठा व भाऊसाहेबांचे योगदान :-**

अहमदनगर जिल्हा हा दुष्काळी जिल्हा आहे. वर्षानुवर्षे पडणाऱ्या दुष्काळी परिस्थीतीवर मात करण्यासाठी शेतकऱ्यांना शेतीस जोडधंदा असावा. यासाठी बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेळी, मेंढी पालन योजनेंअंतर्गत कर्ज पुरवठा करण्याचे धोरण भाऊसाहेबांनी राबिवली. शेळी, मेंढी पालनासाठी जे कर्ज दिले जाई त्यात भाऊसाहेबांच्या अध्यक्षीय काळातील प्रकरणे सर्वाधिक मंजुर झाल्याचे दिसून येते. कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावे शेती असणे आवश्यक असे ही अट होती. ही अट पुर्ण करणाऱ्या शेतकऱ्यांना पुढील प्रमाणे कर्ज दिले जाई. १०, २०, ५०, शेळी किंवा मेंढी युनिटसाठी कर्ज पुरवठा केला जाई. या योजनेचा भाऊसाहेबांच्या काळात सर्वाधिक शेतकऱ्यांनी लाभ घेतला.[३७]

**६.३.६.४ गांडुळ खत प्रकल्प योजनेस कर्ज पुरवठा व भाऊसाहेबांचे योगदान :-**

शेतीस उत्तम प्रकारचे खत मिळावे या उद्देशाने बँकेच्या माध्यमातुन "गांडुळखत प्रकल्प कर्ज योजनेतंर्गत कर्ज पुरवठा केला जाई. भाऊसाहेबांनी आपल्या अध्यक्षीय काळात ग्रामसभाच्या माध्यमातुन या योजनेचा प्रचार जिल्हयात मोठया प्रमाणात केल्याने भाऊसाहेबांच्या या योजनेचा जिल्हयातील अनेक शेतकऱ्यांनी लाभ घेतला व मोठया प्रमाणात गांडुळ खत निर्मिती करुन उत्तम प्रकारे शेती करण्याचे आपले ध्येय साध्य केले. गांडुळखत निर्मितीच्या ६०० चौ.फुट या लहान प्रकल्पासाठी २०००० हजाराचे कर्ज दोन हप्त्यामध्ये दिले जाई. त्यात शेतकऱ्यांनी स्वगुंतवणुक १०,०००/- रुप्ये करणे अपेक्षित होते. तर २०० मे. टन या मोठया प्रकल्पासाठी २,५०,०००/- दोन हप्त्यामध्ये दिले जाई. त्यात शेतकऱ्यांनी २५ टक्के स्वगुंतवणुक करणे अपेक्षित होते. या प्रमाणे भाऊसाहेबांनी आपल्या अध्यक्षीय काळात शेतकऱ्यांना गांडुळखत पुरविण्यासाठी कर्ज पुरवठा केल्याने शेतकऱ्यांना शेतीस जोडधंदा म्हणून ही योजना लाभदायक ठरली.[३८]

**६.३.६.५ फळबाग योजनेस कर्ज पुरवठा करण्यातील भाऊसाहेबांचे योगदान :-**

अहमदनर जिल्हा हा दुष्काळी असल्याने शेतीस पाण्याची कमतरता कायम भासत असते. यावर मात करण्यासाठी शेतकऱ्यांनी कमी पाण्यावर फळबाग व्यवसायाकडे वळावे म्हणून भाऊसाहेबांनी बँकेतील आपल्या अध्यक्षीय काळात शेतकऱ्यांना फळबागासाठी कर्ज पुरवठा करण्याचे धोरण अवंलबिले होते. फळबाग योजनेतंर्गत आंबा, मोसंबी, संत्री, डाळरंब, सिताफळ, पेरु, चिकु, निमोणी या सारख्या फळपिकासाठी भाऊसाहेबांनी मोठया प्रमाणात

कर्ज पुरवठा केल्याने जिल्हयातील अनेक भागातील शेतकरी फळबाग पिकाकडे वळाले आहेत. फळ बागासाठी पुढीलप्रमाणे कर्ज पुरवठा केला जाई.

**तक्ता क्रं.२३**

| अ. नं. | तपशिल | कर्जाची कमाल मर्यादा रु. | कर्ज वितरणाचे हप्ते | सभासदाची स्वगुंतवणुक रक्कम रु. | कर्जाचा परत फेड कालावधी | कर्ज परत फेड हप्ते संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | आंबा | २०४५५ | ५ वर्षामध्ये | २५% | ६ | ६ |
| २) | मोसंबी | १०२९५ | ५ वर्षामध्ये | २५% | ५ | ५ |
| ३) | संत्री | १२६६० | ५ वर्षामध्ये | २५% | ५ | ५ |
| ४) | डाळींब | २८०६० | ५ वर्षामध्ये | २५% | ५ | ५ |
| ५) | सिताफळ | १३२९५ | ५ वर्षामध्ये | २५% | ४ | ४ |
| ६) | पेरु | ८१२० | ५ वर्षामध्ये | २५% | ४ | ४ |
| ७) | चिकु | १०२३० | ५ वर्षामध्ये | २५% | ५ | ५ |
| ८) | निमोणी | ९६३० | ५ वर्षामध्ये | २५% | ५ | ५ |

जिल्हयातील शेतकरी रोख पैसा मिळवुन देणाऱ्या फळबाग व्यवसायाकडे वळावा. यासाठी जिल्हा बँकेने शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करण्याचे धोरण अवलंबिले होते. भाऊसाहेब थोरात यांनी आपल्या १४ वर्षाच्या अध्यक्ष काळात शेतकऱ्यांना फळबागासाठी मोठया प्रमाणात कर्ज पुरवठा केला. भाऊसाहेबांच्या या धोरणातुन जिल्हयात फळबागा फुलु लागल्या. शेतकऱ्यांच्या हाती रोख पैसा खेळु लागला. यात भाऊसाहेबांचे योगदान महत्वपूर्ण ठरले.[३९]

**६.३.६.६ कांदा चाळ उभारणीस कर्ज पुरवठा :-**

अहमदनगर जिल्हयातील शेतकरी मोठया प्रमाणात कादयांचे उत्पादन घेतात. परंतु साठवणुकीची सुविधा नसल्याने शेतकऱ्यांना उत्पादीत केलेला कांदा शेतातच जमा करुन ठेवणे भाग पडत होते. उन व पाऊस याने मोठया प्रमाणात कांदयाचे नुकसान होत असे. अशा वेळी नाईलाजाने भाव नसतानाही शेतकऱ्यांना कांदा विकणे भाग पडे. कांदा पिकासाठी केलेला खर्चही अनेकवेळा निघत नसे. यातुन शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी भाऊसाहेबांनी बँकेचे अध्यक्ष असतांना कांदा चाळ उभारणी योजना सुरु करुन या योजनेतंर्गत शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात कर्ज पुरवठा करण्याचे धोरण अवलंबिले असता बँकेतील या उपक्रमाचा अनेक शेतकऱ्यांनी लाभ घेतला. कांदा चाळीसाठी देण्यात येणाऱ्या कर्जाचे स्वरुप पुढील प्रमाणे होते.

**कांदा चाळीसाठी कर्ज विरण पध्दती :-**

**तक्ता क्रं.२४**

| अ. नं. | तपशिल | कर्जाची कमाल मर्यादा रु. | कर्ज वितरणाचे हप्ते | सभासदाची स्वगुंतवणुक रक्कम रु. | कर्जाचा परत फेड कालावधी | कर्ज परत फेड हप्ते संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | कांदा चाळ उभारणी ८ मे टन | ७५०० | २ | २५००/- | ५ | ५ |
| २) | १० मे.टन | १५००० | २ | ५००० | ५ | ५ |
| ३) | १५ मे टन | २२७५० | २ | ७५०० | ५ | ५ |
| ४) | २० मे.टन | ३०००० | २ | १०००० | ५ | ५ |
| ५) | २५ मे.टन | ३७५०० | २ | १२५०० | ५ | ५ |

याप्रमाणे कर्ज पुरवठा केला जाऊ लागल्याने शेतकरी आपल्या गरजेनुसार कांदाचाळीसाठी कर्ज घेऊ लागले. भाऊसाहेबांनी आपल्या अध्यक्षीय काळात कांदा चाळीसाठी आलेली प्रकरणे मोठया प्रमाणात मंजुर केली. या सुविधेमुळे शेतकरी कांदा साठवण करुन ठेवु लागला. व भाव आल्यानंतर त्याची विक्री करु लागल्याने शेतकऱ्यांना कांदा पिकापासून मोठया प्रमाणात आर्थिक फायदा होऊ लागला. सध्याही ही योजना बँकेच्या माध्यमातुन मोठया प्रमाणात राबविली जात आहे.[४०]

**६.३.७ शेतकऱ्यांना घरकुल योजनेस कर्ज पुरवठा करण्यातील भाऊसाहेबांचे योगदान :-**

आपला शेतकरी वर्ग वर्षानुवर्षे पाचरटाच्या छपरात, मातीच्या कच्च्या घरात, पत्र्याच्या घरात, उन्हाळा, पावसाळा, थंडीत राहात आला आहे. शेतकऱ्यांनाही सर्व सुविधांनी युक्त आर.सी.सी. सिमेंटमध्ये स्लॅबचे पक्के बांधकाम असणारे घर असावे असे भाऊसाहेबांना मनोमन वाटत होते. म्हणूनच त्यांनी सन १९९७ ते १९९८ साली बँकेचे अध्यक्ष असतांना बँकेच्या माध्यमातुन प्रथमच शेतकऱ्यांसाठी घरकुल योजना राबविली. भाऊसाहेबांनी राबविलेल्या उपक्रमाचे शेतकऱ्यांनी स्वागतच केले. आणि अनेक शेतकऱ्यांनी या योजनाचा लाभ घेतला. हे कर्ज अत्यअल्प व्याजदराने शेतकऱ्यांना दिले जाते. भाऊसाहेबांच्या या उपक्रमामुळे अनेक शेतक्यांचे सुंदर घराचे स्वप्न साकार झाले.

या योजनेंतर्गत शेतकऱ्यांकडे असणाऱ्या धारण क्षेत्रानुसार त्यांना कर्ज देण्याचे धोरण बँकेने राबविले :-

**शेतकऱ्यांना घरकुलासाठी केलेल्या कर्ज पुरवठयाचे स्वरुप :-**

**तक्ता क्रं.२५**

| अ.नं. | चौ.फुट | कर्जमर्यादा आर.सी.सी | लोड बेरींग स्लॅब | लोखंडी पत्रा |
|---|---|---|---|---|
| १) | ४०० | ४,८०,००० | ३,८४,००० | २,७२,००० |
| २) | ५०० | ६,००,००० | ४,८०,००० | ३,४०,००० |
| ३) | ६५० | ७,८०,००० | ६,२४,००० | ४,४२,००० |
| ४) | ७५० | ९,००,००० | ७,२०,००० | ५,१०,००० |
| ५) | ८५० | १०,२०,००० | ८,१६,००० | ५,७८,००० |

या स्वरुपात शेतकऱ्यांचे धारणक्षेत्र व मागणी नुसार शेतकऱ्यांना १०,२०,०००/- पर्यंत कर्ज पुरवठा करण्याच्या भाऊसाहेबांच्या धोरणामुळे अनेक शेतकऱ्यांना सर्व सुविधांनी परिपुर्ण घर असण्याचे स्वप्न साकार झाले आहे. ही योजना प्रथमच भाऊसाहेबांनी बँकेच्या माध्यमातुन सुरु केल्याने त्यात भाऊसाहेबांचे योगदान महत्वपुर्ण ठरले आहे. आजही अनेक शेतकरी या योजनेचा मोठया प्रमाणात लाभ घेत आहेत.[४१]

**६.३.८ क्रेंद्र शासन पुरस्कृत ग्रामीण गोदाम योजनेस कर्ज पुरवठा धोरण :-**

अहमदनगर जिल्हयातील प्राथमिक शेती सहकारी संस्था व बिगरशेती सहकारी संस्थांना माल साठवण करण्यासाठी गोदामाची आवश्यकता असते. तसेच शेतकऱ्यांनाही आपले उत्पादीत अन्नधान्य साठवण सुविधा नसल्याने त्यांना धान्य उत्पादनानंतर ते लगेच विकावे लागत असे. या समस्या लक्षात घेता केंद्र शासनाने जिल्हा बँकामार्फत गोदाम योजना राबविण्याचे धोरण घेतले असता त्यासाठी केंद्र शासनाकडून नाबार्डमार्फत २५% ते ३०% अनुदान प्राप्त होत असे. बाकी अनुदान जिल्हा बँकेला दयावे लागे. केंद्र शासनाची ही योजना भाऊसाहेब थोरात जिल्हा बँकेचे अध्यक्ष असतांना त्यांनी मोठया प्रमाणात राबविली. जिल्हयातील साखर कारखाने, दुध संघ, दुध डेअरी, सहकारी सोसायटया, विविध ग्रामीण सोसायटया, ग्रामउदयोग सोसायटया, कारागिराच्या सोसायटया अशा विविध संस्थांना गोदाम बांधकामासाठी बँकेच्या माध्यमातून भाऊसाहेबांनी कर्ज पुरवठा केला. गोदाम बांधकामासाठी इस्टीमेंटच्या ७५% रक्कमेपैकी केंद्र शासनाकडून २५% जिल्हा बँकेकडुन ५०% व स्वगुंतवणुक २५% या स्वरुपात इस्टीमेंटच्या स्वरुपानुसार कर्जपुरवठा केला जाई.

ही कर्ज रक्कम तीन हप्ते करुन देत असत. कर्जाची परत फेड कालावधी ११ वर्षे असुन कर्ज रक्कम १० हप्ते या स्वरुपात भरणे भाग पडे.

भाऊसाहेबांनी या योजनेसाठी दिलेल्या योगदानामुळे जिल्हयातील ग्रामउदयोगांना मोठा दिलासा मिळाला होता. तसेच विविध सहकारी सोसायटया व इतर संस्थांनीही या योजनेचा मोठया प्रमाणात लाभ घेतला. यात भाऊसाहेबांचे योगदान महत्वपूर्ण होते.[४२]

**६.३.९ विविध अनुदान सुविधा व भाऊसाहेबांचे योगदान :-**

विविध संस्था शेतकऱ्यांना मदत म्हणुन अनुदान स्वरुपात रक्कम शेतकऱ्यांना देत असतात. यात जिल्हा परिषद, महाराष्ट्र राज्य खादी ग्रामद्योग मंडळ, महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, सोशल सेंटर आदी मार्फत शेतकऱ्यांना अनुदान स्वरुपात आर्थिक साहय मिळत असे. भाऊसाहेब थोरात जिल्हा बँकेचे अध्यक्ष असताना त्यांनी या विविध संस्थांच्या अनुदान सुविधांचा जिल्हयातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांना लाभ व्हावा यासाठी जिल्हा बँकेच्या माध्यमातून घेतल्या जाणाऱ्या ग्रामसभातुन जनजागृती केली. त्यामुळे मोठया प्रमाणात प्रकरणे जिल्हा बँकेकडे येऊ लागली. अशा वेळी भाऊसाहेबांनी काळजीपूर्वक बँकेकडे आलेली प्रकरणे, त्या त्या संस्थेकडे वेळोवेळी पाठविण्यात महत्वपूर्ण योगदान दिल्याने या विविध संस्थांच्या अनुदान योजनेचा लाभ जिल्हयातील अनेक शेतकऱ्यांना मिळाला.

इ.स. १९९५ ते १९९९ या वर्षी भाऊसाहेब बँकेचे अध्यक्ष होते. या काळात विविध संस्थाकडून २० ते ५०% पर्यंत अनुदान शेतकऱ्यांना मिळवुन देण्यासाठी भाऊसाहेबांनी बँकेच्या माध्यमातुन पुढाकार घेऊन पाठपुरावा केला. त्यामुळे पुढीलप्रमाणे शेतकऱ्यांना लाभ मिळाला.

इ.स. १९९५-१९९६ मध्ये २९१८ सभासदांना ११४.१० लाखाचे अनुदान मिळवुन दिले. तर इ.स.१९९६-१९९७ मध्ये २८६८ सभासदांना ११९.०१ लाखाचे अनुदान मिळवुन दिले. तर इ.स.१९७-१९९८ यावर्षी २२४७ सभासदांना १०३.९३ लाखांचे अनुदान मिळवुन दिले.

इ.स.१९९८-९९ मध्ये २०६८ शेतकऱ्यांना ९८.२९ लाखाचे अनुदान मिळवुन दिले. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त अनुदान मिळवुन देण्यात भाऊसाहेबांचे योगदान महत्वपूर्ण ठरले आहे. त्याच्या योगदानामुळे शेतकऱ्यांना शेती भांडवलासाठी साहय झाले.[४३]

**६.३.१० शेतकरी सभासदांसाठी अपघात विमा पॉलिसी :-**

भाऊसाहेब थोरात दुरदृष्टीचे सहकारतज्ञ होते. आपल्या शेतकरी बांधवांना संकटप्रसंगी आर्थिक मदत मिळावी यासाठी भाऊसाहेबांनी इ.स.१९९७-९८ यावर्षी अध्यक्ष असताना बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अपघात विमा योजना लागु केली. यासाठी बँकेशी संलग्न असणाऱ्या प्राथमिक सेवा सहकारी संस्थांच्या सभासदांकरिता सुरु केलेल्या या योजनेसाठी सभासदाने अल्पसा ७० रुपयांचा १२ वर्षासाठी विमा हप्ता भरल्यास अशा सभासदास एक लाख रुपयांचे विमा संरक्षण मिळवुन देण्यात सर्वस्वी भाऊसाहेबांचे योगदान होते. कारण ही कल्पनाच मुळात भाऊसाहेबांनी सुचविली व संचालक मंडळाकडून मंजुरही करुन घेतली.

या विमा पॉलिसीच्या काळात सभासदांचा दुर्देवाने अपघाती मृत्यु झाल्यास अगर त्यास कायमस्वरुपी पुर्णपणे अपंगत्व आल्यास त्यांच्याकडील सेवा सहकारी संस्थेच्या कर्जाची संपूर्ण बाकी या रक्कमेतुन भरुन उर्वरित रक्कम त्याच्या वारसांना दिली जाते. भाऊसाहेबांनी बँकेच्या माध्यमातुन ही जी योजना सुरु केली या योजनेचा लाभ जिल्हयातील शेतकरी वर्ग आजही घेत आहे. यातुन अपंगत्व आलेल्या सभासदास आर्थिक साहय मिळाले आहे. त्याच प्रमाणे एखादया सभासदाचा मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबियांना अर्थसाहय मिळत आहे. या योजनेत भाऊसाहेबांचे योगदान महत्वपूर्ण आहे.[४४]

**६.३.११ भारतीय सैनिकांसाठी आर्थिक साहय :-**

आपल्या देशाबांधवांच्या संरक्षणासाठी जे सैनिक जिवाची पर्वा न करता सिमेवर आपल्या छातीवर बंदुकीच्या गोळया झेलतात. आपल्या देशासाठी वेळप्रसंगी बलिदानही देतात. अशा शहिद आपल्या बांधवाच्या कुटुंबीयांना थोडेफार बँकेचे साहय व्हावे व त्यांच्या कुटंबियांना दिलासा मिळावा यासाठी बँक सातत्याने अशा कुटुंबीयांना आर्थिक साहय करत आली आहे.

कारगिल ऑपरेशन करत असताना अनेक भारतीय जवानांना आपले बलिदान दयावे लागले. शहिद जवानांच्या कुटुंबियांना "कुटुंब कल्याण निधी" म्हणुन बँकेद्वारे धर्मदाय निधीतुन २ लाख ५ हजार रुपये देण्यात आले. तसेच बँक सेवकांतर्फे ४ लाख ७६ हजार रुपये देण्यात आले.

देशसेवा करणाऱ्या आपल्या बांधवासाठी भाऊसाहेबांनी सातत्याने बँकेच्या माध्यमातुन आर्थिक सहाय्य करण्याचे धोरण अवलंबिले. भाऊसाहेबाच्या या धोरणामुळे देशसेवा

करणाऱ्या शहिद जवानांच्या कुटंबियांना आर्थिक सहाय्य केले. भाऊसाहेबांच्या या सातत्याने सहकार्य करण्याच्या धोरणामुळे जिल्हा बँकेचे कार्य जिल्हयापुरते नसुन महाराष्ट्रातही अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे नाव आज घेतले जाते.४५

**६.३.१२ बॅकेच्या माध्यमातून घेतल्या जाणाऱ्या ग्रामसभातील भाऊसाहेबांचे योगदान :-**

भाऊसाहेब थोरात हे अहमदनगर जिल्हयातील सहकारातील राजहंस म्हणून ओळखले जात. सहकार हाच ध्यास आणि सहकार हाच श्वास मानणाऱ्या भाऊसाहेबांनी अनेक सहकारी संस्था स्थापन केल्या. वाढविल्या, फुलविल्या अशा सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांचा अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेत १९६० साली प्रवेश झाला. ते १४ वर्ष अध्यक्ष तसेच उपाध्यक्ष, संचालक असे ३८ वर्षीय बँकेतील आपल्या कार्यकाळत भाऊसाहेबांनी गाजवत बँकेच्या माध्यमातुन त्यांनी जिल्हयातच नव्हे तर महाराष्ट्रात आपली एक वेगळी ओळख निर्माण केली.

जेव्हा अहमदनगर जिल्हा बँकेच्या ग्रामसभा होत असत. अशा ग्रामसभामधून भाऊसाहेबा बँकेचे अध्यक्ष असतांना आपल्या जीवनातील सहकारातील अनेक प्रसंग उलगडुन सांगत असत. व उपस्थित जनसमुदायांचे लक्ष वेधुन घेत असत. आणि हळुवारपणे जिल्हा बँकेविषयी माहिती सांगण्यास सुरुवात करत असत. जिल्हा बँकेचे ग्रामसभा आयोजनाचे उद्दिष्टये स्पष्ट करत. नंतर जिल्हा बँक ही जिल्हयातील सर्वासांठी आहे असे सांगुन बँकेच्या माध्यमातुन शेतकरी, लघुउदद्योजक, मोठे उदयोग, सहकारी संस्था, बँकेचा कर्मचारी वर्ग, बँकेचे शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रिडा, धार्मिक क्षेत्रातील योगदान तसेच बँकेच्या माध्यमातुन राबविल्या जाणाऱ्या विविध कर्ज योजनेची माहिती सावकाशपणे देत असत. त्यांच्या या भाषणाचा प्रभाव इतका होता की त्या भाषणाचा जिहयात प्रचार होऊन जिल्हा बॅंकेकडे अनेक उदयोगासाठी मोठया प्रमाणात प्रकरणे येत असत. भाऊसाहेब हे आलेले प्रकरणे जलदगीतने मंजुर करत असे. त्यातुन जिल्हयाच्या आर्थिक प्रगतीची गती वाढली. जिल्हयात कृषी क्रांती, हरितक्रांती घडुन आली. ती भाऊसाहेबांच्या दुरदृष्टी धोरणामुळेच. बँकेतील आपल्या ३८ वर्षापैकी १४ वर्ष अध्यक्ष काळही भाऊसाहेबांनी गावविला. त्यांच्या योगदानामुळेच जिल्हा बँक आज सर्वोच्च स्थानी आहे.[४६]

### ६.३.१३ ग्रामीण कारागिरांना व ग्रामिण सोसायटयांना कर्ज पुरवठा :-

भाऊसाहेब जिल्हा बँकेचे १९६५ साली अध्यक्ष झाले. तेव्हा जिल्हयाची परिस्थिती फार वाईट होती. ग्रामीण भागात बारा बलुतेदार पध्दती रुढ होती. या बलुतेदारांना भांडवला अभावी आपले उदयोग बंद करावे लागत. यावर मात करण्यासाठी भाऊसाहेबांनी जिल्हा बँकेच्या माध्यमातुन जिल्हयातील १३ तालुक्यात ग्रामोद्योग संघ स्थापन करुन त्यांच्या मार्फत बलुतेदारांना कर्ज पुरवठा करण्याचे धोरण अवलंबविले. यातुन गावागावातील लोक संघटीत होऊन एकत्रीतपणे जिल्हा बँकेकडे ग्रामीण सोसायटी बांधकाम व भांडवलासाठी प्रकरणे पाठवु लागली. भाऊसाहेबांनी आपल्या अध्यक्षीय १९६५ ते १९६९ तसेच १९७३ ते १९७७ या काळात अशा ग्रामीण सोसायटयांना मोठया प्रमाणात कर्ज वितरण केले. यातुन ग्रामीण कारागिरांच्या कलेला वाव मिळुन त्यांचा रोजंदारीचा प्रश्न सुटला गेला. दुष्काळी परिस्थितीत ते आपल्या उदयोगातुन उपजिवीका भागवु लागले. बलुतेदारांना जीवन जगण्याचा आधार जिल्हा बँकेच्या माध्यमातुन भाऊसाहेबांनी दिला.[४७]

### ६.३.१४ आदिवासी सहकारी सोसायटयांना कर्ज पुरवठा व त्यात भाऊसाहेबांचे योगदान :-

अहमदनगर जिल्हयातील पूर्वेकडील भाग सहयाद्रीच्या पर्वत रांगाना व्यापलेला असुन हा आदिवासी भाग म्हणून ओळखला जातो. या भागात राज्य शासनाने स्वतंत्र ट्रायबल योजनेखाली अकोले तालुक्यात ५० सेवा संस्थांचे एकत्रीकरण करुन ८ मध्यवर्ती आदिवासी संस्था निर्माण केल्या होत्या. भाऊसाहेबांनी १९६५ ते १९६९ या काळात बँकेचे अध्यक्ष असतांना अकोले तालुक्यातील या आदिवासी संस्थांना आर्थिक साहय देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला. बँकेने या सोसायटयांच्या सभासदांपैकी ६६९ अल्प भुधारकांना २ लाखांचे कर्ज मंजुर केले. तसेच शेतकऱ्यांना पीक कर्ज योजनेनुसार ३.८२ लाखाचे कर्ज मंजुर केले. एवढेच नव्हे तर ५१ सभासदांना २.१५ लाखाचे पंपसेट, ऑईल इंजिन, पाईप लाईन, संकरीत गायी यासाठी कर्ज दिले.

वास्तविक पाहाता अकोले तालुका हा आदिवासींचा तालुका असल्याने व उत्पन्नाची साधने उपलब्ध नसल्याने अकोले तालुक्यांच्या शेतकऱ्यांना व गरजवंताना कोणतीही बँक कर्ज देण्यास टाळाटाळ करत असत. परंतु चाणाक्ष भाऊसाहेबांकडे दुरदृष्टी होती. आपल्या जिल्हयातील कोणताही भाग आर्थिक दृष्टीने कमकुवत राहु नये. सर्व जिल्हयाचा विकास व्हावा. तसेच जिल्हा बँकेचा संपूर्ण जिल्हयासाठी उपयोग व्हावा या हेतुने भाऊसाहेबांनी संचालक मंडळापुढे अकोले तालुक्यातील शेतकऱ्यांना कर्ज देण्याचा विषय मांडला असता

भाऊसाहेबांच्या या योजनेस प्रारंभी विरोध झाला. परंतु भाऊसाहेबांनी सविस्तरपणे आपले विचार मांडल्यानंतर संचालक मंडळाने भाऊसाहेबांच्या या योजनेस मंजुरी दिली. भाऊसाहेबांनी कर्ज परतफेडीचा धोका पत्करुन अकोले तालुक्यातील शेतकऱ्यांनाही कर्जाचा लाभ मिळवुन दिला. भाऊसाहेबांच्या या योगदानामुळे आज अकोले तालुक्यातील बहुतेक भाग हा सुजलाम सुफलाम झाला आहे. यात भाऊसाहेबांचे महत्वपूर्ण योगदान आहे.[४८]

**६.३.१५ नैसर्गिक आपत्ती प्रसंगी बँकेचे आर्थिक साहय व त्यात भाऊसाहेब थोरात यांचे योगदान :-**

महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्हा दुष्काळी जिल्हा म्हणून ओळखला जातो. सातत्याने पडणाऱ्या दुष्काळ प्रसंगी ज्या गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध नाही. अशा गावांना पिण्याच्या पाण्यासाठी टाक्यांचे वाटप जिल्हा बँकेने केले. तसेच महाराष्ट्रात अतिवृष्टी, भुकंप, सुनामी, दुष्काळ अशा नैसर्गिक संकटप्रसंगीही बँकेने त्या त्या भागातील जनतेसाठी दिलासा म्हणुन आर्थिक मदत केली. नैसार्गिक संकटप्रसंगी जिल्हा बँकेच्या माध्यमातून आजपर्यंत केलेली मदत पुढीलप्रमाणे :-

**नैसर्गिक संकटप्रसंगी जिल्हया बँकेने महाराष्ट्रातील जनतेला केलेले आर्थिक सहाय्य :-**

**तक्ता क्रं.२६**

| अ.नं. | तपशिल | आर्थिक मदत रुपये |
|---|---|---|
| १) | सन १९७२ दुष्काळी परिस्थितीत जिल्हयातील विद्यार्थ्यांना मदत | २५,०००/- |
| २) | मोवी, गुजराथ, विदर्भ अतिवृष्टी मदत | ३५,०००/- |
| ३) | जळीतग्रस्तांना मदत | २५,०००/- |
| ४) | सन १९८३ दुष्काळी परिस्थितीत जिल्हयातील विद्यार्थ्यांना मदत | १९,०००/- |
| ५) | सन १९८३ कोकण पुरग्रस्तांना मदत | १,००,०००/- |
| ६) | सन १९८९ अतिवृष्टी मदत | ४,००,०००/- |
| ७) | सन १९९२ दुष्काळ पाणी टंचाई टँकरसाठी मदत | १,३७,५००/- |
| ८) | सन १९९३ दुष्काळ, पाणी टंचाई टँकरसाठी मदत | १,३७,५००/- |
| ९) | सन १९९५ दुष्काळ, पाणी टंचाई टँकरसाठी मदत | ७०,०१५/- |

| अ.नं. | तपशिल | आर्थिक मदत रुपये |
|---|---|---|
| १०) | किल्लारी भुकंप ग्रस्तांना मदत | १,००,०००/- |
| ११) | ओरीसा चक्रीवादळग्रस्तांना मदत | २,५१,०००/- |
| १२) | गुजराथ भुकंप | ५,५०,०००/- |
| १३) | सुनामी ग्रस्तांना मदत | १०,००,०००/- |
| १४) | अतिवृष्टीग्रस्तांना मदत | १०,००,०००/- |

नैसर्गिक आपत्ती प्रसंगी बॅकेच्या माध्यमातून जे आर्थिक साहय करण्यात आले त्यात भाऊसाहेब थोरात यांचे योगदान महत्वपूर्ण आहे. भाऊसाहेब थोरात आपल्या अध्यक्षीय काळात अहमदनगर जिल्हयातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील जनतेला दिलासा देण्यासाठी भुकंप, चक्रीवादळ, सुनामी, दुष्काळ, अतिवृष्टी, अशा नैसर्गिक संकट प्रसंगी बँकेच्या माध्यमातून वेळोवेळी आर्थिक साहय केले. आजपर्यंत बँकेच्या माध्यमातुन अशा नैसर्गिक संकटप्रसंगी ५०.८४ लाखाचे आर्थिक साहय करण्यात आले आहे.[४९]

**६.३.१६ विविध संघटनासाठी केलेले अर्थसहाय्य :-**

अहमदनगर जिल्हा बँकेने नेहमीच मानवतेची भूमिका निभावली आहे. बँकेच्या स्थापनेपासून आजतागायत बँकेने नेहमीच सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा, धार्मिक अशा विविध संघटनांना वेळोवेळी आर्थिक साहय केले. ते पुढीलप्रमाणे :-

अहमदनगर जिल्हा बँकेने विविध संघटनांना केलेले अर्थसाहय.

**तक्ता क्रं.२७**

| अ.नं. | तपशिल | आर्थिक साहय्य रक्कम |
|---|---|---|
| १) | विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी १७ संस्था संघटनांना अर्थसहाय्य | १,७६,०००/- |
| २) | हिंद केसरी स्पर्धा आयोजनासाठी | २,००,०००/- |
| ३) | ७० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मेलनाकरिता, सन १९९६. | ५,००,०००/- |
| ४) | जागतिक मराठी अकादमी अधिवेशन, अहमदनगर, (शोध मराठी मनाचा) | ५,००,०००/- |
| ५) | अखिल भारतीय नाटय संम्मेलन आयोजन | १,००,०००/- |
| ६) | परिसंवाद, खेळातील प्राविण्य इ.साठी मदत | १,५३,०००/- |

जिल्हा बँकेचे विविध संघटनांना आर्थिक साहय करण्याच्या धोरणात भाऊसाहेबांचे योगदान महत्वाचे आहे. भाऊसाहेबांनी आपल्या १४ वर्षीय अध्यक्षीय काळात जिल्हयातील क्रीडापटुसाठी क्रीडास्पर्धा आयोजनासाठी अर्थसाहय केले. मराठी साहित्य रसिकांसाठी ७० व्या अखिल भारतीय मराठी साहित्या संम्मेलनास अर्थसाहय, नाटयरसिकांसाठी अखिल भारतीय नाटय संम्मेलनास अर्थ साहय, याशिवाय परिसंवाद, खेळातील प्राविण्य यासाठी भाऊसाहेबांनी मोठया प्रमाणात आर्थिक साहय केले. भाऊसाहेबांच्या या धोरणातुन जिल्हयातील क्रीडापटु, रसिक प्रेमी, साहित्यप्रेमी यांच्या कलागुणांना चालना मिळाली.[५०]

**६.३.१७ सभासद शेतकरी व बँक सेवकांना वैद्यकिय उपचारासाठी आर्थिक सहाय्य :-**

मानवतेच्या भावनेतुन बँकेने सभासद शेतकरी, बँक सेवक, इ. वैद्यकीय उपचारासाठी बँक अर्थसाहय करते. भाऊसाहेब थोरात यांनी आपल्या अध्यक्षीय काळात जिल्हयातील सभासद शेतकरी तसेच बँक सेवकांना वेळोवेळी आर्थिक सहाय्य करण्याचे धोरण अवलंबविले. सुवर्णमहोत्सवी वर्षापर्यंत बँकेच्या माध्यमातुन वैद्यकिय उपचारासाठी बँकेच्या माध्यमातुन सभासद शेतकरी व बँक सेवकांना केलेले आर्थिक साहय.

प्राथमिक सहकारी संस्थेचे सभासद शेतकरी व बँक कर्मचारी यांना वैद्यकीय उपचारासाठी बँकेने केलेले अर्थसाहय :-

**तक्ता क्रं.२८**

| अ.नं. | तपशिल | अर्थिक साहय्य |
|---|---|---|
| १) | १३७१ शेतकरी सभासदांना अर्थ साहय्य | ६७,६६,०००/- |
| २) | बँक सेवकांना आर्थिक मदत | १६,६०,०००/- |
| | **एकुण आर्थिक साहय्य रु.** | **८४,२६,०००/-** |

बँकेने आजपर्यंत मानवतेच्या दृष्टीकोनातुन एक समाजिक जबाबदारी समजुन जिल्हयातील सभासद शेतकरी व बँक सेवकांसाठी सुवर्ण महोत्सवी वर्षापर्यंत रु.८४,२६,०००/- साहय्य केले आहे.[५१]

**६.३.१८ बँक सेवकांसाठी बँकेचे उपक्रम :-**

जिल्हयाच्या सर्वांगीण विकासाचा महामंत्र घेऊन १९५८ पासून स्वार झालेल्या अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेने जिल्हयाच्या विकासासाठी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. जिल्हयाचा विकास करत असताना संचालक मंडळाने सेवक वर्गाकडेही लक्ष दिले आहे.

१) महिला बँक सेविकांना बाळंतपणासाठी ३ महिने पगारी रजा दिली जाते.

२) बँक सेवकांना सर्व्हिस फंड.

३) दिवाळी बोनस

४) वाहन कर्ज

५) गृह कर्ज

६) आजारी रजा

याशिवाय शासकीय नियमानुसार असणाऱ्या सर्व सुट्टया दिल्या जातात. यात भाऊसाहेबांनी आपल्या अध्यक्षीय काळात बँकेच्या सेवकवर्गाकडे लक्ष दिल्याचे दिसुन येते. बँकेच्या माध्यमातुन राबविल्या जाणाऱ्याच्या सुविधांचा भाऊसाहेबांनी बँक सेवकांना व शेतकरी सभासदांना वेळेवर मिळवुन देण्यात भाऊसाहेब नेहमी दक्ष असत. अशा सुविधांमुळे बँकेतील सवेकवर्ग आपले काम तत्परतेने करत असल्याचे दिसुन येते. सेवकांच्या या तत्पर सेवेमुळेचे अहमदनगर जिल्हा सहकारी बँक ही महाराष्ट्रातील एक आदर्श बँक म्हणून ओळखली जाते.[५२]

**६.३.१९ व्हेंचर कॅपिटल योजना :-**

नाबार्ड बँकेची ही योजना अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेने विकास कक्षांतर्गत राबविली. गाई, म्हशी यासाठी गोठयांच्या बांधकामाकरीता एकुण कर्ज मंजुरीच्या ४०% रक्कमेवर व्याज घेतले जात होते. तर ५०% रक्कमेचे व्याज नाबार्ड निधीतुन मिळणार होते. भाऊसाहेबांनी बँकेच्या ग्रामसभेअंतर्गत या योजनेचा जिल्हयात मोठया प्रमाणात प्रचार केला. भाऊसाहेबांच्या या प्रचार मोहिमेनंतर जवळपास ३ हजार सभासदांनी आपले प्रस्ताव बँकेकडे पाठविले. ३ हजार सभासदांचे ४० कोटी रुपयांचे प्रस्ताव भाऊसाहेबांनी नाबार्ड बँकेकडे मंजुरीसाठी पाठविले. त्यातील ३७२ सभासदांचे प्रस्ताव मंजुर झाले आणि त्या ३७२ सभासदांना ८३२.८४ लाख मंजुर झाले. ही रक्कम केवळ भाऊसाहेब थोरात यांच्या दुरदृष्टीमुळे शेतकऱ्यांना मिळाली होती.[५३]

**६.३.२० सर्वांगिण ग्राम विकास (दत्तक खेडी) योजना :-**

या योजने अंतर्गत भाऊसाहेब थोरात बँकेचे अध्यक्ष असतांना इ.स.१९९८-१९८९ या वर्षी १४ गावांची निवड केली. या गावातील शेतकरी, शेतमजुर व भुमिहीन मजुरांचे उत्पन्न दुप्पट व्हावा. त्यांना रोजगार उपलब्ध व्हावा. असे उद्दिष्टये होते. त्यासाठी १४ गावाचा सर्व्हे करुन १३९ सभासदांना १३.१७ लाख इतके कर्ज मंजुर केले. या योजनेतुन असे दिसुन

आले की, शेतकरी, शेतमजुर, भुमिहिनांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांना रोजगारांच्या संधी उपलब्ध झाल्या. ते केवळ भाऊसाहेबांनी बँकेत राबविलेल्या योजनेमुळेच शक्य झाले.[५४]

**६.३.२१ सांस्कृतिक क्षेत्र विकासाच्या माध्यमातून भाऊसाहेब थोरात यांचे जिल्हावासियांच्या कलागुणांना चालना देण्यातील योगदान :-**

अहमदनगर जिल्हयात सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक परिवर्तनाची लाट निर्माण करण्यास अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे योगदान महत्वपूर्ण आहे. बँकेच्या स्थापनेपासून बँकेला जे नेतृत्व लाभले ते सहकारातील जाणते व दुरदृष्टी असणारे आहेत. त्यात भाऊसाहेब थोरात यांना तर अहमदनगर जिल्हयातील सहकारातील राजहंस म्हणून ओळखले जाते. त्यांच्या दुरदृष्टी धोरणामुळेच ते १९७३ ते १९७७ या वर्षी बँकेचे अध्यक्ष असतांना अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या मुख्य शाखेच्या बांधकामाचे काम हाती घेतले. या मुख्य शाखेच्या बांधकामाच्या तळमजल्यावर सभागृह बांधण्याचा प्रस्ताव संचालक मंडळापुढे ठेवला. भाऊसाहेबाच्या या धोरणास संचालक मंडळानेही मान्यता दिली. सन १९७५ साली बँकेच्या बांधकामास सुरुवात होऊन तळ मजल्यावरील सभागृहाचे बांधकाम १९७७ पर्यंत पुर्ण झाले. त्यावेळचे भारताचे उपपंतप्रधान मा.यशवंतराव चव्हाण यांचे शुभहस्ते व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांचे हस्ते उदघाटन झाले. पुढे या सभागृहाचे नाव यशवंतराव चव्हाण सभागृह असे ठेवण्यात आले.

या सभागृहामुळे जिल्हयातील सांस्कृतिक चळवळीला गती मिळाली. या सभागृहात अनेक एकांकी स्पर्धा, विविध गुणदर्शन कार्यक्रम, शाळांचे स्नेहसंमेलने, आर्केस्ट्रा, नाटय कार्यशाळा, लोकसंगिताचे कार्यक्रम आदी कार्यक्रम होत आहे. जिल्हयातील कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळाले आहे. सन १९९० पासून बँकेने राज्य नाटय स्पर्धेसाठी स्वतंत्र केंद्र सुरु केले. यातुन विविध कलाकारांच्या कलागुणांना वाव मिळाला आहे. ग्रामीण भागातील कलाकार शोधण्याचे व त्यांना संधी प्राप्त करुन देण्याचे काम या सभागृहाच्या माध्यमातुन बँकेने आज पर्यंत केले आहे.

अहमदनगर जिल्हयास साहित्य, सांस्कृतिक इतिहासाची मोठी परंपरा आहे. संगमनेरचे कवी आनंद फंदी, हिवरगाव पावसा गावाची पवळा हिवरगावकर या कलाकारांप्रमाणे पुढे मधुकर तोरडमल, रघुनाथ क्षिरसागर, अनिल क्षिरसागर, सादाशिव अमरापुरकर, वसंतराव पाठक आदी नाटय चित्रपट, संगित क्षेत्रातील प्रतिभावंत कलाकाराची उज्वल पंरपरा जिल्हयास लाभली आहे.

या नाटयगृहात केवळ सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक अशा कार्यक्रमाबरोबरच महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामवंत तज्ञ, शिक्षणतज्ञ, कला विज्ञान व न्याय क्षेत्रातील नामवंतांनी या सभागृहास भेटी दिल्या आहेत.

आर्थिकदृष्टया माणूस कितीही संपन्न असला तरी त्यास मानसिकदृष्या तंदुरुस्त ठेवण्याचे काम संगीत,नाटय व साहित्य याद्वारे सांस्कृतिक क्षेत्रच करत असते. आणि हेच काम अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेने केले आहे. जिल्हा बँकेचे सभागृह बांधण्याची कल्पना भाऊसाहेबांच्या विचारातुन पुढे आली. त्या सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांचे जिल्हयातील नाटय रसिक आजही आभार मानतात.[५५]

**६.३.२२ विविध शैक्षणिक संस्थांना बँकेचे आर्थिक साहय्य व त्यात भाऊसाहेबांचे योगदान :-**

स्वतंत्रपुर्व काळात इ.स.१८३८ साली स्वातंत्र्यपुर्व काळात १९३८ साली अहमदनगर येथे आलेल्या खिस्ती मिशनऱ्यांनी शिक्षणाचे महत्व ओळखुन फराहबाग येथे पहिली मुलींची शाळा सुरु केली. तर १८१७ साली वैद्य गंगाधरशास्त्री गुणे यांनी आयुर्वेद कॉलेज सुरु केले. इ.स.१९४७ साली रेव्हरंट डॉ.भा.वा.हिवाळे यांनी अहमदनगर कॉलेज सुरु केले. तर इ.स.१८३१ साली खिस्ती मिशनऱ्यांनी नगर शहर व जवळपासच्या खेडयात व्हॉलंटरी शाळा सुरु केल्या. या सर्व शाळातुन त्या वेळी जवळपास १० हजार विद्यार्थी लिहीण्या वाचण्यास शिकले. इ.स.१९६० पर्यंत अहमदनगर जिल्हयात फारशा शिक्षण सुविधा नव्हत्या. अहमदनगर कॉलेज हे एकमेव पदवी व पदव्युत्तर शिक्षण देणारे महाविद्यालय होते. १९५९ साली महाविद्यालयीन शिक्षण घेणारे केवळ १२४३ विद्यार्थी होते.

महात्मा फुले यांनी शिक्षणाविषयी आपले विचार काव्य स्वरुपात मांडले आहे.

"विद्या विनयाने शोभते" या युक्तीप्रमाणे महात्मा फुले यांनी म्हटल्याप्रमाणे,

विद्येविना मती गेली । मतीविना नीति गेली ।
नीतीविना गती गेली । गतीविना वित्त गेले ।
वित्ताविना शुद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले ।

महात्मा फुले यांच्या विचाराचे भाऊसाहेब समर्थक होते. ते जिल्हा बँकेचे अध्यक्ष असताना त्यांनी जिल्हयातील त्यांनी जिल्हयातील शिक्षणाची ही दयनिय अवस्था दुर करण्यासाठी सातत्याने बँकेच्या संचालक मंडळापुढे जिल्हयातील शिक्षण संस्थाविषयी विषय मांडत असत.

भाऊसाहेबांनी आपल्या अध्यक्षीय काळात अहमदनगर, अकोले, पारनेर, अकोले, शेवगांव, पाथर्डी, जामखेड, महिला महाविद्यालय, अहमदनगर, न्यु लॉ कॉलेज, अहमदनगर, सहकार प्रशिक्षण केंद्र अहमदनगर आदी १७ संस्थांना नवीन महाविद्यालये सुरु करण्यासाठी १३,२०,०००/- चे अर्थ सहाय्य केले. भाऊसाहेबांच्या या साहय्य करण्याच्या धोरणामुळे व प्रोत्साहानामुळे नव्याने १७ महाविद्यालये सुरु झाले.

वसंतदादा पाटील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतांना त्यांनी व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी विना अनुदान तत्वावर अभियांत्रिकी महाविद्यालय, वैदयकिय महाविद्यालय, तंत्रनिकेतन, आय.टी.आय. आयुर्वेद महाविद्यालय, सुरु करण्यास मान्यता दिली असता या संधीचा फायदा घेत जिल्हयातील अनेक सहकार महर्षींनी, विचारवंतानी, शिक्षण चाहत्यांनी अशी महाविद्यालये काढण्याची तयारी दर्शविली, त्यातुनच अहमदनगर, संगमनेर, राहुरी, नेवासा, राहाता, पाथर्डी तालुक्यात असे व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करणाऱ्या संस्थांना अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेने अशा ९ संस्थांना ५२ लाख ५० हजार एवढे आर्थिक सहाय्य केले. त्याचप्रमाणे माध्यमिक शिक्षणाच्या सुविधाही सर्व तालुक्यात असाव्यात. यासाठी अहमदनगर जिल्हा बँकेने १०१ माध्यमिक विद्यालयाच्या उभारणीकरिता ११ लाख ६० हजाराचे अर्थ साहय्य केले. जिल्हा बँकेच्या या योगदानामुळे आज जिल्हयात जवळपास १००० चे आसपास माध्यमिक विद्यालये ज्ञानदानाचे काम करित आहेत. भाऊसाहेबांनी बँकेतील आपल्या १४ वर्षाच्या काळात अनेक शिक्षण संस्थांना मोठया प्रमाणात आर्थिक साहय्य देण्याचे धोरण अवलंबिले होते. भाऊसाहेबांच्या या योगदानामुळे आज जिल्हयात सर्व प्रकारचे शैक्षणिक उपक्रम सुरु होण्यास साहय्य झाले आहे. सध्या अहमदनगर जिल्हयात ११७ महाविद्यलयीन संस्था आहेत.[५६]

### ६.३.२२ विद्यार्थी साहय्य योजना :-

अहमदनगर जिल्हा दुष्काळी जिल्हा असल्याने त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावरही होत आहे. भाऊसाहेब थोरात अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष असतांना १९७२-७३ साली पडलेल्या दुष्काळी परिस्थिमुळे अनेक विद्यार्थ्यांना आपले शिक्षण अर्धवट सोडणे भाग पडले म्हणुन अशा संकट प्रसंगी भाऊसाहेबांनी बँकेच्या माध्यमातुन अशा अनेक गरीब विद्यार्थ्यांना २५ हजाराचे आर्थिक साहय्य केले. तसेच १९८३ साली पडलेल्या दुष्काळ प्रसंगी अशा शिक्षण घेणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांना १९ हजाराची आर्थिक मदत केली.

तसेच परदेशी जाऊन शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना व क्रीडा क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना १ लाख ५३ हजाराचे अर्थसहाय्य केले. अहमदनगर जिल्हा बँकेच्या या विद्यार्थी साहय धोरणामुळे अनेक विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊन स्वावलंबी बनले. यात भाऊसाहेबांचे योगदानही महत्वपूर्ण ठरले आहे.[५७]

## ६.४ भाऊसाहेब थोरात यांचे सहकारमहर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान :-

भाऊसाहेब थोरात यांना इ.स.१९४२ च्या स्वातंत्र्य लढयातील सहभागातून १५ महिन्यांची शिक्षा झाली. शिक्षा संपून १९४४ साली बाहेर आले. ते कम्युनिस्ट विचारांची शिदोरी बरोबर घेऊनच. कम्युनिस्ट विचारांनी प्रभावित झालेल्या भाऊसाहेब थोरात यांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी तीव्र संषर्ष केला. त्याचप्रमाणे स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही भाऊसाहेब थोरात यांनी कम्युनिस्ट विचारांचा प्रचार प्रसार करण्याचे धोरण अवलंबुन अहमदनगर जिल्हयातील शेतकरी कामगार व सामान्य जनतेवर सावकार जमिनदार भांडवलदार वर्गाकडून होते असलेल्या अन्यायाविरोधी संघर्ष सुरुच ठेवला होता. अहमदनगर जिल्हयाचा सर्वांगिण विकास करु पाहणाऱ्या भाऊसाहेब थोरात यांच्या लक्षात आले कि, अहमदनगर जिल्हयाचा सर्वांगिण विकास घडवून आणण्यासाठी सहकारच योग्य आहे. म्हणून भाऊसाहेब थोरात यांनी आपल्या कम्युनिस्ट विचारांना आवर घालत इ.स.१९५२ साली सहकार तत्वाचा अंगिकार केला. आणि सहकार तत्वाच्या महामंत्राच्या सहाय्याने अहमदनगर जिल्हयाचा सर्वांगिण विकास साध्य करण्यासाठी इ.स.१९६८ साली सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात सहकारी साखर कारखान्याची स्थापना केली. अहमदनगर जिल्हयातील खाजगी कारखानदार मालकाकडून शेतकऱ्यांच्या होत असलेल्या शोषणावर निर्बंध लादण्यासाठी कारखान्याच्या माध्यमातून विविध योजना राबवुन अहमदनगर जिल्हयाचा आर्थिक विकास घडवून आणण्याचे धोरण अवलंबिले. भाऊसाहेब थोरात यांच्या या महान कार्यामुळे अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासास खऱ्या अर्थाने चालना मिळाली.

### ६.४.१ साखर कारखान्यात विकास कक्ष स्थापनेच्या माध्यमातून जिल्हयाच्या आर्थिक विकासातील भाऊसाहेबांचे योगदान :-

भाऊसाहेब थोरात महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष असतांना सर्वसामान्य शेतकरी, उद्योजक यांचे प्रश्न सोडविण्यासाठी बँकेत एक स्वतंत्र विकास कक्ष असावा अशी योजना डॉ. धनंजयराव गाडगीळ व डॉ.श्री.श्रीमाळ यांच्या पुढे मांडली असता. भाऊसाहेब थोरात यांच्या बँकेत एक स्वतंत्र विकास कक्ष स्थापनेच्या संकल्पनेचे महत्व ओळखुन त्यांनी भाऊसाहेबांच्या धोरणास होकार दिला. आणि चर्चे अंती महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेतील विकास कक्ष स्थापनेचे स्वरुप निश्चित करण्यात आले. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेत राबविलेली विकास कक्ष योजना भाऊसाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्हा बँकेचे अध्यक्ष असतांना जिल्हा बँकेतही राबविली होती. राज्य सहकारी बँक व जिल्हा बँकेतील विकास कक्षाच्या माध्यमातून भाऊसाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्हयातील सर्वसामान्य शेतकरी, उद्योजक यांना मोठया प्रमाणात विविध योजनांचा लाभ मिळवुन देण्यासाठी केला होता. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी इ.स.१९५० साली सहकारी साखर कारखाना स्थापन केला. विखे पाटलांपासून प्रेरणा घेऊन भाऊसाहेब थोरात यांनी इ.स.१९६८ साली संगमनेर येथे सहकारी साखर कारखाना स्थापन करण्यात यश मिळविले. अहमदनगर जिल्हयातील संगमनेर, अकोले तालुक्यासाठी संयुक्त असा कारखाना सुरु झाला होता. भाऊसाहेब थोरात संगमनेर साखर कारखान्याच्या अध्यक्ष पदावर १९७७ ते १९७८, १९८७ ते १९९२, २००३ ते २००६ या वर्षी ते अध्यक्ष होते.

कारखान्याच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाचा आर्थिक विकास करत असतांना भाऊसाहेब थोरात यांनी कारखान्यात विकास कक्ष स्थापन केला होता. विकास कक्षाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ दिला जात होता. विकास कक्षाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पाईप लाईन व इलेक्ट्रीक मोटार अंदाजपत्रके तयार करुन दिली जाऊ लागली. तसेच नवीन विहीर खोदाई व दुरुस्ती, जमिनीचे सपाटीकरण, जनावरांचा गोठा व द्राक्ष बागा अंदाजपत्रके तयार करुन दिले जाऊ लागली. याशिवाय नकाशे तयार करुन देणे, सहकारी व सामुदायिक पाणीपुरवठा योजनांची दुरुस्तीची कामे केली जाऊ लागली.

भाऊसाहेब थोरात यांनी कारखान्यात स्थापन केलेल्या विकास कक्षाचा लाभ अहमदनगर जिल्हयातील जास्तीत जास्त शेतकरी घेऊ लागले. पर्यायाने शेतकऱ्यांना या

योजनांच्या माध्यमातून शेती विकसीत करणे शक्य झाल्याने शेतकऱ्यांकडे पैसा येऊ लागला. भाऊसाहेब थोरात यांनी कारखान्यात स्थापन केलेल्या विकास कक्षाची योजना देखील यशस्वी झाली. भाऊसाहेब थोरात यांनी कारखान्यात स्थापन केलेला विकास कक्ष अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासात महत्वपूर्ण होता व आहे.[५८]

**६.४.२ संगमनेर भाग सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून पाणीपुरवठा योजनांना कर्जपुरवठा करण्याच्या माध्यमातून जिल्हयाच्या आर्थिक विकासातील भाऊसाहेबांचे योगदान :-**

भाऊसाहेब थोरात हे सहकारातील राजहंस होते. सहकार क्षेत्राच्या माध्यमातून जिल्हयाचा आर्थिक विकास साध्य करत असतांना भाऊसाहेबांकडे एक वेगळी दृष्टी होती. त्यामुळे भाऊसाहेब थोरात फक्त कारखाना काढून थांबले नाहीत तर अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांचा आर्थिक विकास साध्य करण्यासाठी शेतीला पाणी पुरवठा होणे आवश्यक आहे हे भाऊसाहेब जाणून होते. म्हणूनच भाऊसाहेबांनी साखर कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना व्यक्तीगत, सामुदायिक तसेच सहकारी पाणी पुरवठा योजनांसाठी कर्जपुरवठा करण्याचे धोरण अवलंबिले होते. भाऊसाहेबांच्या या योजनेचा अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांनी लाभ घेऊन शेतीला बारमाही पाणीपुरवठा सुविधा उपलब्ध केल्याने शेतकरी शेतीतुन ऊस,कापूस या सारखी रोख पैसा मिळवून देणारी नगदी पिके घेऊ लागल्याने शेतकऱ्यांच्या हाती पैसा खेळू लागला आहे. भाऊसाहेबांच्या दुरदृष्टीमुळे जिल्हयाचा आर्थिक विकासाला गती मिळाली होती.[५९]

**६.४.३ संगमनेर साखर कारखान्याची दैनंदिन गाळपक्षमता वाढविण्याच्या माध्यमातून जिल्हयाच्या आर्थिक विकासातील भाऊसाहेबांचे योगदान :-**

भाऊसाहेबांच्या प्रयत्नातुन संगमनेर भाग सहकारी साखर कारखाना या नावाने ८०० मे.टन दैनंदिन काळप क्षमता असणारी बारामतीच्या कारखान्याची जुनी मशिनरी घेण्याच्या अटीवर इ.स.१९६० साली परवाना मिळाला होता. २४ मार्च १९६८ रोजी महाराष्ट्राचे तात्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे शुभ हस्ते कारखान्याच्या गळीत हंगामास सुरुवात झाली होती. या कारखान्यास अहमदनगर जिल्हयाच्या पूर्वेकडील संगमनेर, अकोले त्याचप्रमाणे जिल्हयातून ही मोठया प्रमाणात ऊस गळीतासाठी येऊ लागल्याने तो कारखान्याच्या गाळप क्षमतेपेक्षा अतिरिक्त होऊ लागला होता. यातून शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून भाऊसाहेबांनी प्रयत्नपूर्वक इ.स.१९७६ साली कारखान्यात नवीन मशिनरी

१२५० मे.टन दैनंदिन गाळप क्षमता असणारी नवीन मशिनरी बसविण्यात आली. आणि २६ नोव्हेंबर १९७६ रोजी महाराष्ट्राचे तात्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांचे शुभ हस्ते नवीन साखर कारखान्याचा शुभारंभ करण्यात आला होता. भाऊसाहेबांच्या दुरदृष्टीच्या धोरणामुळे अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळाला होता. शेतकऱ्यांकडील सर्व ऊसाचे गाळप होऊ लागले होते. परंतु दिवसेंदिवस जिल्हयातील ऊस क्षेत्रात वाढ होत गेल्याने जिल्हयातील उत्पादीत होणारा ऊस जिल्हयातील इतर सहकारी साखर कारखान्यानांही संपणे शक्य होत नसे. तेव्हा भाऊसाहेबांनी कारखान्याची गाळप क्षमता वाढविण्याचा निर्णय घेतला असता त्यांच्या धोरणास सर्व सभासदांनी पाठींबा दर्शविला. आणि भाऊसाहेबांनी पुन्हा प्रयत्नपूर्वक कारखान्याची गाळप क्षमता वाढविण्यास मंजुरी मिळवाली. आणि इ.स.१९८१ साली २००० मे.टन मशनरी कार्यान्वित करण्यात आली.

प्रारंभी शेतकऱ्यांकडील सर्व ऊसाचे गाळप वेळेवर होत होते. परंतु आधुनिक शेती पध्दतीमुळे दिवसेंदिवस ऊस क्षेत्रात वाढ होत गेल्याने पुन्हा ऊस गाळप क्षमता वाढवण्याचा प्रश्न समोर आला असता पुन्हा भाऊसाहेब थोरात यांनी कारखान्यांच्या वार्षिक सभेत ऊस गाळप क्षमता वाढविण्याचा प्रस्ताव मांडला असता सर्व संचालक मंडळाच्या मान्यतेनंतर पुन्हा भाऊसाहेब थोरात यांनी प्रयत्नपुर्वक वाढीव गाळप क्षमतेस मंजुरी मिळवली. इ.स.१९८७ साली कारखान्याची दैनंदिन गाळप क्षमता २००० मे. टनावरुन ३५०० मे. टन वाढविण्याचा निर्णय घेतण्यात आला. आणि जून १९८८ रोजी ३५०० मे.टन दैनंदिन गाळप क्षमतेची परवानगी मिळाली होती. भाऊसाहेब थोरात यांनी कामाला गती देत इ.स.१९८८ मध्ये ३५०० मे.टन दैनंदिन गाळप क्षमतेची नवीन मशनरी सुरु करण्यात यश मिळविले आणि शेतकऱ्यांच्या शिल्लक राहिलेल्या ऊसाचे गाळप करण्यात आले. भाऊसाहेब थोरात यांच्या जिद्दी स्वभावाची अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने ओळख झाली. शेतकरी मोठया जिद्दीने ऊस पिकवु लागले. भाऊसाहेब थोरात यांचा ऊसाचे दैनंदिन गाळप क्षमता वाढविण्याच्या धोरणातून शेतकऱ्यांच्या ऊसाची वेळेवर तोड होऊ लागली होती. शेतकऱ्यांना ऊस शेतीतून बऱ्यापैकी पैसा मिळु लागला होता. भाऊसाहेब थोरात यांच्या प्रयत्नामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक विकास घडुन येण्यास मदत झाली होती.त्यातुन जिल्हयाच्या आर्थिक विकासाला गती मिळाली.

भाऊसाहेब थोरात यांचा वारसा त्यांचे चिरंजीव आणि संगमनेर तालुक्याचे माजी महसुलमंत्री आणि विद्यमान आमदार मा.श्री. बाळासाहेब थोरात यांनी पुढे चालु ठेवला आहे.

तेही कारखान्याच्या बाबतीत दक्षतापूर्ण कामगिरी पार पाडत आहे. कारखान्याची ३५०० मे. टन गाळप क्षमतेची मशनरीही अपुरी पडू लागल्याने मा.आ.बाळासाहेब थोरात यांनी ५००० मे.टन गाळप क्षमतेची नवीन मशनरी बसविण्यास परवाना मिळवुन सध्या ५००० मे.टन गाळप क्षमतेची नवीन मशनरी कार्यान्वीत करण्यात आली आहे. ही बाब शेतकऱ्यांना दिलासा देणारी आहे.[६०]

### ६.४.४ संगमनेर साखर कारखान्याच्या माध्यमातून भाऊसाहेबांनी सुरु केलेल्या विविध लघु उद्योगांद्वारे अहमदनगर जिल्हयाचा केलेला आर्थिक विकास :-

भाऊसाहेब थोरात हे सहाकारातील एक मुत्सद्दी होते. साखर उत्पादनाचा खर्च कमी करण्यासाठी भाऊसाहेब थोरात यांनी कारखान्यास पूरक उद्योग सुरु करुन साखर उत्पादन खर्च कमी करण्यात यश मिळविल्याने पर्यायाने शेतकऱ्यांना जादा भाव देणे ही कारखान्यास शक्य होत आहे. कारखान्यास पुरक उद्योग म्हणून भाऊसाहेब थोरात यांनी डिझेल व पेट्रोल पंप विभाग, आसवानी प्रकल्प, सहवीज निर्मिती प्रकल्प, कागद कारखाना, विविध खत निर्मिती प्रकल्प आदी कारखान्यास पूरक उद्योग सुरु करुन भाऊसाहेब थोरात यांनी साखर उत्पादन खर्च कमी करुन ऊसास जादा भाव देण्यात यश मिळविले. भाऊसाहेबांनी सुरु केलेल्या उद्योगांचे स्वरुप पुढीलप्रमाणे होते.

### ६.४.५ संगमनेर साखर कारखान्यातील आसवानी प्रकल्पाच्या माध्यमातून भाऊसाहेबांचे अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान :-

भाऊसाहेब थोरात यांच्या विचारातून कारखान्यात ४०,००० लिटर्स प्रतिदिन क्षमतेचा आसवानी प्रकल्पाच्या माध्यमातून प्रतिदिन ४०,००० लि. अल्कोहोल निर्मिती केली जाऊ शकते. अल्कोहोल निर्मिती करतांना त्यातून बाहेर पडणाऱ्या दुषित पाण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी संशोधन करण्यात येते. अल्कोहोल निर्मितीतून बाहेर पडणाऱ्या पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी रिबॉयलर बसविल्यामुळे दुषीत पाण्याचे प्रमाण कमी झाले असून जे पाणी शिल्लक राहते त्यांचा उपयोग बायोअर्थ खत तयार करण्यासाठी केला जातो. भाऊसाहेब थोरात यांनी सुरु केलेल्या या प्रकल्पाच्या माध्यमातूनही कारखान्यास आर्थिक फायदा मिळत असल्याने कारखान्यास शेतकऱ्यांच्या ऊसास अधिक भाव देणे शक्य होत आहे.[६१]

**६.४.६ संगमनेर साखर कारखान्यातील सहवीज निर्मिती प्रकल्पाच्या माध्यमातून भाऊसाहेबांचे अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान :-**

भाऊसाहेब थोरात यांनी एका खाजगी कंपनीच्या सहकार्यातुन डिस्टीलरीतून बाहेर पडणाऱ्या स्पॅट वॉशपासून मिथेन गॅस निर्मिती आणि मिथेन गॅसपासून वीजनिर्मिती करण्याचा प्रकल्प सुरु केला आहे. भाऊसाहेब थोरात यांच्या या धोरणामुळे कारखान्यास लागणाऱ्या वीजपुरवठा खर्चात बचत होऊ लागली.[६२]

**६.४.७ संगमनेर साखर कारखान्याच्या खतनिर्मिती प्रकल्पाच्या माध्यमातून भाऊसाहेबांचे अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान :-**

भाऊसाहेब थोरात यांनी कारखाना क्षेत्रात 'राजहंस' या उत्तम प्रतीच्या सेंद्रीय खताची निर्मिती केली जाते. त्याचप्रमाणे 'गांडुळ खत' निर्मितीही मोठया प्रमाणात केली जाते. भाऊसाहेबांच्या दुरदृष्टीमुळे उत्पादीत होणाऱ्या या खताचा पुरवठा शेतकऱ्यांच्या मागणीनुसार केला जातो. या खतनिर्मिती प्रकल्पाच्या माध्यमातूनही कारखान्यास मोठया प्रमाणात नफा होत असून त्यामुळे कारखान्यास शेतकऱ्यांच्या ऊसास अधिक भाव देणे शक्य होत आहे.[६३] भाऊसाहेब थोरात यांनी कारखान्याच्या माध्यमातून जे विविध उद्योग सुरु केले. त्यांच्या आर्थिक मिळकतीमुळे भाऊसाहेब थोरात यांना महाराष्ट्रातील इतर कारखान्याच्या तुलनेत अधिक भाव देणे शक्य होत होते. भाऊसाहेब थोरात यांचे धोरण आ.बाळासाहेब थोरात यांनीही सुरु ठेवल्याने सद्य: स्थितीलाही सर्वाधिक भाव देणारा कारखाना म्हणून सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात सहकारी कारखान्याची ओळख आहे. भाऊसाहेब थोरात यांनी कारखान्यात विविध उद्योग सुरु करुन शेतकऱ्यांचा मोठया प्रमाणात फायदा करुन दिला आहे. भाऊसाहेबांच्या या धोरणामुळे अहमदनगर जिल्हयांच्या आर्थिक विकासास चालना मिळाली आहे.

**६.४.८ ऊसाला हमी भाव देण्याच्या भाऊसाहेबांच्या धोरणातुन अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान :-**

भाऊसाहेब थोरात यांनी सहकाराच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाचा सर्वांगिण विकास करत असतांना कोणताही स्वार्थी हेतु त्यातुन साध्य केला नाही. केवळ शेतकऱ्यांचा कारखाना समजून कारखान्यात विविध उद्योग सुरु करुन आर्थिक मिळकत मिळविण्याचे अनेक मार्ग निर्माण केले होते. तसेच जे काटकसरीचे धोरण अवलंबिले होते त्यामुळेच भाऊसाहेब थोरात कारखाना अहमदनगर जिल्हयातील नव्हे तर महाराष्ट्रातील

कारखान्यापेक्षा सर्वाधिक भाव देणारा साखर कारखाना म्हणून ओळखला जातो. भाऊसाहेब थोरात यांनी ऊसाला हमी भाव देण्याचे जे धोरण अवलंबिले होते त्यामुळे अहमदनगर जिल्हयाच्या पठार भागातील शेतकरीही ऊस उत्पादन घेण्याचे धोरण अवलंबू लागला आहे. पर्यायाने अहमदनगर जिल्हयातील ऊस उत्पादन क्षेत्रात वाढ घडुन आली असून शेतकऱ्यांना ऊस शेतीतुन मोठया प्रमाणात पैसा मिळत असल्याने अहमदनगर जिल्हयातील इतर उद्योग व्यवसाय देखील फुलले आहेत.[६४]

**६.४.९ भाऊसाहेब थोरात साखर कारखान्याचे इ.स. १९८७ ते १९९२ या वर्षी अध्यक्ष असतांना त्यांनी कारखानाच्या माध्यमाधुन शेतकऱ्यांसाठी जे विविध उपक्रम राबविले त्यातील ऊस उत्पादक लाभार्थी शेतकरी पुढीलप्रमाणे :-**

**तक्ता क्रं.२९**

| **अ.नं.** | **लाभार्थी शेतकरी** | **गावाचे नाव** |
|---|---|---|
| १) | वाकचौरे सदाशिव रामचंद्र | पिंपरणे |
| २) | सोनवणे हौशीराम रामराव | चिंचोली गुरव |
| ३) | वाकचौरे सिताराम लक्ष्मण | कळस बु. |
| ४) | नेहे केशरचंद साहेबराव | समनापूर |
| ५) | हासे मुरलीधर भिकाजी | राजाराम |
| ६) | कुटे भाऊसाहेब दामोधर | सुकेवाडी |
| ७) | ओहोळ प्रताप पुंजाजी | वडगावपान |
| ८) | दिघे बंडू गणपत | कोल्हेवाडी |
| ९) | शिंदे बाबासाहेब काशिनाथ | रहिमपूर |
| १०) | शिंदे नानासाहेब गंगाधर | वाघापूर |
| ११) | नागरे दत्तात्रय रामभाऊ | ओझर बु. |
| १२) | वर्पे केशव रावजी | कनोली |
| १३) | वाकचौरे दादा रामभाऊ | पिंपळगाव निपाणी |
| १४) | वाळे दत्तु तबा | मंगळापूर |
| १५) | कवडे साहेबराव बबन | नांदुरी दुमाला |
| १६) | कडलग चंद्रकांत भिकाजी | जवळे कडलग |
| १७) | होस संतोष रखमाजी | राजापूर |
| १८) | गुंजाळ रमेश लहानभाऊ | खांडगाव |

| अ.नं. | लाभार्थी शेतकरी | गावाचे नाव |
|---|---|---|
| १९) | जोंधळे मच्छिंद्र ठकाजी | कोकणगाव |
| २०) | थोरात मारुती त्रिंबक | वडगावपान |
| २१) | नागरे नारायण दादा | शेडगांव |
| २२) | घुले पांडुरंग दामोदर | धांदरफळ |
| २३) | वर्पे मिनानाथ गोपीनाथ | कनोली |

भाऊसाहेब थोरात संगमनेर साखर कारखान्याचे अध्यक्ष असताना जिल्हयातील आदी शेतकऱ्यांनी भाऊसाहेबांनी राबविलेल्या योजनेंचा लाभ घेतला. कारखान्याच्या माध्यमातून त्यांनी सुरु केलेले उपक्रम आजही चालु आहेत. शेतकरी या विविध उपक्रमांचा लाभ सद्यस्थितीलाही घेत आहेत.[६५]

## ६.५ भाऊसाहेब थोरात यांचे राजहंस दूध संघाच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान :-

गुजराथ मधील खेडा जिल्हयात सहकारी तत्वावर पहिला सहकारी दूध उत्पादक संघ स्थापन झाला होता. त्यानंतर दूध उत्पादक संघ स्थापनेचा प्रारंभ झाला होता. पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनी १९६४ साली गुजराथ मधील खेडा दूध उत्पादक संघाला भेट दिल्यानंतर खऱ्या अर्थाने दूध उत्पादक संघ स्थापनेला गती प्राप्त झाली होती. गुजराथमधील खेडा दूध उत्पादक संघातील यशानंतर दुध व्यवसायातील एक ख्यातनाम म्हणून ओळखले जाणारे खेडा दूध उत्पादक संघाचे प्रवर्तक व्हर्गिस कुरियन यांच्या प्रयत्नातून इ.स.१९६५ साली आनंद येथे नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाची स्थापना झाली. कुरियन यांनी देशातील शेतकऱ्यांपुढे एक आदर्श निर्माण केले होते. या बोर्डाने दूध महापूर ही मोठी योजना सुरु केली. या योजनेअंतर्गत दूध खरेदी, त्यावर प्रक्रिया, साठवणूक, वाहतुक विक्री, दूभत्या जनावरांचे संगोपेन, डेअरी मशिनरी तयार करणे, स्टॉकसाठी प्रशिक्षण देणे अशी योजना यशस्वी केली.[६६]

अण्णासाहेब शिंदे अन्न व शेती खात्याचे मंत्री होते. तर कुरियन हे केंद्रीय नियोजन मंडळाचे प्रमुख होते. डॉ.कुरियन यांनी अण्णासाहेबांना निमंत्रित केले असता अण्णासाहेब शिंदे आपल्याबरोबर भाऊसाहेब थोरात यांनाही घेऊन गेले होते. डॉ.कुरियन यांनी आनंद डेअरीच्या माध्यमातून दुग्धव्यवसायात केलेली क्रांती पाहण्याचा योग भाऊसाहेबांना मिळाला

होता. दूग्ध व्यवसायातून डॉ.कुरियन यांनी बेबी फुड, दूध पावडर, चीज व अन्य उपपदार्थ उत्पादन करण्याची कारखानदारी, पशुखाद्याचा कारखाना हे सर्व पाहून भाऊसाहेब थोरात प्रभावित झाले होते. त्याच वेळी भाऊसाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्हयातील सर्वसामान्यांना आर्थिक दिलासा देण्याच्या हेतूने दूध संघाची स्थापना करण्याचा निर्णय घेतला होता.

अहमदनगर जिल्हा हा कमी पर्जन्यमान असणारा जिल्हा असून जिल्हयातील सामान्य शेतकरी त्याचप्रमाणे, सर्वसामान्य भूमिहिन लोकांना गाईपालनाचा धंदा करुन ते आपली आर्थिक गरज भागऊ शकतील हे लक्षात घेऊन भाऊसाहेब थोरात यांनी दूध उत्पादक संघ स्थापनेस परवाना मिळविण्यासाठी अण्णासाहेब शिंदे यांच्याकडे सातत्याने विषय काढत होते. शेवटी भाऊसाहेब थोरात यांच्या प्रयत्नांना यश येऊन अहमदनगर जिल्हयातील पूर्वेकडील सहयाद्रीच्या डोंगर रांगामध्ये वसलेल्या संगमनेर येथे दूध संघ स्थापन करण्यास परवानगी मिळाली. आणि १२ नोव्हेंबर १९७७ साली संगमनेर येथे राजहंस सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघाची स्थापना झाली. पहिल्या शासन नियुक्त संचालक मंडळाचे अध्यक्ष केरुजी हरुजी गुंजाळ तर उपाध्यक्ष पदी तुकाराम तात्याबा पाटील खेमनर यांची नेमणूक झाली होती. शासननियुक्त संचालक मंडळाची तीन वर्षाची मुदत संपली आणि भाऊसाहेब थोरात १९८० साली नवीन संचालक मंडळाद्वारे अध्यक्ष म्हणून निवडले गेले.[६७]

दूध उत्पादक संघ स्थापनेच्या पहिल्या वर्षी संघाचे दूध संकलन २००० लिटर होते. परंतु भाऊसाहेब थोरात यांच्या प्रयत्नामुळे अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांचे वेळोवेळी केलेले प्रबोधन तसेच गावोगावी तज्ञ व्यक्तीच्या व्याख्यानाचे आयोजन गायी खरेदीसाठी जिल्हा बँकेच्या माध्यमातुन भाऊसाहेबांनी शेतकऱ्यांना केलेले आर्थिक साहय, गायांच्या संगोपनासाठी व रोगनिवारणासाठी केलेल्या सुविधा भाऊसाहेब थोरात यांच्या या कार्यामुळे दूध संघाचे प्रारंभीचे २००० लिटर असणारे संकलन वाढत जाऊन सध्या २०१४-२०१५ या वर्षी संघाचे प्रतिदिन दूध संकलन २,८८,२१२ इतके झाले आहे. दूध संघाने दूध संकलनाची घेतलेली ही गरुडझेप भाऊसाहेब थोरात यांच्या दूरदृष्टीमुळे शक्य झाली आहे. दूध संकलन होणे जेवढे आवश्यक आहे तेवढेच त्यावर प्रक्रिया करुन दूध पॅकींग व उपपदार्थ निर्मिती करुन त्यांचे वितरण ही दूध संघ यशस्वीपणे करत आहे. संघाचे दूध व उपपदार्थ पॅकींग महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक या राज्यात विक्री केले जाते.

भाऊसाहेब थोरात यांच्या दूरदृष्टीमुळे दूध संघाची ही प्रगती होऊ शकली. दूधाची उपपदार्थ निर्मिती धोरणामुळे संघाला नफा अधिक मिळत असल्याने पर्यायाने दूध उत्पादक संघ शेतकऱ्यांना ही दुधास चांगला भाव देत आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पादनात मोठया प्रमाणात भर पडत आहे.[६८]

### ६.५.१ दूध संकलन केंद्राना बल्क मिल्क कुलर्स सुविधा पुरविण्याच्या माध्यमातून भाऊसाहेब थोरात यांनी शेतकऱ्यांचा केलेला आर्थिक विकास :-

भाऊसाहेब थोरात यांच्या प्रयत्नातुन इ.स.१९७७ साली दूध संघाची स्थापना झाली. भाऊसाहेबांनी राजहंस दूध संघ या सहकारी दूध संघाची स्थापना केली. परंतु अध्यक्ष पद स्वतःकडे न घेता त्यांचेप्रमाणेच सहकारावर जिवापाड प्रेम करणारे श्री.गुंजाळ केरुजी हारकुजी यांची अध्यक्षपदावर तर खेमनर तुकाराम तात्याबा यांची उपाध्यक्षपदी निवड झाली. भाऊसाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली दूध संघ विकासाकडे मार्गक्रमण करत होता. भाऊसाहेब दूध संघाचे १९९७,१९९८,२००२,२००३ या काळात संचालक होते. आपल्या संचालक कालावधीत त्यांनी दूध संघाच्या विकासाकडे पूर्ण लक्ष देत त्या दृष्टीने शेतकऱ्यांना दूध उत्पादनासाठी प्रोत्साहित करीत. दूध संकलनात मोठया प्रमाणात वाढ घडवुन आणली.

भाऊसाहेब थोरात यांनी ज्या सहकारी संस्था स्थापन केल्या त्या संस्थावर ते आपल्या मुलाप्रमाणे प्रेम करत होते. त्याचे सहकारातील योगदान हे अहमदनगर जिल्हयाच्या विकासासाठी बहुमोल ठरले आहे.

प्रारंभी गावोगावी स्थापन करण्यात आलेल्या दुध संकलन केंद्राच्या माध्यमातून दररोज सकाळीच दूध संकलन केले जात होते. पर्यायाने शेतकऱ्यांनी संध्याकाळी काढलेले दूध त्यांना घरीच ठेवावे लागत असे. अनेक वेळा शेतकऱ्यांकडे साठवण व्यवस्था योग्य नसल्याने दूध खराब होत होते.

त्याचप्रमाणे सकाळ व संध्याकाळचे दूध एकत्रीतपणे सकाळी गावातील दूध संकलन केंद्रावर घातल्यानंतर संकलित झालेले दुध कॅनमध्ये टाकले जात असे. कॅनच्या मध्यवर्ती पोकळीत बर्फ टाकला जात होता. नंतर ते कॅन वाहतुक साधनांच्या सहाय्याने दूध संघापर्यंत पोहोचविले जात असत. या सर्व प्रक्रियेस वेळ जादा जात होता. पर्यायाने कॅनमधील दूध खराब झाल्यास ज्या केंद्राकडून तो कॅन आला असेल त्या केंद्रात दूध घालणाऱ्या शेतकऱ्यांवर त्या दुधाची रक्कम लादली जात होती. महिन्यात एखाद्या केंद्रातील जेवढे कॅन खराब होत असत तो तोटा शेतकऱ्यांवर लादला जात असल्याने शेतकऱ्यांना दुधाचे भाव

कमी मिळत असत. यातून शेतकऱ्यांना आर्थिक तोटा होत होता. त्यावर मात करण्यासाठी दूध संघाच्या माध्यमातून दोन टाईम दूध संकलन केंद्राकडून दुध संकलन करण्यासाठी त्याप्रमाणे गावोगावी असणाऱ्या दूध संकलन केंद्रांना बल्कमिल्क कुलर्स पुरवठा करुन दुध टिकविण्याची क्षमता वाढविणे यासाठी भाऊसाहेब थोरात सातत्याने प्रयत्नशिल होते. दूध संघाच्या माध्यमातून भाऊसाहेब थोरात यांनी काही मोठया दूध संकलन केंद्रांना बल्क मिल्क कुलर्स पुरवुन शेतकऱ्यांना दिलासा दिला होता. परंतु दुध संघास दुध पुरवठा करणाऱ्या सर्वच दुध संकलन केंद्राना बल्क मिल्क कुलर्स पुरविणे शक्य नव्हते. भाऊसाहेब थोरात त्यासाठी प्रयत्न करत होते. भाऊसाहेब थोरात यांनी उराशी बाळगलेले हे स्वप्न त्यांचे पुत्र आमदार बाळासाहेब थोरात यांनी पूर्ण केले. आमदार बाळासाहेब थोरात महसूलमंत्री असतांना केंद्र शासनाकडून स्वच्छ दुध निर्मिती प्रकल्पांतर्गत आमदार बाळासाहेब थोरात यांनी आर्थिक निधि मिळवुन त्यात दुध संघाची काही रक्कम टाकुन ६७ बल्क मिल्क कुलर्स खरेदी केले आहेत व ते सर्व जादा दुध संकलन होणाऱ्या केंद्रावर बसविण्यात आले आहे. केंद्र शासनाने अनुदान व संघाचा सहभाग सहा कोटी रुपयांची गुंतवणुक बल्क मिल्क कुलर्स खरेदी केले आहेत. दुध सं्घात दैनंदिन जमा होणाऱ्या २,८८,२१२ लिटर दुधापैकी बल्क मिल्क कुलर्सद्वारे एकूण एक लाख पन्नास हजार लिटर्स दुध प्रतिदिन संकलित केले जाते. भाऊसाहेब थोरात यांनी उराशी बाळगलेले हे स्वप्न त्यांचे पुत्र आमदार बाळासाहेब थोरात यांनी यशस्वीपणे पूर्ण केले.

भाऊसाहेब थोरात यांच्या दुरदृष्टी धोरणामुळे दुध उत्पादक शेतकऱ्यांना मोठया प्रमाणत अधिक फायदा होत आहे. भाऊसाहेब थोरात यांच्या दुरदृष्टीमुळे अधिकाधिक शेतकरी दुधव्यवसायाकडे वळले आहेत.[६९]

### ६.५.२ दुधजन्य उपपदार्थ निर्मितीच्या माध्यमातून भाऊसाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांचा केलेला आर्थिक विकास :-

भाऊसाहेब थोरात यांना अहमदनगर जिल्हयातील सहकारातील राजहंस म्हणून संबोधले जात होते. भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हयातील सहकार वाढीबरोबरच ज्या सहकारी संस्था स्थापन केल्या त्यांना एक वेगळे महत्व प्राप्त करुन दिले आहे. भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हयातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूध व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी अहमदनगर जिल्हा बँकेचे अध्यक्ष असतांना शेतकऱ्यांना गाय खरेदी त्याचप्रमाणे गायगोठा अशा अनेक योजना राबवुन जिल्हयातील दुध व्यवसायास चालना दिली होती.

भाऊसाहेबांनी संगमनेर दूध संघाची केवळ स्थापनाच केली नाही तर अहमदनगर जिल्हयातील जे दुध उत्पादक शेतकरी संगमनेर दुध संघास दुध देतात त्यांच्या दुधाला जादा भाव मिळावा या उद्देशाने भाऊसाहेबांनी दुध पॅकींग बरोबरच दुधजन्य पदार्थ निर्मिती प्रक्रीया सुरु केली. त्यात तुप, पेढा, श्रीखंड, आम्रखंड, लस्सी, पनीर, ताक, दही, सुगंधी दुध, खवा, गुलाबजाम, सोनपापडी, रसगुल्ला, बर्फी, चिज, प्रोसेस चीज, बटर आदी दुधजन्य पदार्थ निर्मिती करुन दुध संघास अधिकाधिक फायदा मिळवुन दिला. या उपपदार्थ विक्रीतुन जादा नफा होत असल्याने जे दुध उत्पादक शेतकरी दुध देतात त्या शेतकऱ्यांच्या दुधास संघ जास्तीत जास्त भाव देत होता व आहे.

भाऊसाहेबांनी संगमनेर दूध संघाच्या माध्यमातून सुरु केलेल्या दूधजन्य उपपदार्थ निर्मितीमुळे अहमदनगर जिल्हयातील संगमनेर दूध संघ सर्वाधिक भाव देणारा संघ म्हणुन ओळखला जातो. दुध संघास होणाऱ्या नफ्यातुन शेतकऱ्यांच्या दुध व्यवसाय वाढीसाठी विविध योजना राबविल्या जातात. रोगनिदान शिबिराचे आयोजन, व्याख्यानाचे आयोजन जनावरांचे लसीकरण, संघाच्या माध्यमातून खाद्यपुरवठा, गाईखरेदीसाठी बिनव्याजी कर्जपुरवठा योजना, दिवाळी निमित्त बोनस, अशा विविध योजना राबवुन भाऊसाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्हयातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना अधिकाधिक आर्थिक लाभ मिळवुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे. भाऊसाहेबांच्या दुरदृष्टींच्या धोरणामुळे अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासाला गती मिळाली होती.[७०] भाऊसाहेब थोरात यांनी दुध संघाच्या माध्यमातून सुरु केलेल्या दुधजन्य उपपदार्थ निर्मिती प्रक्रिया दिवसेंदिवस वाढत आहे. दुध संघाच्या माध्यमातुन २००४-२००५ यावर्षी दुधजन्य उपपदार्थ निर्मितीत तुप, पेढा, श्रीखंड, आम्रखंड,लस्सी ,पनीर ,ताक,मसाला ताक,दही, सुंगधी दुध, खवा, गुलाबजाम, सोनपापटी, रसगुल्ला, बर्फी, चीज, प्रोसेस चीज, बटर, या दुध पदार्थांची निर्मिती करुन त्यांची विक्री महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेर केली जाते.[७१]

### ६.५.३ राजहंस दूध संघातील मिनरल वॉटर निर्मितीच्या माध्यमातुन भाऊसाहेबांचे अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान :-

भाऊसाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्हयाचा आर्थिक विकास साध्य करत असतना संगमनेर तालुका सहकारी प्रक्रिया संघाच्या माध्यमातून पॅकेज ड्रिकींग वॉटर प्लॅन्ट चालु केला आहे. हा प्लँट राजहंस ॲक्वा या नावाने चालविला जातो. राजहंस ॲक्वा प्लॅन्टला आय.एस.ओ व फुड इंडस्ट्रीज मधील हॅपस या दोन आंतरराष्ट्रीय दर्जाचा मानांकन

प्रणाली घेतलेल्या आहेत. या प्लॅन्टमध्ये २०० मिली कप व पॉलिथिन पाऊच, ५०० मिली. १ लिटर, २ लिटरच्या बॉटलस व २० लिटर्सचे जार या पॅकींगमध्ये राजहंस ॲक्वा उपलब्ध आहे व अहवाल वर्ष २००१४- २०१५ मध्ये १,०९,३४,५६६ लि.उत्पादन तर १,०८,२९,०२८ लि.विक्री झाली आहे. राजहंस ॲक्वाचे पाणी बॉटल महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, आदी राज्यांमध्ये विक्री केली जाते. यातुन संघाला मोठा नफा मिळत होता व आहे. भाऊसाहेब थोरात यांनी या प्रकल्पातून मिळालेला नफा दुध उत्पादक शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविल्या होत्या. भाऊसाहेबांच्या दुरदृष्टी धोरणामुळे अहमदनगर जिल्हयाचा आर्थिक विकास घडुन येऊ शकला.[७२]

## ६.६ भाऊसाहेब राजहंस दूध संस्थेचे १९९७ ते १९९८ साली अध्यक्ष असतांना संघातील विविध योजनांच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाचा केलेला आर्थिक विकास :-

भाऊसाहेब थोरात राजहंस दुध संघाचे संस्थापक होते. राजहंस दुध संघाच्या स्थापनेपासुन त्यांनी आजपर्यंत दुध संघावर कॉंग्रेस पक्षातंर्गत आपले वर्चस्व ठेवण्यात भाऊसाहेबांनंतरही बाळासाहेब थोरात यांनी यश मिळविले आहे. भाऊसाहेब थोरात १९९७ - १९९८ साली राजहंस दुध संघाचे अध्यक्ष असतांना शेतकऱ्यांना दुध व्यवसाय करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी दुध संघाच्या माध्यमातुन विविध योजना राबविल्या.

### ६.६.१ संकरीत गो पैदास :-

भाऊसाहेब थोरात यांनीसंगमनेर दूध संघाच्या पशुसंवर्धन विभागामार्फत स्वयंरोजगार गोपैदास कार्यक्रमातंर्गत ५२ व बाएफ मिया पुरस्कृत ४ अशी एकुण ५६ रेतन केंद्र सुरु करुन शेतकऱ्यांनी संघाकडे मागणी केल्यानंतर संघाचे फिरते कृत्रिम रेतन विभागांतर्गत त्या गावात डॉक्टर जातात. व नोंद केलेल्या शेतकऱ्यांच्या गाईचे कृत्रीम रेत करुन दिले जाते. भाऊसाहेब थोरात यांनी सुरु केलेल्या कृत्रिम रेतन पध्दतीमुळे गाय गाभण राहण्याचे प्रमाणत वाढले होते. पर्यायाने दुध उत्पादनात मोठया प्रमाणत वाढ घडुन आल्याने शेतकऱ्यांना अधिकाधिक आर्थिक लाभ मिळु लागला.

### ६.६.२ प्रतिबंधक लसीकरण :-

भाऊसाहेब थोरात यांनी शेतकऱ्यांचा आर्थिक विकास साध्य करत असतांना शेतकऱ्यांचे धनलक्ष्मीला विविध आजारातून वाचविण्यासाठी लसीकरण मोहीम राबविली

होती. लसीकरण मोहीमेअंतर्गत दुध संघास दुध उत्पादन शेतकऱ्यांसाठी लसीकरण मोहिमेतुन भाऊसाहेबांनी दिलेले योगदान शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी महत्वपूर्ण ठरले आहे.

**६.६.३ हर्डमन कार्यक्रमाच्या माध्यमातुन केलेला शेतकऱ्यांचा आर्थिक विकास :-**

भाऊसाहेब थोरात यांनी संगमनेर दुध संघाच्या कार्यक्षेत्रातील दुध उत्पादन वाढावे यासाठी संघाच्या पशुसंवर्धन विभागामार्फत दुध संघ कार्यक्षेत्रातील ४२ स्वयंरोजगार केंद्रावर हर्डमन कार्यक्रमातंर्गत गायींना दोन्ही कानांमध्ये ओळख क्रमांक देण्यात आले. त्याचप्रमाणे गाईचे प्रजनन, दुध व्यवस्थापन, गायीचे खाद्य, सर्व प्रकारचे रोग प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले. भाऊसाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्हयाचा आर्थिक विकास साध्य करत असतांना जिल्हयातील शेतकऱ्यांसाठी राबविलेल्या हर्डमन कार्यक्रमामुळे जिल्हयातील शेतकरी आर्थिक विकासाकडे वाटचाल करु लागले.[७३]

**६.६.४ भाऊसाहेबांनी चापकटर वाटप योजनेच्या माध्यमातुन अहमदनगर जिल्हयातील दुध उत्पादक शेतकऱ्यांना केलेले आर्थिक सहाय्य :-**

अहमदनगर जिल्हा अवर्षणग्रस्त असल्याने पावसाळयात जनावरांना हिरवा चारा मुबलक प्रमाणात उपलब्ध असतो. परंतु इतर ऋतुत चाऱ्यांची टंचाई भासत असते. यावर उपाय म्हणुन भाऊसाहेब थोरात यांनी पावसाळयात येणारा मुबलक चारा मका, कडवळ यांची कुटी करुन ठेवण्यासाठी व आवश्यक तेव्हा ते जनावरांना देण्यासाठी दुध संघाच्या माध्यमातुन कडबाकुट्टी योजना ना नफा ना तोटा या तत्वावर सुरु केली होती. कडबा कुटीच्या माध्यमातुन हिरव्या चाऱ्याची कुट्टी करण्याचे माहितीपट दुध संकलन केंद्रावर दाखवुन शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीची मका ही अनुदान तत्वावर पुरविण्याचे धोरण भाऊसाहेबांनी राबविले होते. भाऊसाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांना केलेले आर्थिक सहाय्य अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासासाठी महत्वपूर्ण होते.[७४]

**६.६.५ भाऊसाहेबांनी मिल्कींग मशीन वाटप योजनेच्या माध्यमातून जिल्हयातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना केलेले आर्थिक सहाय्य :-**

अहमदनगर जिल्हयातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना मनुष्य बळाची कमतरता भासत असल्याने शेतकरी पारंपारिक पध्दतीने दूध उत्पादन करत असल्याने दुध उत्पादनाची क्षमता असूनही दूध उत्पादनात वाढ होत नव्हती. बाजारपेठेतील वाढती मागणी आणि ग्राहकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी निर्जतुक स्वच्छ दूध पुरवठा करणे आवश्यक होते. हे ओळखून

भाऊसाहेब थोरात यांनी संघाच्या माध्यमातून दूध उत्पादक शेतकऱ्यांमध्ये जागृती करण्यासाठी दूध संकलन केंद्रावर विविध पशुवैद्यकिय अधिकाऱ्यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले होते. व्याख्यानातून शेतकऱ्यांना गायीचे प्रजनन, आहार, व्यवस्थापन, पशुरोग निदान, स्वच्छ दुध निर्मिती यासंदर्भात माहिती दिली जात होती. तसेच दुध उत्पादन वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना आधुनिक पध्दतीने दुध उत्पादन करण्याची आवश्यकता भाऊसाहेबांनी पटवुन दिली. एवढेच नव्हे तर भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हयातील दुध उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना स्वच्छ दुध निर्मिती कार्यक्रमातंर्गत मिल्किंग मशिन वाटप करण्याची योजना दूध संघाच्या माध्यमातून ना नफा ना तोटा या तत्वावर मिल्कींग मशीनची विक्री केली जात होती.

भाऊसाहेब थोरात यांनी सुरु केलेल्या स्वच्छ दुध निर्मिती योजनेचा अहमदनगर जिल्हयातील दूध उत्पादक शेतकऱ्यांची मोठया प्रमाणात वाढ घडवुन आणण्यात यश मिळविले होते. भाऊसाहेब थोरात यांनी सुरु केलेल्या स्वच्छ दुध निर्मिती कार्यक्रम अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांचा आर्थिक विकासासाठी म्हत्वपूर्ण ठरले होते.[७५]

### ६.६.६ भाऊसाहेबांनी पशुरोग निदान प्रयोगशाळेच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयातील दुध उत्पादक शेतकऱ्यांसाठी केलेले आर्थिक कार्य :-

भाऊसाहेब थोरात यांनी संगमनेर दुध संघाच्या माध्यमातुन अद्ययावत पशुरोग निदान प्रयोगशाळा २८ ऑक्टोंबर २००२ रोजी सुरु केली होती. ती आजही कार्यक्षमपणे चालु आहे. या पशुरोग निदान प्रयोगशाळेच्या माध्यमातून जनावरांच्या रक्तातील हिमोग्लोबीनची तपासणी, शेण, मुत्रजल तपासणी, मेंटल डिटेक्टर तपासणी, गोचीड, सुप्त, स्तनदाह आदी आजारावर वेळेत उपचार दिले जात होते व आहेत. दुध संघाच्या प्रयोगशाळेद्वारे दुध उत्पादकांच्या जनावरांसाठी कमीत कमी दरात आजाराचे निदान व त्यावर उपाय केले जात होते व आहेत. भाऊसाहेब थोरात यांनी दूध संघाच्या माध्यमातून अद्ययावत पशुरोग निदान प्रयोगशाळा अहमदनगर जिल्हयातील प्रयोगशाळा दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी महत्वपूर्ण ठरले आहे.[७६]

### ६.६.७ भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हयातील दुष्काळग्रस्तांना दूध संघाच्या माध्यमातुन केलेला पाणीपुरवठा :-

दुष्काळ हा अहमदनगर जिल्हयाच्या पाचवीला पुजलेला होता व आहे. महाराष्ट्र राज्यातील इतर जिल्हयांपेक्षा अहमदनगर जिल्हयात कमी पर्जन्यमान होत असल्याने

अहमदनगर जिल्हयातील लोकांना सातत्याने दुष्काळाचा सामना करावा लागत आहे. सन २००२, २००३, २००७, २००९ अशा सातत्याने पडणाऱ्या दुष्काळ प्रसंगी अहमदनगर जिल्हयातील नागरिकांना तसेच पशुधन वाचविण्यासाठी भाऊसाहेब थोरात यांनी दुध संघाच्या माध्यमातून मागणीनुसार दुष्काळग्रस्त भागातील लोकांना पाणीपुरवठा केला. याशिवाय वेळोवेळी ३ हजार ९ हजार लिटरच्या टाक्यांचा देखील वेळोवेळी पुरवठा केला होता. भाऊसाहेब थोरात यांनी दुष्काळग्रस्त भागाला केलेल्या पाणी पुरवठयामुळे अहमदनगर जिल्हयातील पशुधन वाचविण्यासाठी त्याचप्रमाणे दुष्काळ प्रसंगीही दुध व्यवसायाच्या माध्यमातुन शेतकऱ्यांना आर्थिक उत्पन्न मिळवुन देण्यात भाऊसाहेब थोरात यांनी दिलेले योगदान अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासासाठी महत्वपूर्ण ठरले आहे.[७७]

### ६.६.८ भाऊसाहेबांनी संगमनेर दुध संघाच्या माध्यमातुन जिल्हयातील शेतकऱ्यांना मुक्त संचार गोठयासाठी केलेले आर्थिक सहाय्य :-

भाऊसाहेब थोरात यांनी मुक्त संचार गोठे योजनेचे महत्व लक्षात घेऊन अहमदनगर जिल्हयातील दुध उत्पादक शेतकऱ्यांनी मुक्त संचार गोठे बांधण्याची भाऊसाहेबांनी संगमनेर दुध संघाच्या माध्यमातुन अल्प व्याजदराने कर्जपुरवठा करण्याचे धोरण अवलंबिले होते. भाऊसाहेबांच्या या दुरदृष्टी धोरणाचा अनेक शेतक-यांनी लाभ घेतल्याने गाई आजारी पडण्याची शक्यता कमी झाली. याशिवाय मुक्त संचार गोठे पध्दतीमुळे गाईच्या दुधात ५ ते १० टक्के पर्यंत वाढ घडुन आली. भाऊसाहेब थोरात यांनी मुक्त संचार गोठे योजनेतुन शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होऊन शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नात भर पडली होती. भाऊसाहेब थोरात यांचे हे धोरण पुढेही सातत्याने चालु असून अहमदनगर जिल्हयातील अनेक शेतकरी या योजनेचा लाभ घेत आहेत.[७८]

### ६.६.९ भाऊसाहेब थोरात अहमदनगर जिल्हा बँकेचे अध्यक्ष असतांना शेतकऱ्यांना कर्जाच्या माध्यमातून केलेले आर्थिक सहाय्य :-

भाऊसाहेब थोरात दि अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को- ऑपरेटिव्ह बँक लि. अहमदनगर या बँकेचे सन १९६० साली संचालक झाले होते. १९६० ते १९९९ या कालावधीत ३८ वर्ष भाऊसाहेब अहमदनगर जिल्हा बँकेत अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक पदी होते. ११ वर्ष बँकेचे अध्यक्ष असतांना भाऊसाहेब थोरात यांनी सातत्याने जिल्हयातील शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले होते. भाऊसाहेब थोरात यांनी जिल्हयातील शेतकऱ्यांना पाणीपुरवठा योजनेसाठी शेतीपुरक उद्योगासाठी त्याचप्रमाणे दुधाळ गाईसाठी

अत्यल्प व्याजदराने सातत्याने कर्जपुरवठा केला होता. भाऊसाहेबांच्या शेतकऱ्यांविषयी या धोरणामुळे अहमदनगर जिल्हयातील दूध उत्पादनात प्रचंड प्रमाणात वाढ घडुन आली होती. शेतकऱ्यांच्या हाती बऱ्यापैकी पैसा खेळू लागला होता. भाऊसाहेबांनी सहकारी तत्वावर सुरु केलेल्या संगमनेर दुध संघाप्रमाणेच जिल्हयातील दुध संकलन प्रचंड प्रमाणात वाढले होते. भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हा बॅकेतील आपल्या अध्यक्ष पदाचा उपयोग सातत्याने शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी केल्याने जिल्हयाचा आर्थिक विकास घडून येण्यात भाऊसाहेब थोरात यांचे योगदान महत्वपूर्ण राहिले आहे.[७९]

### ६.६.१० भाऊसाहेबांचे दुध रिबेटच्या माध्यमातुन अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान :-

भाऊसाहेब थोरात यांनी स्थापन केलेल्या संगमनेर सहकारी दुध उत्पादक संघास जो वार्षिक नफा होत असतो त्या वार्षिक नफ्यातील हिस्सा फरक म्हणुन दुध उत्पादक शेतकऱ्यांना वर्षाच्या शेवटी दिला जातो. भाऊसाहेब थोरात यांनी घालुन दिलेल्या नियमानुसार सध्याही त्याच पध्दतीने नफ्यातील काही भाग दूध संघास दूध देणाऱ्या शेतकऱ्यांना वर्षाच्या शेवटी दिला जातो. सन २०१३-२०१४ या वर्षी ही संकलीत केलेल्या दुधावर प्रती लिटर १.७० पैसे इतका दुध दर फरक म्हणुन दिला जातो. दुध फरकाच्या माध्यमातुन दुध उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिलिटर मागे वर्षाच्या शेवटी एकदम रक्कम मिळत असल्याने दुध उत्पादक शेतकऱ्यांच्या वार्षिक उत्पन्नात भर पडत आहे. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी भाऊसाहेब थोरात यांनी दुध संघाच्या माध्यमातुन सुरु केलेली दुध फरक योजना शेतकऱ्यांचा आर्थिक विकास करणारी ठरत आहे. पर्यायाने अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासासाठी रिबेटच्या माध्यमातुन मोठी भर पडत असल्याने अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासास गती मिळाली आहे.[८०]

### ६.६.११ भाऊसाहेबांनी सुरु केलेल्या संगमनेर दुध संघाची आर्थिक स्थिती जिल्हयाच्या आर्थिक विकासास लाभदायक :-

भाऊसाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर दूध संघाची सातत्याने प्रगतीकडे वाटचाल सुरु आहे. त्याचा हा वारसा मा.आ.श्री. बाळासाहेब थोरात यांच्या धोरणातुन दुध संघ सध्या प्रगतीच्या उच्च शिचारावर आहे. भाऊसाहेब थोरात यांच्या दुरदृष्टी धोरणामुळे सध्या मा.आ.श्री.बाळासाहेब थोरात यांच्या नेत्रदिपक कामगिरीमुळे संघ मोठया प्रमाणात नफ्यात आहे. भाऊसाहेब थोरात यांच्या प्रेरणेतुन संघ सातत्याने प्रगतीकडे वाटचाल करत

आहे. मार्च २०१४ अखेर दुध संघास १४.६७ कोटीचा नफा झाला होता. दुध संघास मिळालेला नफा हा अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक भर टाकणारा ठरला आहे.[८१]

भाऊसाहेब थोरात यांनी संगमनेर दूध उत्पादक संघ हा अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासात भर टाकणारा ठरला आहे. संगमनेर दूध उत्पादक संघ हा राज्यात आदर्श दुध उत्पादक संघ म्हणुन ओळखला जातो.

मा.भाऊसाहेब थोरात यांचे मार्गदर्शन व आमदार बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली मा. बाजीराव पाटील खेमनर हे जवळपास १५ वर्ष दूध संघाचे चेअरमन होते. बाळासाहेब थोरात यांच्या संगमनेर दूध उत्पादक संघामुळे अहमदनगर जिल्हयातील अनेकांना रोजगार मिळाला. अनेकांचे संसार फुलले आहेत. जिल्हयाच्या आर्थिक विकासात भर टाकली आहे. संगमनेर दुध उत्पादक संघाच्या उत्तम भागीदारीची व नेत्रदिपक प्रगतीची राज्य पातळीवर नोंद घेतली असून संगमनेर दुध उत्पादक संघास पशुपालन व दुधव्यवसाय विभागातील 'वंसतराव नाईक' पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. भाऊसाहेब थोरात यांच्या सहकार वाढीतील कार्यामुळे अहमदनगर जिल्हयाचा आर्थिक विकास घडुन येण्यास मदत झाली आहे.

### ६.६.१२ भाऊसाहेब थोरात सन १९९७-९८ साली राजहंस दूध संघाचे अध्यक्ष असतांना दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी राबवलेल्या योजनांचे लाभार्थी शेतकरी :-

**तक्ता क्रं.३०**

| अ.नं. | लाभार्थी शेतकरी | गावाचे नाव |
|---|---|---|
| १) | डोंगरे संपतराव विष्णू | निमज |
| २) | सांगळे गणपतराव पुंजाजी | हंगेवाडी |
| ३) | रहाणे रामनाथ बाबुराव | चंदनापूरी |
| ४) | सिनारे सुर्यभान नामदेव | चिखली |
| ५) | चकोर राजेंद्र नामदेव | खळी |
| ६) | जोंधळे प्रतिभा सोमनाथ | निमगांवजाळी |
| ७) | सागर पांडुरंग बाबुराव | बिरेवाडी |
| ८) | मांडेकर संतोष निवृत्ती | रायतेवाडी |
| ९) | गायकर बाळासाहेब नबाजी | राजापूर |

| अ.नं. | लाभार्थी शेतकरी | गावाचे नाव |
|---|---|---|
| १०) | करंजेकर मोहनराव चंद्रभान | सायखिंडी |
| ११) | कानवडे सतिष पुंजा | सावरचोळ |
| १२) | यादव माणिक दाजिबा | जोर्वे |
| १३) | मुंगसे भारत विश्वनाथ | चोरकौठे |
| १४) | जाधव शरद संपत | पानोडी |
| १५) | घुगे भाऊसाहेब भागा | पानोडी |
| १६) | पावसे भास्कर गोविंद | हिवरगांव पावसा |
| १७) | जाधव भाऊसाहेब लक्ष्मण | हिवरगांव पावसा |
| १८) | कुरकुटे विलास जिजाबा | कुरकुटवाडी |
| १९) | शिंदे दत्तात्रय अप्पाजी | रहिमपूर |
| २०) | रोहम पंढरीनाथ दामू | वाघापूर |

आदी शेतकऱ्यांनी भाऊसाहेबांनी दूध संघात राबविलेल्या योजनेचा लाभ घेतला. भाऊसाहेबांनी घालुन दिलेल्या नियमानुसार आजही दूध संघाची वाटचाल.

माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात हे राजहंस दूध संघाचे १९९५, १९९६, १९९७, १९९८, २००२, २००३ या वर्षी संचालक होते. तर १९८० ते १९८८ पर्यंत ते अध्यक्ष असतांना त्यांनीही दूध संघाच्या माध्यमातून दूध उत्पादकांसाठी विविध योजना राबविल्या. आजही त्यांच्या नेतृत्वाखाली राजहंस दूध संघ महाराष्ट्रातील एक अग्रगण्य दूध संघ म्हणून ओळखला जातो. माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांचे मार्गदर्शन आणि देशमुख रणजितसिंह विजयसिंह यांच्या अध्यक्षतेखाली दूध संघाचे कामकाज पाहिले जाते. सद्यस्थितीला दूध संघाचे दिवसाचे संकलन ३,६१,००० लिटर पर्यंत गेले आहे. दूध संघाची सद्याची वार्षिक उलाढाल ४०० कोटीच्या आसपास आहे. संघाच्या माध्यमातून ९०० कर्मचाऱ्यांना रोजगार मिळाला असून अहमदनगर जिल्हयातील सर्वाधिक भाव देणारा दूध संघ म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.[८२]

## ६.७ भाऊसाहेब थोरात यांचे अमृतवाहिनी नागरी सहकारी बँकच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान :-

सरकारी बँका सर्वसामान्य गरीब शेतकऱ्यांना कर्ज देण्यास टाळाटाळ करीत असत. तेव्हा भाऊसाहेबांना वाटत होते की, अमृत उद्योग समुहामध्ये एखादी सर्वसामान्य जनतेची बँक असावी. या उद्देशपूर्तीसाठी भाऊसाहेब थोरात इ.स.१९७८ पासून प्रयत्नशील होते. रिझर्व्ह बँकेकडून प्रत्येक वेळी नकार मिळत होता. तरीही भाऊसाहेब थोरात यांनी आपले प्रयत्न सोडले नाहीत. महाराष्ट्र राज्य बँकेत एल.एस.मराठे हे अधिकारी होते. ते नागरी सहकारी बँक विभागाचे प्रमुख होते. रिझर्व्ह बँकेतील अधिकाऱ्यांशी त्यांचा जवळचा संपर्क होता. त्यांच्या प्रयत्नामुळे अमृतवाहिनी नागरी सहकारी बँकेस परवानगी मिळाली होती.

भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी नागरी सहकारी बँकेचे उद्घाटन ३१ जुलै १९८३ रोजी रिझर्व्ह बँकेचे एक्सिक्युटिव्ह डायरेक्टर डॉ.एच.बी.शिवमंगी यांचे हस्ते झाले. बँकेच्या कामकाजास ०१ ऑक्टोबर १९८३ रोजी सुरुवात झाली. भाऊसाहेब थोरात यांनी फक्त पदासाठी संस्था काढल्या नाहीत. संस्था स्थापन करुन आपल्या प्रमाणेच सहकाराचे चाहते असणाऱ्यांना महत्वाच्या पदावर नेमले. त्यामुळेच भाऊसाहेबांच्या कल्पनेतून अमृतवाहिनी बँकेचा विस्तार होऊ शकला. आजही माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात वडीलांप्रमाणेच बँकेचे कामकाज पाहत आहेत.सध्या बँकेच्या सात शाखा आहेत. बँकेचे कार्यक्षेत्र अहमदनगर जिल्हयापुरते मर्यादित आहे.[८३]

पहिल्या वर्षी बँकेचे कामकाज फक्त ९ महिने चालले. मात्र इ.स.१९८४ पासून बँक सातत्याने विकासाकडे वाटचाल करत आहे. इ.स.१९८५ अखेर बँकेची सभासद संख्या २४३३ झाली होती. बँकेचे सुरुवातीचे भाग भांडवल ३.३५ लाख एवढे होते. बँकेला लाभलेल्या आदर्श संचालक मंडळामुळे बँक दिवसेंदिवस प्रगतीकडे वाटचाल करत आहे. सध्या बँकेची सभासद संख्या ३१ मार्च २०१५ अखेर 'अ' वर्ग सभासद ६४५० असून नाममात्र सभासद संख्या १५०२ इतकी आहे.

मार्च २०१५ रोजी बँकेच्या एकूण ठेवी १८८.९३ कोटींचा कर्ज व्यवहार झालेला आहे. तसेच बँकेची सुरक्षित गुंतवणुक ८६.७८ कोटीची झालेली आहे. ३१ सप्टेंबर २०१५ अखेर बँकेच्या ठेवी २१९.१३ कोटी, कर्जे १२८.१४ कोटी व गुंतवणुक ९७.३१ कोटी इतकी झालेली आहे. ३१ मार्च अखेर बँकेस नफा २.६२ कोटी झाला आहे. ३१ मार्च २०१५ अखेर बँकेचे

खेळते भांडवल २३१.६८ कोटी झालेले आहे. अहमदनगर जिल्हयात बँकेच्या एकूण ७ शाखांमध्ये विस्तार झाला आहे.[८४]

अहमदनगर जिल्हयात बँकेच्या एकुण ७ शाखांमध्ये विस्तार झाला असून बँकेचा शाखाविस्तार जिल्हयाच्या शेजारील नाशिक, पुणे, ठाणे, औरंगाबाद या जिल्हयामध्ये बँकेचा शाखाविस्तार करण्यासाठी बँकेचे संचालक मंडळ प्रयत्नशील आहे.[८५]

**६.७.१ भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी नागरी सहकारी बँक स्थापनेचे उद्देश :-**

भाऊसाहेब थोरात यांचे अमृतवाहिनी नागरी सहकारी बँक स्थापनेचे एकच उद्दिष्टे होते की, अहमदनगर जिल्हयातील अगदी सामान्य शेतकऱ्यांना देखील वेळेवर कर्ज पुरवठा केला जावा. भाऊसाहेब थोरात यांनी अमृतवाहिनी नागरी सहकारी बँकेच्या माध्यमातून कर्ज पुरवठा केला जातो. त्याचप्रमाणे जिल्हयातील सर्वसामान्य शेतकऱ्यांना छोटे उद्योगदार यांना कर्ज पुरवठा केला जातो. त्याचप्रमाणे जिल्यातील सर्वसामान्य शेतकऱ्यांना पॉलीहाऊस, दूधव्यवसाय, कुक्कुटपालन, शेतीसाठी पाईपलाईन, विहीरखोदाई व दूरुस्ती, शेतीपूरक उद्योग, शेतीमाल साठवणुकीसाठी अर्थसाहय, बचतगटांना अर्थसाहय, पगारदार नोकरांसाठी कर्जपुरवठा आदी उद्योगधंद्यासाठी भाऊसाहेबांनी बँकेच्या माध्यमातून कर्जपुरवठा करण्याचे धोरण अवलंबिले होते. बँकेद्वारे स्थावर मालमत्तेचे गहाणखत करुन ६० लाखापर्यंत कर्ज सुविधा भाऊसाहेबांनी सुरु केल्. याशिवाय बँकेच्या सभासदांच्या कुटूंबातील सदस्यांना कॅन्सर, ह्दय विकार, बायपास सर्जरी, किडनी रोपण अशा आजारासाठी बँकेच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य केले आहे.

भाऊसाहेब थोरात यांनी अमृतवाहिनी नागरी सहकारी बँकेच्या माध्यमातून सर्वसामान्य शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्याचे जे धोरण राबविले होते त्यामुळे सर्वसामान्य लोक, शेतकरी, छोटे उद्योजक यांचा आर्थिक विकास होण्यास सहाय्य केले आहे. अहमदनगर जिल्हयातील अगदी सामान्य शेतकरीही या बँकेतील कर्ज सुविधेचा लाभ घेऊन यशस्वीपणे प्रगतीकडे वाटचाल करत आहेत. अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासात भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी नागरी सहकारी बँकेचे योगदान महत्वपूर्ण राहिले आहे. भाऊसाहेब थोरात यांच्या नंतरही त्यांचा मुलगा मा.आ.बाळासाहेब थोरात यांनी आपल्या वडिलांच्या धोरणानुसार बँकेची वाटचाल विकासाकडे करत आहे. भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी नागरी सहकारी बँक अहमदनगर जिल्हयातील अगदी सामान्यांना दिलासा देणारी बँक म्हणून ओळखली जाते.

### ६.७.२ लाभार्थी शेतकरी व उद्योजक सन १९९९ ते २०००.

भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी बँक संगमनेर या बँकेच्या माध्यमातून शेतकरी शेती उद्योगांसाठी कर्ज घेत असतात. त्याचप्रमाणे छोटे छोटे कुटीर उद्योग चालविणारे उद्योजकही या बँकेकडून कर्जे घेत असतात. त्यातील लाभार्थी शेतकरी व उद्योजक.

**तक्ता क्रं.३१**

| अ.नं. | लाभार्थी शेतकरी | गावाचे नाव |
|---|---|---|
| १) | फड बाळासाहेब शिवराम | शेडगांव |
| २) | लोंढे सुरेश सखाराम | साकूर |
| ३) | गोपाळे प्रकाश रामकृष्ण | निमगांव खुर्द |
| ४) | शेख निसार बशीर | कुरण |
| ५) | एरंडे दिनकर म्हातारबा | झोळे |
| ६) | टाक बापुसा गंगासा | संगमनेर |
| ७) | कुटे वसंत भिकाजी | सुकेवाडी |
| ८) | राऊत बाळासाहेब रामचंद्र | घुलेवाडी |
| ९) | ठोमसे पाराजी म्हातारबा | रायतेवाडी |
| १०) | सोनवणे गोरक्षनाथ लक्ष्मण | वेल्हाळे |

आदी शेतकऱ्यांनी बँकेच्या कर्ज वितरण धोरणांचा लाभ घेऊन शेती व शेतीस जोडधंदा सुरु करण्यासाठी या कर्जाचा उपयोग करत आर्थिक दृष्टीने ते आज स्वावंलबी बनले आहेत.[८६]

## ६.८ भाऊसाहेब थोरात यांचे गरुड कुक्कुटपालन संस्थेच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान :-

भाऊसाहेब थोरात सहकाराच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाचा आर्थिक विकास करण्याचे ध्येय समोर ठेवून कार्य करत होते. अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकास साध्य करत असतांना भाऊसाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्हयातील सहकार वाढीस महत्वपूर्ण योगदान दिले आहे. सहकारी संस्थांची स्थापना करुन अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासात महत्वपूर्ण योगदान दिले. जिल्हयाचा आर्थिक विकास साध्य करत असतनां

भाऊसाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्हयातील सायखिंडी येथे गरुड कुक्कुटपालन संस्थेची स्थापना ३० जून १९८३ रोजी केली होती.

गरुड कुक्कुटपालन संस्थेच्या स्थापनेमागे भाऊसाहेबांचा एकच उद्देश होता की, अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांना शेतीस जोडधंदा मिळावा आणि त्याच्या आर्थिक उत्पन्नात भर पडावी. या उद्देशाने भाऊसाहेब थोरात यांनी गरुड कुक्कुटपालन संस्थेची स्थापना केली होती. शेतकरी या संस्थेचा सभासद झाल्यानंतर त्या शेतकऱ्यांना ना नफा ना तोटा या तत्वावर बॉयलर कोंबडयांची पिल्ले दिली जातात. शेतकऱ्यांनी त्याचा सांभाळ करुन दोन ते अडीच किलो वजनाची कोंबडी झाल्यानंतर शेतकऱ्यांकडून पुन्हा त्यांची खरेदी केली जाते. संस्थेच्या माध्यमातून पक्षी व खाद्यपुरवठा याचा खर्च वजा जाता बाजारभावाप्रमाणे शिल्लक रक्कम शेतकऱ्यांना दिला जातो. याशिवाय जे शेतकरी अंडयापासून उत्पन्न मिळवु इच्छितात अशा शेतकऱ्यांना 'लिअर्स कोंबडया' चा पुरवठा केला जातो. शेतकऱ्यांकडून कोंबडयाची अंडी पुन्हा संस्थेद्वारे खरेदी केले जातात. सध्या अहमदनगर जिल्हयातील ५७५ शेतकरी या संस्थेचे सभासद असून ते संस्थेच्या माध्यमातून उत्तम प्रकारे कुक्कुटपालन व्यवसाय करत आहेत. भाऊसाहेब थोरात यांच्या कल्पनेतुन सुरु झालेल्या संस्थेच्या माध्यमातून शेतीस जोडधंदा म्हणून अधिकाधिक लोक या संस्थेचे सभासद होत आहेत. भाऊसाहेब थोरात यांच्या धोरणातुन शेतकऱ्यांना आर्थिक मिळकत मिळून देण्याचे एक माध्यम म्हणुन गरुड कुक्कुटपालन संस्था ओळखली जाते.[८७]

### ६.८.१ गरुड कुक्कुटपालन संस्थेची सद्य:स्थिती :-

भाऊसाहेब थोरात यांनी सुरु केलेल्या गरुड कुक्कुटपालन संस्थेकडे संध्या ४ शेड आहेत. या शेडमध्ये ४० हजार पक्षी आहेत. पक्षाची देखभाल ठेवण्यासाठी १० कामगार आहेत. दिवसेंदिवस संस्था प्रगतीकडे वाटचाल करत आहे. संस्थेचे भाग भांडवल ८ लाख ५० हजार असून सध्या संस्थेची येणे बाकी ४ लाख २२ हजार असून संस्थेची वार्षिक उलाढाल ४५ ते ५० लाखाची होते. संस्थेस ३१ मार्च २०१५ अखेर ३ लाख १६ हजार इतका नफा झाला आहे. तर संस्थेची एकूण मालमत्ता ५० लाख आहे. संस्थेने ही प्रगती कोणत्याही प्रकारचे कर्ज न घेता केली आहे.

भाऊसाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांच्या विकासासाठी ज्या विविध योजना राबविल्या होत्या त्यातील गरुड कुक्कुटपालन संस्था शेतकऱ्यांना खेळते

भांडवल उपलब्ध करुन देणारी एक महत्वाची संस्था आहे. या संस्थेने अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांचा आर्थिक विकास साध्य करण्यात महत्वपूर्ण योगदान दिले आहे.

भाऊसाहेब थोरात यांनी सहकाराच्या माध्यमातून ज्या विविध सहकारी संस्था काढल्या. त्या संस्थांचे अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासात महत्वपूर्ण योगदान आहे. भाऊसाहेब थोरात यांच्या दूरदृष्टीमुळे अहमदनगर जिल्हयाचा आर्थिक विकास घडून येऊ शकला.[८८]

## ६.९ उपसंहार :-

समाजात फार थोडी माणसे ध्येयवेडी असतात. त्यातील भाऊसाहेब थोरात हे एक होते. स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्य प्राप्तीसाठी तर स्वातंत्र्योत्तर काळात अहमदनगर जिल्हयाच्या सर्वांगिण विकासातुन आर्थिक विकास साध्य करण्यासाठी भाऊसाहेबांनी सहकारतत्व प्रणालीचा स्विकार करुन अहमदनगर जिल्हयात सहकार रुजविण्यात महत्वपूर्ण योगदान दिले होते.

भाऊसाहेब थोरात महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष असतांना बँकेत विकास कक्षाची स्थापना करुन शेती व ग्रामीण विकासासाठी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना, कामगारांना, उद्योजकांना वेळेवर आर्थिक साहय पुरविण्याचे धोरण अवलंबविले. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातुन शेतकऱ्यांना ट्रॅक्टरसाठी, शेतीपुरक व्यवसाय, मच्छिमारांसाठी कर्ज योजना, महाराष्ट्रातील सहकारी संस्थांना कर्जपुरवठा, उद्योजकांना कर्जपुरवठा, बँकेच्या माध्यमातुन विविध योजना राबवुन महाराष्ट्रातील शेतकरी, कामगार, उद्योजक, यांना वेळेवर आर्थिक साहय करण्याच्या माध्यमातुन भाऊसाहेबांचे महत्वपर्णु योगदान होते. महाराष्ट्र राज्य बँकेतील या विविध योजनांचा उपयोग अहमदनगर जिल्हयातील सहकारवाढीसाठी शेतकऱ्यांसाठी कामगार, उद्योजक, यांच्यासाठी भाऊसाहेबांनी पुरेपुर करुन अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासात महत्वपुर्ण योगदान दिले होते. त्याचप्रमाणे सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात सहकारी साखर कारखान्याची स्थापना करुन कारखान्याच्या माध्यमातुन विविध योजनांद्वारे शेतकऱ्यांना जे आर्थिक सहाय्य केले यातून अहमदनगर जिल्हयाचा आर्थिक विकास घडवुन येण्यास सहाय्य झाले. त्याचप्रमाणे राजहंस दूध संघाची स्थापना करुन दुध संघाच्या माध्यमातुन

शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविल्या व त्यातुन शेतकऱ्यांचा सर्वांगिण विकास साध्य करण्याचे धोरण अवलंबिले.

या शिवाय गरुड कुक्कुटपालन संस्थेच्या माध्यमातुन अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासात महत्वपूर्ण योगदान दिले. याशिवाय अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्था या संस्थेच्या माध्यमातुन अमृतवाहिनी नागरी सहकारी बँकेची स्थापना करुन शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करण्याचे धोरण अवलंबिले. तसेच भाऊसाहेब थोरात इ.स.१९६० पासून जिल्हा मध्यवर्ती बँकेत अध्यक्ष असतांना भाऊसाहेबांनी बँकेतील विविध योजनांच्या माध्यमातुन जिल्हयातील श्ेतकऱ्यांना शेती अवजारे शेतीपूरक व्यवसाय, कामगारांसाठी कर्ज पुरवठा, लघु उद्योजकांना कर्ज पुरवठा, मोठया उद्योगांना कर्ज पुरवठा, सहकारी संस्थांना कर्ज पुरवठा, सहकारी साखर कारखान्यांना कर्ज पुरवठा, शैक्षणिक संस्थांना आर्थिक सहाय्य केले. भाऊसाहेबांनी बँकेत राबविलेल्या विविध योजनांच्या माध्यमातुन अहमदनगर जिल्हयातील सहकार, शेतकरी, कामगार, लघुउद्योजक, शैक्षणिक संस्था यांना वेळेवर केलेला कर्जपुरवठा व आर्थिक सहाय्यामुळे अहमदनगर जिल्हयाचा आर्थिक विकास घडवून येण्यात भाऊसाहेब थोरात यांचे योगदान महत्वपूर्ण ठरले आहे.

*****

# संदर्भ ग्रंथ

१) कसबे रावसाहेब, लामखडे मा.रा.- 'शेती आणि सहकार', थोरात भाऊसाहेब गौरव ग्रंथ, प्रकाशन- बाळासाहेब गुंजाळ, संगमनेर,प्रकाशन विश्वकर्मा मुद्रणालय संगमनेर, पृ.क्रं.१७५, १७६.

२) घाणेकर वि.वि.- 'सहकार चळवळीचे १०० वर्षाचे अवलोकन व नवी आव्हाने',प्रकाशक - इन्स्टीटयुट ऑफ एज्युकेशन, रत्नाकर बंगला, आपटे रोड पुणे, प्रकाशक- प्रकाश मुद्रणालय, सदाशिव पेठ पुणे, प्रथमावृत्ती २० ऑगस्ट २००४, पृ.क्रं.९०,९१.

३) कित्ता - पृ.क्रं.९३, ९५.

४) थोरात भाऊसाहेब, 'अमृतमंथन' प्रकाशक- लाटकर उल्हास चिंतामणी, प्रकाशन - अमेय, प्रकाशन, सदाशिव पेठे पुणे, तृतीय आवृत्ती ११ जानेवारी १९९९, पृ.क्रं.२१५,२१६, २१८,२२१, २२२, २२३.

५) मुलाखत - खेमनर बाजीराव खंडूजी, माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक, अहमदनगर जिल्हा सहकारी बँक,अहमदनगर,दि.१२/०९/२०१६

६) थोरात भाऊसाहेब 'अमृतगाथा' प्रकाशक - लाटकर उल्हास चिंतामणी, प्रकाशन - अमेय, प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती जुलै २००२ पृ.क्रं.१३०,१३२

७) मुलाखत -रहाणे रामनाथ भाऊराव,मु.पो.चंदनापुरी,ता.संगमनेर,जि.अहमदनगर, दि.१५/०९/२०१६.

८) थोरात भाऊसाहेब 'अमृतगाथा' पूर्वोक्त क्रं.६, पृ.क्रं.२०१

९) मुलाखत - कुटे भाऊसाहेब दामोधर, मु.पो.सुकेवाडी, संगमनेर,जि.अहमदनगर, दि.१७/०९/२०१६.

१०) थोरात भाऊसाहेब 'अमृतगाथा' पूर्वोक्त क्रं.६, पृ.क्रं.२४४

११) मुलाखत- कडू पुंजाजी बापुजी, मु.पो.सात्रळ, ता.राहुरी, जि.अहमदनगर, दि.२०/०७/२०१६.

१२) थोरात भाऊसाहेब 'अमृतगाथा' पूर्वोक्त क्रं.६, पृ.क्रं.२४०

१३) थोरात भाऊसाहेब 'अमृतगाथा' पूर्वोक्त क्रं.६, पृ.क्रं.२३७, २३८.

१४) थोरात भाऊसाहेब 'अमृतगाथा' पूर्वोक्त क्रं.६, पृ.क्रं.२५२

१५)	मुलाखत : पुर्वोक्त क्रं.५, दि.२३/१०/२०१६.

१६)	पहिला वार्षिक अहवाल, अहमदनगर जिल्हा सहकारी बँक,अहमदनगर वर्ष १९५८, पृ.क्रं.२,३.

१७)	५१ वा वार्षिक अहवाल, अहमदनगर जिल्हा सहकारी बँक,अहमदनगर, सुवर्ण महोत्सवी वर्ष २००७-०८, पृ.क्रं.४४,४५.

१८)	४२ वा वार्षिक अहवाल, अहमदनगर जिल्हा सहकारी बँक,अहमदनगर, वर्ष १९९८-९९, पृ.क्रं.४४,४५.

१९)	६० वा वार्षिक अहवाल, अहमदनगर जिल्हा सहकारी बँक,अहमदनगर, वर्ष २०१६-१७, पृ.क्रं.३७,३८.

२०)	वार्षिक अहवाल, अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, भाऊसाहेब थोरात यांचे अध्यक्षीय काळातील, १९६५ ते १९६९, १९७३ ते १९७७, १९९५ ते १९९९.

२१)	५१ वा वार्षिक : पुर्वोक्त क्रं.१७, पृ.क्रं.६, ६० वा वार्षिक अहवाल, पुर्वोक्त क्रं.१९, पृ.क्रं.८.

२२)	परिवर्तन, संपादक, गडाख शंकरराव यशवंतराव, सुवर्ण महोत्सवी वर्ष,अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, १९५८ ते २००८, पृ.क्रं.२८,२९.

२३)	कित्ताः  पृ.क्रं.८०.

२४)	कित्ता : पृ.क्रं.१०८,१०९.

२५)	कित्ता : पृ.क्रं.१२३,१२४,१३१.

२६)	कित्ता : पृ.क्रं.२९.

२७)	अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, "कर्जविषयक धोरण" माहिती पुस्तिका, भाग-२, १९९८-१९९९, पृ.क्रं.१ ते १६.

२८)	परिवर्तन : पुर्वोक्त क्रं.२२, पृ.क्रं.२९.

२९)	अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, "कर्जविषयक धोरण" माहिती पुस्तिका, पुर्वोक्त क्रं.२७,पृ.क्रं.२०.

३०)	अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, "कर्जविषयक धोरण" माहिती पुस्तिका, भाग-२, वर्ष १९९५-१९९६, पृ.क्रं.२१.

३१)	कित्ता : पृ.क्रं.२१.

३२) अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, "कर्ज वितरण धोरण" माहिती पुस्तिका, पुर्वोक्त क्रं.३०,पृ.क्रं.२८.

३३) कित्ता : सन १९९८-१९९९, पृ.क्रं.१६.

३४) अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, "कर्ज विषयक धोरण" माहिती पुस्तिका,भाग-२, वर्ष १९९७-१९९८,पृ.क्रं.१७.

३५) ३८ ते ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा पुस्तिका अध्यक्षीय भाषण, भाऊसाहेब संतुजी थोरात,अहमदनगर जिल्हा सहकारी बँक,वर्ष १९९५ ते १९९९.

३६) अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, "विनियोग तपासणी रजिस्टर नं.५", वर्ष १९९५ ते २००० पर्यंत.

३७) अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, पुर्वोक्त क्रं.२७,पृ.क्रं.१९,३८.

३८) कित्ता : पृ.क्रं.२३.

३९) अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, "कर्ज विषयक धोरण" माहिती पुस्तिका पुर्वोक्त क्रं.३४,,पृ.क्रं.२५.

४०) अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, "कर्ज विषयक धोरण" माहिती पुस्तिका, पुर्वोक्त क्रं.३० पृ.क्रं.२९

४१) अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, "कर्ज विषयक धोरण", पुर्वोक्त क्रं.३४ पृ.क्रं.२६.

४२) मुलाखतः खेमनर बाजीराव खंडुजी, पुर्वोक्त क्रं.५, दि.०५/०४/२०१७

४३) ३९ ते ४२ वार्षिक अहवाल, वर्ष १९९५ ते ९९.

४४) मुलाखत : गायकर सिताराम कोंडाजी, अध्यक्ष, अहमदनगर जिल्हा सहकारी बँक,दि.१५/०५/२०१७.

४५) पाटील सुरेश रामभाऊ, स्टेशनरी विभाग प्रमुख, अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, मुख्य शाखा, अहमदनगर. दि.२०/०७/२०१७.

४६) मुलाखतः वाघ रामदास काशिनाथ, उपाध्यक्ष, अहमदनगर जिल्हा सहकारी बँक,दि.१५/०६/२०१७.

४७) मुलाखत : खेमनर बाजीराव खंडुजी, पुर्वोक्त क्रं.५, दि.२२/०७/२०१७.

४८) मुलाखत : गायकर सिताराम कोंडाजी, पुर्वोक्त क्रं.४४, दि.२७/०७/२०१७.

४९) परिवर्तन : संपादक, गडाख शंकरराव यशवंतराव, पुर्वोक्त क्रं.२२, पृ.क्रं.८०, १५८.

५०) कित्ता : पृ.क्रं.१५८

५१) कित्ता : पृ.क्रं.१६०.

५२) मुलाखत : वर्पे रावसाहेब लक्ष्मण, मुख्य कार्यकारी अधिकारी, अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, मुख्य शाखा : अहमदनगर.दि.२४/०७/२०१७.

५३) परिवर्तन : प्रकाशक - गडाख शंकरराव यशवंतराव, पुर्वोक्त क्रं.२२, पृ.क्रं.८८.

५४) कित्ता : पृ.क्रं.८४,८५.

५५) कित्ता : पृ.क्रं.९१,९२

५६) कित्ता : पृ.क्रं.१०२,१०३,१०४.

५७) कित्ता : पृ.क्रं.१०६.

५८) मुलाखतः कानवडे माधवराव सावळेराम, अध्यक्ष, संगमनेर भाग सहकारी साखर कारखाना, संगमनेर, दि.२१/०९/२०१६.

५९) मुलाखत : पुर्वोक्त क्रं.५, दि.२५/०९/२०१६.

६०) मुलाखत : पुर्वोक्त क्रं.५,दि.२८/०९/२०१६.

६१) मुलाखत : पुर्वोक्त क्रं.५, दि.२६/०९/२०१६

६२) मुलाखत : पुर्वोक्त क्रं.५, दि.२७/०९/२०१६

६३) ४८ वा वार्षिक अहवाल - सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात सहकारी साखर कारखाना लि. अमृतनगर, सन २०१४-२०१५, प्रकाशक - माधवराव कानवडे, मुद्रक क्वालिटी प्रिंटर्स,संगमनेर, पृ.क्रं.१२

६४) मुलाखत- कानवडे माधवराव सावळेराम, निमगाव बु.,ता.संगमनेर,जि.अहमदनगर. दि.२८/०९/२०१६.

६५) संगमनेर भाग सहकारी साखर कारखाना, कर्ज वितरण रजिस्टर क्रं.०८.वर्षे १९९२.

६६) घाणेकर डॉ.वि.वि.,- पुर्वोक्त क्रं.२, पृ.क्रं.२५.

६७) स्मरणिका रौप्यमहोत्सवी स्मरणिका - 'यशोधन' सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्यादित संगमनेर, सन १९७७-२००२, पृ.क्रं.१,२,३.

६८) ३८ वा वार्षिक अहवाल - संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्यादित संगमनेर,प्रकाशक-श्री.रणजितसिंह विजयसिंह देशमुख, अध्यक्ष दूध संघ,संगमनेर २०१४-२०१५, मुद्रक-कामगार सहकारी मुद्रणालय,संगमनेर, पृ.क्रं.८,९.

६९) मुलाखत मा.देशमुख रणजितसिंह विजयसिंह, चेअरमन, सहकारी दूध उत्पादक प्रक्रिया संघ मर्यादीत संगमनेर,जि.अहमदनगर,दि.०५/१०/२०१६.

७०) मुलाखत पूर्वोक्त क्रं.५, दि.१५/१०/२०१६.

७१) ३८ वा वार्षिक अहवाल - पूर्वोक्त क्रं.६८, पृ.क्रं.१०.

७२) ३८ वा वार्षिक अहवाल - पूर्वोक्त क्रं.६८, पृ.क्रं.११.

७३) कित्ता - पृ.क्रं.१३, १४.

७४) २२ वा वार्षिक अहवाल, संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पाक व प्रक्रिया संघ मर्यादित संगमनेर, प्रकाशक मा.श्री. बाजीराव खंडूजी पाटील खेमनर, चेअरमन दूध संघ,मुद्रक- कामगार सहकारी मुद्रणालय, मर्यादित संगमनेर सन १९९८-९९, पृ.क्रं.६

७५) २६ वा वार्षिक अहवाल-संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पाक व प्रक्रिया संघ मर्यादित संगमनेर, प्रकाशक बाळाजी कुटे, चेअरमन, चेअरमन दूध संघ, मुद्रक - कामगार सहकारी मुद्रणालय, मर्यादित संगमनेर सन २००२-२००३, पृ.क्रं.१५.

७६) स्मरणिका,रौप्यमहोत्सवी स्मरणिका,'यशोधन' १९७७-२००२,पुर्वोक्त क्रं.२६, पृ.क्रं.०७.

७७) मुलाखत पुर्वोक्त क्रं.५, दि.१७/१०/२०१६.

७८) कित्ता - दि.२०/१०/२०१६.

७९) कित्ता - दि.२५/११/२०१६

८०) २६ वा वार्षिक अहवाल, पुर्वोक्त क्रं.७५, पृ.क्रं.७, ८

८१) कित्ता - पृ.क्रं.५, ६.

८२) थोरात भाऊसाहेब 'अमृतगाथा' पूर्वोक्त क्रं.६, पृ.क्रं.२८५.

८३) मुलाखतः उबाळे प्रताप जनार्दन,मॅनेजर,राजहंस दुध संघ, संगमनेर, दि.०९/११/२०१६.

८४) ३३ वा वार्षिक अहवाल - भाऊसाहेब संतुजी थोरात अृमतवाहीनी सहकारी बँक लि. घुलेवाडी, प्रकाशक -श्री. अमित वल्लभराय पंडीत, श्री.भाऊसाहेब संतुजी थोरात अमृतवाहिनी बँक लि.घुलेवाडी,ता.संगमनेर,जि.अहमदनगर.पृ.क्रं.५,९.

८५) कित्ता - पृ.क्रं.१२

८६) मुलाखत : श्री. अमित वल्लभराय पंडीत, चेअरमन,श्री.भाऊसाहेब संतुजी थोरात अमृतवाहिनी बँक लि.घुलेवाडी,ता.संगमनेर,जि.अहमदनगर,दि.०७/१०/२०१६.

८७) बो-हाडे भिकाजी होनाजी,रा.सायखिंडी,ता.संगमनेर,जि.अ.नगर, दि.१०/१०/२०१६.

८८) कित्ता दि.१५/१०/२०१६.

*****

# प्रकरण : सातवे

# सिंहावलोकन

**प्रकरण सातवे**

# सिंहावलोकन

स्थळ, काळ, व्यक्ति आणि समाज या चार आधारस्तंभावर इतिहास आधारलेला असतो. मानव हाच इतिहास अभ्यासाचा केंद्रबिंदु असतो. कार्लाइल हा इतिहासकार म्हणतो, की इतिहास म्हणजे थोरा पुरुषांची चरित्रे व त्यांनी केलेली कामगिरी होय. थोडक्यात, थोर पुरुषांच्या सामाजिक, राजकिय, आर्थिक, शैक्षणिक, सहकार, सांस्कृतिक विचारांचे आशा आकांक्षाचे, घडामोडींचे नि स्थितीचे प्रतिबिंब इतिहासात असते. म्हणूनच तर कार्लाईल महारपुरुषांच्या चरित्रांलाच इतिहास म्हणतो. कार्लाईलच्या म्हणण्यानुसार समाजातील काही व्यक्ति त्यांच्या कार्यामुळे श्रेष्ठ ठरत असतात. म्हणून त्यांचे कार्य समाजाचा सर्वांगिण विकास होण्यास सहाय्यभूत ठरत असते. अशाच विसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या पुर्नबांधणीत ज्या असंख्य व्यक्तीचे योगदान होते व आहे. त्यातील भाऊसाहेब थोरात हे एक होते. त्यांचे कार्य विस्तृतपणे अभ्यासक विद्यार्थी व समाजापुढे यावे या उद्देशाने प्रस्तुत शोधप्रबंधासाठी "सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या विकासातील योगदान",(१९२४-२०१०) हा विषय निवडला. प्रस्तुत विषयाचा अभ्यास करत असतांना प्रकरण १ ते ६ पर्यंत शोध प्रबंधाच्या शिर्षकाला न्याय देण्याचा पूर्णपणे यशस्वी प्रयत्न केला आहे. सर्व प्रकरणाचा पुन्हा संक्षेपाने आढावा घेऊन सार रुपाने प्रकरण सातमध्ये मांडण्यात आला आहे. संशोधन विषयाच्या संदर्भात अभ्यास करतांना संबधीत ग्रंथालये, कागदपत्रे, पत्रव्यवहार, अहवाल, वृत्तपत्रातील लेख, बातम्या, पुरस्कार, आदींचा उपयोग झाला. भाऊसाहेब थोरात यांचे समकालीन सहकारी, कौटुंबिक सदस्य व मित्र यांचे अनुभव मोलाचे ठरले. अशा पध्दतीने अस्सल व दुय्यम साधनांच्या सहाय्याने "सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या विकासातील योगदान" या विषयात शोधप्रबंधाची मांडणी केली.

शोधप्रबंधाची मांडणी एकुण सात प्रकरणामध्ये केलेली आहे.

**प्रकरण पहिले :- पार्श्वभुमी**

शोध प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात विषय प्रवेशामध्ये विविध इतिहासकाराच्या चरित्राच्या संदर्भात विचाराचा आढावा घेऊन आधुनिक भारताच्या इतिहासात भारतीय स्वातंत्र्य लढण्यात पंजाब आणि बंगाल प्रांताप्रमाणे महाराष्ट्र राज्य आघाडीवर होते. ब्रिटीश

सरकारच्या अन्याय अत्याचाराला प्रतिउत्तर देतांना महात्मा गांधीजींनी असहकार चळवळ सुरु केली. असहकार चळवळ स्थगितीनंतर सविनय कायदेभंग चळवळी अंतर्गत दांडी येथे मिठाचा सत्याग्रह केला. या सत्याग्रहानंतर जेथे समुद्र नाही तेथे जंगल सत्याग्रह झाला. प्रस्तुत प्रकरणात जंगल सत्याग्रह व दारुबंदी चळवळीतील सहभागींची यादी देण्यात आली आहे. सविनय कायदेभंगानंतर १९४२ ची चलेजाव चळवळ सुरु झाली असता त्यात महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्हा आघाडीवर होता. या चळवळीतील सहभागी स्वातंत्र्य सैनिकांमध्ये भाऊसाहेब थोरात आघाडीवर होते. भारतीय स्वातंत्र्य प्राप्तीपर्यंत अनेक स्वातंत्र्य सैनिक कम्युनिष्ट विचाराने कार्य करत होते. भाऊसाहेबांनी स्वातंत्र्यपूर्व तसेच स्वातंत्र्योत्तर १९५२ पर्यंत शेतकरी, कामगार यांच्यासाठी कम्युनिष्ट पक्षांतर्गत कार्य केले. आणि १९५२ साली सहकार तत्वाचा स्विकार करुन सहकार क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान दिले. सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांचे जिल्हयाच्या आर्थिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील कार्य भावी पिढीला प्रेरणादायक असल्याने त्यांचे व्यक्तीचरित्र प्रकाशात यावे म्हणूनच मी माझ्या पी.एचडी. शोध प्रबंधासाठी "भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या विकासातील योगदान" हा विषय निवडला आहे. संशोधन कार्य पुर्ण करण्यासाठी काही उद्दिष्टये डोळयासमोर ठेवुन संशोधन करण्यात आले. तसेच काही गृहीतके निश्चित करुन संशोधन कार्य करण्यात आले.

संशोधनाची मर्यादा निश्चित करताना भाऊसाहेब थोरात यांचा जन्म १२ जानेवारी १९२४ ते मृत्यु १४ मार्च २०१० असा त्यांच्या मृत्युपर्यंतचा आढावा घेण्यात आला. तसेच संशोधनाची सैध्दांतिक संकल्पना स्पष्ट करण्यात आली. संशोधनासाठी सर्वेक्षणात्मक, चर्चा, प्रश्नोत्तरे, मुलाखत आदी संशोधन पध्दतीचा योग्य त्या ठिकाणी समन्वय साधला आहे. तर संशोधनाच्या संदर्भ साधनात प्राथमिक साधने, दुय्यम साधने, विविध संस्थांचे अहवाल, स्मरणिका, मासिके, नियतकालिके, इंटरनेट लिंक आदी संशोधनाची संदर्भ साधने तसेच संशोधन विषयाशी संबधीत संशोधन किंवा पुर्वसुरीनां केलेल्या ऐतिहासिक मांडणीच्या आढाव्यात भाऊसाहेबांचे आत्मचरित्र, त्याचप्रमाणे विविध आत्मचरित्र व ग्रंथात भाऊसाहेबांच्या संदर्भात झालेले लेखन तसेच एम.फील., पीएच.डी. संशोधनांतर्गत भाऊसाहेबांवर झालेले संशोधन यांचा आढावा घेण्यात आला आहे. प्रकरणाच्या शेवटी प्रबंधाच्या सात प्रकरणात आलेल्या माहितीचा आढावा घेण्यात आला.

**प्रकरण दुसरे :-"अहमदनगर जिल्हयाची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी"**

प्रस्तुत प्रकरणामध्ये सुरुवातीला महाराष्ट्राच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीत महाराष्ट्र या शब्दाची व्युत्पत्ती, काळानुरुप विविध घराण्यातील राजवटी आदी घटकांचा आढावा घेण्यात आला आहे. यानंतर महाराष्ट्राच्या भौगोलिक पार्श्वभूमीत अक्षांश विस्तार, रेखांश विस्तार, आकार, लांबी, रुंदी, क्षेत्रफळ, समुद्रकिनारा, लोकसंख्या, प्रादेशिक विभाग, कोकण विभाग, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, मराठवाडा, विदर्भ, पश्चिम विदर्भ, पुर्व विदर्भ, खनिजसंपत्ती, हवामान, आदी घटकांचा आढावा घेतला आहे.

यानंतर अहमदनगर जिल्हयाची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी मांडण्यात आली असून अहमदनगर जिल्हयाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीत जिल्हयाचे पौराणिक महात्म्य, प्रागौतिहासिक काळ, इ.स.पूर्व २५०० ते ३०० पर्यंत प्राचीन काळ, मध्ययुगीन काळ, आधुनिक काळ, जिल्हयाची आर्थिक परिस्थिती, जिल्हयाची राजकीय परिस्थिती, टिळकयुग, गांधी युगातील अहमदनगर जिल्हयाचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान आदी घटकांचा आढावा घेण्यात आला आहे. अहमदनगर जिल्हयाच्या भौगोलिक पार्श्वभूमीत जिल्हयाचे अक्षांश, रेखांश, क्षेत्रफळ, विस्तार, हवामान, पर्जन्य, भौगोलिक विभाग, अति पावसाचा प्रदेश, कमी पावसाचा प्रदेश, माती, वनस्पती, जलसिंचन, पिके, खनिजे, वन्यप्राणी, धरणे, उद्योग, सहकार आदी घटकांचा आढावा घेण्यात आला आहे.

अहमदनगर जिल्हयाच्या ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमीचा आढावा घेतल्यानंतर अहमदनगर जिल्हयातील संगमनेर तालुक्याच्या ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमीचा आढावा घेण्यात आला आहे. संगमनेर तालुक्याच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीत संगमनेरचा प्राचीन इतिहास, मध्ययुगीन इतिहास, मोगलकालीन इतिहास, आधुनिक इतिहास, स्वातंत्र्योत्तर संगमनेर सांस्कृतिक संगनेर इ. घटकांचा आढावा घेतला आहे. शेवटी भाऊसाहेबांची जन्मभूमी असलेल्या जोर्वे गावास लाभलेल्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेतला आहे. तसेच भौगोलिकदृष्टया वैशिष्टयपूर्ण असणाऱ्या संगमनेर तालुक्याच्या भौगोलिक पार्श्वभूमीचा आढावा घेण्यात आला आहे. या भौगोलिक आढाव्यात संगमनेर तालुक्याचे क्षेत्रफळ, विस्तार, अक्षांश - रेखांश, वनस्पती, पर्जन्य व तापमान, पिके, उद्योग, प्राकृतिक विभाग, डोगराळ विभाग, पठारी विभाग, पठार पदीय प्रदेश, अरुंद नदी खोऱ्यांचे विभाग, लोकसंख्या आदी घटकांचा आढावा घेण्यात आला आहे. शेवटी जोर्वेची ऐतिहासिक पार्श्वभुमीत जोर्वे संस्कृतीचा आढावा घेण्यात आला आहे. तर भौगौलिक पार्श्वभुमीत जोर्वे

गावाचे भौगोलिक स्थान, क्षेत्रफळ, लोकसंख्या,मृदा, व्यवसाय आदी घटकांचा आढावा घेण्यात आला आहे.

**प्रकरण तिसरे :- भाऊसाहेबांचे जीवन व चरित्र :-**

प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रास्ताविकानंतर थोरात घरण्याच्या पुर्वइतिहासातील थोरात घराण्यातील महत्वाच्या व्यक्तीचा आढावा घेतांना प्रथम थोरात घराण्याची वंशावळ देण्यात आली. नंतर थोरात घराण्यातील महत्वाच्या व्यक्तीची माहिती देण्यात आली. तसेच महात्मा गांधीजींनी ब्रिटीश सरकारच्या अन्यायाविरुध्द सुरु केलेली असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ, १९४२ चे छोडो भारत आंदोलन आणि १९४२ च्या आंदोलनातील भाऊसाहेबांचे योगदान. त्याचबरोबर भाऊसाहेबांचे शिक्षण व व्यवसाय यात प्राथमिक शिक्षण जार्वे येथे, नंतर बेलापूर, संगमनेर, नाशिक येथे शिक्षण घेतले. तसेच व्यवसायात शेती, पाटीलकी याचा आढावा घेतला.

भाऊसाहेबांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान, स्वातंत्र्य चळवळीची मिळालेली प्रेरणा, १९४२ च्या चळवळीत अटक व सुटका, सुटकेनंतर संगमनेर येथे प्रतिसरकार स्थापनेचा प्रयत्न, भुमिगत चळवळीच्या माध्यमातुन सोबोटाज कार्यक्रामातील भाऊसाहेबांचे योगदान, भाऊसाहेबांचे किसान सभेतील कार्य, भाऊसाहेबांचे कौटुंबिक जीवन, त्यांचा विवाह, अपत्य प्राप्ती, कुटुंबातील व्यक्तींचा आढावा, भाऊसाहेबांच्या सामाजिक कार्यात पत्नी मथुराबाईंचे योगदान, शेवटी भाऊसाहेबांचा वृध्दपकाळ आणि मृत्यु असे उपसंहार स्वरुपात या तिसऱ्या प्रकरणात भाऊसाहेबांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**प्रकरण चौथे:- "भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या राजकिय विकासातील योगदान"**

"भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या राजकिय विकासातील योगदान" या प्रकरणामध्ये प्रास्ताविक नंतर भाऊसाहेब थोरात यांचे विद्यार्थी दशेतील कार्य, संघटन व चळवळी, विद्यार्थी दशेपासुन स्वातंत्र्य चळवळतील सहभाग १९५२ पर्यंत कम्युनिष्ट विचाराने प्रेरित होऊन शेतकरी व कामगारांसाठी कार्य इ.सन.१९५२ साली कम्युनिष्ट विचाराचा त्याग करत जिल्हयाच्या विकासासाठी सहकारव्रताचा स्विकार तर १९६२ साली कॉंग्रेस पक्षात प्रवेश व योगदान,

भाऊसाहेबांना स्वातंत्र्य चळवळीची मिळालेली प्रेरणा, वर्गशिक्षकांनी स्वातंत्र्य चळवळीच्या सांगितलेल्या घटनातुन प्रेरणा, विविध व्याखनातुन प्रेरणा विद्यार्थी दशेतील

राष्ट्रसेवा दलातील सहभाग, राजापूर सभेतील योगदान, अहमदनगर जिल्हयातील संगमनेर, अकोले येथे प्रतीसरकार स्थापनेतील योगदान, भाऊसाहेबांचे कम्युनिष्ट पक्षांतर्गत कार्य, नाशिक जेलमधुन सुटकेनंतर कम्युनिष्ट पक्षाच्या माध्यमातुन केलेले कार्य, अहमदनगर जिल्हयातील कम्युनिष्ट चळवळीत महत्वपूर्ण योगदान, अहमदनगर जिल्हयाच्या कम्युनिष्ट परिषदेतील योगदान, त्यात जोवे परिषद, गुहा परिषद, वरुडी परिषद, शिरसगाव परिषद, करंजी परिषद, करंजी येथील स्त्रियांची परिषद,राजापूर परिषद, एरंडगांव परिषद तसेच भाऊसाहेबांचे स्थानिक स्वराज्य संस्थेतील योगदान, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका, भाऊसाहेबांचे विधानसभेतील कार्य, शेतीपंपावरील मिटर हटाव आंदोलन, निळवंडे धरण मंजुरी, रिझर्व्ह बँकेवरील शेती कर्जावरील वाढीव व्याजदर कमी करण्यासाठी काढलेला टिकुरे मोर्चा. वरील कार्याच्या माध्यमातुन भाऊसाहेबांच्या अहमदनगर जिल्हयातील राजकीय कार्याचा आढावा घेण्यात आला आहे.

**प्रकरण पाचवे :- भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या सामाजिक विकासातील योगदान**

प्रस्तुत प्रकरणात प्रास्ताविकानंतर भाऊसाहेब थोरात यांच्या अहमदनगर जिल्हयातील सामाजिक कार्यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. त्यात प्रारंभी अहमदनगर जिल्हयातील समाज रचना व सामाजिक पार्श्वभुमी नंतर भाऊसाहेबांचे शेतकरी वर्गासाठी, सावकारशाही विरोधी लढयातील योगदान, खिरविरे येथील सावकारशाही नष्ट करण्यातील भाऊसाहेबांची भूमिका, भाऊसाहेबांच्या योगदानातुन सावकारशाहीतुन मुक्त झालेला शेतकरी वर्ग, तसेच सोमठाणे, नलावडे येथील सावकारशाही विरोधी लढयातील योगदान व कर्जमुक्त झालेले शेतकरी, रिझर्व्ह बँकेच्या शेती कर्जावरील वाढीव व्याजदराविरोधी काढलेल्या टिकुरे मोर्चातील योगदान, शेती पंपावरील मिटर हटाव मोर्चातील योगदान, राजहंस दुध संघाच्या माध्यमातुन अहमदनगर जिल्हयाच्या शेतकऱ्यांच्या विकासातील योगदान, सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातुन अहमदनगर जिल्हयाच्या विकासातील योगदान, अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातुन जिल्हयातील सहकार वाढीत योगदान, तसेच शेतकऱ्यांच्या शेती विकासातील योगदान, सॅम्प्रो संस्थेची स्थापना व संस्थेच्या माध्यमातुन जिल्हयातील बाजारपेठेवर नियंत्रण मिळविण्यासाठी योगदानात शेती उपयोगी व बांधकाम साहित्य विक्री, शेतकऱ्यांना

पाणीपुरवठा करणाऱ्या सहकारी संस्थेतील योगदान, अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, अमृतवाहिनी बँकेच्या माध्यामतुन कर्ज पुरवठा.

भूमिहिनांना वनजमीन मिळवुन देण्यातील योगदान व लाभार्थी शेतकरी, सिलींग व कुळ कायदयासाठी योगदान, भाऊसाहेबांचे अहमदनगर जिल्हयातील कामगाराच्या विकासातील योगदान, यात जिल्हयातील विडी मजुर संघटना स्थापनेतील योगदान, विडी मजुर चळवळ, संगमनेर येथील राज्यव्यापी मजुर परिषदेचे आयोजन, अहमदनगर जिल्हा विडी कामगार कारखान्यांची सद्यस्थिती, जिल्हयातील विडी कारखाने, विडी कारखानदार मालकांकडून कामगारांना मिळणाऱ्या सुविधा, सरकारकडून विडी कामगारांना मिळणाऱ्या सुविधा, अहमदनगर जिल्हयातील कोंबडा विडी, हत्ती विडी, लंगर विडी, भिकुसा विडी कारखान्यांना भेटी तसेच मालक व कामगारांच्या मुलाखती. भाऊसाहेबांच्या विडी कामगाराविषयी योगदानाचा लाभ घेत असलेले विडी कामगार यादी, विधान सभा सदस्य असतांना विडी कामगारांसाठी दिलेले योगदान, जिल्हयातील दुष्काळ निवाराणार्थ केलेले कार्य, जिल्हयातील दंडकाराण्य राबविण्यातील योगदान, भाऊसाहेबांना दंडकारण्याची मिळालेली प्रेरणा, संघटन कौशल्य, दंडकारण्या अभियांनास लोकचळीचे मिळालेले स्वरुप, भाऊसाहेबांच्या दंडकारण्य अभियानाचा शुभारंभाची अहमदनगर जिल्हयात पुनरावृत्ती, जिल्हयाच्या शैक्षणिक विकासात सहयाद्री संस्था, अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्था यांच्या माध्यमातुन योगदान, अमृतवाहिनी रुरल हॉस्पीटल स्थापनेतील योगदान आदि सामाजिक कार्यात जीवनाच्या शेवटपर्यंत केलेला संघर्ष अद्वितीय असाच होता. भाऊसाहेबांच्या या कार्यामुळेच अहमदनगर जिल्हयाचे समाजपरिवर्तन घडुन आले आहे.

**प्रकरण सहावे :- भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान**

प्रस्तुत प्रकरणात प्रास्ताविकामध्ये भाऊसाहेबांनी स्थापन केलेल्या सहकारी संस्थाचा उल्लेख व अहमदनगर जिल्हयात भाऊसाहेबांचे सहकारातील योगदान तसेच विविध सहकारातील पदांचा जिल्हयाच्या विकासासाठी केलेला उपयोग, अहमदनगर जिल्हयात सहकार चळवळीतील भाऊसाहेबांचे योगदान, भाऊसाहेब महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष असताना जिल्हयातील सहकार, शेती, शेतकरी, उद्योजकांसाठी दिलेले योगदान, बँकेतील विकास कक्ष स्थापना व जलद कामास प्रारंभ, नाबार्डचे दिर्घ मुदत कर्ज योजनेचा जिल्हयातील शेतकरी, उद्योजकांना लाभ मिळवुन देण्यातील योगदान, महाराष्ट्र राज्य

सहकारी बँकेच्या माध्यमातुन शेतकऱ्यांना ट्रॅक्टर पुरवठा, नाबार्ड बँक आयोजीत दिल्ली परिषदेतील योगदान, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातुन मच्छिमार परिषदेतील योगदान व मच्छिमारांविषयक बँकेचे धोरण जाहिर. महाराष्ट्र बँकेची राज्यव्यापी परिषद, १९८२ साली महाराष्ट्र राज्य बँकेचे अध्यक्ष असताना जिल्हयातील शेतकऱ्यांना केलेला ट्रॅक्टर पुरवठा योजनेतील लाभार्थी शेतकरी, भाऊसाहेबांचे अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेतील योगदान, बँकेत अध्यक्ष असतांना महत्वाचे निर्णय घेण्यातील योगदान, लघुउद्योग, कुटीर उद्योगांना कर्ज पुरवठा, मोठया उद्योगांना कर्ज पुरवठा, शेतकऱ्यांना पाईपलाईनसाठी कर्ज तसेच ट्रॅक्टर, शेती औजारे, लघु उद्योग, शेतीपूरक उद्योगासाठी कर्ज, तसेच भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना संगमनेर या कारखान्याचे भाऊसाहेब थोरात अध्यक्ष असताना शेतकऱ्यांना पाणी पुरवठा योजनेसाठी केलेला कर्ज पुरवठा, ऊस क्षेत्र वाढीसाठी योगदान, कारखान्याच्या माध्यमातुन अल्कोहोल निर्मिती प्रकल्प, बायोखत प्रकल्प, कागदनिर्मिती प्रकल्प, कारखान्याच्या माध्यमातुन राबविलेल्या योजनेतील लाभार्थी शेतकरी यादी, भाऊसाहेब थोरात यांचे राजहंस दूध संघाच्या माध्यमातुन अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान, दूध संघातुन दुध संकलन केंद्रांना बल्कमिल्क, कुलर्स सुविधा, दुधजन्य उपपदार्थाची निर्मिती, मिनरल वॉटर निर्मिती, राजहंस दूध संघातील विविध योजना, संकरीत गो पैदास, प्रतिबंधक लसीकरण, हार्डमन कार्यक्रम, चापकटर, मिल्किंग मशिन, पशुरोगनिदान प्रयोगशाळा, दुध संघाद्वारे दुष्काळग्रस्तांना साहय्य, मुक्त गोठयासाठी कर्ज.

भाऊसाहेब अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे १९६५ ते १९६९, १९७३ ते १९७७, १९९५ ते १९९९ असे १४ वर्ष अध्यक्ष असताना अहमदनगर जिल्हयाला वरदान ठरलेल्या जिल्हा बँकेने जे विविध उपक्रम राबविले त्यात भाऊसाहेबांचे योगदान महत्वपूर्ण होते. बँकेची स्थापना, कार्यक्षेत्र, शाखा विस्तार यातील भाऊसाहेबांचे योगदान, भाऊसाहेबांच्या अध्यक्षीय काळातील शाखाविस्ताराची तुलनात्मक आकडेवारी देण्यात आली. जिल्हयातील प्राथमिक शेती संस्था व बिगरशेती सहकारी संस्था यांचे भाऊसाहेबांच्या काळातील वाढती संख्या, एकुण शाखांची आकडेवारी देण्यात आली. अहमदनगर जिल्हयातील सहकारी कारखान्यांना कर्ज पुरवठा करण्यातील अध्यक्षीय काळातील भाऊसाहेबांचे धोरण, बँकेच्या माध्यामातुन पाणीपुरवठा करण्याचे भाऊसाहेबांचे धोरण, तक्त्यानुसार त्याची सविस्तर आकडेवारी देण्यात आली आहे. बँकेचे, शेतीचे आधुनिकीकरणाचे धोरण व त्यातील

भाऊसाहेबांचे योगदान, शेतकऱ्यांना बैलगाडी कर्ज व भाऊसाहेबांचे धोरण, मळणी यंत्रासाठी कर्ज व भाऊसाहेबांचे धोरण, ट्रॅक्टरवर चालणारे पाचरटकुटी यंत्र, गोबरगॅस, शेती सपाटीकरण, पोकलॅन,जेसीबी सारखी साधने कर्ज योजनेतील भाऊसाहेबांचे योगदान, द्राक्ष मांडव व द्राक्ष पिकाचे औषधे, कर्ज वितरण व भाऊसाहेबांचे योगदान, शेती व्यवसायाला कर्ज पुरवठा करण्याचे बँकेचे धोरण व त्यातील भाऊसाहेबांचे योगदान, कुक्कुटपालन व्यवसाय व त्यांची आकडेवारी, पशुसंवर्धन व पुशसंवर्धनातील लाभार्थी शेतकरी यादी, गांडुळखत प्रकल्प, शेळी-मेंढी पालन योजना, फळबाग, कांदाचाळ, ग्रामीण गोदाम योजना, विविध अनुदान सुविधा, सभासद अपघात विमा, सैनिकांसाठी आर्थिक साहय्य, बँकेचे ग्रामसभेतुन प्रबोधन, ग्रामीण सोसायटया, नैसर्गिक आपत्ती प्रसंगी धोरण, वैद्यकिय उपचाराविषयी धोरण, बँक सेवकांविषयक धोरण, शैक्षणिक संस्थांना आर्थिक साहय्य, जिल्हा वासियांच्या कलागुणांना वाव देणारे सभागृह व भाऊसाहेब थोरात, विद्यार्थ्यांना आर्थिक साहय्य व त्यातील भाऊसाहेबांचे योगदान.

भाऊसाहेबांनी स्थापन केलेल्या सहकारी संस्था अनेक सहकारी संस्थांचे अध्यक्ष या माध्यमातुन शेतकरी, कामगारांच्या विकासाच्या माध्यमातुन अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील भाऊसाहेबांचे योगदान महत्वपूर्ण ठरले आहे.

**मुल्यमापन :-**

"सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या विकासातील योगदान" या प्रस्तुत विषयावरील संशोधनाअंती व अभ्यासाअंती भाऊसाहेब थोरात यांचा जन्म, बालपण, शिक्षण, स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग, सेवाव्रत, कुटुंबाची जडणघडण, तसेच अहमदनगर जिल्हयाचा सर्वांगीण विकास साध्य करत असतांना भाऊसाहेबांचे राजकिय, सामाजिक, आर्थिक, विकासातील योगदान अशा विविध वैशिष्टयपूर्ण पैलूंवर प्रकाश पडला आहे. या विषयावरील संशोधनासाठी भाऊसाहेब थोरात यांच्या विविध गुणांची तसेच काही मर्यादांची ओळख होण्यास मदत झाली आहे. प्रस्तुत शोध प्रबंधातील संशोधनाअंती असे सिध्द होते की, भाऊसाहेब थोरात यांचे कार्य आजच्या पिढीला तसेच पुढील पिढीला निश्चितच प्रेरणादायी ठरणारे असणार आहे. संशोधनातून प्रकाशमान झालेल्या भाऊसाहेब थोरात यांच्या विविध पैलुची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे :-

## ७.१ स्वातंत्र्य संग्रामातील क्रांतिकारक : -

अहमदनगर जिल्हयातील संगमनेर तालुक्यातील जोर्वे येथे शेतकरी कुटूंबात भाऊसाहेबांचा १२ जानेवारी १९२४ रोजी जन्म झाला. प्राथमिक शिक्षण जोर्वे येथे झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी अनेक शाळा बदलत शेवटी संगमनेर येथे शिक्षण घेत असतांनाच भास्करराव दुर्वे नाना यांनी सुरु केलेल्या राष्ट्रसेवा दलाचे सदस्य झाले. त्यापूर्वीच भाऊसाहेबांना म.गांधीजी विषयी असणारी निष्ठा, विविध व्याख्याने ऐकून ती अधिकच फलद्रुप झाली होती. भाऊसाहेबाबरोबर अण्णासाहेब शिंदे, पी.बी.कडु पाटील, धर्मा पोखरकर, रावसाहेब शिंदे आदी सहकारीही स्वातंत्र्य चळवळीसाठी कार्य करत होते.

शिक्षण चालू असतांनाच १९४२ साली म.गांधीजींनी चले जाव आंदोलन सुरु केले असता भाऊसाहेबांच्या गटाने शिक्षणाला रामराम ठोकून स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. अहमदनगर जिल्हयात ब्रिटिश सरकार विरोधी कार्यकर्त्यांची राजापूर येथे भास्करराव दुर्वे यांच्या घरी बैठक घेऊन अहमदनगर जिल्हयातील स्वातंत्र्य चळवळीची रुपरेषा आखली आणि स्वातंत्र प्रेमाने प्रेरित होऊन भाऊसाहेब आपल्या सहकार्याबरोबर कार्य करु लागले. अहमदनगर जिल्हयाच्या पूर्वेकडील संगमनेर, अकोले येथे प्रतिसरकार स्थापनेचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे साबोटाज कार्यक्रमांतर्गत टेलिफोनचे खांब तोडणे, पूल पाडणे, झाडे पाडून रस्ते अडथळा करणे, सरकारी भरणा लुटणे, असे कार्य करु लागले. एक दिवशी रात्री राहुरी तालुक्यातील गुहा परिसरात टेलिफोन, खांब तोडतांना खांब भाऊसाहेबांच्या पायावर पडला होता. त्यानंतर त्यांना अटक झाली. १५ महिने शिक्षा झाली. नाशिक जेलमध्ये असतांना अण्णासाहेबांचे प्रबोधनपर मार्गदर्शन केलेले प्रचंड वाचन भाऊसाहेब व जिल्हयातील तुरुंगातील इतरही स्वातंत्र्य सैनिक, कम्युनिस्ट विचाराने प्रेरित झाले. इ.स १९४४ साली भाऊसाहेबांची सुटका झाली. भाऊसाहेब तुरुंगातुन बाहेर आले ते कम्युनिस्ट विचाराची शिदोरी बरोबर घेऊनच. पुन्हा ब्रिटिश सरकार विरोधी कार्य करु लागले. शेतकरी व कामगार उध्दारासाठी कार्य करु लागले. शेतकरी व कामगार उध्दारासाठी कार्य करु लागले. खिरविरे येथे सावकारीची कागदपत्रे जाळण्याच्या घटनेतुन भाऊसाहेबांना १९५१ साली पुन्हा अटक होऊन त्यांच्यावर खटला भरला गेला आणि ६ महिने शिक्षा झाली. आता मात्र भाऊसाहेबांच्या लक्षात आले की, अहमदनगर जिल्हयाचा सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी कम्युनिस्ट विचार कुचकामी आहे. म्हणून चानाक्ष

भाऊसाहेबांनी वेळीच आपल्या कम्युनिस्ट विचारांना आवर घालत इ.स.१९५२ साली सहकार व्रताचा स्विकार केला आणि सहकाराच्या माध्यमातून कार्य करु लागले होते.

भारत मातेला स्वातंत्र्य मिळुन देण्यासाठी भाऊसाहेब थोरात यांनी अहमदनगर जिल्हयात केलेली जागृती आणि स्वातंत्र्य प्राप्तीसाठी स्वातंत्र्य प्रेमीचे केलेले संघटन हे जिल्हयातील स्वातंत्र्य चळवळ प्रखर करण्यात भाऊसाहेब थोरात यांचे योगदान महत्वपूर्ण ठरले होते. त्यांचे स्वातंत्र्य चळवळीतील कार्य सर्वांना प्रेरणा देणारे ठरले आहे.

## ७.२ उत्तम संघटक :-

भाऊसाहेब हे उत्तम संघटक होते. हे या शोध प्रबंधाच्या अभ्यासांती सिध्द होते. भाऊसाहेबांचे वडिल गावचे पाटील होते. गावचे पाटील असल्याने जनसंघटनावर त्यांची पकड होती. भाऊसाहेबांना बालपणात घरातूनच जनसंघटन कार्याचे धडे मिळाले होते. भाऊसाहेब शिक्षण घेत असतांनाच जनसंघटन करण्याचा गुण विकसीत झाला होता.

गांधीजींनी इ.स.१९४२ साली छोडो भारत आंदोलन सुरु केले असता त्यात सहभागी होण्यासाठी भाऊसाहेबांनी शाळेतील मित्र परिवार तसेच जिल्हयातील स्वातंत्र्य प्रेमी यांचे उत्तम संघटन केले होते. आणि अहमदनगर जिल्हयात स्वातंत्र्य चळवळ प्रखर केली होती. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भाऊसाहेब थोरात यांनी इ.स.१९५२ साली सहकार व्रताचा स्विकार केला होता. सहकाराच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाचा सर्वांगीण विकास साध्य करण्याचा संकल्प करुन भाऊसाहेब थोरात कामाला लागले होते. भाऊसाहेबांच्या अंगी असलेल्या वकृत्व, नेतृत्व, संघटन चातुर्य या गुणांमुळे भाऊसाहेब थोरात समोरच्या व्यक्तीवर वेगळीच छाप पाडत असत. या गुणांमुळे भाऊसाहेब अहमदनगर जिल्हयात सहकाराचे बिजारोपण करुन त्यांचे विशाल वटवृक्षात रुपांतर करु शकले होते. एवढेच नव्हे तर स्वतःही अनेक सहकारी संस्था, शिक्षण संस्था स्थापन केल्या. तसेच विविध पदावर असतांना त्या पदास एक वेगळे महत्व प्राप्त करुन देत भाऊसाहेबांनी त्या पदाचा उपयोग अहमदनगर जिल्हयाच्या सर्वांगिण विकास करण्यासाठी केला होता. भाऊसाहेबांची कार्यकर्त्यांना सांभाळण्याची त्यांच्यावर जिवापाड प्रेम करण्याची वृत्ती अफलातुन होती.

### ७.३ निस्वार्थ वृत्ती :-

समाजात फार थोडी माणसे त्यांच्या विशिष्ट गुण वैशिष्टयांमुळे ओळखली जातात. त्यापैकी भाऊसाहेब थोरात हे एक होते. शिक्षण घेत असतांनाच भारत मातेच्या मुक्तेसाठी भाऊसाहेबांनी स्वातंत्र्य चळवळीत उडी घेतली होती. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही भाऊसाहेबांनी आपल्या समाज कार्यात खंड पडू दिला नव्हता. यामागे त्यांचा कोणताही स्वार्थ हेतू नव्हता. स्वातंत्र प्राप्तीनंतर अहमदनगर जिल्हयातील शेतकरी कामगार, आदिवासी, यांच्यासाठी कार्य करत होते. समाज कार्य करत असतांना विविध सहकारी संस्थाच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयातील शेतकरी तसेच कामगारांना रोजगार उपलब्ध करुन दिला. केवळ समाजातील सर्वांना बरोबर घेऊन चालणे हा भाऊसाहेबांचा स्वभाव धर्म होता. त्यासाठी वेळप्रसंगी ते आपल्या खिशातील पैसा खर्च करण्यासाठी मागेपुढे पहात नसत. भाऊसाहेबांनी जी पदे उपभोगली, त्या पदांचा उपयोग समाजातील सर्व सामान्यांसाठी कसा करता येऊ शकेल याचाच ते सातत्याने विचार करत असत. सहकार, शिक्षण सुविधा, राज्य बँक, जिल्हा बॅकेतील अध्यक्ष पदाचा उपयोग जिल्हयातील सर्व सामान्यांसाठी केला.

केवळ समाज कार्य करत राहणे भाऊसाहेबांच्या या वृत्तीमुळे ते जिल्हयाचा सर्वांगिण विकास साध्य करु शकले. कोणतेही कार्य करत असतांना त्यांनी कधी स्वार्थ पाहिला नव्हता. त्यामुळेच ते अहमदनगर जिल्हयाचे सहकार महर्षी म्हणून ओळखले जाऊ लागले.

### ७.४ नैतिकतेचे अधिष्ठान :-

या शोध प्रबंधाच्या अभ्यासाअंती भाऊसाहेबांच्या व्यक्तीमत्वातील एक आदर्श पैलू समोर येतो. तो म्हणजे ते नैतिकतेचे पुजारी होते. भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हयाचा सर्वांगिण विकास करण्याचे जे स्वप्न पाहिले होते ते साध्य करण्यासाठी भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हयातील विविध संस्थांच्या विकासात महत्वपूर्ण योगदान दिले होते. एवढेच नव्हे तर साखर कारखाना, दुध संघ, गरुड कुक्कुटपालन संस्था, सहयाद्री शिक्षण संस्था, अमृतवाहिनी शिक्षण संस्था या संस्थांची स्थापना करुन या संस्थामधील भाऊसाहेबांचा कारभार अत्यंत पारदर्शी होता. या शिवाय विधानसभा, राज्य बँक, जिल्हा बँक या पदाचा उपयोग नितीमान भाऊसाहेबांनी समाज विकासासाठी केला होता. भाऊसाहेब स्वत: व्यसनापासून दूर होते. उलट संपर्कात येणाऱ्यांनाही ते व्यसनापासून दूर ठेवत असत. आपल्याकडे आलेल्या कार्यकर्त्यांची, पाहुण्यांची तसेच कामासाठी आलेल्या सर्वांची

भाऊसाहेब सर्व प्रकारची चौकशी करत असत, उठाठेव करत असत. ही आपली नैतिक जबाबदारी मानत असत. सतत सहकार्य करत राहणे, हा भाऊसाहेबांचा नैतिक धर्म असल्याने ते अहमदनगर जिल्हयाचा सर्वांगिण विकास साध्य करु शकले होते.

## ७.५ आदर्श कुटुंब प्रमुख :-

नाशिक जेलमधून १५ महिन्यांची शिक्षा संपुन इ.स.१९४४ साली भाऊसाहेबांची सुटका झाली आणि त्याच वर्षी भाऊसाहेबांचा मथुराबाई बरोबर विवाह झाला. आईच्या निधानानंतर कुटुंबाची सर्व जबाबदारी भाऊसाहेब व मथुराबाई यांच्यावर आली. सामाजिक कार्याची आवड असल्याने त्यात खंड पडू लागला होता. परंतु पत्नीच्या खंबीर पाठींब्यामुहे भाऊसाहेब अहमदनगर जिल्हयाचा सर्वांगिण विकास करु शकले होते. परंतु सामाजिक कार्य करत असतांना कौटुंबिक जबाबदारी पासून ते कधीही दूर राहिले नाहीत. आईच्या निधनानंतर भावंडाचा सांभाळ केला. चारही भावंडाची शिक्षणे पुर्ण केली. बहिणी हिराबाई, ताराबाईचेही शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सर्व भावंडाचे विवाह सुशिक्षित सुसंस्कृत घराण्यात करुन दिले. पंडितराव व मधु यांनी इंजिनिअरींगचे शिक्षण पुर्ण केले. त्याचप्रमाणे भाऊसाहेबांनी मुलांचे व मुलींचेही शिक्षण पुर्ण केले. सर्व मुलींचे विवाह सुशिक्षित सुसंस्कृत घराण्यात करुन दिले. मुली आपल्या पतीबरोबर समाजकार्य करत आहे.

ज्याप्रमाणे भाऊसाहेब सामाजिक कार्यात कोठेही कमी न पडता अहमदनगर जिल्हयाच्या सर्वांगिण विकास करण्यात बहुमोल योगदान देऊन सर्वांगिण विकास साध्य करु शकले. त्याचप्रमाणे एक कुटुंब प्रमुख म्हणुनही भाऊसाहेब कोठेही कमी पडले नाहीत. अहमदनगर जिल्हयाच नव्हे तर महाराष्ट्रही भाऊसाहेबांच्या कुटूंबाकडे आजही एक आदर्श कुटुंब याच दृष्टीने पाहत आहे. सामाजिक कार्याच्या माध्यमातून भाऊसाहेबाच्या कुटूंबाने आजही आपली वेगळी ओळख कायम ठेवली आहे.

## ७.६ सहकारातील दिपस्तंभ :-

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अहमदनगर जिल्हयाचा सर्वांगिण विकास करण्याचा ध्यास घेतलेल्या भाऊसाहेब थोरात यांनी आपल्या कम्युनिस्ट विचारांना आवर घातला. इ.स.१९५२ साली सहकार व्रताचा स्विकार करुन सहकाराच्या ध्येयाने प्रेरित होऊन भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हयात सहकार मंत्राचा प्रचार आणि प्रसार केला होता. जिल्हयातील प्रत्येक तालुक्यातील कार्यकर्त्यांना संघटीत करुन सहकारी संस्थांचे महत्व पटवुन देऊन विविध

सहकारी संस्था उभारणीस गती देण्याचे आवाहन केले होते. भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हयातील खेडयापर्यंत सहकार नेण्याचे स्वप्न पाहिले होते. भाऊसाहेबांच्या सहकार चळवळीमुळे अहमदनगर जिल्हयात सहकारी तत्वावर साखर कारखाने, दुध संघ, ऑईल मिल, खतनिर्मिती, प्रकल्प, कागद मिल, विज निर्मिती प्रकल्प, सुतगिरणी, आवळा प्रकल्प, सामूहिक शेती, असे अनेक उद्योग विकसीत झाले होते. एवढेच नव्हे भाऊसाहेब थोरात यांनी स्वतःही संगमनेर येथे सहकारी साखर कारखाना, दुधसंघ, अमृतवाहिनी नागरी सहकारी बँक, गरुड कुक्कुटपालन संस्था, सॅम्प्रो या संस्था काढुन अहमदनगर जिल्हयाचा सर्वांगिण विकास घडवुन आणाला. एवढेच नव्हे तर सहयाद्री शिक्षणसंस्था, अमृतवाहिनी शिक्षण संस्था या शिक्षण संस्थाच्या माध्यमातून जिल्हयातील शैक्षणिक क्रांतीचे जनकही भाऊसाहेबच होते. अहमदनगर जिल्हयात सामाजिक क्रांती घडविणारे ही भाऊसाहेबच होते. भाऊसाहेब थोरात यांच्या सहकार ध्यासाने आणि सहकार मंत्राने अहमदनगर जिल्हयाचा सर्वांगिण विकास साध्य होऊ शकला.

## ७.७ शिक्षणप्रेमी :-

शिक्षणप्रेमी भाऊसाहेबांना नेहमी वाटत होते की, अहमदनगर जिल्हयातील सर्व सामान्यांच्या मुलांनाही शिक्षण मिळावे ही तळमळ होती. आपले स्वप्न प्रत्यक्षात साकार करण्यासाठी भाऊसाहेबांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने सहयाद्री बहुजन विद्या प्रसारक समाज शिक्षण संस्थेची इ.स.१९६६ साली स्थापना केली होती.

सहयाद्री शिक्षण संस्थेची अहमदनगर हिल्हयातील आदीवासी पठार भागात २१ माध्यमिक विद्यालये, १० उच्चमाध्यमिक विद्यालये, दोन महाविद्यालये, असा प्रचंड विस्तार झाला आहे. याशिवाय अमृतवाहिनी, शेती व शिक्षण विकास संस्था या संस्थेच्या माध्यमातून भाऊसाहेब थोरात यांनी अमृतवाहिनी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, अमृतवाहिनी मॉडेल इंग्लिश मिडीयम स्कूल, इंजिनिअरींग कॉलेज, पॉलिटेक्निक कॉलेज, अमृतवाहिनी मेडिकल कॉलेज, अमृतवाहिनी रुरल हॉस्पिटल, या शैक्षणिक अभ्यासक्रमांच्या माध्यमातुन भाऊसाहेब संतुजी थोरात यांनी अहमदनगर जिल्हयातील सर्व सामान्यांच्या मुलांनाही शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन दिल्या आहेत. भाऊसाहेबांनी समाज विकासासाठी केलेले हे कार्य बहुमोल ठरले. आज भाऊसाहेबांच्या शिक्षण संस्थांचे विशाल वटवृक्षात रुपांतर झाले आहे.

## ७.८ अहमदनगर जिल्हयातील आर्थिक क्रांतीचे जनक :-

प्रस्तुत शोध प्रबधांच्या अभ्यासाअंती असा निष्कर्ष निघतो की, अहमदनगर जिल्हयात आर्थिक क्रांती घडविणारे भाऊसाहेब होते. जिल्हयाची बाजारपेठ फुलविणारे भाऊसाहेबच, व्यापारी वर्गात उत्साह निर्माण करणारे भाऊसाहेबच, अहमदनगर जिल्हयाचा चेहरा, मोहरा बदलणारे भाऊसाहेबच, अहमदनगर जिल्हा वासियांना आर्थिक अडचणीवर मात करायला शिकवणारे भाऊसाहेबच, अगदी पठार भागातील जनतेच्या हाती पैसा खेळवणारे भाऊसाहेबच, संशोधना अंती असे सिध्द होते की, अहमदनगर जिल्हयात आर्थिक क्रांती घडविणारे भाऊसाहेबच होते.

## ७.९ अहमदनगर जिल्हयातील कृषी क्रांतीचे जनक :-

संशोधना अंती असे सिध्द होते की, अहमदनगर जिल्हयातील माळरानावर नंदनवन फुलविणारे भाऊसाहेबच होते. जिल्हयात सहकाराचा प्रचार आणि प्रसार करुन अहमदनगर जिल्हा सहकारमय करुन टाकणारे भाऊसाहेबच होते. साखर कारखाना, दुध संघ, अमृतवाहिनी नागरी सहकारी बॅंक, गरुड कुक्कुटपालन संस्था, सॅम्प्रो संस्था या संस्थाच्या माध्यमातून सर्वसामान्य शेतकऱ्यांना साहय करुन जिल्हयातील माळरानावर नंदनवन फुलविणारे भाऊसाहेबच. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य बॅंक व अहमदनगर जिल्हा बॅंकेतील आपल्या अध्यक्षपदाच्या काळात अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांच्या शेती विकासासाठी विविध योजना राबवुन त्याचा लाभ अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांना करुन देणारेही भाऊसाहेबच म्हणुन भाऊसाहेब थोरात यांना अहमदनगर जिल्हयाच्या कृषी क्रांतीचे जनक म्हणून ओळखले जाते.

## ७.१० काटकसरीपणाचे मूर्तीमंत आदर्श :-

काटकसरीपणा हा भाऊसाहेबांच्या रक्तातच भिनलेला होता. भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हयाचा विकास करतांना अहमदनगर जिल्हयात ज्याप्रमाणे सहकाराचा विकास केला त्याचप्रमाणे त्या संस्थाना काटकसरीचा संदेश देणारे ही भाऊसाहेबच होते. भाऊसाहेब थोरात यांनी साखर कारखाना, दुधसंघ, अमृतवाहिनी नागरी सहकारी बॅंक, गरुड कुक्कुटपालन संस्था, सॅम्प्रो संस्था, शिक्षण संस्था या सर्व संस्थांना भाऊसाहेब दररोज सकाळी उठल्यानंतर भेटी देत असत. सर्व विभागाची बारकाईन चौकशी करत असत. सर्वाना काटकसर करण्याची सक्त ताकीद देत. भाऊसाहेबांच्या काटकसरीपणाच्या

स्वभावामुळेच भाऊसाहेबांनी स्थापन केलेल्या सर्व संस्थांचे आज विशाल वटवृक्षात रुपांतर झाले आहे. कोणताही अनावश्यक खर्च टाळणे ही त्यांची प्रवृत्ती होती. साधी राहणी, साधी गाडी, उच्च विचारसरणी असा भाऊसाहेबांचा स्वभाव होता. भाऊसाहेबांनी आपल्या काटकसरीपणाचा जिल्हयातील लोकांपुढे एक आदर्श निर्माण केला होता.

### ७.११ दंडकारण्य अभियानाचे जनक :-

वयाची ८३ वर्ष ओलांडणाऱ्या भाऊसाहेबांची वाचनाची आवड कमी झाली नव्हती. उलट वाढली होती. कोणाचा विश्वास बसणार नाही इतक्या निरनिराळया तऱ्हेचे वाचन ते करत असत. भीमसेनची डायरी, बखरी, किर्सीजरची डायरी, विविध वृत्तपत्रे, अंक, पुलचे समग्र साहित्य, दांडेकराचे स्मरणगाथा, दलित साहित्य, मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे, एक होता कार्व्हर इ. सर्व प्रकारच्या साहित्याचे वाचन भाऊसाहेब करीत असत. एवढेच नव्हे तर नाटके, कथाकथन, क्रिकेट, जलतरण स्पर्धा, कार्यक्रमही ते आवडीने पाहत असत. एके दिवशी भाऊसाहेबांना जॉ जिओनो या फ्रेंच लेखकाने लिहिलेल्या 'झाडे लावणारा माणूस' हे पुस्तक वाचण्यास मिळाले. एलझिअर्ड बुफिए नावाच्या मेंढपाळाने आल्प्स पर्वताच्या प्रदेशात एकहाती एक लाख झाडे लावुन आल्प्स पर्वताच्या वैराण, निर्जन प्रदेशात नंदनवन फुलविले होते. हे वाचून भाऊसाहेबांच्या मनात राहुन गेलेली इच्छा जागृत झाली. आणि वयाची ८३ व्या वर्षी भाऊसाहेबांनी अहमदनगर जिल्हयात 'दंडाकारण्य अभियान' राबविण्याचा निर्णय घेतला. नियोजनाप्रमाणे आपल्या हातांनी संगमनेर तालुक्यातील सायखिंडी येथे उदघाटन करुन पुढील कार्यक्रम ३ जून ते २ जुलै २००७ या काळात राबविण्याचे निश्चित केलेल्या कालावधीत अहमदनगर जिल्हयात स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी सोसायटया, शाळा, कॉलेज, विविध शिक्षण संस्था, मोठया प्रमाणात सहभागी झाल्या होत्या. गावालगतच्या डोंगरावर उजाड माळरानांवर, वनखात्याची पडीक जमीन, डोंगर उतार, स्मशानभूमी, अशा सर्वच ठिकाणी बीरोपणाचा कार्यक्रम यशस्वीपणे राबविला. भाऊसाहेब थोरात यांनी सुरु केलेले हे अभियान आमदार मा.बाळासाहेब थोरात यांनी पुढे चालु ठेवले आहे. भाऊसाहेबांच्या कृपेने अहमदनगर जिल्हयातील उजाड माळरानावर नंदनवन फुलविणारे भाऊसाहेबच. भाऊसाहेबांनी जी सामाजिक कामे केली त्यात नैसार्गिक समतोल ही महत्वाचा मानून राबविलेल्या या उपक्रमाने महाराष्ट्रात नव्हे तर देशात भाऊसाहेबांचे नाव झाले आहे.

भाऊसाहेब थोरात यांनी जीवनाच्या शेवटपर्यंत अहमदनगर जिल्हयाच्या सर्वांगिण विकासासाठी संघर्ष केला.

म्हणुन म्हणावेसे वाटते,

महाराष्ट्र ओळखतो महा पुरुषाला,

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरातांना.

शतशः प्रणाम माझा त्या महामानवाला.

प्रस्तुत प्रबंधांच्या अभ्यासाअंती भाऊसाहेब थोरात यांच्या अनेक महत्वपूर्ण पैलुंवर प्रकाश पडला आहे. असे असले तरी व्यक्ती म्हटले की, काही मर्यादा येतातच. अहमदनगर जिल्हयाचा सर्वांगिण विकास करत असतांना भाऊसाहेबांच्या अंगी असलेल्या गुण कौशल्यांना, कला गुणांना आणि सहकार्य करण्याच्या वृत्तीला काही समाज कटकांमुळे फाटा देणे भाग पडले होते. सहकाराच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयाचा सर्वांगिण विकास साध्य करत असतांना काही वेळा धोरण योग्य असूनही भाऊसाहेबांच्या कार्यावर मर्यादा येत होत्या. सहकारातून विकास करत असतांना अनेक वेळा भाऊसाहेब थोरात यांना घेतलेल्या निर्णयांना पर्यायी निर्णय घेणे भाग पडत होते. शेतकरी कामगारांच्या उध्दाराच्या धोरणावरही भाऊसाहेबांना अनेक वेळा मर्यादांना सामारे जावे लागले होते. भाऊसाहेबांना आपल्या संघर्ष वृत्तींना काही समाजकटकांमुळे रोखणे भाग पडत होते. अहमदनगर जिल्हयातील शैक्षणिक क्रांतीचे जनक, सामाजिक क्रांतीचे जनक, आर्थिक क्रांतीचे जनक, सहकार क्रांतीचे जनक भाऊसाहेब थोरात असले तरी त्यांना अनेक मर्यादांचे पालन करणे भाग पडत होते. अहमदनगर जिल्हयाच्या विकासासाठी जीवनाच्या अखेरपर्यंत संघर्षमय जीवन जगणाऱ्या व संघर्षातुन मार्ग काढणाऱ्या थोर स्वातंत्र सेनानी सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात या महामानवाला माझे कोटी कोटी प्रणाम.

*****

# संदर्भ ग्रंथ सुची

# संदर्भ ग्रंथ सुची


**अ) प्राथमिक साधने :-**

**अ-१**

१) थोरात भाऊसाहेब 'अमृतमंथन' प्रकाशक - लाटकर उल्हास चिंतामणी, प्रकाशन- अमेय प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती,११ जाने.१९९९.

२) थोरात भाऊसाहेब 'अमृतगाथा', प्रकाशक - लाटकर उल्हास चिंतामणी, प्रकाशन - अमेय प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, द्वितीय आवृत्ती, जुलै २००२.

**अ-२) शासकिय / निमशासकिय संस्थांचे अहवाल :-**

**शासकिय अहवाल :-**

१) अहमदनगर जिल्हा गॅझेटिअर्स, महाराष्ट्र शासन मुंबई.

२) अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - अर्थ सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई.

३) तहसिल रेकॉर्ड संगमनेर.

४) महाराष्ट्र रोझ ॲटलास, इंडियन मैप सर्व्हिस भोजपुर

**निमशासकिय संस्थांचे अहवाल :-**

१) वार्षिक अहवाल - सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज, संगमनेर, इ.स. २०१३-२०१४.

२) ४० वा वार्षिक अहवाल - सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात सहकारी साखर कारखाना लि.अमृतनगर, सन २००६-२००७, प्रकाशक - माधवराव कानवडे, मुद्रक- क्वालिटी प्रिंटर्स, संगमनेर.

३) ४८ वा वार्षिक अहवाल - सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात सहकारी साखर कारखाना लि. अमृतनगर, २०१४-२०१५, प्रकाशक - माधवराव कानवडे, मुद्रक- क्वालिटी प्रिंटर्स, संगमनेर.

४) ३३ वा वार्षिक अहवाल - भाऊसाहेब संतुजी थोरात अमृतवाहिनी सहकारी बँक लि.घुलेवाडी, प्रकाशक - श्री. पंडीत अमित वल्लभराय,संगमनेर, जि.अहमदनगर.

५) ३८ वा वार्षिक अहवाल - संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्यादित संगमनेर, प्रकाशक - श्री.रणजितसिंह विजयसिंह देशमुख, चेअरमन, दूधसंघ, मुद्रक- कामगार सहकारी मुद्रणालय, मर्यादीत संगमनेर.२०१४-१५

६) २२ वा वार्षिक अहवाल - संगमनेर सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्यादित संगमनेर, प्रकाशक - मा.श्री.बाजीराव खंडूजी पाटील खेमनर, चेअरमन- दूधंसघ, मुद्रक- कामगार सहकारी मुद्रणालय, मर्यादीत संगमनेर, सन १९९८-९९.

७) २६ वा वार्षिक अहवाल - संगमनेर सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्यादित संगमनेर, प्रकाशक - लक्ष्मणराव बाळाजी कुटे, चेअरमन- दूधंसघ, मुद्रक- कामगार सहकारी मुद्रणालय, मर्यादीत संगमनेर, सन २००२-२००३.

८) १ ला वार्षिक अहवाल - अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, अहमदनगर, वर्ष १९५८.

९) ५१ वा वार्षिक अहवाल - अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, अहमदनगर,सुवर्ण महोत्सवी वर्ष २००७-२००८.

१०) ४२ वा वार्षिक अहवाल - अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, अहमदनगर, वर्ष १९९८-९९.

११) ६० वा वार्षिक अहवाल - अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, अहमदनगर, वर्ष २०१६-१७.

**अ-३ मुलाखती :-**

१) कडू पुंजाजी बापुजी, मु.पो. सात्रळ, ता.राहुरी,जि.अहमदनगर.

२) कानवडे माधवराव सावळेराम, मु.पो.निमगाव बु. ता.संगमनेर, जि.अहमदनगर.

३) कांगुणे कांताबाई बाबाजी, विडी कामगार,हत्तिविडी कारखाना, बाजारपेठ संगमनेर,

४) कडलग एस.पी. अमृतवाहिनी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, संगमनेर.

५) कुटे भाऊसाहेब दामोधर- मु.पो.सुकेवाडी, ता.संगमनेर,जि.अहमदनगर.

६) कर्पे लहानु गजाबा, मु.पो.पिंपळगाव कोंझिरा,ता.संगमनेर,जि.अहमदनगर.

७) डोईफोड वैशाली गणेश, कोंबडा विडी कामगार,मुख्य शाखा-मोतीनगर, संगमनेर.

८) खताळ बी.जे., मु.पो.संगमनेर, रंगारगल्ली, ता.संगमनेर,जि.अहमदनगर, माजी मंत्री, महाराष्ट्र शासन.

९) केदार गंगाराम जानकु,मु.पो.देसवडे,ता.पारनेर,दि.१५/०५/२०१६.

१०) खेमनर बाजीराव खंडूजी, मु.पो.साकुर,ता.संगमनेर,जि.अहमदनगर.

११) गंधाक्ते बबनराव राजधर, मु.पो.वडझिरे, ता.पारनेर,जि.अहमदनगर.

१२) गवांदे किसन आप्पाजी, मॅनेजर, कोंबडा विडी कारखाना,मोतीनगर,संगमनेर.

१३) गायकर सिताराम कोंडाजी, अध्यक्ष अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, अहमदनगर.

१४) चौधरी एस.आर. फार्मसी कॉलेज, संगमनेर, ता.संगमनेर, जि.अहमदनगर.

१५) झावरे, डॉ.एस.के. संगमनेर, ता.संगमनेर,जि.अहमदनगर.

१६) तांबे दुर्गाताई सुधीर-मु.पो.संगमनेर,इंदिरानगर,ता.संगमनेर,जि.अहमदनगर, नगराध्यक्षा,संगमनेर.

१७) तांबे सुधीरजी भास्कर, मु.पो.संगमनेर,इंदिरानगर, ता.संगमनेर, जि.अहमदनगर.,आमदार पदवीधर मतदार संघ, अध्यक्ष सह्याद्री शिक्षण संस्था, संगमनेर.

१८) थोरात बाळासाहेब भाऊसाहेब, संगमनेर,मु.पो.संगमनेर, ता.संगमनेर, जि.अहमदनगर.

१९) थोरात पंडीतराव संतुजी, मु.पो.जोर्वे,ता.संगमनेर,जि.अहमदनगर.

२०) दातीर बाळकृष्ण भिकाजी, मु.पो. खांबा,ता.संगमनेर,जि.अहमदनगर, चेअरमन सॅम्प्रो संस्था, संगमनेर.

२१) देशमुख रणजितसिंह विजयसिंह, मु.पो.अंभोरे, ता.संगमनेर, जि.अहमदनगर.

२२) देशमुख एस.टी. अमृतवाहिनी इंडस्ट्रीयल ट्रेनिंग कॉलेज संगमनेर, ता.संगमनेर,जि.अहमदनगर.

२३) पन्हाळे गणपत नारायण, मु.पो.अकोल,ता.अकोले.

२४) पंडीत अमित वल्लभराय, चेअरमन श्री.भाऊसाहेब संतुजी थोरात अमृतवाहिनी सहकारी बँक लि.घुलेवाडी, मु.पो.संगमनेर,ता.संगमनेर, जि.अहमदनगर.

२५) पाटील डॉ.अशोक, मथुराबाई दंत महाविद्यालय, संगमनेर, ता.संगमनेर, जि.अहमदनगर.

२६) उबाळे प्रताप जनार्दन, मॅनेजर, राजहंस दुध संघ,संगमनेर.

२७) बोऱ्हाडे भिकाजी होनाजी, मु.पो.सायखिंडी, ता.संगमनेर,जि.अहमदनगर.

२८) राहाणे रामनाथ भाऊराव, मु.पो.चंदनापुरी, ता.संगमनेर,जि.अहमदनगर.

२९) जाधव संजय- ग्रामसेवक जोर्वे,ता.संगमनेर,जि.अहमदनगर.

३०) विखे एस.पी. संगमनेर, ता.संगमनेर,जि.अहमदनगर.प्राचार्य,इंजिनिअरींग कॉलेज, संगमनेर.

३१) हजारे एस.डी.,प्राचार्या- अमृतवाहिनी मॉडेल स्कूल, संगमनेर, ता.संगमनेर, जि.अहमदनगर.

३२) हंडाळ किसन त्रिंबक,मु.पो.पाथर्डी,ता.पाथर्डी.

३३) सातपुते रामनाथ भाऊराव, मॅनेजर, हत्ति विडी कारखाना, बाजारपेठ, संगमनेर.

३४) क्षत्रिय प्रकाश प्रल्हाद, भिकुसा विडी, कारखाना मालक, संगमनेर, ता.संगमनेर.

३५) मुलाखत : पाटील सुरेश रामभाऊ, स्टेशनरी विभाग प्रमुख, मुख्य शाखा : अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, अहमदनगर.दि.२०/०७/२०१७.

३६) वाघ रामदास काशिनाथ, उपाध्यक्ष, अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, अहमदनगर, दि.१५/०६/२०१७.

३७) वर्पे रावसाहेब लक्ष्मण, मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य शाखा-अहमदनगर जिल्हा सहकारी बँक,अहमदनगर, दि.२०/०७/२०१७.

**ब) दुय्यम साधने :-**

**ब-१**

१) आवाळे मनोज - 'पंचायतराज' प्रकाशक - आवाळे एस.एम. , प्रकाशन - आदिक्षेत्र प्रकाशन,पुणे ४३, नववी आवृत्ती मे.२०१५.

२) अंतरकर अरुणा - 'कथा आधुनिक दंडकारण्याची' प्रकाशक - लाटकर उल्हास चिंतामणी, प्रकाशन - अमेय प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती ७ जुलै २००८.

३) आठरे आबाजी, "भरतासारखा भाऊ", आठरे चंद्रभान पाटील, अलांचित चंद्रमा, चंद्रभान आठरे पाटील, स्मृतीग्रंथ, अहमदनगर १९९०.

४) कोठेकर शांता, 'इतिहास तंत्र आणि तंत्वज्ञान' प्रकाशक - पुराणिक ललिता, प्रकाशन, श्रीसाईनाथ धरम पेठ, नागपूर, तिसरी आवृत्ती, १५ फेब्रु.२०११.

५) कोलारकर शं.गो. 'मराठयांचा इतिहास' प्रकाशक- श्री.मुजुमदार प्रसन्न, प्रकाशन -श्री.मंगेश प्रकाशन नागपूर, पाचवी आवृती २००३.

६) कडू पी.बी. 'क्रांती पंढरीचा वारकरी' प्रकाशक - कडू अरुण पुंजाजी, प्रकाशन जिनियस प्रिंटर्स प्रा.लि.मुंबई, द्वितीयावृत्ती- सप्टे.२००४.

७) केतकर कुमार - 'कथा स्वातंत्र्याची' प्रकाशक श्री.एन.के.राठोड, प्रकाशन- महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,पुणे, प्रथमावृत्ती- २००४.

८) कोठेकर शांता, वैद्य सुमन'आधुनिक भारताचा इतिहास', प्रकाशिका, ललिता पुराणिक प्रकाशन-श्री साईनाथ प्रकाशन,नागपूर, सहावी आवृत्ती २००९.

९) कसबे रावसाहेब, लामखडे मा.रा.- 'शेती आणि सहकार' थोरात भाऊसाहेब गौरवग्रंथ, प्रकाशक - बाळासाहेब गुंजाळ, संगमनेर प्रकाशन - विश्वकर्मा मुद्रणालय, पुणे.

१०) कुंटे भ.ग. स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोष, खंड पहिला, प्रकाशक, कार्यकारी संपादक व सचिव, दर्शनिका विभागा, महाराष्ट्र शासन, मुंबई,प्रकाशन वर्ष १९७९.

११) गंधे नारायण - प्रवराकाठची संस्कृती, प्रकाशक चंद्रकुमार गंधे, प्रकाशन ज्ञानेश पिंटर्स संगमनेर, प्रथमाआवृत्ती १९८७.

१२) गवंडी पुंडलिक - 'लाल सुर्य' प्रकाशन - अमोल प्रकाशन, पुणे १९९९.

१३) गाठाळ एस.एस.,मराठयांचा इतिहास व संस्कृति, प्रकाशक,अंतकरे के.एस.,प्रकाशन - कैलास प्रकाशन, औरंगाबाद,प्रथम आवृत्ती जुलै २००८.

१४)	घाणेकर वि.वि.-'सहकार चळवळीचे १०० वर्षाचे अवलोकन व नवी आव्हाने', प्रकाशन-इन्स्टीटयुट ऑफ रुरल डेव्हलपमेंट ॲण्ड एज्युकेशन, रत्नाकर बंगला, आपटे रोड पुणे, प्रकाशक - प्रकाश मुद्रणालय, सदाशिवपेठ, पुणे, ०३०, प्रथम आवृत्ती २० ऑ.२००४.

१५)	जोशी सु.ह.'महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्रे' प्रकाशक -पाष्टे दत्तात्रय ग., प्रकाशन- डायमंड पब्लिकेशन, पुणे आवृत्ती- प्रथम आवृत्ती, १ जानेवार २०१०.

१६)	जिओनो जॉ.- 'झाड लावणारा माणूस' अनु.माधुरी पुरंदरे, प्रकाशक दिलीप माझगावकर, प्रकाशन - राजहंस प्रकाशन सदाशिव पेठ पुणे, तृतीय आवृत्ती, ऑक्टो.२००५.

१७)	टेमकर राजधर- 'पार्थभुमी भूषण' दादा पाटील राजळे, चरित्रग्रंथ- प्रकाशक -लाटकर उल्हास चिंतामणी , प्रकाशन- अमेय प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती जुलै १९९९.

१८)	देव प्रभाकर- इतिहास शास्त्र संशोधन, "अध्यापन आणि लेखन परंपरा", प्रकाशक, हर्षल रमेश वरखेडे, प्रकाशन, ब्रेन टॉनिक, प्रकशन- पाईप लाईनरोड, नाशिक, आवृत्ती पहिली, ऑ.२००७.

१९)	दास्ताने संतोष - 'महाराष्ट्र',संपादक, दास्ताने संतोष प्रकाशन दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे-१९९९.

२०)	देशपांडे द.ग.- 'महाराष्ट्रातील किल्ले' प्रकाशक - डायमंड पब्लिकेशन, सदाशिव पेठ पुणे, प्रथम आवृत्ती, २९ ऑक्टोबर २००९.

२१)	पवार जयसिंगराव - 'मराठी सत्तेचा उदय' प्रकाशक, दिनेश के.थुरीया, प्रकाशन- निराली प्रकाशन,पुणे, द्वितीय आवृत्ती, जाने.२००१.

२२)	पवार जयसिंगराव - 'हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास' प्रकाशक - सौ.भाग्यश्री मोरेश्वर फडके, प्रकाशन - अथर्व अपार्टमेंट फ्लॅट नंबर १०, दुधाळी कोल्हापूर, सातवी आवृत्ती नोव्हे २००५.

२३)	पठाण के.जी. संदर्भ- 'महाराष्ट्र राज्य व जिल्हे एक दृष्टीकोन', खंड दुसरा, प्रकाशक- इंटेलेक्च्युअल बुक ब्युरो, प्रथम आवृत्ती २००५.

२४)	पाठकनाथ विठ्ठल, 'अहमदनगर जिल्हयातील स्वातंत्र्य संग्राम', अहमदनगर ऐतिहासिक वस्तुसंग्राहालय, अहमदनगर. १९९३.

२५) प्रधान ग.प्र. स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत,प्रकाशक- साधना प्र.स. प्रकाशन साधना प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती ११ जुन २००४.

२६) बिपिन चंद्र - 'इंडियन आफ्टर इंडिपेन्डस' प्रकाशक - क्षीरसागर व्ही. एस. प्रकाशन, के.सागर प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती २००९

२७) भावे मधुकर - 'यशवंतराव ते विलासराव' प्रकाशन -मनोविकार प्रकाशन,पुणे-३०, प्रथम आवृत्ती-२००८

२८) भामरे आर.पी., शहा जी.बी. 'आधुनिक भारताचा इतिहास' १८५७-१९५०., प्रकाशक - श्रीरंगराव पाटील- प्रकाशन - प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, प्रथम आवृत्ती २०१४.

२९) भावे सविता - 'कृषी क्रांतीचे सेनानी' अण्णासाहेब शिंदे- प्रकाशक, लाटकर चि.स.- प्रकाशन कल्पना मुद्रणालय, सदाशिव पेठ,टिळक रस्ता,पुणे- ०३०.

३०) महाजन मुंकुद - 'भारतीय बँक प्रणाली' प्रकाशन निराली प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती जुन, २०१४.

३१) मिरिकर सरदार - 'वैभवशाली अहमदनगर पैस'७० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, अहमदनगर १९९७.

३२) मेहेदळे डॉ.विश्वास, यशवंतराव चव्हाण ते पृथ्वीराज चव्हाण,अनुबंध प्रकाशन,पुणे.

३३) राजदेरकर प्रा.सुहास मधुकर - इतिहास लेखनशास्त्र, प्रकाशक - श्री.प्रमोद गुणे, प्रकाशन, विद्या प्रकाशन,रुईकर रोड, नागपूर, प्रथमावृत्ती १९९८

३४) शेवाळे विठ्ठल म.- 'आपला अकोले तालुका' संपादक शेवाळ वि.म., प्रकाशन- आनंद प्रिंटर्स सावता माळी नगर, संगमनेर,जि.अहमदनगर, प्रथम आवृत्ती, डिसेंबर २०१५.

३५) शेवाळे विठ्ठल, 'सहयाद्रीच्या कुशीत' प्रकाशक - वनविहार, प्रकाशन - संगमनेर, प्रथमावृत्ती सप्टें.२००६.

३६) शिंदे रावसाहेब - 'शिक्षण आणि समाज' प्रकाशक - लाटकर उल्हास चिंतामणी, प्रकाशन - अमेय प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती ऑ.२००१.

३७) शिंदे रावसाहेब - 'ध्यासपर्व' प्रकाशक - लाटकर उल्हास चिंतामणी, प्रकाशन - अमोल प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, १३ जाने.२००५.

३८) शिंदे रावसाहेब, 'चरित्र आणि चारित्र्य' प्रकाशक - लाटकर उल्हास चिंतामणी, प्रकाशन - अमोल प्रकाशन पुणे, द्वितीयावृत्ती, २५ ऑगस्ट २००१.

३९) शिरसाठ शाम बैनाडे, प्रा.भगवानसिंग - 'पंचायतीराज आणि नागरी प्रशासन' प्रकाशक शशिकांत पिंपळापुरे, प्रकाशन - विद्या बुक्स पब्लीशर्स औरंगपूरा, औरंगाबाद, सुधारीत आवृत्ती ऑ.२००४.

४०) शेख गफूर - 'आधुनिक भारताचा इतिहास' प्रकाशक - श्री.कैलास पाटील, प्रकाशन, प्रितम पब्लिकेशन्स, प्रथामवृत्ती जुन २००५.

४१) शेवाळे वि.म., 'सहयाद्रीच्या कुशीत', वनविहार प्रकाशन,संगमनेर.

४२) सवदी ए.बी. 'महाराष्ट्राचा सामान्य भूगोल' प्रकाशक - निराली प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती मे २००२.

४३) सरदेसाई बी.एन.,'इतिहास लेखनशास्त्र', प्रकाशक- भाग्यश्री मोरेश्वर, फडके प्रकाशन,नागपुर, पहिली आवृत्ती, एप्रिल २००२.

४४) साळी चेतन शंकर - संदर्भ महाराष्ट्र राज्य व जिल्हे एक दृष्टीकोन, प्रकाशक - श्री.संजय शर्मा, प्रकाशन,इंटेलेक्चुअल बुक ब्युरो, नारायण नगर, होशंगाबाद रोड, भोपाळ, खंड - २ प्रथामवृत्ती २००५.

**ब-२ भाषण :-**

**अध्यक्षीय भाषण :** भाऊसाहेब थोरात, अध्यक्ष अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक वार्षिक सर्वसाधारण सभा १२ नोव्हे.१९९८.

**अध्यक्षीय भाषण :** भाऊसाहेब थोरात, अध्यक्ष, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक वार्षिक सर्वसाधारण सभा, ६ नोव्हे.१९९६.

**ब-३ प्रबंध :**

१) **प्रबंध :** पीएच.डी.प्रबंध - डॉ.राजदेव टी.बी. "कॉ.दत्ता देशमुख यांचे महाराष्ट्राच्या जडणघडणीतील योगदान" इतिहास विभाग - डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद २००१.

२) **एम.फिल प्रबंध :** प्रा.सोनवणे दिंगबर जनार्दन, "अहमदनगर जिल्हयातील थोर स्वातंत्र्य सेनानी सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांचे स्वातंत्र्य संग्रामातील योगदान, अमरावती विद्यापीठ, अमरावती,वर्ष १९९९.

३) **पीएच.डी. प्रबंध :** (राज्यशास्त्र) राठोड हेमलता अरविंद- " सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात व्यक्ती व कार्य, राजकारणातील व सहकारातील योगदान, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे. वर्ष २००९.

**ब-४ स्मरणिका / गौरविका :-**

१) आठरे चंद्रभान` पाटील - 'अलांच्छित चंद्रमा' चंद्रभान आठरे पाटील, स्मृतीग्रंथ, अहमदनगर १९९०.

२) महाराष्ट्र राज्य सहकारी संघ - सुवर्ण महोत्सव स्मृतीग्रंथ, इ.स. १९७१, लेख वैकुंठभाई मेहता.

३) स्मरणिका रौप्य महोत्सवी स्मरणिका - 'यशोधन' सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्यादित संगमनेर, सन १९७७-२००२.

**ब-५ विशेष अंक :-**

१) थोरात भाऊसाहेब - 'कर्मयोगी' अमृत महोत्सवी गौरवग्रंथ, संपादक - जगदीश आसोपा, १२ जाने.२००६.

२) दैनिक सकाळ -सकाळ कार्यालय,वर्धापनदिन विशेषांक - 'भ्रंमती' २ एप्रिल २००८.

३) दर्शन अंक, विचारदर्शन

४) साप्ताहिक - 'यज्ञ' संगमनेर २४ जानेवारी ते ६ फेब्रुवारी २००५.

५) काटे बा.ल., प्रकाशन संगमनेर महाविद्यालयाचा दर्शन अंक, चि.स.अटकुर, कल्पना मुद्रणालय, टिळकरस्ता, विचारदर्शन,पुणे.

६) परिवर्तन : संपादक, गडाख शंकरराव यशवंतराव, सुवर्ण महोत्सवी वर्ष, अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, अहमदनगर. वर्ष १९५८ ते २००८.

७) अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, अहमदनगर. " कर्ज विषयक धोरण" माहिती पुस्तिका, भाग -२, वर्ष १९९८- १९९९.

८) अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, अहमदनगर. " कर्ज विषयक धोरण" माहिती पुस्तिका, विशेष अंक,भाग-२, वर्ष १९९५- १९९६.

९) अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, अहमदनगर. " कर्ज विषयक धोरण" माहिती पुस्तिका, भाग -२, वर्ष १९९७- १९९८.

## ब-६ मासिके :-

१) जोशी एम.ए. नगर जिल्हा, ऐतिहासिक वस्तू संग्रहालयाचे 'त्रैमासिक'-नोव्हेंबर १९७७.

२) पाठकनाथ विठ्ठल-'अहमदनगर जिल्हयातील स्वातंत्र्यसंग्राम' अहमदनगर ऐतिहासिक वस्तूसंग्रहालय, अहमदनगर, त्रैमासिक अंक -१९९३.

## ब-७ अध्यक्षीय भाषण :-

१) थोरात भाऊसाहेब संतुजी - अध्यक्षीय भाषण, ३८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा पुस्तिका, अहमदनगर जिल्हा सहकारी बँक अहमदनगर, वर्ष १९९५.

२) थोरात भाऊसाहेब संतुजी - अध्यक्षीय भाषण, ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा पुस्तिका, अहमदनगर जिल्हा सहकारी बँक अहमदनगर, वर्ष १९९९.

## ब-८ रजिस्टर :-

३) सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात सहकारी साखर कारखाना, कर्ज वितरण रजिस्टर क्रं.८. सन १९९२.

४) सहयाद्री संस्था रजिस्टर क्रं.५,सन १९७०.

५) अहमदनगर जिल्हा सहकारी बँक अहमदनगर, विनियोग तपासणी रजिस्टर नं.५, वर्ष १९९५ ते २००० पर्यंत.

## ब-९ वृत्तपत्रे :-

६) दै.लोकमत, द्विशतकपूर्ती 'नवी आशा नवी दिशा', दि.१५ ऑ.२००७.

७) दैनिक सार्वमत - श्रीरामपूर, आवृत्ती दि.१६ मार्च २०१०.

८) दैनिक सकाळ - वर्धापन दिन विशेष अंक, २ एप्रिल २००८.

## ब-१० इंटरनेट लिंक्स :-

1) http;mr.Wikipedia.org/s/19x.
2) www.wikipedia.com.
3) Wikipedia,The free enclopedia.
4) www.mpsworld.com
5) www.marathi vishwakosh.in
6) www.ahmednagar Wikipedia.in
7) Maharashtra rajaysahakari bank.com

# परिशिष्टे

## परिशिष्ट क्रमांक-१

### स्वातंत्र्यपूर्व व स्वात्र्योत्तर काळात भाऊसाहेब थोरात यांच्या कार्याचे कार्यक्षेत्र असणाऱ्या अहमदनगर जिल्हयातील तालुके दर्शविणारा अहमदनगर जिल्हयाचा नकाशा



# परिशिष्ट क्रमांक-२

## भाऊसाहेब संतुजी थोरात यांना स्वातंत्र्यपूर्व स्वातंत्र्य चळवळीत व स्वातंत्र्योत्तर सहकार क्षेत्रात खंबीर साथ देणारे सहकारी

| अ.नं. | मुलाखत कर्त्याचे नाव | वय वर्ष |
|---|---|---|
| १) | खताळ बी.जे. | ९८ |
| २) | कडू पुंजाजी बापुजी | ९५ |
| ३) | कर्पे लहानु गजाबा | ९० |
| ४) | कानवडे माधवराव सावळेराम | ७० |
| ५) | कुटे भाऊसाहेब दामोधर | ७५ |
| ६) | गंगाधक्ते बबनराव राजधर | ८५ |
| ७) | खेमनर बाजीराव खंडूजी | ७५ |
| ८) | दातीर बाळकृष्ण भिकाजी | ७३ |
| ९) | थोरात पंडीतराव संतुजी | ७९ |
| १०) | बोऱ्हाडे भिकाजी होनाजी | ७२ |
| ११) | गायकर सिताराम कोंडाजी | ७३ |
| १२) | राहणे रामनाथ भाऊराव | ७२ |
| १३) | तांबे सुधिर भास्कर | ६२ |
| १४) | थोरात बाळासाहेब भाऊसाहेब | ६४ |
| १५) | तांबे दुर्गाताई भास्कर | ५८ |
| १६) | कानवडे माधवराव सावळेराम | ७३ |
| १७) | देशमुख रणजितसिंह विजयसिंह | ५० |
| १८) | पंडीत अमित वल्लभराय | ६० |
| १९) | हजारे एस.डी. | ५० |
| २०) | चौधरी एस.आर. | ६५ |

# परिशिष्ट क्रमांक-३

## भाऊसाहेब थोरात यांनी स्थापन केलेल्या सहकारी संस्थांना मिळालेले पुरस्कार

| अ.नं. | मिळालेले पुरस्कार | वर्षे |
|---|---|---|
| १) | आय.एस.ओ.२००९ हे आंतरराष्ट्रीय नामांकन प्रमाणपत्र सर्वप्रथम संगमनेर सहकारी साखर कारखान्यास शरदचंद्र पवार यांचे शुभहस्ते प्रदान | १९९९ |
| २) | सहकार क्षेत्रातील कार्याबद्दल गुलाबराव पाटील सहकार गौरव पुरस्कार खासदार सुशिलकुमार शिंदे यांचे हस्ते सांगली येथे प्रदान | २१ जानेवारी १९९९ |
| ३) | कुसुमाग्रज स्मृती प्रित्यर्थ मास्टर दिनानाथ मंगेशकर स्मृती प्रतिष्ठाणचा समाजसेवेचा आनंदमयी पुरस्कार लता मंगेशकर यांचे हस्ते प्रदान | २४ एप्रिल १९९९ |
| ४) | किसनवीर सातारा सहकारी साखर कारखाना भुईज, जि.सातारा यांचेवतीने देण्यात येणारा किसनवीर सामाजिक पुरस्कार आ.रामदास फुटाणे यांचे हस्ते प्रदान. | २२ ऑगस्ट २००० |
| ५) | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन्स यांचे वतीने देण्यात येणार सहकारी क्षेत्रातील अतुलनीय कार्यासाठी देण्यात येणारा जीवनगौरव पुरस्कार मुंबई येथे खा.शरद पवार यांचेहस्ते प्रदान | २५ सप्टें.२००० |
| ६) | सामाजिक व शैक्षणिक क्षेत्राबद्दल पुणे विद्यापीठाचा जीवन साधना गौरव पुरस्कार | २००१ |
| ७) | वसंतदादा शुगर इन्स्टीटयुट तर्फे सर्वोत्कृष्ठ नाविण्य प्रस्थापक साखर कारखाना म्हणुन संगमनेर कारखान्यास पुरस्कार | २००४ |
| ८) | वसंतदादा शुगर इन्स्टीटयुट तर्फे सर्वोत्कृष्ठ नाविण्य प्रस्थापक साखर कारखाना म्हणुन संगमनेर कारखान्यास पुरस्कार | १८ फेब्रुवारी २००५ |

| अ.नं. | मिळालेले पुरस्कार | वर्षे |
| --- | --- | --- |
| ९) | दंडकारण्य अभियाना संदर्भात अण्णासाहेब शिंदे यांचा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान. | २००७ |
| १०) | भारतीय जैन संघटनेच्या वतीने शांतीभुषण पुरस्कार | ३१ मार्च २००७ |
| ११) | स्वातंत्र्य सैनिक पुरस्कार राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांचे हस्ते पुरस्कार | ९ ऑगस्ट २००८ |
| १२) | सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल नरुभाऊ लिमये स्मृती आर्यभुषण पुरस्कार मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचे हस्ते | २५ मे २००९ |

# परिशिष्ट क्रमांक-४

**Normal Roll of Security Prisoners of I & II Confined in to Nasik central prisoners on 1943.**

**स्वातंत्र्य सेनानी भाऊसाहेब थोरात स्वातंत्र्य चळवळीतील सहभागातुन नाशिक सेंट्रल जेलमध्ये इ.स.१९४३ साली कैदेत असतांनाचे मुंबई पुराभिलेखागारामध्ये उपलब्ध झालेला पुरावा. त्यात भाऊसाहेबांचा Sr.No.२२२, Register No. ८४९, Class - II चे ते कैदी होते.**





## परिशिष्ट क्रमांक - ५

### भाऊसाहेब थोरात यांच्या सहकारी संस्थांना मिळालेले पुरस्कार



## परिशिष्ट क्रमांक - ६

## भाऊसाहेब थोरात यांना मान्यवरांचे गौरोद्‌गारपर पत्र /लेख



अण्णासाहेब शिंदे
शिंदे बंगला, श्रीरामपूर,
जि. अहमदनगर (महाराष्ट्र)
दूरध्वनी : 2796 श्रीरामपूर.
शेती फार्म : 44 कोल्हार बु।।

दिनांक : 2/1/1988

माननीय श्री. मधुकर बुवा यांना,
स. न. वि. वि.

श्री. भाऊसाहेब थोरात यांच्या जीवनासंबंधी तुम्ही विशेषांक प्रसिध्द करीत आहात. हे वाचून आनंद झाला. श्री. भाऊसाहेब थोरात हे महाराष्ट्रातील थोर कार्यकर्ते आहेत. स्वातंत्र्य लढयातही त्यांनी बहुमोल कामगिरी केलेली आहे. एवढेच नव्हे तर, स्वातंत्र्य लढयासाठी स्वतःचा जीव देखील त्यांनी धोक्यात घातला होता. अतिशय निःस्वार्थीपणाने त्यांनी उभे जीवन राष्ट्र कार्यासाठी आणि राष्ट्राच्या बांधणीसाठी खर्च केले. रचनात्मक क्षेत्रात त्यांनी केलेल्या कामाचे वर्णन करण्यास शब्दही अपुरे पडतील. श्री. भाऊसाहेब थोरात हे उत्तम संघटक तर आहेतच पण आधुनिक प्रकल्प उभारण्यात त्यांचा हातखंडा आहे. त्यांच्या जीवनावर लेख लिहिण्यात मला विशेष समाधान मिळाले असते. तथापी, अलिकडे माझी तब्येत बरी नाही. त्यामुळे मी आपणास लेख पाठवू शकत नाही याबद्‌दल दिलगिर आहे. तुमच्या विशेषांकास माझ्या हार्दिक शुभेच्छा.

आपला नम्र,

(अण्णासाहेब शिन्दे)

सत्यमेव जयते

# शरद पवार

**नेता, प्रतिपक्ष**

**लोकसभा**

नगर जिल्ह्यातील थोर स्वातंत्र्यसेनानी व महाराष्ट्रातील सहकार चळवळीचे ज्येष्ठ नेते म्हणून मा. श्री. भाऊसाहेब थोरात यांचा परिचय उभ्या महाराष्ट्राला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात १९४२ च्या चळवळीत भूमिगत राहून, सर्वसामान्य माणसांमध्ये जागृती करून, खेडोपाडी पायी फिरून, प्रसंगी ब्रिटिश सरकारशी मुकाबला करून या चळवळीचा अग्रणी कार्यकर्ता म्हणून ते महाराष्ट्राला परिचित आहेत. कै. अण्णासाहेब शिंदे, धर्माजी पोखरकर, कै. पी. जी. भांगरे, कै. अहिरे, श्री. बी. बी. कडू व कै. बुवासाहेब, श्री. नवले अशा असंख्य स्वातंत्र्यसेनांनीबरोबर नगर जिल्ह्यात– विशेषतः संगमनेर, अकोले तालुक्यांत स्वातंत्र्याचा लढा उभारण्याचे काम त्यांनी यशस्वीपणे केलेले आहे. स्वातंत्र्याच्या लढ्याबरोबरच सामाजिक, राजकीय, शैक्षणिक जागृतीचे काम त्यांनी खेडोपाडी विविध सभांच्या माध्यमातून केलेले आहे.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वराज्याचे सुराज्य करण्यासाठी, लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सहकार माध्यमाच्या धोरणांची निवड भाऊसाहेब थोरात यांनी केली. गावच्या सोसायटीपासून ते तालुका संघापर्यंत, सहकारी सुपरवायझिंग युनियन, मार्केट कमिटी ते सहकारी साखर कारखाना, इत्यादी संस्थांमार्फत संगमनेर, अकोले तालुक्यांतील शेतकऱ्यांना स्वाभिमानी व स्वयंभू करण्याचा फार मोठा प्रयत्न त्यांनी केला. त्यांच्या सहकार क्षेत्रातील कामाचा लौकिक म्हणजे आज महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण देशात अग्रणी समजला जाणारा संगमनेर भाग सहकारी साखर कारखाना हा होय.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सतत चळवळ व शेतकऱ्यांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळवून देण्यात मा. श्री. भाऊसाहेबांनी महत्त्वाचा वाटा उचललेला आहे. राज्य सहकारी बँकेचे अध्यक्षपद भूषवून महाराष्ट्राच्या सहकार चळवळीला बलशाली करण्याचे काम त्यांच्याकडून झालेले आहे. शेतीसाठी, पिण्यासाठी पाणी या प्रश्नांसाठीही त्यांनी आपले लक्ष केंद्रित केले व शेतकऱ्यांना सातत्याने पाणी मिळवून देण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी केलेले आहे. शेतीबरोबरच शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसायाचे महत्त्व ओळखून, त्या व्यवसायाला त्यांनी संगमनेर-अकोले तालुक्यांत चालना दिली व शेतकऱ्याला दोन पैसे मिळवून देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. शिक्षणाशिवाय कष्टकरी माणूस सुखी होणार नाही, ही जाणीव ठेवून त्यांनी संगमनेर-अकोले तालुक्यांत शैक्षणिक विकासासाठी अनेक संस्थांच्या माध्यमातून अनेक शिक्षण संस्था उभारलेल्या आहेत.

राजकीय क्षेत्रात त्यांनी नगर जिल्हा व महाराष्ट्राला आपल्या परखड भाषेत व मतांद्वारे योग्य मार्गदर्शन सातत्याने केलेले आहे.

शांत व प्रेमळ, तसेच गरिबांची कणव असणारा एक आदर्श नेता म्हणून भाऊसाहेबांकडे पाहिले जाते. आज वयाच्या ७५ व्या वर्षीही तरुणाला लाजवेल, अशा हिरिरीने ते सार्वजनिक कामे सातत्याने अथकपणे पार पाडीत आहेत.

मा. श्री. भाऊसाहेब थोरात यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्ताने महाराष्ट्राच्या जनतेच्या वतीने मी त्यांना शुभकामना व्यक्त करीत आहे. त्यांना उत्तम आयुरारोग्य लाभावे व महाराष्ट्राची, तसेच, देशाची सेवा करण्याची अशीच संधी लाभो.

शरद पवार

(शरद पवार)

# परिशिष्ट क्रमांक - ७

## वृत्तपत्र कात्रणे व फोटो







दै.सार्वमत १९९५

दै.सार्वमत दि.१८/०६/२०१०








दै.सार्वमत दि.१५ जुन २००८

## सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांना 'श्री शांतीभूषण' पुरस्कार

### शनिवारी नाशिकला पुरस्काराचे वितरण



संगमनेर (प्रतिनिधी):- भारतीय जैन संघटनेच्या वतीने दिला जाणारा या वर्षीचा श्री शांती भूषण पुरस्कार अमृत उद्योग समूहाचे संस्थाचे संस्थापक सहकार महर्षी भाऊसाहेब संतूजी थोरात यांना जाहीर झाला असून या पुरस्काराचे वितरण येत्या शनिवार दिनांक ३१ मार्च रोजी नाशिक येथे आयोजित केलेल्या वितरण सोहळ्यात करण्यात येणार आहे.

सहकार क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देऊन महाराष्ट्राच्या सहकाराला योग्य दिशा देणारे, संगमनेर तालुक्याचे भाग्यविधाते अमृत उद्योग समूहाचे संस्थापक सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या कार्याचा गौरव म्हणून हा पुरस्कार देण्यात येणार असून भारतीय जैन संघटना, उत्तर महाराष्ट्र (नाशिक) विभागातर्फे या वर्षीचा पुरस्कार सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्याबरोबरच नाशिक येथील उद्योजक राधाकिसन चांडक, पत्रकार किरण अग्रवाल, सामाजिक कार्यकर्त्या सौ. सिंधूताई सपकाळ, सौ. अश्विनीताई बोरस्ते, तर शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय काम केल्याबद्दल नेमीनाथ जैन ब्रह्मचर्या आश्रम हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

शनिवार दि. ३१ मार्च रोजी दुपारी २.३० वाजता नाशिक येथील परशुराम सायखेडकर नाट्यगृह, नेहरू गार्डन जवळ नाशिक येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास भारतीय जैन संघटनेचे राष्ट्रीय महामंत्री ॲड. प्रकाशचंद्र सुराणा, माजी लोकसभा सभापती मनोहर जोशी, नाशिक महानगरपालिकेचे महापौर विनायक पांडे, जैन कॉन्फरन्स दिल्लीचे राष्ट्रीय अध्यक्ष किशोर खाबीया तसेच अहमदनगर अर्बन को-ऑपरेटीव्ह बँकेचे चेअरमन हस्तीमलजी मुनोत यांची उपस्थिती लाभणार आहे.

या कार्यक्रमास हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन हेमराज खाबीया, सुमतीलाल गांधी, डॉ. वसंत बोरा, दिलीप बोरा, दीपक चोपडा, डॉ. सी. एच. बागरेचा, मनोज ललवाणी आदींनी भारतीय जैन संघटनेच्या वतीने केले आहे.

ज्येष्ठ नेते भाऊसाहेब थोरात यांना निश्चित झालेल्या या पुरस्कारामुळे अनेक कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**दै.सकाळ दि.३१/०३/२००७**

## प्रत्येक भारतीयाने स्वातंत्र्याचा इतिहास जाणून घ्यावा : थोरात

सकाळ वृत्तसेवा

संगमनेर, ता. १३ : प्रत्येक भारतीयाने स्वातंत्र्याचा इतिहास जाणून घ्यावा व मगच परकियांच्या पाशातून मुक्त झालेले स्वातंत्र्य अनुभवावे, असा बहुमोल सल्ला भाऊसाहेब थोरात यांनी दिला आहे.

क्रांतिदिनी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते श्री. थोरात यांना सन्मानित करण्यात आल्याबद्दल संगमनेर साखर कारखाना व अमृत उद्योगसमूहातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. या वेळी अध्यक्ष ॲड. माधवराव कानवडे, उपाध्यक्ष मधुकर नवले, कार्यकारी संचालक अनिल शिंदे, जे. बी. घुगरकर उपस्थित होते.

श्री. थोरात म्हणाले, "स्वातंत्र्याचा इतिहास आजच्या नव्या पिढीला करून देणे अत्यंत गरजेचे आहे. प्राणाची बाजी लावून ब्रिटिशांच्या जुलमी जोखडातून देश मुक्त करण्यासाठी स्वातंत्र्यसैनिकांना किती यातना सहन कराव्या लागल्या, अनेकांना प्राण गमवावे लागले, अनेकांचे संसार मातीला मिळाले, अनेक जण देशोधडीस लागले. हा सारा इतिहास जनतेसमोर प्रभावीपणे मांडणे गरजेचे आहे. प्रत्येकाने तो अभ्यासावा व जाणून घ्यावा."

ॲड. कानवडे म्हणाले, "दादांचा राष्ट्रपतींच्या हस्ते झालेला सत्कार ही आपल्या अभिमानाची बाब आहे. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी त्यांनी केलेले काम व स्वातंत्र्य प्राप्तीनंतर या भागाच्या विकासासाठी त्यांनी उभी केलेली सहकाराची चळवळ या दोन गोष्टी त्यांच्या जीवन शैलीशी एकरूप झाल्या आहेत. त्यांच्या कामाचा प्रत्येक भारतीयाने आदर्श घ्यावा."

श्री. नवले म्हणाले, "दादांचा राष्ट्रपतींच्या हस्ते सत्कार होणेही संगमनेर-अकोलेकरांना अभिमानास्पद व चळवळी या दोन तालुक्यांतून झालेल्या आहेत."

या वेळी सर्व संचालक, वीज अभियंता राजेंद्र डोंगरे, दत्ता अभंग आदी मान्यवर उपस्थित होते.


**दै.संकाळ दि.१४/०८/२०१७**



शिवाजी शिर्के

**दै.देशदुत दि.२१/०३/२०१०**

## स्वातंत्र्य संग्रामातील क्रांतिकारक-भाऊसाहेब थोरात






**दै.गावकरी दि.१५/०३/२०१०**


**दै.सकाळ दि.०९/०८/२००८**

## परिशिष्ट क्रमांक - ८

**भाऊसाहेब थोरात यांना सन १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीत खंबीर साथ देणारे त्यांचे सहकारी कॉ.कडु पी.बी., कॉ.रावसाहेब शिंदे, कॉ.पोखरकर धर्माजी, कॉ.नवले बुवासाहेब, कॉ.कर्पे लहानु गजाबा.**









मा.राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांचे हस्ते जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक म्हणुन सत्कार स्विकारतांना मा.सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात



संगमनेर भाग सहकारी कारखान्याच्या उदघाटन प्रसंगी मा.वसंतरावजी दादा पा. व मा.अण्णासाहेब शिंदे समवेत भाऊसाहेब थोरात



महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै.वसंतराव नाईक यांचेबरोबर शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा करतांना भाऊसाहेब थोरात




महाराष्ट्राचे गृह मंत्री कै.बाळासाहेब देसाई, कै.पद्मश्री विखे पाटील व माजी सहकार मंत्री कै.विनायकराव पाटील समवेत भाऊसाहेब थोरात सहकार चळवळीविषयी चर्चा करतांना



दंडकारण्य अभियान उद्‌घाटन प्रसंगी भाऊसाहेब थोरात व इतर मान्यवर व शालेय विद्यार्थी

## मान्यवरांच्या जिल्हा बँकेच्या भेटी प्रसंगी समवेत सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात





माजी राष्ट्रपती व तत्कालीन कृषीमंत्री फकुद्दिन अली अहमद यांच्या सत्कार प्रसंगी बँकेचे तत्कालीन उपाध्यक्ष भाऊसाहेब थोरात, अध्यक्ष पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील केंद्रिय कृषि व अन्न राज्यमंत्री डॉ. अण्णासाहेब शिंदे

## परिशिष्ट क्रमांक - ९



जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक कर्पे लहानु गजाबा यांची मुलाखत घेतांना संशोधक



माजी मंत्री बी.जे.खताळ पाटील यांची मुलाखत घेतांना संशोधक



मा.श्री.थोरात पंडीत संतुजी यांची मुलाखत घेतांना संशोधक



**माजी महसुलमंत्री व विद्यमान आमदार मा.थोरात बाळासाहेब भाऊसाहेब यांची मुलाखत घेतांना संशोधक**



**मा.श्री.कानवडे माधवराव सावळेराम यांची मुलाखत घेतांना संशोधक**

अहमदनगर जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक श्री.खेमनर बाजीराव खंडुजी यांची मुलाखत घेताना संशोधक






अहमदनगर जिल्हा बँकेचे स्टेशनरी विभाग प्रमुख श्री.पाटील सुरेश रामभाऊ यांची मुलाखत घेताना संशोधक

भिकुसा विडी कारखानदार मालक क्षत्रिय प्रकाश प्रल्हाद यांची मुलाखत घेताना





कोंबडा विडी कारखान्याचे मॅनेजर श्री.गवांदे किसन आप्पाजी यांची मुलाखत घेताना संशोधक



हात्ती विडी कारखान्याचे मॅनेजर श्री.सातपुते रामनाथ रामभाऊ यांची मुलाखत घेताना संशोधक

# परिशिष्ट क्रं.७

## प्रश्नावली

**प्रश्न :-**

१) मुलाखत देणाऱ्यांचा अल्प परिचय

२) भाऊसाहेब थोरात यांच्याशी परिचय कसा झाला ?

३) भाऊसाहेब थोरात यांच्या स्वातंत्र्य चळवळीविषयी माहिती सांगा.

४) भाऊसाहेब थोरात यांच्या सामाजिक कार्याबद्दल माहिती सांगा.

५) भाऊसाहेब थोरात यांच्या राजकीय कार्याबद्दल माहिती सांगा.

६) भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासातील कार्याबद्दल माहिती सांगा.

७) भाऊसाहेब थोरात यांचे अहमदनगर जिल्हयात सहकार रुजविण्यातील कार्य सांगा.

८) भाऊसाहेब थोरात यांच्या अहमदनगर जिल्हयातील शैक्षणिक कार्याबद्दल माहिती सांगा.

९) भाऊसाहेब थोरात यांचे शेतकरी, कामगार विषयक कार्य सांगा.

१०) भाऊसाहेब थोरात यांचे सावकारशाही विरोधी लढयातील कार्य सांगा.

११) भाऊसाहेब थोरात यांचे सहकारातील कामगार विषयक कार्य सांगा.

१२) भाऊसाहेब थोरात यांनी जिल्हा बँकेतील माध्यमातुन केलेल्या जिल्हयाच्या विकासातील कार्य सांगा.

१३) भाऊसाहेबांनी जिल्हयातील दुष्काळ निवारणार्थ केलेले कार्य सांगा.

*****

## सहकारातील दिपस्तंभ



## थोर स्वातंत्र्य सैनिक भाऊसाहेब संतुजी थोरात